Since the number of candidates in the above 3 categories selected on merit and those appointed against reserved quota of 8% does not exceed 40% of the total vacancies to be filled on this occasion, besides 8 candidates selected on merit, all the 24 candidates with relaxed standard, if available will have to be appointed against the reserved quota.

**Example 2 :**

100 vacancies are to be filled. Reservation including the element of carry forward for the first three categories is as follows :-

| | Carry forward | Current Reservation | Total Reservation |
|---|---|---|---|
| Scheduled Castes | 3 | 13 | 16 |
| Scheduled Tribes | 2 | 7 | 9 |
| Denotified Tribes/Notified Tribes | 1 | 4 | 5 |
| | 6 | 24 | 30 |

In the first 100 candidates arranged in the order of merit, there are 9 Scheduled Castes, 5 Scheduled Tribes and 3 Denotified Tribes/Notified Tribes who come on merit and they will therefore, be counted against 66% general (unreserved) posts. The position will then, be as follows :-

| | Selected On merit | With relaxed standard against reserved quota including carry forward | Total |
|---|---|---|---|
| Scheduled Castes | 9 | 16 | 25 |
| Scheduled Tribes | 5 | 9 | 14 |
| Denotified Tribes/ Notified Tribes | 3 | 5 | 8 |
| | 17 | 32 | 47 |

In this case, the number of candidates selected on merit and those appointed against reserved quota including carry forward exceeds 40% of the total vacancies to be filled on this occasion. All the 17 candidates selected on merit are eligible for appointment . In order to adhere to the 40% limit, the eligible for appointment . In order to adhere to the 40% limit, the number of candidates to be taken against reserved vacancies with relaxed standard will work out as follows on pro-rata basis applicable to prescribed percentage of reservation.

| | Selected On merit | To be taken against reserved quota | Total |
|---|---|---|---|
| Scheduled Castes | 9 | 12 (16-A) | 21 |
| Scheduled Tribes | 5 | 7 (9-2) | 12 |
| Donotified Tribes/ Notified Tribes | 3 | 4 (5-1) | 7 |
| | | | 40 |

**Reservation for Backward Classes In Government Service- Implementation of in respect of Small Cadre and isolated posts -**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
General Administration Department,
Circular No. BCC-1079/155/XVI-B
Mantralaya, Bombay-400 032, Dated the 19th December, 1979

**READ :-** Government Resolution General Administration Department No. BCC-1070/ECR-J, dated the 28th May 1971.

**CIRCULAR:-** According to Government orders issued in the Government Resolution, General Administration Department, No. BCC-1070/ECR-J, dated the 28th May, 1971, if any of the vacancies reserved for the members of a particular section of the Backward Classes cannot be filled in by appointment of members of that section for want of suitable candidates ,they should be carried forward for five years subject to the proviso that the reserved vacancies and the vacancies carried forward together should not to exceed 50% of the total number of vacancies on any occasion of recruitment. To facilitate implementation of these orders it was clarified that if there be only two vacancies, one of them should be treated as a reserved vacancy but if there be only one vacancy it should be treated as unreserved. Similar clarification also appears in chapter 5 relating to "promotions" in the booklet containing orders regarding reservations and other concessions in Government Services for Backward Classes.

2. It has come to the notice of Government that the clarifications given in the booklet that if there be only one vacancy, it should be treated as unreserved, if there be two vacancies one of them should be treated as reserved and so on has been misinterpreted at all levels so as to mean that in any year if only one vacancy occurs it is to be treated as unreserved and also that the orders regarding reservation for Backward Classes in recruitment and promotion as well , would not be applicable to isolated posts and small cadres wherein only one vacancy occurs at a time. The above interpretation is not correct for the obvious reason that both 100 points roster for recruitment and 50 point roster for promotions are year to year running accounts and the vacancies occurring after the date of introduction of these rosters have to be based on progressive number each time. In order to remove the misunderstanding in this regard the entire matter has been again thoroughly examined and the Government is pleased to clarify that in cases where only one vacancy occurs in the initial recruitment year and the corresponding rosters point happens to be reserved for any of the Backward Classes, it should be treated as unreserved and filled in accordingly and the reservation carried forward to subsequent recruitment year(S), but in the subsequent recruitment year (S), even if there be only one vacancy, it should be treated as reserved against the carried forward reservation from the initial recruitment year and should be filled in by the candidate belonging to Backward Class for whom the carried forward vacancy was reserved. Similar procedure should be followed in respect of the subsequent vacancies, and reservation for various sections of Backward Classes should be made strictly in accordance with the roster points by rotation. It is only when two or more vacancies occur at a time and where there are any carried forward vacancies, the principle of not more than 50% reservation shall apply and the balance of the carried forward vacancies both from carried forward and/or current reservation will be further carried forward subsequent five years in the case of direct recruitment

and 3 years in the case of posts filled by promotion. In view of above position the clarification given in the pare 1.6 on page 2 an in sub-para (1) of para 5.3 on page 23 of the booklet containing orders regarding reservation and other concession in Government Service for Backward Classes as brought out vide Government Circular, General Administration Department, No. BCC 1078/XVI-B, dated the 31st May 1979, be treated as deleted.

2. All the appointing authorities are, therefore, requested to note the correct interpretation of the orders issued in this circular and ensure that the above Government orders are followed scrupulously while implementing the various orders regarding reservation for Backward Classes at the stage of recruitment and promotion as well.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**A. N. BATABYAL**
**Secretary to Government.**

**शासकीय सेवेत सेवा भरती वर्षात आरक्षित पदे चालू वर्षी उपलब्ध होत नसल्यास पुढील वर्षात वाढीस आरक्षण लागू करणे.............................. वर्षभरात उपलब्ध होणाऱ्या रिक्त पदांपैकी किती पदे आरक्षित गणली जातील याबाबतचे निर्देश.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्रमांक बीसीसी १०७८/८३१
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक १४ एप्रिल १९८१.

**संदर्भ क्र १)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०००/(इसीआर)-अे दिनांक २८ मे १९७१.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक १०७२/इसीआर/जे, दिनांक २७ जून १९०४.

**निर्णय**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी१०००/(इसीआर)जे, दिनांक १८ मे १९७१ अन्वये असे आदेश देण्यात आले होते की, मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदांपैकी काही पदांवर एखाद्या वर्षात जर मागासवर्गीय उमेदवारांची नियुक्ती होऊ शकली नाही तर तेवढी पदे पुढील पाच वर्षांपर्यंत आरक्षण म्हणून पुढे नेली (Carried Forward) जावेत. यास अशा प्रकारची पुढे गेलेली आरक्षित पदे व रोजगाराने नव्याने आरक्षित ठरलेली पदे यांची एकच संख्या कोणत्याही सेतु भरतीच्या प्रसंगी भरावयाच्या एकूण पदांपैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये.

२. सर्वोच्च न्यायालयाने केवळ राज्य व इतर विरुध्द एस. एस. थॉमस व इतर या खटल्यात दिलेल्या निवाड्याच्या अनुषंगाने याबाबत केंद्र शासनाने काढलेल्या आदेशाप्रमाणेच ही ५० टक्यांची मर्यादा वाढविता येईल किंवा कसे हा प्रश्न विचाराधीन होता. पूर्वीच्या वर्षामध्ये भरल्या न गेल्यामुळे पुढे नेण्यात आलेल्या (Carried Forward) आरक्षित पदांची मोठी संख्या विचारात घेता शासन असे आदेश देत आहे की, यापुढे सेवाभरतीच्या कोणत्याही एका प्रसंगी पुढे नेलेली (Carried Forward) इतर आरक्षित पदे व नव्याने आरक्षित ठरलेली पदे यांची बेरीज उपलब्ध झालेल्या एकूण पदांच्या संख्येच्या ५० टक्क्यांहून अधिक होत असली तरीही अशी पदे मागासवर्गीयांच्या नियुक्तीसाठी आरक्षित म्हणून वापरण्यात यावीत. मात्र अशा नियुक्तीमुळे संबंधीत मागासवर्गीयांची, विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त आणि भटक्या जमाती या सदरात मोडणाऱ्या व्यक्तिची संख्या त्या त्या संपूर्ण संवर्गातील व्यक्तींसाठी विहित केलेल्या आरक्षणाच्या प्रमाणापेक्षा अधिक होता कामा नये. एकदा आरक्षणाचे विहित प्रमाण भरले गेले की, त्या नंतरच्या रिकाम्या जागा भरतांना नेहमीची म्हणजे सरळ सेवा प्रवेशासाठी १०० अंकी रोस्टरप्रमाणे व पदोन्नतीसाठी ५० अंकी रोस्टरप्रमाणे मागासवर्गीयांसाठी आरक्षित व इतरांसाठी अनारक्षित पदे भरण्याची पध्दत चालू राहील.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी१०७२/बीसीआर जे, दिनांक २७ जून १९७४ अन्वये करण्यात आलेली तरतूदही शासनाने वरील संदर्भांत विचारात घेतली. या तरतुदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त व भटक्या जमातीचे निव्वळ गुणवत्तेवर अनारक्षित म्हणून निवडलेले उमेदवार

आणि मागासवर्गीय म्हणून आरक्षित पदांसाठी निवडलेले उमेदवार यांची एकुण संख्या एकूण उपलब्ध पदांच्या संख्येच्या ४०% पेक्षा जास्त असू नये असे आदेश देण्यात आले होते. वरील आदेश रद्द करुन शासन आता असे आदेश देत आहे की, निव्वळ गुणवत्तेवर निवडल्या गेलेल्या (Carried forward) गेलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त व भटक्या जमातीच्या उमेदवारांची नियुक्ती आरक्षित पदांचा हिशोब करतांना विचारात घेण्यात येऊ नये.

४. सेवा भरतीमधील मागासवर्गीयांची तूट त्वरित भरुन काढण्यासाठी या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नांवाने,

**सही :- न. वे. सुंदररावक**
**विशेष सचिव, महाराष्ट्र शासन**

**Reservation for Backward Class in Government…..limit of 30 percent for fresh and carrying forward reservation with reference to the total vocations in a recruitment year.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
General Administration Department.
Resolution No. BCC/1082/1777/XVI-B
Mantralaya, Bombay – 400 032, dated the 6th January 1983..

**READ :-** (i) Government Resolution, General Administration Department, No.. BCC-1070(ECR)-J, dated the 28th May 1971.
(ii) Government Circular. Resolution, General Administration Department, No. BCC-1079(ECR)-J, dated the 23rd May 1972.
(iii) Government Resolution, General Administration Department, No. BCC-1072 (ECR) - J, dated the 27th June 1974.
(iv) Government Circular, General Administration Department, No. BCC-1079 XVI, dated the 19th December 1979.
(iii) Government Resolution, General Administration Department, No. BCC-1078/801-XVI-B, dated the 14th April 1981.

**RESOLUTION :-** In Government Resolution, General Administration Department, No. BCC-1078/831XVI-B, dated 14th April 1981 it was directed that in future the carried forward reserved vacancies together with the current reserved vacancies would be available for utilization on any occasion even in excess of 50% of the vacancies to be filled up on such occasion subject to the condition that overall representation of Backward Classes especially of Scheduled Castes/ Scheduled Tribes and Denotified Tribes/Nomadic Tribes in the total strength in the concerned cadre or grade does not exceed the percentage prescribed for each category. The orders contained in Government Resolution, General Administration Department, No. BCC-1072/ECR-J, to scheduled Castes/Scheduled Tribes and Denotified Tribes/Nomadic Tribes upto 40% selected against reserved vacancies were also modified vide para 3 of Government Resolution General Administration Department, No. BCC-1078/831/XVI-B, dated 14th April 1981.

2. Government examined the question of continuance of the orders issued in Government Resolution, General Administration Department, No. BCC-1078/831/XVI-B, dated 14th April 1981 in the light of the recent judgement Supreme Court in the case of Akhil Bhartiya Soshit Karmachari Sagh v/s Union of India and in supper session of the orders issued in Government Resolution, General Administration Department , No. BCC 1078/831-XVI-B, dated 14th April 1981 and is pleased to direct as follows –

(i) In future fresh reservation along with the carried forward reservation should not exceed 50% of the total vacancies available on any one occasion of recruitment. The surplus above 50% should be carried forward to subsequant year of recruitment subject, however, to the condition that they do not become five recruitment years old in respect of direct recruitment and three years old in respect of promotions, which are the maximum period of carry forward reservations from year to year and lapse. In order to save lapsing of the reservation, the oldest carry forward should be accommodated first.

For example there are five carried reservations spreading over three proceeding recruitment years in the following manner :

| | SC | ST | DTNT. |
|---|---|---|---|
| 3rd year | 1 | - | - |
| 2nd year | 1 | 1 | - |
| 1st year | - | 1 | 1 |

Supposing six vacancies occur in the succeeding year, three vacancies should be reserved taking into consideration the50%limit. As the oldest carried forward reservation have to be accommodated first, one scheduled Caste of third year and one Scheduled Caste and one Scheduled Tribe of second year are to be reserved out of the six vacancies available . One Scheduled Tribe and one Denotified Tribe/Nomadic Tribe reservation of first year will be carried forward to next recruitment year and they will be considered as in the second year of carried forward in the next recruitment year.

(ii) The number if candidates belonging to Scheduled Castes and Scheduled Castes converts to Buddhism, Scheduled Tribes and Denotified Tribes/Nomadic Tribes appointed on merit together with those appointed against the reserved quota of 24% should not exceed 40% or the total vacancies to be filled on any occasion of recruitment as per the earlier instructions contained in Government Circular, General Administration Department, No. BCC-1078/BCR-J, dated 27th June 1974.

3. Orders contained in para 2 (i) above, however, will not affect the orders issued in Government Resolution, General Administration Department, No. BCC-1079/155-XVI, dated 19th December 1979 which covering the procedure regarding filling up of a single vacancy occurring in a recruitment year.

4. The above instructions will take affect from the date of issue of these orders.

5. All the Departments of Mantralaya and Heads of Departments/ offices are requested to note the above revised orders and ensure that they are scrupulously implemented.

By order and in the name of Governor of Maharashtra.

**B.K.RALVE**
**Special Secretary to the Government**

**स्थानिक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सांविधिक संस्था, महामंडळे, इत्यादी मधील मागासवर्गीय उमेदवारांसाठी राखून ठेवलेली पदे व इतर सवलती देण्याबाबत योग्य अंमलबजावणी.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्र क्रमांक बीसीसी १०८७/१६-ब मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक १२ फेब्रुवारी १९८७

**संदर्भ क्र** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईओ-१०७०/सी, दि. २५ ऑगस्ट १९७०.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक १०७२/इसीआर/जे, दि. १५ जून १९७२.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक १०७२/इसीआर/जे, दि. १७ एप्रिल १९७३.
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक १०७५/५७९/इसीआर-१६, दि. १६ जानेवारी १९७६.
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक १०७७/४९८/१६, इसीआर/जे, दि. १२ ऑक्टोबर १९७७.
६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी१०८२/१६-ब, दि. १ जून १९८२.

**परिपत्रक :-** शासनाने मागासवर्गीयांसाठी शासकीय सेवेत सरळसेवा भरती व पदोन्तीसाठी आरक्षण विहीत केले असून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी असे वेळोवळी आदेश काढले आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, या आदेशांची तंतोतंत अंमलबजावणी होत नाही.

२. शासनाने मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांसंबंधीचे धोरण व आदेश यांची व्याप्ती विविध स्थानिक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील शासकीय उपक्रम, सांविधानिक संस्था, महामंडळे इत्यादी पर्यंत वाढविली आहे. या मंडळांनी सदर आदेशांची योग्य ती अंमलबजावणी करावी या दृष्टीने शासन परिपत्रक, क्रमांक बीसीसी-१०८२/१६-ब, दिनांक १ जून, १९८२ अन्वये असे निदेशही दिलेले होते. विभागाचे आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी शासनाचा प्रतिनिधी म्हणून वस्तुस्थिती अजमावून पहाण्यासाठी आणि अशा मंडळाच्या कार्यान्वयन प्राधिकाऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी आपल्या संबंधित अधिकारितेतील कार्यालयांना भेटी द्याव्यात अशा सूचनाही देण्यात आल्या होत्या. तसेच सर्व मंत्रालयीन विभागांनाही अशी विनंती करण्यात आली होती की, त्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालये, स्थानिक मंडळे, सांविधिक मंडळे, महामंडळे इत्यादींना वर उल्लेखिलेल्याप्रमाणे भेट देणाऱ्या प्राधिकाऱ्यांना आवश्यक ती सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यासंबंधी आणि त्यांचे मार्गदर्शन व सल्ला पुरेपूर उपलब्ध करुन घेण्यासांबंधी योग्य ते निदेश द्यावेत.

३. वरील आदेशांचा या परिपत्रकाद्वारे पुनरोच्चार करण्यात येत असून मागासवर्गीयांच्या आरक्षणाविषयक व अन्य सवलती बाबत शासनाने जे आदेश काढले आहेत, त्यांची तंतोतंत अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभागांना पुन:एकदा विनंती करण्यात येते की, त्यांनी आपापल्या अधिपत्याखाली सर्व कार्यालये, निमशासकीय संस्था, वा मंडळे, महापालिका इत्यादी मध्ये शासनाचे बाबतचे आदेश पाळले जातात याची योग्य ती दक्षता घ्यावी व जरुर भासेल तेथे संबंधित कार्यालयांची तपासणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नांवाने,

**सु. रामकृष्ण.**
**विशेष सचिव (सेवा).**

**मूळ कार्यालयाचे विभाजन करुन त्याची प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने अनेक कार्यालयात विभाजन केल्यानंतर मुळ कार्यालयात असलेला मागासवर्गीयांना भरती/बढतीबाबतचा अनुशेष मूळ कार्यालयातून नवीन कार्यालयात वर्ग करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक बी.सी.सी.११८६/२२१/सीआर.३१२/८९/१६-ब,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- २३ फेब्रुवारी, १९८९.

**निर्णय :-**

एका कार्यालयाचे विभाजन करुन प्रशासकीय सोयींच्या दृष्टिने त्यातून एकापेक्षा अधिक नवीन कार्यालये निर्माण केली जातात व मुळ कार्यालयातील काही कर्मचारी व पदे नवीन निर्माण केलेल्या कार्यालयात वर्ग केले जातात. हया संदर्भात शासनाकडे विचारणा करण्यात आली आहे की, मूळ कार्यालयातील मागासवर्गीयांचा भरती/बढती बाबतचा किती अनुशेष नवीन कार्यालयाकडे वर्ग करण्यात यावी.

शासनाने याबबात विचार केला असून आता खुलासा करण्यात येत आहे की, मुळ कार्यालयातील निरनिराळ्या संवर्गातील जी पदे नव्योन निर्माण करण्यात आलेल्या कार्यालयात वर्ग करण्यात आलेली आहेत. त्या पदांच्या संख्येच्या प्रमाणात मागासवर्गीयांचा टक्केवारीनुसार वाटण्यात येणारा भरती/बढती बाबतचा अनुशेष वर्ग करण्यात यावा. म्हणजेच मुळ कार्यालयातील प्रत्येक संवर्गात किती अनुशेष होता हे पाहून त्यानुसार त्या त्या संवर्गातील किती टक्के पदे नवीन निर्माण केलेल्या कार्यालयात वर्ग करण्यात आली, त्यांच्या टक्केवारीच्या मर्यादेपर्यंत मागासवर्गीयांचा अनुशेष नवीन कार्यालयाकडे वर्ग करण्यात यावा. उदाहरणार्थ मुळ कार्यालयातील एखाद्या विशिष्ट संवार्गातून २५% पदे नवीन कार्यालयात वर्ग करण्यात आलेली असल्यास त्या पदांसदर्भात मागासवर्गीयांचा फक्त २५% च अनुशेष वर्ग करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्री.ब.गांगुर्डे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासकीय सेवेत मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदे -**

**डॉ. चक्रधर पासवान विरुध्द बिहार राज्य व इतर या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाडयाच्या संदर्भात स्पष्टीकरण...**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्र क्रमांक बीसीसी १०८८/१८१०/२३६/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १ मार्च १९८९

**पहा :-** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :बीसीसी-१०६४/चार-जे, दिनांक १६ एप्रिल, १९६५.
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :बीसीसी-१०७९/१५५/१६-ब, दिनांक १९ डिसेंबर, १९७९.

**परिपत्रक :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०६४-चार-जे, दिनांक १६ एप्रिल १९६५ द्वारे विविक्त (Isolated Post) पदे व छोटे संवर्ग यांचे मागासवर्गीय कर्मचारी भरतीसाठी गट करण्याबातचे आदेश अस्तित्वात आहेत. त्याप्रमाणे शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७९/१५५/१६-ब, दिनांक १९ डिसेंबर १९७९ मधील आदेशाप्रमाणे सुरुवतीच्या भरतीच्या वर्षी जेथे एकच पद रिकामे होईल आणि तत्सम रोस्टर अंक हा मागासवर्गीयांपैकी कोणत्याही वर्गासाठी राखीव म्हणून असेल, तरी ते पद बिनराखीव समजण्यात येऊन त्याप्रमाणे ते भरण्यात यावे आणि रोस्टर अंकाप्रमाणे आलेले आरक्षण पुढे नेण्यात यावे. परंतु त्यानंतरच्या भरती वर्षात फक्त एकच पद रिकामे झाले असले तरीही ते सुरुवातीच्या भरती वर्षापासून पुढे नेण्यात आलेल्या राखीव पदानुसार राखीव समजण्यात येऊन ज्या मागासवर्गीयांच्या विशिष्ट घटकांसाठी राखून ठेवण्यात आले होते त्या मागासवर्गीय उमेदवारांच्या नेमणूकीने भरण्यात यावे. त्यानंतरच्या रिकाम्या पदांच्या बाबतीत तशीच कार्यपध्दती अनुसरण्यांत येऊन मागासवर्गीय विविध घटकांकरिता रोस्टर अंकानुसार आळीपाळीने कोटेकोरपणे पदे राखून ठेवण्यात येऊन भरण्यात यावीत.

२. डॉ. चक्रधर पासवान विरुध्द बिहार राज्य व इतर, सिव्हिल अपिल क्रमांक : २३१५/८१ (प्रकरण क्रमांक १९७७) एसीसीसी-२१४, या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ८ मार्च १९८८ रोजी दिलेला निर्णय असा आहे की, ज्या संवर्गात फक्त एकच पद (Isolated Post) असेल तेव्हा त्या एका पदास किंवा त्या पदासंदर्भात भविष्यात निर्माण होणारी जागा यास भारतीय संविधानातील कलम १६(४) मधील तरतुदीनुसार आरक्षण ठेवल्यास त्या पदाचा एकाधिकार निर्माण केल्यासारखे होईल, म्हणजेच त्या अशा एका पदास सुरुवातीच्या भरती वर्षात अथवा त्यापुढील भरती वर्षात भरती/बढतीबाबतचे आरक्षण लागू करणे असा विधानिक ठरेल.

३. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला वरील निकाल लक्षात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, फक्त एकच पद (Isolated Post) असलेल्या संवर्गात सुरुवातीच्या अथवा त्या पुढील भरती वर्षात भरती/बढतीबाबतचे आरक्षण लागू होणार नाही व ते पद बिन राखीव म्हणून समजण्यात यावे.

४. सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी मागासवर्गीयांकरिता भरतीच्या व त्याचप्रमाणे पदोन्नतीच्या वेळी पदे राखून ठेवण्यासंबंधीच्या विविध आदेशांची अंमलबजावणी करताना वरील आदेश लक्षात घेऊन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. द. माळवे,**
**उप सचिव,**
**महाराष्ट्र शासन.**

**शासकीय सेवेत मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदे-**
**विविक्त पद - सर्वोच्च न्यायालयाचा निकाल.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्र क्रमांक बीसीसी १०८८/१८१०/२६३/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक १५ सप्टेंबर, १९८९.

**पहा :-** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन, क्रमांक : बीसीसी-१०६४/चार-जे, दिनांक १६ एप्रिल १९६५.
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन, क्रमांक : बीसीसी-१०७९/१५५/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर १९७९.
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १ मार्च, १९८९.

**परिपत्रक**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १ मार्च १९८९ अन्वये फक्त एकच पद (Isolated Post) असलेल्या संवर्गात सुरवातीच्या अथवा त्यापुढील भरती वर्षात भरती/बढती याबाबतचे आरक्षण लागू होणार नाही व ते पद बिनराखीव म्हणून समजण्यात येईल असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदरील आदेशांना पुढील आदेश होई पर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे. ही स्थगिती हया परिपत्रकाच्या दिनाकांपासून अंमलात येईल.

२. सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांनी मागासवर्गीयांकरिता भरतीच्या त्याचप्रमाणे पदोन्नतीच्या वेळी पदे राखून ठेवण्यासंबंधीच्या विविध आदेशांची अंमलबजावणी करताना वरील आदेशाची नोंद घेऊन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. द. माळवे,**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**मागासवर्गीयांसाठी राखून ठेवलेली पदे तशीच पुढे चालू ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक बीसीसी १०८९/४६६३/३५३/८९/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक ७ ऑक्टोबर, १९८९.

**पहा :-** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०७८/(ईसीआर)/-जे, दिनांक २८ मे १९७१.

## शासन निर्णय

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७८/(ईसीआर)/जे, दिनांक २८ मे १९७१ अन्वये सरळ सेवा प्रवेशाने भरती करतांना मागासवर्गीयांच्या एखाद्या विशिष्ट गटासाठी राखून ठेवलेल्या रिक्त पदांपैकी कोणतीही पदे, योग्य उमेदवारांच्या अभावी त्य गटातील उमेदवाराची नेमणूक करुन भरता आली नाहीत तर, ती आरक्षित रिक्त पदे पाच भरती वर्षापर्यंत पुढे नेऊन त्या त्या गटासाठी तशीच राखून ठेवावीत असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही नियुक्ती अधिकाऱ्यांकडून अशी आरक्षित पदे बिगर मागासवर्गीय उमेदवारांच्या नियुक्तीने भरण्यात आली आहेत. त्यामुळे मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी सहजासहजी रिक्त पदे भरतीतीत उपलग्ध होत नाहीत. शासनाच्या आदेशाप्रमाणे मागासवर्गीयांची आरक्षित रिक्त पदे आरक्षण मुक्त करुन बिगर मागासवर्गीयांच्या नियुक्तीने भरता येत नाहीत.

२. वरील आदेशांचा पुनरुच्चार करुन शासन आता अशा सूचना देत आहे की, सरळ सेवा प्रवेशाने भरती करताना मागासवर्गीयांच्या एखाद्या विशिष्ट गटासाठी राखून ठेवलेल्या रिक्त पदांपैकी कोणतीही पदे पात्र उमेदवारांच्या अभावी त्या गटातील उमेदवारांची नेमणूक करुन भरता आली नाहीत तर, ती रिक्त पदे पाच भरती वर्षापर्यंत त्या गटासाठी तशीच राखून ठेवावीत. शासनाच्या पूर्व अनुमती शिवाय आरक्षित रिक्त पदे आरक्षण मुक्त करुन भरण्यात आली आहेत असे आढळून आल्यास संबंधित नियुक्ती अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

३. वरील आदेशांचे शासकीय, निम-शासकीय सेवा तसेच महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, अनुदानित संस्था, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम, विद्यापीठे, इत्यादीमधील सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे अनुपालन करावे व मागासवर्गीयांची आरक्षित पदे विहित बिंदू नामावली नुसार भरण्यात येतील याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र.द.माळवे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**गुणवत्तेवर निवड झालेल्या मागासवर्गीयांच्या गटातील उमेदवारांना आरक्षित असलेल्या जागांच्या संदर्भात मोजण्यात येवू नये याबाबतचा खुलासा.....**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक बीसीसी १०८९/२५५१(ब)/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक २५ जानेवारी, १९९१.

**वाचा :-** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०६४/३ जे, दिनांक ९ एप्रिल १९६५.
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०६४/३ जे, दिनांक २७ जून, १९७४.

**निर्णय**

उपरोक्त शासन निर्णयामध्ये असे सूचित केले आहे की, मागासवर्गीयांच्या गटातील ज्या उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड होईल त्यांना आरक्षित जागांच्या संदर्भात मोजण्यात येवू नये. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, सदरील आदेशांची अंमलबजावणी काटेकारेपणे केली जात नाही व मागासवर्गीयांच्या गटातील उमेदवार गुणवत्तेनुसार (मेरीट) निवडले गेले असले तरी त्यांना राखीव असलेल्या जागांच्या संदर्भातच नेमणूका देण्यात येतात.

२. उपरोक्त आदेशांचा याद्वारे पुनरुच्चार करण्यात येत असून सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे संबंधित आदेशांकडे काटेकोर अंमलबजावणीसाठी लक्ष वेधण्यात येत आहे. या संदर्भात खालील उदाहरणात स्पष्टीकरण दर्शविले आहे.

उदा. १०० बिंदू नामावलीनूसार १७ जागा भरताना बिंदु क्रमांक -२२ ते ३८ हे वापरावयाचे आहेत. ह्या नुसार खुला प्रवर्ग व मागासवर्गीयांच्या आरक्षित जागांचे वाटप पुढीलप्रमाणे येईल :-

| | |
|---|---|
| खुला प्रवर्ग | ११ |
| अनुसूचित जाती | २ (बिंदू क्रमांक २५ व ३३) |
| अनुसूचित जमाती | १ (बिंदू क्रमांक ३०) |
| विमुक्त जाती, भटक्या जमाती | १ (बिंदू क्रमांक २८) |
| इतर मागासवर्गीय | २ (बिंदु क्रमांक २४ व ३४) |
| एकूण | १७ |

या एकूण भरावयाच्या १७ जागांपैकी ६ जागा मागासवर्गीयांसाठी आरक्षित आहेत. या ६ आरक्षित जागांसाठी गुणवत्ता शिथिल करुन जे उमेदवार निवडलेले आहेत त्यांचा विचार करावा लागेल. ६ आरक्षित जागांव्यतिरिक्त जे काही मागासवर्गीय उमेदवार गुणवत्तेनुसार निवड झाले असतील त्यांना खुल्या प्रवर्गाच्या ज्या ११ जागा आहेत त्या संदर्भात त्यांचा गुणानुक्रमे विचार करावा लागेल.

३. वरील आदेशांचे शासकीय व निमशासकीय सेवांमधील सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. द. माळवे,**
**उप सचिव,**
**महाराष्ट्र शासन.**

**भरती प्रक्रिया मर्यादा पाच पेक्षा जास्त नसणे या आरक्षित, पदांची मागासवर्गीयांच्या तीन गटात आपआपसात अदलाबदल करुन पदे भरणे- याबाबतचे सुधारित आदेश.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-१०९१/२५५१(क)/१६-ब,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २७ मार्च, १९९१.

**पहा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७०/(इसीआर) जे, दिनांक २८ मे, १९७१.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७२/इसीआर-जे, दिनांक २३ मे, १९७२.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमाक बीसीसी- १०७०/इसीआर-जे, दिनांक २७ जून, १९७४.

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७०-१६, दिनांक १९ डिसेंबर, १९७९.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७८/४२४/१२४/१६-ब, दिनांक २१ फेब्रुवारी, १९८०.

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी- १०७०/८३१/१६-ब, १४ एप्रिल, १९८१.

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी - १०८२/१७७७/१६-ब, दिनांक ६ जानेवारी, १९८३.

८) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी -१०८३/१६-ब, दिनांक २९ जानेवारी, १९८३.

९) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी - १९८९/प्र.क्र. २२९/८९/१६-ब, दिनांक १२-०७-१९८९.

१०) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी - १०८९ प्र.क्र. २२९/८९/१६-ब, दिनांक ११-०८-१९८९.

११ शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी - १०८९ प्र.क्र. ३३८/८९/१६-ब, दिनांक ३०-०९-१९८९.

**शासन निर्णय**

उपरोक्त शासकीय परिपत्रके व निर्णयाद्वारे मागासवर्गीसाठी सरळ भरती व पदोन्नतीमध्ये पदे राखून ठेवावी. योग्य उमेदवार भरती करण्यासाठी उपलब्ध झाला नाही तर त्याचे सरळ भरतीचे आरक्षण ५ भरती वर्षे व पदोन्नतीचे आरक्षण ३ भरतीवर्ष पुढे नेणे (Carry Forward) व त्यावर सदर आरक्षण व्यपगत करणे (Lapas) मागासवर्गीय तीन गटाची (अनु. जाती, अनु. जमाती, विजा/भज) पुढे नेण्यात आलेली पदे (अनुशेष) व चालू असणाऱ्यांची संख्या व इतर मागासवर्गीयांची १०% आरक्षण भरुन एका भरती प्रसंगी आरक्षणात असलेली ५०%

मर्यादा आरक्षित पदे आपापसात अदलाबदल करुन भरणे इत्यादीसंबंधी वेळोवेळी आदेश देण्यात आलेले होते. वर नमुद केलेल्या आदेशात सुधारणा करुन शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**२. एका भरतीप्रसंगी मागासवर्गीयांच्या आरक्षित पदांची ५०% ची मर्यादा अनुशेष भरतीच्या संदर्भात शिथिल करुन अनुशेष १००% भरण्याबाबत.**

दिनांक २७ जून , १९७४ च्या आदेशाप्रमाणे मागासवर्गीयांच्या ३ गटातील अनु. जाती, अनु. जमाती व विजा/भज यांच्या बाबत एका भरती प्रसंगी आरक्षित पदाची मर्यादा ४०% पेक्षा जास्त होऊ नये असे आदेश दिले होते. वेळोवेळी मुदतवाढ देऊन हे आदेश दिनांक २६ जानेवारी, १९९० पर्यंत चालू ठेवण्यात आले होते. या ४०% च्या मर्यादेत (१) अनुशेषाची पदे. (२) गुणवत्तेवर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांची पदे. (३) चालू आरक्षणाची पदे यांचा समावेश होतो. राज्य शासनाने सरळसेवा भरतीसाठी इतर मागासवर्गीयांसाठी १०% आरक्षण ठेवले आहे. हे १०% (इमाव) व इतर ३ मागासवर्गीय गटाचे ४०% आरक्षण अशी एकूण ५०% आरक्षित ठेवण्याची मर्यादा होती. परंतु आता केंद्र शासनाने सुचित केल्याप्रमाणे अनुशेषाची केवळ रिक्त पदे कोणतीही मर्यादा न लावता १००% भरता येतील. म्हणजेच सुधारित धोरणानुसार मागासवर्गीयांच्या तीन गटांची (अनु. जाती,अनु. जमाती, वि.जा./भ.ज.) अनुशेष म्हणून पुढे नेण्यात आलेली आरक्षित पदे (जागा) (Vacancy) भरताना ती सर्वच्या सर्व १००% भरता येतील. व भरतीसाठी ५०% ची जी सर्वसाधारण मर्यादा आहे ती अशा अनुशेषाच्या रिक्त ठेवलेल्या पदांना लागू होणार नाही. ही अनुशेषाची रिक्त पदे भरताना त्यासाठी पुन्हा बिंदुनामावलीचा वापर करण्यात येऊ नये ( कारण हे नवे/चालू आरक्षण नाही). थोडक्यात पूर्वीची न भरलेली अनुशेषाची पदे सर्वच्या सर्व १००% भरता येतील. नवी पदे भरताना आरक्षण चालू आरक्षण मोजण्यात यावे. चालू आरक्षणास ५०% भरतीची मर्यादा लागू राहील. उदा. मागील अनुशेष १० असा आहे. (३ पदे अनु. जाती, ५ पदे अनु. जमाती, व २ पदे वि.जा./भ.ज.) आता १६ जागा भरण्यासाठी कार्यवाही करावयाची आहे. अनुशेषाची सर्वच्या सर्व १० पदे १००% भरता येतील व त्या १० पदांसाठी पुनः बिंदुनामावलीचा वापर करता येणार नाही. हा अनुशेष वजा जाता ज्या ६ जागा शिल्लक रहातील त्यासाठीच फक्त बिदु नामावलीचा वापर करावा व मागासवर्गीयांचे चालू आरक्षण मोजण्यात यावे. ही पदे खालीप्रमाणे जाहीर करण्यात यावीत :-

| **मागील अनुशेष** | **एकूण** | **खुला प्रवर्ग** | **अनु. जाती** | **अनु. जमाती** | **वि.जा भ.ज.** | **इतर मागासवर्ग** |
|---|---|---|---|---|---|---|
| नवी पदे (जागा) | १० | - | ३ | ५ | २ | (ओबीसी) अनुशेष पुढे नेता येत नाही |
| चालू आरक्षण (बिंदूनामावली नुसार) | ६ | ३ | १ | १ | - | १ |
| **एकूण** | **१६** | **३** | **४** | **६** | **२** | **१** |

**टीप. जर संपूर्ण १००% अनुशेष भरण्यासाठी पुरेशी पदे उपलब्ध नसतील तर सर्वात जुना अनुशेष प्रथम भरण्यात यावा व शिल्लक अनुशेष भरतीसाठी पुढे नेण्यात यावा.**

**३. मागासवर्गीयांची आरक्षित पदे पूर्व मंजूरीने तात्पुरती बिगर आरक्षित करुन खुल्या प्रवर्गाने भरण्याची सुधारीत पध्दत :-**

राज्य शासनाच्या दिनांक २७ जून १९७४ च्या आदेशाप्रमाणे आरक्षित पदांसाठी त्या त्या गटातील मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदे रिक्त ठेवण्याची तरतुद होती. म्हणजेच, पदे बिगर आरक्षित

करण्याची तरतुद नव्हती. मात्र प्रत्यक्षातअसे दिसून आले आहे की, बऱ्याच नियुक्ती अधिकाऱ्यांनी आजपावेतो आरक्षित पदे पूर्व मंजूरी घेऊन / पूर्व मंजूरी न घेता त्यावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची नियुक्ती केली आहे. आणि आरक्षित पदे रिक्त ठेवण्याची फार क्वचितच अंमलबजावणी झाली आहे. अलिकडे केंद्रशासनाने मागासवर्गीयांची आरक्षित पदे बिगर आरक्षित करुन भरण्याबाबत (वर्ग-१ ची काही पदे वगळता) सक्त बंधन घातले आहे. केंद्र शासनाच्या या आदेशा संदर्भात विचार करता असे दिसून आले आहे की, राज्यातील परिस्थिती केंद्र शासनासारखी नाही. राज्य शासनाची पदे आणि संदर्भ दूरवर ग्रामीण भागात विखुरलेले आहेत आणि विशिष्ट गटातील मागासवर्गीय उमेदवार न मिळाल्यास (विशेषतः काही तांत्रिक पदासाठी) सोयीच्या व प्रशासकीय दृष्टीने ती आरक्षित पदे दीर्घकाळ रिकामी ठेवणे योग्य होणार नाही. म्हणून आरक्षित पदे बिगर आरक्षित करण्यास सरसकट बंदी घालून ती पदे कामाची निवड पाहता रिक्त ठवण्यातअडचणी आहेत. मात्र याबाबत अपवादात्मक परिस्थितीत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात यावी:-

(अ) वर्ग - १ व २ ची आरक्षित पदे बिगर आरक्षित करावयाची झाल्यास, त्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे आदेशासाठी, म्हणजेच मुख्यमंत्र्यांच्या आदेशासाठी प्रशासकीय विभागाने त्यांचे संबंधित राज्यमंत्री, मंत्री (समाज कल्याण) (अनु. जाती आणि अनु. जमातीच्या आरक्षणाबाबत) किंवा मंत्री आदिवासी विकास (अनु. जमातीच्या आरक्षणाबाबत) यांचे मार्फत सादर करण्यात यावा. मात्र असा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी आरक्षित पदांची दुसऱ्यांदा जाहिरात देऊन (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणी करुन) भरतीसाठी प्रयत्न केलेला असावा व पहिल्या जाहिरातीपासून किमान १ वर्षाचा कालावधी झालेला असावा. त्याचप्रमाणे २ वेळा जाहिरात देऊनही मागासवर्गीयांच्या विशिष्ट गटातील उमेदवार उपलब्ध होऊ शकला / शकले नाहीत तर ते पद / पदे बिगर आरक्षित करुन भरणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. असे प्रमाणपत्र विभागाच्या सचिवांनी प्रस्तावात नमूद केलेले असावे.

(आ) वर्ग-३ व ४ मधील फक्त तांत्रिक पदांच्या संदर्भात आणि अगदी अपवादात्मक परिस्थितीत जर दुसऱ्यांदा जाहिरात देऊन किंवा विहित यंत्रणेकडे मागणी करुन सुध्दा मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाले / झाला असेल ा/ नसेल व पहिल्या जाहिरातीपासून किमान २ वर्षाचा कालावधी झालेला असेल त्याचप्रमाणे पद / पदे बिगर आरक्षित करुन भरणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे असे विभागीय सचिवांनी प्रमाणित केले तरच आरक्षित पद / पदे बिगर आरक्षित करण्याचा प्रस्ताव सादर करता येईल. असा प्रस्ताव प्रशासकीय विभागाचे राज्यमंत्री, मंत्री यांचेमार्फत मंत्री समाजकल्याण किंवा मंत्री, आदिवासी विकास यांच्याकडके आदेशासाठी सादर करणे बंधनकारक राहील.

वरील उपपरिच्छेद (अ) व (आ) प्रमाणे केवळ अपवाद म्हणूनच तात्पूरत्या स्वरुपात बिगर आरक्षित केलेली पदे वगळता, आरक्षित पदे तात्पूरती किंवा कायम स्वरुपी भरता येणार नाहीत. ती तशीच रिक्त ठेवावी लागतील. थोडक्यात पूर्ण मंजूरी न घेता आरक्षित पदे बिनराखीव करता येणार नाहीत किंवा ती परस्पर खुल्या गटाच्या उमेदवारांमधून भरताही येणार नाहीत. ती तशी भरण्यात आली तर संबंधित नियुक्ती अधिकाऱ्यांस त्याबाबत जबाबदार धरण्यात येईल. व त्याचे विरुध्द प्रचलित नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल.

४. **अनु. जाती, अनु. जमाती, वि.जा. / भ.जमाती या मागासवर्गीयांच्या आरक्षित पदांची अदलाबदल करुन ती त्याच गटातील उमेदवारांनी भरण्याची सुधारित कार्यपध्दती.**

शासन निर्णय, क्रमांक बीसीसी - १०७८/८२४/१२४/१६-ब, दिनांक २५ फेब्रुवारी, १९८० व सम क्रमाकांचे दिनांक २३ जानेवारी , १९८१ च्या आदेशानुसार पदोन्नतीसाठी वर नमुद केलेल्या आरक्षित गटापैकी विशिष्ट गटाचे अ कर्मचारी उपलब्ध नसतील तर त्यांची आरक्षित पदे मागासवर्गीयांच्या इतर दोन गटातील कर्मचाऱ्यांनी परंतु त्या त्या गटांच्या आरक्षणाच्या मर्यादेपर्यन्त म्हणजेच मागील अनुशेष आणि चालू व आरक्षण मिळून त्या गटाच्या एकूण पदांच्या मर्यादे पर्यन्तच (up to their quota) भरण्याची तरतुद आहे. तसे करुनही

आरक्षित जागा भरता आल्या नाहीत तर त्या पदोन्नतीच्या जागा तीन भरती वर्षे पुढे नेण्यात याव्यात व कोणत्याही परिस्थितीत पूर्व मंजूरी घेतल्याशिवाय त्या आरक्षित जागा प्रवर्गाने न भरता तीन भरती वर्षे रिक्त ठेवण्यात याव्यात असे आदेश आहेत. त्याचप्रमाणे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७८/इसीआर-जे, दिनांक २८ मे, १९७१ मध्ये असे आदेश आहेत की, योग्य मागासवर्गीय उमेदवारांच्या अभावी आरक्षित पदे सरळभरतीने भरता आली नाहीत तर आरक्षित पदे (जागा) ५ भरती वर्षे रिक्त ठेवावीत व आरक्षण पुढे नेण्यात यावे.

उपरोक्त आदेशात सुधारणा करुन शासन असे आदेश देते की, येथून पुढे मागासवर्गीयांची पदोन्नती व सरळभरतीमधील आरक्षित पदे योग्य उमेदवार न मिळाल्याच्या कारणास्तव (तीन / पाच भरती वर्षा नंतर) व्यपगत करण्यात येऊ नयेत व रिक्त ठेवण्यात आलेली अशी आरक्षित पदे ज्या मागासवर्गीय गटाची आरक्षित पदे आहेत ती त्याच गटाच्या उमेदवारांनी भरण्यासाठी तीन वेळा (तीन भरती वर्षे) प्रयत्न करावेत. त्यानंतर मात्र त्या विशिष्ट गटाचा उमेदवार उपलब्ध झाले / झाला नाही तर आरक्षण व्यपगत न होता रिक्त पदे / पद मागासवर्गीयांच्या इतर दोन गटाच्या (उदा. अनु. जातीचे राखीव पद, अनु. जमाती किंवा वि.जा. / भ.ज. च्या) उमदेवारांने भरण्यात यावे / यावीत. अशा तऱ्हेने आरक्षित पदे मागासवर्गीयांच्या इतर गटातील उमेदवारांनी अदलाबदल करुन भरण्यास कोणतीही कालमर्यादा रहाणार नाही. किंवा त्यात त्या गटाच्या विशिष्ट आरक्षणांची (Quota) जी मर्यादा आहे तिचे बंधन असणार नाही. अशी अदलाबदल करुन पदे भरतांना इतर मागासवर्ग (O.B.C.) या गटाच्या उमेदवारांनी भरणे अनुज्ञेय नाही.

५. उपरोक्त आदेश हे सध्या चालू असलेल्या सरळसेवा भरतीमधील (शासन निर्णय, दिनांक १२ जुलै, १९८९) तसेच पदोन्नतीमधील (शासन निर्णय, दिनांक ३० सप्टेंबर, १९८९) अनुशेष भरुन काढण्याच्या विशेष भरती मोहिमे संदर्भात लागू असणार नाहीत. म्हणजेच अशा अनुशेषाची मोजणी होऊन पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे /येत आहे. त्या अनुशेष भरतीसाठी हे आदेश लागू असणार नाहीत. सरळभरतीचा अनुशेष भरुन काढण्यासाठी दिनांक ३१ डिसेंबर, १९९१ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आलेली आहे. दिनांक ३० जून, १९८९ अखेरचा राहिलेला अनुशेष दिनांक ३१-१२-१९९१ पर्यन्त जर भरुन काढता आला नाही तर तो वरील सुधारीत आदेशानुसार व्यपगत ठरणार नाही आणि तो अनुशेष उपरोक्त परिच्छेद ४ मधील तरतुदीप्रमाणे भरुन काढावा.

६. वरील आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, तसेच महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, अनुदानित संस्था, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम, विद्यापीठे, अनुदानित शैक्षणिक संस्था इ. आस्थापनेमधील पदांना लागू राहतील. मंत्रालयीन विभागांनी आवश्यक असेल तेथे त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील निमशासकीय संस्था / कार्यालयातील पदांबाबत विहित नियम / अधिनियमाखाली सूचना निर्गमित कराव्यात अशी त्यांना विनंती आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. द. माळदे**

**धनगर च वंजारी समाजाचा अंतर्भाव केल्यानंतर विमुक्त जाती व भटक्या जमाती यांचे वाढविलेले ६ टक्के आरक्षण सर्व बाबींकरिता लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक बीसीसी १०९२/१६९२/प्र.क्र.१५४/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक २१/६/१९९३.

**वाचा :-** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०६४/प्र.क्र.१११/जे, दिनांक ९ एप्रिल १९६५.

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०७०/इसीआर-जे, दिनांक २३ नोव्हेंबर, १९७०.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०७२/जे, दिनांक २३ मे, १९७४.

(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०९२/१६९२/प्र.क्र.१५४/सोळा-ब, दिनांक ४ ऑगस्ट १९९२.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी /१०९२/१६९२/प्र.क्र.१५४/१६-ब, दिनांक ४ ऑगस्ट, १९९२ अन्वये विमुक्त जाती व भटक्या जमातीकरीता पदोन्नती व सरळ सेवा भरतीकरीता असलेले ४ टक्क्यांचे आरक्षण ६ टक्के करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. याच निर्णयातील परिच्छेद २ मध्ये मागासवर्गीयांच्या विविध गटासाठी असलेल्या आरक्षणाची टक्केवारी दर्शविण्यात आलेली आहे व त्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीकरीता ६ टक्के आरक्षण दर्शविण्यात आले आहे. तथापि, पदोन्नती व सरळ सेवा भरती या शब्द रचनेमुळे वर उल्लेखिलेले आरक्षण इतर प्रयोजनाकरिता लागू आहे किंवा कसे याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. म्हणून त्या संदर्भात आता असे स्पष्ट करण्यात येते की, विमुक्त जाती व भटक्या जमातीकरीता पूर्वी ज्या ज्या प्रयोजनाकरिता ४ टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते त्या सर्व प्रयोजनाकरीता वाढीव दोन टक्के आरक्षण लागू राहील.

२. हे आदेश पूर्वलक्षीप्रभावाने म्हणजेच दिनांक ४ ऑगस्ट, १९९२ पासून लागू होतील.

३. मंत्रालयातील विविध विभागांनी याची नोंद घेऊन याबाबत त्या त्या विभागानी योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नांवाने,

**अ.तु.वाघमारे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासकीय / निमशासकीय सेवेतील**
**मागासवर्गीयांसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण**
**रोजंदारीवरील  कर्मचाऱ्यांना लागू करणे बाबत**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी १०९३/१५७५/प्र.क्र.३/९०/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक १८ ऑक्टोबर, १९९३.

**परिपत्रक**

शासकीय निमशासकीय सेवेतील मागासवर्गीयांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाप्रमाणे रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना देखील लागू करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

रोजंदारी कामगारांच्या बाबतीत आरक्षणाचे संदर्भात आदेश जसेच्या तसे लागू करणे व्यवहार्य ठरत नसले तरी मागासवर्गीयांचे सर्वसाधारण आरक्षण त्यांना ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा कमी होणार नाही याची दखल घेण्यात यावी.  रोजांदारी कामगारांसाठी  निश्चित पदे नसल्यामुळे त्यांची संख्या ही कामाच्या गरजेनुसार व कामाच्या निकडीनुसार ठरत असल्याने त्यांच्यासाठी बिंदू नामावली ठेवण्याची आवश्यकता नाही. तथापि एखाद्या विशिष्ट संस्थेला १०० रोजंदारी कामगार घ्यावयाचे आहेत, अशा वेळी शक्यतो अ.जा./अ.ज./वि.जा.भ.ज./इ.माव.व यांच्यासाठी सेवेत राखून ठेवलेल्या आरक्षणाच्या प्रमाणानुसार अशा कामगारांची भरती केली जाईल, याबाबतची खबरदारी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**अ.तु.वाघमारे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक,क्रमांक -बीसीसी १०९३ /३१८७/प्र.क्र. १७१ /९३/१६-ब,
मंत्रालय,मुंबई -४०० ०३२
दिनांक २१ फेब्रुवारी १९९४.

**वाचा :-** १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- बीसीसी १०७८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १.३.१९८९.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०८८ /१८१०/२६३/१६-ब, दिनांक १५.९.१९८९.

**परिपत्रक**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०८८ / १८१०/२६३/१६-ब, दिनांक १-३-१९८९ अन्वये ज्या संवर्गात फक्त एकच पद (Isolated post)असेल तेव्हा त्या एका पदास किंवा त्या पदासंदर्भात भविष्यात निर्माण होणारी रिक्त जागा यास आरक्षण लागू होणार नाही व ते पद बिनराखीव म्हणून समजण्यात यावे असे आदेश निर्गमित करण्यात आले होते. तदनंतर शासन परिपत्रक, क्रमांक बीसीसी १०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १५-९-१९८९ अन्वये वर नमूद केलेल्या आदेशांना पुढील आदेश होईपर्यन्त तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. दरम्यानच्या कालावधीत एकाकी पदाच्या आरक्षणासंबंधी वरील प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली व बहुतेक प्रकरणी न्यायालयाने एकाही पदास आरक्षण लागू होणार नाही असे निर्णय दिलेले आहेत. तसेच याचिका क्रमांक ३३८१/९१, श्री लोखंडे विरुध्द महाराष्ट्र शासनाच्या संदर्भात औरंगाबाद खंडपीठाने याचिकेची सुनावणी होईपर्यन्त / अंतिम निर्णय लागूपर्यन्त शासन परिपत्रक, क्रमांक बीसीसी १०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १५-९-१९८९ अन्वये एकाकी पदास आरक्षण लागू करण्याबाबत निर्गमित केलेल्या या आदेशांस स्थगिती दिलेली आहे. वर विषद केलेल्या सर्व बाबी विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, फक्त एकच पद (Isolated post) असलेल्या संवर्गात सुरुवातीच्या अथवा त्यापुढील भरती वर्षात भरती/बढती बाबतचे आरक्षण लागू होणार नाही. म्हणजेच हे आदेश निर्गमित केल्यानंतर ज्या ज्या कर्मचा-यांना एकाकी पदांवर नेमणूका दिल्या जातील, त्या तात्पुरत्या स्वरुपात तर असतील शिवाय त्या जेष्ठता व गुणवत्तेनुसार तसेच त्या औरंगाबाद खंडपीठाच्या याचिका क्रमांक ३३८१/९१ च्या निर्णयाच्या अधीन राहून दिल्या जातील.

सर्व नियुक्ती अधिका-यांनी मागासवर्गीयांकरिता भरतीच्या त्याचप्रमाणे पदोन्नतीच्या वेळी पदे राखून ठेवण्यासंबंधीच्य विविध आदेशांची अंमलबजावणी करताना वरील आदेश लक्षात घेऊन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. तु. वाघमारे**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक २३ मार्च, १९९४

**वाचा :-** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०६४/१११/जे, दिनांक ९/४/१९६५.
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९१/२५५/(ड)/१६-ब, दि.२७/३/१९९१.

**प्रस्तावना :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०६४/१११/जे, दिनांक ९ एप्रिल १९६५ अन्वये शासकीय, निमशासकीय सेवेत खालीलप्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे :-

| | |
|---|---|
| (१) अनुसूचित जाती व अनुसूचित जातीतील बौध्द धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ % |
| (२) अनुसूचित जमाती | ७ % |
| (३) विमुक्त जाती व भटक्या जमाती | ४ % |
| (४) इतर मागसवर्ग (ओ.बी.सी.) | १० % |
| एकूण | ३४ % |

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०९२/१६९२/प्र.क्र.१५४/१६-ब, दिनांक ४ ऑगस्ट, १९९२ अन्वये धनगर व वंजारी समाजाच्या विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये अंतर्भाव केल्यानंतर विमुक्त जाती व भटक्या जमातीचे पूर्वी असलेले ४ टक्के आरक्षण २ टक्क्यांनी वाढवून ते ६ टक्के विहित करण्यात आलेले आहे.

३. दिनांक २७ मार्च, १९९१ च्या आदेश क्र बीसीसी-१०९१/२५५१/(क) १६-ब, अन्वये मागासवर्गीयांच्या तीन प्रवर्गातील (अनुसूचित , अनुसूचित जमाती व विमुक्त जाती व भटक्या जमाती) उमेदवार उपलब्ध नसल्यास ही पदे अदलाबदली भरण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

**शासन निर्णय**

मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना शासकीय, निमशासकीय तसेच मंडळे, महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादी यांच्या सेवेमध्ये वाढीव आरक्षण ठेवण्याबाबतचा प्रस्ताव त्याचप्रमाणे विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीत वाढ करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या प्रस्तावाचा सर्वकष विचार करुन शासनाने आता इतर मागासवर्गीयांकरिता तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातींकरिता खालीलप्रमाणे सुधारीत आरक्षण विहित करण्याचा निर्णय घेतला आहे.

| | |
|---|---|
| (अ) विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती) | ३% |
| (ब) भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती) | २.५% |
| (क) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती यादी जोडल्याप्रमाणे) | ३.५% |
| (ड) भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती यादी जोडल्याप्रमाणे) | २% |
| (इ) इतर मागासवर्गीयांकरिता | १९% |
| **एकूण** | **३०%** |

**२.** विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच इतर मागासवर्गीयांकरिता शासन निर्णय, क्र.बीसीसी-१०९२/ १६९२/ प्र.क्र.१५४/१६-ब, दि. ४-८-१९९२ व क्र. बीसीसी -१०६४/१११/जे, दि.९-४-१९६५ अन्वये विहित करण्यात आलेल्या आरक्षणात आता शासन निर्णयाच्या वरील परि. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गाकरिता विहित करण्यात आलेल्या आरक्षणातील पदे भरली न गेल्यास ती भरली न गेलेली पदे सरळ सेवा भरतीकरिता ५ भरती वर्षापर्यंत अनुशेष म्हणुन पुढे ओढण्याची तरतुद होती व ही पदे भरण्याकरिता सतत ५ भरती वर्षापर्यंत प्रयत्न करणे अपेक्षित आहे. तथापि, अशा आशयाची तरतुद इतर मागासवर्गियांकरिता पूर्वी जे १०% आरक्षण विहित करण्यात आले होते त्याकरिता करण्यात आलेले नव्हते. इतर मागासवर्गीयांची आरक्षित पदे ती त्या त्याच वर्षी भरणे आवश्यक होते. तथापि, शासनाने या बाबींचाही विचार करुन आता असा निर्णय घेतला आहे की, यापुढे सरळ सेवा भरतीतील इतर मागासवर्गीयांकरिता आरक्षित असलेली पदे भरली न गेल्यास ती अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात यावीत व ५ भरती वर्षापर्यंत ही पदे त्याच प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात यावीत. प्रयत्न करुनही या प्रवर्गाकडून उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर ती अदलाबदलीने भरणेबाबत शासन निर्णय, क्रमांक बीसीसी/१०९१/२५५१/(क)/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१ च्या तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. शासन निर्णयाच्या परि. १ मध्ये उल्लेखिलेल्या आरक्षण हे शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरिता देखील अनुज्ञेय आहे. शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग तसेच वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये इत्यादी विभागांनी याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत. शैक्षणिक संस्थामध्ये एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास ते आरक्षण अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात येत नसल्यामुळे व ते त्याच वर्षी भरावयाचे असल्यामुळे ते अदलाबदलीने भरणेबाबत संबंधित विभागाने विचार करुन योग्य ते आदेश निर्गमित करावे.

४. मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार क्रीमी लेयर चे तत्व केंद्र शासनाने मान्य केले आहे. राज्य शासनाने देखील "क्रीमी लेयर" चे तत्व थोडया फार फरकाने मान्य केले आहे. तेव्हा क्रीमी लेयर बाबत व त्यानुषंगाने इतर बाबींचा विचार करुन योग्य ते सविस्तर आदेश समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाकडून निर्गमित करण्यात येतील. शासन निर्णयाच्या परिच्छेद एक मधील अ, ब, क, ड, इ या प्रवर्गातील फक्त क, ड, इ करीताच क्रीमी लेयरचे तत्व लागू राहील.

५. गुणवत्तेनुसार जे उमेदवार सेवा प्रवेशाकरिता पात्र ठरले जातील त्यांची गणना आरक्षित पदांवर केली जाणार नाही.

६. शासन निर्णयाच्या वरील परि. १ येथील अ, ब, क, ड, इ येथील आरक्षण फक्त सरळ सेवा भरतीकरिता अनुज्ञेय राहील. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार यापूर्वी तात्पुरत्या स्वरुपात किंवा कायम स्वरुपात ज्या पदोन्नत्या दिलेल्या आहेत त्यावर त्याचा परिणाम होणार नाही. ज्या ज्या ठिकाणी सेवेमध्ये पदोन्नती करिता आरक्षण ठेवण्यात आले आहे हे आरक्षण सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या दिनांकापासून (१६ नोव्हेंबर १९९२) पुढे ५ वर्षे चालू राहील.

७. पूर्वी ज्या ज्या प्रयोजनाकरिता आरक्षणाचे आदेश लागू करण्यात आले होते त्या सर्व प्रयोजनाकिरता हे आरक्षणाचे आदेश लागू राहतील. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या विभांतर्गत याप्रमाणे कार्यवाही करुन त्या विभागांनी स्वतंत्र निर्गमित करावेत.

८. हे आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

९. हे आदेश समाजकल्याण शालेय शिक्षण, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण आणि वैद्यकिय शिक्षण व औषणी द्रव्ये विभागांशी विचारविनिमय करुन निर्गमित करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**एस. शंकर मेनन**
**प्रधान सचिव (सेवा)**

**मंडळ आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार मागासवर्गीयांचे आरक्षण व आरक्षणांतील वाढ,वैद्यकीय व तत्सम अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय,क्रमांक एमओयएस १०९४/सी आर ५८/९४/ शिक्षण.
मंत्रालय,मुंबई -४०० ०३२
दिनांक ३ जून, १९९४.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- बीसीसी १०६४/१११/ जे, दिनांक ९-४-१९६५
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०९१/२५५१/ (ड) / १६-ब, दिनांक २७/३/१९९१
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०९२/१६९२/ प्र. क्र १५४/१६-ब, दि. ४ ऑगस्ट १९९२
४) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक एमईडी-१०९२/४८३/९२/शिक्षण-१, दि. २५ जून १९९३.
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०९३/२१६७/ सी आर १४१/९३/१६-ब, दि.२३ मार्च १९९४.

**शासन निर्णय** :- राज्य शासनाने मंडळ आयोगाच्या मागासवर्गीय आरक्षणबाबतच्या शिफारशी स्विकारलेल्या असून, त्या अनुषंगाने शासकीय सेवेत मागासवर्गीयांना आरक्षण व आरक्षणात वाढ केल्याबाबतचे आदेश शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी -१०९३/२१६७/सी आर १४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च १९९४ अन्वये निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्तींकरिता १३% आरक्षण व अनुसूचित जमातीकरिता ७% आरक्षण कायम ठेवण्यात आलेले असून विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणात सुधारणा केलेल्या आहेत. राज्यात मागासवर्गीयांच्या आरक्षणात सुधारणा केलेल्या असून राज्यात मागासवर्गीयांकरिता शासकीय व निमशासकीय सेवामध्ये उपलब्ध असलेले आरक्षण खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती व अनुसूचित जातीतील बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती. | १३% |
| २) | अनुसूचित जमाती | ७% |
| ३) | विमुक्त जाती ( १४ व तत्सम जाती) | ३% |
| ४) | भटक्या जमाती ( जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | ५.५% |
| ५) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जाती, यादी सोबत जोडल्या प्रमाणे) | ३.५% |
| | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती, यादी सोबत जोडल्याप्रमाणे) | २% |
| ६) | इतर मागासवर्गीय | १९% |

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी १०९३ /२१६६ /सी आर -१४१/९३/१५-ब, दिनांक २३ मार्च,१९९४ च्या परिच्छेद ३ मधील तरतुदीनुसार वर नमूद केलेले आरक्षण शैक्षणिक वर्षातील प्रवेशाकरिता देखील अनुज्ञेय आहे. त्याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने तसेच इतर संबंधित विभागांनी स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करावयाचे आहेत. त्या अनुषंगाने शासन वैद्यकीय व तत्सम अभ्यासक्रमाच्या शासकीय, अनुदानित, विना

अनुदानित व महानगरपालिका संचलित महाविद्यालयांमध्ये परिच्छेद २ मध्ये नमूद केलेले आरक्षण लागू करीत आहे. सदरचे आरक्षण पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील प्रवेशाकरिता लागू करण्यात येत आहे. यात अति विशेष अभ्यासक्रमाचा अंतर्भाव होणार नाही. हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून हे आदेश अंमलात येतील.

३. वर नमूद केलेल्या मागासवर्गीयांच्या एका गटातील रिक्त जागा, मागासवर्गीयांच्या उर्वरित गटातील विद्यार्थ्यांच्या एकत्रित गुणवत्ता यादीमधून भरण्याच्या नियमांचा या अनुषंगाने पुनरुच्चार करण्यात येत आहे.

४. तसेच ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना, त्यांच्या गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश प्राप्त होत असेल, अशा विद्यार्थ्यांची मागासवर्गीयातील आरक्षणासाठी गणना केली जाणार नाही. या नियमांचा देखील या निमित्ताने पुनरुच्चार करण्यात येत आहे.

५. मंडल आयोगाच्या शिफारशीमध्ये नमूद केलेले क्रिमीलेअरचे तत्व राज्य शासनाने थोडा फार फरकाने मान्य केले असून उपरोक्त परिच्छेद २ मध्ये अ. क्र. ५ वरील भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती),अ. क्र. ६ (भटक्या जमाती, वंजारी व तत्सम जमाती) व अ. क्र. ७ वरील इतर मागासवर्गीयांना फक्त क्रिमीलेअरचे तत्व लागू करण्यात येत आहे. अधिक खुलाश्यासाठी असे स्पष्ट करण्यात येते की, मागासवर्गीयांतील क्रिमीलेअरमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या गटांना मागासवर्गीयांच्या आरक्षणाचे फायदे उपलब्ध होणार नाहीत. तथापि क्रिमीलेअर व इतर बाबी अनुषंगाने समाज कल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागामार्फत सविस्तर आदेश निर्गमित करण्यात येत असून त्या आदेशा-अनुषंगाने आवश्यक असल्यास योग्य ते शासन आदेश यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

६. सक्षम प्राधिकारी व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई हे या शासन निर्णयाअनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अरविंद चौधरी**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**मागासवर्गीयांसाठी आरक्षीत पदे-**
**उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदलाबदलीने पदे भरणे,**
**पदे आरक्षणातून मुक्त करणे.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-१०९४/सीआर-५७/९४/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक ५ डिसेंबर, १९९४.

**पहा:-** शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र. बीसीसी-१०९१/२५५१/(क) १६-ब,दिनांक २७ मार्च, १९९१

**प्रस्तावना :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी- १०६४/१११/जे, दिनांक ९.४.१९६५ अन्वये मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गाकरिता सरळ सेवा प्रवेशाकरिता आरक्षण विहित करण्यात आले होते. त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरिता १० टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले होते, व ते २२ मार्च, १९९४ पर्यन्त अंमलात होते. दिनांक ९.४.१९६५ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार इतर मागासवर्गीयांकरिता असलेले आरक्षण भरले न गेल्यास अनुशेष म्हणून दाखविण्याची तसेच पुढे ओढण्याची तरतुद नव्हती. त्यामुळे शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र. बीसीसी-१०९१/२५५१(क)/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१ च्या आदेशानुसार अदलाबदलीने पदे भरताना ती फक्त अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गामधूनच भरण्याची तरतूद आदेशात करण्यात आलेली होती. मंडळ आयोगाच्या शिफारशीनुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च, १९९४ अन्वये मागासवर्गीयांच्या ज्या विविध प्रवर्गाकरिता आरक्षण विहित करण्यात आलेले आहे त्यामध्ये इतर मागावर्गीयाकरिता एकूण १९ टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. या आरक्षित पदांपैकी काही पदे भरली न गेल्यास ती पुढील ५ भरती वर्षपर्यंत अनुशेष म्हणून पुढे ओढण्याची तरतुद करण्यात आलेली असून ती अदलाबदलीने भरण्याबाबत देखील दिनांक २३ मार्च, १९९४ च्या शासन निर्णयात तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गुणवत्तेनुसार जे मागासवर्गीय उमेदवार सेवा प्रवेशाकरिता पात्र ठरतील त्यांची गणना आरक्षित पदावर केली जाणार नाही अशीही तरतूद दिनांक २३ मार्च, १९९४ च्या आदेशात करण्यात आलेली आहे.

मागासवर्गीयांसाठी असलेल्या सरळ सेवा भरती तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षित पदे उमेदवाराअभावी भरली न गेल्यास ती कशा प्रकारे भरण्यात यावीत याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या गोष्टीचा सर्वंकष विचार करुन शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

**शासन निर्णय** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी-१०९१/२५५१(क)/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१ मधील आदेश अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**सरळ सेवा भरती**

अ) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) भटक्या जमाती (ड)व इतर मागासवर्गीय (इ)या प्रवर्गाकरिता निर्धारित केलेल्या प्रमाणानुसार भरती करण्यासाठी त्या त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अशी पदे ५ भरती वर्षापर्यन्त रिक्त ठेवावी व या ५ भरती वर्षात त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात यावेत, असे प्रयत्न करुनही उमेदवार प्राप्त झाली नाही तर ६ व्या वर्षी खाली उल्लेख केल्याप्रमाणे अदलाबदलीने ही पदे भरण्यात यावीत. ६ व्या वर्षीही त्या प्रवर्गाचा किंवा अदलाबदलीसाठी दुसऱ्या प्रवर्गाचा उमेवार उपलब्ध झाला नाही तर ७ व्या वर्षी खुल्या प्रवर्गाने उमेदवार भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर करण्यात यावी. त्यासाठी आवश्यक त्या समर्थनानीशी प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावा. ६ व्या वर्षी पदे खालील प्रवर्गांने अदलाबदलीने भरण्यात यावीत :-

)
अनुसूचित जाती ) या दोन प्रवर्गातच अदलाबदली
अनुसूचित जमाती ) करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| विमुक्त जाती (अ) | ) | (मुळच्या १४ व तत्सम जाती) |
| भटक्या जमाती (ब) | ) | (मूळच्या २८ व तत्सम जमाती) |
| | ) | या दोन प्रवर्गातच अदलाबदली करण्यात यावी. |
| भटक्या जमाती (क) | ) | या तीन प्रवर्गात अदलाबदली |
| धनगर व तत्सम | ) | करण्यात यावी. |
| | ) | |
| भटक्या जमाती (ड) | ) | |
| वंजारी व तत्सम. | ) | |
| इतर मागासवर्गीय (इ) | ) | |

ब) प्रशासकीय व जनहितास्तव पद ५ भरती वर्षापर्यन्त रिक्त ठेवणे शक्य नसेल तर पद तात्पुरते बिगर राखीव करण्याचा प्रस्ताव संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाकडे अभिप्रायासाठी पाठवावे. अशा प्रस्तावावर सामान्य प्रशासन विभागाने अभिप्राय दिल्यानंतर वर्ग-१, व वर्ग-२ च्या पदांसंदर्भात प्रस्ताव त्या त्या विभागाच्या सचिवांनी मा. मंत्री, समाजकल्याण व आदिवासी विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्र्यांकडे सामान्य प्रशासन विभागामार्फत मान्यतेसाठी पाठवावेत.

क) मंत्रालयीन विभागातील व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील वर्ग - ३ व वर्ग - ४ ची पदे तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावीत व सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर विभागांनी मा. मंत्री (स.क.) आणि मा. मंत्री (आदिवासी विकास) यांची मान्यता घ्यावी.

ड) वर नमूद केल्याप्रमाणे अशा सर्व प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

## पदोन्नती

१) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती (अ)/ भटक्या जमाती (ब) यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण ठेवण्यात आले आहे. शासन निर्णय,क्र.बीसीसी-१७७२/जे,दिनांक२३ मे,१९७४ अन्वये त्यासाठी ५० बिंदू नामावली निर्धारित केली आहे. त्याचा अवलंब करावा. या नामावलीत विमुक्त जाती/भटक्या जमातींचा एकत्रित समावेश करण्यात आला आहे. त्याप्रमाणेच कार्यवाही करावी.या प्रवर्गासाठी निर्धारित केलेल्या प्रमाणानुसार त्यात्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध झाले नाही तर पद भरण्यासाठी ३ भरती वर्षे प्रयत्न करण्यात यावा व त्या प्रवर्गाची उमेदवार मिळेपर्यन्त ते पद ३ भरती वर्षे रिक्त ठेवण्यात यावे. तद्‌नंतर ४ थ्या वर्षी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती या दोन प्रवर्गातून व विमुक्त जाती (अ)/भटक्या जमाती (ब) या दोन प्रवर्गातूनच आपआपसातून अदलाबदलीने भरण्यात यावे.

२) प्रशासकीय कारणास्तव किंवा जनहितास्तव अशी पदे संबंधित प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसल्यास तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करावयाचे असल्यास यासंबंधीचा प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागामार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे मंजूरीसाठी पाठवावा. सामान्य प्रशासन विभागाने या पदाचे राखीव स्वरुप तात्पुरते काढून टाकण्यास मान्यता दिली तर एकत्रित निवडसूचित समाविष्ट असलेल्या इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन रिकाम्या जागा तात्पुरत्या स्वरुपात भरता येतील व त्या त्या गटाची राखीव पदे त्य गटाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत ४ थ्या वर्षी वर नमूद केल्याप्रमाणे पद अदलाबदलीने भरावे. ४ थ्या वर्षीही अदलाबदलीसाठी मागासवर्गीयांचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर पद कायमचे अनारक्षित झाले असे समजून इतर प्रवर्गातून / खुल्या प्रवर्गाने (ज्या मागासवर्गीयही असतील) भरण्यात यावे यासाठी ही सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घ्यावी.

३) गट-१ व गट-२ ची आरक्षित पदे तात्पूरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधीचे प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायासाठी पाठवावेत व नंतर मा. मंत्री, समाजकल्याण, मा. मंत्री, आदिवासी विकास व संबंधित विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्र्याकडे मंजूरीसाठी पाठवावेत.

४) मंत्रालयीन विभागातील व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील वर्ग-३ व ४ ची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधीचा प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी पाठवावेत.

५) वर नमूद केल्याप्रमाणे अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

६) गट-१ व गट-२ च्या निवड सूचीतील मागासवर्गीयांच्या अधिक्रमनास मान्यता देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, मंत्री (समाजकल्याण ), मंत्री (आदिवासी विकास) व विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्र्याकडे अशी प्रकरणे सादर करण्यात यावीत.

७) ज्येष्ठतेनुसार मागासवर्गीय उमेदवार पदोन्नतीला पात्र असेल परंतू त्याच्या प्रवर्गाचा आरक्षित बिंदू नसेल तर अशा कर्मचाऱ्यास आरक्षित बिंदू नाही म्हणून पदोन्नती नाकारु नये.

## सर्वसाधारण सूचना

**१.** राखीव जागेवर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती / पदोन्नती देताना आपली नियुक्ती/ पदोन्नती मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली असून संबंधित उमेदवार प्राप्त झाल्यानंतर किंवा अदलाबदलीने पद भरल्यानंतर आपली नियुक्ती/पदोन्नती संपुष्टात येईल. असा उल्लेख नियुक्ती/पदोन्नतीच्या आदेशात न चुकता करण्यात यावा.

**२.** राखीव जागेवर इतर उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती/पदोन्नती दिल्यास अशा उमेदवारांची नोंद कायम स्वरुपी बिंदू नामावलीत घेण्यात येऊ नये. त्यांची नोंद तात्पुरत्या स्वरुपातील स्वतंत्र नोंदवहीत घेण्यात यावी. व जसजसे मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होतील तसतसे त्या नोंदवहीतील नोंदी कायम स्वरुपी बिंदू नामावलीत घेण्यात याव्यात.

**३.** सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी जे जे प्रस्ताव सादर करण्यात येतील ते ते प्रस्ताव संबंधित विभागांनी मागासवर्गीयांच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्याकरिता नेमण्यात आलेल्या उप सचिवांनी प्रथम तपासून आपापल्या विभागाच्या सचिवांमार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावेत.

**४.** मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या क्षेत्रिय कार्यालयातील गट-३ व गट-४ च्या सरळ सेवा भरतीतील व पदोन्नतीतील मागासवर्गीयांचे अनारक्षण/अधिक्रमण विभाग प्रमुखांनी सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांचे प्रमाणपत्र न चुकता घ्यावे.

**५.** महामंडळे,मंडळे,महानगरपालिका,नगरपालिका,शासकीय उपक्रम,जिल्हा परिषद, अनुदानित संस्था,विद्यापीठ, सहकारी संस्था/बँका,शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादीमधील मागासवर्गीयांची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधी संबंधित विभागांनी सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने व मान्यतेने पुढील कार्यवाही करावी.

हे आदेश १ जानेवारी, १९९५ पासून अमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**शांता शास्त्री,**
**शासनाचे प्रधान सचिव**

**मंडळ आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना शासकीय, निमशासकीय तसेच मंडळे, महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सेवेत आरक्षण**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्र. बीसीसी -१०९४ /प्र. क्र. ६८/९४/१६-ब,
मंत्रालय मुंबई -४०० ०३२,
दिनांक ८ डिसेंबर,१९९४

**पहा** :-१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०६६/ प्र.क्र. १११/ जे, दिनांक ९ एप्रिल १९६५
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०७०/ सी आर -जे, दिनांक २३ नोव्हेंबर,१९७०.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०४२/ जे, दिनांक २३ मे, १९७४.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०९३/ २१६७ /सी आर - १४१/९३/ १६-ब, दिनांक - २३ मार्च, १९९४.
५) शासन निर्णय, समाज कल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,क्रमांक सीबीसी- १४९४ /प्र. क्र. २३६/मावक- ५, दिनांक ७-१२-१९९४.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी - १०९३ / २१६७ /सी आर- १४१ / ९३ / १६-ब, दिनांक २३ मार्च १९९४ अन्वये मंडळ आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना शासकीय, निमशासकीय तसेच मंडळे, महामंडळे,नगरपालिका, महानगरपालिका,जिल्हा परिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादीच्या सेवेमध्ये खाली उल्लेखिल्याप्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| अ) विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती) | ३ % |
| ब) भटक्या जमाती (जाने. १९९० पूर्वीच्या) २८ व तत्सम जमाती) | २.५ % |
| क) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ % |
| ड) भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २ % |
| इ) इतर मागास वर्गीय | १९ % |

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०६४ /१११/ जे, दिनांक ९ एप्रिल,१९६५ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जातीतील बौध्द धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती, यांच्याकरिता १३% अपंग अनुसूचित जमाती यांच्या करिता ७% या विहित करण्यात आलेल्या आरक्षणात कोणताही बदल करण्यात आलेला नाही ते तसेच चालू राहिल.

४. राज्यात अनुसूचित जाती आणि जमाती म्हणून विवक्षित घोषित करण्यात आलेले जनसमुदाय वगळता अन्य काही जाती उपजातींकडून सामाजिक आणि आर्थिक दृष्टया तसेच शैक्षणिकदृष्टया मागासलेपणाच्या कारणावरु विशेष सवलती देण्याची मागणी होत असते अशा प्रसंगी जमाती विशेषतः अनुसूचित जमातींच्या

यादीमध्ये ज्या जमातींचा समावेश करण्यात आलेला आहे. अशा जमातीच्या नावाशी साधर्म्य असणाऱ्या कोष्टी, मच्छिमार कोळी, सोनकोळी यासारख्या जातींचा समावेश आहे. या जाती आदिवासी जमातीच्या निकषांची परिपूर्तता करीत असल्यास घटनेच्या ३४२ (१) व (२) च्या कलमान्वये राष्ट्रपतींना वा लोकसभेत या जाती आदिवासी जमातीमध्ये अंतर्भूत करता येतात किंवा कसे याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. तथापि या जाती सामाजिक दृष्टया आणि शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या असल्याने त्यांच्या विकासासाठी काही सवलती अथवा उपाययोजना करणे आवश्यक आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, सोबतच्या तत्क्यात नमूद केलेल्या जातीसाठी एक स्वतंत्र वेगळा प्रवर्ग निर्माण करावा व या प्रवर्गाला सवलती तसेच शासकीय नोक-यामध्ये आरक्षण देण्यात यावे. या जातींच्या प्रवर्गाला "विशेष मागास प्रवर्ग" संबोधण्यात येत आहे. त्यानुसार शासकीय, निमशासकीय तसेच मंडळे महामंडळे,नगरपालिका, महानगरपालिका,जिल्हापरिषदा, सहकारी बँका शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सेवामध्ये हे आरक्षण लागू राहिल. यापुढे सुधारित आरक्षण खालील प्रमाणे राहिल :-

| | |
|---|---|
| १) अनुसूचित जाती | १३% |
| २) अनुसूचित जमाती | ७% |
| ३) विमुक्त जाती (अ) [१४ व तत्सम जाती ] | ३% |
| ४) भटक्या जमाती (ब) जाने.९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती | २.५% |
| ५) भटक्या जमाती (क) [ धनगर व तत्सम जमाती] | ३.५% |
| ६) भटक्या जमाती (ड) [ वंजारी व तत्सम जमाती] | २% |
| ७) इतर मागास वर्गीय | १९% |
| ८) विशेष मागास प्रवर्ग (यादी जोडल्याप्रमाणे) | २% |

४. वर उल्लेख केलेल्या क्रमांक ८ वरील "विशेष मागास प्रवर्गास" ठेवण्यात आलेले आरक्षण हे सरळ सेवा भरतीसाठी व पदोन्नतीसाठीही अनुज्ञेय राहिल. तसेच या प्रवर्गाला क्रिमीलेअरचे तत्व लागू राहणार नाही. विमुक्त जाती (अ) या प्रवर्गासाठी शासनाकडून अनुज्ञेय असलेल्या अन्य सर्व सवलती देखील वरील विशेष मागास प्रवर्गास अनुज्ञेय राहतील. याबाबतचे आदेश संबंधित मंत्रालयीन विभागांनी स्वतंत्रपणे निर्गमित करावेत.

५. शासन सेवेतील भरती संदर्भात विहित करण्यात आलेल्या २०० बिंदू नामावलीमध्ये वर उल्लेखलेल्या विशेष मागास प्रवर्गासाठी आरक्षण धरुन सुधारित २०० बिंदू नामावली निर्गमित करण्यात येईल.

६. हे आदेश दिनांक १ डिसेंबर १९९४ पासून अंमलात येतील.

७. वरील आदेश आदिवासी विकास विभाग, समाज कल्याण, ससांस्कृतिक कार्य. व क्रीडा विभाग यांच्याशी विचार विनिमय करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शांता शास्त्री**
**प्रधान सचिव (सेवा)**
**महाराष्ट्र शासन,**

**परिशिष्ट -अ** (कृपया पुढील पान पहा)

## परिशिष्ट - "अ"

**समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्रमांक सीबीसी -१९९४ प्र .क्र. २३६ / मावक -५, दिनांक ७ डिसेंबर, १९९४ अन्वये विशेष मागास प्रवर्गातील जातींची यादी.**

| अ. क्र. | जातीचे नाव |
|---|---|
| १) | गोवारी जात |
| २) | माना जात |
| ३) | (१) कोष्टी, (२) हलवा कोष्टी, (३) हलवा जात, (४) साळी, (५) लाड कोष्टी (६) गढेवाल कोष्टी, (७) देशकर, (८) सालेवार, (९) पद्मसाळी, (१०) देवांग, (११) काचीबंधे, (१२) पटवीस,(१३) सतसाले, (१४) साडे, (१५) जैनकोष्टी. |
| ४) | (१) कोळी तत्सम जाती (२) मच्छिमार कोळी, (३) अहीर कोळी,(४) खानदेशी कोळी, (५) रानकोळी, (६) ख्रिश्चन कोळी) (७) चुंबळे कोळी, (८) पानसरे कोळी, (९) सूर्यवंशी कोळी,(१०) मांगेला कोळी, (११) सोनकोळी, (१२) वैतीकोळी, (१३) खारवी, (१४) नाशिक,धुळे व जळगांव जिल्हयातील डांगर शेती करणारे कोळी. |
| ५) | (१) मुन्नेरशर, (२) मुन्नुरशर, (३) मुन्नर, (४) तेलगु मुन्नर, (५) मुन्नरवार तेलगु, (६) मुन्नरकापू (७) कायेवार, (८) तेलगु कापेवार, (९) मुन्नरवाड (१० तेलगु फुलमाळी या जाती |

**मागासवर्गीयांसाठी आरक्षीत पदे -**
**उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदला बदलीने**
**पदे भरणे,पदे आरक्षणातून मुक्त करणे.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय, क्रमांक-बीसीसी -१०९४/ सी आर ५७/९४/ १६-ब, मंत्रालय मुंबई -४०० ०३२

दिनांक २६ डिसेंबर,१९९४

**वाचा** :- शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी -१०९१/२५५१/ (क)/ १६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१.

**प्रस्तावना** :

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी -१०६४/१११/ जे, दि. ९-४-१९६५ अन्वये मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गाकरिता सरळ सेवा प्रवेशाकरिता आरक्षण विहित करण्यात आले होते. त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरिता १० टक्के आरक्षण करण्यात आलेले होते, व ते २२ मार्च,१९९४ पर्यन्त अंमलात होते. दिनांक ९-४-१९६५ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार इतर मागासवर्गीयांकरिता असलेले आरक्षण भरले न गेल्यास अनुशेष म्हणून दाखविण्याची तसेच ते पुढे ओढण्याची तरतूद नव्हती, त्यामुळे शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०९१/७५५१/(क)/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१ च्या आदेशानुसार अदलाबदलीने पदे भरताना ती फक्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गामधूनच भरण्याची तरतूद आदेशीत करण्यात आलेली होती. मंडळ आयोगाच्या शिफारशीनुसार शासन निर्णयस, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९३ / २१६७ / सी आर - १४१ /९३ / १६-ब, दिनांक २३ मार्च, १९९४ अन्वये मागासवर्गीयांच्या ज्या विविध प्रवर्गाकरिता एकूण आरक्षण विहित करण्यात आलेले आहे त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरिता एकूण १९ टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. या आरक्षित पदांपैकी काही पदे भरली न गेल्यास ती पुढील ५ भरती वर्षा पर्यन्त अनुशेष म्हणून पुढे ओढण्याची तरतूद करण्यात आलेली असून ती अदलाबदलीने भरण्याबाबत देखील दिनांक २३ मार्च, १९९४ च्या शासन निर्णयात तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गुणवत्ते नुसार जे मागासवर्गीय उमेदवार सेवा प्रवेशाकरिता सपात्र ठरतील त्यांची गणना आरक्षित पदांवर केली जाणार अशीही तरतुद दिनांक २३ मार्च, १९९४ च्या आदेशात करण्यात आलेली आहे.

मागासवर्गीयांसाठी असलेल्या सरळ सेवा भरती तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षित पदे उमेदवारा अभावी भरली न गेल्यास ती कशा प्रकारे भरण्यात यावीत याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या गोष्टीचा सर्वंकष विचार करुन शासनाने आता खालील प्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९१/२५५१/(क)/१६-ब,दिनांक २७ मार्च,१९९४ मधील आदेश अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**सरळ सेवा भरती :**

अ) अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) भटक्या जमाती (ड) व इतर मागासवर्गीय (इ) या प्रवर्गाकरिता निर्धारित केलेल्या प्रमाणानुसार भरती करण्यासाठी त्या त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अशी पदे ५ भरती वर्षापर्यन्त रिक्त ठेवावी व या ५ भरती वर्षात त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात यावेत, असे प्रयत्न करुनही उमेदवार प्राप्त झाला नाही तर ६ व्या वर्षी खाली उल्लेख केल्याप्रमाणे अदलाबदलीने ही पदे भरण्यात यावीत. ६ व्या वर्षीही त्या प्रवर्गाचा किंवा अदलाबदलीसाठी दुस-या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ७ व्या वर्षी खुल्या प्रवर्गाने उमेदवार भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर करण्यात यावी. त्यासाठी आवश्यक त्या समर्थनानीशी प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावा. ६ व्या वर्षी पदे खालील प्रवर्गाने अदलीबदलीने भरण्यात यावीत :-

| | | |
|---|---|---|
| अनुसूचित जाती<br>अनुसूचित जमाती | } | या दोन प्रगर्वगातच अदलीबदली करण्यात यावी. |
| विमुक्त जाती (अ)<br>भटक्या जमाती (ब) | } | (मुळच्या १४ व तत्सम जाती)<br>(मुळच्या २८ व तत्सम जमाती)<br>या दोन प्रवर्गातच अदलाबदली करण्यात यावी. |
| भटक्या जमाती (क)<br>धनगर व तत्सम<br>भरटक्या जमाती (ई)<br>वंजारी व तत्सम<br>इतर मागावसवर्गीय (इ) | } | या तीन प्रवर्गातच अदलाबदली करण्यात यावी. |

ब) शासकीय व जनहितास्तव पद ५ भरती वर्षापर्यन्त रिक्त ठेवणे शक्य नसेल तर पद तात्पुरते बिगर राखीव करण्याचा प्रस्ताव संबंधित विभागाच्या सचिवांच्या सामान्य प्रशासन विभागाकडे अभिप्रयायासाठी पाठवावे. अशा प्रस्तावावर सामान्य प्रशासन विभागाने अभिप्राय दिल्या नंतर वर्ग-१ व वर्ग-२ च्या पदासंदर्भात प्रस्ताव त्या त्या विभागाच्या सचिवांनी मा. मंत्री, समाजकल्याण व आदिवासी विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्र्याकडे सामान्य प्रशासन विभागामार्फत मान्यतेसाठी पाठवावेत.

क) मंत्रालयीन विभागातील व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-५ ची पदे तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावीत व सामान्य प्रशासन विभागाच्यचा मान्यतेनंतर विभागांनी मा. मंत्री (सा.प्र.) आणि मा.मंत्री (आदिवासी विकास) यांची मान्यता घ्यावी.

ड) वर नमूद केल्याप्रमाणे अशा सर्व प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात यावे.

**पदोन्नती** :-

(१)अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती /विमुक्त जाती (अ) / भटक्या जमाती (ब) या प्रवर्गांना विहित आरक्षण ठेवण्यात आले आहे. शासन निर्णय क्र. बीसीसी-१०७२ / जे, दिनांक २३ मे १९७४ अन्वये त्यासाठी ५ बिंदू नामावली निर्धारीत केली आहे. त्याचा अवलंब करावा. या नामावलीत विमुक्त जाती / भटक्या जमातींचा एकत्रित समावेश करण्यात आला आहे. त्याप्रमाणेच कार्यवाही करावी. या प्रवर्गासाठी निर्धारित केलेल्या प्रमाणांनुसार त्या त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर पद भरण्यासाठी ३ भरती वर्षे प्रयत्न करण्यात यावा व त्या प्रवर्गाची उमेदवार मिळेपर्यन्त ते पद ३ भरती वर्षे रिक्त ठेवण्यात यावे. तदनंतर ४ थ्या वर्षी अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती या दोन प्रवर्गातून व विमुक्त जाती (अ) / भटक्या जमाती (ब) या दोन प्रवर्गातूनच आपआपसातून आदलाबदलीने भरण्यात यावे.

(२) शासकीय कारणास्तव किंवा जनहितास्तव अशी पदे संबंधित प्रवर्गाच्या उमेदवार उपलब्ध नसल्यास तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करावयाचे असल्यास यासंबंधीचा प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागामार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे मंजूरीसाठी पाठवावा. सामान्य प्रशासन विभागाने या पदाचे राखीव स्वरुप तात्पुरते काढून टाकण्यास मान्यता दिली तर एकत्रित निवड सूचित समाविष्ट असलेल्या इतर कर्मचा-यांची नेमणूक करुन रिकाम्या जागा तात्पुरत्या स्वरुपात भरता येतील व त्या त्या गटाची राखीव पदे त्या गटाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त ४ थ्या वर्षी नमूद केल्याप्रमाणे पद अदलाबदलीने भरावे. ४ थ्या वर्षीही अदलाबदलीसाठी मागासवर्गीयांना उमेदवार उपलब्ध

झाला नाही तर पद कायमचे अनारक्षित झाले असे समजून इतर प्रवर्गातून / खुल्या प्रवर्गाने (ज्या मागासवर्गीयाचे असतील) भरण्यात यावे. यासाठी ही सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घ्यावी.

(३) गट-१ व गट-२ ची आरक्षित पदे तातुरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधीचे प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह संबंधित विभागाच्या सचिवाच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायासाठी पाठवावेत व त्यानंतर मा. मंत्री,समाजकल्याण, मा. मंत्री आदिवासी विकास व संबंधित विभागाचे मंत्री यांच्या मार्फत मा. मुख्यमंत्रयांकडे मंजूरीसाठी पाठवावेत.

(४) मंत्रालयीन विभागातील व विभागाच्या निमंत्रणाखालील कार्यालयातील वर्ग-३ व ४ ची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधीचा प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी पाठवावेत.

(५) वर नमूद केल्याप्रमाणे अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

(६) गट-१ व गट २ च्या निवड सूचीतील मागासवर्गीयाच्या अधिक्रमांकास मान्यता देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, मंत्री (समाजकल्याण), मंत्री (आदिवासी विकास) व विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्र्याकडे अशी प्रकरणे सादर करण्यात यावीत.

(७) ज्येष्ठतेनुसार मागासवर्गीय उमेदवार पदोन्नतीला पात्र असेल परंतु त्याच्या प्रवर्गाचा आरक्षित बिंदू नसेल तर अशा कर्मचा-यास आरक्षित बिंदू नाही म्हणून पदोन्नती नाकारु नये.

**सर्वसाधारण सूचना -**

१) राखीव जागेवर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती /पदोन्नती देताना "आपली नियुक्ती /पदोन्नती मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर तातुपरत्या स्वरुपात करण्यात आली असून संबंधित उमेदवार प्राप्त झाल्यानंतर किंवा अदलाबदलीने पद भरल्यानंतर आपली नियुक्ती / पदोन्नती संपुष्टात येईल" असा उल्लेख नियुक्ती / पदोन्नतीच्या आदेशात न चुकता करण्यात यावा.

**२)** राखीव जागेवर इतर उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती / पदोन्नती दिल्यास अशा उमेदवारांची नोंद कायम स्वरुपी बिंदू नामावलीत घेण्यात येऊ नये. त्यांची नोंद तात्पुरत्या स्वरुपातील स्वातंत्र नोंदवहीत घेण्यात यावी. व जसजसे मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होतील तसतसे त्या नोंदवहीतील नोंदी कायम स्वरुपी बिंदू नामावलीत घेण्यात याव्यात.

३) सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी जे जे प्रस्ताव सादर करण्यात येतील ते ते प्रस्ताव संबंधित विभागांनी मागासवर्गीयांच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्याकरिता नेमण्यात आलेल्या उप सचिवांनी प्रथम तपासून आपापल्या विभागाच्या सचिवांमार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावेत.

४) मंत्रालयीन विभागाच्या अखत्यारिखाली असलेल्या क्षेत्रिय कार्यालयातील गट-३ व गट-४ च्या सरळ सेवा भरतीतील व पदोन्नतीतील मागासवर्गीयाचे अनारक्षण / अधिक्रमण याबाबत विभाग प्रमुखांनी सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) याचे प्रमाणपत्र न चुकता घ्यावे.

५) महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय उपक्रम , जिल्हा परिषद, अनुदानित संस्था, विद्यापीठ, सहकारी संस्था / बँका, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादीमधील मागासवर्गीयांची आरक्षित पदे तात्पूरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधी संबंधित विभागांनी सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने व मान्यतेने पुढील कार्यवाही करावी.

हे आदेश १ जानेवारी, १९९५ पासून अंमलात येतील.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शांता शास्त्री**
**शासनाचे प्रधान सचिव.**

**विशेष मागास प्रवर्गाकरिता शासकीय निमशासकीय सेवेत आरक्षण**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक २ जानेवारी, १९९५.

**पहा :** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब दिनांक २ जानेवारी, १९९५.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४ अन्वये, शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या विशेष भागात प्रवर्गातील जातींना शासकीय निमशासकीय तसेच मंडळे, महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सहकारी संस्था, शासकीय उपक्रमे व शैक्षणिक संस्था इत्यादीच्या सेवेमध्ये सरळसेवा व पदोन्नतीमध्ये २% आरक्षण ठेवण्यात आले आहे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४ मधील आदेशांच्या अंमलबजावणीस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

हे आदेश मंत्रालयीन विभागांना त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या विभाग प्रमुखांच्या निदर्शनास तात्काळ आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(शांती शास्त्री)**
**प्रधान सचिव (सेवा)**
**महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक- बीसीसी -1094/प्र.क्र. 68/94/16 ब,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक :- 26 जुलै, 1995.

**पहा :-** 1) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी -1094/प्र.क्र. 68/94/16 ब, दिनांक 8 डिसेंबर 1994.
2) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी -1094/प्र.क्र. 68/94/16 ब, दिनांक 2 जानेवारी 1995.
3) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र. सीबीसी -1494 / प्र.क्र. 236/ मावक -5, दिनांक 7 डिसेंबर, 1994.
4) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र. सीबीसी -1494 / प्र.क्र. 236/ मावक -5, दिनांक 13 जून, 1995.
5) शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. बीसीसी -1094/प्रक्र.68/94/16ब, दिनांक 15 जून, 1995.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी -1094/प्रक्र.68/94/16ब, दिनांक 15 जून, 1995 अन्वये, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाने घोषित केलेल्या ‘‘विशेष मागास प्रवर्गासाठी शासकीय, निमशासकीय सेवेत सरळ सेवा तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षण विहीत करण्यात आले आहे. त्यास अनुलक्षून सरळ सेवा भरतीची 200 बिंदू नामावली, त्याचप्रमाणे पदोन्नतीसाठी असलेल्या 50 बिंदू नामावलीमध्ये सुधारणा करणे अनिवार्य आहे. त्यादृष्टीने 200 बिंदू नामावली सुधारित स्वरुपात निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या स्वतंत्रपणे विचाराधीन आहे.

पदोन्नतीसाठी पूर्वीची 50 बिंदू नामावली शासन निर्णय क्र.बीसीसी -1092/1692/प्र.क्र. 154/16 ब, दिनांक 4 ऑगस्ट, 1992 अन्वये विहीत करण्यात आली आहे. या बिंदू नामावलीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्यासाठी आरक्षण ठरविण्यात आले आहे. आता नव्याने निर्माण केलेल्या विशेष मागास प्रवर्गास 2% इतके आरक्षण सरळ सेवा व पदोन्नतीमध्ये दिले असल्याने पदोन्नतीसाठी असलेल्या 50 बिंदू नामावलीत एक बिंदू सदर विशेष मागास प्रवर्गासाठी दर्शविणे आवश्यक आहे. पूर्वीच्या 50 बिंदू नामावलीत सुधारणा करुन त्यात विशेष प्रवर्गासाठी 2% इतके आरक्षण म्हणजे 50 बिंदू मध्ये एक बिंदू. बिंदू क्र. 10 वर दर्शवून सुधारित बिंदू नामावली सोबतच्या परिशिष्टात नमुद करण्यात आली आहे. ही बिंदू नामावली दिनांक 13 जून, 1995 पासून अंमलात येईल.

सर्व शासकीय कार्यालयानी सदर आदेशाची नोंद घ्यावी आणि त्यानुसार कार्यवाही करावी. मंत्रालयीन विभागांनी सदर आदेश त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना कळवावेत तसेच निमशासकीय सेवा, मंडळे, महामंडळे इत्यादि आस्थापनामध्ये हे आदेश लागू करण्यासंबंधात स्वतंत्र आदेश संबंधित मंत्रालयीन विभागानी निर्गमित करावेत. या संवर्गात निश्चित केलेल्या आदेशांच्या प्रती या विभागांसहि पाठविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शि. शा. हिरीजमनेर,**
**उप-सचिव, महाराष्ट्र शासन.**

**नमुनेवजा नामावली (50 बिंदू रोस्टर)**

| अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | 26. | खुली |
| 2. | खुली | 27. | विजाभज (अ/ब) |
| 3. | खुली | 28. | खुली |
| 4. | अनुसूचित जमाती | 29. | खुली |
| 5. | खुली | 30. | खुली |
| 6. | खुली | 31. | अनु. जमाती |
| 7. | विजाभज (अ/क) | 32. | खुली |
| 8. | खुली | 33. | खुली |
| 9. | खुली | 34. | खुली |
| 10. | विशेष मागासवर्ग | 35. | अनु.जाती |
| 11. | खुली | 36. | खुली |
| 12. | खुली | 37. | खुली |
| 13. | अनु. जाती | 38. | खुली |
| 14. | खुली | 39. | अनु. जाती |
| 15. | खुली | 40. | खुली |
| 16. | अनु.जमाती | 41. | खुली |
| 17. | खुली | 42. | खुली |
| 18. | खुली | 43. | अनु.जमाती |
| 19. | अनु.जाती | 44. | खुली |
| 20. | खुली | 45. | खुली |
| 21. | खुली | 46. | खुली |
| 22. | खुली | 47. | अनु.जाती |
| 23. | अनु जाती | 48. | खुली |
| 24. | खुली | 49. | खुली |
| 25. | खुली | 50. | विमुक्त जाती व भटक्या जमाती (अ/ब) |

---

| | |
|---|---|
| अनु. जाती | 7 |
| अनु. जमाती | 4 |
| विजाभज (अ/ब) | 3 |
| विशेष मागास प्रवर्ग | 1 |
| राखीव पदांची संख्या | 15 |
| खुल्या पदांची संख्या | 35 |

**एकाकी पदाच्या आरक्षणाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक, क्रमांक - बीसीसी १०९३/३१८७/प्र.क्र.१७१/९३/१६-ब

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १२ जुलै, १९९६.

**पहा :** **१.** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०७८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १.३.१९८९.

**२.** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- बीसीसी १०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १५.९.१९८९.

**३.** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०९३/३१८७/प्र.क्र.१७१/९३/१६-ब, दि. २१ फेब्रुवारी, १९९४.

**शासन परिपत्रक :**

उपरोक्त समक्रमांकाच्या दि. २१ फेब्रुवारी, १९९४ अन्वये फक्त एकच पद [ISOLATED] असलेल्या संवर्गात सुरुवातीला अथवा त्यापुढील भरती वर्षात भरती/बढती बाबतचे आरक्षण लागू होणार नाही म्हणजेच हे आदेश निर्गमित केलयानंतर ज्या ज्या कर्मचाऱ्यांना एकाकी पदावर नेमणूका दिल्या जातील त्या तात्पुरत्या स्वरुपात तर असतील शिवाय त्या जेष्ठता व गुणवत्तेनुसार तसेच त्या औरंगाबाद खंड पिठाच्या याचिका क्रमांक ३३८१/९१ च्या निर्णयाच्या अधीन राहून दिल्या जातील असे आदेश देण्यात आले होते.

२. उपरोक्त औरंगाबाद खंडपीठाकडे दाखल केलेली याचिका क्र. ३३८१/९१ ही मागे घेण्यात आली असल्याने एकाकी पदांवर नेमणूका करताना त्या औरंगाबाद खंडपीठाच्या क्रमांक - ३३८१/९१ च्या निर्णयाच्या अधीन राहून देण्याची आवश्यकता नाही. तसेच यापूर्वी ज्या नियुक्त्या सदर न्यायालयीन प्रकरणाच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आल्या होत्या. त्या निर्वाचित करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शि.शा हिरीजगनेर**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र. बी.सी.सी.१०९३/३१८७/प्र.क्र.१७१/९३/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक २ नोव्हेंबर, १९९६.

**पहा :-** (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १ मार्च, १९८९.
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १५ सप्टेंबर, १९८९.
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९३/३१८७/प्र.क्र.\१७१/९३/१६-ब, दिनांक २१ फेब्रुवारी, १९९४.
(४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९३/३१८७/प्र.क्र.१७१/९३/१६-ब, दिनांक १२ जुलै, १९९६.

**शासन परिपत्रक**

उपरोक्त समक्रमांच्या दिनांक २१ फेब्रुवारी, १९९४ परिपत्रकान्वये “फक्त एकच पद (Isolated) असलेल्या संवर्गात सुरुवातीच्या अथवा त्यापुढील भरती वर्षात भरती/बढती बाबतचे आरक्षण लागू होणार नाही. म्हणजेच, आदेश निर्गमित केल्यानंतर ज्यांना, एकाकी पदावर नेमणूक पदोन्नती दिली जाईल ती ज्येष्ठता व पात्रता या आधारे व तात्पुरत्या स्वरुपात असेल, तसेच अशा नियुक्त्या मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे दाखल केलेल्या याचिका क्र. ३३८१/९१ च्या निर्णयाच्या अधीन राहून दिल्या जातील” असे आदेश देण्यात आले होते.

२. उपरोक्त याचिका ३३८१/९१ ही मागे घेण्यात आली असल्याने एकाकी पदावर नेमणूका करताना त्या औरंगाबाद खंडपीठाच्या क्र. ३३८१/९१ च्या निर्णयाच्या अधीन राहून देण्याची आवश्यकता नाही. तसेच या पुर्वी ज्या नियुक्त्या सदर न्यायालयीन प्रकरणाच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आल्या होत्या त्या नियमित करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ते आदेश निर्गमित करण्याबाबत उपरोक्त दिनांक १२, जुलै १९९६ च्या परिपत्रकान्वये आदेश देण्यात आले आहेत.

३. वरीलप्रमाणे आदेश निर्गमित केल्यानंतरही काही कार्यालयांकडून एकाकी पदाला आता आरक्षण राहील किंवा कसे याबाबत या विभागाकडे विचारणा होत आहे. त्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, एकाकी पदाला भरती व बढतीबाबत आरक्षण लागू होत नाही. तसेच आरक्षण लागू होत नसल्याने अनुशेषाचा प्रश्न उद्भवत नाही. एकाकी पदावर नेमणूका देताना केवळ ज्येष्ठता व पात्रता विचारात घेण्यात याव्या.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शि. शा. हिरीजगनेर**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासकीय / निमशासकीय इत्यादी सेवेतील एकाकी पदांना (Isolated Post) लागू करण्यात आलेले आरक्षण रद्द करण्यासंदर्भात**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र. बी.सी.सी.१०९७/प्र.क्र.२०/९७/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१ सप्टेंबर, १९९८.

**वाचा :-** शा.नि., सा.प्र.वि. क्र. बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७.

**प्रस्तावना :-** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ (८) अन्वये “एकाकी पदास बिंदू नामावलीनुसार, आळीपाळीने आरक्षण ठेवावे. सुरुवातीस अनुसूचित जाती व त्यानंतर खुला असे आळीपाळीने (एका आड एक) या तत्वावर याचे पालन व्हावे” असे आदेश देण्यात आले आहेत.

या संदर्भात पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, चंदीगड विरुध्द फॅकल्टी असोसिएशन (रिव्हयू पिटीशन (सिव्हील) क्रमांक १७४९/९७ चे सिव्हील अपील क्रमांक ३१७५/९७) या आणि इतर प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या सांविधानिक पीठाने दि. १७.४.९८ रोजी असा निर्ण य दिला की, एकाकी पदास थेट किंवा आहीपाळीने आरक्षण लागू करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानुसार उपरोक्त दि. १८.१०.९७ च्या शासन निर्णयातील संबंधित आदेशामध्ये यथोचित सुधारणा करण्याचा प्रस्ताव, शासनाच्या विचाराधीन होता.

**निर्णय :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८.१०.१९९७ मधील परिच्छेद २(८) अन्वये एकाकी पदास आळीपाळीच्या तत्वावर आरक्षण लागू करण्याचे जे आदेश देण्यात आले आहेत ते रद्द करण्यात येत आहेत. यापुढे शासकीय/निमशासकीय इत्यादी सेवेतील एकाकी पदांना आरक्षण लागू असणार नाही.

२. हे आदेश, शासकीय / निमशासकीयसेवा/मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हा परिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापीठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना बंधनकारक असल्याने त्यानाही लागू करण्यासंबंधी संबंधित ग्रंथालयीन विभागांनी योग्य ते आदेश त्वरित निर्गमित करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शि. शा. हिरीजगनेर**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर सरळसेवेने नियुक्त / अथवा पदोन्नत झालेल्या कर्मचारी / अधिकारी यांना शासकीय / निमशासकीय सेवेत २% आरक्षणाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६- ब,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक :- २७ मे, २००२.

**संदर्भ** : - १) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब,दिनांक ८ डिसेंबर, १९९४.

२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब,दिनांक २ जानेवारी, १९९५.

३) शासन निर्णय, स.क.सा.का.व.क्री.वि.क्र. सीबासी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक ७ डिसेंबर, १९९४.

४) शासन निर्णय, स.क.सा.का.व.क्री.वि.क्र. सीबासी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५.

५) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.

**प्रस्तावना :-** राज्यातील अनु. जाती आणि अनु. जमाती म्हणून विविक्षितपणे घोषित करण्यात आलेले जनसमुदाय वगळता अन्य काही जाती-जमाती कडून सामाजिक, आर्थिकदृष्ट्या तसेच शैक्षणिक दृष्ट्या मागासलेपणाच्या कारणावरुन ‘‘विशिष्ट सवलती देण्याची मागणी सातत्याने होत असते, अशी मागणी अनु. जमातीच्या यादीमधील ज्या जमातीचा समावेश करण्यात आलेला आहे, अशा जमातीच्या नावांशी साध्यर्म्य असणाऱ्या जातीकडून प्रकर्षाने होत असते. अशा समुदायांमध्ये प्रामुख्याने हलबा-कोष्टी, मच्छिमार-कोळी, सोनकोळी, मुन्नेरवार, गोवारी आणि माना यासारख्या जातींचा समावेश आहे. याबाबत शासनाने विचार करुन गोवारी, माना, कोष्टी, हलबा-कोष्टी, कोळी, तत्सम जाती, मुन्नेरवार इत्यादी जाती शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांकः सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५,दिनांक ७ डिसेंबर,१९९४ अन्वये ‘‘विशेष मागास प्रवर्ग’’ म्हणून घोषित केलेला आहे.

या विशेष मागास प्रवर्गासाठी सरळसेवा व पदोन्नतीमध्ये २% आरक्षण विहित करण्यात आले तसेच अनु. जमातीच्या जाती प्रमाणपत्राआधारे शासकीय / निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती मिळविलेली आहे त्यांना सेवेतून काढून टाकण्यात येवू नये अथवा पदावनत करण्यात येऊ नये असे आदेश, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

अनु. जमातींच्या राखीव जागांवर नियुक्त झालेल्या बिगर आदिवासी कर्मचारी / अधिकारी यांच्या बाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ जून, १९९५ च्या शासन निर्णयान्वये संरक्षण (प्रोटेक्शन) देताना ही पदे अनारक्षित (डिरिझर्व्ह) करण्यात यावीत व अशा नेमलेल्या बिगर आदिवासी / कर्मचारी यांची आदिवासींसाठी आरक्षित कोट्यांमध्ये गणना करुन नये, अशी महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ४० व्या बैठकीत शिफारस करण्यात आली. सदर शिफारस शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ४० व्या बैठकीतील शिफारशीवर विचार करुन अनु. जमातीच्या राखीव जागेवर नियुक्त झालेल्या विशेष मागास प्रवर्गातील कर्मचारी / अधिकारी यांच्याबाबत आता शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**(अ) ज्या बिगर आदिवासी राखीव जागांवर नोकरी किंवा पदोन्नती मिळविल्या त्यांना ते ज्या घटकाचे आहेत, त्यांना त्या घटकात दाखविण्यात यावे व जी रिक्त झालेली पदे आहेत ती आदिवासी जमातींमधून भरण्यात यावीत.**

**(ब) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १५/६/१९९५ च्या परिच्छेद-४ मध्ये देण्यात आलेले संरक्षण दिनांक १५/६/१९९५ च्या आधी लागलेल्या कर्मचारी / अधिकारी यांनाच देण्यात यावे.**

२. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचारी / अधिकारी तसेच महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय उपक्रम, अनुदानित संस्था, विद्यापीठे, सहकारी बँका, सहकारी संस्था, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादिंनाही लागू राहतील.

३. हे आदेश मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांच्या तात्काळ निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बा. क. अग्रवाल**
**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**अनुसूचित जमातीची लोकसंख्या प्रामुख्यान जास्त असलेल्या गडचिरोली जिल्हयासाठी गट-क व गट-ड (वर्ग ३ व ४) साठी सेवेत अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग.

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२००१/३५३/ प्र.क्र. १४ / २०००/१६-ब,

मंत्रालय मुंबई -४०० ३२,

दिनांक १३ ऑगस्ट २००२.

**वाचा** :-१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०९३/२०६७/प्र. क्र.१४१/९३/ १६-ब, दिनांक १८-६-१९९४.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०९३/२१६७/सीआर १४१/९३/१६-ब, दिनांक १-९-१९९७

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०९८/११६/ ९८/ १६-ब, दिनांक २२-९-१९९९

**<u>शासन निर्णय</u>**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,दि. १८ जून १९९४ व दि. २२ सप्टेंबर १९९९ अन्वये अनुसूचित जमातीची लोकसंख्या तुलनेने अधिक असलेल्या ठाणे, नाशिक, धुळे, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर गडचिरोली व नंदुरबार या ८ जिल्हयांमध्ये गट “क“ व गट “ड“ (वर्ग ३ व ४) मधील पदांवर सरळ सेवा भरतीसाठी अनुसूचित जमातीकरीता वाढीव आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. या वाढीव आरक्षणांतर्गत गडचिरोली जिल्हयासाठी सध्या ठेवण्यात आलेल्या १५% या वाढीव आरक्षणत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या प्रस्तावावर आता निर्णय झालेला असून यापुढे गडचिरोली जिल्हयातील गट-क आणि गट-ड (वर्ग ३ व वर्ग ४) मधील पदे सरळ सेवेने भरण्यासाठी अनुसूचित जमातीकरीता २४% इतके वाढीव आरक्षण लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. याबाबतची बिंदू नामावली स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येईल.

२. विहित ७% पेक्षा वाढीव आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास, त्या जागा अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास वर्गाकरीता असलेले आरक्षण त्या त्या प्रमाणात कमी करुन अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण देण्यात आले असल्यामुळे, त्या प्रवर्गाकरीता असलेल्या आरक्षणानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९७/ प्र. क्र. ०२/९७/१६-ब, दि २९ मार्च १९९७ अन्वये भरण्यात याव्यात. मात्र ७ % पेक्षा कमी उमेदवार उपलब्ध झाल्यास ७% पर्यन्तच्या मर्यादेतील अनुशेष विद्यमान आदेशाप्रमाणे पुढे ओढण्यात यावा.

३. हे आदेश हा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भि. रा. वाढवे**
**उप सचिव महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन राजपत्र,**

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जानेवारी २२,२००४ / माघ २, शके, १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

**भाग चार**

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

**अनुक्रमणिका**

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ - अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तीसाठी लोकसेवांमधील व पदांमधील व पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरिता आणि तत्संबंधी व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.** पृष्ठे ५१-५८

दिनांक २० जानेवारी २००४ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याव्दारे, प्रसिध्द करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन
विधी व न्याय विभाग.

----------------------------

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २२ जानेवारी २००४ रोजी प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम.)

**अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तीसाठी लोकसेवांमधील व पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरिता आणि तत्संबंधीत व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तीसाठी लोकसेवांमधील रिक्त जागांसाठी व पदांकरिता आरक्षण करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नांव व्याप्ती व प्रारंभ

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे नियत करील अशा दिनांकास अमलात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,--

(क) "नियुक्ती प्राधिकरण" याचा लोकसेवा व पदे यांच्या संबंधातील अर्थ, अशा सेवांमध्ये किंवा पदांवर नियुक्त करण्यासाठी अधिकार प्रदान केलेले प्राधिकरण असा आहे ;

(ख) "निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती)" याचा अर्थ,शासनाने,वेळोवेळी विमुक्त जाती म्हणून घोषित केलेल्या जमाती असा आहे,

(ग) "आस्थापना" याचा अर्थ, शासनाने किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही अधिनियमांन्वये घटित केलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे किंवा सांविधिक प्राधिकारणाचे कोणतेही कार्यालय,किंवा विद्यापीठ किंवा जिच्यातील भाग भांडवल, शासनाने धारण केले आहे अशी कंपनी किंवा महामंडळ किंवा सहकारी संस्था किंवा शासकीय अर्थसहाय्यित संस्था, असा आहे.

**स्पष्टीकरण :-** या खंडाच्या प्रयोजनार्थ, शासकीय अर्थसहाय्यित संस्था या शब्दप्रयोगात,ज्या संस्थांना किंवा उद्योगांना शासनाकडून हा अधिनियम लागू होण्याच्या पूर्वी अथवा त्यानंतर, सवलतीच्या दराने शासकीय जमिनीच्या स्वरुपात किंवा शासनाकडून इतर कोणत्याही आर्थिक सवलतीच्या स्वरुपात सहाय्य देण्यात आलेले आहे किंवा ज्यांना शासनाकडून मान्यता, परवाना देण्यात आला आहे, त्याच्यावर शासनाकडून देखरेख किंवा नियंत्रण ठेवण्यात येते, अशा संस्थांचा किंवा उद्योगांचाही अंतर्भाव होतो.

(घ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे,

(ड) "गट "अ" "ब" "क" किंवा "**ड**" " याचा अर्थ शासनाने, याबाबत,वेळोवेळी दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांव्दारे वर्गीकरण केल्याप्रमाणे गट "अ" "ब" "क" किंवा यथास्थिती, "**ड**"च्या कक्षेत येणारी पदे,असा आहे.

(च) "भटक्या जामती" याचा अर्थ एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी उपजीवीकेच्या शोधार्थ भटकंती करणा-या शासनाने, वेळोवेळी घोषित केलेल्या जमाती, असा आहे.

(छ) "इतर मागासवर्ग" याचा अर्थ, शासनाने, घोषित केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या नागरिकांचा वर्ग, आणि त्यात भारत सरकारने महाराष्ट्र राज्याच्या संबंधात इतर मागासवर्ग म्हणून घोषित नागरिकांचा समावेश आहे, असा आहे.

(ज) "विहीत" याचा अर्थ शासनाने या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमांव्दारे विहित, असा आहे.

(झ) "लोकसेवा व पदे" याचा अर्थ राज्याच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सेवा व पदे, असा आहे आणि त्यामध्ये -

१९६१ (एक) स्थानिक प्राधिकरण,

चा महा (दोन) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये स्थापन केलेली व जिच्यात राज्य शासन

२४ भागधारक आहे अशी सहकारी संस्था.

१९५६ चा १ (तीन) शासनाच्या मालकीचे व शासनाने नियंत्रित केलेले,केंद्रीय किंवा राज्य अधिनियमाव्दारे किंवा अधिनियमान्वये स्थापन झालेले मंडळ किंवा महामंडळ किंवा सांविधिक संस्था किंवा कंपनी अधिनियम,१९५६ याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या केलेली शासकीय कंपनी,

(चार) महाराष्ट्र अधिनियमाव्दारे किंवा त्या अन्वये स्थापन केलेल्या विद्यापीठासह, शासनाचे सहाय्यक अनुदान घेणारी, शासनाच्या मालकीची व शासनाने नियंत्रित केलेली शैक्षणिक संस्था,

(पांच) आस्थापना, आणि

(सहा) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, शासकीय आदेशाव्दारे ज्या बाबतीत आरक्षण लागू केले होते आणि ज्याचा उपखंड (एक) मध्ये समावेश केलेला नाही अशा सेवांचा व पदांचा समावेश होतो.

(त्र) "सेवा भरती वर्ष" याचा अर्थ, ज्या इंग्रजी कॅलेंडर वर्षात प्रत्यक्षात सेवा भरती केली ते वर्ष असा आहे.

(ट)"आरक्षण"याचा अर्थ, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्या सदस्यांसाठी सेवांमध्ये पदांचे आरक्षण, असा आहे.

(ठ) "अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती " यांना,भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३६६ याच्या खंड (२४) व (२५) मध्ये अनुक्रमे त्यांना नेमून दिलेले अर्थ असतील.

(ड) "विशेष मागास प्रवर्ग" याचा अर्थ महाराष्ट्र शासनाने,विशेष मागास प्रवर्ग म्हणून घोषित केलेल्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास नागरिकांचा वर्ग, असा आहे.

**३.** (१) हा अधिनियम - प्रयोज्यता

(क) वैद्यकीय, तंत्र व शिक्षण क्षेत्रातील अति विशेषीकृत पदे,
(ख) बदली किंवा प्रतिनियुक्तीव्दारे भरावयाची पदे,
(ग) पंचेचाळीस दिवसांपेक्षा कमी कालावधीसाठीच्या तात्पुरत्या नियुक्तया आणि
(घ) कोणत्याही संवर्गातील किंवा श्रेणीतील एकल (एकाकी) पद, याव्यतिरिक्त, लोक सेवांमधील व पदांवरील सर्व नियुक्त्यांना लागू होईल.

(२) कलम २ मधील खंड (ग) च्या स्पष्टीकरणामध्ये तरतूद केल्याप्रमाणे, कोणत्याही सहाय्य देण्यासंबंधात कोणत्याही आस्थापनेशी करार करताना किंवा अशा कराराचे नुतनीकरण करताना, राज्य शासन अशा आस्थापनेने अधिनियमाच्या तरतुदीचे पालन करावे अशी अट (अशा करारात) समाविष्ट करील.

आरक्षण व टक्केवारी **४.** (१) या अधिनियमाव्दारे किंवा त्या अन्वये अन्यथा तरतूद केली नसेल तर, अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग, यांसाठी राखून ठेवलेल्या जागा अशा जातीतील, जमातीतील,प्रवर्गातील किंवा वर्गातील नसलेल्या उमेदवारांव्दारे भरण्यात येणार नाहीत.

(२) या अधिनियमाच्या इतर तरतुदीना अधीन राहून, कलम २ च्या खंड (त्र) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या

लोकसेवांच्या आणि पदांच्या थेट भरतीच्या वेळी, अनुसूचित जमाती,निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांतील व्यक्तीसाठी खाली तरतूद केल्याप्रमाणे पदे राखून ठेवण्यात येतील :-

| जाती, जमाती, प्रवर्ग, वर्गाचे वर्णन | | राखून ठेवावयाच्या रिक्त पदांची किंवा जागांची टक्केवारी. |
|---|---|---|
| १. अनुसूचित जाती | . . | १३ टक्के |
| २. अनुसूचित जमाती | . . | ७ टक्के् |
| ३. निरअधिसूचित जमाती (अ) | . . | ३ टक्के |
| ४. भटक्या जमाती (ब) | . . | २.५ टक्के |
| ५. भटक्या जमाती (क) | . . | ३.५ टक्के |
| ६. भटक्या जमाती (ड) | . . | २ टक्के |
| ७. विशेष मागास प्रवर्ग | . . | २ टक्के |
| ८. इतर मागासवर्ग | . . | १९ टक्के |
| एकूण | . . | ५२ टक्के |

परंतू शासनास, राजपत्रातील आदेशाव्दारे,अशी तरतूद करता येईल की, सर्व पदांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्या करिता ठेवावयाच्या आरक्षणाच्या टक्केवारीची तरतूद ही,-

(एक) राज्य प्रवर्गातील पदांच्या बाबतीत, राज्याच्या नवीनतम जनगणना अभिलेखाच्या आधारे, व

(दोन) जिल्हा प्रवर्गातील पदांच्या बाबतीत संबंधित जिल्हयाच्या नवीनतम जनगणना अभिलेखाच्या आधारे, करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, "उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअरचे)" तत्त्व, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त, वर नमूद केलेल्या सर्व प्रवर्गांना लागू असेल.

**स्पष्टीकरण एक -** या पोट कलमाच्या प्रयोजनार्थ, "निरधिसूचित जमाती (अ)," "भटक्या जमाती (ब)," "भटक्या जमाती (क)" आणि "भटक्या जमाती (ड)" या शब्दप्रयोगांचा अर्थ, शासनाने, याबाबत वेळोवेळी काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे , "निरधिसूचित जमाती (अ),""भटक्या जमाती (ब)," "भटक्या जमाती (क)" आणि "भटक्या जमाती (ड)" म्हणून घोषित केलेल्या अशा जमाती किंवा पोट-जमाती, असा आहे.

**स्पष्टीकरण दोन -** या पोट कलमाच्या प्रयोजनार्थ, "उन्नत व प्रगत" या शब्दप्रयोगाचा अर्थ, शासनाच्या सामाजिक प्रयोज्यता न्याय,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाने याबाबत वेळोवेळी काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे घोषित केल्याप्रमाणे "उन्नत व प्रगत" प्रवर्गात मोडणा-या व्यक्ती, असा आहे.

परंतू तसेच, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास, ठाणे, धुळे, नंदुरबार, रायगड, यवतमाळ,चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयामध्ये कोणत्याही शासकीय आदेशांन्वये **क** व **ड** गटातील पदांच्या थेट भरतीसाठी अनुसूचित

जमातीकरिता अतिरिक्त आरक्षण अंमलात असल्यास,असे आरक्षण अशा आदेशामध्ये सुधारणा करण्यात येईपर्यंत किंवा ते रद्द करण्यात येईपर्यंत अंमलातअसण्याचे चालू राहील.

(३) पोट-जात (२) खालील तक्तयातील अनुक्रमांक (३) ते (६) (दोन्ही धरुन) मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असेल. उक्त कोणत्याही प्रवर्गासाठी राखून ठेवलेल्या पदांकरिता योग्य उमेदवार त्याच सेवाप्रवेश वर्षात उपलब्ध न झाल्यास, अशी पदे उक्त पदे, उक्त इतर कोणत्याही प्रवर्गातील योग्य उमेदवारांना नियुक्त करुन भरण्यात येतील.

(४) विभागीय स्तरावरील किंवा जिल्हा स्तरावरील सर्व पदांमध्ये शासनसाने त्याबाबतीत अधिसूचित केले असेल त्याप्रमाणे ,अशा गट-क आणि गट-ड च्या प्रवर्गामध्ये सेवाप्रवेश वर्षात निर्माण होणा-या आरक्षणाची टक्केवारी अशा विभागीय किंवा जिल्हा स्तरावरच फक्त राखली जाईल.

**पदोन्नत्या मधील आरक्षण**

५.(१) पदोन्नतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्यावर असेल.

(२) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास, पदोन्नतीव्दारे भरावयाच्या कोणत्याही पदांसाठी आरक्षणाची तरतूद करणारे शासनाचे आदेश अंमलात असल्यास, शासनाकडून त्यामध्ये फेरफार करण्यात आला नसेल किंवा ते रद्द करण्यात आले नसतील तर ते, अंमलात असण्याचे चालू राहतील.

राखीव असलेल्या रिक्त जागा पुढे नेणे

६. (१) कोणत्याही सेवाप्रवेश वर्षाच्या संबंधात कलम ४ च्या पोट कलम (२) अन्वये व्यक्तीच्या कोणत्याही प्रवर्गासाठी राखीव असलेली कोणतीही जागा रिक्त राहिल्यास, अशी रिक्त जागा,सरळ सेवा भरतीच्या बाबतीत पाच वर्षापर्यंत आणि पदोन्नतीच्या बाबतीत तीन वर्षापंत पुढे नेण्यात येईल.
परंतू या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास मागासवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे अशी पदे भरण्यासंबंधीचे कोणतेही शासकीय आदेश अमलात असल्यास असे शासकीय आदेश त्यामध्ये शासनाकडून फेरफार करण्यात आला नसेल किंवा तो रद्द करण्यात आले नसतील तर, अंमलात असण्याचे चालू राहतील.

(२) पोट कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे एखादी रिक्त जागा पुढे नेण्यात आली असेल तेंव्हा, ज्या सेवाभरती वर्षामध्ये ती पुढे नेण्यात आली असेल त्या सेवाभरती वर्षाकरिता संबंधित व्यक्तीच्या प्रवेशासाठी राखीव असलेल्या रिक्त जागांच्या नियम वाटपामध्ये ती हिशोबात धरली जाणार नाही.

परंतू, नियुक्ती प्राधिकारी, अशा न भरलेल्या रिक्त जागा भरण्यासाठी कोणत्याही वेळी विशेष सेवाभरती मोहिम हाती येईल आणि जर अशा विशेष सेवाभरती मोहिमेनंतरही अशा रिक्त जागा भरल्या गेल्या नाहीत तर, त्यानंतर,शासन विहित करील अशा रीतीने त्या जागा भरण्यात येतील.

अधिनियमाचे अनुपालन करण्याची जबाबदारी व अधिकार

७. (१) शासन लेखी आदेशाव्दारे, प्रत्येक नियुक्ती प्राधिका-याकडे किंवा त्या प्राधिका-याच्या हाताखालील कोणत्याही अधिका-याकडे या अधिनियमाच्या तरतुदीचे अनुपालन करण्याची जबाबदारी सोपवतील,

(२) शासन त्याचरीतीने पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नियुक्ती प्राधिका-याला किंवा त्या अधिका-याला, पोट-कलम (१) अन्वये अशा प्राधिका-याकडे किंवा अधिका-याकडे सोपविलेले असे कर्तव्य परिणामकारकरीतीने पार पाडण्यासाठी अशा प्राधिका-यास किंवा अधिका-यास आवश्यक असतील असे अधिकार किंवा प्राधिकार विनिहित करील.

शास्ती

८. (१) कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये,कर्तव्य किंवा जबाबदारी सोपविलेला कोणताही नियुक्त प्राधिकारी किंवा अधिकारी किंवा कर्मचारी, या अधिनियमातील प्रयोजनांचे उल्लंघन होईल किंवा ते

निष्फळ ठरेल अशा उद्देशाने हेतुपुरस्सर कृती करील तर, त्यास अपराधसिध्दी नंतर, नव्वद दिवसापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

(२) शासनाच्या किंवा शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या पूर्वमंजुरीखेरीज, कोणतेही न्यायालय या कलमाखालील शिक्षापात्र अपराधांची दखल घेणार नाही.

अभिलेख मागवण्याचा अधिकार

९. कलम ४ च्या पोट-कलम(२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गाच्या कोणत्याही व्यक्तीवर, या अधिनियमाच्या तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे किंवा याबाबतीत कोणत्याही व्यक्तीवर, या अधिनियमाच्या तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे किंवा याबाबतीत दिलेल्या शासकीय आदेशांचे कोणत्याही नियुक्ती प्राधिकरणााने पालन न केल्यामुळे प्रतिकुल परिणाम झाला आहे असे शासनाच्या निदर्शनास आल्यास,किंवा निदर्शनास आल्यास, शासन योग्य वाटतील अशा अभिलेखांची मागणी करु शकेल आणि तसे आदेश देऊ शकेल.

निवड समिती मधील प्रतिनिधीत्व

१०. (१) शासनास आदेशान्वये, लोक सेवा व पदांकरिता नियुक्ती किंवा यथास्थिति, पदोन्नती याकरिता निवड करण्याच्या प्रयोजनार्थ निवड, चाळणी आणि विभागीय पदोन्नती समितीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास वर्ग यांमधील अधिका-यांच्या नामनिर्देशनाकरिता तरतूद करताोईल.

(२) शासनास, आदेशाव्दारे, कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील व्यक्तींच्या हितासाठी त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षा किंवा तशाच प्रकारच्या अन्य परीक्षा किंवा मुलाखती यांच्या संबंधातील शुल्कामध्ये सवलत देता येईल आणि उच्च वयोमर्यादाशिथिल करता येईल.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास अंमलात असलेले,कोणतीही स्पर्धात्मक परीक्षा किंवा तशाच प्रकारच्या अन्य परीक्षा किंवा मुलाखत यांच्या शुल्कामध्ये सवलत आणि उच्च वयोमर्यादा शिथिल करणे यांसह सवलती आणि शिथिल करण्याच्या संबंधातील शासकीय आदेश, त्यांमध्ये शासनाकडून फेरफार केला नसल्यास किंवा ते रद्द केले नसल्यास लागू असण्याचे चालू राहतील.

अनियमित नियुक्त्या निरर्थक असणे

११. हया अधिनियमाच्या तरतुदीन्वये उल्लंघन करुन केलेल्या कोणत्याही नियुक्त्या निरर्थक होतील. नियुक्तया

सद्‌भावना पूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

१२. या अधिनियमाच्या तरतुदीन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणताही प्राधिकारी किंवा व्यक्ती यांच्याविरुध्द कोणताही वाद, खटला किवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार

१३. (१) राज्य शासनाला या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेव्दारे नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, तो एकाच अधिवेशनात किंवा लागेपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल तितक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि त्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्यालगत नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही

फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा अधिसूचनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा, यथास्थिती, तो अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा रद्द करणे यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**या अधिनियमाच्या तरतूदी त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या जोडीला असणे**

१४. या अधिनियमान्वये तरतूदी, त्यावेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही अधिनियमाच्या या तरतुदींच्या जोडीला असतील आणि त्यांचे अल्पीकरण करणाऱ्या नसतील.

**व्यावृत्ती**

१५. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच पिवड प्रक्रिया अधीच सुरु झाली असेल अशा प्रकरणांना या अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत आणि अशी प्रकरणे, अशा प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि कायद्याच्या ज्या तरतुदी होत्या त्यांना अनुसरुन हाताळण्यात येतील.

**स्पष्टीकरण :-** या कलमाच्या प्रयोजनार्थ, प्रस्तुत सेवा नियमांच्या अन्वये जेथे -

(एक) फक्त लेखी परीक्षा किंवा मुलाखतीच्या आधारे भरती करावयाची असेल आणि अशी लेखी परीक्षा किंवा, यथास्थिती, मुलाखत सुरु झाली असेल, किंवा

(दोन) लेखी परीक्षा व मुलाखत दोन्हींच्या आधारे भरती करावयाची असेल आणि अशी लेखी परीक्षा सुरु झाली असेल,

त्याबाबतीत, निवड प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे, असे मानण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार

१६. (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, शासनास, प्रसंग उद्‌भवल्यावर, अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यांनतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे सादर करण्यात येईल.

**असा.क्र. २१** **रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३२/एमबीआय/२००३-०५**

**महाराष्ट्र शासन राजपत्र**

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, जानेवारी २९,२००४/माघ ९, शके १९२५**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार -ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिध्द केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ३२, दिनांक २९ जानेवारी २००४

अधिसूचना

महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम , २००१. क्रमांक बीसीसी २००१/१८९७/प्र.क्र.६४/२००१/१६-ब-महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम ८) याच्या कलम १ च्या पोट-कलम (३) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त अधिनियम अंमलात आणण्यासाठी दिनांक २९ जानेवारी २००४ हा दिवस निश्चित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**सुरेश कुमार,**
**शासनाचे अपर मुख्य सचिव (सा.वि.स)**

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

**Mantrala, Mumbai 400 032, dated the 29th January 2004**

## *NOTIFICATION*

MAHARASHTRA STATE PUBLIC SERVICE [RESERVATION FOR SCHEDULED CASTES, SCHEDULED TRIBES, DE-NOTIFIED TRIBES (VIMUKTA JATIS), NOMADIC TRIBES, SPECIAL BACKWARD CATEGORY AND OTHER BACKWARD CLASSES] Act, 2001 No. BCC.2001/1897/C.R.No. 64/2001/16-B – In exercise of the power conferred by sub-section (3) of section 1 of the Maharashtra State Public Services [Reservation for Scheduled Castes, Scheduled Tribes, Don-notified Tribes (Vimukta Jatis) , Nomadic tribes, Special Backward Category and Other Backward Classes] Act, 2001 (Mah. Act. VIII of 2004), the Government of Maharashtra hereby appoints the 29th day of January 2004 to be the date on which the said act shall come into force.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**SURESH KUMAR,**
**Additional Secretary to Government**

**महाराष्ट्र लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१.**

---

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग.
शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२००१/१८९७/ प्र.क्र. ६४/२००१/१६-ब,
मंत्रालय, मुंबई -४०० ३२,
दिनांक : १० फेब्रुवारी,२००४.

**परिपत्रक**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम,२००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी, २००४ पासून अंमलात आणला आहे. यासंबंधीची अधिसूचना दिर. २९ जानेवारी, २००४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र (असाधारण) भाग चार- ब मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. सोबत, सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८ व अधिसूचनेची मराठी / इंग्रजी प्रत सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, कार्यालयीन प्रमुख यांच्या निदर्शनास आणून उक्त अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना विनाविलंब देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जी. के. राऊत**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**भटक्या जमातीमध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या जातींना सवलती देण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग.

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२००३/१३४९/ प्र.क्र. ६३ /०३/१६-ब,

मंत्रालय मुंबई -४०० ३२,

दिनांक ७ मे २००५.

**वाचा** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०९३/२१६७/प्र. क्र.१४१/९३/ १६-ब, दिनांक २३ मार्च,१९९४.

**प्रस्तावाना :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०९३/२१६७/प्र. क्र. १४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च,१९९४ अन्वये इतर मागासवर्गीयांना तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातींना शासकीय व निमशासकीय सेवेत सुधारीत आरक्षण विहीत करण्यात आले. या शासन निर्णयानुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीकरीता खालील प्रमाणे सुधारीत आरक्षण विहीत करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| अ) विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती) | : ३ % |
| ब) भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जात) | : २.५ % |
| क) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | : ३.५ % |
| ड) भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | : १ % |
| **एकूण -** | **११ %** |

वरील शासन निर्णयाप्रमाणे विमुक्त जातीमधील १४ जातींना तर भटक्या जमातीमधील एकूण ३० जातींना आरक्षणाचे फायदे दिलेले आहेत. आता विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या क्रमांक सीबीसी १०९८/ प्र. क्र. १८५ /इमाव-५, दिनांक १४ फेब्रुवारी , २००१ च्या शासन निर्णयान्वये खालील जातींचा भटक्या जमातीमध्ये नव्याने समावेश करण्यात आला.

३१ - मरीआईवाले,कडकलक्ष्मीवाले, मरगम्मवाले.

३२ - गिहरा / गहरा.

३३ - गुसाई / गोसाई

३४ - मुस्लिम मदारी,गारुडी,सापवाले व जादुगार

३५ - भारतीय इराणी.

या शिवाय सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रिडा व विशेष सहाय विभागाच्या क्रमांक- सीबीसी-१०/२००१/प्र. क्र. २३२ /मावक-५, दि. १ जून,२००४ च्या शासन निर्णयान्वये खालील जातीचा भटक्या जमातींमध्ये नव्याने समावेश करण्यात आला.

३६ - गवळी, मुस्लिम गवळी

३७ - दरवेशी, वाघवाले,शाह (मुस्लिम धर्मीय), अस्वलवाले

भटक्या जमातीमध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या वरील जातींना विमुक्त जाती / भटक्या जमातीमधील कोणत्या उप गटांचे फायदे द्यावेत याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- भटक्या जमातीमध्ये नव्याने समावेश केलेल्या खालील जातींना आरक्षण व अन्य सवलतीकरीता भटक्या जमाती (ब) या उपगटाचे फायदे देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

३१ - मरीआईवाले, कडकलक्ष्मीवाले, मरगम्मवाले
३२ - गिहरा / गहरा
३३ - गुसाई / गोसाई
३४ - मुस्लिम मदारी, गारुडी, सापवाले व जादुगार
३५ - भारतीय इराणी
३६ - गवळी, मुस्लिम गवळी
३७ - दरवेशी, वाघवाले, शाह (मुस्लिम धर्मीय), अस्वलवाले

२. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, मंडळे / महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, अनुदानित शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादीं सर्व कार्यालयांना लागू राहतील.

३. हे आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**र. ग. पवार**
**उप चिव महाराष्ट्र शासन**

**शासन परिपत्रक दिनांक ५.११.२००९ मधील क्रमांक ७ च्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने सुधारित आदेश निर्गमित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, मंत्रालय,

मुंबई-४०० ०३२. दिनांक : १२ डिसेंबर, २०११.

**वाचा :** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/ ०९/१६ ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९.

**प्रस्तावना :-**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६- ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :-

"मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज यापुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येवू नये."

याचिका क्र.२१३६/२०११ श्रीकांत चंद्रकांत सैदाणे विरुद्ध महाराष्ट्र शासन यासह एकूण १५ याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशान्वये शासन परिपत्रक दि. ५.११.२००९ मधील क्रमांक ७ पुढील आदेश रद्द ठरविले आहेत.

**शासन निर्णय :-**

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश विचारात घेवून शासन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे :-

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने दिलेले आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२) सरळसेवाभरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्याने आदेश निर्गमित करावेत.

३) नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. त्याने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार, संबंधित जात पडताळणी समितीने उमेदवारांचे जात पडताळणीचे प्रस्ताव सहा महिन्यांच्या आत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर त्यास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करावेत, आणि त्या उमेदवाराविरुद्ध नियुक्ती प्राधिकाऱ्याने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करावी.

याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे, यावर मा. सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील, त्या आदेशाच्या अधीन राहून उपरोक्त आदेश राहतील.

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिनस्त कार्यालयांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणून द्यावा.

प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी सर्व जात पडताळणी समित्यांना वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निदेश द्यावेत व जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असलेल्या प्रकणांचा त्यांनी दरमहा आढावा घ्यावा, आढावा घेण्यात आल्यानंतर मासिक प्रगती अहवाल प्रधान सचिव (सा.वि.स.), सामान्य प्रशासन विभाग यांना पाठवावा.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१११२२६१०२२२२१२२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. ना. रणखांबे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल क्र. २२ आणि राज्यात शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (शै. सा. मा. प्र.) Educationally and Socially Backward Catergory (ESBC) तयार करुन त्या प्रवर्गातंर्गत मराठा समाजाचा समावेश करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक

मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२

दिनांक : १५ जुलै, २०१४

**वाचा : शासन सामान्य प्रशासन विभाग, सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १३ दि. ९ जुलै २०१४.**

**प्रस्तावना :-**

भारतातील आरक्षण संकल्पनेचे जनक म्हणून ओळखले जाणारे राजर्षी शाहू महाराज यांनी सन १९०२ मध्ये करवीर संस्थानात सरकारी नोकऱ्यामध्ये मागासवर्गीयांना आरक्षणाची तरतुद केली होती. त्यामध्ये मराठा समाजाचाही समावेश केला होता. त्यानंतर ब्रिटिश कालीन मुंबई प्रांताच्या दि. २३ एप्रिल १९४२ च्या निर्णयाद्वारे मराठा व इतर जातीसह एकूण २२८ जाती मध्यम व मागास समाज म्हणून घोषित केल्या होत्या. सदर शासन निर्णयाला जोडलेल्या सुचीत अ.क्र. १४९ येथे मराठा समाज दाखविण्यात आला आहे. सन २००४ मध्ये मराठा आरक्षणाचे प्रकरण महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे त्यांच्या शिफारशीसाठी विचारार्थ पाठविले होते. न्या. आर.एम. बापट यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मागासवर्ग आयोगाने सन २००८ मध्ये मराठा आरक्षणाबाबत अहवाल क्र. २२ शासनास सादर केला होता. सदर अहवालात मराठा समाजाला इतर मागासवर्ग या प्रवर्गात आरक्षण देता येणार नाही असे नमुद करण्यात आले आहे. त्या अहवालावर मंत्रीमंडळाच्या उपसमितीने तपशीलवार विचारविनिमय केल्यानंतर मराठा समाजाचा शैक्षणिक व सामाजिक मागासलेपणा याबाबतची आयोगाने गोळा केलेली अपुरी साधार माहिती या मुद्यावर अहवाल सादर करण्यासाठी हे प्रकरण आयोगाकडे परत पाठविण्यात आले. तसेच विद्यमान आरक्षणास बाधा न पोहोचविता मराठा समाजाला आरक्षण देता येईल किंवा कसे याबाबत मत देण्याची विनंती केली होती. त्यावर आयोगास अहवाल सादर करण्याची वारंवार विनंती केल्यानंतरही आयोगाने केवळ २२ व्या अहवालावर महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम २००५ च्या कलम ९(२) नुसार निर्णय घेण्याचा आग्रह धरला होता.

दरम्यानच्या काळात राज्यातील मराठा समाजाचा इतर मागासवर्ग प्रवर्गामध्ये समावेश करण्यासंदर्भात योग्य त्या शिफारशी करण्यासाठी मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने राज्यातील मराठा समाजाचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सर्वेक्षण करुन साधार माहितीसह अहवाल शासनास सादर केलेला आहे. त्यामध्ये मराठा समाज हा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदर अहवालाची प्रत राज्य मागासवर्ग आयोगास देऊन विद्यमान आरक्षणाला बाधा न पोहोचविता शैक्षणिक,सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत अभिप्राय देण्याची पुन्हा विनंती करण्यात आली. त्यावर आयोगाने दि. २० मे २०१४ च्या पत्रान्वये शासनास आयोगाचा अहवाल क्र. २२ वर निर्णय घेण्याची विनंती केली आहे.

वरील पार्श्वभूमी पाहता राज्य मागासवर्ग आयोग याबाबतीत निर्णय घेण्यास अनुकूल नाही असे मानण्यास वाव असल्याने शासनाने जवळजवळ एक दशक प्रतिक्षा केल्यानंतर मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेण्याचे ठरविले. शासनाने दि. २५ जुन २०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य मागासवर्ग आयोगाचा २२ वा अहवाल अंशतः नाकारण्याचा व मराठा समाज शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला असल्याने तो महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम २००५ च्या कलम ९(२) नुसार आरक्षणास पात्र आहे या फेरबदलासह तो स्विकारण्याचा निर्णय घेतला. आयोगाचा अहवाल क्र. २२, खालील कारणामुळे शासनाकडून अंशतः नाकारण्यात येत आहे.

१. साधार माहितीचा (Quantifiable Data) अभाव

२. आयोगातील सदस्यांमध्ये मतभिन्नता

३. साधार माहिती (Quantifiable Data) जमविण्यासाठीच्या शासनाच्या वारंवार केलेल्या विनंतीवर आयोगाकडून प्रतिसादाचा अभाव व शासनाने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग २००५ च्या कलम ९(२) प्रमाणे काय कार्यवाही केली आहे एवढीच आयोगाकडून विचारणा व निर्णय घेण्याची सुचना

४. मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत साधार माहिती उपलब्ध झाल्यानंतर देखील अभिप्राय देण्यास विलंब

मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने गोळा केलेल्या तथ्यांच्या व साधार माहितीच्या आाधारे मराठा समाज हा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास आहे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमध्ये व शिक्षणात अपुरे प्रतिनिधीत्व आहे. त्यामुळे या समाजास नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी आरक्षण आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे.

राज्यातील अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग वगळून राज्यात शैक्षणिक व सामाजिक मागासलेपणाच्या कारणावरुन शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग असा नवीन प्रवर्ग तयार करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

राज्यात शैक्षणिक व सामाजिक मागासलेल्या समाजासाठी भारतीय राज्य घटनेच्या १५ (४), १५ (५), १६(४) व ४६ नुसार **शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** (**शै.सा. मा.प्र.**) **Educationally and Socially Backward Catergory** (**ESBC**) असा नवीन प्रवर्ग तयार करण्यात येत आहे. या प्रवर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात येत आहे. सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ दिनांक ९ जुलै २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गातंर्गत मराठा समाजास शासकीय / निमशासकीय सेवा (सरळसेवा भरतीसाठी) व शैक्षणिक संस्थामध्ये १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि कृषी व पशुसंवर्धन विभागांतर्गत शासकीय तसेच खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त १६ टक्के आरक्षण शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गातंर्गत मराठा समाजास देण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण उन्नत व प्रगत (क्रिमिलेयर) घटकांना लागू होणार नाही. या प्रवर्गाला इतर मागासप्रवर्गाप्रमाणेच (राजकीय आरक्षण वगळून) सर्व सुविधा मिळतील. शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवेत आरक्षण लागू करण्याची अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग (सामाजिक विकास समन्वय) यांच्याकडून निर्गमित करण्यात यावी व त्याप्रमाणे सरळसेवेसाठी दि. २९ मार्च १९९७ च्या शासन निर्णयान्वये

विहित केलेल्या बिंदूनामावलीत आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही अनुक्रमे शालेय शिक्षण विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभागाने करावी. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने करावी. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित कृषी विद्यापीठातील व पशु वैद्यकीय शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही कृषी व पदुम विभागाने करावी. सदरचे आरक्षण मा. राज्यपाल यांच्या दि. ९ जुन २०१४ च्या अधिसुचनेनुसार अधिसुचित विभागांना व पदाना लागू होणार नाही.

या प्रवर्गामध्ये जातींना जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याची कार्यपद्धती इतर मागासवर्गासाठी असलेल्या जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याच्या कार्यपध्दतीसारखीच राहील. या प्रवर्गासाठी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रासाठी इतर मागासवर्ग या प्रवर्गाप्रमाणे महाराष्ट्रातील वास्तव्याचा दिनांक १३ ऑक्टोंबर १९६७ असा राहील. यासाठी या प्रवर्गातील व्यक्तींना द्यावयाच्या जात प्रमाणपत्राचा नमुना सोबत परिशिष्ट अ मध्ये जोडला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०७१६११०३४९९३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**रा. द. शिंदे**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

# <u>परिशिष्ट - अ</u>

Form of certificate to be issued to Educationally and Socially Backward Category persons belonging the state of Maharashtra.

Documents verified :- (1)

(2)

(3)

(4)

## CASTE CERTIFICATE

This is to certify / that shri/shrimati/kumari *____________________________________________ son / daughter * of ___________________________of village / Town *____________________ in District / Division *__________________________________ of the state of Maharashtra belongs to the _________________________caste which is recognised as Educationally and Socially Backward Category under Goverment Resolution______ _________________ Department No. ________________dated _________________as amended form time to time.

2. Shri / Shrimati / Kumari *_________________________________________________

and / or his / her * family ordinarily reside (s) in village / Town ___________________________ ___________________________________ of ____________________________________district / division of the State of Maharashtra.

Signature ___________________________

Designation _________________________

With seal of office.

Place ____________________

Date ____________________

**शासकीय / निमशासकीय सेवांमध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्र. अविवि २०१४/प्र.क्र.८१/का-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ जुलै, २०१४

**<u>वाचा :</u> सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १४, दि. ९ जुलै, २०१४.**

**प्रस्तावना :-**

१) महाराष्ट्र राज्य हे वंचितांसाठी आरक्षणाची तरतूद करणारे अग्रेसर राज्य आहे आणि नागरिकांचे मागासवर्ग यांमधील लोकांच्या सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीकरिता राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या किंवा पदांच्या आरक्षणासाठी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून, महाराष्ट् राज्यात आरक्षण धोरण अंमलात आहे.

२) भारतातील आरक्षणाच्या संकल्पनेचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ या वर्षी, सरकारी नोकऱ्यांमध्ये जागा राखून ठेवण्यासाठी सुरुवातीला दोन अधिसूचना काढल्या होत्या. १९०२ च्या उक्त दोन अधिसूचनांमध्ये मागासवर्ग म्हणून मुस्लिम समाजासाठी आरक्षणाची तरतूद केली होती. तत्कालिन बॉम्बे शासनाने दिनांक २३ एप्रिल, १९४२ रोजी काढलेल्या निर्णयात, सुमारे २२८ समाजाला मध्यम व मागासवर्ग म्हणून घोषित केले होते व त्या निर्णयाला जोडलेल्या सूचीमध्ये मुस्लिम समाजाला अनुक्रमांक १५५ वर दाखविण्यात आले आहे.

३) भारत सरकारने, न्यायमूर्ती सच्चर समिती नियुक्त करुन त्याद्वारे देशातील धार्मिक अल्पसंख्याक वर्गाच्या स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी तपशीलवार अभ्यास पूर्ण केला आणि सच्चर समितीने, सन २००६ मध्ये भारत सरकारला आपला अहवाल सादर केला आणि शिक्षण व राज्याच्या नियंत्रणाखालील सेवा यांमध्ये संधी देऊन मुस्लिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विवक्षित शिफारशी केल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने दिनांक ६ मे, २००८ च्या आपल्या निर्णयान्वये, महाराष्ट्रातील मुस्लिमांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणाचा विचार करण्यासाठी आणि शासनाकडून करता येतील अशा सुधारात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.मेहम्मद-उर-रेहमान यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट गठीत केला होता. डॉ.रेहमान समितीने, सन २०१३ मध्ये सादर केलेल्या आपल्या अहवालात, इतर गोष्टींबरोबरच, राज्य शासनाच्या सेवांमध्ये व शैक्षणिक संस्थांमध्ये मागास मुस्लिमांसाठी किमान आठ टक्के आरक्षणाची शिफारस केली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या मुस्लिमांना शासकीय /निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीकरिता व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरीता आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

**<u>शासन निर्णय</u>:-**

राज्यात शैक्षणिक व सामाजिक मागासलेल्या समाजासाठी भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद १५(४), १५(५), १६(४) व ४६ मधील तरतुदीनुसार विशेष मागास प्रवर्ग (अ) (Special Backward Category—A)निर्माण करुन त्यामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटाचा समावेश

करण्यात येत आहे. शासन अध्यादेश क्रमांक १४ दि. ९ जुलै, २०१४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटासाठी विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५% आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(**अ**) त्यानुसार भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद १६ (४) मधील तरतुदीनुसार शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरती मध्ये सध्या राज्यात अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त ५% आरक्षण नव्याने निर्माण करण्यात आलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ (Special Backward Category—A) या प्रवर्गाला देण्यात येत आहे.

(**ब**) भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १५(१), १५(४), १५(५) व ४६ मधील तरतुदीनुसार शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी व पशु वैद्यकीय विभागांतर्गत शासकीय तसेच खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशात सध्या राज्यात अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त ५%आरक्षण नव्याने निर्माण करण्यात आलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ(Special Backward Category—A) या प्रवर्गाला देण्यात येत आहे.

**१**.सदरचे आरक्षण भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेल्या अल्पसंख्याक वर्गांच्या शैक्षणिक संस्थांना लागू राहणार नाही.

२. हे आरक्षण क्रिमीलेअर घटकांना लागू होणार नाही.

३. अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गामधील मुस्लिम समुदायातील ज्या घटकांना आरक्षणाचा लाभ यापूर्वी देण्यात आला आहे त्यांना आरक्षण पूर्वीप्रमाणे सुरु राहील व त्यांना वि.मा.प्र.-अ मधील ५% आरक्षणाचा फायदा मिळणार नाही.

४. आरक्षणाचा फायदा सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेल्या मुस्लिम समाजातील एकूण ५० मागास घटकासाठी अनुज्ञेय राहील.

५. शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवेत आरक्षण लागू करण्याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग (सामाजिक विकास समन्वय) यांनी करावी व त्याप्रमाणे सरळसेवेसाठी दि.२९ मार्च, १९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदूनामावलीत आवश्यक त्या सुधारणा कराव्यात.

६. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही अनुक्रमे शालेय शिक्षण विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाने करावी.

७. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित वैद्यकीय शिक्षण शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने करावी.

८. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित कृषी विद्यापीठातील व पशु वैद्यकीय शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही कृषी व पदुम विभागाने करावी.

९. सदरचे आरक्षण मा. राज्यपाल यांच्या दिनांक ९ जून, २०१४ च्या अधिसूचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील अधिसूचित पदांना लागू रहाणार नाही.

**१०**. आरक्षणाची अंमलबजावणी होण्यासाठी वि.मा.प्र.-अ प्रवर्गातील उमेदवारांच्या जातीचे प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्रासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने आवश्यक त्या सूचना संबंधित यंत्रणेस निर्गमित कराव्यात.

विशेष मागास प्रवर्ग-अ (Special Backward Category—A) मध्ये समाविष्ट असणाऱ्या मुस्लिम समाज घटकांची अनुसूची सोबत जोडली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०७१९१२२९२९९११४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**डॉ. पी. एस. मीना**
**शासनाचे अपर मुख्य सचिव.**

अनुसूची

**विशेष मागास प्रवर्ग –अ (एसबीसी-ए)**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | धोबी मुस्लिम किंवा मुस्लिम धोबी किंवा धोबी मुसलमान. | २६ | फरुकी किंवा फारुकी. |
| २ | गराडी मुस्लिम किंवा गारोडी. | २७ | सिद्दीकी किंवा सिद्दीक. |
| ३ | नाई मुस्लिम, नावीद किंवा नावीक. | २८ | मालवी. |
| ४ | शेख किंवा शेक. | २९ | मीर. |
| ५. | मुघल किंवा मुगल. | ३० | हकीम. |
| ६. | सय्यद (सेद, सयद आणि सय्यद). | ३१ | मुल्ला किंवा मुल्लाजी, भोरी-मुल्लाजी. |
| ७. | पठाण. | ३२ | जमादार. |
| ८ | खान. | ३३ | मुकादम. |
| ९ | काद्री किंवा खाद्री. | ३४ | नकवी. |
| १० | पिरजादे किंवा पीरजादे. | ३५ | रिजवी किंवा रिज्वी. |
| ११. | मौलवी किंवा मौलाना. | ३६ | रिझवी किंवा राज्वी. |
| १२ | खाकरुब किंवा फरास. | ३७ | हुसैन किंवा हुसैनी. |
| १३ | मिर्झा. | ३८ | कामली किंवा कासमी. |
| १४ | बेग किंवा बैग. | ३९ | मेहंदी किंवा मेहदी. |
| १५ | अहमदी. | ४० | हैदरी. |
| १६ | नक्षबंदी किंवा नकाशबंदी किंवा नक्शबंदी. | ४१ | आलवी किंवा अलवी. |
| १७ | मच्छिमार मुस्लिम. | ४२ | उस्मानी. |
| १८ | तांडेल मुस्लिम. | ४३ | नूरी. |
| १९ | पटवा मुस्लिम. | ४४ | रहमानी. |
| २० | कागजी मुस्लिम किंवा कागडी मुस्लिम. | ४५ | मोहम्मदी किंवा मोहाम्मदी. |
| २१ | काझी. | ४६ | चाऊस किंवा चाउस. |
| २२ | टाकणकर. | ४७ | फकीह. |
| २३ | चिश्ती. | ४८ | सुफी किंवा वार्स किंवा अशर्फी. |
| २४ | मुस्लिम शाह. | ४९ | शूतारी किंवा सतारी मुस्लिम. |
| २५ | मुस्लिम पटेल. | ५० | ख्वाजा (अजमेरी, बग्दादी, मदनी, मक्की किंवा तुर्की). |

**विशेष मागास प्रवर्ग - अ (एसबीसी - ए) करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशानुसार करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांकः- २ मार्च, २०१५.

<u>वाचा :-</u>

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४,दिनांक ९ जुलै, २०१४.महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ(एसबीसी-ए)करिता(राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश,२०१४ व या अध्यादेशाबाबत दि. १४ जुलै, २०१४ चे शुद्धिपत्र.
२. शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अविवि२०१४/प्र.क्र.८१/का-७, दि. १९ जुलै,२०१४.
३. महाराष्ट्र राज्य लोकसेवा(अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती),भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१.
४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि.२९.३.१९९७.
५. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१ दि. २४.७.२०१४.

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग - अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थामधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४ (**सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १४**) अन्वये **"विशेष मागास प्रवर्ग - अ (एसबीसी-ए)"** निर्माण करण्यात आला आहे, सदर अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार या प्रवर्गास सरळसेवेच्या पदभरतीमध्ये ५ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

उक्त अध्यादेशातील कलम ४(१)नुसार व अल्पसंख्याक विकास विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार सरळ सेवेच्या पदभरतीमध्ये विशेष मागास प्रवर्ग - अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी १०९७/प्र. क्र.२/९७/१६- दि. २९.३.१९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सुधारणा करुन, उक्त अध्यादेशातील कलम ८ (१) नुसार संदर्भाधिन क्र. ५ येथील दि. २४.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सुधारित बिंदुनामावली विहित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग - अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४ (**सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १४**) या अध्यादेशाच्या विरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र. २०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत.

या प्रकरणी मा. उच्च् न्यायालयाने दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये **सदर अध्यादेशाताल कलम ४ (१) मधील राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवामधील सरळ सेवा प्रवेश नियुक्त्यांमधील ५% नियुक्त्या विमाप्र- अ करिता राखून ठेवण्याच्या तरतुदीस** अंतरिम स्थगिती दिलेली आहे. या आध्यादेशाचे कायद्यात रुपातंर न झाल्याने सदरचा अध्यादेश दि. २३.१२.२०१४ रोजी व्यपगत झालेला आहे. त्यास अनुसरुन शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय** :- **अ**) सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक ५ येथील दिनांक २४ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पासून स्थगित करण्यात असून, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीचा वापर करण्यात यावा.

**आ**) सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक ५ येथील शासन निर्णय, दिनांक २४ जुलै, २०१४ मधील कार्यपद्धतीनुसार, ज्या प्रकरणी भरती प्रक्रिया दिनांक १४.११.२०१४ पूर्वी पूर्ण झालेली नसेल,अशा प्रकरणी उपरोक्त मुद्दा क्रमांक (अ) मध्ये नमूद केलेली कार्यपद्धती अवलंबावी.

**इ**) दि २३.१२.२०१४. रोजी महाराष्ट्र अध्यादेश क्र. १४ चे कायद्यात रुपांतर न झाल्यामुळे सदर अध्यादेश व्यपगत झालेला आहे, ही वस्तुस्थिती विचारात घेता, या विभागाचा संदर्भाधिन क्र ५. येथे नमूद केलेला दि २४.७.२०१४. चा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे

२. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना / आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१५०३०२११५४४२४५०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकिंत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**टि. वा. करपते**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

# [२]

# आरक्षण - संरक्षण

**जे शासकीय कर्मचारी त्यांच्या मुळ नेमुणुकीसाठी पात्र नव्हते अथवा अर्हता प्राप्त नव्हते असे नंतर आढळून येईल. त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

निर्णय क्र. सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३/अकरा, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : १२ ऑक्टोबर, १९९३.

१. शासकीय सेवकांनी त्यांच्या नेमणूकीपूर्वी केलेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. साधारण शासकीय सेवकांनी त्यांच्या नेमणूकीच्या वेळी खोटी माहिती दिल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी साक्षांकन नमुन्यात समाविष्ट केलेल्या "ताकीद" या तरतूदीचा वापर संबंधित विभाग / कार्यालय यांनी करावयाचा असतो.

२. आता असा प्रश्न उपस्थित झाला आहे की, एखादा शासकीय सेवक त्याच्या शासन सेवेतील मूळ नेमणूकीसाठी पात्र नव्हता. अथवा अर्हता प्राप्त नव्हता. असे नंतर आढळून आल्यास अशा कर्मचाऱ्यांना सेवेतून मुक्त करता येईल काय याबाबत सर्वोच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी विझीनगरम विरुध्द एम. त्रिपूर सुंदरी देवी (१९९०/(४) एसएलआर २३७ या प्रकरणात या मुद्याचा विचार केला असून पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

त्याखेरीज सर्व संबंधितांनी याचीही जाणीव ठेवली पाहिजे की, जाहिरातीमध्ये विशिष्ट अर्हता नमूद केलेली असते आणि एखादी नेमणूक तिच्याकडे दूर्लक्ष करुन करण्यात येते त्यावेळी ते प्रकरण केवळ नियुक्ती प्राधिकारी व नियुक्त व्यक्ती यांच्यापुरतेच रहात नाही. ज्यांच्याकडे नियुक्त व्यक्ती अथवा व्यक्तींच्या अर्हते समान अथवा त्यापेक्षा जास्त अर्हता असेल. परंतु जाहिरातीत नमूद केलेली अर्हता नसल्यामुळे ज्यांनी अर्ज केले नसतील असे अर्जदार असू शकतात. अशा परिस्थितीत, अर्हता शिथिल करता येईल असे जर स्पष्टपणे नमूद केले नसेल तर अशा कमी वर्गाची अर्हता असणाऱ्या व्यक्तींची नेमणूक करणे ही जनतेची फसवणूक होईल. असे फसवणूकीचे व्यवहार चालू ठेवल्यास कोणत्याही न्यायालयाने सहभागी होवू नये."

त्यानुसार असे ठरविण्यात आले आहे की, ज्या प्रकरणांमध्ये असे आढळून येईल की, एखादा शासकीय कर्मचारी शासन सेवेतील मूळ नेमणूकीसाठी संबंधित पदाच्या नियमातील तरतूदीप्रमाणे पात्र नव्हता. अथवा विहित अर्हता प्राप्त नव्हता. अथवा त्याने नेमणूक मिळविण्यासाठी खोटी माहिती दिली होती. अथवा खोटे प्रमाणपत्र सादर केले होते. त्या कर्मचाऱ्याला सेवेत ठेवण्यात येवू नये. जर तो परिविक्षाधीन अथवा अस्थायी शासकीय कर्मचारी तर त्याला सेवामूक्त करण्यात यावे. अथवा त्याच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात. जर तो स्थायी शासकीय कर्मचारी असेल तर तो त्याच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ मध्येय विहित केल्याप्रमाणे विभागीय चौकशी करण्यात यावी. आणि आरोप सिद्ध झाल्यास त्या शासकीय कर्मचाऱ्यास सेवेतून काढून टाकावे अथवा सेवेतून बडतर्फ करण्यात यावे. परंतु कोणत्याही परिस्थितीत यापेक्षा कोणतीही वेगळी शिक्षा लागू नये.

३. अशा प्रकरणी सेवामुक्ती, सेवासमाप्ती, सेवेतून काढण्याची कारवाई अथवा बडतर्फीची कारवाई सदरहू शासकीय कर्मचाऱ्याविरुध्द न्यायालयात खटला भरण्याच्या शासनाच्या अधिकाराला बाधा येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. ग. मंडप**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन व**
**सामान्य प्रशासन विभाग**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक १५ जून, १९९५.

**पहा :-** १) शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४.
२) शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक २ जानेवारी, १९९५.
३) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,क्र. सीबीसी -१४९४/प्र.क्र.२३६/ मावक-५, दिनांक ७ डिसेंबर, १९९४.
४) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,क्र. सीबीसी -१४९४/प्र. क्र.२३६/ मावक-५, दिनांक १३ जून, १९९५.

**शासन निर्णय :-** राज्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती म्हणून विवक्षितपणे घोषित करण्यात आलेला जनसमुदाय वगळता अन्य काही जाती-जमातीकडून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेपणाच्या कारणांवरुन विशेष सवलती देण्याची मागणी लक्षात घेता समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्र. सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक ७ डिसेंबर, १९९४ अन्वये खाली नमूद केलेल्या जातीचा विशेष मागास प्रवर्ग घोषित केला होता.

| **अ.क्र .** | **जातीचे नांव** |
|---|---|
| १. | गोवारी जात |
| २. | माना जात |
| ३. | १) कोष्टी, २) हलबा कोष्टी, ३) हलबा जात, ४) साळी, ५) लाड कोष्टी, ६) गढेवाल कोष्टी, ७) देशकर, ८) सालेवार, ९) पद्मशाली, १०) देवांग, ११) काची बंधे, १२) पटवीस, १३) सतसाले, १४) साडे, १५) जैनकोष्टी. |
| ४. | १) कोळी, तत्सम जाती, २) मच्छिमार कोळी, ३) अहीर कोळी, ४) खानदेशी कोळी, ५) पानकोळी, ६) ख्रिश्चन कोळी, ७) चुंबळे कोळी, ८) पानभरे कोळी, ९) सूर्यवंशी कोळी,१०) मांगेला कोळी, ११) सोनकोळी, १२) वैती कोळी, १३) खारवी, १४) नाशिक, धुळे व जळगांव जिल्ह्यातील डांगर शेती करणारे कोळी. |
| ❖ | १) मुन्नेरवार, २) मुन्नूरवार, ३) मुन्नुर ४) तेलगु मुन्नुर, ५) मुन्नुरवार तेलगु ६) मुन्नरकापू, ७) कापेवार, ८) तेलगु कापेवार, ९) मुन्नरवाड, १०) तेलगु फुलमाळी, या जाती. |

२. त्यास अनुलक्षून या विभागाच्या शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४ अन्वये या “विशेष मागास प्रवर्गा”करिता २ % आरक्षण ठेवण्यात आले होते. त्याप्रमाणे हे आदेश शासकीय, निमशासकीय तसेच मंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हापरिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सेवेत देखील लागू राहील असे आदेश या निर्णयाद्वारे देण्यात आले होते. या निर्णयास शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६ब, दिनांक २ जानेवारी, १९९५ अन्वये स्थगिती देण्यात आली होती.

३.	आता वरील दिनांक २ जानेवारी, १९९५ च्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात येत आहे. तसेच वरील क्र. ४ (१४) येथे उल्लेख केलेल्या "नाशिक, धुळे व जळगांव जिल्ह्यातील डांगर शेती करणारे कोळी" या ऐवजी "अनुसूचित जमातीमध्ये समावेश नसलेले कोळी" अशी दुरुस्ती करण्यात येत आहे.

४.	वर उल्लेखिलेल्या "विशेष मागास प्रवर्गास" देण्यात आलेले आरक्षण हे सरळ सेवा भरतीसाठी व पदोन्नतीसाठी अनुज्ञेय राहील. तसेच या प्रवर्गाला क्रिमीलेअरचे तत्व लागू राहणार नाही. या प्रवर्गातील ज्या व्यक्तीला या आधीच अनुसूचित जमातींच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय, निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केलेली आहे, त्यांना पदावनत किंवा सेवेतून काढून टाकण्यात येऊ नये.

५.	शासन सेवेतील भरती संदर्भात विहित करण्यात आलेल्या २०० बिंदू नामावलीमध्ये "विशेष मागास प्रवर्गासाठी" २% आरक्षण दर्शवून सुधारित २०० बिंदू नामावली स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे.

५. हे आदेश मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या व कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**श.गं. काळे,**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ३ जुलै, १९९५.

**पहा:-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक २ जानेवारी, १९९५.
३)शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६ मावक-५, दिनांक ७ डिसेंबर, १९९४.
४)शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६ मावक-५, दिनांक १३ जून, १९९५.
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी- १४९४/ प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.
६) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शुध्दीपत्र क्र. सीबीसी १४९४/ प्र. क्र. २३६/ मावक-५, दिनांक १५ जून, २०१५.

**शासन निर्णय**

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाने शासन निर्णय, क्रमांक सीबीसी१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५ दिनांक १३ जून, १९९५ व समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दिनांक १५ जून, १९९५ नुसार जाहीर केलेल्या विशेष मागास प्रवर्गासाठी सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय, क्रमांक बीसीसी -१०९४/प्र.क्र.५८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५ अन्वये शासकीय/निमशासकीय सेवेत २% आरक्षण निर्धारीत करण्यात आलेले आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या वर नमूद केलेल्या दिनांक १५ जून, १९९५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४ मध्ये सुधारणा करण्यात येत असुन आता सदर परिच्छेद खाली नमुद केल्याप्रमाणे वाचावा. ‘‘वर उल्लेखिलेल्या विशेष मागास प्रवर्गास देण्यात आलेले आरक्षण हे सरळ सेवा भरतीसाठी व पदोन्नतीसाठी अनुज्ञेय राहील.:- तसेच या प्रवर्गाला क्रिमिलेअरचे तत्व लागू राहणार नाही. या विशेष मागास प्रवर्गातील ज्या व्यक्तींना यापूर्वीच अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय/निमशासकीय नोकरीत प्रवेश अथवा पदोन्नती मिळाली असेल अशा कर्मचाऱ्यांना पुढील आदेशापर्यंत सेवेतून काढून टाकण्यात येऊ नये.

३. वर परिच्छेद १ मध्ये नमूद केलेला समक्रमांकाचा दिनांक १५ जून, १९९५ चा शासन निर्णय दिनांक १३ जून, १९९५ पासून अंमलात येईल.

४. शासन असाही आदेश देत आहे की, विशेष मागास प्रवर्गातील यादी संदर्भात समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाने यापुढे काही बदल केल्यास ते या आदेशांनाही लागू राहतील.

५. हे आदेश मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या व कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**शि.शा. हिरोजमनेर**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक १५ डिसेंबर, १९९५.

**पहा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक २ जानेवारी, १९९५.

३) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,क्र.बीसीसी १४९४/ प्र. क्र.२३६/मावक-५, दिनांक ७ डिसेंबर, १९९४.

४) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,क्र. सीबीसी १४९४/ प्र. क्र.२३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.

६) समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,शुध्दीपत्रक क्र.सीबीसी १४९४/ प्र. क्र.२३६/मावक-५, दिनांक १५ जून, १९९५.

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक ३ जुलै, १९९५.

**शासन निर्णय :-** समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाने शासन निर्णय क्र. सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५ व समक्रमांकाचे शुध्दीपत्र दिनांक १५ जून, १९९५ नुसार जाहीर केलेल्या विशेष मागास प्रवर्गासाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५ अन्वये शासकीय/निमशासकीय सेवेत २% आरक्षण निर्धारित करण्यात आलेले आहे. या शासन निर्णयाच्या परिच्छेद - ४ मध्ये सुधारणा करुन दिनांक ३ जुलै, १९९५ रोजी सुधारीत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. फेरविचारांती शासनाने दिनांक ३ जुलै, १९९५ रोजीचा शासन निर्णय रद्द केला आहे व दिनांक १५ जून, १९९५ चा आदेश कायम ठेवावा असा निर्णय घेतला आहे. दिनांक १५ जून, १९९५ ते दिनांक ३ जुलै, १९९५ मधील कालावधीत जर कोणास पदावनत केले असेल तर त्यास पूर्ववत लाभ देण्यात यावा व त्याचे नुकसान होणार नाही हे पहावे असे आदेशही देण्यात येत आहेत.

**२.** शासन असाही आदेश देत आहे की, विशेष मागास प्रवर्गातील जातीसंदर्भात व समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाने यापुढे काही बदल केल्यास ते या आदेशासही लागू राहतील.

**३.** हे आदेश मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**क.चं.श्रीवास्तव,**

**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

**विशेष मागास प्रवर्गाकरीता शासकीय/निमशासकीय सेवेत आरक्षण.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २६ डिसेंबर, १९९५.

**पहा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक ३ जुलै, १९९५.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ डिसेंबर, १९९५.

**शु ध्दी प त्र क**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ डिसेंबर, १९९५ मध्ये परिच्छेद १ मधील दिनांक १५ जून, १९९५ ते दिनांक ३ जुलै, १९९५ मधील कालावधीतील जर कोणास पदावनत केले असेल तर त्यास पूर्ववत लाभ देण्यात यावा व त्यांचे नुकसान होणार नाही हे पहावे असे आदेश देण्यात आले होते. शासन निर्णय, दिनांक ३ जुलै, १९९५ नंतर जर कोणास पदावनत केले असेल तर त्यांना पूर्ववत लाभ देण्यात यावा व त्यात नुकसान होणार नाही हे पहावे, असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**क.चं.श्रीवास्तव**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**जे शासकीय त्यांच्या मूळ नेमणूकीसाठी पात्र नव्हते अथवा अर्हताप्राप्त नव्हते असे नंतर आढळून येईल त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

निर्णय क्र. सीडीआर-१०९५/९९५/प्र.क्र.३/९६/अकरा,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९६.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३/ अकरा, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९३.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.२८/९४/१६-ब, दिनांक १५ डिसेंबर, १९९५.

**निर्णय :-** शासकीय सेवकांनी त्यांच्या मूळ नेमणुकीच्यावेळी खोटी माहिती दिल्यास अथवा ते मूळ नेमणूकीस अर्हताप्राप्त नव्हते, असे निदर्शनास आल्यास त्यांचे विरुध्द करावयाच्या उपरोक्त दिनांक १२ ऑक्टोबर, १९९३ च्या निर्णयानुसार सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. (प्रत संलग्न) या शासन निर्णयात मूळ नेमणूकीनंतर सेवेत असताना पदोन्नतीच्या फायद्यासाठी खोटे प्रमाणपत्र सादर केल्याचे निदर्शनास आल्यास काय कार्यवाही करावी याबाबतच्या सूचना नाहीत.

२. वरील मुद्याबाबत असे ठरविण्यात आले आहे की, "जर एखाद्या शासकीय सेवकाने मूळ नेमणूकीनंतर पदोन्नतीच्या फायद्यासाठी जातीचे खोटे प्रमाणपत्र दाखल करुन पदोन्नती मिळविली असेल आणि सदर बाब नंतर काही कालांतराने निदर्शनास आल्यास त्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश तात्काळ रद्द करण्यात यावेत व त्याला त्याच्या मूळ पदावर पदावनत करावे. तसेच संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात यावी".

३. या विषयी असेही स्पष्ट करण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिनांक १२ ऑक्टोबर, १९९३ च्या आदेशातील माहिती मूळ नेमणूकीच्या वेळेची असल्याने ती वय, अर्हता अथवा जात यापैकी कोणत्याही मुद्यांबाबत असू शकते. परंतु, पदोन्नतीच्या वेळी विचारात घ्यावयाचे प्रमाणपत्र केवळ मागासवर्गीयांसाठीच्या राखीव जागांच्या आदेशांच्या अनुषंगाने त्यांच्यातील प्रवर्गापुरते मर्यादित असते. त्यानुसार वरील परिच्छेद २ मधील सूचना केवळ ज्या प्रकरणात जातीचे खोटे प्रमाणपत्र दाखल केल्याचे आढळून येईल अशा प्रकरणांना लागू होते.

४. दिनांक १५ जून, १९९५ पूर्वी विशेष मागास प्रवर्गातील ज्या व्यक्तींनी या आधीच अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय/निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केली आहे अशांनी शासन निर्णय क्रमांक-बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ डिसेंबर, १९९५ (प्रत संलग्न) मध्ये स्पष्ट केल्यानुसार पदावनत करण्यात येऊ नये किंवा सेवेतून काढून टाकण्यात येऊ नये. दिनांक १५ जून, १९९५ च्या नंतर विशेष मागास प्रवर्गातील ज्या व्यक्ती अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेत प्रवेश मिळवतील किंवा पदोन्नत होतील अशा कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे खोटी आढळल्यास त्यांच्याविरुध्द परिच्छेद २ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**रा. द. कासार,**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**विशेष मागास प्रवर्गाकरीता शासकीय/ निमशासकीय सेवेत आरक्षण.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक २४ जुलै, १९९८.

**पहा :** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब. दिनांक १५ जून, १९९५.

**शुध्दीपत्रक**

उपरोक्त विषयीचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५ मधील परिच्छेद क्र. ४ ऐवजी खालीलप्रमाणे सुधारित परिच्छेद क्र. ४ वाचावा :-

४. वर उल्लेखिलेल्या "विशेष मागास प्रवर्गास देण्यात आलेले आरक्षण हे सरळसेवा भरतीसाठी, व पदोन्नतीसाठी अनुज्ञेय राहील. तसेच या प्रवर्गाला क्रिमीलेअरचे तत्व लागू राहणार नाही. या प्रवार्गातील ज्या व्यक्तींनी या आधीच अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय, निमशासकीय तसेच मंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादीच्या सेवेत प्रवेश मिळविलेला असेल, त्यांना सेवेतून काढून टाकण्यात येऊ नये. तसेच प्रवेश मिळविल्यांनतर याआधीच पदोन्नती प्राप्त केलेली असेल त्यांना पदावनत करु नये".

२. हे आदेश (शुध्दीपत्रक) मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या व कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**नवीन कुमार**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**विशेष मागास प्रवर्गाकरीता शासकीय,**
**निमशासकीय सेवेत आरक्षण.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शुध्दीपत्रक क्रमांक : बीसीसी-२०००/३१०२/प्र.क्र.३/२००२/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :४ जुलै, २००२.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३/अकरा, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९३.
२) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६ब, दिनांक १५ जून, १९९५.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः सीडीआर-१०९५/९९५/प्र.क्र.३/९६/११, दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९६.
५) शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी -२०००/३१०२/प्र.क्र.३/२००२/ १६-ब, दिनांक २० मार्च, २००२.

**शु ध्दि प त्र क**

शासन परिपत्रक क्रमांक /बीसीसी-२०००/३१०२/प्र.क्र.३/२००२/१६-ब, दिनांक २० मार्च, २००२ मध्ये परिच्छेद-२ मधील ओळ क्रमांक ११ मध्ये,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९४/१३/१०७७/९३/११, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९३ असे नमूद करण्यात आलेले आहे, त्याऐवजी, "शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३/अकरा, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९३" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**जी.के.राऊत**
**शासनाचे अवर सचिव.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-२०००/३१०२/प्र.क्र.३/२००२/१६ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक २० मार्च, २००२.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.९३/११, दि. १२ ऑक्टोबर, १९९३.

२) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६ब, दिनांक १५ जून, १९९५.

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीडीआर-१०९५/९९५/प्र.क्र.३/९६/११, दि. ३१ ऑक्टोबर, १९९६.

**शासन परिपत्रक**

**शासन परिपत्रक :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि. १५ जून १९९५ अन्वये अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय/निमशासकीय सेवेत प्रवेश मिळविला आहे अथवा पदोन्नती मिळविली आहे अशा व्यक्तींना सेवेतून काढून टाकू नये अथवा पदावनत करु नये असे संरक्षण देण्यात आले आहे. या शासन निर्णयात देण्यात आलेले सरंक्षण दिनांक १५ जून १९९५ या दिनांकापर्यंत मर्यादित असून या दिनांकानंतर सेवेत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त झालेल्या उमेदवारांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांना उपरोक्त शासन निर्णयान्वये देण्यात आलेले संरक्षण लागू होत नाही. शासनाचे याबाबतचे निर्णय/आदेश सुस्पष्ट असून त्यामध्ये अद्याप कोणतेही बदल झालेले नाहीत.

**शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयासारखच एक बनावट शासन निर्णय काही हितसंबंधीताकडून शासनव्यवहारात आणल्याचे आढळून आले आहे. हा शासन निर्णय “क्रमांक बीसीसी १३९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि. १५ मार्च २०००” असा क्रमांकित असून त्यामध्ये शेवटच्या परिच्छेदातील सुरुवातीस दिनांक १४ जुलै १९९८ पूर्वी असा उल्लेख करुन त्यांना पदावनत करु नये असा समारोप करण्यात आलेला आहे. तसेच हा शासन निर्णय श्री. श.र.काळे, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन या नावाने निर्गमित झालेला आहे. हा शासन निर्णय पूर्णपणे बनावट असून अशाप्रकारचे कोणतेही आदेश शासनाने निर्गमित केलेले नाहीत.** या बनावट शासन निर्णयाची सर्व विभाग प्रमुखांनी गांभिर्याने दखल घेऊन या शासन निर्णयाच्या (म्हणजेच क्रमांक : बीसीसी १३९४/प्र.क्र.६८/९४/१६ब, दिनांक १५ मार्च २००० च्या बनावट शासन निर्णयाच्या) आधारे शासन सेवेत प्रवेश मिळविला असेल अथवा पदोन्नती मिळविली असेल अशा कर्मचारी/अधिकाऱ्यांविरुध्द शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-सीडीआर १९९४/१३/१०७७/९३/११, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९३ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-१०९५/९९५/प्र.क्र.३/९६/११, दि. ३१ ऑक्टोबर, १९९६ अन्वये दिलेल्या आदेशानुसार तात्काळ कारवाई सुरु करावी.

हे आदेश सर्व मंत्रालयीन विभागांना त्यांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख/कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास तात्काळ आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जी.के.राऊत**
**शासनाचे अवर सचिव.**

**अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५ जून, १९९५ पूर्वीच सरळ सेवेने नियुक्त अथवा पदोन्नत झालेल्या विशेष मागास प्रवर्गातील कर्मचारी / अधिकारी यांची शासकीय / निमशासकीय सेवेतील जेष्ठता निश्चित करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी -२००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**दिनांक : २४ जून, २००४**

**पहा -** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी - १०९४/प्र.क्र. ६८/९४/१६ब, दिनांक १५ जून १९९५

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी - १०९४/प्र.क्र. ६८/९४/१६ब, दिनांक २४ जुलै १९९८

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी - १०९४/प्र.क्र. ६८/९४/१६ब, दिनांक २७ मे २००२.

**<u>प्रस्तावना :-</u>** अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये ज्या जमातीचा समावेश करण्यात आलेला आहे अशा जमातींच्या नावाशी साधर्म्य असणाऱ्या गोवारी, माना, कोष्टी, कोळी, मुन्नेवार, या सारख्या जातींचा **विशेष मागास प्रवर्ग** म्हणून समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा विभाग, यांनी त्यांच्या क्रमांक - सीबीसी - १४९४/प्र.क्र. २३६/मावक -५, दिनांक ७ डिसेंबर १९९४ च्या शासन निर्णयान्वये घोषित केलेला आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक - बीसीसी १०९४/प्र.क्र. ६८/९४/१६ब, दिनांक १५ जून १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गासाठी सरळ सेवा व पदोन्नतीमध्ये २% आरक्षण विहित करण्यात आले आहे. तसेच या विशेष मागास प्रवर्गातील ज्या व्यक्तींना दिनांक १५ जून १९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय / निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केलेली आहे त्यांना पदावनत किंवा सेवेतून काढून टाकण्यात येवू नये अशा प्रकारचे संरक्षण दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये दिलेले आहेत.

दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयानुसार विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना सेवेतील संरक्षण देण्याबाबत वरील प्रमाणे निर्णय घेतला असला तरी असे संरक्षण प्राप्त केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांना त्यांच्या संरक्षित केलेल्या संवर्गातील ज्येष्ठता कशा प्रकारे विचारात घ्यावी याबाबत निर्णय घेण्यात आलेला नव्हता. या अनुषंगाने श्री. एस. ए. कंदिकटला विरुद्ध महाराष्ट्र शासन प्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्यासमोर दाखल झालेल्या मुळ अर्ज क्रमांक ३९८/२००१ प्रकरणी, दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयात ज्या व्यक्तींना सेवेतील संरक्षणाचा फायदा देण्यात आलेला आहे तो फायदा त्या संवर्गातील त्यांची जेष्ठता संरक्षित करण्यासाठीही आहे असे स्पष्टपणे नमुद करणारे आदेश निर्गमित करण्याबाबत न्यायाधिकरणाने निर्णय दिलेला आहे. न्यायाधिकरणाचे आदेश विचारात घेवून दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयानुसार सेवेत संरक्षण प्राप्त केलेल्या विशेष मागास प्रवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठता निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

विशेष मागास प्रवर्गातील ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी दिनांक १५ जून १९९५ पूर्वीच अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय/ निमशासकीय सेवेत प्रवेश मिळविला असेल अथवा पदोन्नती प्राप्त केलेली असेल अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांना उपरोक्त क्रमांक १ येथील दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयाद्वारे संरक्षण देवून अशा संरक्षित केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता **दिनांक १५ जून १९९५** अशी विचारात घेण्यात यावी.

२. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या वरील आदेश निदर्शनास आणून निर्णयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना विनाविलंब देण्यात याव्यात.

३. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, मंडळे / महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा अनुदानित शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादी कार्यालयांना लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**यु. पी. एस. मदान**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**अनुसुचित जमातीच्या राखीव जागांवर सरळ सेवेने नियुक्त अथवा पदोन्नत झालेल्या बिगर आदिवासी कर्मचारी/अधिकारी यांना शासकीय सेवेत घेतल्यानंतर त्यांच्या सेवेत पडलेला खंड नियमीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-२००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १५/१२/२००५.

**पहा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक २७ मे, २००२.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब, दिनांक २४ जून, २००४.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दनांक ३० जून, २००४.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन अ.क्र.१ येथे नमूद दिनांक १५ जून १९९५ च्या शासननिर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गासाठी सरळ सेवा व पदोन्नतीमध्ये २% आरक्षण विहीत करण्यात आले असून या **विशेष मागास प्रवर्गातील** ज्या व्यक्तींना दिनांक १५ जून १९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय /निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केलेली आहे. त्यांना पदावनत किंवा सेवेतून काढून टाकण्यात येवू नये, अशा प्रकारचे संरक्षण दिलेले आहे. तसेच संदर्भाधीन अ.क्र.४ येथे नमूद केलेल्या दि. ३०/६/२००४ च्या शासन निर्णयानुसार, **ज्या बिगर आदिवासींनी** अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दि. १५ जून, १९९५ च्या पूर्वी शासकीय/निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविलेल्या आहे, त्यांना सेवेतून काढण्यात येवू नये किंवा पदावनत करण्यात येवू नये. तसेच त्यांना ते ज्या घटकाचे आहेत त्या घटकात दाखविण्यात यावे व यापुढे त्यांना त्या त्या घटकाचे आरक्षणाचे फायदे देय राहतील व अशा प्रकारे रिक्त झालेली पदे आदिवासी जमातीमधून भरण्यात यावीत, असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

दिनांक ३० जून २००४ च्या आदेशानुसार ज्या कर्मचारी/अधिकाऱ्यांची अनुसूचित जमातींच्या प्रमाणपत्राच्या आधारावर दिनांक १५ जून १९९५ पूर्वी नियुक्ती किंवा पदोन्नती झाली आहे. तसेच अनुसूचित जमातींचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे सदरील अधिकारी/कर्मचारी **विशेष मागास प्रवर्ग किंवा अन्य कोणत्याही मागास प्रवर्गातील प्रमाणपत्र** सादर करु शकले नाही थोडक्यात म्हणजे जे कर्मचारी खुल्या प्रवार्गातील ठरले त्यांना देखील सदर शासन निर्णयान्वये त्यांच्या नियुक्तीस व पदोन्नतीस संरक्षण प्राप्त झाले. तथापि, जे अधिकारी/कर्मचारी दि. १५/६/९५ च्या शासन निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करु शकले नव्हते. परंतु त्यांची नियुक्ती दिनांक १५/६/१९९५ पूर्वीची असून देखील त्यांना त्यांच्या नियुक्तीस संरक्षण प्राप्त झाले नव्हते. अशा कर्मचाऱ्यांना सेवेतून काढून टाकले होते. अशा काढून टाकण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक ३० जून २००४ च्या शासन निर्णयानुसार सेवेत पुन्हा घेतल्यांनतर त्यांच्या सेवेत पडलेला सेवाखंड कशाप्रकारे नियमित करावा याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

दि. १५/६/९५ च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवून सेवेत संरक्षण प्राप्त होण्यासाठी विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करु न शकल्यामुळे ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या होत्या व ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना उपरोक्त दिनांक ३० जून, २००४ च्या शासन निर्णयानुसार पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे, अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवेतील खंड (दि. १५/६/९५ च्या शासन निर्णयानुसार सेवा समाप्त केल्याचा दिनांक व दिनांक ३० जून, २००४ च्या शासन निर्णयानुसार पुन्हा शासन सेवेत घेतल्याचा दिनांक) यामधील कालावधी असाधारण रजा म्हणून नियमित करण्यात यावा. सदरील सेवा खंडीत कालावधीत त्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष काम केले नसल्याने वेतन व भत्ते अनुज्ञेय राहणार नाही. तसेच सेवाखंडीत कालावधीत हा निवृत्तीवेतन व इतर अनुषंगिक लाभ देखील अनुज्ञेय राहणार नाही.

४. हे आदेश मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा पिरषदा अनुदानित शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादी कार्यालयांच्या निदर्शनास आणावेत.

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौ.संदर्भ क्र. २४२/०५/सेवा-८, दि. २६/२५/२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**अशोक खोत**
**अपर मुख्य सचिव (साविस)**
**महाराष्ट्र शासन**

**दि. १५.६.१९९५ नंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्यांच्या सेवेस संरक्षण देणेबाबत निर्णय घेण्यासाठी मंत्री गटाची स्थापना करणे.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-२००८/प्र.क्र.३९५/०८/१६-ब

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक : ५ मार्च, २००९.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.

२) शासन निर्णय क्र. बीसीसी-२००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दिनांक ३० जून, २००४.

**प्रस्तावना :** तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिनांक २९.९.२००५ रोजी त्याचबरोबर दिनांक ९.७.२००८ रोजी गोवारी समाज व हलबा समाजाच्या प्रश्नाच्या अनुषंगाने संबंधीत संघटनांच्या प्रतिनिधीसोबत झालेल्या बैठकीमध्ये ज्यांचे अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे अशा दि.१५.६.१९९५ नंतर आदिवासी विभागाचा जात पडताळणी अधिनियम २००१ लागू होईपर्यंतच्या कालावधी मध्ये लागलेल्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत संरक्षण देता येईल असा निर्णय घेतला होता. त्या अनुषंगाने प्रस्ताव दि. २५.२.२००९ च्या मंत्रीमंडळ बैठकीसमोर चर्चेस आला असता, ह्या विषयी ५ सदस्य असलेल्या मंत्रीगट समितीने ह्या प्रस्तावाचा प्रथम अभ्यास करुन मंत्रिमंडळास याविषयी शिफारस करावी असा निर्णय घेतला. या अनुषंगाने मंत्री गटाची स्थापना करण्यासाठी खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे :

**शासन निर्णय :**

दि. १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्याच्या सेवेस संरक्षण देण्यात आले आहे. त्याची मर्यादा वाढविणेबाबत - मंत्रीगट समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

या समितीमध्ये खालीलप्रमाणे मंत्रीगटाचा समावेश करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| मंत्री (उद्योग) | - अध्यक्ष |
| मंत्री (परिवहन) | - सदस्य |
| मंत्री (अल्पसंख्यांक विभाग) | - सदस्य |
| मंत्री (आदिवासी विकास) | - सदस्य |
| मंत्री (अन्न व नागरी पुरवठा) | - सदस्य |
| अपर मुख्य सचिव (सा.वि.स.) | - सदस्य सचिव |

सदरहू शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक क्रमांक २००९०३०५१६११४७००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**गो. आ. लोखंडे**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**दि. १५.६.१९९५ नंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्यांच्या सेवेस संरक्षण देणेबाबत निर्णय घेण्यासाठी स्थापन केलेल्या मंत्री गटाची पुनर्रचना करणे.**

---

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-२००८/प्र.क्र.३९५/०८/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ मार्च, २०१०.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दिनांक ३० जून, २००४.
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००८/प्र.क्र.३९५/०८/१६-ब, दिनांक ५ मार्च, २००९.

**प्रस्तावना :** तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिनांक २९.९.२००५ रोजी त्याचबरोबर दिनांक ९.७.२००८ रोजी गोवारी समाज व हलबा समाजाच्या प्रश्नाच्या अनुषंगाने संबंधीत संघटनांच्या प्रतिनिधीसोबत झालेल्या बैठकीमध्ये ज्यांचे अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे अशा दि. १५.६.१९९५ नंतर आदिवासी विभागाचा जात पडताळणी अधिनियम २००१ लागू होईपर्यंतच्या (दि.१८.१०.२००१) कालावधी मध्ये लागलेल्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत संरक्षण देता येईल, असा निर्णय घेतला होता. त्या अनुषंगाने प्रस्ताव दि. २५.२.२००९ च्या मंत्रीमंडळ बैठकीसमोर चर्चेस आला असता, ह्या विषयी ५ सदस्य असलेल्या मंत्रीगट समितीने हया प्रस्तावाचा प्रथम अभ्यास करुन मंत्रिमंडळास याविषयी शिफारस करावी असा निर्णय घेतला. या अनुषंगाने संदर्भाधीन क्र. ३ येथील दि. ५.३.२००९ च्या शासन निर्णयान्वये मंत्री गटाची स्थापना करण्यात आली आहे. आता सार्वत्रिक निवडणूका होऊन नव्याने मंत्रिमंडळ अस्तित्वात आले असल्याने मंत्रीगटाची खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्याचा शासन निर्णय घेत आहे :

**शासन निर्णय :**

दि. १५.६.१९९५ पुर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी /कर्मचारी यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्याच्या सेवेस संरक्षण देण्यात आले आहे त्याची मर्यादा वाढविणेबाबत विचार करुन शासनास शिफारसी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीगट समितीची पुनर्रचना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

याद्वारे आता खालीलप्रमाणे मंत्रीगटाची पुनर्रचना करण्यात येत आहे :

| | | |
|---|---|---|
| मंत्री (महसूल) | - | अध्यक्ष |
| मंत्री (परिवहन) | - | सदस्य |
| मंत्री (सामाजिक न्याय) | - | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| मंत्री आदिवासी विकास) | - | सदस्य |
| मंत्री (अन्न व नागरी पुरवठा) | - | सदस्य |
| मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) | - | सदस्य |
| राज्यमंत्री (आदिवासी विकास) | - | सदस्य |
| प्रधान सचिव (विधी व न्याय) | - | सदस्य |
| प्रधान सचिव (सा.वि.स.)सा.प्र.वि. | - | सदस्य सचिव |

सदरहू शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक क्रमांक २०१००३२२१३५९४४००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**दि. रा. डिंगळे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**दि. १५.६.१९९५ नंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्यांच्या सेवेस संरक्षण देणेबाबत निर्णय घेण्यासाठी स्थापन केलेल्या पुनर्रचित मंत्री गटात समावेशन.**

---

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-२००८/प्र.क्र.३९५/०८/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १६ एप्रिल, २०१०.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दिनांक ३० जून, २००४.
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००८/प्र.क्र.३९५/०८/१६-ब, दिनांक ५ मार्च, २००९.
४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००८/प्र.क्र.३९५/०८/१६-ब, दिनांक २२ मार्च, २०१०.

**प्रस्तावना :**

समक्रमांकाच्या क्र.४ येथील दि.२२ मार्च, २०१०च्या शासन निर्णयान्वये दि. १५.६.१९९५ नंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्यांच्या सेवेस संरक्षण देणेबाबत निर्णय घेण्यासाठी स्थापन केलेल्या मंत्री गटाची पुनर्रचना करण्यात आलेली आहे. या पुनर्रचित मंत्रिगटामध्ये मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण, फलोत्पादन व पर्यटन यांचा समावेश करण्याची बाब विचाराधीन होती. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :

**शासन निर्णय :**

दि. १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातींच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्यांच्या सेवेस संरक्षण देण्यात आले आहे त्याची मर्यादा वाढविणेबाबत विचार करुन शासनास शिफारसी करण्यासाठी पुनर्रचित करण्यात आलेल्या मंत्रीगटामध्ये मंत्री (वैद्यकीय शिक्षण,फलोत्पादन व पर्यटन) यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे. त्यामुळे आता पुनर्रचित मंत्रिगट खालीलप्रमाणे राहील :

| | |
|---|---|
| मंत्री (महसूल) | - अध्यक्ष |
| मंत्री (परिवहन) | - सदस्य |
| मंत्री (सामाजिक न्याय) | - सदस्य |
| मंत्री (आदिवासी विकास) | - सदस्य |

| | | |
|---|---|---|
| मंत्री (अन्न व नागरी पुरवठा) | - | सदस्य |
| मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) | - | सदस्य |
| मंत्री (वैद्यकीय शिक्षण, फलोत्पादन व पर्यटन) | - | सदस्य |
| राज्यमंत्री (आदिवासी विकास) | - | सदस्य |
| प्रधान सचिव (विधी व न्याय) | - | सदस्य |
| प्रधान सचिव (सा.वि.स.) सा.प्र.वि. | - | सदस्य सचिव |

सदरहू शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक क्रमांक २०१००४१६१७३५०३००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**दि. रा. डिंगळे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**दि. १५.६.१९९५ नंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाण पत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्यांच्या सेवेस संरक्षण देणेबाबत निर्णय घेण्यासाठी स्थापन केलेल्या मंत्री गटाची पुनर्रचना करणे.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-२००८/प्र.क्र.३९५/०८/१६ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ४ मार्च, २०११.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दिनांक ३० जून, २००४.
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००८/प्र.क्र.३९५/०८/१६-ब, दिनांक ५ मार्च, २००९.
४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००८/प्र.क्र.३९५/०८/१६-ब, दिनांक २२ मार्च, २०१०.
५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००८/प्र.क्र.३९५/०८/१६-ब, दिनांक १६ एप्रिल, २०१०.

**प्रस्तावना :** ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती दि. १५.६.१९९५ पूर्वीची आहे. अशा कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांच्या सेवेस, तसेच दि. १५.६.२०१५ पूर्वी झालेल्या त्यांच्या पदोन्नतीस संरक्षण देण्यात आले आहे. दि. १५.६.१९९५ पासून ते जात पडताळणी अधिनियम २००१ लागू होईपर्यंतच्या कालावधीपर्यंत (दि. १५.६.१९९५ ते दि.१८.१०.२००१) लागलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, जर त्यांचा अनुसूचित जमातीचा दावा अवैध ठरला तर त्यांच्या सेवेस संरक्षण देता येईल अथवा कसे याबाबत शिफारसी करण्यासाठी मंत्रीगट नेमण्याचा निर्णय दि. २५.२.२००९ रोजी मंत्रिमंडळाने घेतला होता. या अनुषंगाने संदर्भाधीन क्र. ३, ४ व ५ येथील शासन निर्णयान्वये मंत्री गटाची स्थापना/पुनर्रचना करण्याबाबत आदेश वेळोवेळी निर्गमित करण्यात आले आहेत. आता मंत्रिमंडळाची फेररचना झाली असल्याने सदर मंत्रीगटाची खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे :

**शासन निर्णय :**

दि. १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या अथवा पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्याच्या सेवेस संरक्षण देण्यात आले आहे, त्याची मर्यादा वाढविणेबाबत विचार करुन शासनास शिफारसी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीगट समितीची पुनर्रचनाकरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

यद्वारे आता खालीलप्रमाणे मंत्रीगटाची पुनर्रचना करण्यात येत आहे :

| | |
|---|---|
| मंत्री (महसूल) | - अध्यक्ष |
| मंत्री (क्रिडा व युवक कल्याण) | - सदस्य |
| मंत्री (सामाजिक न्याय) | - सदस्य |
| मंत्री (आदिवासी विकास) | - सदस्य |
| मंत्री (अन्न व नागरी पुरवठा) | - सदस्य |
| मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) | - सदस्य |
| मंत्री (वैद्यकीय शिक्षण, फलोत्पादन) | - सदस्य |
| राज्यमंत्री (आदिवासी विकास) | - सदस्य |
| प्रधान सचिव (विधी व न्याय) | - सदस्य |
| प्रधान सचिव (सा.वि.स.) सा.प्र.वि. | - सदस्य सचिव |

सदरहू शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक क्रमांक २०११०३०४२०३७३२००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**दि. रा. डिंगळे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर सरळ सेवेने नियुक्त अथवा पदोन्नत झालेल्या बिगर आदिवासी कर्मचारी/अधिकारी यांना शासकीय सेवेत घेतल्या-नंतर त्यांच्या सेवेत पडलेला खंड नियमित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शुध्दीपत्रक क्रमांक :- बीसीसी-२०११/प्र.क्र.९२९/११/१६ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ७ जानेवारी, २०१२.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक २७ मे, २००२.
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब, दिनांक २४ जून, २००४.
४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००२/प्र.क्र.९३ /०४/१६-ब, दिनांक ३० जून, २००४.
५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब, दिनांक १५ डिसेंबर, २००५.

**प्रस्तावना :** उपरोक्त क्रमांक १-४ येथील शासन निर्णयान्वये ज्या कर्मचारी/अधिकाऱ्यांनी दिनांक १५ जून, १९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय/निमशासकीय सेवेत प्रवेश मिळविला आहे, अशा कर्मचारी/अधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांना पदावनत करण्यात येवू नये किंवा सेवेतून काढून टाकण्यात येवू नये किंवा सेवेतून काढून टाकण्यास येवू, असे शासनाने ठरविले असून अशा कर्मचारी/अधिकारी यांची सेवाज्येष्ठता दिनांक १५ जून, १९९५ अशी निश्चित करण्यात यावी, असे शासनाने आदेश दिले आहेत. संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक ३०.०६.२००४ च्या शासन निर्णयामध्ये "ज्या बिगर आदिवासींनी अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५ जून, १९९५ च्या पूर्वी शासकीय/निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविलेल्या आहेत, त्यांना सेवेतून काढण्यात येवू नये, त्यांना ते ज्या घटकाचे आहेत, त्या घटकात दाखविण्यात यावे यापुढे त्यांना त्या त्या घटकांचे आरक्षणाचे फायदे देय राहतील. अशा प्रकारे रिक्त झालेली पदे आदिवासी जमातीमधून भरण्यात यावीत", असे आदेश दिले आहेत.

ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या होत्या व ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना उपरोक्त संदर्भ क्र. ४ येथील दि. ३० जून, २००४ च्या शासन निर्णयानुसार पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे, अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवेतील खंड कसा नियमित करावा, याबाबत संदर्भाधीन क्रमांक ५ येथील दिनांक १५.१२.२००५ च्या शासन निर्णयानुसार आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. परंतु सदर शासन निर्णय दिनांक १५.१२.२००५ मधील प्रस्तावनेतील परिच्छेद २ मध्ये काही चुकीचे शब्दप्रयोग झाले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे खालीलप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**शुध्दीपत्रक :-**

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब, दिनांक १५.१२.२००५ मध्ये प्रस्तावनेमधील परिच्छेद ३ (सदर परिच्छेदाचा क्रमांक २ ऐवजी ३ असा चुकीने टंकलिखित झाला आहे.) खालील तक्त्यातील रकाना क्र.२ मध्ये दिल्याप्रमाणे वाचावा :-

| दि.१५.१२.२००५ च्या शासन निर्णयातील मूळ परिच्छेद | मूळ परिच्छेदाऐवजी समाविष्ट करावयाचा परिच्छेद |
|---|---|
| १ | २ |
| ३. दिनांक ३० जून २००४ च्या आदेशानुसार ज्या कर्मचारी/अधिकाऱ्यांची अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारावर दिनांक १५ जून, १९९५ पूर्वी नियुक्ती किंवा पदोन्नती झाली आहे, तसेच अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे सदरील अधिकारी/कर्मचारी **विशेष मागास प्रवर्ग किंवा अन्य कोणत्याही मागास प्रवर्गातील प्रमाणपत्र** सादर करु शकले नाही. थोडक्यात म्हणजे जे कर्मचारी खुल्या प्रवर्गातील ठरले त्यांना देखील सदर शासन निर्णयान्वये त्यांच्या नियुक्तीस व पदोन्नतीस संरक्षण प्राप्त झाले आहे. तथापि, जे अधिकारी/कर्मचारी दि. १५.६.९५ च्या शासन निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करु शकले नव्हते, परंतु त्यांची नियुक्ती दिनांक १५.६.१९९५ पूर्वीची असून देखील त्यांना त्यांच्या नियुक्तीस संरक्षण प्राप्त झाले नव्हते. अशा कर्मचाऱ्यांना सेवेतून काढून टाकले होते. अशा काढून टाकण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक ३० जून २००४ च्या शासन निर्णयानुसार सेवेत पुन्हा घेतल्यांनतर त्यांच्या सेवेत पडलेला सेवाखंड कशाप्रकारे नियमित करावा याबाबतच प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे. | २. वरील निर्णयानुसार संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना सेवेस संरक्षण प्राप्त होण्यासाठी ते ज्या मागास प्रवर्गात आहेत, त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, त्यांनी ते सादर केले नाही, या कारणास्तव अथवा वरील निर्णय घेतले जाण्यापूर्वी अथवा नंतर ज्यांना सेवेतून काढून टाकले होते व काही कालावधीनंतर त्यांना सेवेत पुन्हा घेण्यात आले आहे, अशा कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या सेवेत पडलेला सेवाखंड कशा प्रकारे नियमित करावा, याबाबतचा प्रस्ताव शासन विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे. |

**अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर सरळसेवा/पदोन्नती झालेल्या बिगर आदिवासी अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासकीय / निमशासकीय सेवेत संरक्षण देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक - बीसीसी २००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब,

मंत्रालय, मुंबई-३२. दिनांक : ३० जून २००४.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग-बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग-बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक २ जानेवारी, १९९५.

३) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक सीबीसी १४९४/ प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक ७ डिसेंबर, १९९४.

४) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक सीबीसी १४९४/ प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग-बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५.

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग-बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक २७ मे, २००२.

**शासन निर्णय :-**

अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर दिनांक १५ जून १९९५ पूर्वी, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त झालेल्या, पदोन्नती मिळविलेल्या, शासकीय/निमशासकीय सेवतील अधिकारी/कर्मचारी यांना संरक्षण देण्याच्या अनुषंगाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९८/१६- ब, दिनांक २७ मे २००२ अधिक्रमित करुन शासन खालील प्रमाणे सुधारीत आदेश देत आहे.

(अ) ज्या बिगर आदिवासींनी अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५ जून १९९५ च्या पूर्वी शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविलेल्या आहेत, त्यांना सेवेतून काढण्यात येवू नये किंवा पदावनत करु नये. त्यांना ते ज्या घटकाचे आहेत, त्या घटकात दाखविण्यात यावे. यापुढे त्यांना त्या त्या घटकाचे आरक्षणाचे फायदे देय राहतील. अशा प्रकारे रिक्त झालेली पदे आदिवासी जमातीमधून भरण्यात यावीत.

**(ब) वरील संरक्षण हे दिनांक १५ जून १९९५ च्यापूर्वी लागलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनाच देय राहिल.**

**(क) वरीलप्रमाणे संरक्षित केलेल्या बिगर आदिवासी अधिकारी / कर्मचारी यांची सेवाज्येष्ठता दिनांक १५ जून, १९९५ अशी विचारात घेण्यात यावी.**

२. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवेतील अधिकारी /कर्मचारी तसेच मंडळे/ महामंडळे, नगरपालिका/महानगरपालिका, शासकीय उपक्रम, अनुदानित संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यांदीनाही लागू राहील.

३. वरील आदेश मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या तात्काळ निदर्शनास आणण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**यु. पी. एस. मदान**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

[३]

# आरक्षण - पदोन्नती

**Reservation for certain sections of the Backward Classes at the stage of promotions**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

General Administration Department,
Resolution No.BCC-1072-J,
Sachivalaya, Bombay-400 032, dated the 23rd May,1974.

## RESOLUTION

The question of providing reservation for certain sections of the Backward Classes at the stage of promotion had been under consideration of Government of some time past Government has now decided that there should be reservation for the three sections of Backward Classes, as mentioned below in promotions made on the basis of seniority subject to fitness, in appointments to all Class I, Class III and Class IV posts in grade of services in which the element of direct recruitment, if any, does not exceed 50%.

Percentage to be reserved.

| | | |
|---|---|---|
| 1 | Scheduled Castes and Scheduled Castes converts to Buddhism | 13% |
| 2 | Scheduled Tribes including Those living outside the Specified areas. | 7% |
| 3 | Denotified Tribes and Nomadic Tribes | 4% |
| | | 24% |

2. A decision on the fitness or unfitness of an Officer should be taken by the Department Promotion Committee which should be constituted by the Departments. The Departments should decide on the composition of the Departmental Promotion Committee having regard to the nature of post/posts for which promotion is to be made. While referring proposal to the Departmental Promotion Committee for promotion on the basis of seniority subject to fitness in respect of vacancies expected to arise during a year, the following procedure should be followed :-

1) A separate 50-point roster as * appended, to determine the number of reserved vacancies in a year should be followed. The points mentioned in the roster should be reserved for the Scheduled Castes and Scheduled Castes converts to Buddhism, Scheduled Tribes and Denotified and Nomadic Tribes. The points in the roster are only for determining the number of vacancies to be reserved for these categories in the total number of vacancies for which a select list is to be drawn. The points in the roster are not for determining seniority or for determining the order of promotion.

2) Whenever according to the points in the roster there are any vacancies reserved for each or three sections mentioned above, separate lists should be drawn up or the eligible candidates from each of these categories, and arranged in order of their inter-se seniority in the main list.

2. 3) The backward Class Officers belonging to the three sections should be adjusted by the Departmental promotion Committee separately in regard to their fitness.

4) When the select lists of the officer in the general category and those belonging to Scheduled Castes and Scheduled Castes converts to Buddhism, Scheduled Tribes and Denotified and Nomadic Tribes have been prepared by the Departmental promotion Committee, these should be merged into a combined select list in which the names of all the selected officers general as well as those belonging to the three Sections mentioned above, are arranged in the order of their inter seniority in the original seniority list of the category or grade from which the promotion followed for making promotions in vacancies as and when they arise during the year.

5) The Select list thus prepared would normally be operative for a period of one year, but this period may be extended by six months to enable such of the officers included therein, as could not be appointed to the higher posts during the normal period of one year, to be appointed during the extended period.

6) If the number of eligible candidates belonging to the three sections of backward classes, mentioned in paragraph-1, found fit for promotion falls short of the number of vacancies reserved for either or them during the year, the extent of such shortfall should be reported to the General Administration Department through the administrative Department concerned along with proposals, if any, for de-reservation of vacancies in respect of which the shortfall has occurred. If on a scrutiny of the date furnished in this regard, any dereservation is agreed to by the General Administration Department, the vacancy 30 dereserved should be filled in by another candidate included in the Combined Select list and the reservation carried forward for subsequent three recruitment years.

3. Vacancies may not occur with sufficient frequency in cases of isolated posts and small cadres with the result that in such cases it may not be possible to prescribe reservation for the Backward Classes at the stage of promotion. Government is, therefore please to direct that isolated posts and small cadres, in the same class and carrying similar status, salary and qualifications in the same department may be grouped together for the purpose of reservation or vacancies at the stage of promotion. In this connection, instructions issued in Government Resolution, General Administration Department No.BCC-1064/IV-J, dated the 16th April, 1965 should be followed. If any difficulty is felt in implementation, reference may be made to General Administration through the administrative department concerned for final orders.

4. These orders should take effect from the date of issued on are applicable through out the State. All department of the Secretariat and Heads of Departments / offices should ensure these order are scrupulously followed by them, and that the Government decision to provide reservation for the Scheduled Castes and Scheduled Castes converts to Buddhism, Scheduled Tribes and Denotified and Nomadic Tribes at the State promotion implemented strictly.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**K.G.PPARANJPE**
**Secretary to Government.**

## MODEL ROSTER FOR PROMOTION

| Sr.No. | Whether Reserved or open | Sr. No. | Whether Reserved or open |
|---|---|---|---|
| 1 | Scheduled Castes | 26 | Open |
| 2 | Scheduled Tribes | 27 | Open |
| 3 | Denotified Tribes and Nomadic Tribes | 28 | Denotified Tribes and Nomadic Tribes |
| 4 | Open | 29 | Scheduled Tribes |
| 5 | Open | 30 | Open |
| 6 | Open | 31 | Open |
| 7 | Open | 32 | Scheduled Castes |
| 8 | Open | 33 | Open |
| 9 | Scheduled Castes | 34 | Open |
| 10 | Open | 35 | Open |
| 11 | Open | 36 | Open |
| 12 | Open | 37 | Open |
| 13 | Open | 38 | Open |
| 14 | Open | 39 | Open |
| 15 | Open | 40 | Scheduled Castes |
| 16 | Scheduled Tribes | 41 | Open |
| 17 | Scheduled Castes | 42 | Open |
| 18 | Open | 43 | Open |
| 19 | Open | 44 | Scheduled Tribes |
| 20 | Open | 45 | Open |
| 21 | Open | 46 | Open |
| 22 | Open | 47 | Open |
| 23 | Open | 48 | Open |
| 24 | Open | 49 | Scheduled Castes |
| 25 | Scheduled Castes | 50 | Open |

**Scheduled Castes** ….. ….. **7**

**Scheduled Tribes** ….. ….. **4**

**Denotified Tribes and Nomadic Tribes** ….. ….. **2**

**Promotions**

**Principles to be observed in connection with from a lower to a higher grade, service or post.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

General Administration Department

Resolution No. SRV- 1074/D, Sachivalaya,

Bombay – 400 032. Dated the 28th January 1975.

**RESOLUTION OF GOVERNMENT**

In supersession of the order issued in Government Resolution, Political and Services Department, No. 4099/34, dated the 18th December 1950 and Government Circular Memorandum. Political and Services Department No. 4099/34 dated the 18th December 1950. Government, in consultation with Maharashtra Public Service Commission is pleased to direct that the following principles should be observed in the matter of promotions from a lower to a higher grade, service or post.

(1) All promotions up to the first promotion to a Class I post should be on the principle of "Seniority subject to fitness" . i.e. persons should be considered for promotion according to their seniority and they should be promoted in the order of their seniority provided they are considered fit for shouldering the higher responsibilities.

(2) Promotions above the first promotions to Class I should be by the strict selection i.e. only those persons who possess positive merit and achieve tangible good results should be considered suitable for promotion irrespective to their seniority provided they fulfill the criteria of length of service prescribed if any.

(3) Promotions to the posts of Heads of Departments should be by only very strict selection on the same criteria as under (2) above and irrespective of the class of service to which they belong. Selection should be depend on the competence and ability of the officer to inspire a sense of dynamism in the department and effect a stricter control.

(4) While considering persons for promotion by seniority subject to fitness as well as by selection, the cases of persons belonging to backward classes should be considered with special sympathy as laid down in Government Resolution, General Administration Department No. BAC-1057- J dated the 7th January 1961.

(5) In the case of promotions on the principles of seniority subject to fitness, it should be ensured that the percentage reservation for certain sections of the backward classes of laid down in Government Resolution, General Administration Department No. BCC-1072,-J, dated the 23rd May 1974, is strictly observed.

(6) In the case of promotions by selection, intense seniority of the officer who are considered fit for promotion should be maintained subject to grant of accelerated promotion to those who possess an outstanding record.

2. All Departments of the Secretariat should ensure that the above principles are strictly observed while effecting promotions, they are also requested to ensure that an officer belonging to one of the backward classes, if available, is nominated on each of the Departmental promotion committee. Each department in consultation with General Administration Department should issue detailed instructions on the manner in which these orders will be implemented by each Department or organization under it.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**D.D. SATHE**

**Chief Secretary to the Government of Maharashtra,**

**General Administration Department**
**Reservation for certain sections of the Backward Classes at the Stage of promotion.**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

General Administration Department
Resolution No. BCC- 1075/1370/1254(a)/XVI,
Sachivalaya, Bombay – 400 032, Dated the 31st July, 1976.

**READ** :- (i). Government Resolution, General Administration Department No.BCC-1072-J dated the 23rd May, 1974.

(ii) Government Resolution, General Administration Department NO.SRV-1074-D dated the 28th January 1975.

**RESOLUTION** :- According to the orders issued in Government Resolution, General Administration Department No.BCC-1072-J, dated the 23rd May, 1974 read with Government Resolution, General Administration Department NO.SRV-1074-D, dated the 28th January 1975, reservation has been provided for (i) Scheduled Castes, (ii) Scheduled Tribes and (iii) Denotified Tribes and Nomadic Tribes in all promotions upto first promotion in Class I posts in services in which the element of direct recruitment, if any, does not exceed 50%. The question of enlarging the scope of the existing scheme of reservations for these three sections of Backward Classes in posts filled by promotion has been under consideration of Government.

2. Government has now decided, in partial modification of the orders referred to above, that the reservation for the (i) Scheduled Castes, (ii) Scheduled Tribes and (iii) Denotified Tribes / Nomadic Tribesin promotions upto first promotion to Class I posts should be made applicable to cadres or services in which the element of direct recruitment, if any does not exceed 66 2/3 % instead of 50% as at present.

3. These orders should take effect from the date of issue except where a Select List for promotion has already been prepared by the Departmental Promotion Committee in accordance with the Government Resolution, dated the 23rd May, 1974 and approved by the appropriate authority, before the date of issue of these orders. In cases where the Select Lists have already been prepared and approved by the appropriate authority as stated above, these orders should apply to the preparation of the subsequent select lists.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**S.B. KULKRNI,**
**Secretary to the Government of Maharashtra.**

**Recruitment Rules-**
**Provision of minimum service as a condition for promotion to higher posts -**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
General Administration Department
Circular No. SRV-1277/XII,
Mantralaya, Bombay – 400 032, Dated the 14th October 1977.

**CIRCULAR**

It is noticed that in a large number of cases where the Recruitment Rules provide for appointment to posts by promotion, the Rules are silent as to the condition regarding the minimum service in the lower post for regulating promotions to a higher post . In the absence of such a provision in the Recruitment Rule, comparatively inexperienced persons have been considered for promotion to higher posts on the basis of their total length of service and not necessarily with reference to the length of service in the immediately lower cadre. Suitability of a Government Servant for promotion to a higher post has necessarily to be judged on the basis of his performance in the immediately lower post. In order, therefore, to keep the standard of efficiency it has now been decided that certain minimum service should be prescribed for Government Servants to be eligible for promotion. The minimum periods to be prescribed are as follows :-

| | | | |
|---|---|---|---|
| i) | For promotion within Class III services | - | 3 years in the lower Class III cadre |
| ii) | For promotion from a post in Class-III to a post in Class-II service | - | 5 years in Class III service. |
| iii) | For promotions within Class II service | - | Minimum 3 years service in the lower cadre |
| iv) | For promotions from Class II to Class-I post. | - | 5 years' service in Class II service. |
| v) | For promotions within Class I service | - | Minimum 4 years service in the lower Class I cadre. |

2. It is open to the Departments to prescribe a longer period of minimum service, if considered necessary.

3. The Departments of Mantralaya are requested to review the Recruitment Rules for various posts and services under their administrative control and amend those Rules, where necessary on the basis of the norms indicated above, having regard to the conditions obtaining in the respective cadres for regulating promotions to higher posts.

**4.** The review of the Recruitment Rules should be completed by 31st December, 1977. In the meantime, the Departments should forward to the General Administration Department monthly reports showing the progress of the work in the accompanying form, by the first work of every month.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**L.H. AJGAONKAR**
**Deputy Secretary to Government.**

**ACCOMPANIMENT To GOVERNMENT CIRCULAR, GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT SRV-1277/XII, DATED THE 14TH OCTOBER, 1977**

---------

**F O R M**

| Sr. No. | Name of Department | Number of Recruitment Rules, prescribed for services and posts under the Department. | Number of Recruitment Rules which have been reviewed in the light of the orders in the Government Circular. | Number of Recruitment Rules in which the provision of minimum service has been incorporated. | Number of Recruitment Rules remaining to be reviewed | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |

**Reservation of vacancies for certain sections of Backward Class Classes at the Stage of promotion.**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

General Administration Department
Resolution No. BCC- 1078/130/XVI-B
Mantralaya, Bombay – 400 032,
Dated the 19th March, 1979.

**READ** :- (i). G.R., G.A.D., No.BCC-1072-J, dated 23.5.1974.

(ii) G.R., G.A.D., No.SRV-1074-D, dated 28.1.1975.

(iii) G.R., G.A.D., No.BCC-1075/1370/1254(a)/XVI, dated 31.7.1976.

(iv) G.R., G.A.D., No.BCC-1072/122/787/XVI, dated 2.3.1977.

**RESOLUTION** :- According to the orders issued in Government Resolution, General Administration Department No.BCC-1072-J, dated the 23rd May, 1974 there should be reservation for the three sections of Backward Classes, as mentioned below, in promotions made on the basis of seniority subject to fitness in appointments to Class I, Class II, Class III and Class IV posts in grades or services in which the element of direct recruitment, if any, does not exceed $66\frac{2}{3}\%$

| | **Category of Backward Class** | **Percentage to be reserved** |
|---|---|---|
| i) | Scheduled Castes and Scheduled Castes converts to Buddhism | 13% |
| ii) | Scheduled Tribes including those living outside the specified areas | 7% |
| iii) | Denotified Tribes and Nomadic Tribes | 4% |
| | | 24% |

2. A combined select list is prepared in which the names of all selected officers, general as well as those belonging to the three sections mentioned above, are arranged in the order of their inter-se-seniority in the original seniority list of the category or grade from which the promotion is made. The combined select list is followed for making promotions in vacancies as and when they arise during the year.

3. Generally, the persons belonging to the above three sections of Backward Classes occupy the lower ranks in the combined select list end if there are any reversions due to abolition of posts, repatriation of a senior persons to parent Department etc., persons belonging to Scheduled Castes, Scheduled Tribes and DT/NT being juniors are reverted. If the orders issued in Government Resolution, General Administration Department, No.BCC-1072/122/787/XVI, dated 2nd March, 1977 are scrupulously followed, there should be ordinarily be no occasion to up-set reservations. However, inspite of following these orders scrupulously, an occasion arises when a person from the combined select list is required to be reverted and if a person from Scheduled Caste, or Scheduled Tribe or DT/NT being junior is reverted, there is a risk of a backlog being created in the promotional vacancies. The question as to what procedure should be followed when there is an occasion to revert an officer/officers promoted according to the combined select list prepared according to paragraph 4 of Government Resolution, General Administration Department, No.BCC-1072-J dated 23rd May, 1974 was under consideration of Government for some time past.

4. Government is now pleased to direct that when any reversion is to be effected, members of Backward Classes already in service should not be reverted if their strength in the promotion cadre does not exceed the prescribed percentage of reservation. A natural corollary of this would be that in case reversion is necessary and a General Category person has to be reverted, he will lose his seniority in the combined select list and would take his place according to the date of his continuous officiation on re-promotion.

5. All Departments of the Mantralaya and Heads of Departments / Offices should ensure that these orders are scrupulously followed by them.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**G.B.Pohekar**
**Deputy Secretary to Government**.

**उच्च पदावरील पदोन्नतीसाठी किमान सेवेच्या वर्षाची तरतूद.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-१२७७/बारा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : ३ सप्टेंबर, १९७९.

**प रि प त्र क**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१२७७/बारा, दिनांक १४ ऑक्टोबर, १९७७ च्या पहिल्या परिच्छेदाच्या संदर्भात शासन, खाली नमूद केल्याप्रमाणे पुढील आदेश देत आहे :-

(१) वर्ग-२ च्या पदावरील पदोन्नतीसाठी वर्ग-३ मध्ये किमान ५ वर्षाचा सेवाकाल आवश्यक आहे. त्यापैकी दोन वर्षाचा सेवाकाल हा पदोन्नतीसाठी असलेल्या पदाच्या निकटतम तृतीय वर्गातील निम्न पदावरील असावा.

(२) त्याचप्रमाणे उच्च पदावरील नेमणूकीसाठी सेवाप्रवेश नियमात असलेली किंवा नवीन सेवाप्रवेश नियम तयार करताना विहीत करण्यात येणारी किमान सेवेची अट पूर्ण करणारे उमेदवार उपलब्ध होण्याची जर शक्यता नसेल तर ती अट शिथील करण्याची तरतूद सेवाप्रवेश नियमात अंतर्भूत करण्यात यावी.

२. मंत्रालयातील सर्व विभागांना विनंती करण्यात येते की, उच्च पदावरील पदोन्नतीचे विनियमन करण्यासाठी संवर्गातील तत्कालीन स्थिती लक्षांत घेऊन निरनिराळया पदांच्या सेवाप्रवेश नियमांचे पुनर्विलोकन करावे आणि आवश्यक असेल तेथे वर नमूद केलेल्या आदेशांच्या आधारे सुधारणा करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**कृ. रा. निलावर,**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**Provision of minimum Service as a condition for promotion to higher posts -.**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

General Administration Department
Circular No. SRV-1080-XII.
Mantralaya, Bombay – 400 032, Dated the 20th July, 1981.

**READ** :- (1) Government Circular , General Administration Department No.SRV-1277-XII, dated the 14th October, 1977.

(2) Government Circular , General Administration Department No.SRV-1277-XII, dated the 3rd September 1979.

**CIRCULAR** :- The question of modification of the orders contained in the Government Circular, General Administration Department, No.SRV-1277-XII, dated the 14th October 1977 as amended by the Government Circular, General Administration Department No.SRV-1277-XII, dated the 3 rd September 1979 was under the consideration of Government. Government has now decided to do away with the condition regarding minimum period of service for promotions to posts within the same Class of service and for promotion from one class of service, to another, it has been decided that a total period of three years service in the lower class of service should be adequate. Accordingly, the revised norms of minimum service for promotion should be as follows :-

| | | |
|---|---|---|
| (1) | For promotions within the same Class of service -(i.e. within class-III or Class- II or Class-I as the case may be) | No period of minimum service is necessary. |
| (2) | For promotions from a post in Class-III to a post in- Class-II service. | 3 years in Class-III service. |
| (3) | For promotion from a post in Class-II to a post in -Class-I Service. | 3 years in Class-II Service. |

2. 2.The Departments of Mantralaya are requested to follow the above norms for regulating promotions pending amendment to the relevant Recruitment Rules for various posts and Services under the administrative Control.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**V.A.KOTESHWAR**
**Deputy Secretary to Government.**

**कनिष्ठ पद/संवर्ग/सेवामधून वरिष्ठ पद/ संवर्ग/सेवामधील पदोन्नती करताना पाळावयाची तत्वे.**

---

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-१०७७/सीआर ३४३/७९/१२,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : १८ मे १९८३.

**वाचा :-** **१)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०७४/डी, दिनांक २८.१.१९७५.

**२)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०७५/३४२/१०, दिनांक १.४.७६.

**३)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०७७/३६५८/१२, दिनांक १९.९.७७.

**४)** शासन परिपत्रक, ज्ञापन क्रमांक- एसआरव्ही-१०७८/३१२/१२, दिनांक ७.२.१९७९.

**शासन निर्णय** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०७४/डी, दिनांक २८ जानेवारी १९७५ मधील आदेशाप्रमाणे, शासन सेवेतील वर्ग १ मधील प्रथम पदोन्नती वरील पदोन्नत्या निश्चित गुणवत्तेच्या निकषांनी केल्या जातात आणि वर्ग १ मधील प्रथम पदोन्नती पर्यंतच्या सर्व पदोन्नत्या "जेष्ठतेप्रमाणे योग्यता" पाहून (Seniority subject to fitness) केल्या जातात. पदोन्नती करताना गुणवत्तेला अधिकाधिक वाव देण्याच्या दृष्टीने, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०७५/३४२/१०, दिनांक १ एप्रिल १९७६ अन्वये आदेशित करण्यात आले की, वर्ग १ मधील प्रथम पदोन्नती पर्यंतच्या सर्व पदोन्नत्या करताना त्यातील २५ टक्के जागा केवळ गुणवत्तेच्या आधारावर जेष्ठतेचा विचार न करता भरण्यासाठी राखून ठेवाव्यात. या आदेशानुसार वर्ग १ मधील प्रथम पदोन्नतीसाठीच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी निवडसूची तयार करताना ७५ टक्के जागा नेहमीच्या "जेष्ठता व योग्यता" या निकषाद्वारे आणि उरलेल्या २५ टक्के जागा "निश्चित गुणवत्तेच्या" निकषाद्वारे भरावयाच्या असतात.

शासनाच्या असे निदर्शनासल आले आहे की, या आदेशाची अंमलबजावणी करताना काही व्यावहारिक अडचणी उत्पन्न होतात. म्हणून या आदेशांचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सहाय्याने पुर्नविलोकन करण्यात आले. या विषयाचा सखोल आणि सांगोपांग विचार करुन शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

(अ) विशिष्ट गुणवत्ता धारकांसाठी २५ टक्के पदे राखीव ठेवण्यासंबंधीच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०७५/३४२/१०, दिनांक १.४.७६ द्वारा निर्गमित झालेले आदेश आता मागे घेण्यात येत आहेत.

(ब) सर्व पदोन्नतीमध्ये अत्युत्कृष्ट अहवाल असणा-यांचा अंतर्भाव निवड सूचीमध्ये करताना ४ जागा पर्यंतचे वरचे स्थान देण्याचा विद्यमान प्रथेऐवजी ६ जागा पर्यंतचे वरचे स्थान देण्यात यावे.

(क) निवड समितीने निवड सूची तयार करताना पुरेशा व्यक्तींचा विचार करावा या दृष्टीने जेंव्हा निवड सूची २५ किंवा कमी नांवाची करावयाची असेल तेंव्हा निवड समितीच्या विचारार्थ असलेल्या अधिका-यांची

संख्या तयार करावयाव्या निवड सूचीच्या तिप्पट संख्येइतकी असावी. जेंव्हा निवड सूची २५ पेक्षा अधिक नांवाची असेल तेंव्हा समितीच्या विचारार्थ अधिका-यांची संख्या निवड सूचीच्या दुप्पट इतकी असावी.

(ड) २५ टक्के पदावर गुणवत्तेच्या निकषावर ज्या अधिका-यांना पदोन्नत्या आधीच देण्यात आल्या आहेत त्याचा फेर विचार करण्यात येऊ नये. केवळ ज्या निवड सूचीमध्ये ज्यांचा या निकषांच्या आधारावर अंतर्भाव झाला असेल, परंतू अद्याप ज्यांना अशा पदोन्नत्या देण्यात आल्या नाहीत त्यांची नांवे निवड सूचीमधून वगळण्यात यावीत व तेवढयापुरता निवडसूचीचा भाग रद्द समजण्यात यावा. तसेच विद्यमान नियमानुसार निवड सूचीत चार स्थानापर्यंत वरचे स्थान देण्याऐवजी सहा स्थानापर्यंत वरचे स्थान देण्याचा विचार वर दर्शविल्याप्रमाणे यापुढे व्हावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**व.अं. कोटेश्वर**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**सेवाप्रवेश नियम**
**पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात /सेवेत/श्रेणीत किमान सेवेसंबंधीची अट विहीत करणे.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-१०८८/१०९/बारा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : २५ ऑगस्ट १९८८.

**पहा :- १)** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१२७७/१२, दि.१४ ऑक्टोबर, १९७७.
**२)** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१२७७/१२, दि.३ सप्टेंबर, १९७९.
**३)** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०८०/१२, दि.२० जुलै १९८१.

**परिपत्रक** :

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०८०/१२, दिनांक २० जुलै १९८१ द्वारे पदोन्नती करताना निम्न संवर्गात ३ वर्षाच्या किमान सेवेची अट विहीत करण्यात आलेली आहे. तथापि ही अट आंतरश्रेणी पदोन्नतीच्या बाबतीत लागू नाही. आंतरश्रेणी पदोन्नतीच्या बाबतीत सुध्दा निम्न पदावर किमान सेवेची अट लागू करता येईल किंवा कसे हा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता. या प्रश्नावर सम्यक विचार करुन शासन आता असे आदेश देत आहे की, वर्ग-३ मधून वर्ग-३ मधील वरिष्ठ पदांवर, वर्ग-२ मधून वर्ग-२ वरिष्ठ पदावर आणि वर्ग १ मधील दुस-या पदोन्नतीपर्यंतच्या पदांवर पदोन्नती करतानाही निम्न पदावर ३ वर्षाच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून विहीत करण्यात यावी. तसेच आंतरश्रेणीय पदोन्नतीसाठी निकटतम निम्न पदावर ३ वर्षाच्या किमान सेवेची अट विहीत करण्यात यावी.

२. मंत्रालयाच्या विविध विभागांनी आपापल्या कक्षेतील पदांच्या संदर्भात वरील तत्व संबंधित सेवाप्रवेश नियमांत अंतर्भूत करण्याची कार्यवाही करावी आणि अशाप्रकारे कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत पदोन्नती करताना या तत्वाचा अवलंब करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**मु.स. मोकाशी**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**कनिष्ठ पद /संवर्ग/सेवामधून वरिष्ठ पद/संवर्ग सेवामधील पदोन्नती करताना पाळावयाची तत्वे.**

-----------------------------------------------

**निवड समितीने निवडसूची तयार करताना विचारात घ्यावयाच्या व्यक्तींची संख्या.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-१०८९/४०६/प्र.क्र.५/८९/बारा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : १ ऑगस्ट १९८९.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही-१०७५/४०६/३४२/दहा, दिनांक १ एप्रिल १९७६.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही-१०७७/सीआर-३४३/७९/बारा, दिनांक १८ मे १९८३.

**शासन निर्णय**

निवड समितीत सध्या रिक्त असलेल्या आणि पुढील वर्षभराच्या कालावधीत रिक्त होणा-या संभाव्य रिक्त पदांपैकी पदोन्नतीने भरावयाच्या पदांकरीता निवडसूची तयार करावयाची असते. पदोन्नतीच्या प्रयोजनासाठी असलेल्या निवड समितीकडून निवडसूची तयार करताना पुरेशा व्यक्तींचा विचार व्हावा असे अपेक्षित आहे.

२. निवड समितीच्या विचारार्थ क्षेत्रात (Zone of consideration) असलेल्या व्यक्तिंच्या गोपनीय अभिलेखांचे अवलोकन करावे लागते. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक - एसआरव्ही-१०७७/सीआर-३४३/७९/ बारा, दिनांक १८ मे १९८३ अन्वये निवड समितीच्या विचारार्थ क्षेत्र निश्चित करण्याबाबतचे शासनाचे विद्यमान आदेश पुढीलप्रमाणे आहेत.

"निवड समितीने निवडसूची तयार करताना पुरेशा व्यक्तींचा विचार करावा यादृष्टीने जेंव्हा निवडसूची २५ किंवा कमी नांवाची करावयाची असेल तेव्हा निवड समितीच्या विचारार्थ असलेल्या अधिका-यांची संख्या तयार करावयाच्या निवड सूचीच्या तिप्पट संख्येइतकी असावी. जेंव्हा निवडसूची २५ पेक्षा अधीक नावाची असेल तेंव्हा समितीच्या विचारार्थ अधिका-यांची संख्या निवडसूचीच्या दुप्पट इतकी असावी."

३. निवडसूची तयार करताना विद्यमान आदेशानुसार विचारार्थ क्षेत्रातील सर्वच उमेदवारांचा विचार करणे आवश्यक नसते. परंतू सर्वांचे गोपनीय अहवाल अद्ययावत करुन/गोळा करुन निवड समितीच्या सदस्यांना अवलोकनासाठी पाठवावे लागतात, त्यामूळे निवडसूची तयार करायला विलंब होतो. ज्यावेळी २५ टक्के पदावर गुणवत्तेच्या निकषांवर पदोन्नती द्यावयाचे आदेश होते. त्यावेळी मोठया संख्येचे विचारार्थ क्षेत्र असणा-यांना निवडसूचीमध्ये जास्तीत जास्त ६/२ जागा पर्यंतचे वरचे स्थान देता येते. त्यामुळे या विषयाचा सखोल आणि सांगोपांग विचार करुन शासन निवड समितीच्या विचारार्थ क्षेत्राच्या व्याप्ती संबंधीच्या विद्यमान आदेशात बदल करुन बिनराखीव पदांकरिता व राखीव पदातील प्रत्येक प्रवर्गाकरिता विचारार्थ क्षेत्र पुढीलप्रमाणे असावे असे आदेश देत आहे.

१.	<u>बिनराखीव (सर्वसाधारण प्रवर्ग) पदांकरिता विचारार्थ क्षेत्र.</u>

अ)	एक ते तीन नांवाची निवडसूची करावयाची असल्यास कमीत कमी सहा कर्मचा-यांचा /अधिका-यांचा विचार करण्यात यावा.

ब)	चार ते दहा नांवाची निवडसूची करावयाची असल्यास निवडसूचीच्या आकाराच्या दुप्पट संख्ये इतक्या कर्मचा-यांचा /अधिका-यांचा विचार करण्यात यावा.

क)	दहापेक्षा जास्त नांवांची निवडसूची करावयाची असेल तर निवडसूचीच्या आकाराच्या दीडपट संख्ये इतक्या किंवा वीस यापैकी जास्त असेल त्या संख्ये इतक्या कर्मचा-यांचा /अधिका-यांचा विचार करण्यात यावा.

२.	<u>राखीव (अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग) पदांकरिता विचारार्थ क्षेत्र.</u>

वर्ग-३ ते वर्ग-१ मधील पहिल्या पदापर्यंतच्या पदावर पदोन्नती देताना ५० बिंदू रोस्टरनुसार प्रत्येक मागास वर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांसाठी /अधिका-यांसाठी जितकी राखीव पदे असतील त्या राखीव पदाच्या संख्येस अनुसरुन वरील भाग (१) मधील (अ), (ब) आणि (क) मध्ये नमूद केलेल्या संख्येइतक्या मागासवर्गीय कर्मचा-यांचा /अधिका-यांचा देखील विचार करण्यात यावा.

**<u>टिप</u> :-**मागासवर्गीयांकरीता राखील असलेले पद अथवा पदे आरक्षणमुक्त करण्याचे शासनाचे आदेश झाल्यास त्या प्रमाणात वरील भाग (१) मधील विचारार्थ क्षेत्र वाढून भाग (२) मधील विचारार्थ क्षेत्र कमी होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**भा.म.भणगे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**कनिष्ठ श्रेणीतून वरिष्ठ श्रेणीत पदोन्नत्या देताना अवलंबिण्याची तत्वे.**

---

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :बीसीसी-१०९०/१५/३१७/१६-ब
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : ३१ मे १९९०.

**पहा :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी-१०७५/१५/३१७/१६ दिनांक ८ एप्रिल १९७६.

**शासन निर्णय**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७५/१५/३१७/१६, दिनांक ८ एप्रिल १९७६ मधील आदिवासी भागात केलेले काम पदोन्नतीसाठी "अतिरिक्त अर्हता" म्हणून समजण्यात यावे अशा दिलेल्या सूचना ह्या निर्णयाच्या दिनांकापासून रद्द करण्यात येत आहेत.

२. सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील सूचना त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख इत्यादींच्या नजरेस अनुपालनासाठी आणून द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**प्र. द. माळवे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**मागासवर्गीयांना शासकीय व निम-शासकीय सेवेत पदोन्नतीमध्ये आरक्षण**

---

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

निर्णय क्रमांक : बीसीसी-१०८९/२५५१(अ)/१६-ब

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : २३ जानेवारी १९९१.

**पहा :-** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :बीसीसी-१०७२-जे,दिनांक २३ मे १९७४.

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही-१०७४-डी, दिनांक २८ जानेवारी, १९७५.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :बीसीसी- १०७५/ १३७०/ १२५४/ (अ)/१६, दिनांक ३१ जुलै १९७६.

**<u>शासन निर्णय</u>:-** शासन निर्णय, दिनांक ३१ जुलै १९७६ अन्वये असे आदेश देण्यात आले आहेत की, ज्या संवर्गात/सेवांत सरळसेवा भरतीचे प्रमाण ६६ २/३ % पेक्षा अधिक होत नाही अशा संवर्गात /सेवांत पदोन्नतीच्या कोटयामध्ये मागासवर्गीयांना आरक्षण लागू करण्यात यावे. वर नमूद केलेल्या दिनांक २३ मे, १९७४ च्या शासन निर्णयातील आदेशाप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या तीन गटांतील मागासवर्गीय कर्मचारी / अधकारी यांना पदोन्नतीसाठी ५० बिंदू नामावली प्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे.

२. मागासवर्गीयांचे सरळसेवेमध्ये प्रतिनिधित्व वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने अलिकडेच असे आदेश दिले आहेत की, ज्या सेवा /संवर्गामध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५% पेक्षा अधिक होत नसेल अशा सेवा /संवर्गामध्ये पदोन्नतीसाठी आरक्षण विहित करण्यात यावे. सदरील आदेशांचा विचार करुन त्या अनुषंगाने शासन आता असे आदेश देत आहेत की, राज्य शासकीय / निम शासकीय सेवेतील ज्या सेवा/संवर्गामध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५% पेक्षा अधिक नाही अशा सेवा/संवर्गामध्ये पदोन्नतीसाठी वर नमूद केलेल्या तीन गटांसाठी ५० बिंदू नामावली नुसार आरक्षण विहित करण्यात यावे.

३. उपरोक्त आदेश हे सध्या चालू असलेल्या सरळसेवा भरतीमधील (शासन निर्णय, दिनांक १२ जुलै, १९८९) तसेच पदोन्नतीमधील (शासन निर्णय, दिनांक ३० सप्टेंबर, १९८९) अनुशेष भरुन काढण्याच्या विशेष भरती मोहिमे संदर्भात लागू असणार नाहीत. म्हणजेच, ज्या संदर्भात अनुशेषाची मोजणी होऊन पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे /येत आहे, त्या अनुशेष भरतीसाठी हे आदेश लागू असणार नाहीत.

४. वरील आदेश शासकीय /निमशासकीय सेवा तसेच महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, अनुदानित संस्था, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम, विद्यापीठे, अनुदानित शैक्षणिक संस्था, इत्यादी मधील आस्थापनेमधील पदांना लागू राहतील. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील निमशासकीय संस्था / कार्यालयातील पदांबाबत विहित नियम /अधिनियमाखाली सूचना निर्गमित कराव्यात अशी त्यांना विनंती आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**प्र.द. माळवे,**
**उप सचिव,**
**महाराष्ट्र शासन.**

**पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २५ मे, २००४

**पहा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७२/जे, दिनांक २३ मे, १९७४.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७४/डी, दिनांक २८ जानेवारी, १९७५.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०८९/२५५१ (अ)/१६ब, दिनांक २३ जानेवारी, १९९१.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६ब, दिनांक १८ ऑक्टो.१९९७.

**प्रस्तावना :-** मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नतीमध्ये शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०७२/जे, दिनांक २३ मे, १९७४ अन्वये आरक्षणाचे तत्व लागू करण्यात आले होते. तसेच शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०७४/डी, दिनांक २८ जानेवारी, १९७५ अन्वये कनिष्ठ स्तरावरुन वरीष्ठ स्तरावर पदोन्नती देताना पाळावयाची तत्वे विशद केलेली असून या शासन निर्णयान्वये वर्ग १ च्या पहिल्या पदापर्यंतची (पहिल्या टप्प्यापर्यंत) पदोन्नती ही "योग्यतेनुसार वरिष्ठता" (seniority subject to fitness) या तत्वावर मागासवर्गीयाकरीता असलेले आरक्षण विचारात घेवून करण्याबाबत आदेश होते. या शासन निर्णयानुसार वर्ग-१ च्या पहिल्या पदानंतरची (पहिल्या टप्प्यानंतरची) पदोन्नती "काटेकोर निवड" पध्दतीद्वारे (By strict selection) करण्याबाबत आदेश दिलेले असून, त्यानुसार वर्ग १ च्या पहिल्या पदानंतरच्या पुढील पदांना / टप्प्यांना आरक्षणाचे तत्व लागू केलेले नव्हते. याशिवाय शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०८९/२५५१ (अ)/१६ ब, दिनांक २३ जानेवारी १९९१ अन्वये ज्या सेवा / संवर्गा मध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५% पेक्षा अधिक नाही, अशा सेवा / संवर्गामधून पदोन्नतीसाठी आरक्षण विहीत करण्याबाबत आदेश दिलेले होते. म्हणजेच ज्या सेवा / संवर्गामध्ये सरळ सेवाभरतीचे प्रमाण ७५% पेक्षा अधिक होते अशा वर्ग ४ ते वर्ग १ च्या पहिल्या टप्प्यापर्यंतच्या पदांमध्ये पदोन्नतीकरीता आरक्षण लागू नव्हते.

२. सद्य:स्थितीत महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २९/१/२००४ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील (आरक्षण कायदा) कलम ५ मध्ये खालील प्रमाणे तरतूदी केलेल्या आहेत.

**[अ] कलम ५ पोटकलम (१) पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर असेल.**

**[ब] पोटकलम (२) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास , पदोन्नतीद्वारे भरावयाच्या कोणत्याही पदासाठी आरक्षणाची तरतूद करणारे शासनाचे आदेश अंमलात असल्यास, शासनाकडून त्यामध्ये फेरफार करण्यात आला नसेल किंवा ते रद्द करण्यात आले नसतील तर ते अंमलात असल्याचे चालू राहतील.**

३. सध्या प्रचलित असलेल्या दिनांक २३ मे, १९७४, २८ जानेवारी, १९७५ व २३ जानेवारी १९५१ चे शासन निर्णय अधिक्रमित करुन आता नव्याने लागू केलेल्या वरील अधिनियमाच्या कलम ५ पोटकलम (१) व (२) च्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

(अ) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील (आरक्षण कायदा) च्या कलम ५ मधील पोटकलम (१) नुसार जेथे पदे पदोन्नतीने भरली जातात तेथे आरक्षणाचे तत्व लागू होईल. त्यानुसार दिनांक २३/१/१९९१ च्या शासन निर्णयातील तरतूद रद्द करुन सरळ सेवेचे प्रमाण ७५% पेक्षा अधिक असले तरीही उर्वरीत पदोन्नतीच्या पदांना आरक्षण लागू राहील.

(ब) पदोन्नतीमधील आरक्षण हे खालीलप्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १) अनुसूचीत जाती | १३% |
| २) अनुसूचीत जमाती | ७% |
| ३) विमुक्त जाती (अ) | ३% |
| ४) भटक्या जमाती (ब) | २.५% |
| ५) भटक्या जमाती (क) | ३.५% |
| ६) भटक्या जमाती (ड) | २% |
| ७) विशेष मागास प्रवर्ग | २% |
| **एकूण** | **३३%** |

**(क) जेथे पदोन्नतीकरीता सेवा प्रवेश नियमात तरतूद आहे तेथे पदोन्नती करीता अद्यापपर्यंत ज्या टप्प्यांना वा संवर्गांना आरक्षण लागू नव्हते, आता त्या पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांना / संवर्गांना आरक्षणाचे तत्व दिनांक २९/१/२००४ पासून लागू होईल.**

(ड) जे मागासवर्गीय अधिकारी वर्ग १ च्या वरील टप्प्यात दिनांक २९/१/२००४ या तारखेपर्यंत पदोन्नत झालेले आहेत ते सर्व सेवाजेष्ठता व गुणवत्तेनुसार झाले आहेत असे समजण्यात यावे.

(इ) या अधिनियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीने भरण्यात येणारी आरक्षणाची पदे यापुढे रिक्त होणाऱ्या पदांच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने भरण्यात यावीत.

(फ) नव्याने आरक्षण लागू केलेल्या संवर्गाना / पदांना सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णयातील आरक्षणा संबंधीचे आदेश लागू राहतील. मात्र ज्या संवर्गात नव्याने आरक्षण लागू करण्यात येणार आहे त्या संवर्गातील मंजूर पदांवर एकाच वेळी आरक्षण न लावता त्या संवर्गातील दिनांक २९/१/२००४ पासून रिक्त होणाऱ्या पदांवरील टक्केवारी विचारात घेवून आरक्षणाची पदे विचारात घ्यावीत.

(ग) दिनांक २९/१/२००४ पूर्वी सुरु केलेल्या निवड प्रक्रियेमध्ये वर्ग १ च्या पुढील टप्यामध्ये तसेच ज्या पदोन्नतीच्या टप्प्यांना आरक्षण लागू नव्हते अशा पदोन्नतीच्या टप्प्यांमध्ये सदर अधिनियमाच्या तरतूदी लागू होणार नाहीत. मात्र दिनांक २९/१/२००४ च्या नंतरच्या निवड प्रक्रियेमध्ये अधिनियमातील तरतूदीनुसार आरक्षणाचे तत्व लागू राहिल.

४. वरील आदेश मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख याच्या निदेर्शनास आणून वरील आदेशांची योग्य अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(यु.पी.एस.मदान)**
**सचिव**

**आरक्षणाची पदे पदोन्नतीने भरण्यासंदर्भातील विहीत कार्यपध्दती....**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय /क्रमांक : बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र. ६४/०१/१६ ब
मंत्रालय मुंबई - ४०० ३२.
दिनांक : २६ ऑक्टोबर, २००४.

**पहा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -१०७२/ जे, दिनांक २३ मे १९७४

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही - १०७४/ डी, दिनांक - २८ जानेवारी १९७५.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी - १०८९ / २५५१ / १६-ब, दिनांक - २३ जानेवारी १९९१.

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी - १०९७ /प्र.क्र.- ६३/९७/ १६-ब, दिनांक - १८ ऑक्टोबर १९९७.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ ब, दिनांक २५ मे २००४

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती, निरधीसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियमाला अनुसरुन दिनांक २५ मे २००४ रोजी शासन निर्णय काढण्यात आला आहे. ज्या पदोन्नतीच्या पदांना प्रथमच आरक्षण लागू करण्यात आले आहे असे रिक्त पदे भरण्याचे तत्व उक्त शासन निर्णयात स्पष्ट केले आहे. ही पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यपद्धती निश्चित कशी असावी याबाबत विभागांकडून काही शंका उपस्थित करण्यात येत आहेत आणि त्यांचे स्पष्टीकरण या विभागाकडे विचारण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शंका निरसनासाठी सर्व टप्प्यांवर पदोन्नतीची रिक्त पदे राखीव प्रवर्गामधून भरण्याची सविस्तर कार्यपद्धती पुढील प्रमाणे राहील.

१) पदोन्नतीकरीता निवडसूची ही प्रत्येक सेवाभरती वर्षामध्ये (१सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट) तयार करावी. नेहमीची प्रथा अशी आहे की, विशिष्ट संवर्गात ज्यावेळी एखादे रिक्त पद किंवा रिक्त पदे निर्माण होतात त्यावेळी पदोन्नतीकरीता निवडावयाच्या उमेदवारांचे प्रस्ताव सादर करण्यात येतात. ही चुकीची पद्धत आहे भरती वर्षात एकूण किती रिक्त पदे उपलब्ध होऊ शकतील अशा संभाव्य रिक्त पदांच्या संख्येचा अचूक अंदाज काढावा व त्या वर्षातील अशा रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन दरवर्षी निवडसूची तयार केली गेली पाहिजे. एखाद्या सेवा भरती वर्षात रिक्त असलेल्या व रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांचा अचूक अंदाज केल्यानंतर अशा रिक्त पदांवर ३३ टक्के आरक्षणाचे सूत्र लागू करुन आरक्षित करावयाच्या पदांची संख्या काढणे ही त्यापुढची पायरी आहे. राखीव पदांची संख्या अपूर्णांकात असेल तर ती जवळच्या पूर्ण संख्येत पूर्णांकात करण्यात येईल,जसे आरक्षणासाठी २.३ पदे असतील तर ती २ म्हणून समजण्यात येतील आणि २.६ पदे असतील तर ती ३ म्हणून समजण्यात येतील.२.५ हा आकडा या प्रयोजनासाठी २ म्हणून नव्हे तर ३ म्हणून समजण्यात येईल.

२)  राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी उपलब्ध पदांची संख्या निश्चित केल्यावर कोणत्या विशिष्ट प्रवर्गासाठी ती पदे वापरता येतील ते ठरविण्यात यावे. या प्रयोजनार्थ दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णया सोबतच्या पदोन्नतीसाठीच्या नमुनावजा १०० बिंदु नामावलीचे सहाय्य घेण्यात यावे. पहिल्या भरती वर्षात अशा उपलब्ध पदांसाठी नामावलीतील बिंदू हे प्रत्येक राखीव प्रवर्गाकरिता ते नामावलीमध्ये ज्या क्रमाने असतील त्याच क्रमाने अनुक्रमांक १ पासून सुरु होऊन वापरण्यात येतील. उदा.जर केवळ एकच राखीव पद उपलब्ध झाले तर ते पद अनुसूचित जातीच्या उमेदवारामधून भरण्यात यावे. कारण बिंदू नामावलीतील पहिला अनुक्रमांक हा अनुसूचित जातीसाठी आहे.जर दोन राखीव पदे असतील तर त्यापैकी एक अनुसूचित जातीच्या उमेदवाराला तर दुसरे अनुसूचित जमातीच्या उमेदवाराला मिळेल, कारण बिंदूनामावलीतील अनुक्रमांक १ व २ वरील राखीव बिंदू या प्रवर्गासाठी आहे. तीन राखीव पदे असतील तर पहिले पद अनुसूचित जातीच्या, दुसरे पद अनुसूचित जमातीच्या व तिसरे पद विमुक्त जाती (अ) च्या प्रवर्गाच्या जातीच्या उमेदवाराला मिळेल. कारण अनुक्रमांक १, २ व ३ वरील राखीव बिंदू अनुक्रमे या प्रवर्गासाठी आहेत. याच पद्धतीने बिंदू नामावलीमध्ये दिलेल्या क्रमाने प्रत्येक राखीव प्रवर्गासाठीचा नामावली बिंदू वापरण्यात यावा.

३)  पुढील भरती वर्षामध्ये विशिष्ट वर्षात रिक्त होणाऱ्या आरक्षित पदांसाठी वापरावयाचा नामावली बिंदू हा मागील वर्षात वापरलेल्या शेवटच्या मागासवर्गीयांच्या नामावली बिंदू पासून पुढे सुरु होईल. स्पष्टीकरणार्थ- पहिल्या वर्षात जर एक रिक्त पद राखीव असेल व ते नामावली बिंदू क्रमांक १ वरील अनुसूचित जातीच्या उमेदवाराकडे गेले असेल आणि दुसऱ्या वर्षात पुन्हा एक रिक्त पद राखीव असेल तर ते अनुसूचित जातीच्या पुढे येणाऱ्या बिंदू नामावलीतील क्र.२ नुसार अनुसूचित जमातीच्या उमदवारांकडे जाईल. त्याप्रमाणे पहिल्या वर्षी ३ रिक्त पदे राखीव असतील व ती पदे (बिंदू नामावली क्र. १,२ व ३ नुसार अनुक्रमे) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती (अ) या प्रवर्गातील उमेदवाराकडे गेली असतील आणि जर पुढील वर्षात राखीव प्रवर्गासाठी आणखी ३ पदे उपलब्ध होणार असतील तर ही तीन पदे राखीव प्रवर्गात येणाऱ्या नामावली बिंदूनुसार म्हणजेच अनु. क्र. ४ वरील भटक्या जमाती (क) अनु. क्र. ७ वरील भटक्या जमाती (ब) आणि अनु. क्र. ११ वरील भटक्या जमाती (ड) यांच्याकडे जातील. अशारीतीने प्रत्येक संवर्गातील पुरेसे प्रतिनिधीत्व प्राप्त करण्याची सर्व राखीव प्रवर्गांना संधी मिळेल.

४)  तथापि संवर्गात एकूण कर्मचारीसंख्या ३२ पेक्षा कमी असेल अशा संवर्गाकरिता ही स्थिती कधीही साध्य करता येणार नाही. कारण ३३ टक्क्यांची मर्यादा राखतांना विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब, क आणि ड) आणि विशेष मागास प्रवर्ग यांतील उमेदवारांना त्यांच्या प्रमाणशीर आरक्षणाच्या दृष्टीने प्रत्येकी एक पद सुद्धा मिळणार नाही. म्हणून अशा प्रकरणांमध्ये राखीव प्रवर्गांसाठी नंतरच्या बिंदू नामावली बिंदू क्रमाचा अवलंब करण्याची पद्धत पुढे चालू ठेवण्यात यावी.

५)  पदांची एकूण संख्या ही ३२ किंवा त्याहून अधिक असेल अशा संवर्गासाठी वर स्पष्ट केल्याप्रमाणे, बिंदु नामावली पद्धतीचा वापर करतेवेळी नेहमीच प्रत्येक प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदांची एकूण संख्या लक्षात घ्यावी. उदा. एखाद्या संवर्गाची संख्या ४० असल्यास वैयक्तिक व एकत्रितपणे ३३ % आरक्षण ठेवता येण्यासाठी त्यापैकी ५ अनुसूचित जाती, ३ अनुसूचित जमाती, ४ विमुक्त जाती आणि भटक्या जमाती (अ, ब, क, ड यांसाठी प्रत्येकी १ पद) आणि १ विशेष मागास वर्गीय उमेदवार याप्रमाणे पदे घ्यावी लागतील. बिंदू नामावलीतील बिंदूचा अवलंब करताना, काही झाले तरी, ५,३,४ व १ ही मर्यादा ओलांडली गेलेली नाही याची खातरजमा करावी. एखाद्या विशिष्ट वेळी अनुसूचित जातीचे ५ उमेदवार अगोदरच पदावर असतील आणि राखीव प्रवर्गासाठी नवीन रिक्त पद निर्माण झाल्यास व बिंदूनामावलीतील त्यापुढील बिंदु हा पुन्हा अनुसूचित जातीचा असल्यास, त्या प्रवर्गाला अगोदरच १३ % इतके पुरेसे प्रतिनिधीत्व असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करावे. अशा प्रकरणांच्या बाबतीत राखीव प्रवर्गासाठी बिंदू नामावलीतील त्यानंतरचा

नामावली बिंदू वापरण्यात यावा. समजा ज्या प्रवर्गासाठी बिंदू नामावलीतील नंतरचा नामावली बिंदू वापरावयाचा असेल त्या प्रवर्गाला देखील या अगोदरच विहीत टक्केवारी प्रमाणे आरक्षण मिळाले असल्यास त्यानंतरच्या आरक्षणासाठीचा नामावली बिंदू वापरण्यात यावा. जेणेकरुन प्रत्येक राखीव प्रवर्गाला पुरेसे प्रतिनिधीत्व मिळू शकेल. मात्र ज्यावेळी विहित टक्केवारीनुसार / बिंदूनामावली नुसार आरक्षित पदे उपलब्ध नसतील व मागासवर्गीय त्यांच्या ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीस उपलब्ध असला तर त्यांना केवळ आरक्षित पद / बिंदू उपलब्ध नाही म्हणून पदोन्नती नाकारण्यात येवू नये, त्यांना त्यांच्या ज्येष्ठतेनुसार बिनराखीव पदावर पदोन्नती देण्यात यावी.

६) हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी पदोन्नती देण्यासाठी ज्या संवर्गामध्ये आरक्षणाची पद्धत लागू करण्यात येत होती अशा संवर्गासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १८/१०/१९९७ रोजीच्या शासन निर्णयामधील याबाबतीत नमूद केलेली पद्धती अनुसरण्यात येईल . त्याचप्रमाणे शासन निर्णय दिनांक २३/५/१९७४ व २८/१/१९७५ यामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट दिनांक २५ मे २००४ चा शासन निर्णय किंवा हे परिपत्रक यांच्याशी विसंगत नसेल तर ती अंमलात असणे तसेच चालू राहील.

७) असेही स्पष्ट करण्यात येत आहे की, या अधिनियमात ज्यासाठी तरतूद करण्यात आली आहे असे आरक्षण ही पदे भरण्याकरीता निवड प्रक्रिया यापूर्वीच सुरु करण्यात आली नसेल तर हा अधिनियम अंमलात आणण्याच्या दिनांकास म्हणजे , दिनांक २९/१/२००४ रोजी रिक्त असलेल्या किंवा त्यानंतर रिक्त होणाऱ्या सर्व पदोन्नतीच्या पदांना देखील लागू होइल. विचारार्थ क्षेत्रातील उमेदवारांच्या नावाची निवड करण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत उमेदवारांची निवड झाली असल्यास 'निवडप्रक्रिया' सुरु झाली असे समजण्यात यावे.

भविष्यात पदोन्नती संबंधातील सर्व प्रकरणे वर स्पष्ट करण्यात आलेल्या पद्धतीने हाताळण्यात येतील या पद्धतीपेक्षा कोणतीही वेगळी पद्धत अनुसरली जावू नये , जेणे करुन विशिष्ट प्रवर्गाला अपुरे किंवा जादा प्रतिनिधीत्व दिले जाईल व त्यामुळे अर्थातच या अधिनियमाच्या तरतुदींचा भंग केल्यासारखे होईल.

८) दिनांक २९ जानेवारी २००४ पूर्वी तदर्थ पदोन्नती (Ad-hoc) देताना ज्या प्रकरणात आरक्षणाचा विचार केलेला नसेल अशा प्रकरणी तदर्थ पदोन्नतीला पुन्हा मुदतवाढ देताना आरक्षण विहीत करुन पदोन्नती देण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच मागासवर्गीयाच्या जागेवर खुल्या / इतर प्रवर्गांना दिलेल्या तात्पुरत्या पदोन्नत्या रद्द करुन त्या त्या प्रवर्गाला देण्यात याव्या व ते उपलब्ध नसतील तर दि. ५/१२/१९९४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार खुल्या व इतर प्रवर्गाला तात्पुरत्या स्वरुपात देण्यात याव्यात.

२. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा , मंडळे / महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा अनुदानित शैक्षणिक संस्था , सहकारी संस्था, शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादीं सर्व कार्यालयांना लागू राहतील.

३. मंत्रालयीन विभागांनी सदरील आदेश त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणून निर्णयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना विनाविलंब देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप बागची**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:आरटीआर-१४०३/८४/प्र.क्र.५४/०३/१३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० मे, २००५

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि. १५-४-१९९१
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९४/प्र.क्र.४/९४/१२, दि. ७-३-१९९६
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६ ब, दि. १८-१०-१९९७

**प्रस्तावना :**

उपरोक्त अनुक्रमांक १ येथे नमूद केलेल्या दिनांक १५/४/१९९१ च्या शासन निर्णयान्वये गट "ड" मधील कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक टंकलेखक पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात काही अटी व शर्ती विहित केलेल्या आहेत. त्यामधील एक अट अशी आहे की, सदर शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता होत असल्यास त्या त्या विभागात / कार्यालयात त्या त्या विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या लिपिक-टंकलेखक पदाच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती द्यावी. तथापि, उपरोक्त अनुक्रमांक २ येथे नमूद केलेल्या दिनांक ७ मार्च, १९९६ च्या शासन निर्णयान्वये सेवाभरतीचे प्रमाण निश्चित करताना हे प्रमाण त्या त्या संवर्गातील कायम (Permanent) आणि हंगामी (Temporary) अशा दोन्ही स्वरुपांच्या एकूण मंजूर पदांच्या पदसंख्येला लावण्याबाबत आदेशित केले आहे. यास्तव दिनांक १५/४/१९९१ च्या आदेशातील विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या लिपिक-टंकलेखक पदाच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती देण्याची तरतूद उपरोक्त क्रमांक २ येथील दिनांक ७ मार्च, १९९६ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित झाली आहे.

त्याचप्रमाणे अनुक्रमांक ३ येथे नमूद केलेल्या दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ च्या शासन निर्णयातील आरक्षणविषयक तरतुदी गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती देताना लागू करावयाच्या आहेत. कमी संवर्ग संख्या असलेल्या कार्यालयातील गट "ड" च्या कर्मचाऱ्यांना गट "क" मध्ये पदोन्नती मिळण्यासंदर्भात कोटा निश्चित करणे तसेच गट "ड" मधून गट "क" मध्ये पदोन्नती देण्यासाठी संगणक ज्ञानाची अर्हता आवश्यक करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

वरील सर्व बाबी विचारात घेऊन गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याबाबतच्या दिनांक १५/४/१९९१ च्या आदेशामध्ये अंशत बदल करुन आता पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१) गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देताना प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या २५ टक्के पदांऐवजी लिपिक-टंकलेखक संवर्ग संख्येच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

मात्र असे करताना ज्या कार्यालयात लिपिकवर्गीयांची पदे ४ पेक्षा कमी आहेत त्या कार्यालयाकरीता पुढील सूत्राचा अवलंब करावा.

| **लिपिकवर्गीय पदांची संख्या** | **गट "ड" मधील पदोन्नतीसाठी रिक्त करावयाचा कमाल पदे** |
|---|---|
| १ | ० |
| २ | १ |
| ३ | १ |

या सूत्रामुळे लिपिकवर्गीय पदे ४ पेक्षा कमी असल्यास २५ टक्क्यांची मर्यादा त्या त्या प्रमाणात शिथिल केल्याचे समजण्यात यावे.

२) गट "ड" मधील कर्मचारी गट "क" मध्ये पदोन्नत होण्यापूर्वी जर त्याने संगणकाची अर्हता प्राप्त केली नसेल तर गट "क" मधील पदावरील नियुक्तीपासून २ वर्षांच्या काळात विहित संगणक ज्ञानाची अर्हता त्यास प्राप्त करावी लागेल. अन्यथः त्याला गट "ड" मधील पदावर पदावनत व्हावे लागेल.

३) संदर्भाधीन क्रमांक ३ येथे नमूद केलेल्या दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णयामधील आरक्षणविषयक तरतुदी लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदोन्नतीच्या वाट्याला येणाऱ्या २५ टक्के पदांना लागू करुन त्यानुसार होणारी आरक्षित पदे विचारात घेऊन पदोन्नत्या देण्यात याव्यात.

४) संदर्भाधीन क्रमांक १ येथील दि. १५/४/१९९१ च्या आदेशातील अर्हताप्राप्त उमेदवारांची परस्पर ज्येष्ठता राखणे, टंकलेखनाची विहित वेगमर्यादा प्राप्त करणे इत्यादी अटी यापुढे देखील तशाच कायम राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रकाश लोखंडे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : २४ ऑगस्ट,२००६.

**वाचा :-** १) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २५/५/२००४.
२) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक १४/२/२००५.
३) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र. बीसीसी-२००४/प्र.क्र.११८/०४/१६-ब, दिनांक १४/७/२००५.

**प्रस्तावना :-**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८ (आरक्षण कायदा) च्या कलम-५ मधील पोटकलम (१) नुसार जेथे पदे पदोन्नतीने भरली जातात तेथे पदोन्नतीकरिता अद्यापपर्यंत ज्या टप्प्यांना वा संवर्गाना आरक्षण लागू नव्हते त्या सर्व टप्प्यांना वा संवर्गांना आरक्षणाचे तत्व लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. या शासन निर्णयास श्री.विजय घोगरे व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.८४५२/२००४ दाखल करुन आव्हान दिले होते. या याचिकेच्या संदर्भात दिनांक ७/२/२००५ रोजी सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालयाने "जैसे थे" ठेवण्याचे आदेश दिले होते. या आदेशाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ वरील दिनांक १४/२/२००५ च्या शासन निर्णयान्वये दिनांक २५ मे, २००४ च्या शासन निर्णयामुळे होणा-या पदोन्नतीच्या कार्यवाहीस पुढील आदेश होईपर्यंत "जैसे थे" परिस्थिती ठेवावी असे आदेश दिले होते. तद्नंतर दिनांक २२/२/२००५ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २५ मे, २००४ च्या शासन निर्णयाची पुढील आदेश होईपर्यंत अंमलबजावणी न करण्याबाबतचे स्थगिती आदेश दिलेले होते. तसेच दिनांक २०/४/२००५ रोजी मा. उच्च न्यायालयाने हे स्थगिती आदेश कायम ठेवले होते. या स्थगिती आदेशांच्या अनुषंगाने पदोन्नतीमध्ये येणा-या अडचणींच्या पार्श्वभूमीवर शासनाने "सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१७८३ /२००६ (इन रीट पिटीशन क्र.८४५२/२००४)" दाखल केले होते. या सिव्हील ॲप्लीकेशनच्या अनुषंगाने दिनांक १७ ऑगस्ट, २००६ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाने खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

> " In view of the above, we permit the applicant.. State of Maharashtra to fill in all promotional posts by suitable candidate. However, while filling up the said promotional posts, it shall be made apparently clear to the appointee that the said promotion is subject to final result in the above writ petition and said appointment will no way create any right."

**शासन निर्णय :-**

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे वरील आदेश पहाता, यापूर्वी वर नमूद केलेले दिनांक १४/२/२००५ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय / निमशासकीय इत्यादी कार्यालयांच्या निदर्शनास सदर आदेश आणून देण्यात यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००६०८२४१५३५०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**गो. आ. लोखंडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**महाराष्ट्र शासन**

**क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ३२**
**दूरध्वनी क्र.२२०२५१७७**
**दिनांक : ३.१०.२००६**

प्रति,

अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय :- पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करणेबाबत.**

**संदर्भ :** १) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २५/५/२००४.
२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक १४/२/२००५.
३) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००४/प्र.क्र.११८/०४/१६-ब दिनांक १४/७/२००५.
४) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २४/८/२००६.
५) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २४/८/२००६.

**महोदय / महोदया,**

मा. उच्च न्यायालयातील सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१७८३/२००६ (इन रीट पिटीशन क्र.८४५२/२००४) च्या संदर्भात दिनांक १७ ऑगस्ट २००६ रोजी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र.५ वरील दिनांक २४/८/२००६ च्या शासन पत्रान्वये या विभागाच्या दिनांक २५ मे, २००४ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीची कार्यवाही सुरु ठेवण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

२. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक १७/८/२००६ च्या आदेशांच्या व दिनांक१९/९/२००६ च्या आदेशांच्या (सिव्हील ॲप्लीकेशन क्र.२२८३/२००६ मधील) विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या Special Leave to Appeal (Civil) No.(s) १६४८५/२००६ च्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"**Taken on board.**

**Operation of the impugned order is stayed in the matter comes up for preliminary hearing on 16th October, 2006.**"

**३.** मा.सर्वोच्च न्यायालयाचे वरील आदेश पहाता संदर्भ क्र.५ वरील दिनांक २४/८/२००६ च्या पत्रानुसार पदोन्नतीसंदर्भात करावयाची कार्यवाही पुढील आदेश होईपर्यंत स्थगित ठेवण्यात यावी.

४. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय /निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन पत्रानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

आपला,

**गो.आ.लोखंडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन**

**क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ३२**
**दूरध्वनी क्र.२२०२५१७७**
**दिनांक : १०/११/२००६**

प्रति,

अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय :- पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करणेबाबत.**

**संदर्भ :**
१) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २५/५/२००४,
२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक १४/२/२००५,
३) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००४/१८८७/प्र.क्र.११८/०४/१६-ब दिनांक १४/७/२००५.
४) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २४/८/२००६,
५) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २४/८/२००६
६) शासन पत्र क्रमांक.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक ३/१०/२००६

**महोदय / महोदया,**

मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या Special Leave to Appeal (Civil) No (s) १६४८५/२००६ च्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २७ सप्टेंबर, २००६ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन पदोन्नतीसंदर्भात करावयाची कार्यवाही पुढील आदेश होईपर्यंत स्थगित ठेवण्यात यावी असे आदेश संदर्भ क्रमांक-६ वरील दिनांक ३ ऑक्टोबर, २००६ च्या पत्रान्वये देण्यात आलेले आहेत.

२. सद्य:स्थितीत मा.सर्वोच्च न्यायालयाने Special Leave to Appeal (Civil) No (s) १६४८५/२००६ च्या अनुषंगाने दिनांक ६.११.२००६ रोजी झालेल्या सुनावणीत मा.उच्च न्यायालयातील प्रकरणावर निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील त्याचबरोबर अनुसूचित जाती / अनुसूचित जामती/इतर मागासवर्ग यांच्या पदोन्नत्या संदर्भात **"जैसे थे"** ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. सदरहू मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत यासोबत जोडण्यात येत आहे.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व पदोन्नत्यासंदर्भातील कार्यवाही पुढील आदेश होईपर्यंत **"जैसे थे "** ठेवण्यात यावी.

४. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन पत्रानुसार आवश्यत ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

आपला,

**त्रि.वा.गेडाम**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन**

**क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.३४/०१/१६-ब,**

**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ३२**
**दूरध्वनी क्र.२२०२५१७७**
**दिनांक : १३/३/२००७**

प्रति,

अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय : पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करणेबाबत.**

**संदर्भ :**
१) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २५/५/२००४.
२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक १४/२/२००५.
३) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००४/प्र.क्र.११८/०४/१६-ब दिनांक १४/७/२००५.
४) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २४/८/२००६.
५) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २४/८/२००६.
६) शासन पत्र क्रमांक.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक ३/१०/२००६.
७) शासन पत्र क्रमांक.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक १०/११/२००६.

**महोदय / महोदया,**

मा.सर्वोच्च न्यायालयाने Special Leave to Appeal (Civil) No (s) १६४८५/२००६ च्या अनुषंगाने दिनांक ६/११/२००६ रोजी मा.उच्च न्यायालयातील प्रकरणावर निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील त्याचबरोबर अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्ग यांच्या पदोन्नत्या संदर्भात **"जैसे थे"** ठेवण्याचे आदेश दिलेले होते. सदर आदेशास अनुसरुन सर्व पदोन्नत्या संदर्भातील कार्यवाही पुढील आदेश होईपर्यंत **"जैसे थे"** ठेवण्यात यावी असे आदेश संदर्भ क्र.७ वरील दिनांक १०/११/२००६ च्या पत्रान्वये दिलेले होते.

२. मा.सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक ६/११/२००६ च्या आदेशानुसार अर्जदाराला दिनांक ६/११/२००६ पासून म्हणजेच आदेशाच्या दिनांकापासून दोन आठवडयाच्या आत मा.उच्च न्यायालयात सुधारीत अर्ज दाखल करण्याचेही निर्देश दिलेले होते. त्यानुसार अर्जदारांनी मा.उच्च न्यायालयात Civil Application क्रमांक १३४/२००७ (इन रिट पिटीशन क्रमांक ८४५२/०४) दाखल केलेले होते. मा.उच्च न्यायालयाने या विषयाच्या

अनुषंगाने प्रलंबित असलेल्या Civil Application क्र.३१३०/२००६, क्र.१७८३/०६ व २२८३/०६ आणि क्र.१३४/२००७ (Writ Pitition क्रमांक ८४५२/०४) वर एकत्रित सुनावणी घेऊन दिनांक ९/३/२००७ रोजी खालीलप्रमाणे आदेश देऊन सदरहू Civil Applications निकालात काढलेले आहेत.

(अ) It is clarified that the promotions that we have permitted to be made by this order are only in relation to the State Government employees and on similar lines establishments of the instrumentalitics of the State, which are covered by Article 12 of the Constitution of India could also be permitted to effect promotion and this order does not apply to other establishments, which are covered by the definition of Establishment in Section 2 of the Act. To that extent the status quo shall be maintained.

(ब) We accordingly permit the State Government to fill up the promotional posts to the extent of 67% from the open category, 13% from Scheduled Caste and 7% from Scheduled Tribe Category. So far as 20% of Scheduled Caste and Scheduled Tribe post are concerned, the creamy layer concept shall not be made applicable. The balance 13% seats however, shall be kept vacant pending the hearing and final disposal of the writ petition. It is clarified that this arrangement is made subject to the result of the petition. Civil Applications are disposed of the above terms.

३. मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेश लक्षांत घेता आता खुल्या प्रगर्वाची ६७%, अनुसूचित जाती प्रवर्गाची १३%, व अनुसूचित जमाती प्रवर्गाची ७% याप्रमाणे पदोन्तीची पदे भरण्यात यावीत. उर्वरित विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची ११% व विशेष मागास प्रवर्गाची २% अशा एकूण १३% आरक्षणाची पदे याचिका क्र.८४५२/०४ निकाली निघेपर्यंत रिक्त ठेवण्यात यावीत.

४. उपरोक्त सर्व पदोन्नत्या या मूळ याचिका क्रमांक ८४५२/०४ च्या निर्णयाच्या अधीन राहून कराव्यात व पदोन्नतीच्या आदेशामध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

५. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना वरील परिच्छेद २ (अ) मध्ये दिलेल्या निर्देशांच्या अधिन राहून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

६. सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००७०३१३१६०७३८००१ असा आहे.

**आपला,**

**गो.आ.लोखंडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन**

**क्र.बीसीसी/१२०७/प्र.क्र.१४६/०७/१६-ब,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ३२**
**दिनांक : ७ जुलै २००७**

प्रति,

सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय :- पदोन्नतीचे परिपूर्ण प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग /का १६-ब ला पाठविणेबाबत.**

**महोदय,**

आपल्या विभागाकडून गट-अ व गट-ब च्या पदांचे पदोन्नतीचे प्रस्ताव मागासवर्गाचे आरक्षण, टक्केवारी तपासणी करण्यासाठी पाठविले जातात. टक्केवारीनुसार आरक्षण भरलेले आहे किंवा नाही अथवा मागासवर्ग अधिकारी / कर्मचारी यांच्यावर पदोन्नतीसंदर्भात अन्याय झाला आहे किंवा कसे याबाबत या विभागाकडून प्रस्ताव तपासला जातो.

२. काही विभागाकडून येणा-या प्रस्तावांची छाननी करताना असे निदर्शनास आलेले आहे की, प्रस्तावांमध्ये त्रुटी असतात. विभागाच्या प्रस्तावामध्ये दर्शविलेली मंजूर पदे व त्यांचेवरचे आरक्षण हे प्रचलित नियमांवर आधारित नसते. त्यामुळे विभागाच्या निवडसूचीला मान्यता देताना अडचणी येतात.

३. (अ) ज्या पदावरुन व ज्या पदावर पदोन्नती द्यावयाची आहे त्या दोन्ही पदांची वेतनश्रेणी व गट अ/ब नमूद करावेत.

(ब) तरी भविष्यात खालील सूचनांप्रमाणे प्रस्ताव सादर करावेत. गट अ पदावर पदोन्नती देण्याचे प्रस्ताव सादर करताना खाली दर्शविलेल्या तक्त्यामध्ये मंजूर पदे व त्यावर आरक्षण दर्शविण्यात यावे.

| **अ.क्र.** | **प्रवर्गाचे नाव** | **आरक्षण टक्केवारी** | **टक्केवारी नुसार भरावयाची आवश्यक पदे** | **प्रत्यक्षात भरलेली पदे** | **रिक्त पदे** | **संभाव्य रिक्त होणारी पदे** | **भरावयाची पदे** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३% | | | | | |
| २ | अनुसूचित जमाती | ७% | | | | | |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३% | | | | | |
| ४ | भटक्या जमाती (ब) | २.५% | | | | | |
| ५ | भटक्या जमाती (क) | ३.५% | | | | | |
| ६ | भटक्या जमाती (ड) | २% | | | | | |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | २% | | | | | |
| ८ | सर्वसाधारण खुला | ६७% | | | | | |
| | **एकूण** | **१००%** | | | | | |

(क) गट ''अ'' पदावरुन वरिष्ठ गट ''अ'' पदावर पदोन्नती देताना दिनांक २५/५/२००४ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे दिनांक २९/१/२००४ रोजी रिक्त असलेल्या पदांवर आरक्षण काढून प्रस्ताव सादर करावेत.

(ड) विशेष मागास प्रवर्गातील ज्या उमेदवारांना या विभागाच्या शासन निर्णय क्र.बीसीसी/१०९४/प्र.क्र.६८/९४/१६ ब, दिनांक १५ जून, १९९५ च्या शासन निर्णयानुसार सेवेत संरक्षण प्राप्त झाले असेल अशा उमेदवारांची सेवाज्येष्ठता या विभागाच्या शासन निर्णय क्रमांक :बीसीसी/२००४/प्र.क्र.४५/०४/१६ ब, दिनांक २४ जून, २००४ च्या शासन निर्णयानुसार दिनांक १५ जून,१९९५ अशी विचारात घेवून पदोन्नतीचे प्रस्ताव पाठविले असल्याची धारणा पक्की करावी. तसेच ज्या बिगर आदिवासी उमेदवारांनी अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५ जून, १९९५ च्या पूर्वी शासकीय व निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविली आहे अशा उमेदवारांना या विभागाच्या शासन निर्णय क्रमांक :बीसीसी/२००२/प्र.क्र.९३/०४/१६ ब, दिनांक ३०/६/२००४ च्या शासन निर्णयान्वये संरक्षण दिलेले असून, अशा उमेदवारांचे पदोन्नतीचे प्रस्ताव पाठवितांना ते ज्या घटकाचे आहेत त्या घटकात दाखविण्यात येऊन याच शासन निर्णयातील तरतुदीनुसार त्यांची सेवाज्येष्ठता दिनांक १५ जून, १९९५ अशी विचारात घेऊन प्रस्ताव पाठविले आहेत, ही धारणा पक्की करावी.

(इ) पदोन्नतीसाठी प्रस्ताविलेल्या अधिका-यांची जेष्ठता सूचीतील क्रमांक इ. बाबीही स्पष्टपणे नमूद करण्यात याव्यात.

वरील बाबी विचारात घेऊन विभागानी कृपया परिपूर्ण पदोन्नतीचे प्रस्ताव पाठवावेत, अशी विनंती करण्यात येत आहे.

आपला

**गो.आ.लोखंडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन**

**क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ३२**
**दूरध्वनी क्र.२२०२५१७७**
**दिनांक : १/४/२००८.**

प्रति,

अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय :- पदोन्नतीतील - आरक्षण दिनांक २५ मे,२००४च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत..**

**संदर्भ :** १) मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ९.३.२००७ चे आदेश.
२) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक १३/०३/२००७.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ९/३/२००७ च्या आदेशामध्ये मुख्य याचिका क्रमांक ८४५२/२००४ अंतीम निकालात निघेपर्यंत विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेली १३% पदे पदोन्नतीने भरण्यास स्थगिती दिली होती. ही स्थगिती उठविण्यासाठी शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये Petition for Special Leave Appeal (Civil) No.(s) १८५३४-१८५३७/२००७ दाखल केले होते. सदरहू एसएलपी वर सर्वोच्च न्यायालयामध्ये दिनांक २८/३/२००८ रोजी सुनावणी झाली असून न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

"The High Court by the impugned order has directed the State Government no to fill the promotional posts to an extent of 13% which are earmarked for VJNT de-notified tribes, nomadic tribes and special backward classes. The impugned order is modified to the extent that the State Government may also fill the post in respect of the said 13% from VJNT candidates, subject to the final decision of the pending writ petition before the High Court. The special leave petitions are disposed of accordingly."

3. मा.सर्वोच्च न्यायालयाचे वरील आदेश लक्षात घेता आता विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची ११% व विशेष मागास प्रवर्गाची २% आरक्षणाची पदे पदोन्तीने भरण्याबाबतची कार्यवाही मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक ८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात यावी.

४. सर्व पदोन्नत्या हया मूळ याचिका क्र.८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून कराव्यात व पदोन्नतीच्या आदेशामध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

५. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन पत्रानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

६. सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००८०४०११७५५४०००१ असा आहे.

आपला

**गो.आ.लोखंडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**छोट्या संवर्गामध्ये मागास प्रवर्गांची आरक्षणाची पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-२००८/प्र.क्र.४०७/०८/१६-ब

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २७ ऑक्टोबर, २००८

**संदर्भ :** १) परिपत्रक क्र. बीसीसी १०७९/१५५/१६-ब, दिनांक १९ डिसेंबर, १९७९.

२) शासन निर्णय क्र, बीसीसी १०९४/सीआर ५७/९४/१६-ब, दिनांक ५ डिसेंबर, १९९४.

३) महाराष्ट्र आरक्षण कायदा क्रमांक ८/२००४.

४) शासन निर्णय, क्रमांक : बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २५ मे, २००४.

५) शासन निर्णय, क्रमांक : बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २६ ऑक्टोबर, २००४.

**परिपत्रक**

मागासवर्गीयांच्या बाबतीत शासकीय सेवेतील आरक्षणाबाबतचे धोरण राबवित असताना सर्व मागासवर्गीय घटकांना त्यांचेसाठी निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे, याची अंमलबजावणी करण्यासाठी ह्या विभागाने वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत. छोट्या संवर्गाच्या बाबतीत पदोन्नतीमधील आरक्षण निश्चित करताना ३३ टक्के मर्यादेचे पालन करावयाचे असल्याने सर्वच मागास घटकांना प्रतिनिधीत्व मिळत नाही. यामुळे पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ सर्व प्रवर्गांना होत नाही असे आढळून आल्यामुळे ह्या विभागाने संदर्भ क्रमांक १ च्या परिपत्रकान्वये छोट्या संवर्गामध्ये मागासवर्गीयांची आरक्षणाची पदे बिंदू नामावलीच्या क्रमानुसार आळीपाळीने (by rotation) भरावीत अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. सेवेतील आरक्षणाच्या धोरणाची अंमलबजावणी करीत असताना मागास प्रवर्गातील एखाद्या घटकाचा उमेदवार उपलब्ध होत नसल्यास कोणती कार्यवाही करावी याविषयाची सर्वसाधारण सूचना ह्या विभागाच्या संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. आरक्षण कायदा-२००४ ची राज्यामध्ये अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर पदोन्नतीमध्ये वर्ग-१ च्या पुढील सर्व टप्प्यावर नव्याने आरक्षणाची अंमलबजावणी कशारितीने करावी याविषयीच्या सविस्तर सूचना संदर्भ क्रमांक ५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच छोट्या संवर्गाच्या बाबतीत पदोन्नतीमध्ये आरक्षणाचे धोरण राबविताना कशाप्रकारे कार्यवाही करावी याविषयी ह्या शासन निर्णयातील परिच्छेद-४ मध्ये स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. असे असतानाही ह्या विभागाकडे "छोट्या संवर्गाबाबत पदोन्नतीमध्ये आरक्षणाची अंमलबजावणी करीत असताना, एखाद्या मागास घटकाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास बिंदू नामावलीच्या क्रमानुसार पुढच्या बिंदूचा वापर करावयाचा की, दिनांक ५.१२.१९९४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार हे पद तात्पुरते अनारक्षित करुन सेवाजेष्ठतेने भरावे" याबाबत वारंवार विचारणा करण्यात येत आहे.

२. या अनुषंगाने आता असे आदेश देण्यात येत आहेत की, संदर्भ क्रमांक ५ येथील शासन निर्णयाच्या परिच्छेद-४ मध्ये नमूद केल्यानुसार ज्या संवर्गामध्ये एकूण मंजूर पदसंख्या ३२ पेक्षा कमी असेल त्या संवर्गामध्ये ३३

टक्के आरक्षणाची मर्यादा पाळत असताना काही मागास प्रवर्गांना एकही पद मिळणार नाही म्हणून याबाबत ३३ टक्के आरक्षणाप्रमाणे येणारी पदे प्रवर्गासाठी विहित केलेल्या आरक्षण टक्केवारीच्या मर्यादेत व बिंदू नामावलीच्या क्रमानुसार प्रथम अनुसूचित जाती तदनंतर अनुसूचित जमाती याप्रमाणे विमुक्त जाती / भटक्या जमाती व शेवटी विशेष मागास प्रवर्ग या क्रमाने पदे भरावयाची आहेत. असे करीत असताना जर एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार पदोन्नतीस उपलब्ध होत नसल्यास त्या पुढच्या प्रवर्गाच्या बिंदू क्रमांकाचा पदोन्नतीसाठी वापर करावयाचा आहे. अशाप्रकारे आरक्षणाच्या टक्केवारीच्या मर्यादेत, बिंदू नामावलीच्या क्रमवारीनुसार त्या त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे जर पद भरता येत नसेल तर क्रमवारीनुसार पुढील प्रवर्गाच्या आरक्षण बिंदूचा वापर करण्यात यावा. यापध्दतीने भरलेला बिंदू रिक्त झाल्यानंतर पुढील बिंदूचा वापर करण्यापूर्वी क्रमवारीनूसार यापूर्वी उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे ज्या प्रवर्गाचा बिंदू रिक्त राहिला होता तो प्रथम भरण्यात यावा, असे करुन देखील सदर प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होत नसेल तरच पुढील प्रवर्गाचा बिंदू वापरावा. अशा प्रकरणी ह्या विभागाच्या दिनांक ५.१२.१९९४ च्या शासन निर्णयान्वये कार्यवाही करावयाची नसून ज्यावेळी कोणत्याही मागास प्रवर्गाचा कोणताही उमेदवार पदोन्नतीसाठी उपलब्ध होत नसेल त्यावेळी मात्र दिनांक ५.१२.१९९४ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार कार्यवाही करावयाची आहे.

सदरहू सूचना मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व शासकीय, निमशासकीय सेवा, मंडळे, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, अनुदानित शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादी कार्यालयांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदरहू परिपत्रक शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक क्रमांक २००८१०२७१३४२३३००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**गो.आ.लोखंडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**गट अ व गट ब (राजपत्रित) पदांवर पदोन्नतीसाठीच्या निवडसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याच्या कार्यपध्दतीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०११

**वाचा :-** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-२००५/प्र.क्र.५/०५/१२, दिनांक २६.६.२००६.

**<u>शासन परिपत्रक</u>**

प्रचलित कार्यपध्दतीनुसार शासन सेवेतील गट-अ मधील (असुधारित वे.श्रे.रु.१२०००-१६५०० व त्यापेक्षा कमी दर्जाच्या) आणि गट-ब (राजपत्रित) मधील पदांवर पदोन्नतीसाठीच्या निवडसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग कार्या.१२ व कार्या.१६-ब कडून तपासण्यात येतात. असे प्रस्ताव ब-याच वेळेस प्रशासकीय विभागाकडून योग्य प्रकारे सादर केले जात नसल्याचे व प्रस्तावासोबत आवश्यक कागदपत्रे सादर केली नसल्याचे आढळून येते. संबंधित मुद्यांच्या पूर्ततेसाठी व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करण्याकरिता नस्ती प्रशासकीय विभागास परत करावी लागते. तसेच असे प्रस्ताव प्रथम कार्या.१२ कडून तपासून आरक्षणासंदर्भात कार्या.१६-ब कडे पाठविण्यात येतात. तथापि संबंधित निवडसूचीतील पदांचे आरक्षण विभागाने योग्य प्रकारे केले नसल्यास आरक्षणासंबंधीच्या मुद्यांची पूर्तता करण्यासाठी कार्या.१६-ब कडून प्रस्तावा विभागास परत करण्यात येतो. तसेच विभागाने नमूद केलेल्या आरक्षरणामध्ये बदल झाल्यास त्यामुळे निवडसूचीतही बदल संभवतो. अशा परिस्थितीत निवडसूची योग्यप्रकारे अंतिम होण्यासाठी प्रस्ताव कार्या.१२ कडून पुन्हा तपासणे आवश्यक ठरते. सबब निवडसूचीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागात दोन कार्यासनांमध्ये वारंवार तपासावा लागतो. परिणामी निवडसूची अंतिम होण्यास व पदोन्नतीने पदे भरण्यामध्ये जास्त कालावधी लागतो.

२. वरीलप्रमाणे परिस्थिती उद्‌भवू नये व निवडसूचीचे प्रस्ताव लवकरात लवकर कार्या.१२ कडून तसेच कार्या.१६-ब कडून (प्रत्येकी) शक्यतो १० (कार्यालयीन कामकाजाच्या) दिवसाच्या कालावधीत अंतिम व्हावेत या दृष्टीने कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

(१) निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूचीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागीय पदोन्नती समितीच्या (निवडसमितीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तात या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट "अ" मधील सर्व बाबींचा तपशील नमूद करण्यात यावा. या आदेशापूर्वी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या अनुषंगाने या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट "अ" मधील सर्व बाबींचा तपशील बैठकीच्या कार्यवृत्तात नमूद केला नसल्यास सदर तपशील स्वतंत्र प्रपत्रात सादर करण्यात यावा.

(२) निवडसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास मान्यतेसाठी पाठविताना या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट "ब" मधील सर्व कागदपत्रे सादर करण्यात यावी.

(३) आरक्षणासंदर्भात कार्या.१६-ब ने वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार आवश्यक कागदपत्रे, तपशील सादर करण्यात यावा.

(४) निवडसूचीसाठी उपलब्ध पदांचे आरक्षण तपासण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीपूर्वीच बिंदूनामावलीसह प्रस्ताव प्रथम सामान्य प्रशासन विभाग/कार्या.१६-ब कडे सादर करण्यात यावा. कार्या.१६-ब कडून आरक्षण प्रमाणित करुन झाल्यानंतर विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात यावी. कार्या.१६-ब ने प्रमाणित केलेले आरक्षण व अन्य आवश्यक बाबी विचारात घेऊन निवडसूची /तदर्थ पदोन्नतीसूची तयार करण्यात यावी. विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशी लक्षांत घेऊन निवडसूची /तदर्थ पदोन्नतीसूचीस मान्यतेचा प्रस्ताव कार्या.१२ कडे सादर करण्यात यावा. कार्या.१२ कडून प्रस्ताव तपासून तो विभागास परत करण्यात येईल. मात्र आरक्षणाबाबत काही विशिष्ट मुद्दा उपस्थित होत असल्यासच त्यासंदर्भात अथवा मागासवर्गीय अधिकारी / कर्मचा-याचे गोपनीय अहवालानुसार अधिक्रमण होत असल्यास (अपात्र होत असल्यास) त्याअनुषंगाने प्रस्ताव कार्या.१६-ब कडे पाठविण्यात येईल.

(५) तदर्थ पदोन्नतीसूचीसाठी (नामनिर्देशनाच्या कोटयातील पदांवर तदर्थ स्वरुपात पदोन्नती द्यावयाची असल्यास) सदर पदांकरिता आयोगाकडे मागणीपत्र सादर केल्याचा तपशिल यामध्ये किती पदांकरिता, केंव्हा मागणीपत्र पाठविले, मागणीपत्रात आयोगाने त्रुटी काढल्या आहेत काय ? आयोगाने जाहिरात दिली आहे काय ? मागणीपत्राबाबत आयोगाकडून झालेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती, आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होण्यास अपेक्षित कालावधी याचा समावेश असावा.

(६) प्रस्ताव सादर करताना पूर्वीच्या निवडसूचीस आयोगाची मान्यता घेतली आहे वा कसे त्याचा उल्लेख करुन मागील निवडसूचीच्या प्रस्तावावर सा.प्र.वि. ने काही विशिष्ट बाबींची पूर्तता करण्याचे अभिप्राय दिले असल्यास त्यानुसार पूर्तता करुन प्रस्ताव सादर करावा.

३. सर्व प्रशासकीय विभागांनी या निदेशांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच त्यांच्या अधिपत्याखालील ज्या विभागप्रमुखांकडून निवडसूचीचे प्रस्ताव सादर होत असतील त्या विभागप्रमुखांना या निदेशांचे पालन करण्याबाबत कळविण्यात यावे. यानुसार विभागप्रमुखांनी प्रस्ताव योग्यप्रकारे सादर केला आहे काय हे प्रशासकीय विभागाने तपासणे आवश्यक राहील. या परिपत्रकातील निदेशानुसार व सोबतच्या परिशिष्ट ''अ'' व ''ब'' नुसार पूर्तता केली नसल्यास निवडसूचीचा प्रस्ताव तपासण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध केले असून त्याचा संगणक संकेतांक २०११०२२४१८४६३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्री.प्र.पाटील**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२, दि. २४ फेब्रुवारी २०११ सोबतचे**

**परिशिष्ट "अ"**

(विभागीय पदोन्नती समितीच्या / निवडसमितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तात नमूद करावयाच्या बाबी)

१) मंजूर आकृतीबंधानुसार संबंधित संवर्गाची मंजूर पदसंख्या आणि आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर पदसंख्येत वाढ किंवा घट झाली असल्यास त्याची माहिती.

२) पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी (वेतनबँड व ग्रेड पे) व गट

३) ज्या पदावरुन पदोन्नती द्यावयाची आहे त्या पदाचे पदनाम व वेतनश्रेणी (वेतनबँड व ग्रेड पे).

४) सेवा प्रवेश नियमानुसार भरतीचे मार्ग (पदोन्नती, नामनिर्देशन, इ.) व त्याचे प्रमाण तसेच पदोन्नतीकरिता एका पेक्षा अधिक निम्न संवर्ग असल्यास त्या संवर्गातून पदोन्नतीकरिता प्रमाण.

५) निवडसूचीचे वर्ष (सर्वसाधारणपणे १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट)

६) मंजूर पदसंख्येनुसार पदोन्नती कोटयात येणारी पदे व त्यापैकी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकास रिक्त असलेली व निवडसूची वर्षातील संभाव्य रिक्त पदे. (कोणत्या दिनांकापर्यंतची संभाव्य रिक्त पदे विचारात घेतली आहेत ते नमूद करावे.)

७) सेवा प्रवेश नियमात पदोन्नतीकरिता विहित केलेल्या निम्न संवर्गात नियमित सेवेचा निकष अथवा सेवा प्रवेश नियमात याबाबत तरतूद नसल्यास सा.प्र.वि. च्या आदेशानुसार किमान ३ वर्षे नियमित सेवेचा निकष तसेच सेवाप्रवेश नियमात शैक्षणिक अर्हता विहित केली असल्यास सदर निकष पूर्ण करतात वा कसे.

८) आधीच्या वर्षामध्ये संबंधित संवर्गातील नामनिर्देशनाच्या (सरळसेवा) कोटयातील पदावर तदर्थ पदोन्नती दिली असल्यास, उपलब्ध प्रवर्गनिहाय पदांवर त्यांची पदोन्नती नियमित होण्यासाठी त्यांचा निवडसूचीत समावेशनाचा विचार केला आहे काय. (तदर्थ पदोन्नती दिली नसल्यास, तसे प्रमाणित करणे).

९) बिंदूनामावलीनूसार मागासवर्गीयांच्या प्रत्येक प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदांचा (अनुशेषासह) कार्यासन १६ ब ने प्रमाणित केलेला तपशील (आरक्षणाचा तपशील).

१०) ज्या पदावरुन पदोन्नती द्यावयाची आहे त्या संवर्गाची विचारात घेतलेली ज्येष्ठतासूची. (कोणत्या वर्षापर्यंतची आहे.)

११) पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील व निकष पूर्ण करणा-या अधिकारी / कर्मचा-यांची नांवे व ज्येष्ठताक्रमांक, विभागीय चौकशी सुरु असल्यास त्याचा, जातवैधता प्रमाणपत्र सादर केला आहे वा कसे याचा तपशील.

१२) अधिकारी / कर्मचा-यांचा निलंबन, शिक्षा वा अन्य कारणास्तव विचार झाला नसेल त्याबाबतचा तपशील, विभागीय चौकशीअंती शिक्षा दिली असल्यास शिक्षेचे स्वरुप, आदेशाचा दिनांक व शिक्षा सुरु होण्याचा दिनांक.

१३)	पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी यांच्या मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची विभागीय पदोन्नती समितीमधील अध्यक्ष व सदस्यांनी स्वतंत्रपणे (अथवा एकत्रित) केलेली प्रतवारी व सरासरी प्रतवारी व केलेली (पात्र /अपात्र) शिफारस याचे विवरणपत्र (यामध्ये अधिकारी / कर्मचारी यांची नांवे, त्यांचा प्रवर्ग, ज्येष्ठता क्रमांक, पदोन्नतीसाठी पात्रता इ. तपशिल) तसेच मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी गोपनीय अहवालाची प्रतवारी धारण करत नसल्यास अपात्र ठरविताना त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन तसा विचार केल्याचे नमूद करावे. तसेच गोपनीय अहवालानुसार अपात्र ठरविलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे /पदोन्नतीच्या पात्रतेपर्यंत न येणारे शेरे कळविले असल्याचे नमूद करावे.

१४)	समितीने शिफारस केलेली निवडसूची /तदर्थ पदोन्नतीसूची. (निवडसूची / तदर्थ पदोन्नतीसूची करिता वरील अ.क्र.६ नुसार उपलब्ध पदांच्या मर्यादेत निवडसूची / तदर्थ पदोन्नतीसूची असावी). निवडसूची / तदर्थ पदोन्नतीसूची यामध्ये अधिकारी / कर्मचा-यांची नांवे, ज्येष्ठता क्रमांक, प्रवर्ग तसेच एकापेक्षा अधिक संवर्गातील अधिकारी / कमचारी असल्यास त्यांचे पद याचा उल्लेख करावा. तसेच निवडसूची / तदर्थ पदोन्नतीसूची आपसातील ज्येष्ठताक्रमानुसार आहे याची दक्षता घ्यावी.

**१५)	शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ८.६.२०१० नुसार सबंधित संवर्गास विभागीय संवर्ग वाटप नियमावली लागू आहे वा कसे ते नमूद करावे व ही नियमावली लागू असल्यास विभागीय संवर्गनिहाय रिक्त पदांची विगतवारी नमूद करावी.**

**शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२, दि. २४ फेब्रुवारी २०११ सोबतचे**

## परिशिष्ट "ब"

## (निवडसूची /तदर्थ पदोन्नतीसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करताना सोबत सादर करावयाचे कागदपत्र)

१) सेवा प्रवेश नियमाची प्रत, त्यामध्ये सुधारणा केली असल्यास त्याची प्रत.

२) ज्या पदावरुन पदोन्नती द्यावयाची आहे त्या संवर्गाची प्रसिध्द केलेली अद्ययावत ज्येष्ठतासूची. ही ज्येष्ठतासूची योग्य असल्याचे संबंधित सचिव व सह सचिव / उपसचिव यांनी प्रमाणित करणे. या ज्येष्ठसूचीतील जे अधिकारी / कर्मचार पूर्वीच सेवानिवृत्त, पदोन्नत, निधन झाले असतील वा राजीनामा दिला आहे, त्याची नोंद करणे तसेच ज्येष्ठतासूचीसंदर्भात न्यायालयीन प्रकरण सुरु असल्यास त्याची सद्यस्थिती नमूद करणे.

३) विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीचे अध्यक्ष व सर्व सदस्यांनी स्वाक्षरीत केलेले कार्यवृत्त.

४) विभागीय पदोन्नती समितीने अपात्र ठरविलेल्या अधिकारी / कर्मचा-यांची गोपनीय अहवाल नस्ती. संबंधितांना प्रतिकूल शेरे अथवा पदोन्नतीच्या पात्रतेपर्यंत न येणारे शेरे कळविल्याची नस्तीमधील ज्ञापने ठेवण्यात यावीत.

५) पदोन्नती नाकारल्याने पदोन्नतीसाठी विचार न झालेल्या अधिकारी / कर्मचा-यांचा त्यासंबंधीचा अर्ज. पदोन्नती कायमस्वरुपी नाकारली किंवा किती कालावधीकरिता नाकारली याचा स्पष्ट उल्लेख अर्जात असावा. याबाबत उल्लेख नसल्यास ते स्पष्ट करुन घ्यावे.

**मागासवर्गीयांकरिता पदोन्नतीसाठी**
**छोटया संवर्गातील आरक्षित पदे -**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.१०५६/२०११/१६-ब,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : ५ जानेवारी, २०१२.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी-१०९४/सीआर ५७/९४/१६-ब, दिनांक ५ डिसेंबर, १९९४.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क. २/९७/१६-ब, दिनांक २९ मार्च, १९९७.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क. ६३/९७/१६-ब, दिनांक १८ ऑक्टोंबर, १९९७.
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी-२००८/प्र.क. ४०७/०८/ १६-ब, दिनांक २७ ऑक्टोंबर, २००८.

**शासन निर्णय :-**

याचिका क्र. ३०७७/२०११ मागासवर्ग कर्मचारी / अधिकारी सुरक्षा महासंघ विरुध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२९ सप्टेंबर २०११ रोजी दिलेल्या आदेशान्वये वरील संदर्भ क्र.४ येथील शासन परिपत्रक दि.२७.१०.२००८ मधील आदेशास अंतरिम स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे **दि.२७.१०.२००८ च्या शासन परिपत्रकाची अंमलबजावणी पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.**

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिनस्त कार्यालयांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणावा.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१२०१०५०९४६४७१४७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**दि.रा.डिंगळे**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**

**क्र.बीसीसी-२०१२/प्र.क्र.१०२५/१६-ब,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड**
**मंत्रालय, मुंबई-४०० ३२,**
**दिनांक : ३०.११.२०१२.**

प्रति,

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय :- पदोन्नतीचे प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**महोदय,**

राज्य शासनातील गट-अ व गट-ब या संवर्गातील पदोन्नत्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत देण्यात येतात. त्यासाठी प्रशासकीय विभागाने आरक्षणाच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १६-ब व निवडसूचीच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१२ अथवा आस्थापना मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

पदोन्नतीचे प्रस्ताव कशा पध्दतीने सामान्य प्रशासन विभागास सादर करावेत, याविषयीच्या सविस्तर सूचना या विभागाच्या क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२, दि.२४.२.२०११ च्या परिपत्रकान्वये दिल्या आहेत. त्याप्रमाणे विभागाकडून सादर होणा-या प्रस्तावांमध्येही ज्या कागदपत्रांची आवश्यकता आहे ते स्पष्ट केले आहे. तरीही विभागाकडून सादर होणारे प्रस्ताव परिपूर्ण असल्याचे दिसून येत नाही. त्याकरिता सर्व प्रशासकीय विभागांनी खालीलप्रमाणे प्रस्तावाची तपासणी करुन सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १६-ब यांना आरक्षण तपासणीसाठी प्रस्ताव सादर करावेत.

१) सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२, दि.२४.२.२०११ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे पदोन्नतीचा प्रस्ताव तयार करण्यात यावा.

२) विभागाच्या प्रस्तावासोबत त्यांच्या प्रस्तावाची माहिती दिल्यानंतर सोबतच्या नमुन्यात माहिती देणा-या टिप्पणीचा समावेश विभागाने त्यांच्या प्रस्तावाच्या टिप्पणीत करावा.

३) पदोन्नतीचा प्रस्ताव सादर करताना,

    १) सेवा प्रवेश नियम (भरतीचे प्रमाण व अर्हता स्पष्ट करावी.)

    २) मंजूर पदांचा आकृतिबंध (यामध्ये मंजूर पदे स्पष्टपणे कळून येतील असे पहावे. अनेक शासन निर्णयानुसार पदनिर्मिती झाली असल्यास त्याचा तक्ता (Table) दर्शविण्यात यावा.)

    ३) कनिष्ठ पदांची अद्यावत ज्येष्ठता यादी.

    ४) दिनांक १ सप्टेंबर रोजीची स्थिती दर्शविणारी प्रमाणित बिंदूनामावली - (उदा.दि.१.९.२०११ ते दि.३१.८.२०१२) व निवडसूचीकरिता दि.१.९.२०१२ ते ३१.८.२०१३ असे भरती वर्ष विचारात घ्यावे.

४)	बिंदूनामावली संगणकीकृत (Online) करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यास काही कालावधी लागणार आहे. सदर बिंदूनामावलीमध्ये विहित करण्यात आलेले रकाने सोबतच्या विवरणपत्र ''ब''मध्ये दर्शविण्यात येत आहेत. त्यानुसार प्रत्येक संवर्गाच्या बिंदूनामावलीतील रकाने सुधारीत करण्याची आवश्यकता आहे त्यामुळे यापुढे बिंदूनामावली लिहिताना ती विवरणपत्र ''ब''मध्ये दर्शविलेल्या रकान्यानुसार तपशिल नमूद करुन, लिहिण्याची कार्यवाही विभागाने करावी.

आपणांस विनंती करण्यात येते की, प्रस्तुत पत्रात नमूद केल्याप्रमाणे सोबतच्या नमुन्यातील टिप्पणीत दर्शविल्यानुसार आपण आपल्या विभागाचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत जेणेकरुन प्रस्तावांवी तपासणी करणे व आरक्षणाच्या दृष्टीने मान्यता देणे या विभागास सुलभ होईल.

**दि.रा.डिंगळे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सहपत्र -** १) टिप्पणीचा नमूना
२) विवरणपत्र-ब

-------------------------------- या पदावर पदोन्नती द्यावयाच्या प्रस्तावाचा तपशिल

१. पदोन्नती द्यावयाचे पद व वेतनश्रेणी - पदाचा गट-अ, गट-ब/गट-अ मधील पहिल्या अथवा त्यापुढील टप्प्याचे पद.

२. ज्या संवर्गातून पदोन्नती द्यावयाची आहे ते पद -..............................................

३. वरिष्ठ संवर्गाची मंजूर पदसंख्या - ..............................................................

४. सेवा भरतीचे प्रमाण -..........................................................................

५. पदोन्नतीच्या कोटयातील पदे - ....................................................................

....................................................................

६. प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदूनामावली सादर केली आहे काय ? ...............(दि.१ सप्टेंबरची दर्शविणारी)

७. अ) मंजूर सेवा प्रवेश नियम पृ. /प

ब) मंजूर पदांचा आकृतिबंध पृ. /प

क) कनिष्ठ संवर्गाची अद्यावत ज्येष्ठता यादी पृ. /प

८. **पदोन्नतीचा कोटा** - पदोन्नतीकरिता उपलब्ध असलेल्या पदांची सद्यःस्थिती पुढीलप्रमाणे राहील :-

| **अ.क्र.** | **प्रवर्गाचे नांव** | **आरक्षण टक्केवारी** | **आरक्षण टक्केवारी नुसार पदे** | **कार्यरत पदे** | **रिक्त पदे (अ.क्र.४-५)** | **संभाव्य रिक्त होणारी पदे** | **एकूण रिक्त पदे (अ.क्र.६+७)** | **समायोजना नंतर पदोन्नती करिता उपलब्ध पदे** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| १ | अ.जाती | १३ % | | | | | | |
| २ | अ.जमाती | ७ % | | | | | | |
| ३ | वि.जा.(अ) | ३ % | | | | | | |
| ४ | भ.ज.(ब) | २.५ % | | | | | | |
| ५ | भ.ज. (क) | ३.५ % | | | | | | |
| ६ | भ.ज. (ड) | २ % | | | | | | |
| ७ | वि.मा.प्र. | २ % | | | | | | |
| ८ | खुला | ६७ % | | | | | | |
| | **एकूण** | **१००%** | | | | | | |

**अ) दिनांक १ सप्टेंबर रोजी रिक्त असलेले बिंदू क्रमांक**

अ.जा. अ.ज. वि.जा.(अ) भ.ज.(ब)

भ.ज.(क) भ.ज.(ड) वि.मा.प्र. खुला

**ब) संभाव्य रिक्त पदांचे बिंदू क्रमांक**

अ.जा. अ.ज. वि.जा.(अ) भ.ज.(ब)

भ.ज.(क) भ.ज.(ड) वि.मा.प्र. खुला

पदसंख्या जास्त असल्यास वरील तपशील स्वतंत्र पानावर दर्शविण्यात यावा.

९(अ) कार्यरत असलेल्या व पदोन्नतीसाठी प्रस्तावित असलेल्या मागास प्रवर्गाच्या कर्मचारी /अधिका-यांची जाती प्रमाणपत्राची वैधता झाली आहे किंवा नाही.

(ब) अनुसूचित जमातीबाबत :- दिनांक १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या कर्मचा-यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यास व त्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत, त्या

प्रवर्गाचे जाती प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यास दि.१५.६.१९९५ व दि.३०.६.२००४ च्या शासन निर्णयानुसार त्यांच्या सेवेस संरक्षण प्राप्त झाले आहे, त्यानुसार अशा कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांची जात वैधता तपासली आहे व त्याप्रमाणे त्यांची सेवा ज्येष्ठता निश्चित केली आहे असे कर्मचारी / अधिकारी किती आहेत ज्यांचा पदोन्नतीच्या प्रस्तावात समावेश केला आहे त्याचा तपशिल प्रस्तावात देण्यात यावा.

क.अ.

अ.स.

उ.स.

**अ.मु.स./प्र.स./सचिव**
**(प्रशासकीय विभाग)**

## बिंदूनामावली नोंदवही - नमुना

| बिंदू क्रमांक | बिंदूच ा प्रवर्ग | बिंदूवरील कर्मचा-याचे नांव | कर्मचा-याचा स्वतःचा जातप्रवर्ग | सध्याच्या पदावरील नियुक्तीचा दिनांक | जन्म दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | जात प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | जात प्रमाणपत्र देणा-या प्राधिका-याचे पदनाम | जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | जात वैधता प्रमाणपत्र देणा-या समितीचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

## बिंदूनामावली लेखन व अद्यावतीकरणाबाबत सूचना

अ) प्रत्येक संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमातील सेवाभरतीच्या तरतूदीनुसार बिंदूनामावल्या ठेवताना सर्वसाधारणतः खालील तीन प्रकारच्या स्वतंत्र बिंदूनामावल्या ठेवण्याची आवश्यकता असते.

१. सरळसेवा - दि.२३.३.१९९७ च्या आदेशानुसार.
२. पदोन्नती - दि.१८.१०.१९९७ च्या आदेशानुसार (पूर्वीपासून आरक्षण असलेल्या पदांच्या बाबतीत) दि.२५.५.२००४ व दि.१८.१०.१९९७ च्या आदेशानुसार (ज्या पदांना नव्याने आरक्षण लागू झाले त्या पदांच्या बाबतीत)

३. सरळसेवेच्या कोटयातील पदांवरील तदर्थ पदोन्ती - दि.१८.१०.१९९७ च्या आदेशानुसार

ब) बिंदूनामावली बांधणी केलेल्या पुस्तिकेच्या / नोंदवहीच्या स्वरुपात ठेवण्यात यावी.

क) बिंदूनामावली दरवर्षी (पदोन्नतीसाठी १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट) लिहिण्यात यावी.

ड) प्रत्येक संवर्गाची बिंदूनामावली दि.५.११.२००९ च्या आदेशानुसार प्रमाणित करुन घेण्यात यावी.

इ) बिंदूनामावलीत प्रत्येक वर्षी प्रवर्गनिहाय आरक्षित पदे, कार्यरत पदे, रिक्त पदे इत्यादि तपशीलासह, विहित नमुन्यातील गोषवारा तयार

करुन तो सक्षम प्राधिका-याने सही / शिक्क्यानिशी प्रमाणित करावा.

फ) बिंदूनामावलीच्या सुरुवातीला / शेवटच्या पानावर सदर बिंदूनामावलीत एकूण किती पृष्ठे आहेत व त्यापैकी किती पृष्ठांपर्यंत

बिंदूनामावली लिहिण्यासाठी वापर करण्यात आला आहे त्याची नोंद प्रमाणपत्राच्या स्वरुपात करण्यात यावी.

त्याचप्रमाणे बिंदूनामावलीच्या शेवटच्या पानावर अंतिम गोषवा-याचा पृष्ठ क्रमांक व त्या गोषवा-याचे संबंधित वर्ष याचादेखिल

उल्लेख स्पष्टपणे करण्यात यावा.

**मागासवर्गीयांकरिता पदोन्नतीसाठी छोटया संवर्गातील आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती..**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.१०५६/११/१६-ब,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : १७ ऑक्टोबर, २०१३.

**वाचा :-** १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी-२००८/प्र.क. ४०७/०८/ १६-ब, दिनांक २७.१० २००८.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०५६/११/१६-ब दि.५ जानेवारी, २०१२

**प्रस्तावना :-**

छोट्या संवर्गामध्ये मागासप्रवर्गाची आरक्षणाची पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती कशी असावी याबाबत संदर्भाधीन क्रमांक-१ येथे नमुद केलेल्या दि. २७.१०.२००८ च्या परिपत्रकानुसार सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. या शासन परिपत्रकास आव्हान देणारी याचिका क्र.३०७७/२०११ मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाख करण्यात आली होती. सदर याचिकेवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२९/९/२०११ रोजी दिलेल्या आदेशान्वये, दि.२७/१०/२००८ रोजीच्या शासन परिपत्रकास, अंतरिम स्थगिती देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन संदर्भ क्रमांक-२ येथे नमुद केलेल्या शासन निर्णय दि.५/१/२०१२ अन्वये दि.२७/१०/२००८ च्या शासन परिपत्रकाची अंमलबजावणी पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात आलेली होती. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.९ मे, २०१३ रोजी दिलेल्या अंतिम निर्णयानुसार, दि.२७ ऑक्टोबर, २००८ चे शासन परिपत्रक रद्द केले आहे. या न्यायालयीन निर्णयास अनुसरुन कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयान्वये, संदर्भ क्र.१ येथील दि.२७.१०.२००८ चे शासन परिपत्रक मागे घेण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व विभागप्रमुखांच्या / नियुक्ती प्राधिका-यांच्या निदर्शनास आणावा.

सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.mahrashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३१०१७१६४५२१७१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**डॉ. पी.एस.मीना**
**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**गट-ब आणि गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील पदोन्नतीच्या बिंदुनामावली तपासणीसाठी व आरक्षण निश्चिती करिता विभागीय स्तरावर अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय : बीसीसी -२०१५/प्र.क्र.१२६A/१६-ब
मंत्रालय, मुंबई -४०००३२.
दिनांक : ५ मे, २०१५.

**वाचा :-** १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय बीसीसी १०८५/२९८८/१६-ब, दि. १३ ऑगस्ट, १९८६.
२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४०१/१६-ब, दि. २६ ऑक्टोबर, २००४.
३. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. बीसीसी २००९/प्र.क्र. २९१/०९/१६-ब, दि. ५ नोव्हेंबर, २००९.
४. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही २०१०/प्र.क्र./३४७/१०/१२, दि. २४ फेब्रुवारी, २०११.

**प्रस्तावना :-**

शासन सेवेतील गट-ब आणि गट-अ (कनिष्ठ श्रेणी) संवर्गातील पदांवर पदोन्नतीसाठी होणारा विलंब लक्षात घेऊन बिंदुनामावली प्रमाणिकरण व पदोन्नतीसाठी रिक्त पदांच्या आरक्षण निश्चिती प्रक्रियेचे विकेंद्रिकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त सर्व राज्य स्तरीय विभाग प्रमुखांच्या नियंत्रणाखालील विभागीय स्तरावरील गट-ब आणि गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील पदोन्नतीकरिता आरक्षण निश्चितीचे व बिंदुनामावली तपासणी व प्रमाणित करण्याचे अधिकार विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांना या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात येत आहेत.

**२.** गट-ब आणि गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील पदांवर पदोन्नती देण्याकरिता मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त सर्व राज्य स्तरीय विभाग प्रमुखांनी सर्व संवर्गातील रिक्त पदांचा आढावा नियमितरित्या दर महिन्यात घ्यावा. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त अनुक्रमांक २ येथील शासन निर्णयानुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार रिक्त पदांची अचूक गणना करुन पदोन्नतीच्या निवडसूची बाबत कार्यवाही करावी.

**३.** मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त सर्व राज्यस्तरीय विभाग प्रमुखांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व गट-ब आणि गट-अ (कनिष्ठ श्रेणी) संवर्गाची बिंदुनामावली, सेवाप्रवेश नियम, सेवा ज्येष्ठता यादी, मंजूर पदांचा आकृतीबंध व संबंधित निवडसूची वर्षासाठी दि. १ सप्टेंबर रोजीची रिक्त पदे व निवडसूची वर्षाच्या दि. ३१ ऑगस्ट अखेरची संभाव्य रिक्त पदे अशाप्रकारे निवडसूची वर्षातील एकत्रित रिक्त पदे यांचा तपशील ऑनलाईन बिंदूनामावलीमध्ये भरुन सदर बिंदूनामावली विभागीय आयुक्तांकडे मान्यतेस्तव सादर करावी.

४. सहाय्यक विभागीय आयुक्त (मावक) यांनी वरील अनुक्रमांक ३ नुसार विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्राप्त ऑनलाईन बिंदुनामावलीची तपासणी केल्यानंतर विभागीय आयुक्त यांनी बिंदुनामावली प्रमाणित करावी व निवडसूची वर्षाकरिता संभाव्य रिक्त पदांसह एकूण रिक्त पदांची आरक्षण निश्चिती प्रमाणित करावी.

५. संबंधित विभागीय आयुक्तांकडून बिंदुनामावली योग्य प्रकारे प्रमाणित केली आहे किंवा कसे याबाबत मंत्रालयातील मागासवर्ग कक्षाने दोन महिन्यांनी प्रत्येक विभाग प्रमुखाने विविध संवर्गात दिलेल्या पदोन्नतीबाबत १० टक्के संवर्गाची तपासणी करावी. जर बिंदुनामावली बरोबर नाही किंवा विभाग प्रमुखाने बिंदुनामावली प्रमाणे पदोन्नत्या दिल्या नसतील तर संबंधित विभागीय आयुक्त व विभाग प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल.

६. मंत्रालयीन विभागाच्या अधिनस्त सर्व राज्य स्तरीय विभाग प्रमुखांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व गट-ब आणि गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गापैकी कोणकाणत्या संवर्गाबाबत मुद्दा क्र. ४ नुसार पदोन्नतीच्या बिंदुनामावल्यांना विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांच्याकडून मान्यता घेता येईल याबाबत आढावा घ्यावा. याकरिता सर्वसाधारणपणे ज्या विभागीय आयुक्ताच्या कार्यक्षेत्रात राज्यस्तरीय विभाग प्रमुखाचे कार्यालय असेल त्यांनी त्या विभागीय आयुक्तांकडून बिंदूनामावली प्रमाणित करुन घ्यावी. मात्र, एखाद्या विभागीय आयुक्तांच्या कार्यक्षेत्रात अधिक कार्यालये असल्यास, त्या कार्यक्षेत्रातील राज्यस्तरीय विभाग प्रमुख अन्य विभागीय आयुक्तांकडून बिंदुनामावली प्रमाणित करुन घेऊ शकतील.

७. संचालक, माहिती व तंत्रज्ञान यांनी विभागीय स्तरावर ऑनलाईन बिंदुनामावली प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक विभागीय स्तरावर सहाय्यक आयुक्त (मावक) यांच्या कार्यालयात विशेषज्ञ/तंत्रज्ञ नियुक्ती करुन अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. तसेच विभागीय स्तरावरील सर्व कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना ऑनलाईन बिंदुनामावलीमध्ये करावयाच्या बदलाबाबत सूचना देऊन आज्ञावलीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही संचालक, माहिती व तंत्रज्ञान यांनी करावी.

८. सर्व विभागीय आयुक्तांनी बिंदुनामावली व आरक्षण तपासणीची कार्यवाही ही सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यपध्दतीनुसार पूर्ण करुन त्यास मान्यता द्यावी. अशा पध्दतीने देण्यात आलेल्या पदोन्नतीनंतर बिंदुनामावली व आरक्षण तपासणीची कार्यवाही योग्य रितीने झाली किंवा नाही याकरिता सदरच्या प्रस्तावांची तपासणी मागासवर्ग कक्ष, सामान्य प्रशासन विभाग (कार्या १६-ब) यांनी करावी. परंतु या तपासणीसाठी पदोन्नतीने नियुक्ती थांबवू नये.

९. सर्व सहाय्यक आयुक्त (मावक) यांनी, त्यांना लागणारी आवश्यक पदे व वित्तीय तरतुद करण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे विभागीय आयुक्तांमार्फत प्रस्ताव दि. १५ मे, २०१५ पर्यंत सादर करावा.

१०. या शासन निर्णयातील विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार बिंदु नामावली तपासण्याची अंमलबजावणी दि. १ जुन, २०१५ पासून सुरु करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५०५१५३६०९०७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**टि. वा. करपते**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

# [४]

# आरक्षण - बिंदूनामावली

# आरक्षण बिंदूनामावली

## प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या, सामान्य प्रशासन विभाग, मागासवर्ग कक्ष १६-ब, मंत्रालय, मुंबई यांचे अधिपत्याखाली बिंदू नामावलीचे काम पाहणेकरीता सर्व विभागीय आयुक्त, यांचे कार्यालयात त्यांचे अधिपत्याखाली मागासवर्ग कक्ष कार्यरत असून, सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष हे या शाखेचे प्रमुख आहेत. अमरावती, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, पुणे व कोकण ह्या सहा महसूली विभागांचे विभागीय आयुक्त कार्यालयात त्यांचे कार्यक्षेत्रातील जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये यांचे वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांचे भरती व बढती बाबत बिंदूनामावली नोंदवहीची अंतिम पडताळणी करुन अनुशेषास मान्यता देणेचे अधिकार सहाय्यक आयुक्त (मावक) यांना आहेत. त्याचबरोबर प्राथमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालये यांचे वर्ग १ ते वर्ग ४ चे अधिकारी /कर्मचारी तसेच विद्यापीठाचे वर्ग ३ व वर्ग ४ चे कर्मचारी यांच्या बिदू नामावली नोंदवहीचे अंतिम पडताळणीचे अधिकार त्यांना आहेत. तसेच मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त सर्व राज्यस्तरीय विभाग प्रमुखांच्या नियंत्रणाखालील विभागीय स्तरावरील गट "ब" आणि गट "अ" (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील पदोन्नतीकरीता आरक्षण निश्चित करणे व बिंदूनामावली तपासणी व प्रमाणित करणेचे अधिकार विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांना सामान्य प्रशासन विभाग १६-ब यांचेकडील दि. ५ मे २०१५ चे शासन निर्णयाद्वारे प्रदान करणेत आले आहेत.

प्रामुख्याने सन १९६५ पासून सरळसेवा भरती व पदोन्नती मधील आरक्षण व बिंदू नामावली बाबत सामान्य प्रशासन विभागाचे विविध शासन निर्णय आहेत. त्याचा थोडक्यात प्रवास पुढील प्रमाणे-

- देशमुख समितीच्या शिफारसींवर आधारित सामान्य प्रशासन विभागाचे दि.९/४/१९६५ चे शासन निर्णय, व दि.२३ मे १९७४ चे शासन निर्णयानुसार मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद- अ.जा. १३%, अ.जमाती ७%, विजाभज ४% = २४%
- शा.नि. दि.४ ऑगस्ट १९९२ नुसार धनगर व वंजारी समाजाचा अंतर्भाव केल्यानंतर वि.जाती व भ.जमाती यांचे ४% आरक्षण ६% केल्यामुळे अ.जा. १३% , अ.जमाती ७%, विजाभज ६% व इतर मागासवर्ग १०% = ३६%
- शा.नि. दि.२३ मार्च १९९४ नुसार मंडल आयोगाच्या शिफारसीनुसार इतर मागावर्गीयांना शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण पदोन्नती आरक्षण तसेच बिंदूनामावली इ. मधील बदल विजा (अ) ३%,भजब २.५%,भजक ३.५%,भजड२%(एकूण विजाभज ११%) व इतर मागासवर्ग १९%
- शा.नि. दि. ५ डिसें.१९९४ नुसार मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदे उमेदवार उपलब्ध न झाल्यास आदलाबदलीने पदे भरणे, पदे आरक्षणातून मुक्त करणे इ.
- शा.नि. दि.२५ जून १९९५ नुसार विशेष मागासप्रवर्गाकरीता शासकीय/ निमशासकीय सेवेत आरक्षण पदोन्नती व सरळसेवा यामध्ये विमाप्र प्रवर्गास २ टक्के आरक्षण.
- शा.नि. दि.२१ सप्टेंबर १९९८ नुसार शासकीय/ निमशासकीय इ. सेवेतील एकाकी पदांना आरक्षण लागू असणार नाही.
- शा.नि. दि.३० जून २००४ नुसार अनु.जमातीच्या राखीव पदावर सरळसेवा/पदोन्नतीने झालेल्या बिगर आदिवासी अधिकारी/ कर्मचाऱ्यांना शासकीय/निमशासकीय सेवेत संरक्षण संरक्षित केलेल्या बिगर आदिवासी/ कर्मचारी यांची सेवा ज्येष्ठता दि.१५/६/१९९५ अशी विचारत घेणे.
- शा.नि. दि.२९/३/९७ व सभरवाल समितीचे शिफारसीवर आधारीत दि.१८/१०/९७ चे शासन निर्णयानुसार सरळसेवा व पदोन्नतीची १०० बिंदूनामावली.

- महाराष्ट्र शासनाचा सन २००४ आरक्षण कायदा व शा.नि. दि.२५/५/२००४, व दि. २६/१०/२००४ चे शासन निर्णयानुसार वर्ग-१ व वर्ग-२ करीता सर्व टप्प्यांवर आरक्षण लागू.
- मे.उच्च न्यायालयाचे दि.९/५/१३ चे निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक दि.२७/१०/२००८ रद्द.
- शा.परिपत्रक दि.५ नोव्हेंबर २००९ तसेच शासन निर्णय दि. ५ मे २०१५ अनुसार बिंदू नामावली तयार करणे तसेच बिंदू नामावली नोंदवहीची प्राथमिक / अंतिम तपासणी करणारे प्राधिकारी निश्चित करणे.
- दि.१९/७/२०१४ व दि. २४/७/२०१४ चे शासन निर्णय नुसार शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता (ईएसबीसी) १६% व विशेष मागास प्रवर्ग अ (एसबीसी-ए) यांना ५% आरक्षण.
- दि.२१/२/२०१५ चे शासन निर्णय नुसार ईएसबीसी करीता मे.उच्च न्यायालयाचे अंतरिम आदेश.
- दि.२/३/२०१५ चे शासन निर्णयानुसार एसबीसीए करीता मे.उच्च न्यायालयाचे अंतरिम स्थगिती आदेश.

उपरोक्त विविध शासन निर्णय झाले असले तरी सद्यस्थितीत सरळसेवा भरती व पदोन्नतीकरीता पुढील प्रमाणे सुधारीत आरक्षण निश्चित केले आहे.

| जाती/जमाती प्रवर्ग | सरळ सेवेकरीता राखून ठेवावयाच्या रिक्त पदांची किंवा जागांची टक्केवारी | पदोन्नतीकरीता राखून ठेवावयाच्या रिक्त पदांची किंवा जागांची टक्केवारी |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३% | १३% |
| अनुसूचित जमाती | ७% | ७% |
| विमुक्त जाती अ | ३% | ३% |
| भटक्या जमाती ब | २.५% | २.५% |
| भटक्या जमाती क | ३.५% | ३.५% |
| भटक्या जमाती ड | २% | २% |
| विशेष मागास प्रवर्ग | २% | २% |
| इतर मागास प्रवर्ग | १९% | -- |
| **एकूण** | **५२%** | **३३%** |

**बिंदूचे समायोजना बाबत -** सामान्य प्रशासन विभागाने दि. १८/१०/१९९७ व दि. २६/१०/२००४ अन्वये आर.के.सभरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार एखाद्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यास त्याच्या स्वतःच्या प्रवर्गाचे पद रिक्त नाही म्हणून सेवाजेष्ठता नि पात्रता या आधारे खुल्या प्रवर्गातून पदोन्नती दिल्यानंतर, त्याच्या मागासप्रवर्गाचे पद रिक्त झाल्यास, अशा मागासवर्गीय कर्मचाऱ्यास त्याच्या स्वतःच्या मागास प्रवर्गातील रिक्त पदावर समायोजित करुन खुल्या प्रवर्गाचे पद रिक्त करण्यात यावे.

**बिंदूनामावली (रोस्टर) बाबत -**

नियुक्ती प्राधिकारी यांनी बिदू नामावली ठेवणे आवश्यक आहे. ज्या ज्या वेळी भरती किंवा बढती करावयाची आहे, त्यापूर्वी तसेच किंवा मंजूर पदसंख्येत, आकृतीबंधामध्ये बदल होईल त्या-त्या वेळी अनुशेषास अंतिम मान्यता घेऊनच पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे. याकरीता सामान्य प्रशासन विभागाचे अद्यावत आदेश विचारात घेवून रोस्टर बाबत कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

रोस्टर म्हणजे भरतीनंतर कार्यरत कर्मचारी यांची नेमणूकी पासून ते सेवानिवृत्ती/राजीनामा/मृत्यू या पर्यंतची सर्व जंत्री/कुंडली. सेवेमध्ये आलेनंतर सेवाजेष्ठता यादीपासून ते पदोन्नती पर्यंतचा आरसा म्हणजे बिंदू नामावली.

१) शासन निर्णय दिनांक १८/१०/१९९९७ नुसार रोस्टर तयार करतेवेळी सरळसेवा व पदोन्नती करीता १०० बिंदू प्रमाणे तयार केली जाते.

अ) सरळसेवा संवर्गासाठी वर्ग-१ ते वर्ग-४ व पदोन्नती वर्ग-३ ते वर्ग-४ करिता दि.२ जुलै १९९७ या दिवशी कार्यरत असणारे उमेदवारांची बिंदू नामावली तयार केली जाते. तसेच

ब) आरक्षण कायदा २००४ अन्वये, पदोन्नतीचे प्रत्येक टप्प्यावर आरक्ष्ज्ञण लागू केलेने वर्ग-१ व वर्ग-२ चे पदोन्नती करीताही आरक्षण लागू झाले आहे. त्यामुळे वर्ग१ व वर्ग २ चे पदोन्नतीची बिंदू नामावली लिहीताना दि.२९ जाने. २००४ रोजी कार्यरत असणारे उमेदवार हा आधार घेणेत येतो.

२) संवर्गनिहाय मंजूर पदावरील व कार्यरत पदावरील आवश्यक आरक्षण व अनुशेषाचा गोषवारा काढला जातो. तसेच प्रवर्गाचा गोषवाराही काढणेत येतो. यामुळे कोणते बिंदू कितीवेळा वापरले गेले आहेत किंवा अद्याप कोणते बिंदू वापरले नाहीत, ते समजते.

**बिंदू नामावली (रोस्टर) लिहीताना प्रामुख्याने पुढील नमुन्यात ठेवावी.**

| बिंदू क्रमांक | बिंदूचा प्रवर्ग | अधिकारी कर्मचारी यांचे नांव | प्रत्यक्ष जात व जातीचा प्रवर्ग | भरती वर्ष | नियुक्तीचा/ पदोन्नतीचा दिनांक | जन्म तारीख | सेवा निवृत्तीचा दिनांक | जात वैधता तपासणी झाली आहे काय? | जात वैधता झाली असलेस तपाणीचा क्रमांक व दिनांक | शेरा (येथे प्रामुख्याने कोणत्या कारणाने पद रिक्त झाले ते नमूद करावे. उदा. पदोन्नती, मयत, राजीनामा, स्वेच्छानिवृत्ती, निवृत्ती इ. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

**रोस्टर अद्ययावत करतेवेळी व तपासणीवेळी प्रामुख्याने पुढील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.**

१. संवर्ग निहाय अंतिमरित्या प्रसिध्द केलेल्या (सन १९९७ व चालू वर्षाची ) सेवाजेष्ठता याद्या.
२. संवर्ग निहाय मंजूर पदसंख्येची संच मान्यता / आकृती बंध.
३. सरळसेवा व पदोन्नती मधील सर्व संवर्गातील कार्यरत कर्मचारी यांच्या वैयक्तिक मान्यता असाव्यात.
४. सर्व संवर्गातील कार्यरत कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती.
५. पदोन्नती कोणत्या निम संवर्गातून दिली जाते त्याची साखळी (पदोन्नती साखळी)
६. पदोन्नती संदर्भात कार्यप्रमाणाली टिपणी.
७. यापूर्वी केलेल्या तपासणीमधील दर्शविलेला अनुशेष भरती केले बाबतचा अहवाल.
८. शासन निर्णय दि. १६/३/९९ नुसार सदर बिंदू नामावली तयार करताना सरळसेवा भरतीवेळी समांतर आरक्षण असलेस त्याप्रमाणेही नोंदी घ्याव्यात. उदा. अपंग ३%, प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त ५%, माजी सैनिक १५% , खेळाडू ५% , महिला ३०% इ.
९. संस्था/कार्यालयातील सर्व संवर्गाचे कार्यरत असलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यांबाबत वरिष्ठ न्यायालयात न्यायालयीन प्रकरण चालू आहे अगर कसे?
१०. शासन निर्णय क्र. संकिर्ण १०९६/प्र.क्र.३०/का-२ दि. १/८/१९९७ नुसार महिलांसाठी सरळसेवा भरतीमध्ये ३०% आरक्षणानुसार माहिती रजिस्टर.

थोडक्यात, आरक्षणाचे धोरणानुसार अनुशेष पूर्ण करण्यासाठी बिंदूनामावली अद्ययावत असणे आवश्यक आहे. उपरोक्त नमूद मुद्यांबाबतचे अद्ययावत अधिनियम व शासनाचे निर्णय या भागामध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. नियुक्ती प्राधिकारी व संबंधित कर्मचारी तसेच सेवेत कार्यरत असणारे सर्वच अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे स्वत:चे पदोन्नतीचे प्रकियेवेळी या पुस्तिकेचा निश्चितच उपयोग होईल.

*******

**Government service – reservation in – for members of the Backward Classes**

**Maintenance of Roster**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

General Administration Department
Circular No . BCC 1071 / ECR-J
Sachivalaya, Bombay-32 (BR), dated the 19th February 1971

## C I R C U L A R

In the Form of Register showing employment of Backward Classes and in the Model Roster appended to the Government Circular, General Administration Department, No.BCC 1070/ECR-J, dated the 23rd November 1970, the various sections of Backward Classes have been indicated either in short form or in abbreviated terms. It is clarified that the full description of the four sections of the Backward Classes should be as given in Government Resolution, General Administration Department, No. BCC 1064-III-J, dated the 9th April 1965. Accordingly, the terms used in the Form of Register and Model Roster in respect of the four sections of the Backward Classes appended to Government Circular, General Administration Department, No. BCC-1070/ECR-J, dated the 23rd November 1970 should be substituted as shown belows-

| | Present | To be substituted by |
|---|---|---|
| 1) | S.C. or Scheduled Castes | Scheduled Castes and Scheduled Castes converts to Buddhism. |
| 2) | S.T. or Scheduled Tribes | Scheduled Tribes including those living outside the specified areas. |
| 3) | N.T. and V.J. | Denotified Tribes and Nomadic Tribes. |
| 4) | Other Backward Classes | Other Backward Communities. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**D.S. TELANG,**
**Deputy Secretary to the Government of Maharashtra,**
**General Administration Department.**

**वर्ग ४ मधील जिल्हानिहाय संवर्गात सरळसेवा प्रवेशाने भरती करताना १०० बिंदू रोस्टर ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्रमांक :- बीसीसी- ११८७/२७७६/ (सीआर-२९६/८७) / १६ ब,
मंत्रालय, मुंबई :- ४०००३२,
दिनांक :- १५ ऑक्टोबर १९८७.

**पहा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- बीसीसी-१०७२/जे, दिनांक ६ जून १९७२.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- बीसीसी- १०८४ / (सीआर-२०४/८३) दिनांक ७ जानेवारी, १९८४.

**निर्णय :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- बीसीसी-१०७२/जे, दिनांक ६ जून, १९७२ अन्वये शासनाने खालील सहा जिल्ह्यांमध्ये वर्ग ३ व वर्ग ४ मधील जिल्हानिहाय संवर्गातील पदे सरळसेवा प्रवेशाने भरतांना अनुसूचित जमातीकरिता पुढीलप्रमाणे खास जिल्हानिहाय आरक्षण विहीत केलेले आहे.

| | |
|---|---|
| ठाणे | २२ % |
| नाशिक | २२ % |
| धुळे | २२ % |
| कुलाबा (रायगड) | ९ % |
| यवतमाळ | १४ % |
| चंद्रपूर | १५ % |

२. महसूल व वन विभागाच्या क्रमांक :- आरईएन-५१८१/४४१२/(९४०)/एम-२०, दिनांक २३ ऑगस्ट १९८२ च्या अधिसूचनेद्वारे पूर्वीच्या चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करुन चंद्रपूर व गडचिरोली असे दोन जिल्हे निर्माण केले. मूळच्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये आदिवासीसाठी शासकीय सेवेत भरतीसाठी १५% आरक्षण विहित केलेले होते. नवनिर्मित गडचिरोली जिल्ह्यामध्ये आदिवासीसाठी किती प्रमाणात आरक्षण ठेवावे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, नवनिर्मित गडचिरोली जिल्ह्यात चंद्रपूर जिल्ह्याप्रमाणेच आदिवासीकरिता शासकीय सेवेत भरतीसाठी १५% आरक्षण लागू करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**म. ना. बर्वे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**धनगर व वंजारी समाजाच्या अंर्तभाव केल्यानंतर विमुक्त जाती व भटक्या जमाती यांचे सध्याचे ४ टक्के आरक्षण ६ टक्के करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्रमांक : बीसीसी- १०९२/१६९२/प्र.क्र. १५४/सोळा-ब,
मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ४ ऑगस्ट १९९२.

**पहा :-** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-१०६४/प्र.क्र.१११/ जे, दिनांक ९ एप्रिल १९६५.
(२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०७०/इसीआर - जे, दि. २३ नोव्हेंबर, १९७०.
(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०७२/ जे, दिनांक २३ मे १९७४.

**शासन निर्णय :-** धनगर समाज व त्या समाजाच्या तत्सम जाती यांना दिनांक २५ मे १९९० पासून भटक्या जमातीमध्ये समाविष्ट करण्यात आल्यामुळे तसेच वंजारी समाजाला शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत वंजारा या जातीशी तत्सम जात समजावी या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या सध्याच्या ४ टक्के आरक्षणात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता त्या संबधी शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सध्या विमुक्त जाती व भटक्या जमातीचे पदोन्नती व सरळसेवा भरती यामध्ये जे ४ टक्के आरक्षण आहे, त्यात शासनाचा त्यासंबंधी अंतिम निर्णय होईपर्यंत तात्पुरती २ टक्यांची वाढ करुन ती ६ टक्के करण्यात येत आहे. सदर वाढीव आरक्षणांच्या टक्केवारीची अंमलबजावणी हे आदेश निर्णयीत झाल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

२. या वाढीव टक्केवारीमुळे यापुढे मागासवर्गीयांच्या विविध गटांसाठी पुढील प्रमाणे आरक्षण राहील.

| | |
|---|---|
| अनुसुचित जाती | १३ टक्के |
| अनुसुचित जमाती | ७ टक्के |
| विमुक्त व भटक्या जाती/जमाती | ६ टक्के |
| इतर मागासवर्गीय | १० टक्के |
| एकूण आरक्षण : | ३६ टक्के |

३. यापूर्वी मागासवर्गीयांच्या आरक्षणाच्या संदर्भात पदोन्नती मधील आरक्षित पदे मोजण्यासाठी, विहित केलेल्या ५० बिंदु नामावलीचा वापर व सरळ सेवा भरतीमधील आरक्षित पदे मोजण्यासाठी विहित केलेल्या १०० बिंदू नामावल्यांचा वापर करण्यात येत होता, त्यात वाढीव टक्केवारीनुसार बदल करुन सुधारित १०० बिंदु नामावल्या व ५० बिंदु नामावली सोबत परिशिष्ट अ, ब, ख, ड, फ जोडल्या आहेत. यापुढे या सुधारित बिंदू नामावल्यांचा वाढीव टक्केवारीनुसार विमुक्त जाती/ भटक्या जमातीची आरक्षित पदे व मोजण्यासाठी वापर करण्यात यावा.

४. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग / विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख / तसेच शासकीय / निमशासकीय कार्यालये मंडळे / महामंडळे / नगरपालिका / नगरपरिषद / महनगरपालिका / जिल्हा परिषदा / अनुदानित शैक्षणिक संस्था/कृषी अकृषी विद्यापीठे / सहकारी संस्था/बँका इत्यादींना वाढीव टक्केवारी नुसार आरक्षण लागू करण्याबाबतच्या सूचना त्वरीत निर्गमित कराव्यात व वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**अ.तुं. वाघमारे,**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

**धनगर व वंजारी समाजाचा अंर्तभाव केल्यानंतर विमुक्त जाती व भटक्या जमाती यांचे सध्याचे <u>४ टक्के आरक्षण ६ टक्के करण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शुध्दीपत्रक क्रमांक : बीसीसी-१०९२/१६९२/प्र.क्र.१५४/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर, १९९२.

**पहा :-** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-१०९२/१६९२/प्र.क्र.१५४/१६-ब, दिनांक ४ ऑगस्ट, १९९२.

**<u>शुध्दीपत्र</u> :-** शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-१०९२/१६९२/प्र.क्र.१५४/१६-ब, दिनांक ४ ऑगस्ट १९९२ च्या सोबत जोडण्यात आलेल्या चंद्रपुर व गडचिरोली जिल्हयांसाठी असलेल्या परिशिष्ट "इ" मधील बिंदू क्रमांक ७७ हा खुल्या प्रवर्गासाठी आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णयासोबत जोडण्यात आलेल्या ठाणे, नाशिक व धुळे जिल्हयांसाठी असलेल्या परिशिष्ट "ब" व रायगड जिल्हयासाठी असलेल्या परिशिष्ट "क" मधील बिंदु नामावलीच्या नमुन्या ऐवजी या शुध्दीपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब" आणि "क" प्रमाणे बिंदु नामावलीचा नमुना राहील.

परिशिष्ट "अ", "ब", "क", "ड", "इ" व "फ" मधील वाढीव टक्केवारीच्या बिंदु नामावल्या दिनांक ४ ऑगस्ट १९९२ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**अ.रा.शिरोलकर,**
**अपर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**(परिशिष्ट- "ब")**

ठाणे, नाशिक आणि धुळे जिल्हयांसाठी (वर्ग-३ व ४ च्या जिल्हास्तर संवर्गासाठी )

१०० बिंदु नामावलीचा नमुना (दिनांक ४ ऑगस्ट १९९२ पासून लागू)

| अनु. क्रमांक | गट | अनु. क्रमांक | गट |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | ३३. | अनुसूचित जाती |
| २. | अनुसूचित जमाती | ३४. | इतर मागासवर्गीय |
| ३. | विमुक्त जाती व भटक्या जमाती | ३५. | अनुसूचित जमाती |
| ४. | इतर मागासवर्गीय | ३६. | खुली |
| ५. | खुली | ३७. | खुली |
| ६. | खुली | ३८. | खुली |
| ७. | खुली | ३९. | खुली |
| ८. | अनुसूचित जमाती | ४०. | अनुसूचित जमाती |
| ९. | अनुसूचित जाती | ४१. | अनुसूचित जाती |
| १०. | खुली | ४२. | खुली |
| ११. | खुली | ४३. | खुली |
| १२. | खुली | ४४. | अनुसूचित जमाती |
| १३. | अनुसूचित जमाती | ४५. | इतर मागासवर्गीय |
| १४. | इतर मागासवर्गीय | ४६. | खुली |
| १५. | खुली | ४७. | खुली |
| १६. | अनुसूचित जमाती | ४८. | विमुक्त जाती व भटक्या जमाती |
| १७. | अनुसूचित जाती | ४९. | अनुसूचित जाती |
| १८. | खुली | ५०. | अनुसूचित जमाती |
| १९. | खुली | ५१. | खुली |
| २०. | खुली | ५२. | खुली |
| २१. | अनुसूचित जमाती | ५३. | विमुक्त जाती व भटक्या जमाती |
| २२. | खुली | ५४. | इतर मागासवर्गीय |
| २३. | खुली | ५५. | अनुसूचित जमाती |
| २४. | इतर मागासवर्गीय | ५६. | खुली |
| २५. | अनुसुचित जाती | ५७. | अनुसूचित जाती |
| २६. | अनुसूचित जमाती | ५८. | अनुसूचित जमाती |
| २७. | खुली | ५९. | खुली |
| २८. | विमुक्त जाती व भटक्या जमाती | ६०. | खुली |
| २९. | खुली | ६१. | खुली |
| ३०. | अनुसूचित जमाती | ६२. | खुली |
| ३१. | खुली | ६३. | अनुसूचित जमाती |
| ३२. | खुली | ६४. | इतर मागासवर्गीय |
| | | ६५. | अनुसूचित जाती |
| | | ६६. | खुली |
| | | ६७. | खुली |

| अनु. क्रमांक | गट |
|---|---|
| ६८. | अनुसूचित जमाती |
| ६९. | खुली |
| ७०. | खुली |
| ७१. | खुली |
| ७२. | अनुसुचित जमाती |
| ७३. | अनुसूचित जाती |
| ७४. | इतर मागासवर्गीय |
| ७५. | खुली |
| ७६. | खुली |
| ७७. | अनुसूचित जमाती |
| ७८. | विमुक्त जाती व भटक्या जमाती |
| ७९. | खुली |
| ८०. | खुली |
| ८१. | अनुसुचित जाती |
| ८२. | अनुसूचित जमाती |
| ८३. | खुली |
| ८४. | इतर मागासवर्गीय |
| ८५. | खुली |
| ८६. | अनुसूचित जमाती |
| ८७. | खुली |
| ८८. | खुली |

| अनु. क्रमांक | गट |
|---|---|
| ८९ | अनुसुचित जाती |
| ९० | खुली |
| ९१ | अनुसूचित जमाती |
| ९२ | खुली |
| ९३ | खुली |
| ९४ | इतर मागासवर्गीय |
| ९५ | अनुसूचित जमाती |
| ९६ | खुली |
| ९७ | अनुसुचित जाती |
| ९८ | खुली |
| ९९ | विमुक्त जाती व भटक्या जमाती |
| १०० | अनुसुचित जमाती |

| | |
|---|---|
| एकूण राखीव जागा- | ५१ |
| अनुसूचित जाती- | १३ |
| अनुसूचित जमाती | २२ |
| विमुक्त जाती व भटक्या जमाती | ६ |
| इतर मागासवर्गीय | १० |
| | ५१ |
| राखीव पदांची संख्या - | ५१ |
| खुल्या पदांची संखया - | ४९ |

(१००- ५१ =४९)

**(परिशिष्ट- "क")**

कुलाबा (रायगड) जिल्हयांसाठी (वर्ग-३ व ४ च्या जिल्हास्तर संवर्गासाठी )

१०० बिंदु नामावलीचा नमुना (दिनांक ४ ऑगस्ट १९९२ पासून लागू)

| अनु. क्रमांक | गट | अनु. क्रमांक | गट |
|---|---|---|---|
| १. | अनुसुचित जाती | ३३ | अनुसुचित जाती |
| २. | अनुसूचित जमाती | ३४ | इतर मागासवर्गीय |
| ३. | विमुक्त जाती व भटक्या जमाती | ३५ | खुली |
| ४. | इतर मागासवर्गीय | ३६ | खुली |
| ५. | खुली | ३७ | खुली |
| ६. | खुली | ३८ | खुली |
| ७. | खुली | ३९ | खुली |
| ८. | खुली | ४० | खुली |
| ९. | अनुसुचित जाती | ४१ | अनुसुचित जाती |
| १०. | खुली | ४२ | खुली |
| ११. | खुली | ४३ | खुली |
| १२. | खुली | ४४ | अनुसूचित जमाती |
| १३. | खुली | ४५ | इतर मागासवर्गीय |
| १४. | इतर मागासवर्गीय | ४६ | खुली |
| १५. | खुली | ४७ | खुली |
| १६. | अनुसूचित जमाती | ४८ | विमुक्त जाती व भटक्या जमाती |
| १७. | अनुसुचित जाती | ४९ | अनुसुचित जाती |
| १८. | खुली | ५० | अनुसूचित जमाती |
| १९. | खुली | ५१ | खुली |
| २०. | खुली | ५२ | खुली |
| २१. | खुली | ५३ | विमुक्त जाती व भटक्या जमाती |
| २२. | खुली | ५४ | इतर मागासवर्गीय |
| २३. | खुली | ५५ | खुली |
| २४. | इतर मागासवर्गीय | ५६ | खुली |
| २५. | अनुसुचित जाती | ५७ | अनुसुचित जाती |
| २६. | खुली | ५८ | अनुसूचित जमाती |
| २७. | खुली | ५९ | खुली |
| २८. | विमुक्त जाती व भटक्या जमाती | ६० | खुली |
| २९. | खुली | ६१ | खुली |
| ३०. | अनुसूचित जमाती | ६२ | खुली |
| ३१. | खुली | ६३ | खुली |
| ३२. | खुली | ६४ | इतर मागासवर्गीय |

| अनु. क्रमांक | गट |
|---|---|
| ६५. | अनुसुचित जाती |
| ६६. | अनुसूचित जमाती |
| ६७. | खुली |
| ६८. | खुली |
| ६९. | खुली |
| ७०. | खुली |
| ७१. | खुली |
| ७२. | अनुसुचित जमाती |
| ७३. | अनुसूचित जाती |
| ७४. | इतर मागासवर्गीय |
| ७५. | खुली |
| ७६. | खुली |
| ७७. | खुली |
| ७८. | विमुक्त जाती व भटक्या जमाती |
| ७९. | खुली |
| ८०. | खुली |
| ८१. | अनुसुचित जाती |
| ८२. | खुली |
| ८३. | खुली |
| ८४. | इतर मागासवर्गीय |
| ८५. | खुली |
| ८६. | अनुसूचित जमाती |
| ८७. | खुली |
| ८८. | खुली |
| ८९. | अनुसुचित जाती |
| ९०. | खुली |
| ९१. | खुली |
| ९२. | खुली |
| ९३. | खुली |
| ९४. | इतर मागासवर्गीय |
| ९५. | खुली |
| ९६. | खुली |
| ९७. | अनुसुचित जाती |
| ९८. | खुली |
| ९९. | विमुक्त जाती व भटक्या जमाती |
| १००. | खुली |

| | |
|---|---|
| एकूण आरक्षित जागा : | ३८ |
| अनुसूचित जाती | १३ |
| अनुसूचित जमाती | ९ |
| विमुक्त जाती व भटक्या जमाती | ६ |
| इतर मागासवर्गीय | १० |
| एकूण :- | ३८ |
| राखीव पदांची संख्या :- | ३८ |
| खुल्या पदांची संख्या :- | ६२ |

(१००-३८ = ६२)

**शासकीय/निमशासकीय सेवेतील मागासवर्गीयांसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना लागू करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : बी.सी.सी.१०९३/१५७५/प्र.क्र.३/९०/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दिनांक १८ ऑक्टोंबर, १९९३.

**प रि प त्र क**

शासकीय निमशासकीय सेवेतील मागासवर्गीयांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाप्रमाणे रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना देखील आरक्षण लागू करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

रोजंदारी कामगारांच्या बाबतीत आरक्षणाचे संदर्भात आदेश जसेच्या तसे लागू करणे व्यवहार्य ठरत नसले तरी मागासवर्गीयांचे सर्वसाधारण आरक्षण त्यांना ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा कमी होणार नाही याची दखल घेण्यात यावी. रोजंदारी कामगारांसाठी निश्चित पदे नसल्यामुळे त्यांची संख्या ही कामाच्या गरजेनुसार व कामाच्या निवडीनुसार ठरत असल्याने त्यांच्यासाठी बिंदू नामावली ठेवण्याची आवश्यकता नाही. तथापि एखाद्या विशिष्ट संस्थेला १०० रोजंदारी कामगार घ्यावयाचे आहेत, अशावेळी शक्यतो अ.जा/ अ.ज./ वि.जा.भ.ज./ इ.मा.व. यांच्यासाठी सेवेत राखून ठेवलेल्या आरक्षणाच्या प्रमाणानुसार अशा कामगारांची भरती केली जाईल, याबाबतची खबरदारी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**अ. तु. वाघमारे**
| 22. | खुला | 51. | अनुसूचित जाती |
| 23. | अनुसूचित जमाती | 52. | खुला |
| 24. | खुला | 53. | अनुसूचित जमाती |
| 25. | इतर मागास वर्ग, | 54. | खुला |
| 26. | खुला | 55. | इतर मागास वर्ग, |
| 27. | अनुसूचित जाती | 56. | खुला |
| 28. | खुला | 57. | भटक्या जमाती (क) |
| 29. | इतर मागास वर्ग, | 58. | खुला |

| **अनुक्रमांक** | **वर्ग** |
|---|---|
| 59. | इतर मागास वर्ग, |
| 60. | खुला |
| 61. | अनुसूचित जाती |
| 62. | खुला |
| 63. | अनुसूचित जमाती |
| 64. | खुला |
| 65. | इतर मागास वर्ग |
| 66. | खुला |
| 67. | अनुसूचित जाती |
| 68. | खुला |
| 69. | इतर मागास वर्ग, |
| 70. | खुला |
| 71. | अनुसूचित जमाती |
| 72. | खुला |
| 73. | अनुसूचित जाती |
| 74. | खुला |
| 75. | इतर मागास वर्ग |
| 76. | खुला |
| 77. | भटक्या जमाती (ड) |
| 78. | खुला |
| 79. | इतर मागास वर्ग, |
| 80. | खुला |
| 81. | अनुसूचित जमाती |
| 82. | खुला |
| 83. | विमुक्त जाती (अ) |
| 84. | खुला |
| 85. | इतर मागास वर्ग |
| 86. | खुला |

| **अनुक्रमांक** | **वर्ग** |
|---|---|
| 87. | विशेष मागास वर्ग |
| 88. | खुला |
| 89. | इतर मागास वर्ग, |
| 90. | खुला |
| 91. | अनुसूचित जाती |
| 92. | खुला |
| 93. | अनुसूचित जमाती |
| 94. | खुला |
| 95. | इतर मागास वर्ग, |
| 96. | खुला |
| 97. | अनुसूचित जाती |
| 98. | खुला |
| 99. | भटक्या जमाती (ब/क) |
| 100. | खुला |

| **वर्गानुसार आरक्षित पदे** | | **बिंदू** | |
|---|---|---|---|
| 1) अनुसूचित जाती (11) | : - | 1, 12, 21, 27, 37, 51, 61, 67, 73<br>91, 97 | |
| 2) अनुसूचित जमाती (9) | : - | 2, 23, 33, 43, 53, 63, 71, 81, 93, | |
| 3) विमुक्त जाती (अ) (3) | : - | 3, 41, 83 | |
| 4) भटक्या जमाती (ब) (2.5) | : - | 4, 47 | 99 (ब/क) |
| 5) भटक्या जमाती (क) (3.5) | : - | 7, 31, 57 | |
| 6) भटक्या जमाती (ड) (2) | : - | 11, 77 | |
| 7) विशेष मागास प्रवर्ग (2) | : - | 15, 87 | |
| 8) इतर मागास वर्ग (19) | : - | 5, 9, 17, 19, 25, 29, 35, 39, 45, 49, 55,<br>59, 65, 69, 75, 79, 85, 89, 95 | |
| 9) सर्वसाधारण (48) | : - | 6, 8, 10, 13, 14, 16, 18, 20, 22,<br>24, 26, 28, 30, 32, 34, 36, 38, 40,<br>42, 44, 46, 48, 50, 52, 54, 56, 58,<br>60, 62, 64, 66, 68, 70, 72, 74, 76,<br>78, 80, 82, 84, 86, 88, 90, 92, 94,<br>96, 98, 100 | |

**चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांसाठी सरळ सेवा भरतीसाठी स्वतंत्र 100 बिंदू नामावली (अनुसूचित जमातीकरिता 15% आरक्षण)**

| अनुक्रमांक | वर्ग, | अनुक्रमांक | वर्ग, |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | 30. | खुला |
| 2. | अनुसूचित जमाती | 31. | भटक्या जमाती (क) |
| 3. | विमुक्त जाती (अ) | 32. | खुला |
| 4. | भटक्या जमाती (ब) | 33. | अनुसूचित जमाती |
| 5. | इतर मागास वर्ग, | 34. | खुला |
| 6. | खुला | 35. | इतर मागास वर्ग, |
| 7. | भटक्या जमाती (क) | 36. | खुला |
| 8. | खुला | 37. | अनुसूचित जाती |
| 9. | इतर मागास वर्ग | 38. | खुला |
| 10. | खुला | 39. | इतर मागास वर्ग, |
| 11. | भटक्या जमाती (ड) | 40. | खुला |
| 12. | अनुसूचित जाती | 41 | विमुक्त जाती (अ) |
| 13. | खुला | 42. | खुला |
| 14. | खुला | 43. | अनुसूचित जाती |
| 15. | विशेष मागास वर्ग, | 44. | खुला |
| 16. | खुला | 45. | अनुसूचित जमाती |
| 17. | अनुसूचित जमाती | 46. | खुला |
| 18. | खुला | 47. | भटक्या जमाती (ब) |
| 19. | इतर मागास वर्ग, | 48. | खुला |
| 20. | खुला | 49. | इतर मागास वर्ग, |
| 21. | अनुसूचित जाती | 50. | खुला |
| 22. | खुला | 51. | अनुसूचित जाती |
| 23. | अनुसूचित जमाती | 52. | खुला |
| 24. | खुला | 53. | अनुसूचित जमाती |
| 25. | इतर मागास वर्ग, | 54. | खुला |
| 26. | खुला | 55. | इतर मागास वर्ग, |
| 27. | अनुसूचित जाती | 56. | खुला |
| 28. | खुला | 57. | भटक्या जमाती (क) |
| 29. | अनुसूचित जमाती | 58. | खुला |

| अनुक्रमांक | वर्ग, |
|---|---|
| 59. | अनुसूचित जमाती |
| 60. | खुला |
| 61. | अनुसूचित जाती |
| 62. | खुला |
| 63. | अनुसूचित जमाती |
| 64. | खुला |
| 65. | इतर मागास वर्ग, |
| 66. | खुला |
| 67. | अनुसूचित जाती |
| 68. | खुला |
| 69. | अनुसूचित जमाती |
| 70. | खुला |
| 71. | अनुसूचित जमाती |
| 72. | खुला |
| 73. | अनुसूचित जाती |
| 74. | खुला |
| 75. | अनुसूचित जमाती |
| 76. | खुला |
| 77. | भटक्या जमाती (ड) |
| 78. | खुला |
| 79. | इतर मागास वर्ग, |
| 80. | खुला |
| 81. | अनुसूचित जाती |
| 82. | खुला |
| 83. | विमुक्त जाती (अ) |
| 84. | खुला |
| 85. | अनुसूचित जमाती |
| 86. | खुला |

| अनुक्रमांक | वर्ग, |
|---|---|
| 87. | विशेष मागास वर्ग |
| 88. | खुला |
| 89. | इतर मागास वर्ग, |
| 90. | खुला |
| 91. | अनुसूचित जाती |
| 92. | खुला |
| 93. | अनुसूचित जमाती |
| 94. | खुला |
| 95. | अनुसूचित जमाती |
| 96. | खुला |
| 97. | अनुसूचित जाती |
| 98. | खुला |
| 99. | भटक्या जमाती (ब/क) |
| 100. | खुला |

| वर्गानुसार आरक्षित पदे | | बिंदू | |
|---|---|---|---|
| 1) अनुसूचित जाती (13) | : - | 1, 12, 21, 27, 37, 43, 51, 61, 67 73, 81, 91, 97 | |
| 2) अनुसूचित जमाती (15) | : - | 2, 17, 23, 29, 33, 45, 53, 59, 63, 69, 71, 75, 85, 93, 95 | |
| 3) विमुक्त जाती (अ) (3) | : - | 3, 41, 83 | |
| 4) भटक्या जमाती (ब) (2.5) | : - | 4, 47 | 99 (ब/क) |
| 5) भटक्या जमाती (क) (3.5) | : - | 7, 31, 57 | |
| 6) भटक्या जमाती (ड) (2) | : - | 11, 77 | |
| 7) विशेष मागास प्रवर्ग (2) | : - | 15, 87 | |
| 8) इतर मागास वर्ग (11) | : - | 5, 9, 19, 25, 35, 39, 49, 55, 65, 79, 89 | |
| 9) सर्वसाधारण (48) | : - | 6, 8, 10, 13, 14, 16, 18, 20, 22, 24, 26, 28, 30, 32, 34, 36, 38, 40, 42, 44, 46, 48, 50, 52, 54, 56, 58, 60, 62, 64, 66, 68, 70, 72, 74, 76, 78, 80, 82, 84, 86, 88, 90, 92, 94, 96, 98, 100 | |

------------------

**आर. के. सभरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने आरक्षणाबाबतचे आदेश**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १८ ऑक्टोबर, १९९७.

**<u>शासन निर्णय</u>**

सर्वोच्च न्यायालयाने आर. के. सभरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य, यांच्या प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने असा निर्णय घेतला होता की, केंद्र शासनाने किंवा इतर राज्य शासनांनी आदेश निर्गमित केल्यानंतर, शासन त्याप्रमाणे आदेश निर्गमित करील.

**२.** केंद्र शासनाने त्यांच्या ज्ञापन क्रमांक ३६०१२/२/९६-एसटीटी (आरईएस),दिनांक २ जुलै, १९९७ अन्वये वरील याचिकेसंदर्भातील मार्गदर्शक तत्वासंबंधीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. ते विचारात घेऊन, सेवाभरती व बिंदुनामावलीसंदर्भात, शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे :-

**(१)** आरक्षण हे संवर्गाच्या पदसंख्येस (संवर्गातील एकूण पदांची संख्या विचारात घेऊन टक्केवारीनुसार) लावावे. रिक्त होणाऱ्या जागांच्या संदर्भात लावू नये. बिंदुनामावली ही आरक्षणाची विहित टक्केवारी पूर्ण होईपर्यन्त वापरात ठेवावी. विहित टक्केवारी पूर्ण होताच बिंदुनामावली वापरण्याची आवश्यकता नाही. त्यानंतर ज्या प्रवर्गाची जागा रिक्त होईल त्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांद्वारे ती जागा भरण्यात यावी व त्या बिंदुपुढे तो बिंदु त्या प्रवर्गासाठी उपयोगात आणला अशी नोंद घ्यावी.

**(२)** गुणवत्तेनुसार निवड झालेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्याची आरक्षण पदावर गणना करण्यात येऊ नये व त्याची नियुक्ती आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्याची गणना खुल्या प्रवर्गात करावी.

**(३)** वर (१) येथे नमूद केल्यानुसार बिंदुनामावली ही रिक्त होणाऱ्या पदावर आधारित नसावी. ती संवर्गाच्या संख्येवर आधारित असावी.

**(४)** बिंदुनामावली ही मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. ज्येष्ठता निश्चित करण्यासाठी नाही.

**(५)** बिंदुनामावली वापरताना खालील मुलभूत तत्वे विचारात घ्यावीत --

**१.** मागास प्रवर्गांना विहित केलेले आरक्षण हे टक्केवारीनुसार असावे व एकूण आरक्षण हे प्रचलित आरक्षणानुसार संवर्गाच्या ५२% पेक्षा जास्त असता कामा नये.

**२.** सरळ सेवा भरतीसाठी आणि पदोन्नतीसाठी वेगळी बिंदु नामावली ठेवावी. या व्यतिरिक्त अन्य भरती माध्यम असल्यास, त्यासाठी देखील वेगळी बिंदुनामावली ठेवावी.

**(६)** बदली, प्रतिनियुक्तीच्या पदांना बिंदुनामावली वापरु नये.

**(७)** "मागासवर्गीयांना सेवेत आरक्षण व इतर सवलती" या पुस्तिकेतील प्रकरण १(अ) २ पृ.१८/१९ यातील आदेश विचारात घेऊन छोट्या संवर्गाचे गट करण्यात यावेत.

**(८)** एकाकी पदास बिंदुनामावलीनुसार आळीपाळीने आरक्षण ठेवावे. सुरुवातीस अनुसूचित जाती व त्यानंतर खुला असे आळीपाळीने (एका आड एक) या तत्वावर याचे पालन व्हावे.

**(९)** यापुढे पदोन्नतीमध्ये भटक्या जमाती (क), धनगर व तत्सम यांना ३.५% व भटक्या जमाती (ड), वंजारी व तत्सम यांना २% आरक्षण विहित करण्यात येत आहे. नवीन १०० बिंदुनामावली सोबत जोडलेली आहे. ती १९९६-९७ च्या निवड सूची पासून अंमलात आणावी आणि तसे करताना बिंदु क्रमांक १ पासून ती वापरावी. हे आरक्षण त्या त्या निवडसूची वर्षापुरते राहील. तसेच ते "अ", "ब", "क" व "ड" या प्रवर्गात अंतर्गत परिवर्तनीय (Internally Transferrable) राहील.

**३.** वरील आदेशानुसार बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सविस्तर सूचना सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आल्या आहेत. हे आदेश दिनांक २ जुलै, १९९७ पासून अंमलात येतील. त्यापूर्वी, तयार करण्यात आलेल्या निवडसूच्या अंतिम करण्यात आल्या असल्यास, त्यांत बदल करण्याची आवश्यकता नाही. यापुढे सरळ सेवा भरती किंवा पदोन्नतीचे प्रस्ताव विचारात घेताना, त्या त्या संवर्गातील आरक्षित पदधारकांची संख्या विचारात घेऊन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रवि भू. बुध्दिराजा,**
**प्रधान सचिव (सेवा)**

# परिशिष्ट
## बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना

(१) सरळसेवा भरती करिता शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/१६-ब, दिनांक २९ मार्च, १९९७ नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

(२) सेवा प्रवेश नियमांनुसार प्रत्येक भरती माध्यमाकरिता (सरळसेवा व पदोन्नती इत्यादी) वेगवेगळी बिंदुनामावली दर्शविण्यात यावी. बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा भरती नियमांतील तरतुदी विचारात घ्याव्यात.

(३) बिंदुनामावली ही मागास प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. ज्येष्ठता निश्चित करण्यासाठी नाही.

(४) सध्या असलेली संवर्गातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, आरक्षण बिंदुची संख्या त्यानुसार त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

(५) जेथे सध्या विहित आरक्षणापेक्षा जास्त नियुक्त्या करण्यात आल्या आहेत त्यामुळे सध्याच्या तेथील नियुक्त्यांना बाधा येणार नाही.

(६) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी यानुसार तातडीने कार्यवाही करुन प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनेनुसार आढावा घ्यावा व त्यानुसार कार्यवाही करावी.

(७) सध्या अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरीलप्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहीत धरण्यात यावे.

(८) पदोन्नतीच्या वाट्यातील पदे भरण्यासाठी निवडसूची बनविताना आणि पदोन्नतीच्या वाट्याबाहेरील अन्य पदांवर तात्पुरत्या पदोन्नत्या देण्यासाठी पदोन्नती सूची बनविताना दोन वेगवेगळ्या बिंदुनामावल्या वापराव्यात.

**पदोन्नतीची १०० बिंदु नमुनेवजा नामावली**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु. जाती | २६ | खुला | ५१ | अनु. जाती | ७६ | खुला |
| २ | अनु. जमाती | २७ | अनु. जाती | ५२ | खुला | ७७ | भ. ज. (ड) |
| ३ | वि.जा. (अ) | २८ | खुला | ५३ | अनु. जमाती | ७८ | खुला |
| ४ | भ. ज. (क) | २९ | खुला | ५४ | खुला | ७९ | खुला |
| ५ | खुला | ३० | खुला | ५५ | खुला | ८० | खुला |
| ६ | खुला | ३१ | भ. ज. (क) | ५६ | खुला | ८१ | अनु. जाती |
| ७ | भ.ज. (ब) | ३२ | खुला | ५७ | भ. ज. (क) | ८२ | खुला |
| ८ | खुला | ३३ | अनु. जमाती | ५८ | खुला | ८३ | वि.जा. (अ) |
| ९ | खुला | ३४ | खुला | ५९ | खुला | ८४ | खुला |
| १० | खुला | ३५ | खुला | ६० | खुला | ८५ | खुला |
| ११ | भ. ज. (ड) | ३६ | खुला | ६१ | अनु. जाती | ८६ | खुला |
| १२ | अनु. जाती | ३७ | अनु. जाती | ६२ | खुला | ८७ | वि.मा.प्र. |
| १३ | खुला | ३८ | खुला | ६३ | अनु. जमाती | ८८ | खुला |
| १४ | खुला | ३९ | खुला | ६४ | खुला | ८९ | खुला |
| १५ | वि.मा.प्र. | ४० | खुला | ६५ | खुला | ९० | खुला |
| १६ | खुला | ४१ | वि.जा. (अ) | ६६ | खुला | ९१ | अनु. जाती |
| १७ | खुला | ४२ | खुला | ६७ | अनु. जाती | ९२ | खुला |
| १८ | खुला | ४३ | अनु. जाती | ६८ | खुला | ९३ | अनु. जमाती |
| १९ | खुला | ४४ | खुला | ६९ | खुला | ९४ | खुला |
| २० | खुला | ४५ | खुला | ७० | खुला | ९५ | खुला |
| २१ | अनु. जाती | ४६ | खुला | ७१ | अनु. जमाती | ९६ | खुला |
| २२ | खुला | ४७ | भ.ज. (ब) | ७२ | खुला | ९७ | अनु. जाती |
| २३ | अनु. जमाती | ४८ | खुला | ७३ | अनु. जाती | ९८ | खुला |
| २४ | खुला | ४९ | खुला | ७४ | खुला | ९९ | भ.ज. (ब/क) (आळीपाळीने) |
| २५ | खुला | ५० | खुला | ७५ | खुला | १०० | खुला |

| | | | |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | (१३) | : | १, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७ |
| अनुसूचित जमाती | (७) | : | २, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३ |
| विशेष मागास प्रवर्ग | (२) | : | १५, ८७ |
| विमुक्त जाती (अ) | (३) | : | ३, ४१, ८३ |
| भटक्या जमाती (ब) | (२) | : | ७, ४७ |
| भटक्या जमाती (क) | (३) | : | ४, ३१, ५७ |
| भटक्या जमाती (ब/क) | (१) | : | ९९ |
| भटक्या जमाती (ड) | (२) | : | ११, ७७ |
| सर्वसाधारण | (६७) | : | ५, ६, ८, ९, १०, १३, १४, १६, १७, १८, १९, २०, २२, २४, २५, २६, २८, २९, ३०, ३२, ३४, ३५, ३६, ३८, ३९, ४०, ४२, ४४, ४५, ४६, ४८, ४९, ५०, ५२, ५४, ५५, ५६, ५८, ५९, ६०, ६२, ६४, ६५, ६६, ६८, ६९, ७०, ७२, ७४, ७५, ७६, ७८, ७९, ८०, ८२, ८४, ८५, ८६, ८८, ८९, ९०, ९२, ९४, ९५, ९६, ९८, १०० |

---

**आर.के. समरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने आरक्षणाबाबतचे आदेश.**

---

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शुध्दीपत्रक क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २८ ऑक्टोंबर, १९९७.

**<u>शु ध्दी प त्र</u>**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८/१०/१९९७ च्या (रोनिओ प्रत) सोबतच्या १०० बिंदु नामावलीतील बिंदु क्र. ८३ अनावधानाने भ. ज. (ब) करिता दर्शविण्यात आला आहे. सदर बिंदु वि.जा. (अ) करिता राखीव आहे. दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णयाच्या छापील प्रतीमध्ये (रोटा प्रती) मध्ये याबद्दलची दुरुस्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रवि भू. बुध्दिराजा**
**प्रधान सचिव (सेवा)**

**शासकीय निवासस्थानाचे वाटप करण्यासाठी**
**<u>बिंदू नामावलीचा वापर............................</u>**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. शानिवा-२५९९/प्र.क्र. ४२/९९/२३-अ.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ६ मार्च, १९९९.

**वाचा :** १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.शानिवा २५८७/ (प्र.क्र. ९१/८५)/२३-अ. दिनांक - १२ जून, १९८६
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शानिवा २५८६/ (प्र.क्र. ८८/८७)/२३-अ. दिनांक - १ एप्रिल, १९८९
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.शानिवा १५८७/ (प्र.क्र. २४३)/२३-अ. दिनांक - ९ ऑक्टोबर, १९९०
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी १०९३/ २१०७/प्र.क्र. १४१/९३/१६-ब. दिनांक १८ जून. १९९४
५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शानिवा २५९४/ प्र.क्र. ६४३/९४/२३-अ. दिनांक २५ ऑगस्ट. १९९४
६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी १०९७/ प्र.क्र.२/९७/१६-ब. दिनांक २९ मार्च. १९९७.

**प्रस्तावना :-**

बृहन्मुंबइतील शासकीय निवासस्थानाचे वाटप करण्यासाठी बदलीपात्र. बृहन्मुंबई बाहेरुन बृहन्मुंबईत नियुक्त झालेल्या, तसेच शासन परिपत्रक, दि. १२ जून, १९८६ अन्वये वैद्यकीय व इतर कारणाने पात्र असलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या बाबतीत सरळ सेवा भरतीसाठी असलेल्या २०० बिंदू नामावलीच्या आधारे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. शानिवा २५९४/प्र.क्र. ६४३/९४/२३-अ. दिनांक २५ ऑगस्ट, १९९४ अन्वये आरक्षण बिंदू नामावली तयार करण्यात आली होती.

मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना शासकीय निमशासकीय सेवेत आरक्षण विहित करण्यात आले आहे. त्यानुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९७/प्र.क.२/९७/१६-ब. दिनांक २९.३.१९९७ नुसार सरळ सेवा भरतीसाठी १०० बिंदू नामावली तयार करण्यात आली. सदर नामावलीच्या आधारे शासकीय निवासस्थानांचा वाटपासाठी १०० बिंदू नामावली तयार करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**निर्णय :-** याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, शासकीय निवासस्थानांचे वाटप करताना -

**१.** शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब. दिनांक २९ मार्च, १९९७. अन्वये निर्गमित केलेल्या १०० बिंदू नामावली मधील ५२ बिंदू मागासवर्गीयांसाठी आरक्षित केलेले असून ४८ बिंदू खुल्या वर्गासाठी आरक्षित केलेले आहेत.

**२.** मागासवर्गीयासाठी आरक्षित केलेल्या ५२ बिंदूतील ३५ बिंदू हे बदलीपात्र व बृहन्मुंबई ठाणे व नवी मुंबई या जिल्ह्याच्या क्षेत्राच्या बाहेरुन सेवेसाठी आले त्या अधिकारी/कर्मचारी यांची स्वत:च्या/कुटुंबियांच्या नांवे मुंबई /नवी मुंबई तसेच लोहमार्गावरील विरार पर्यन्त व मध्य लोहमार्गावरील कर्जत/कसारा पर्यन्त (जेथून कर्मचारी रोज मुंबईतील कार्यालयांत ये-जा करु शकतात/करतात) सदनिका नाहीत. अशांना निवासस्थानाचे वाटप करण्यासाठी वापरण्यात यावेत.

**३.** खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित केलेल्या ४८ बिंदूतील ३२ बिंदू हे बदलीपात्र व बृहन्मुंबई. ठाणे व नवी मुंबई या जिल्ह्याच्या क्षेत्राच्या बाहेरुन सेवेसाठी आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची स्वत:च्या/कुटुंबियांच्या नांवे मुंबई/नवी मुंबई तसेच लोहमार्गावरील विरार पर्यन्त व मध्य लोहमार्गावरील कर्जत/कसारा पर्यन्त (जेथून कर्मचारी रोज मुंबईतील कार्यालयांत ये-जा करु शकतात/करतात) सदनिका नाहीत. अशांना निवासस्थानाचे वाटप करण्यासाठी वापरण्यात यावेत.

**४.** मागासवर्गीयासाठी आरक्षित केलेल्या ५२ बिंदू पैकी १७ बिंदू तसेच खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित केलेल्या ४८ बिंदू पैकी १६ बिंदू हे त्या त्या प्रवर्गात टक्केवारी नुसार व शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. शानिवा-२५८५/प्र.क्र.९१/८५/२३-अ. दि. १२.६.८६ अन्वये विहित केल्यानुसार खालील अधिकारी/कर्मचारी यांना वाटप करण्यात यावेत.

१. अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांचे कुटुंबिय हृदय किंवा कर्करोगाने पिडित असल्यास.
२. अधिकारी/कर्मचारी स्वत: माजी सैनिक असल्यास.
३. अधिकारी/कर्मचारी स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबिय असल्यास.
४. महिला अधिकारी/कर्मचारी प्रशासकीय कारणावरुन मुंबई बाहेरुन बदली होऊन आली असल्यास.

खुल्या वर्गातील वर परिच्छेद ४ मध्ये दर्शविलेल्या १६ बिंदू पैकी ३ बिंदू हे मागासवर्गीय / खुल्या प्रवर्गातील जे अधिकारी / कर्मचारी स्वत: अपंग (अस्थिव्यंग/मुकबधिर/अंध) असल्यास वाटप करण्यात येतील.

वरील प्रमाणे १०० बिंदू नामावली सोबत (परिशिष्ट - 'अ') जोडली आहे.

**५.** वरील आरक्षण बिंदू नामावलीचा वापर करताना अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास या दोन प्रवर्गातील आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय राहील. तसेच विमुक्त जाती/ भटक्या जमाती करीता 'अ', 'ब', 'क' व 'ड' या प्रवर्गातील आरक्षण अंतर्गत परीवर्तनीय राहिल.

**६.** ज्या ठिकाणी एकाकी बिंदू आहेत, त्या ठिकाणी आलटून पालटून प्राधान्याने निवासस्थानाचे वाटप करावे.

**७.** निवासस्थानाचे वाटप बिंदू नामावलीनुसारच करण्यात येईल.

**८.** मंत्रालयातील सर्व विभाग व बृहन्मुंबईतील विभाग व कार्यालय प्रमुख यांनी कृपया या निर्णयातील तरतुदी आणि सूचना त्यांच्या अधिपत्या खालील अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**प्र.म. देवभानकर**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

## परिशिष्ट 'अ'

**सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. शानिवा- २५९९/प्र.क्र.४२/९९/२३-अ, दिनांक :- ६ मार्च, १९९९ चे सहपत्र.**

| अनुक्रमांक | वर्ग | अनुक्रमांक | वर्ग |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचीत जाती | ३६ | खुला |
| २ | अनुसूचीत जमाती | ३७ | अनुसूचीत जाती |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३८ | खुला |
| ४ | भटक्या जमाती (ब) प्राधान्य | ३९ | इतर मागास वर्ग |
| ५ | इतर मागास वर्ग | ४० | खुला प्राधान्य |
| ६ | खुला | ४१ | विमुक्त जाती (अ) प्राधान्य |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४२ | खुला |
| ८ | खुला | ४३ | अनुसूचीत जाती |
| ९ | इतर मागास वर्ग | ४४ | खुला |
| १० | खुला प्राधान्य | ४५ | इतर मागास वर्ग |
| ११ | भटक्या जमाती (ड) प्राधान्य | ४६ | खुला प्राधान्य |
| १२ | अनुसूचीत जाती | ४७ | भटक्या जमाती (ब) |
| १३ | खुला | ४८ | खुला |
| १४ | खुला | ४९ | इतर मागास वर्ग |
| १५ | विशेष मागास वर्ग प्राधान्य | ५० | खुला |
| १६ | खुला प्राधान्य | ५१ | अनुसूचीत जाती |
| १७ | इतर मागास वर्ग प्राधान्य | ५२ | खुला प्राधान्य |
| १८ | खुला | ५३ | अनुसूचीत जमाती |
| १९ | इतर मागास वर्ग | ५४ | खुला |
| २० | खुला | ५५ | इतर मागास वर्ग प्राधान्य |
| २१ | अनुसूचीत जाती | ५६ | खुला |
| २२ | खुला प्राधान्य | ५७ | भटक्या जमाती (क) प्राधान्य |
| २३ | अनुसूचीत जमाती | ५८ | खुला प्राधान्य |
| २४ | खुला | ५९ | इतर मागास वर्ग |
| २५ | इतर मागास वर्ग | ६० | खुला |
| २६ | खुला | ६१ | अनुसूचीत जाती प्राधान्य |
| २७ | अनुसूचीत जाती प्राधान्य | ६२ | खुला |
| २८ | खुला प्राधान्य | ६३ | अनुसूचीत जमाती |
| २९ | इतर मागास वर्ग | ६४ | खुला प्राधान्य (अपंग) |
| ३० | खुला | ६५ | इतर मागास वर्ग |
| ३१ | भटक्या जमाती (क) प्राधान्य | ६६ | खुला |
| ३२ | खुला | ६७ | अनुसूचीत जाती |
| ३३ | अनुसूचीत जमाती प्राधान्य | ६८ | खुला |
| ३४ | खुला प्राधान्य (अपंग) | ६९ | इतर मागास वर्ग |
| ३५ | इतर मागास वर्ग प्राधान्य | ७० | खुला प्राधान्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ७१ | अनुसूचीत जमाती | ८६ | खुला |
| ७२ | खुला | ८७ | विशेष मागास वर्ग |
| ७३ | अनुसूचीत जाती | ८८ | खुला प्राधान्य |
| ७४ | खुला | ८९ | इतर मागास वर्ग |
| ७५ | इतर मागास वर्ग प्राधान्य | ९० | खुला |
| ७६ | खुला प्राधान्य | ९१ | अनुसूचीत जाती प्राधान्य |
| ७७ | भटक्या जमाती (ड) | ९२ | खुला |
| ७८ | खुला | ९३ | अनुसूचीत जमाती प्राधान्य |
| ७९ | इतर मागास वर्ग | ९४ | खुला प्राधान्य (अपंग) |
| ८० | खुला | ९५ | इतर मागास वर्ग प्राधान्य |
| ८१ | अनुसूचीत जाती | ९६ | खुला |
| ८२ | खुला प्राधान्य | ९७ | अनुसूचीत जाती |
| ८३ | विमुक्त जाती (अ) | ९८ | खुला |
| ८४ | खुला | ९९ | भटक्या जमाती (ब/क) प्राधान्य |
| ८५ | इतर मागास वर्ग | १०० | खुला प्राधान्य |

-----------------

**अनुसूचित जमातीची लोकसंख्या प्रामुख्याने जास्त असलेल्या ठाणे, नाशिक, धुळे, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांसाठी वर्ग-३ व वर्ग-४ साठी सेवेत अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बी.सी.सी.१०९८/प्र.क्र.११६/९८/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २२ सप्टेंबर, १९९९.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी - १०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक १८ जून, १९९४.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी - १०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक १ सप्टेंबर १९९७.

**शासन निर्णय :-** उपरोक्त १८ जून, १९९४ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीची लोकसंख्या तुलनेने अधिक असलेल्या सात जिल्ह्यांमध्ये गट-क आणि गट-ड मध्ये सरळसेवा पदाच्या भरतीसाठी अनुसूचित जमातीकरिता असलेले वाढीव आरक्षण त्या पुढेही तसेच चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. महसूल व वन विभागाच्या क्रमांक, पीईएन-३१९७/सीआर-७४/एम-१०, दिनांक ३० जून, १९९८ च्या अधिसूचनेद्वारे धुळे जिल्हयाचे विभाजन करून धुळे व नंदुरबारअसे २ जिल्हे निर्माण करण्यात आले आहेत. धुळे जिल्हयामध्ये अनुसूचित जमातीकरिता शासकीय सेवेतील गट-क आणि गट-ड मधील सरळसेवा भरतीसाठी २२टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. त्यामुळे नवनिर्मित नंदुरबार जिल्हयासाठी देखील शासकीय सेवेत गट-क आणि गट-ड मधील सरळसेवा भरतीच्या पदांसाठी अनुसूचित जमातीकरिता २२ टक्के आरक्षण लागू करण्यात येत आहे. यासाठी उपरोक्त दिनांक १ सप्टेंबर १९९७ च्या शासन निर्णयाप्रमाणे तसेच धुळे जिल्ह्यासाठी असलेल्या बिंदुनामावली प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शैला तारगे पाटील,**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**अनुसूचित जाती कल्याण समिती व विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समितीने बिंदूनामावली व आरक्षणाची पदे भरण्याबाबत केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ५ नोव्हेंबर, २००९

**संदर्भ :** १) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०६४/१११/जे, दि. ९ एप्रिल, १९६५.

२) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०७२/इसीआर-जे, दि. २७ जून, १९७४.

३) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०८५/२९८८/१६-ब, दि. १३ ऑगस्ट, १९८६.

४) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०९१/२५५१ (क)/१६-ब, दि. २७ मार्च, १९९१.

५) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०९४/सीआर ५७/९४/१६-ब, दि. ५ डिसेंबर, १९९४.

६) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०९७/सीआर २/१६-ब, दि. २९ मार्च, १९९७.

७) शासन निर्णय, क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दि. १८ ऑक्टोबर, १९९७.

८) महाराष्ट्र आरक्षण कायदा क्रमांक ८/२००४.

९) शासन निर्णय, क्रमांकः बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २५ मे, २००४,

१०) शासन निर्णय, क्रमांकःबीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि. २६ ऑक्टोबर, २००४.

११) शासन निर्णय, क्रमांकः बीसीसी २००८/प्र.क्र.४०७/०८/१६-ब, दि. २७ ऑक्टोबर, २००८.

१२) शासनपत्र क्रमांकः बीसीसी २००९/प्र.क्र.३३५/०९/१६-ब, दि. ६ एप्रिल २००९

१३) शासनपत्र क्रमांकः बीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दि. ११ मे २००९.

**प्रस्तावना :**

मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणांच्या आदेशांचे योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी मंत्रालयतीन स्तरावर सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत मागासवर्ग कक्षाची स्थापना जून १९७४ मध्ये तर क्षेत्रीय स्तरावर विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली मागासवर्ग कक्षाची स्थापना दि. १३ ऑगस्ट, १९८६ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे, व या दोन्ही कक्षाची कार्यकक्षा सुद्धा निश्चित करुन देण्यात आली आहे. त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर सहाय्यक आयुक्त (मावक) यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयातील वर्ग ३ व ४ च्या कर्मचाऱ्यांच्या बिंदूनामावल्या तपासून प्रमाणित करावयाच्या आहेत. राज्यातील सर्व वर्ग १ व वर्ग २ अधिकाऱ्यांच्या बिंदूनामावल्या मंत्रालयातील मागासगवर्ग कक्षाने तपासून प्रमाणिक करावयाच्या आहेत. शासनाचे याबाबत स्थायी शासकीय आदेश असतानाही बहुतांशी शाळा / महाविद्यालये, विद्यापीठे, शासकीय कार्यालये यांच्या बिंदू नामावल्या योग्य रित्या प्रमाणित केल्या जात नाहीत असे निदर्शनास आले आहे. शालेय शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बिंदूनामावल्या सध्या शिक्षणाधिकारी / उपसंचालक (शिक्षण) यांचेकडून तपासून देण्यात येत आहेत. या बिंदूनामावल्या सहायक आयुक्त (मावक) यांनी प्रमाणित करावयाच्या आहेत. तथापि अशा प्रकारची कार्यवाही होताना दिसून येत नाही. यामुळे बिंदूनामावल्या प्रमाणित करावयाच्या कार्यवाहीत मोठ्या प्रमाणात त्रुटी

आढळून आल्या आहेत. या अनुषंगाने शासनाने संदर्भाधीन क्र. १२ येथील पत्रान्वये, त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील बिंदुनामावल्यांना सहायक आयुक्त (मावक) / मंत्रालयीन मागासवर्ग कक्ष यांची अंतिम मान्यता असल्याखेरीज नियुक्ती/पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येऊ नये. जर काही अपवादात्मक परिस्थितीमध्येअशी मान्यता घेणे शक्य झाले नसल्यास अशा बिंदूनामावल्यांना ६ महिन्यांच्या आत सहाय्यक आयुक्त (मावक)/मंत्रालयीन मागासवर्ग कक्ष यांची अंतिम मान्यता आवश्यक राहील अशा सूचना निर्गमित केल्या आहेत. अनूसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजा / भज व इमाव कल्याण समितीने शासनाच्या बिंदुनामावल्या तपासण्याच्या सद्याच्या कार्यपद्धतीमध्ये असलेल्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत. या सर्व बाबी विचारात घेवून संदर्भाकीत क्र. १२ येथील पत्रान्वये दिलेल्या सूचना आता रद्द करुन आता खालीलप्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत :

## परिपत्रक

१) सरळसेवा प्रवेशासाठी शासन निर्णय क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/१६-ब, दि. २९ मार्च १९९७ अन्वये तसेच पदोन्नतीसाठी शासन निर्णय क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दि. १८ ऑक्टोबर १९९७ अन्वये स्वतंत्र १०० बिंदूनामावली निश्चित केली आहे. बिंदूनामावली नोंदवह्या अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकाऱ्यांची आहे व बिंदूनामावल्या कशा प्रकारे ठेवाव्यात याविषयी स्पष्ट सूचना शासनाच्या दि. २३.११.१९७० च्या शासन परिपत्रकान्वये दिल्या आहेत. असे असतानाही शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अद्याप बऱ्याच कार्यालयांनी बिंदूनामावल्याच ठेवेलेल्या नाहीत. बिंदूनामावल्या न ठेवता नियुक्त्या व पदोन्नत्या देण्याची कार्यवाही करणे हे शासनाच्या आरक्षण विषयक धोरणाशी विसंगत आहे. तरी सर्व प्रशासकीय विभागांनी, तसेच त्यांच्या अधिनस्त ज्या कार्यालयांनी अद्याप बिंदूनामावल्या ठेवलेल्या नाहीत त्यांनी त्या त्वरीत तयार करुन या परिपत्रकाच्या सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्यांकडून त्या प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

२. विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या मागासवर्ग कक्षास, त्याचबरोबर शालेय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयाच्या / शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बिंदूनामावल्या प्रमाणित करण्याचे कोणतेही आदेश या विभागाने दिलेले नसतानाही या कार्यालयांकडून / अधिकाऱ्यांकडून परस्पर मागासवर्ग कक्षाची मान्यता न घेता बिंदू नामावल्या प्रमाणित केल्या जात आहे. बिंदू नामावल्या, या परिपत्रकाच्या प्रपत्र "अ" मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्यांशिवाय इतर अधिकाऱ्यांनी प्रमाणित केल्या असल्यास व त्यानुसार नियुक्त्या / पदोन्नती देण्याची कार्यवाही केली असल्यास सदरहू कार्यवाही ही नियमबाह्य ठरते व अशा नियमबाह्य कार्यवाहीस संबंधित नियुक्ती प्राधिकारी व्यक्तिशः जबाबदार राहतील.

३. सरळसेवा व पदोन्नतीमध्ये छोट्या संवर्गाच्या बाबतीत मागास प्रवर्गाची आरक्षणाची पदे कशी भरावीत या विषयीच्या स्पष्ट सूचना ह्या विभागाने शासन निर्णय दि. ५-१२-१९९४ व शासन परिपत्रक क्र. दि. २७.१०.२००८ अन्वये दिलेल्या आहेत. असे असतानाही मागासप्रवर्गाची पदे भरताना या सूचनांकडे दुर्लक्ष होत आहे असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव वर उल्लेखित शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील सूचना नुसार आरक्षणाची पदे भरण्याची कार्यवाही काटेकोरपणे करण्याबाबत पुन्हा सूचना देण्यात येत आहेत.

४. सरळसेवेची पदे भरत असताना मागासप्रवर्गाची पदे उमेदवारांअभावी रिक्त रहात असल्यास अशी पदे अदलाबदलीने भरण्याची कार्यपद्धती शासन निर्णय दि. ५ डिसेंबर, १९९४ अन्वये निश्चित करण्यात आली आहे. असे असतानाही बऱ्याच विभागाकडून / कार्यालयाकडून मागासप्रवर्गाच्या बिंदूवर परस्पर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांना शासनाची मान्यता न घेता नियुक्त्या दिल्या जात आहेत. विशेषकरुन विना अनुदानित / अनुदानित संस्थाचे बाबत ही बाब प्रामुख्याने निदर्शनास आली आहे. यास्तव सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालय प्रमुख / नियुक्ती प्राधिकारी यांच्या निदर्शनास वर उल्लेखित दि. ५ डिसेंबर, १९९४ च्या

शासन निर्णयातील तरतुदी, तसेच आरक्षण कायद्यातील सर्व प्रमुख तरतूदी निदर्शनास आणाव्यात. मागासवर्गीयांच्या राखीव बिंदूवर खुल्या प्रवर्गातून नियुक्त्या दिल्या असल्यास अशी सर्व प्रकरणे सामान्य प्रशासन विभागा (मागासवर्ग कक्ष) च्या निदर्शनास आणावीत आणि अशा सर्व नियुक्त्या रद्द करुन, रिक्त होणाऱ्या जागा मागासप्रवर्गातून भरण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

५. आरक्षण कायदा २००४ नुसार आरक्षण कायद्यातील तरतुदींचा भंग करुन केलेल्या नियुक्त्या अथवा पदोन्नत्या या नियमबाह्य ठरतात. यास्तव सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी याविषयी सर्वंकष आढावा घेऊन मागास प्रवर्गांच्या जागांवर बिगर मागासप्रवर्गाच्या कर्मचारी / अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही याची खात्री करुन घ्यावी. जर अशा प्रकारे गैरमार्गाने नियुक्त्या केलेल्या असल्यास त्वरीत अशा नियुक्त्या रद्द करुन रिक्त होणारी पदे संबंधित मागास प्रवर्गातून त्वरीत भरावीत. अन्यथा अशा अनियमिततेस नियुक्ती प्राधिकारी हे व्यक्तिश: जबाबदार राहतील.

६. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही शैक्षणिक संस्था मधील आदिवासी प्रवर्गाच्या जागा बऱ्याच वर्षापासून रिक्त आहेत. मुलाखतीसाठी आदिवासी प्रवर्गातील उमेदवार उपस्थित राहतात. परंतु त्यांना नियुक्ती न देता जागा रिक्त ठेवण्यात येतात. ही बाब गंभीर असून जोपर्यन्त अनुशेष आहे तोपर्यंत विशेष भरती मोहिम राबवून मागास प्रवर्गच्या अनुशेषाची पदे भरण्याची कार्यवाही सुरु ठेवावी अशा स्पष्ट सूचना शासनाने वेळोवेळी दिलेल्या आहेत. मागास प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध असूनही त्यांना नियुक्त्या न देता अनुशेष पुढे ओढणे यासारख्या बाबी जर काही शासकीय विभगांनी / कार्यालयांनी केल्या असल्यास संबधित नियुक्ती प्राधिकारी यांनी याविषयी संबंधित सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांचेमार्फत याबाबतचा सविस्तर अहवाल संबंधित प्रशासकीय विभाग व सामान्य प्रशासन विभाग मागासप्रवर्ग कक्षास सादर करणे आवश्यक आहे.

७. मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज यापुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येऊ नये.

८. सरळसेवा / पदोन्नतीद्वारे पद भरती / पदोन्नती करीत असताना निवडसमिती / विभागीय पदोन्नती समितीमध्ये मागासप्रवर्गाच्या प्रतिनिधीचा समावेश करणे आवश्यक आहे.

९. विधान मंडळाच्या, अनुसूचित जाती कल्याण समिती / अनुसूचित जमाती कल्याण समिती / विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती / इतर मागास वर्ग कल्याण समिती यांनी बिंदुनामावली तयार करण्याचे काम विहीत कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे अशी शिफारस शासनास केली आहे. या अनुषंगाने सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये शैक्षणिक संस्था यांची तपासणी करुन ज्या कार्यालयांनी अद्याप बिंदूनामावली ठेवली नसेल किंवा बिंदूनामावली ठेवली आहे परंतु प्रमाणित केलेली नाही अशा सर्व कार्यालयांनी तीन महिन्याच्या आत कार्यवाही पुर्ण करावी. जोपर्यंत बिंदुनामावली सहाय्यक आयुक्त (मावक) यांच्याकडून प्रमाणित करुन घेतली जाणार नाही तोपर्यंत अशा संस्थाचे पुढील अनुदान रोखण्यात यावे. अशा संस्थांच्या बाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल अनुदान वितरीत करण्यास सहमती देणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्रत्येक वर्षी ३१ मे पर्यंत सहायक आयुक्त (मावक) यांना सादर करणे बंधनकारक राहील. सहायक आयुक्त (मावक) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्राप्त होणारे सर्व अहवाल एकत्रित करुन त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रधान सचिव (मावक) यांना ३१ जुलै पर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

१०. अ) प्रत्येक कार्यालयाने बिंदू नामावली बरोबर ठेवली आहे कि नाही तसेच बिंदूनामावलीच्या क्रमानुसार आरक्षणाची पदे भरली आहेत किंवा कसे याची पडताळणी करण्यासाठी प्रत्येक ३ महिन्यास प्रपत्र "ड" मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व कार्यालयांनी २ प्रतीमध्ये सहाय्यक आयुक्त (मावक) यांचेकडे माहिती सादर करावी. सहाय्यक

आयुक्त (मावक) यांनी १ प्रत आपलेकडे ठेवून दुसरी प्रत आपल्या अभिप्रायासह प्रधान सचिव (साविस) यांचेकडे सादर करावी.

ब) बिंदू नामावल्या प्रमाणित करणाऱ्या अधिकाऱ्यांना एखाद्या प्रकरणी मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना डावलून अशी पदे खुल्या प्रवर्गातून भरली आहेत ही बाब निदर्शनास आल्यास याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल संबंधित प्रशासकीय विभाग व मंत्रालय मागासवर्ग कक्षास सादर करणे आवश्यक आहे. संबंधित संस्थांना शासनाचे अनुदान वितरीत करणाऱ्या अधिकाऱ्यांनी यापुढे स्वतः जातीने लक्ष घालून या संस्थांनी सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष / मंत्रालयीन मागासवर्ग कक्ष यांनी प्रमाणित केलेल्या बिंदू नामावलीनुसार मागास प्रवर्गाची सर्व पदे भरली आहेत याची खात्री करुन मगच अनुदान वितरीत करणे आवश्यक आहे. अन्यथा बिंदू नामावली प्रमाणित करणारे अधिकारी त्याचबरोबर अनुदान वितरीत करणारे अधिकारी व नियुक्ती प्राधिकारी हे या अनियमिततेस जबाबदार राहतील.

क) प्रधान सचिव (साविस) यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक ३ महिन्यांनी म्हणजेच एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी च्या तिसऱ्या सोमवारी मागास प्रवर्गाच्या सरळसेवा व पदान्नतीमधील अनुशेषाबाबत आढावा बैठक घेण्यात येईल. नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी मागासप्रवर्गाच्या अनुशेषाबाबत दिलेली व शासनाकडे सामाजिक संघटना / लोकप्रतिनिधी यांनी दिलेली माहिती याची पडताळणी केली असता पडताळणीअंती नियुक्ती प्राधिकारी / सहाय्यक आयुक्त (मावक) यांनी दिलेली माहितीमध्ये विसंगती आढळून आल्यास अथवा चुकीची माहिती दिल्याचे निदर्शनास आल्यास अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

११. राज्यामध्ये आरक्षण कायदा २००४ लागू करण्यात आला आहे. ह्या कायद्यातील कलम ११ मधील तरतुदीनुसार या अधिनियमातील तरतुदीचे उल्लंघन करुन केलेल्या कोणत्याही नियुक्त्या निरर्थक ठरतात. तसेच कलम ८ मधील तरतुदीनुसार आरक्षण कायद्यातील तरतुदींचा हेतूपुरस्सर रितीने भंग होईल अशी कृती करणाऱ्या अधिकाऱ्याला ९० दिवसाच्या कारावसाची किंवा रु. ५०००/- एवढ्या दंडाची अथवा दोन्ही, अशा शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. यास्तव सर्व प्रशासकीय विभागांना सूचना करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यालये, स्थानिक मंडळे, सांविधानिक मंडळे, महामंडळे इ. ना. उपरोक्त नमूद केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकातील सूचना त्याचबरोबर आरक्षण कायद्यातील महत्वाच्या तरतूदी निदर्शनास आणून द्याव्यात. सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांच्या बिंदूनामावल्या अद्ययावत ठेवून त्यास सहाय्यक आयुक्त (मावक) / मंत्रालयीन मागासवर्ग कक्ष यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावे. सहाय्यक आयुक्त (मावक) व मंत्रालयीन मागासवर्ग कक्ष यांना कार्यालयीन भेटीच्या वेळी आवश्यक ती माहिती सत्वर उपलब्ध करुन द्यावी. जाणीवपुर्वक मागासवर्गीयांबाबत उपस्थित झालेल्या मुद्यांना माहिती देण्यास विलंब लावणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवरती शिस्तभंगांची कार्यवाही करण्यात येईल.

सदरहू परिपत्रक शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९११०५१७१२२४००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**(एन.आरुमुगम)**
**प्रधान सचिव, साविस**

## प्रपत्र अ
## बिंदूनामावली तयार करणे प्राथमिक तपासणी / अंतिम तपासणी करणारे प्राधिकारी

| अ.क्र. | संबंधित कार्यालय | बिंदूनामावली कोणी ठेवावी | प्राथमिक तपासणी कोणी करावी | बिंदूनामावलीस मान्यता देणारे प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालये (वर्ग ४ ते वर्ग १ संवर्ग) | संबंधित संस्था / नियुक्ती प्राधिकारी | विद्यापीठ मागासप्रवर्ग कक्ष | सहाय्यक आयुक्त (मावक) |
| २. | विद्यापीठ खुद्द वर्ग ३ व वर्ग ४ | नियुक्ती प्राधिकारी | विद्यापीठ मागासप्रवर्ग कक्ष | सहाय्यक आयुक्त (मावक) |
| ३. | विद्यापीठ खुद्द वर्ग २ वर्ग १ | नियुक्ती प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (मावक) | प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) |
| ४. | प्राथमिक व माध्यमिक शाळा | नियुक्ती प्राधिकारी | शिक्षण अधिकारी | सहाय्यक आयुक्त (मावक) |
| ५. | माध्यमिक शाळांना संलग्न असलेली ज्युनिअर महाविद्यालये | नियुक्ती प्राधिकारी | उपसंचालक, उच्च शिक्षण | सहाय्यक आयुक्त (मावक) |
| ६. | शासकीय / निमशासकीय कार्यालये वर्ग २ व वर्ग १ | नियुक्ती प्राधिकारी | संबंधित मंत्रालयीन विभाग | प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) |
| ७. | मंत्रालय वर्ग १, २, ३ कर्मचाऱ्यांची बिंदूनामावली ठेवणे मंत्रालय वर्ग ४ | नियुक्ती प्राधिकारी | उप सचिव, (आस्थापना) / साप्रवि-१४ उप सचिव, प्रशासन | प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) |
| ८. | राज्यस्तरीय शैक्षणिक संस्था / राज्यस्तरीय कार्यालयातील आस्थापना | नियुक्ती प्राधिकारी | मुख्य कार्यालय ज्या महसूली विभागांमध्ये असेल त्यांचे सहाय्यक आयुक्त (मावक) | प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) |
| ९. | इतर सर्व राज्यस्तरीय शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, सहकारी बँका / मुक्त विद्यापीठे | नियुक्ती प्राधिकारी | मुख्य कार्यालय ज्या महसूली विभागांमध्ये असेल त्यांचे सहायक आयुक्त (मावक) | प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावक) |

**प्रपत्र - ब**

**शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक १८.१०.१०९७ नुसार**

**पदोन्नतीच्या छोट्या संवर्गासाठी आरक्षित पदांचा तपशील**

| मंजूर पदे | आरक्षित पदे | प्रवर्गनिहाय आरक्षण |
|---|---|---|
| १ | निरंक | शासन निर्णय दि. २९-९-१९९८ नुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही. |
| २ | १ | प्रथम अजा-१ तदनंतर अ.जमाती, वि.जा.भ.ज., वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ३ | १ | वरीलप्रमाणे |
| ४ | १ | वरीलप्रमाणे |
| ५ | २ | अ.जा.-१, अ.ज.-१ तदनंतर वि.जा.भ.ज., वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ६ | २ | अ.जा.-१, अ.ज.-१ तदनंतर वि.जा.भ.ज., वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ७ | २ | वरीलप्रमाणे |
| ८ | ३ | अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.-१, वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ९ | ३ | वरीलप्रमाणे |
| १० | ३ | वरीलप्रमाणे |
| ११ | ४ | अ.जा.-२, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.-१, व नंतर वि.मा.प्र.आळीपाळीने |
| १२ | ४ | वरीलप्रमाणे |
| १३ | ४ | वरीलप्रमाणे |
| १४ | ५ | अ.जा.-२, अ.ज.-१, वि.जा.(अ) १ भ.ज. (क) १ नंतर वि.मा.प्र.आळीपाळीने |
| १५ | ५ | वरीलप्रमाणे |
| १६ | ५ | वरीलप्रमाणे |
| १७ | ६ | अ.जा.-३, अ.ज.-१, वि.जा.(अ) १ भ.ज. (क) १ नंतर वि.मा.प्र.आळीपाळीने |
| १८ | ६ | वरीलप्रमाणे |
| १९ | ६ | वरीलप्रमाणे |
| २० | ७ | अ.जा.-३, अ.ज.-२, वि.जा.(अ) १ भ.ज. (क) १ नंतर वि.मा.प्र.आळीपाळीने |
| २१ | ७ | वरीलप्रमाणे |
| २२ | ७ | वरीलप्रमाणे |
| २३ | ८ | अ.जा.-३, अ.ज.-२, वि.जा.(अ) १ भ.ज. (ब) १, भ.ज.(क) १ नंतर वि.मा.प्र.१ आळीपाळीने |
| २४ | ८ | वरीलप्रमाणे |
| २५ | ८ | वरीलप्रमाणे |
| २६ | ९ | अ.जा.-३, अ.ज.-२, वि.जा.(अ) १ भ.ज.(ब) १, भ.ज. (क) १ नंतर वि.मा.प्र.१ |
| २७ | ९ | वरीलप्रमाणे |
| २८ | ९ | वरीलप्रमाणे |
| २९ | १० | अ.जा.-३, अ.ज.-२, वि.जा.(अ) १ भ.ज.(ब) १, भ.ज. (क) १ नंतर वि.मा.प्र.१ आळीपाळीने |
| ३० | १० | वरीलप्रमाणे |
| ३१ | १० | वरीलप्रमाणे |
| ३२ | ११ | अ.जा.-४, अ.ज.-२, वि.जा.(अ) १ भ.ज.(ब) १, भ.ज. (क) १, भ.ज. (ड) १ |

**प्रपत्र - "क"**
**शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि. २९ मार्च, १९९७ नुसार**
**सरळसेवेकरीता छोट्या संवर्गासाठी आरक्षित पदांचा तपशील**

| पदसंख्या | खुले पद | आरक्षणाची पदे | |
|---|---|---|---|
| २ | १ | १ | प्रथम अ.जा.नंतर अ.ज.वि.जा.भ.ज.-इ.मा.व.-वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ३ | २ | १ | प्रथम अ.जा. १ नंतर अ.ज.वि.जा.भ.ज.-इ.मा.व.-वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ४ | २ | २ | प्रथम अ.जा.-१ व अ.ज.-१ नंतर वि.जा.भ.ज.-इ.मा.व.-वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ५ | ३ | २ | प्रथम अ.जा.-१ व अ.ज.-१ नंतर वि.जा.भ.ज.-इ.मा.व.-वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ६ | ३ | ३ | प्रथम अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.-१ नंतर इ.मा.व.-वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ७ | ४ | ३ | प्रथम अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज./इ.मा.व/ वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ८ | ४ | ४ | अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.-१, इ.मा.व.-१ नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |
| ९ | ५ | ४ | अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.-१, इ.मा.व.-१ नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |
| १० | ५ | ५ | अ.जा.-१, अ.ज.-१, वि.जा.भ.ज.-१, इ.मा.व.-२ नंतर वि.मा.प्र. आळीपाळीने |

## प्रपत्र ड

## मागास प्रवर्गाच्या आरक्षित बिंदूवर इतर प्रवर्गातून केलेल्या नियुक्त्या

**कार्यालयाचे नांव :**
**कार्यालयाचा संपुर्ण पत्ता :**
**दूरध्वनी क्रमांक :**
**व दिनांक :**

**संवर्गाचे नांव :**
**वेतनश्रेणी :**
**अहवालाचा महिना**

| जाती प्रवर्गाचे नाव | मंजूर पदसंख्या | प्रत्यक्षात मागास प्रवर्गाची भरलेली पदसंख्या | ज्या प्रवर्गासाठी बिंदू आरक्षित होता परंतू प्रत्यक्षात दुसऱ्या प्रवर्गातून पद भरले अशा प्रकरणांची संख्या | स्तंभ क्र.४ बाबतची थोडक्यात कारण-मीमांसा | ज्या प्रवर्गासाठी बिंदू आरक्षित होता त्या प्रवर्गाव्यतिरिक्त दुस-या प्रवर्गातून बिंदू भरण्यास सहमती देणाऱ्या प्राधिका-याचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**सहाय्यक आयुक्त (मावक)**

**कार्यालय प्रमुखाची सही व हुद्दा**

**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी <u>सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१३/प्र.क्र.३५४/भागा-२/२०१३/१६-ब,
दिनांक : २४ जुलै, २०१४.

**<u>वाचा :-</u>**

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४.
२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/ मावक, दि. १५ जुलै, २०१४.
३. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९/०३/१९९७.

**<u>प्रस्तावना :-</u>**

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश २०१४ **(सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १३)** अन्वये **"शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग"** निर्माण करण्यात आला आहे. सदर अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार प्रवर्गात सरळसेवेच्या पदभरतीमध्ये १६ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

उक्त अध्यादेशातील कलम ४(१) नुसार व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १५ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षणास अनुसरुन, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९/०३/१९९७. च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात उक्त अध्यादेशातील कलम ८ (१) नुसार सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>** शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी (ईएसबीसी) संदर्भाधीन क्रमांक १ येथील अध्यादेशानुसार १६ टक्के आरक्षण लागू करण्याची तरदूद करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. १५ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयान्वये, राज्यात शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास समाजासाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम १५(४), १५(५), १६(४) व ४६ नुसार शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र.) (Educationally and Socially Backward Category) (E.S.B.C.) असा नवीन प्रवर्ग तयार करण्यात आल्याचे व

या प्रवर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आल्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्याअनुषंगाने शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (शै.सा.मा.प्र.) (Educationally and Socially Backward Category) (E.S.B.C.) (प्रवर्गासाठी, राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय/ निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १६ टक्के आरक्षण विहित करण्यात येत आहे. त्यानुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९/०३/१९९७. अन्वये विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारित करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक १ येथील, दिनांक ९ जुलै, २०१४ चा अध्यादेश प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून, शासकीय/निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसंदर्भात सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित करण्यात येत असलेल्या सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करण्यात यावा.

३. गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची संबंधीत प्रवर्गाच्या आरक्षित पदावर गणना करण्यात येऊ नये. त्यांची नियुक्ती संबंधीत आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्यांची नोंद खुल्या प्रवर्गातील बिंदुवर दर्शविण्यात यावी.

४. शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी (ईएसबीसी) सरळसेवेन भरण्यात येणारी १६ टक्के आक्षणाची पदे दिनांक ९ जुलै, २०१४ पासून भरणे आवश्यक आहे. त्यामुळे संवर्गामध्ये दिनांक ९ जुलै २०१४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोटयातील रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षाकरिता शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) या प्रवर्गाकरिता आरक्षणाची गणना करताना, सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

५. संदर्भीय सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ मधील कलम १८(१) नुसार, या अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी म्हणजेच दिनांक ९ जुलै, २०१४ पूर्वीच सरळसेवा भरतीमधील निवड प्रकिया सुरु झाली असेल, अशा प्रकरणांना या अध्यादेशाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. अशा प्रकरणांच्या बाबतीत, सदर अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि आरक्षण अधिनियम, २००१ मधील ज्या तरतुदी लागू होत्या, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. दि. ९ जुलै २०१४ पुर्वी ज्या प्रकरणी सरळसेवा भरतीच्या प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झालेली आहे, त्याचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही. यापुढे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सरळसेवा भरतीसाठी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ नुसार** सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करावा. पुर्वीपासून आरक्षण लागू असलेल्या मागासप्रवर्गांचा अनुशेष असल्यास तो सरळसेवा भरतीच्यावेळी विचारात घेण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्याअधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

८. सरळसेवेद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत वरीलप्रमाणे बिंदूनामावलीचा अवलंब करताना, सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

हे आदेश दिनांक ९ जुलै, २०१४ पासून अंमलात येतील. सदरहून शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१४०७२४१७२४५५४७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रमोद त्र्यं.नलावडे**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**परिशिष्ट-अ**

**सरळसेवा भरतीसाठी १०० बिंदुनामावली**

| ब्रिदु. क्र. | प्रवर्ग | ब्रिदु. क्र. | प्रवर्ग | ब्रिदु. क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | २२ | खुला | ४३ | अनुसूचित जाती |
| २ | अनुसूचीत जमाती | २३ | अनुसूचीत जमाती | ४४ | खुला |
| ३ | विमुक्त जाती (अ) | २४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ४५ | इतर मागास वर्ग |
| ४ | भटक्या जमाती (ब) | २५ | इतर मागास वर्ग | ४६ | खुला |
| ५ | इतर मागास वर्ग | २६ | खुला | ४७ | भटक्या जमाती (ब) |
| ६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | २७ | अनुसूचित जाती | ४८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| ७ | भटक्या जमाती (क) | २८ | खुला | ४९ | इतर मागास वर्ग |
| ८ | खुला | २९ | इतर मागास वर्ग | ५० | खुला |
| ९ | इतर मागास वर्ग | ३० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ५१ | अनुसूचित जाती |
| १० | खुला | ३१ | भटक्या जमाती (क) | ५२ | खुला |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ३२ | खुला | ५३ | अनुसूचीत जमाती |
| १२ | अनुसूचित जाती | ३३ | अनुसूचीत जमाती | ५४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| १३ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ३४ | खुला | ५५ | इतर मागास वर्ग |
| १४ | खुला | ३५ | इतर मागास वर्ग | ५६ | **विशेष मागास प्रवर्ग -अ** |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ३६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ५७ | भटक्या जमाती (क) |
| १६ | **विशेष मागास प्रवर्ग -अ** | ३७ | अनुसूचित जाती | ५८ | खुला |
| १७ | इतर मागास वर्ग | ३८ | **विशेष मागास प्रवर्ग -अ** | ५९ | इतर मागास वर्ग |
| १८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ३९ | इतर मागास वर्ग | ६० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| १९ | इतर मागास वर्ग | ४० | खुला | ६१ | अनुसूचित जाती |
| २० | खुला | ४१ | विमुक्त जाती(अ) | ६२ | खुला |
| २१ | अनुसूचित जाती | ४२ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ६३ | अनुसूचीत जमाती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६४ | खुला | ७७ | भटक्या जमाती (ड) | ९० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| ६५ | इतर मागास वर्ग | ७८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ९१ | अनुसूचित जाती |
| ६६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ७९ | इतर मागास वर्ग | ९२ | खुला |
| ६७ | अनुसूचित जाती | ८० | खुला | ९३ | अनुसूचित जमाती |
| ६८ | खुला | ८१ | अनुसूचित जाती | ९४ | **विशेष मागास प्रवर्ग-अ** |
| ६९ | इतर मागास वर्ग | ८२ | खुला | ९५ | इतर मागास वर्ग |
| ७० | खुला | ८३ | विमुक्त जाती(अ) | ९६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| ७१ | अनुसूचित जमाती | ८४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ९७ | अनुसूचित जाती |
| ७२ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ८५ | इतर मागास वर्ग | ९८ | खुला |
| ७३ | अनुसूचित जाती | ८६ | खुला | ९९ | भटक्या जमाती (ब)/(क) |
| ७४ | खुला | ८७ | विशेष मागास प्रवर्ग | १०० | खुला |
| ७५ | इतर मागास वर्ग | ८८ | खुला | | |
| ७६ | विशेष मागास प्रवर्ग -अ | ८९ | इतर मागास वर्ग | | |

# प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>प्रवर्ग</th><th>आरक्षणाची टक्केवारी</th><th colspan="2">बिंदु क्रमांक</th></tr>
<tr><td>१</td><td>अनुसूचित जाती</td><td>१३%</td><td colspan="2">१, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१,९७</td></tr>
<tr><td>२</td><td>अनुसूचित जमाती</td><td>७%</td><td colspan="2">२, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३</td></tr>
<tr><td>३</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>३%</td><td colspan="2">३, ४१, ८३,</td></tr>
<tr><td>४</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>२.५%</td><td>४, ४७</td><td rowspan="2">९९ (ब/क)</td></tr>
<tr><td>५</td><td>भटक्या जमाती (क)</td><td>३.५%</td><td>७, ३१, ५७</td></tr>
<tr><td>६</td><td>भटक्या जमाती (ड)</td><td>२%</td><td colspan="2">११, ७७</td></tr>
<tr><td>७</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>२%</td><td colspan="2">१५, ८७</td></tr>
<tr><td>८</td><td>इतर मागास प्रवर्ग</td><td>१९%</td><td colspan="2">५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५</td></tr>
<tr><td>९</td><td>शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग</td><td>१६%</td><td colspan="2">६, १३, १८, २४, ३०, ३६, ४२, ४८, ५४, ६०, ६६, ७२, ७८, ८४, ९०, ९६</td></tr>
<tr><td>१०</td><td>विशेष मागास प्रवर्ग- अ</td><td>५%</td><td colspan="2">१६, ३८, ५६, ७६, ९४</td></tr>
<tr><td>११</td><td>खुला</td><td>२७%</td><td colspan="2">८, १०, १४, २०, २२, २६, २८, ३२, ३४, ४०, ४४, ४६, ५०, ५२, ५८, ६२, ६४, ६८, ७०, ७४, ८०, ८२, ८६, ८८, ९२, ९८, १००</td></tr>
</table>

**परिशिष्ट-ब**

**बिंदु नामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना.**

१) सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ मधील तरतुदींस अनुसरुन सुधारित बिंदुनामावली तयार करताना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

२) बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा प्रवेश नियमातील तरदुदींनुसार संवर्गाच्या एकूण मुंजूर पदसंख्येपैकी सरळसेवा कोट्यातील पदांची संख्या निश्चित करण्यात यावी.

३) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षासाठी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) या प्रवर्गाकरिता आरक्षणाची गणना करताना खाली नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

अ) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी संवर्गातील सरळसेवा कोट्यातील एकूण मंजूर पदसंख्येला (दि.९ जुलै, २०१४ पुर्वीचे अ.जा.-१३%, अ.ज.-७%, विजा-अ ३%, भ.ज.(ब)-२.५%, भ.ज.(क)-३.५%, भ.ज.(ड)-२%, विमाप्र-२% व इमाव-१९%) एकूण ५२ टक्के आरक्षण विचारात घेऊन आरक्षित पदांची गणना करावी.

आ) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी वरील आरक्षणानुसार प्रवर्ग निहाय मागास प्रवर्गाची व खुल्या प्रवर्गाची किती पदे कार्यरत आहेत, याची गणना करावी.

इ) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी संवर्गातील एकूण रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन त्यामधून दिनांक ९ जुलै, २०१४ पूर्वीच्या मागास प्रवर्गांच्या रिक्त पदांची संख्या (दि. ९ जुलै, २०१४ पुर्वीचे अ.जा, अ.ज, विजा-अ, भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र व इमाव) वजा करावी.

ई) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी खुल्या प्रवर्गाची रिक्त पदे विचारात घेऊन त्यावर नव्याने आरक्षण लागू केलेल्या शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी १६% आरक्षणाची गणना करावी.

**उदा. एखाद्या संवर्गात मुंजूर पदसंख्या १०० आहे. दि.९ जुलै, २०१४ पर्यंत या संवर्गात ६७ पदे कार्यरत असुन ३३ पदे रिक्त आहेत. त्या संवर्गाचा प्रवर्गनिहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | प्रवर्गाचे नाव | आरक्षण टक्केवारी | आरक्षण-टक्केवारी नुसार पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे (४-५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अनु.जाती | १३% | १३ | १० | ३ |
| २ | अनु.जमाती | ७% | ७ | ५ | २ |
| ३ | वि.जा.(अ) | ३% | ३ | २ | १ |
| ४ | भ.ज.(ब) | २.५% | ३ | १ | २ |
| ५ | भ.ज.(क) | ३.५% | ३ | २ | १ |
| ६ | भ.ज.(ड) | २% | २ | १ | १ |
| ७ | वि.मा.प्र. | २% | २ | १ | १ |
| ८ | इ.मा.व. | १९% | १९ | १५ | ४ |
| ९ | खुला | ४८% | ४८ | ३० | १८ |
| १० | एकुण | १००% | १०० | ६७ | ३३ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता ३३ रिक्त पदांपैकी खुल्या प्रवर्गाची १८ पदे रिक्त आहेत.

A) **पहिले भरती वर्ष** – अशा प्रकारे खुल्या प्रवर्गातील एकूण रिक्त पदांच्या १६% प्रमाणे येणारी पदे ही नव्याने आरक्षण लागू केलेल्या शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित असतील. म्हणजेच १८ च्या १६%=२.८८ म्हणजेच पुर्णांकात एकूण ३ पदे शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी पहिल्या भरतीवर्षासाठी आरक्षित असतील.

B) **दुसरे भरती वर्ष** – दसऱ्या भरती वर्षात, खुल्या प्रवर्गात २० रिक्त पदे उपलब्ध झाली असे समजल्यास, दुसऱ्या भरती वर्षी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी रिक्ततेची गणना करताना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षामधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच २०+१८=३८) येणाऱ्या एकूण रिक्त ३८ पदांच्या १६% प्रमाणे येणारी पदे ६.०८ म्हणजेच पुर्णांकात ६ पदे, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षी शैक्षणिक आणि समाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थिती कार्यरत पदे वजा करुन उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षी शैक्षणिक आणि समाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित ३ पदांपैकी २ पदे भरली असतील व सद्यस्थितीत सदरची २ पदे कार्यरत असतील तर दुसऱ्या भरती वर्षासाठी आरक्षित ६ पदांपैकी ४ पदांची (६-२) भरती करावी.

C) **तिसरे भरती वर्ष** – त्यानंतरच्या तिसऱ्या भरती वर्षात ३२ पदे रिक्त झाली असे समजल्यास, तिसऱ्या भरती वर्षी शैक्षणिक आणि समाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी रिक्ततेची गणना करताना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षांमधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळून (म्हणजेच ३२+२०+१८=७०) येणाऱ्या एकूण ७० रिक्त पदांच्या १६% प्रमाणे येणारी पदे ११.२

म्हणजेच पूर्णांकांत ११ पदे शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (इएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थिती कार्यरत पदे वजा करुन उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षाअखेर शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित ६ पदांपैकी ५ पदे भरली असतील व सद्यस्थितीत सदरची ५ पदे कार्यरत असतील तर तिसऱ्या भरती वर्षासाठी आरक्षित ११ पदांपैकी ६ पदांची (११-५) भरती करावी.

D) **चौथे भरती वर्ष** – त्यानंतरच्या चौथ्या भरती वर्षात ३० पदे रिक्त झाली असे समजल्यास, चौथ्या भरती वर्षी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी रिक्ततेची गणना करताना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षांमधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच ३०+३२+२०+१८=१००) येणाऱ्या एकूण १०० पदांच्या १६% प्रमाणे येणारी पूर्णांकांत १६ पदे शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षांमध्ये शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थितीत कार्यरत पदे वजा करुन उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षाअखेर शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित ११ पदांपैकी ११ पदे भरली असतील व सद्यस्थितीत सदरची ११ पदे कार्यरत असतील तर चौथ्या भरती वर्षासाठी आरक्षित १६ पदांपैकी ५ पदांची (१६-११) भरती करावी.

४) वरील प्रमाणे आरक्षण गणनेची कार्यवाही जो पर्यंत शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी अनुज्ञेय १६ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे उपलब्ध होत नाहीत, तो पर्यंत चालू ठेवावी. शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास ((ईएसबीसी) प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे प्राप्त झाल्यानंतर मात्र प्रत्येक प्रवर्गनिहाय अनुज्ञेय टक्केवारीनुसार त्या-त्या प्रवर्गाची पदे भरण्यात यावीत.पद भरती केलेल्या शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास ((ईएसबीसी) प्रवर्गातील उमेदवारांची बिंदुनामावलीत बिंदु क्रमांक ६ पासून नोंद प्रारंभ करुन यानुसार त्यापुढे सदर प्रवर्गासाठीच्या बिंदुवर नोंद करावी.

५) सुधारित बिंदुनामावली तयार करताना सध्याअसलेली संवर्गातील सरळसेवा कोटयातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, संबंधित वर्षाची बिंदुनामावली तयार करताना सरळसेवा कोटयातील पदसंख्येनुसार आरक्षित बिंदुची संख्या त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

६) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिनस्त सर्व आस्थापनांना वरील विविध संवर्गाच्याबाबतीत यानुसार योग्य ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना द्याव्यात. प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व योग्य त्या प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

७) सध्या आरक्षणासंदर्भात अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरील प्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

**********

**विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
**शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब**
**दिनांक : २४ जुलै, २०१४.**

<u>वाचा :-</u>

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४ व या अध्यादेशाबाबत दि. १४ जुलै, २०१४ चे शुद्धिपत्र.
२. शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अविवि२०१४/प्र.क्र.८१/का-७, दि. १९ जुलै, २०१४.
३. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१.
४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४ (**सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १४**) अन्वये **"विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए)"** निर्माण करण्यात आला आहे, सदर अध्यादेशातील कलम ४(१) नुसार या प्रवर्गास सरळसेवेच्या पदभरतीमध्ये ५ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

उक्त अध्यादेशातील कलम ४(१) नुसार व अल्पसंख्याक विकास विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी ५ टक्के आरक्षणास अनुसरुन, शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी १०९७ /प्र.क्र.२ /९७ /१६-ब, दि. २९.३.१९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात उक्त अध्यादेशातील कलम ८ (१) नुसार सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे. :-

**शासन निर्णय** :- विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता संदर्भाधीन क्रमांक १ येथील अध्यादेशानुसार ५ टक्के आरक्षण लागू करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ येथील अल्पसंख्याक विकास विभागाच्या दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयान्वये, राज्यात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समाजासाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम १५(४), १५(५), १६ (४) व ४६ मधील तरतुदींनुसार विशेष मागास प्रवर्ग- अ (एसबीसी-ए) असा नवीन प्रवर्ग तयार करण्यात आल्याचे व या प्रवर्गात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटाचा (सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ मधील अनुसुचीप्रमाणे व अल्पसंख्याक विकास विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयासोबतच्या अनुसूचितील यादीप्रमाणे) समावेश करण्यात आल्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्याअनुषंगाने विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी, राज्याच्या लोकसेवामधील शासकीय/निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये ५ टक्के आरक्षण विहित करण्यात येत आहे. त्यानुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब दि. २९.३.१९९७ अन्वये विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारित करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ९ जुलै, २०१४ चा अध्यादेश प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून शासकीय/निमशाकीय सेवेतील सरळसेवा भरतीसंदर्भात सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित करण्यात येत असलेल्या सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करण्यात यावा.

३. गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची संबंधित प्रवर्गाच्या आरक्षित पदावर गणना करण्यात येऊ नये. त्यांची नियुक्ती संबंधित आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्यांची नोंद खुल्या प्रवर्गातील बिंदुवर दर्शविण्यात यावी.

४. विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी सरळसेवेने भरण्यात येणारी ५ टक्के आरक्षणाची पदे दिनांक ९ जुलै, २०१४ पासून भरणे आवश्यक आहे. त्यामुळे संवर्गामध्ये दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त होणारी पदे विचारात घेवून चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षांकरिता विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) या करिता आरक्षणाची गणना करतांना सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

५. संदर्भीय सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ मधील कलम १८ (१) व सदर अध्यादेशातील कलम १८ (२) बाबत दि. १४ जुलै, २०१४ रोजीच्या शुद्धिपत्रानुसार, या अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी म्हणजेच दिनांक ९ जुलै, २०१४ पूर्वीच सरळसेवा भरतीमधील निवड प्रक्रिया सुरु झाली असेल, अशा प्रकरणांना या अध्यादेशाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. अशा प्रकरणांच्या बाबतीत, सदर अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि आरक्षण अधिनियम, २००१ मधील ज्या तरतुदी लागू होत्या, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. दि. ९ जुलै, २०१४ पूर्वी ज्या प्रकरणी सरळसेवा भरतीच्या प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झालेली आहे, त्याचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही. यापुढे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सरळसेवा भरतीसाठी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** नुसार सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करावा. पूर्वीपासून आरक्षण लागू असलेल्या मागासप्रवर्गांचा अनुशेष असल्यास तो सरळसेवा भरतीच्यावेळी विचारात घेण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान

दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

८. सरळसेवेद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत, वरील प्रमाणे बिंदुनामावलीचा अवलंब करताना, सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

हे आदेश दिनांक ९ जुलै, २०१४ पासून अंमलात येतील.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१४०७२४१७२६५८६००७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रमोद त्र्यं. नलावडे**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**परिशिष्ट-अ** सरळसेवा भरतीसाठी १०० बिंदुनामावली

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | इतर मागास वर्ग |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ७० | खुला |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | **विशेष मागास प्रवर्ग - अ** | ७२ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | इतर मागास वर्ग | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ४० | खुला | ७४ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | खुला | ४२ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ७६ | **विशेष मागास प्रवर्ग - अ** |
| ९ | इतर मागास वर्ग | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | खुला | ४४ | खुला | ७८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | इतर मागास वर्ग |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | खुला | ८० | खुला |
| १३ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | अनुसूचित जाती |
| १४ | खुला | ४८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ८२ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | इतर मागास वर्ग | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | **विशेष मागास प्रवर्ग - अ** | ५० | खुला | ८४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | अनुसूचित जाती | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ५२ | खुला | ८६ | खुला |
| १९ | इतर मागास वर्ग | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | खुला | ५४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ८८ | खुला |
| २१ | अनुसूचित जाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | इतर मागास वर्ग |
| २२ | खुला | ५६ | **विशेष मागास प्रवर्ग - अ** | ९० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |
| २४ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ५८ | खुला | ९२ | खुला |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | इतर मागास वर्ग | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | खुला | ६० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ९४ | **विशेष मागास प्रवर्ग - अ** |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | इतर मागास वर्ग |
| २८ | खुला | ६२ | खुला | ९६ | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** |
| २९ | इतर मागास वर्ग | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | ६४ | खुला | ९८ | खुला |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (ब)/(क) |
| ३२ | खुला | ६६ | **शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग** | १०० | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | अनुसूचित जाती | | |
| ३४ | खुला | ६८ | खुला | | |

# <u>सरळसेवा भरतीसाठी १०० बिंदुनामावली</u>

## प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

<table>
<tr><th>अनुक्रमांक</th><th>प्रवर्ग</th><th>आरक्षणाची टक्केवारी</th><th colspan="2">बिंदु क्रमांक</th></tr>
<tr><td>१</td><td>अनुसूचित जाती</td><td>१३ %</td><td colspan="2">१, १२, २१, २७, ३७,४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७</td></tr>
<tr><td>२</td><td>अनुसूचित जमाती</td><td>७ %</td><td colspan="2">२, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३</td></tr>
<tr><td>३</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>३ %</td><td colspan="2">३, ४१, ८३,</td></tr>
<tr><td>४</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>२.५ %</td><td>४, ४७</td><td rowspan="2">९९ (ब/क)</td></tr>
<tr><td>५</td><td>भटक्या जमाती(क)</td><td>३.५ %</td><td>७, ३१, ५७,</td></tr>
<tr><td>६</td><td>भटक्या जमाती(ड)</td><td>२ %</td><td colspan="2">११, ७७</td></tr>
<tr><td>७</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>२ %</td><td colspan="2">१५, ८७</td></tr>
<tr><td>८</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>१९ %</td><td colspan="2">५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५</td></tr>
<tr><td>९</td><td>शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग</td><td>१६ %</td><td colspan="2">६, १३, १८, २४, ३०, ३६, ४२, ४८, ५४, ६०, ६६, ७२, ७८, ८४, ९०, ९६</td></tr>
<tr><td>१०</td><td>विशेष मागास प्रवर्ग- अ</td><td>५%</td><td colspan="2">१६, ३८, ५६, ७६, ९४</td></tr>
<tr><td>११</td><td>खुला</td><td>२७ %</td><td colspan="2">८, १०, १४, २०, २२, २६, २८, ३२, ३४, ४०, ४४, ४६,५०, ५२, ५८, ६२, ६४, ६८, ७०, ७४, ८०, ८२, ८६, ८८, ९२, ९८, १००</td></tr>
</table>

## परिशिष्ट - ब

## बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना.

१) सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ मधील तरतुदींस अनुसरुन सुधारित बिंदुनामावली तयार करताना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट - अ** नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

२) बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा प्रवेश नियमावली तरतुदींनुसार संवर्गाच्या एकूण मंजूर पदसंख्येपैकी सरळसेवा कोट्यातील पदांची संख्या निश्चित करण्यात यावी.

३) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षांसाठी विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) या करिता आरक्षणाची गणना करतांना खाली नमुद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

अ) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी संवर्गातील सरळसेवा कोट्यातील एकूण मंजूर पदसंख्येला (दि. ९ जुलै, २०१४ पुर्वीचे अ.जा.-१३ %, अ.ज. ७%, विजा-अ ३%, भ.ज.(ब)-२.५% भ.ज.(क)-३.५%, भ.ज. (ड)- २%, विमाप्र- २% व इमाव-१९%) एकूण ५२ टक्के आरक्षण विचारात घेऊन आरक्षित पदांची गणना करावी.

आ) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी वरील आरक्षणानुसार प्रवर्ग निहाय मागास प्रवर्गाची व खुल्या प्रवर्गाची किती पदे कार्यरत आहेत, याची गणना करावी.

इ) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी संवर्गातील एकूण रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन त्यामधून दिनांक ९ जुलै, २०१४ पूर्वीच्या मागास प्रवर्गांच्या रिक्त पदांची संख्या (दि. ९ जुलै, २०१४ पुर्वीचे अ.जा,अ.ज, विजा-अ, भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र व इमाव) वजा करावी.

ई) दिनांक ९ जुलै २०१४ रोजी खुल्या प्रवर्गाची रिक्त पदे विचारात घेऊन त्यावर नव्याने आरक्षण लागू केलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी ५% आरक्षणाची गणना करावी.

**उदा. एखाद्या संवर्गात मंजूर पद संख्या १०० आहे. दि. ९ जुलै, २०१४ पर्यंत या संवर्गात ६७ पदे कार्यरत असुन ३३ पदे रिक्त आहेत. त्या संवर्गाचा प्रवर्गनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | प्रवर्गाचे नाव | आरक्षण टक्केवारी | आरक्षण-टक्केवारी नुसार पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे (४-५) |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | अनु. जाती | १३ % | १३ | १० | ३ |
| २ | अनु. जमाती | ७ % | ७ | ५ | २ |
| ३ | वि.जा. (अ) | ३ % | ३ | २ | १ |
| ४ | भ.ज.(ब) | २.५ % | ३ | १ | २ |
| ५ | भ.ज.(क) | ३.५ % | ३ | २ | १ |
| ६ | भ.ज.(ड) | २ % | २ | १ | १ |
| ७ | वि.मा.प्र. | २ % | २ | १ | १ |
| ८ | इ.मा.व. | १९ % | १९ | १५ | ४ |
| ९ | खुला | ४८ % | ४८ | ३० | १८ |
| १० | **एकूण** | **१०० %** | **१००** | **६७** | **३३** |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता ३३ रिक्त पदांपैकी खुल्या प्रवर्गाची १८ पदे रिक्त आहेत.

A) **पहिले भरती वर्ष**- अशा प्रकारे खुल्या प्रवर्गातील एकूण रिक्त पदांच्या ५% प्रमाणे येणारी पदे ही नव्याने आरक्षण लागू केलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी आरक्षित असतील. म्हणजेच १८ च्या ५%=०.९० म्हणजेच पूर्णांकात एकूण १ पद विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी पहिल्या भरतीवर्षासाठी आरक्षित असेल.

B) **दुसरे भरती वर्ष**- दुसऱ्या भरती वर्षात, खुल्या प्रवर्गात २० रिक्त पदे उपलब्ध झाली असे समजल्यास, दुसऱ्या भरती वर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी रिक्ततेची गणना करतांना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षामधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच २०+१८=३८) येणाऱ्या एकुण ३८ रिक्त पदांच्या ५% प्रमाणे येणारी पदे १.९ म्हणजेच पुर्णांकांत २ पदे विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी आरक्षित राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थितीत कार्यरत पदे वजा करुन उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी आरक्षित १ पदापैकी १ पद भरले असेल व सद्यस्थितीत सदरचे १ पद कार्यरत असेल तर दुसऱ्या भरती वर्षासाठी आरक्षित २ पदांपैकी १ पदाची (२-१) भरती करावी.

C) **तिसरे भरती वर्ष**- त्यानंतरच्या तिसऱ्या भरती वर्षात ३२ पदे रिक्त झाली असे समजल्यास, तिसऱ्या भरती वर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी रिक्ततेची गणना करतांना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षामधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच ३२+२०+१८=७०) येणाऱ्या एकूण ७० रिक्त पदांच्या ५% प्रमाणे येणारी पदे ३.५ म्हणजेच पुर्णांकांत ४ पदे विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी आरक्षित राहतील.असे करत असतांना, मागील भरतीवर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थितीत कार्यरत पदे वजा करुन उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षाअखेर विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी आरक्षित २ पदांपैकी १ पद भरले असेल व सद्यस्थितीत सदरचे १ पद कार्यरत असेल तर तिसऱ्या भरती वर्षासाठी आरक्षित ४ पदांपैकी ३ पदांची (४-१) भरती करावी.

D) **चौथे भरती वर्ष**- त्यानंतरच्या चौथ्या भरती वर्षात ३० पदे रिक्त झाली असे समजल्यास, चौथ्या भरती वर्षी विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी रिक्ततेची गणना करतांना खुल्या प्रवर्गात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत मागील भरतीवर्षामधील खुल्या प्रवर्गातील आलेली रिक्त पदांची संख्या मिळवून (म्हणजेच ३०+३२+२०+१८=१००) येणाऱ्या एकूण १०० रिक्त पदांच्या ५% प्रमाणे येणारी पुर्णांकांत ५ पदे विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी आरक्षित राहतील. असे करत असताना, मागील भरतीवर्षामध्ये विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी आरक्षित केलेल्या पदांपैकी भरलेली व त्यापैकी सद्यस्थितीत कार्यरत पदे वजा करुन उर्वरित पदांची भरती करावी. म्हणजेच सदर उदाहरणानुसार मागील भरतीवर्षा अखेर विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी आरक्षित ४ पदांपैकी ४ पदे भरली असतील व सद्यस्थितीत सदरची ४ पदे कार्यरत असतील तर चौथ्या भरती वर्षासाठी आरक्षित ४ पदांपैकी १ पदाची (५-४) भरती करावी.

४) वरील प्रमाणे आरक्षण गणनेची कार्यवाही जो पर्यंत विशेष मागास प्रवर्ग -अ (एसबीसी-ए) साठी अनुज्ञेय ५ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे उपलब्ध होत नाहीत, तो पर्यंत चालू ठेवावी. विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी ५ टक्के आरक्षणानुसार पर्याप्त आरक्षित पदे प्राप्त झाल्यानंतर मात्र प्रत्येक प्रवर्गनिहाय अनुज्ञेय टक्केवारीनुसार त्या-त्या प्रवर्गाची पदे भरण्यात यावीत.

पद भरती केलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गातील उमदवारांची बिंदुनामावलीत बिंदु क्रमांक १६ पासून नोंद प्रारंभ करुन यानुसार त्यापुढे सदर प्रवर्गासाठीच्या बिंदुवर नोंद करावी.

५) सुधारित बिंदुनामावली तयार करताना सध्या असलेली संवर्गातील सरळसेवा कोट्यातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, संबंधित वर्षाची बिंदुनामावली तयार करताना सरळसेवा कोट्यातील पदसंख्येनुसार आरक्षित बिंदुंची संख्या त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

६) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी, त्यांच्या अधिनस्त सर्व आस्थापनांना वरील विविध संवर्गाच्याबाबतीत यानुसार योग्य ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना द्याव्यात. प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व योग्य त्या प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

७) सध्या आरक्षणासंदर्भात अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरील प्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

***********

**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता मा. उच्च न्यायालयाच्या अंतरीत आदेशाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २१ फेब्रुवारी, २०१५.

**वाचा:-**

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४.
२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दि. १५ जुलै, २०१४.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब, दि. २४.७.२०१४.

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि समाजिकदृष्ट्या मागास (ईसएबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश २०१४ **(सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३)** अन्वये **"शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग"** निर्माण करण्यात आला आहे. सदर अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार या प्रवर्गास सरळसेवाच्या पदभरतीमध्ये १६ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. उक्त अध्यादेशातील कलम ४(१) नुसार व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक २ येथील दिनांक १५ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षण दिलेले आहे.

उक्त अध्यादेशातील कलम ८ (१) नुसार संदर्भाधिन क्र. २ येथील दि. २४.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सुधारित बिंदुनामावली विहित करण्यात आलेली आहे.

**सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १३** या अध्योदशाच्या विरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र. २०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. या प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये सदर अध्यादेशास अंतरिम स्थगिती दिलेली आहे. सदर निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात शासनामार्फत विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १८.१२.२०१४ च्या आदेशान्वये सदर विशेष अनुमती याचिका खारीज केली असून मा. उच्च न्यायालयाच्या दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये दिलेली

अंतरिम स्थगिती कायम ठेवली आहे. तसेच महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ चे कायद्यात रुपांतर होऊन महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१४, (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५) अस्तित्वात आला आहे त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय :-** या शासन निर्णयान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. १४.११.२०१४ रोजीचे स्थगिती आदेश विचारात घेऊन शासन खालील प्रमाणे आदेश देत आहेत.:-

**अ)** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ येथील दि. १५ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयातील शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गातंर्गत मराठा समाजास शासकीय/निमशासकीय सेवा (सरळसेवा भरतीसाठी) व शैक्षणिक संस्थेमध्ये १६ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी दि. १४ नोव्हेंबर २०१४ पासून स्थगित करण्यात येत आहे.

शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि कृषी व पशुसंवर्धन विभागांतर्गत शासकीय तसेच खाजगी अनुदानित व विनाअनुदानीत शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त १६ टक्के आरक्षण शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गांतर्गत मराठा समाजास देण्याबाबतची तरतूद दि. १४ नोव्हेंबर २०१४ पासून स्थगित करण्यात येत आहे.

**ब)** सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दि. २४ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी दि. १४ नोव्हेंबर, २०१४ पासून स्थगित करण्यात यावी. दि. १४ नोव्हेंबर, २०१४ नंतर शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळ सेवा भरतीकरीता पूर्वीच्या आदेशानुसार विहित केलेल्या १०० बिंदू नामावलीचा वापर करुन ही पदे भरण्याची कार्यवाही करावी.

**क)** मा. उच्च न्यायालयाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिलेल्या स्थगित आदेशापूर्वी, शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश अबाधित राहतील.

**ड)** दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पूर्वी, शासकीय/ निमशासकीय सेवेमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाच्या आधारे उमेदवारांच्या नेमणुका झाल्या असल्यास, मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधीन राहून त्या नेमणूका कायम राहतील.

**इ)** दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाच्या आधारे, शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना व शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही संबंधीत विभागांनी करावी.

**ई)** दि. १४ नोव्हेंबर, २०१४ नंतर शैक्षणिक संस्थांमध्ये द्यावयाच्या प्रवेशांबाबत शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी आरक्षण वगळता प्रचलित आदेशांनुसार कार्यवाही करावी.

**प)** शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास अशी पदे मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत भरण्यात येऊ नयेत. अशी पदे भरण्याबाबतचा निर्णय मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर घेण्यात येईल. मात्र शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग वगळता उर्वरित पदे सदर जाहिरातीनुसार भरण्याची कार्यवाही करावी. कारण अशा बहुतांश प्रकरणात निवड प्रक्रिया सुरु झालेली असेल किंवा शेवटच्या टप्प्यात असल्यामुळे अशा जाहिराती रद्द करुन पुन्हा नव्याने जाहिरात देणे प्रशासकीय दृष्ट्या उचित ठरणार नाही.

**फ)** दि. ४ नोव्हेंबर, २०१४ नंतर शासकीय व निमशासकीय सेवा भरती करताना पूर्वीच्या आदेशांनुसार वेळोवेळी विहित केलेल्या १०० बिंदुनामावलीचा वापर करुन ही पदे भरण्याची कार्यवाही करावी.

उपरोक्त सर्व कार्यवाही ही मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.२०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदानप्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्त्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

३. सरळसेवेद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत वरीलप्रमाणे शासन निर्णयाचे पालन करण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०/मावक, दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१५०२२११६४६०२८७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**टि. वा. करपते**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

[५]

# आरक्षण - ज्येष्ठता सूची

# सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०७६/१२ दिनांक २१ जून १९८२.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जून १९८२.

**भारताचे संविधान**

क्रमांक एसआरव्ही-१०७६/बारा-भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे पुढील नियम करीत आहेत :-

**१. संक्षिप्त नाव :-** या नियमात "महाराष्ट्र नागरी सेवा [ज्येष्ठतेचे विनियमन] नियमावली, १९८२" असे म्हटले जाईल.

**२. प्रारंभ आणि प्रयुक्ति :-** ही नियमावली २१ जून, १९८२ रोजी अंमलात येईल आणि ज्यासंबंधी नियम करणे हे शासनाच्या अखत्यारात येते अशी सर्व पदे, संवर्ग व सेवा मधील शासकीय कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता तद्नंतर या नियमावलीच्या तरतुदीनुसार विनियमित होईल.

परंतु कोणतीही विशिष्ट पदे, संवर्ग किंवा सेवा यामधील ज्येष्ठतेचे विनियमन करण्यासाठी कोणतेही वेगळे नियम किंवा आदेश विहित केले असतील त्याबाबतीत, अशी पदे धारण करणाऱ्या व्यक्तींच्या किंवा अशा संवर्गातील अथवा सेवेतील व्यक्तींच्या ज्येष्ठतेचे विनियमन असे वेगळे नियम किंवा आदेश यानुसार करण्यात येईल.

**३. व्याख्या :-** या नियमावलीत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ कोणत्याही पदावर, संवर्गात किंवा सेवेत नेमणूक करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी,

(ब) "आयोग" याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(क) कोणतेही पद, संवर्ग किंवा सेवा या संबंधात "अखंड सेवा" याचा अर्थ एखाद्या व्यक्तीने त्या पदावर संवर्गात किंवा सेवेत असताना अखंडपणे अथवा कोणत्याही वरच्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत राहून खालच्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत प्रत्यावर्तन न होता अखंडपणे केलेली सेवा.

परंतु एखादी व्यक्ती या नियमांच्या तरतुदी अन्वये नेमणुकीच्या मानीव तारखेपासून एखाद्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत अखंडपणे स्थानापन्न असेल त्या बाबतीत, अशा व्यक्तीने अशा मानीव तारखेपासून अखंड सेवा केलेली आहे असे मानले जाईल.

(ड) "मानीव तारीख" याचा अर्थ नियम ५ च्या तरतुदींनुसार शासकीय कर्मचाऱ्यास नेमून दिलेली तारीख.

(इ) कोणतेही पद, संवर्ग किंवा सेवा या संबंधात "थेट भरती केलेली व्यक्ती" याचा अर्थ त्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत नामनिर्देशनाद्वारे नेमणुक झालेली व्यक्ती.

(फ)“अभावित (फोर्च्युटस) नेमणूक” याचा अर्थ, संबंधीत सेवाभरती नियमांच्या तरतुदींनुसार रीतसर नेमणूक होईपर्यन्त केलेली अस्थायी नेमणूक.

(ग) “शासन” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन.

ह) कोणतेही पद, संवर्ग किंवा सेवा यासंबंधात “पदोन्नत कर्मचारी” याचा अर्थ खालच्या पदावरुन संवर्गातून किंवा सेवेतून पदोन्नती देऊन त्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत नेमणूक करण्यात आलेला एखादा शासकीय कर्मचारी.

(य) “निवड सूची”याचा अर्थ, या बाबतीत केलेल्या नियमांनुसार खालच्या पदावरुन,संवर्गातून किंवा सेवेतून वरच्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत पदोन्नती देण्यासाठी निवड केलेल्या व्यक्तींची सूची.

(ज) “निवड मंडळ” याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळ अधिनियम, १९७२” (१९७३ च्या महा. २१) वाचा कलम ३ खाली स्थापन केलेले प्रादेशिक निवड मंडळ किंवा प्रकरणपरत्वे, कलम ६ खाली स्थापन केलेले विशेष निवड मंडळ,

(च) कोणतेही पद, संवर्ग किंवा सेवा यासंबंधात “बदली केलेला शासकीय कर्मचारी” याचा अर्थ सक्षम प्राधिकाऱ्याच्या मते ज्या अन्य पदाचा, संवर्गाचा किंवा सेवेचा दर्जा किंवा वेतनमान पूर्वोक्त पदापेक्षा, संवर्गापेक्षा किंवा सेवेपेक्षा कमी नाही अशा पदावरुन, संवर्गातून किंवा सेवेतून बदली करुन पूर्वोक्त पदावर संवर्गात किंवा सेवेत नेमलेला शासकीय कर्मचारी,

(छ) “गैरवाजवी तोशीस” याचा अर्थ अकल्पितपणे व अनुचितपणे आणि ही नियमावली तयार करण्यात आली त्यावेळी त्याचा अंदाज करता आला नाही इतक्या प्रमाणात सोसावी लागणारी तोशीस असा आहे. आणि त्याची सामान्यपणे होणारी तोशीस किंवा गैरसोय समाविष्ट नाही,

(प) या नियमावलीत वापरलेले पण व्याख्या न केलेले शब्द आणि शब्दप्रयोग यांना “महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सामान्य शर्ती) नियम,१९८१” यामध्ये नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.

**४. ज्येष्ठतेची सर्वसाधारण तत्वे :-**

(१) या नियमावलीतील अन्य तरतुदींच्या अधीनतेने, कोणतेही पद, संवर्ग किंवा सेवा यामधील शासकीय कर्मचाऱ्याची ज्येष्ठता सामान्यपणे त्यांच्या त्या पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील अखंडित सेवाकालावरुन निश्चित करण्यात येईल.

परंतु जेंव्हा रजा, प्रशिक्षण किंवा अन्य प्रतिनियुक्ती अगर परकीय सेवा अगर कोणत्याही अन्य पदावरील अस्थायी स्थानापन्नता, या कारणास्तव त्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत त्या कर्मचाऱ्याची अनुपस्थिती होईल तेंव्हा, तो कर्मचारी रजेवर किवा प्रतिनियुक्तीवर गेला नसता अथवा अशा अन्य पदावर त्याची अस्थायी नेमणुक झाली नसती तर एरव्ही तो उक्त पदावर, संवर्गात किंवा सेवेत राहिला असता असे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केले तर, असा कोणत्याही अनुपस्थितीचा कालावधी हा अशा सेवाकालाची गणना करण्याच्या प्रयोजनार्थ हिशेबात घेतला जाईल.

परंतु आणखी असे की, अभावित नेमणूक म्हणून त्याने काही सेवा केली असल्यास ती सेवा सेवाकालाच्या गणनेतून वगळली जाईल आणि संबंधित सेवा भरती नियमावलीच्या तरतुदीनसार केलेली त्याची रीतसर नेमणूक ज्या तारखेला झाली असेल त्या तारखेला तो त्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत नेमला गेला होता असे ज्येष्ठतेच्या प्रयोजनार्थ मानले जाईल.

(२) पोटनियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी -

(अ) कोणत्याही पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील नेमणुकीसाठी एकाच तुकडीत निवड होऊन थेट भरती झालेल्या व्यक्तींनी नेमणुक आदेश निघाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत किंवा सक्षम प्राधिकारी स्वविवेकानुसार वाढवून देईल अशा कालावधीत जर नेमणुकीचा स्वीकार केला असेल तर त्यांच्या आपसातील ज्येष्ठता आयोगाने वा निवड मंडळाने किंवा प्रकरणपरत्वे सक्षम प्राधिकाऱ्याकडून नामनिर्देशनाद्वारे झालेल्या थेट भरतीच्या बाबतीत सदर सक्षम प्राधिकाऱ्याने लावलेल्या पसंतीक्रमानुसार निर्धारित केली जाईल.

(ब) निवड सूचीतून पदोन्नती मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अशा निवडसूचीत त्यांची नावे ज्या क्रमाने असतील त्याच क्रमानुसार त्यांची आपसातील ज्येष्ठता राहील. जर निवडसूची दोन भागात तयार केलेली असेल तर, पहिल्या भागात बिनशर्त निवड झालेल्यांची नावे अंतर्भूत असतील व दुसऱ्या भागात निवड झालेल्यांची नावे असतील. पहिल्या भागात समाविष्ट झालेल्या सर्व व्यक्तींचा क्रम दुसऱ्या भागातील समाविष्ट केलेल्या व्यक्तींच्या वर लागेल.

परंतु निवड सूचीतील नावे ज्या क्रमाने लावलेली आहेत तो क्रम मागाहून आढावा घेतल्यामुळे बदलण्यात आला तर, संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचा ज्येष्ठताक्रम त्यांच्या या सुधारित क्रमानुसार फेरमांडणी करण्यात येऊन निर्धारित केला जाईल.

(क) बदली झालेला शासकीय कर्मचारी ज्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत तो बदली झालेला आहे त्या पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील अन्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेने त्याची ज्येष्ठता, तो जेथे बदली झाला त्या पदाचा, संवर्गाचा किंवा सेवेचा वर्ग आणि वेतनमान, तेथील त्याचा सेवाकाल आणि त्याच्या बदलीस कारणीभूत झालेली परिस्थिती यथायोग्यपणे लक्षात घेऊन सक्षम प्राधिकारी निर्धारित करील.

(३) जेथे कोणत्याही दोन किंवा अधिक व्यक्तींच्या एखादे पद, संवर्ग किंवा सेवा यातील नेमणुकीच्या तारखा, आवश्यक तर, मानीव तारीख नेमून दिल्यानंतर निर्धारित केलेल्या तारखा एकच असतील तर, वयाने ज्येष्ठ असलेली व्यक्ती ज्येष्ठताक्रम निर्धारित करण्याच्या प्रयोजनार्थ ज्येष्ठ म्हणून मानली जाईल.

**५. नेमणुकीच्या मानीव तारखा नेमून देणे :-**

(१) नियम ४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पुढील पोटनियमात अंतर्भूत केलेल्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी शासकीय कर्मचाऱ्यास एखादे पद, संवर्ग किंवा सेवा यामधील त्याच्या

प्रत्यक्ष नेमणुकीच्या तारखेपेक्षा जी वेगळी आहे अशी तारीख तेथील नेमणुकीची मानीव तारीख म्हणून नेमून देऊ शकेल आणि अशी मानीव तारीख नेमून देण्यात आल्यावर, उक्त पद, संवर्ग किंवा सेवा यातील त्याचा सेवाकाल त्या तारखेपासून सुरु झाला असे समजून त्याची गणना केली जाईल.

(२)जेंव्हा एकाच तुकडीत निवड होऊन थेट भरती झालेल्या व्यक्ती वेगवेगळ्या तारखांना कामावर रुजू झाल्या असतील आणि प्रत्यक्षात ज्या तारखांना त्यांची नेमणुक झाली त्या तारखा कालानुक्रमे नियम ४ च्या पोटनियम (२) च्या खंड (अ) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे त्यांच्या आपसातील ज्येष्ठताक्रमाशी अनुरुप नसतील तेव्हा, जी व्यक्ती वरच्या क्रमावर असेल पण आपणापेक्षा कनिष्ठ असलेल्या व्यक्तींच्या नंतर कामावर रुजू झाली असेल, तिला खालच्या क्रमावर असलेली व्यक्ती ज्या तारखेस कामावर रुजू झाली असेल ती तारीख तिच्या नेमणुकीची मानीव तारीख म्हणून नेमून दिली जाईल. मात्र वरच्या क्रमावर असलेली व्यक्ती आपल्या नेमणुकीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत किंवा सक्षम प्राधिकारी वाढवून देईल अशा मुदतीत कामावर रुजू झाली असली पाहिजे.

(३) जेव्हा कोणत्याही निवड सूचीप्रमाणे जे दोन किंवा अधिक शासकीय कर्मचारी कोणतेही वरचे पद, संवर्ग किंवा सेवा यातील पदोन्नतीसाठी पात्र आहेत अशांना अशी वरची पदे, संवर्ग किंवा सेवा यामध्ये पदोन्नती मिळाली असेल आणि प्रत्यक्षात ज्या तारखांना असे शासकीय कर्मचारी अशा वरच्या पदांवर, सवंर्गात किंवा सेवेत रुजू झाले त्या तारखा कालानुक्रमे नियम ४ च्या पोटनियम (२) च्या खंड (अ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्यांच्या आपसातील ज्येष्ठताक्रमाशी अनुरुप नसतील तेंव्हा, जर एखादी ज्येष्ठ व्यक्ती आपणापेक्षा कनिष्ठ असलेल्या व्यक्तींच्या नंतर कामावर रुजू झाली तर तिला, कनिष्ठ असलेली व्यक्ती ज्या तारखेस कामावर रुजू झाली असेल ती तारीख नेमणुकीची मानीव तारीख म्हणून दिली जाईल.

(४) पदोन्नत व्यक्तींचा ज्येष्ठताक्रम नियम ४ च्या पोटनियम (२) च्या खंड (ब) मधील परंतुकात तरतुद केल्याप्रमाणे फेरमांडणी करुन निर्धारित केला असेल त्या बाबतीत, त्यांना पदोन्नतीच्या मानीव तारखा नेमून दिल्या जातील किंवा जर त्या आधीच नेमून दिलेल्या असतील तर, याप्रमाणे फेरमांडणी करुन निर्धारित केलेल्या त्यांच्या ज्येष्ठताक्रमांशी कालानुक्रमे अनुरुप होईल अशातऱ्हेने त्या तारखा सुधारण्यात येतील.

(५) ज्या शासकीय कर्मचाऱ्याचे नाव निवड सूचीत समाविष्ट केलेले आहे त्याच्या विरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही चालू असल्यामुळे त्याची त्यास निवडसूचीतील त्याच्या क्रमाप्रमाणे प्रत्यक्षात पदोन्नती दिलेली नसेल, आणि अशी शिस्तभंग कार्यवाही संपल्यानंतर त्याची पदोन्नती झाली असेल, तेथे त्या प्रकारणाची परिस्थिती आणि शिस्तभंग कार्यवाहीचा निर्णय यथायोग्यपणे लक्षात घेऊन, सक्षम प्राधिकारी त्या कर्मचाऱ्यास निवडसूचीतील त्याच्या क्रमानुरुप नव्हे तर अन्यथा निर्धारित केलेली नेमणुकीची मानीव तारीख नेमून देऊ शकेल.

(६) निवडसूची तयार करीत असताना जर एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यास डावलण्यात आले आणि त्याच्या प्रकरणाचा फेर आढावा घेताना एकतर सक्षम प्राधिकाऱ्याने स्वत: होऊन किंवा न्यायालयाने किंवा त्या संबंधात अधिकार प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याने ही कारवाई मागाहून रद्द ठरवली तर, अशा शासकीय कर्मचाऱ्याची प्रत्यक्ष पदोन्नती झाल्यावर त्याला याप्रमाणे डावलण्यात आले नसते तर ज्या तारखेस त्याची पदोन्नती झाली असती ती त्याच्या नेमणुकीची मानीव तारीख म्हणून नेमून देण्यात येईल.

(७) बदली झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याची ज्या पदावरुन, संवर्गातून किंवा सेवेतून बदली झाली आहे त्याचा वर्ग आणि वेतनमान, त्यातील त्याचा सेवावधी आणि त्याच्या बदलीस कारणीभूत झालेली परिस्थिती ही यथायोग्यपणे लक्षात घेऊन सक्षम प्राधिकारी ठरवील ती तारीख नेमणुकीची

मानीव तारीख म्हणून नेमून दिली जाईल. जर बदली झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याची नेमणुक आयोगाशी विचारविनियय करुन झाली असेल तर आयोगाशी विचारविनिमय करुन मानीव तारीख निर्धारित केली जाईल.

**६. अभावित नेमणूक कोणती ते ठरविणे :-** जेव्हा एखाद्या पदात, संवर्गात किंवा सेवेत नेमणुक केलेली असेल तेंव्हा, सक्षम प्राधिकारी ती नेमणुक अभावित आहे किंवा कसे ते ठरवील आणि नेमणूक अभावित असल्यास त्यानुसार प्रमाणपत्रात नमूद करील.

परंतु, अशा प्रमाणत्राची नोंद केली नसेल आणि जर, या प्रकरणी नेमणुक नैमित्तिक होती असे कोणत्याही नंतरच्या तारखेस आढळून आले तर, त्यामुळे आपली नेमणूक अभावित नाही असे समजण्यास भाग पाडण्याचा हक्क कोणत्याही व्यक्तीस प्राप्त होणार नाही.

**७. विवक्षित बाबतीत नियम शिथील करण्याचा अधिकार :-** पूर्वगामी नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जेंव्हा आयोगाच्या कक्षेतील पदांच्या बाबतीत आयोगाशी वचारविनिमय केल्यानंतर जर शासनाची अशी खात्री झाली की, या नियमांपैकी कोणत्याही नियमाची अंमलबजावणी केल्यामुळे कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या एखाद्या वर्गास गैरवाजवी तोशीस सोसावी लागत आहे किंवा सोसावी लागण्याचा संभव आहे. अथवा लोकहिताच्या दृष्टीने नियम शिथिल करणे आवश्यक आहे. तर ती कारणे लेखी नमूद करुन त्या कारणांस्तव अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत किंवा अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या वर्गाच्या बाबतीत आदेशाद्वारे असे निर्देशित करु शकेल की, अशा तरतुदी अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे पण त्यांच्या आशयाला बाध आणणार नाहीत अशा फेरबदलांसह अशा शासकीय कर्मचाऱ्याला किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या वर्गाला लागू होतील.

परंतु अशा शासकीय कर्मचाऱ्याचे किंवा शासकीय कर्मचाऱ्यांच्या वर्गाचे प्रकरण न्यायोचित रीतीने हाताळता यावे आणि या नियमांत तरतूद केलेल्या स्वरुपाचे लाभ प्रदान करता यावेत यासाठीच फक्त याप्रमाणे नियम शिथिल करता येतील किंवा निर्देश देता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने,

**एस. एच. ठाकर.**
**शासनाचे सचिव.**

**शासन सेवेतील कर्मचाऱ्यांची / राजपत्रित अधिकाऱ्यांची ज्येष्ठता यादी तयार करणे व प्रसिध्द करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन.**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही १०८७/६२४/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ एप्रिल १९८७.

**<u>शासन परिपत्रक</u>**

शासन सेवकांच्या पदोन्नती, स्थायीकरण इत्यादी प्रयोजनासाठी अन्य बाबी समवेत त्यांची सेवेतील/ संवर्गातील ज्येष्ठता विचारात घ्यावयाची असते. त्यासाठी भिन्न सेवेत / संवर्गात असणाऱ्या सर्व सेवकांची अद्यावत ज्येष्ठता यादी बनविणे आणि संबंधितांच्या माहितीसाठी ती प्रसिद्ध करणे आवश्यक असते. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासन सेवेतील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या / कर्मचाऱ्याच्या ज्येष्ठता याद्या नियमितपणे तयार करुन प्रसिद्ध केल्या जात नाहीत किंवा त्या प्रतिवर्षी अद्यावत केल्या जात नाहीत. परिणामी त्या त्या सेवेत / संवर्गात काम करीत असणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना त्या सेवेत / संवर्गात आपले स्थान निश्चित कोठे आहे याबद्दलची जाणीव होत नाही. अतएव, शासनाचे असे आदेश आहेत की, शासन सेवेतील राजपत्रित अधिकारी / कर्मचारी ज्या सेवेत / संवर्गात काम करीत आहेत त्यांची सेवा / संवर्ग निहाय ज्येष्ठता यादी प्रतिवर्षी १ जानेवारी हा आधारभूत दिनांक मानून एप्रिल महिन्यामध्ये तयार करण्यात यावी आणि ती संबंधित राजपत्रित अधिकारी / कर्मचारी यांच्या माहितीसाठी तात्काळ प्रसिद्ध करण्यात यावी. या यादीमध्ये विभागाचे नांव, संवर्गाचे नांव, शासन सेवकांची ज्येष्ठतेनुसार नावे, राखीव जाती / जमातीचा असल्यास तसा उल्लेख आणि प्रत्येकाच्या त्या संवर्गातील नियुक्तीचा दिनांक या माहितीचा समावेश असावा.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, शासनाचे सदर आदेश आपल्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास कृपया आणावेत आणि त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. बा. देसाई,**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

# GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Bombay 400 032, dated the 23rd September 1988

602

**CONSTTUTION OF INDIA.**

No. SRV-1086/2776/CR-5/87/XII.-In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is herby pleased to make the following rules to amend the Maharashtra Civil Services (Regulation of Seniority) rules, 1982, namely :-

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Regulation of Seniority) (Amendment) rules, 1988.

2. In rule 4 of the Maharashtra Civil Services (Regulation of Seniority) Rules, 1982(hereinafter referred to as "the principal rules"), In sub-rule (1), in the second proviso, after the words "a fortuitous appointment" the following shall be inserted, namely :-

"except in a case where the competent authority certifies that, it was not expedient / possible or practicable to make a regular appointment strictly in accordance with the ratio of recruitment as prescribed in the relevant recruitment rules, with the brief reason recorded therefor ".

3. In rule 5 of the principal rules, -

(a) in sub-clause (1), at the end after the words "as commencing from that date" the following shall be added, namely :-

"The deemed date assigned under this rule and the seniority list prepared in pursuance of the same, shall not ordinarily, be altered at the time of preparation of seniority list on the subsequent occasions or in the subsequent years".

(b) to sub-rule (3), the following proviso shall be added, namely :-

"Provided that, in a case where a Government servant himself is deemed responsible for delay in assuming charge of the promotional post, his *inter se* seniority shall be fixed with reference to the date he actually assumes charge of such post."

4. In rule 6 of the principal rules, after the existing proviso, the following proviso shall be added, namely:-

"Provided further that, appointment shall not be deemed to be fortuitous if the authority competent to make appointment certifies while preparing the annual gradation list that the temporary appointment had to be made, as candidates for regular

appointment by nomination or as the case may be, persons fit for promotion from the lower cadre, were not available at all or in adequate numbers."

5. After rule 6 of the principal rules, the following rule shall be inserted, namely:-

"7. Preparation of gradation list annually. – The authority competent to make appointment shall prepare annually for each cadre under 1st control, a gradation list of persons under that cadre in the order of seniority as on 1st January and shall bring it to the notice of the Government servants concerned."

6. Existing rule 7 of the principal rules shall be renumbered as rule 8.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**S. RAMAKRISHNA**
**Additional Chief Secretary (Personnel) to Government**

-----------------------------

No.SRV-1086/2776/CR-5/87/XII
GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Mantralaya, Bombay 400032
Date the 23rd September 1988.

**शासन सेवेतील कर्मचाऱ्यांची / राजपत्रित अधिकाऱ्यांची ज्येष्ठता यादी तयार करणे व प्रसिद्ध करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-१०९३/प्र.क्र.८/९३/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १७ जुलै, १९९३.

**शासन परिपत्रक**

शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - एसआरव्ही- १०८७/६२४/१२, दि. २१ एप्रिल, १९८७ अन्वये शासन सेवेतील राजपत्रित अधिकारी/कर्मचारी ज्या सेवेत/ संवर्गात काम करित आहेत त्यांची सेवा/ संवर्ग निहाय ज्येष्ठता यादी प्रतीवर्षी १ जानेवारी हा आधारभूत दिनांक मानून एप्रिल महिन्यामध्ये तयार करण्यात यावी आणि ती संबंधित राजपत्रित अधिकारी/ कर्मचारी यांच्या माहितीसाठी तात्काळ प्रसिद्ध करण्यात यावी, असे आदेश देण्यात आलेले आहेत. तथापि शासनाचे आदेश असूनही अधिकाऱ्यांची/ कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता यादी प्रतीवर्षी अजूनही संबंधिताच्या माहितीसाठी प्रसिद्ध केल्या जात नाहीत, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. पदोन्नती, स्थायीकरण इत्यादी प्रयोजनासाठी अन्य बाबींसमवेत संबंधित कर्मचाऱ्याची ज्येष्ठता विचारात घ्यावयाची असते. ज्येष्ठता यादी वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात आल्या नाहीत तर संबंधित अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना आपले संवर्गातील निश्चित स्थान कोठे आहे याची माहिती मिळत नाही. परिणामी त्यांना पदोन्नती, स्थायीकरण इत्यादींच्या संदर्भात घेतलेले निर्णय योग्य आहेत किंवा कसे याबाबतची माहिती वेळीच उपलब्ध होत नाही. अतएव, सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, वर नमूद केलेल्या शासन परिपत्रकाअन्वये ज्येष्ठता यादी प्रतीवर्षी प्रसिद्ध करण्याबाबत जे आदेश आहेत त्याची नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही व्हावी व ते आपल्या अखत्यारिमधील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावेत आणि त्यांच्या कक्षेतील सर्व संवर्गातील अधिकाऱ्यांच्या/ कर्मचाऱ्यांच्या दि. १ जानेवारी, १९९३ पर्यंतच्या ज्येष्ठता याद्या तयार करुन त्या दिनांक ३१ सप्टेंबर, १९९३ पूर्वी प्रसिद्ध करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा एकत्रितरित्या अहवाल सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे दि. ३१ ऑक्टोबर, १९९३ पूर्वी पाठवावा.

तसेच त्यानंतर या ज्येष्ठता याद्या प्रतीवर्षी बनविल्या जातील याबाबत दक्षता घेण्याच्या दृष्टीने देखील संबंधितांना योग्य त्या सूचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शांता शास्त्री**
**सचिव (सेवा)**

**<u>शासन सेवेतील कर्मचाऱ्यांची / राजपत्रित अधिकाऱ्यांची ज्येष्ठता यादी तयार करणे व प्रसिद्ध करणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही २००२/प्र.क्र.३/२००२/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- २७ मार्च, २००२.

**वाचा :-** (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८७/६२४/१२, दिनांक २१ एप्रिल, १९८७.
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही -१०९३/प्र.क्र.८/९३/१२, दिनांक १७ जुलै, १९९३.

**शासन परिपत्रक :-**

शासकीय सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांना त्यांचे ज्येष्ठतेतील स्थान कळावे यासाठी प्रत्येक वर्षाचा १ जानेवारी हा आधारभूत दिनांक मानून दरवर्षी एप्रिल महिन्यात सेवाज्येष्ठता यादी प्रसिद्ध करावी असे शासनाचे आदेश आहेत. पदोन्नती व स्थायीकरण करताना अद्ययावत सेवाज्येष्ठता यादी उपलब्ध होणे आवश्यक असते. ज्येष्ठतायादी जर अद्ययावत स्वरुपात प्रसिद्ध करण्यात आली नसेल तर संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांना आपले संवर्गातील निश्चित स्थान कोठे आहे, याबाबतची माहिती मिळत नाही. यामुळे पदोन्नती / मानीव दिनांक याबाबतची अनेक प्रकरणे उद्‌भवतात आणि न्यायालयीन प्रकरणांच्या संख्येतही वाढ होत आहे असे दिसून आले आहे.

२. बऱ्याच मंत्रालयीन विभागांकडून आणि विभाग प्रमुखांकडून १ जानेवारी या आधारभूत दिनांकास प्रत्येक वर्षी सेवाज्येष्ठता प्रसिद्ध करण्यात येत नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे वर नमूद केलेल्या संदर्भाकित आदेशाचा पुनरुच्चार करण्यात करण्यात येत आहे. प्रत्येक मंत्रालयीन विभागाने आणि विभाग प्रमुखांनी कृपया त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी/ कर्मचारी संवर्गाची सेवाज्येष्ठता यादी प्रत्येक वर्षी १ जानेवारी या आधारभूत दिनांकास एप्रिल महिन्यापर्यन्त कोणत्याही परिस्थितीत प्रसिद्ध करण्याची काळजी घ्यावी.

2. The expenditure on this account should be debited to the budget head " 252- Secretariat General Services (a) Secretariat (2) General Administration Department , Demand No. 7" and met from the grants sanctioned the reunder.

3. This Resolution issues with the concurrence of the Finances Department vide its unofficial reference No. 208/EXP-H/79, dated the 29th January, 1979.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**D. G. Ratnaparkhe**
**Under Secretary to Government.**

**Cases to be shown to the**
**General Administration Department (BC Cell)**
**Regarding grievances of Backward Class**
**Employees in regard to service matters.**

## Government of Maharashtra,

General Administration Department, Circular No. BCC-1079/XVI-B,
Mantralaya, Bombay-400 032.
Dated 18th June, 1979.

**READ :-** Government Resolution, General Administration Department, No. BCC-1077/498/XVI, dated the 12th October, 1977.

**CIRCULAR :** A Cell know as "Backward class Cell" has been create in the General Administration Department and this Cell has been entrusted with the following among other functions :

i) To deal all policy matter regarding the reservation and other concessions for Backward classes in service.

ii) To ensure that the orders regarding the reservations at the stage of recruitment and promotion of Backward classes in the services and posts under the State Government/ Local bodies/ Corporations/Boards under the control of the State Government are properly implemented .

iii) Maintenance of the roster for the direct recruitment and promotion.

iv) Proper computation of backlog and number of post reserved.

v) Proper computation of size of the Select Lists.

vi) Review of cases of superseded backward class employees.

vii) To lock into the representations containing grievances of Backward class employees in regard to service matters and

viii) To deal with all references received in General Administration Department, regarding representations of backward classes in service.

2. It was expected that files from all Mantralaya Departments pertaining to backward class employees will be shown to this Cell before taking final decision. It has, however, been observed that many of the Mantralaya Departments do not show the cases if backward class employees to the B.C. Cell, it has been therefore, not been possible for the B.C. Cell to discharge the functions entrusted to it.

3. All the Department of Mantralaya are, therefore, requested that all files in which the issues as mentioned above are involved should be specifically marked to B. C. Cell in General Administration Department.

**Secretary to Government.**

**<u>तात्काळ</u>**

**शासकीय सेवेत मागासवर्गीय कर्मचारी / अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेल्या गा-हाण्यांच्या / निवेदनाच्या प्रकरणांवर <u>विनाविलंब कार्यवाही करण्याबाबत..</u>**

**महाराष्ट्र शासन.**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक :बीसीसी-१०८६/५७३ /१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ एप्रिल १९८६

**<u>शा स न प रि प त्र क</u>**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०७७/४९८/सोळा, दिनांक १२ ऑक्टोबर १९७७ मधील आदेशान्वये मागासवर्गीयासंबंधी धोरणाची व आदेशाची योग्य रितीने अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्यासाठी सामान्य प्रशासन विभागामध्ये एक खास मागासवर्ग कक्ष निर्माण करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०७६/१९९९/६८५/१६-ब, दिनांक ३ मार्च १९७७ अन्वये मागासवर्गीतील कर्मचारी आपली गा-हाणी समाज कल्याण मंत्री, राज्यमंत्री किंवा आदिवासी विकास मंत्री व राज्यमंत्री यांच्याकडे थेट सादर करु शकतात असे निदेश देण्यात आले आहेत. वरील आदेशाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागातील मागासवर्ग कक्षाकडे व मंत्री, राज्यमंत्री, समाज कल्याण मंत्री व राज्यमंत्री आदिवासी विकास यांच्याकडे मागासवर्गीय कर्मचारी अनेक निवेदने पाठवितात. सदर अभिवेदनावर तात्काळ कार्यवाही करुन मागासवर्गीय कर्मचा-यांवर भरती व बढती बाबत अन्याय झाला आहे किंवा कसे, या संदर्भात परीक्षण करुन संबंधित प्रशासकीय मंत्रालयीन विभागाला योग्य सूचना देणे आवश्यक असते. वरील प्रकारच्या अभिवेदनाच्या संदर्भात प्रथम संबंधित मंत्रालयीन विभाग अथवा संबंधित विभागीय प्रमुख यांचे अभिप्राय मागविण्यात येतात. त्यांचे अभिप्राय उपलब्ध झल्यानंतर सदर अभिप्राय शासकीय आदेशाप्रमाणे योग्य आहेत किंवा कसे हे तपासून या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येते. परंतु शासनास असे आढळून आले आहे की, मागासवर्ग कक्षाकडून मागासवर्गीय कर्मचा-यांच्या सेवा विषयक गा-हाण्यांच्या संदर्भात मागविण्यात आलेले अभिप्राय उच्चस्तरावर स्मरणपत्रे पाठवूनही संबंधित मंत्रालयीन विभाग व संबंधित विभागीय प्रमुख यांचेकडून योग्य कालावधीत उपलब्ध होत नाहीत. म्हणून अशा प्रकरणांवर निर्णय घेण्यास फारच विलंब होतो व बरीच प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. मागासवर्गीयांच्या सेवेसंबंधी व इतर सवलतीबाबतच्या गाऱ्हाण्यासंबंधीच्या निवेदनावर / प्रकरणांवर तात्काळ अभिप्राय उपलब्ध झाल्यास, सामान्य प्रशासन विभागामधील मागासवर्ग कक्ष अधिक परिणामकारकरित्या काम करु शकेल व अशा प्रकरणांवर विनाविलंब निर्णय घेणे शक्य होईल. म्हणून सर्व मंत्रालयीन विभाग / विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, मागासवर्ग कक्षाकडून पाठविलेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांच्या सेवा विषयक गाऱ्हाण्याच्या प्रकरणांवर आवश्यक असलेले अभिप्राय व इतर माहिती तातडीने म्हणजे जास्तीतजास्त एक महिन्याच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्याबाबत दक्षता घ्यावी. संबंधित अधिका-याकडून एका महिन्याच्या आत अभिप्राय प्राप्त न झाल्यास त्याबाबत गंभीर दखल घेण्यात येईल.

२. सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी वरील आदेशाची काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

३. तसेच, सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील आदेश त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखलील शासकीय, निम-शासकीय, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे, सहकारी संस्था इत्यादींच्या नजरेस आणून सदर आदेशाचे कटाक्षाने पालन करण्याबाबतच्या त्यांना योग्य सूचना निर्गमित कराव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**भा. गो. देशमुख**
**मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन.**

**आरक्षणाबाबतचे आदेशांची अंमलबजावणी.**

**विभागीय आयुक्तांच्या अधिपत्त्याखाली मागासवर्ग कक्ष निर्माण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग.

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी १०८५ / २९८८/ १६ ब

मंत्रालय मुंबई -४०० ३२,

१३ ऑगस्ट, १९८६.

मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणाबाबतचे धोरण व शासकीय आदेशांची अंमलबजावणी योग्यरितीने होते किंवा नाही हे पसाहण्यासाठी सामान्य प्रशासन विभागामध्ये एक खास कक्ष निर्माण करण्यात आला आहे. सदर कक्षामध्ये प्रामुख्याने मागासवर्गीयांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणांबाबतच्या धोरणात्मक बाबी हाताळणे व त्यांची अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्यासाठी राज्यातील सर्व स्तरावरील शासकीय / निमशासकीय कार्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन शासकीय आदेशांची अंमलबजावणी केली जाते किंवा नाही हे पहाणे, तसेच राज्यातील सर्व स्तरावरील शासकीय/निमशासकीय कार्यालयातील कर्मचा-यांची सेवा विषयक गा-हाणी तपासून त्यावर योग्य कार्यवाही करणे इत्यादि स्वरुपाची कामे या कक्षाकडे सोपविण्यात आली आहेत. सामान्य प्रशासन विभागातील मागासवर्ग कक्षाकडे सोपविण्यात आलेली विविध कामे लक्षात घेता सदर कक्ष मंत्रालयीन विभागात केंद्रीत असल्याने विभागीय व जिल्हा पातळीवरील कार्यालयात शासकीय आदेशांची योग्यरितीने अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्यासाठी तसेच त्या स्तरांवरील कार्यालयांतील शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांच्या सेवाविषयक गा-हाणांच्या संदर्भात अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने अपुरा आहे असे अभिप्राय व्यक्त करुन विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने त्यांच्या १९८२-८३ च्या अहवालात आग्रहाची शिफारस केली होती की, मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षणबाबतच्या शासकीय आदेशांची सर्व स्तरावर परिणामकारकरित्या अंमलबजावणी व्हावयाची असेल तर प्रशासकीय दृष्टया समन्वय साधण्यासाठी मंत्रालयीन पातळीवर प्रत्येक विभागांत एक वेगळा कक्ष निर्माण करण्यात यावा. अशा स्वरुपाची शिफारस आयुक्त, अनुसूचित जाती/जमाती, केंद्र शासन यांनीही केली होती.

२. वरील शिफारशींच्या अनुषंगाने प्रत्येक मंत्रालयीन विभागात वेगळा कक्ष निर्माण केल्यास त्यावर अधिक खर्चाचा होणारा बोजा व प्रशासकीय अडचणी लक्षात घेता प्रत्येक मंत्रालयीन विभागात वेगळा कक्ष निर्माण करण्यापेक्षा विभागीय पातळीवर निर्माण करुन विभागीय पातळीवर शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावाचे सखोल परिक्षण करुन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

३.१. शासनाने विकेंद्रीकरण करण्याबाबतचे धोरण व मागासवर्गीय कर्मचा-यांच्या सेवाविषयक गा-हाण्यांवर शीघ्रतेने अंतिम निर्णय घेण्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रत्येक विभागीय आयुक्ताच्या अधिपत्याखाली एक वेगळा “मागासवर्ग कक्ष” निर्माण करण्यात यावा. वरील प्रमाणे निर्णय घेताना शासनाने असेही ठरविले आहे की, सदर कक्ष आयुक्त कार्यालयात सध्या असलेल्या अधिकारी व कर्मचारीवृंदांमधून निर्माण करण्यात यावा. पर्यायाने वेगवेगळया योजनेसाठी निर्माण केलेली अधिका-यांची व कर्मचा-यांची पदे सदर योजना समाप्त करण्यात आल्या असल्या तरी तशीच पुढे चालू ठेवण्यात आलेल्या व अतिरिक्त ठरविलेल्या पदांमधून आवश्यक ती पदे मागासवर्गीय कक्षासाठी उपलब्ध करुन घेण्यात यावीत.

३.२. सर्व साधारणपणे सदर कक्षामध्ये एक अर्धवेळ सहाय्यक आयुक्तांच्या दर्जाच्या अधिका-याबरोबर पूर्ण वेळ १ नायब तहसीलदार, २ अवल कारकून व १ लिपिक-टंकलेखक यांचा समावेश असावा. आवश्यक वाटल्यास वर्ग-१ अधिका-याच्या सेवा, सध्या असलेल्या अधिका-यांमध्ये कामाचे पुनर्वाटप करुन उपलब्ध करुन घ्याव्यात. सदर अधिकारी कमीत कमी १/२ (अर्धा) दिवस कक्षाच्या कामाची जबाबदारी घेऊ शकेल अशी व्यवस्था करावी.

३.३. वरील शासन निर्णयानुसार सर्व विभागीय आयुक्तांना असे आदेश देण्यात येत आहेत की, प्रत्येक विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली एक मागासवर्गीय कक्ष १-९-१९८६ पर्यन्त निर्माण करण्यात यावा.

४.१. वरील प्रमाणे प्रत्येक विभागीय पातळीवर मागासवर्गीय कक्ष निर्माण केल्यानंतर म्हणजे १-९-८६ पासून सामान्य प्रशासन विभागातील मागासवर्ग कक्ष व विभागीय पातळीवर विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली निर्माण करण्यात येणारा मागासवर्ग कक्ष यांची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहील.

**सामान्य प्रशासन विभागातील मागासवर्ग कक्ष :-**

अ) राजपत्रित वर्ग १ व वर्ग २ ची सर्व प्रकरणे.

ब) वर्ग ३ ची राज्यस्तरीय संवर्गातील कर्मचा-यांची प्रकरणे (स्टेट लेव्हल कॅडर)

क) मंत्रालयीन विभागातील वर्ग ३ व वर्ग ४ ची सेवा विषयक प्रकरणे आणि

ड) प्रत्यक्ष पहाणी/तपासणीचे काम हे मर्यादित स्वरुपाचे असेल, म्हणजे ज्या विभाग प्रमुखांच्या कार्यालयातील वर्ग ३ ची पदे राज्यस्तरावर असतील (स्टेट लेव्हल कॅडर) त्या कार्यालयाची तपासणी व इतर कार्यालयापैकी महापालिका,नगरपालिका,जिल्हा परिषदा इत्यादि कार्यालयांची वर्ग १ व वर्ग २ च्या किंवा तत्सम कर्मचा-यांच्या अनुषंगाने तपासणी करणे.

**विभागीय आयुक्ताच्या कार्यालयात निर्माण करण्यात येणारा मागासवर्ग कक्ष :-**

अ) वर्ग-३ च्या राज्यस्तरावरील सर्व संवर्गातील कर्मचा-यांच्या गा-हाण्या व्यतिरिक्त विभागीय / जिल्हा पातळीवरील सर्व कार्यालयामधील वर्ग ३ व ४ मधील मागासवर्गीय कर्मचा-यांच्या सेवा विषयक प्रकरणे हाताळणे व शासकीय आदेश लक्षात घेवून त्यावर निर्णय घेणे. सदर गा-हाण्याच्या संदर्भात आयुक्तांकडून घेतलेल्या निर्णयामध्ये जोपर्यंत शासनाकडून सुधारणा किंवा बदल केला जात नाही तोपर्यंत आयुक्तांकडून घेतलेला निर्णय अंतिम स्वरुपाचा असेल. तसेच ज्या प्रकरणात आयुक्तांच्या निर्णयात पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याचा प्रश्न असेल त्या संदर्भात संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी पदोन्नतीच्या मानीव तारखा देण्याबद्दलच्या आयुक्तांच्या आदेशांची अंमलबजावणी करण्यापूर्वी त्याबाबत शासनाचे आदेश घेणे आवश्यक राहील.

ब) प्रत्यक्ष पहाणी जिल्हा स्तरावर / तपासणीचे काम सर्व शासकीय विभागी, जिल्हा व तालुका व इतर कार्यालये तसेच विभागीय/वरील महामंडळे, महापालिका /नगरपालिका जिल्हा परिषदा इत्यादि कार्यालयांची वर्ग ३ व वर्ग ४ च्या किंवा तत्सम कर्मचा-यांच्या अनुषंगाने तपासणी करणे.

४.२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८२/१६-ब, दिनांक १-६-८२ मधील आदेशान्वये सामान्य प्रशासन विभागामधील मागासवर्ग कक्षाचे अधिकारी, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी शासनाचे प्रतिनिधी म्हणून मागासवर्गीयासाठीचे आरक्षणाबाबतच्या आदेशांची विविध स्थानिक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमे, सांविधिक संस्था, मंडळे, महामंडळे इत्यादिकडूनही योग्य रितीने अंमलबजावणी होणे किंवा नाही ही वस्तुस्थिती अजमाऊन पाहण्यासाठी आणि अशा मंडळाच्या कार्यान्वयन प्राधिका-यांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी विभागीय /जिल्हा पातळीवरील अशा कार्यालयांना भेटी द्याव्यात असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. वरील आदेश लक्षात घेऊन सदर कार्यालयातील

कर्मचा-यांच्या सेवा विषयक गा-हाण्यांची प्रकरणे विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखालील मागासवर्गीय कक्षाकडून हाताळली जातील, त्या गा-हाण्यांच्या संदर्भात शासकीय आदेश लक्षात घेवून आयुक्त योग्य सल्ला संबंधित कार्यालयांना देतील.

४.३ मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या नियंत्रणाखालील विविध स्थानिक संस्था, सावजनिक क्षेत्रातील उपक्रमे, सांविधिक संस्था, मंडळे, महामंडळे इत्यादिंना त्यांच्या सेवेतील कर्मचा-यांच्या सेवा विषयक गा-हाण्यांच्या संदर्भात विभागीय आयुक्तांनी दिलेला सल्ला व मार्गदर्शन लक्षात घेवून योग्य कार्यवाही करण्यासंबंधी निदेश निर्गमित करण्यात यावेत.

५. सर्व विभागीय आयुक्तांनी वरील आदेशान्वये त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या सहायक आयुक्त/अथवा तत्सम अधिकारी यांच्या अधिपत्याखाली आवश्यक कर्मचारीवृंद घेऊन एक वेगळा मागासवर्गीय कक्ष निर्माण करण्याबाबत १.९.१९८६ पर्यन्त कार्यवाही करावी आणि त्याप्रमाणे शासनास कळवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. रामकृष्ण**
**विशेष सचिव, सामान्य प्रशासन विभाग.**

**विभागीय आयुक्तांच्या अधिपत्त्याखालील मागासवर्ग कक्षासाठी अधिकारी व कर्मचारी वर्गाची पदे निर्माण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग.
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी १०८८/१९१९/१६ ब
मंत्रालय मुंबई -४०० ३२,
दिनांक ११ मे, १९९०.

**वाचा** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०८५/२९८८/१६-ब, दिनांक १३-८-१९८६.

**शासन निर्णय**

शासकीय / निमशासकीय सेवेत मागासवर्गीयांसाठी विहित केलेल्या आरक्षणाबाबतच्या विविध आदेशांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्यासाठी तसेच त्या त्या महसूल विभागातील शासकीय, निमशासकीय कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांच्या सेवाविषयक गा-हाण्यांच्या संदर्भात अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली वर नमूद केलेल्या दि. १३-८-८६ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेल्या मागासवर्ग कक्षासाठी स्वतंत्र अशा अधिकारी व कर्मचारी वर्गाची पदे निर्माण करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, प्रत्येक विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील मागासवर्गीय कक्षासाठी खालीलप्रमाणे अधिकारी व कर्मचारी वर्गाची पदे प्रथमतः दिनांक १ मे १९९० ते २८ फेब्रुवारी १९९१ पर्यंतच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात यावी :-

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | विभागीय आयुक्त, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती व नागपूर |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| • | उपजिल्हाधिकारी /सहा.आयुक्त (रु.२२००-४०००) | प्रत्येकी १ पद |
| • | नायब तहसिलदार (रु. १६४०-२९००) | प्रत्येकी १ पद |
| • | अव्वल कारकून (रु.१४००-२३००) | प्रत्येकी २ पद |
| • | लिपीक टंकलेखक (रु.९५०-१५००) | प्रत्येकी १ पद |
| • | शिपाई (रु. ७५०-९४०) | प्रत्येकी १ पद |
| | | एकूण ६ पदे |

२. शासनाचे असे आदेश आहेत की, या कामाचे महत्व लक्षात घेता व त्या कामाकडे दुर्लक्ष होऊ नये या दृष्टीने सदर मागासवर्गीय कक्षामधील अधिकारी व कर्मचारी हे फक्त हयाच कक्षातील कामे करतील. त्यांचेकडे इतर कुठलेही काम / दौरे इत्यादि देण्यात येऊ नये. तसेच हया अधिका-यांनी व कर्मचा-यांनी प्रत्येक महिन्यास किमान १५ दिवस फिरती करुन शासकीय व निमशासकीय कार्यालये, महामंडळांची कार्यालये, इत्यादी कार्यालयांची तपासणी करणे आवश्यक राहील. इतर वेळी विभागीय कार्यालय स्थळी उपस्थित राहून ते तपासणी

अहवाल व वर्ग-३ व वर्ग-४ च्या मागासवर्गीय कर्मचा-यांकडून आलेल्या तक्रारींवर कार्यवाही करुन त्यांचा पाठपुरावा करण्याचे काम करतील.

३. सदर कक्षाने आपला तपासणी अहवाल संबंधित कार्यालयाच्या / मंडळाच्या निकटतम उच्च अधिका-यांकडे आणि मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सादर करावा. त्याचप्रमाणे वरील कक्ष तपासणी अहवालांच्या अनुपालनाचा पाठपुरावाही करेल व केलेल्या कामाचा तिमाही अहवाल विभागीय आयुक्तांमार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे शासनाच्या माहितीसाठी सोबतच्या विववरणपत्रात पाठविल.

४. या कारणासाठी होणारा खर्च मागणी क्र. च्ए-९-२०७० इतर प्रशासनिक सेवा -८००-इतर खर्च -६ विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील मागासवर्ग कक्षछ या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व तो वित्त विभाग, शासन ज्ञापन क्र.आकनि ११९०/५/अर्थसंकल्प -१३, दि. १९ एप्रिल १९९० अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या रुपये ३,००,०००/- (तीन लक्ष) इतक्या अग्रिमातून भागविण्यात यावा.

५. विभागीय आयुक्तांच्या कार्यालयाने आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिका-यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात /प्रपत्रात आगाऊ रक्कमेतून खर्च करताना सादर करण्यात येणा-या देयकावर आकस्मिकता निधी अग्रिम, शासन ज्ञापन, वित्त विभाग क्र.आकनि ११९०/५/अर्थसंकल्प -१३, दि. १९ एप्रिल,१९९० अन्वये मंजूर असे लाल शाईने लिहावे, अशी स्पष्ट सूचना त्या आदेशात /प्रपत्रांत अंतर्भूत करावी व ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी. तसेच अग्रिमातून खर्च केल्याची एकत्रित माहिती त्या महिन्यानंतरच्या १५ तारखेपर्यंत या विभागांकडे पाठवावी.

- हा शासन निर्णय, वित्त विभागांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५४९ व्यय-४, दिनांक २४ एप्रिल १९९० अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. द. माळवे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**शासकीय सेवेत मागासवर्गीय कर्मचारी /अधिकारी यांच्याकडून करण्यात आलेल्या गा-हाण्यांच्या / निवेदनांच्या प्रकरणांवर विनाविलंब कार्यवाही करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक,क्रमांक : बीसीसी-१०८६/५७३ /१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २६ जून १९९०

**पहा :** शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक : बीसीसी-१०८६/५७३/ १६-ब, दिनांक २/४/१९८६

## प रि प त्र क

उपरोक्त शासन परिपत्रकान्वये शासनाने असे आदेश दिले होते की,मागासवर्गीय कर्मचा-यांच्या सेवा विषयक तक्रारी / गा-हाण्यांच्या संदर्भात मागासवर्ग कक्षाकडून मागविण्यात आलेले अभिप्राय / माहिती तांतडीने म्हणजे जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात यावी. परंतु असे निदर्शनास आले आहे की, अशी माहिती / अभिप्राय प्रशासकीय विभाग /विभाग प्रमुख यांच्याकडून तत्परतेने पाठविण्यात येत नाहीत. तसेच या संदर्भात उच्चस्तरावर स्मरणपत्रे पाठवून देखील माहिती उपलब्ध होत नाही. तेव्हा सर्व मंत्रालयीन विभाग / विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना असे सूचित करण्यात येत आहे की, मागासवर्ग कक्ष, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय / विभागीय आयुक्त यांचेकडून मागविण्यात आलेल्या मागासवर्ग कर्मचा-यांच्या सेवाविषयक गा-हाण्यांसंबंधीचे अभिप्राय / माहिती जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत उपलब्ध करुन द्यावी. यासंदर्भात मागविण्यात आलेले अभिप्राय / माहिती एका महिन्याच्या आत उपलब्ध न झाल्यास शासनाला अशा प्रकरणी गंभीर दखल घ्यावी लागेल व संबंधितांवर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

२. सर्व मंत्रालयीन विभाग / विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी वरील आदेशाची काटेकोरपणे पालन करण्याची कृपया दक्षता घ्यावी. तसेच मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखलील शासकीय / निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, सहकारी संस्था, इत्यादींनाही या आदेशाची काटेकोरपपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. द. माळवे**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन.**

**शासकीय सेवेत मागासवर्गीय कर्मचारी / अधिकारी यांची गा-हाणी / निवेदने यांचेवर विनाविलंब कार्यवाही करण्याबाबत. तसेच आरक्षण विषयक आदेशांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत.**

---

**शिस्तभंग विषयक कारवाई.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. बीसीसी-१०८६/५७३/१६-ब,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ दिनांक १२ ऑक्टोबर, १९९०

पहा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०८६/५७२/१६-ब,
दि. २ एप्रिल, १९८६ व दिनांक २६ जून, १९९०.

**परिपत्रक :-** उपरोक्त शासन परिपत्रकान्वये शासनाने असे आदेश दिले आहेत की, मागासवर्गीयांच्या सेवा विषयक तक्रारी /गा-हाणी यांच्या संदर्भात मागासवर्ग कक्षाकडून मागविण्यात आलेले अभिप्राय तातडीने व एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावेत. सदर माहिती १ महिन्याच्या आत पाठविण्यात आली नाही तर अशा प्रकरणी शासनास गंभीर दखल घेऊन संबंधीतांविरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करावी लागेल असे म्हटले होते.

२. शासनाच्या निदर्शनास आले आहे की, शासनाने आरक्षणाविषयक वेळोवेळी जे आदेश निर्गमित केले आहेत त्यांची काही कार्यालयांकडून नीटपणे अंमलबजावणी केली जात नाही व त्याकडे दुर्लक्ष करुन टाळाटाळ केली जाते हया संबंधात विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीने नुकतीच शिफारस केली आहे की,आरक्षण विषयक आदेशाची अंमलबजावणी करण्यात जे अधिकारी दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणा दाखवित असल्याचे आढळून आल्यास त्यांची शासनाने गंभीर दखल घ्यावी व संबंधीतांवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी. सदरील शिफारशीच्या अनुषंगाने शासन असे आदेश देत आहे की, मागासवर्गीयांच्या आरक्षण (सरळ सेवाभरती,बढती, ५० / १०० बिंदू नामावली लिहून काढणे, इत्यादी) बाबी संबंधात वेळोवेळी जे आदेश निर्गमित केलेले आहेत त्यांचे संबंधीत अधिका-यांनी काटेकोरपणे पालन करावे. सेवा विषयक बाबींच्या आदेशाबाबत कार्यवाही करण्यात दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणा दाखविल्यास संबंधित अधिकारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील. तरी संबंधित सक्षम अधिका-याने शासकीय आदेशा प्रमाणे कार्यवाही न करणा-या त्यांच्या नियंत्रणाखालील अधिका-यांच्या विरुध्द नियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्याबाबत त्वरेने कार्यवाही करावी व त्याची माहिती (अहवाल) सामान्य प्रशासन विभाग / मागासवर्ग कक्षाकडे पाठवावी.

२. सर्व मंत्रालयीन विभाग / विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख यांनी वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. तसेच मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणा खालील निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे, सहकारी संस्था इत्यादींनांही वरील आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित मंत्रालयीन विभागांनी निर्गमित कराव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**एच.ए.डी .सादिपन**
**प्रधान सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन.**

**शासकीय सेवेत मागासवर्गीय कर्मचारी / अधिकारी यांची गा-हाणी / निवेदने यांचेवर विनाविलंब कार्यवाही करण्याबाबतचे. तसेच आरक्षण विषयक आदेशांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत.**

---

**शिस्तभंग विषयक कारवाई.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्र. बीसीसी-१०९३/१४०१/प्र.क्र.१२५/९३/१६-ब,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ दिनांक २८ जुलै, १९९३.

**पहा** :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०८६/५७३/१६-ब, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९०.

**परिपत्रक :-** शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :बीसीसी १०८६/५७३/१६-ब, दिनांक १२ ऑक्टोबर १९९० अन्वये शासनाने असे आदेश निर्गमित केले आहेत की, मागासवर्गीयांच्या सेवाविषयक तक्रारी / गा-हाणी यांच्या संदर्भात मागासवर्ग कक्षाकडून मागविण्यात आलेले अभिप्राय तातडीने व एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावेत. सदर माहिती एक महिन्याच्या आत पाठविण्यात आली नाही तर अशा प्रकरणी शासनास गंभीर दखल घेऊन संबंधितांवर नियमाप्रमाणे कारवाई करावी लागेल. तसेच शासनाने आरक्षण विषयक जे वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत त्यांची काही कार्यालयांकडून नीटपणे अंमलबजावणी केली जात नाही व त्याकडे दुर्लक्ष करुन टाळाटाळ केली जाते. आरक्षण विषयक आदेशाची अंमलबजावणी करण्यात जे अधिकारी दुर्लक्ष व निष्काळजीपणा करतील त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. असेही त्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. तथापि ब-याच विभागात / कार्यालयात शासनाने वेळोवेळी जे आरक्षण विषयक आदेश निर्गमित केले आहेत त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे आढळून आले आहे. यासंदर्भात जुलै १९९३ च्या अधिवेशनामध्ये विधानपरिषदेमध्ये चर्चा झाली होती व या चर्चेत मा.सभासदांनी आरक्षणविषयक धोरणाचे पालन न करणा-या अधिका-याविरुध्द / कर्मचा-याविरुध्द कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्या चर्चेच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना याबाबत पुन्हा एकदा सूचना देण्यात येत आहेत की, जे अधिकारी सेवा विषयक बाबींच्या आदेशांच्या अंमलबजावणी संदर्भात दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणा दाखवतील असे संबंधित अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील. सक्षम अधिका-याने शासकीय आदेशाप्रमाणे कार्यवाही न करणा-या त्यांच्या नियंत्रणाखालील अधिका-याविरुध्द नियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करावी व त्यांची माहिती सामान्य प्रशासन विभागास कळवावी.

सर्व मंत्रालयीन विभाग / विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी वरील आदेशाची योग्य ती नोंद घेऊन त्याचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय कार्यालये, उपक्रम, मंडळे, महामंडळे, सहकारी संस्था इत्यादींच्या निदर्शनास वरील आदेश आणावेत. व त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना निर्गमित कराव्यात. मंत्रालयीन विभाग याबाबत ज्या सूचना निर्गमित करतील त्याची एक प्रत सामान्य प्रशासन विभागास (मागासवर्ग कक्ष) न चुकता पृष्ठांकित करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शांता शास्त्री**

**सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन.**

**मागासवर्गीयांच्या सेवाभरती व सेवेविषयी आदेश निर्गमित करण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग.

शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-२०००/२६५५/ १६-ब

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

१० नोव्हेंबर, २०००

**परिपत्रक**

दि. १५.५.२००० रोजी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मागासवर्गीय कर्मचा-यांच्या मागण्याबाबत कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, नागपूर या संघटनेच्या पदाधिका-याबरोबर बैठक घेण्यात आली होती.

सदर चर्चेमध्ये मागासवर्गीयांच्या सेवाभरती तसेच इतर सेवाविषयक बाबीसंबंधी सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीशिवाय आदेश निर्गमित केल्यास ते क्वचित प्रसंगी शासनाच्या या संबंधीच्या धोरणाशी सुसंगत नसतात.

त्यामुळे शासन आता असे आदेश देत आहे की, मागासवर्गीयांच्या सेवाभरती अथवा इतर कोणत्याही सेवाविषयक बाबीसंबंधीचे आदेश सामान्य प्रशासन विभागामार्फत शासनाची मान्यता घेतल्यावर निर्गमित करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**मागासवर्गीयांच्या सेवाभरती व सेवाविषयक आदेश निर्गमित करण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेणेबाबत -**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग.

शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी २०००/२६५५/ १६-ब

मंत्रालय- मुंबई-४०० ३२

१८ जुलै, २००१

**वाचा:-** सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी २०००/२६५५/१६-ब,दि.१०,नोव्हेबर २०००.

संदर्भाधीन परिपत्रकान्वये मागासवर्गीयांच्या सेवाविषयक अथवा इतर कोणत्याही सेवाविषयक बाबी संबंधीचे आदेश सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेतल्यानंतर निर्गमित करण्यात यावे, अशा सूचना दिलेल्या आहेत.

या आदेशाच्या अनुषंगाने काही कार्यालयांनी तसेच विभागाकडून कर्मचा-यांच्या नियुक्त्या करण्याकरीता तसेच पदे भरण्याकरिता अनुमती देण्याबाबत या विभागाकडे विचारणा करण्यात येत आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, मागासवर्गीयांच्या सेवाविषयक बाबींचा संबंध येऊ शकेल असे धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वी मंत्रालयीन विभागांनी सहमती घेणे आवश्यक आहे. तथापि जर रिक्त पदे भरण्यास शासनाची अनुमती असेल तर अशीच पदे विहित कार्यपध्दतीस अनुसरुन भरण्यास, पुन्हा या विभागाची सहमती घेण्याची आवश्यकता नाही. तसेच सेवाविषयक अन्य बाबीसंदर्भातील विहित नियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी या विभागाची सहमती घेण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जी. के. राऊत**

**अवर सचिव,महाराष्ट्र शासन,**

**आरक्षणा संदर्भात निर्गमित केलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग.
परिपत्रक क्रमांक : बीसीसी-२००२/१९१८/(प्र.क्र. ६०/२००२)/१६-ब,
मंत्रालय मुंबई -४०० ३२,
दिनांक : २२-१०-२००२.

**शासन परिपत्रक**

आरक्षणासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालये, मंडळे, महामंडळे, स्वायत्त संस्था, सहकारी बँका, जिल्हा परिषदा यांचेकडून योग्यरित्या करण्यात येते नाही, असे अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या सन २००१-२००२ च्या चौथ्या अहवालात समितीने अभिप्राय नोंदविले आहेत.

वरील अभिप्रायाच्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय विभागांना कळविण्यात येते की, त्यांचे अखत्यारितील कार्यालये, मंडळे, महामंडळे, सहकारी बँका, स्वायत्त संस्था, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद इत्यादी कार्यालयांना सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या / येणा-या निरनिराळया आदेशांची विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयाकडून योग्य प्रकारे अंमलबजावणी होते किंवा कसे याबाबत प्रत्येक प्रशासकीय विभागांनी तपासणी करावी अशी तपासणी करताना संबंधित कार्यालयातील संवर्गनिहाय एकूण पदे, त्यातील विहित टक्केवारीनुसार उपलब्ध झालेली आरक्षणाची पदे, आवश्यक आरक्षणानुसार भरलेली पदे व आवश्यक आरक्षणानुसार असलेली तुट व तसेच या विभागाच्या क्रमांक-बीसीसी-१०९५/९६६/ प्र. क्र ५/१६-ब, दिनांक १०/३/९९ च्या परिपत्रकानुसार ओढलेल्या अनुशेष व या बाबी तपासाव्यात. ओढलेला अनुशेष भरण्याकरिता त्या तया भरती वर्षात केलेले प्रयत्न गट-क व गट-ड मधील सरळ सेवेने पदे भरताना निवड समितीचा सभासद म्हणून समाजकल्याण अधिकारी, आदिवासी विकास अधिकारी यांना मुलाखतीच्या वेळी बोलावण्यात येते किंवा नाही,मागासवर्गीय कर्मचा-यांना मुलाखतीसाठी व नेमणूकीसाठी पाठविण्यात येणारी पत्रे १५ दिवस अगोदर पाठविले जातात किंवा कसे तसेच बिंदू नामावली वही लिहिण्यात आलेली आहे किंवा कसे या सर्व बाबी तपासाव्यात. तसेच मागासवर्गीयांची भरतीबाबतचे वार्षिक विवरणपत्र विहित मुदतीत संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठविण्यात येतात किंवा नाही तसेच ही विवरणपत्र विहित मुदतीत पाठविण्यात येतात किंवा कसे याबाबत देखील तपासणी करावी.

वरील सर्व प्रकारे तपासणी करण्यात यावी तसेच विहित कार्यपध्दत न अवलंबणारा अधिकारी आढळून आल्यास त्या अधिका-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दे. त्र्यं. कुमावत**
**उप चिव महाराष्ट्र शासन**

**शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/ नगरपालिका/महानगरपालिका इत्यादी कार्यालया- मध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग.

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २००४/ १६६६/प्र. क्र. ६१/०४/ १६ ब
मंत्रालय मुंबई -४०० ३२,
१० ऑगस्ट -२००४

**वाचा** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०८५/२९८८/१६-ब, दिनांक १३ ऑगस्ट, १९८६.

**शासन निर्णय**

मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणाबाबतचे धोरण व शासकीय आदेशांची अंमलबजावणी योग्यरितीने होते किंवा नाही हे पाहण्यासाठी तसेच संबंधित कार्यालयातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींचे निराकरण करण्यासाठी वरील शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखाली विभागीय आयुक्त स्तरावर मागासवर्ग कक्ष निर्माण करण्यात आले आहेत. तथापि सर्वच शासकीय/निमशासकीय तसेच मंडळे /महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका, शासकीय उपक्रम, अनुदानित संस्था, विद्यापिठे, सहकारी संस्था,शैक्षणित अनुदानित संस्था इत्यादिमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबतचे आदेश नाहीत. तथापि काही मोठया कार्यालयात मागासवर्ग कक्ष स्थापन केलेला आहे. त्यामुळे कार्यालयांमध्ये बिंदूनामावल्या ठेवणे व मागासवर्गीयांना आरक्षण विषयक लाभ व सवलती मिळण्यास मोलाचे सहकार्य मिळत असल्याचे आढळून आले आहे. ही बाब विचारात घेवून मोठया शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये खालील मार्गदर्शक सूचना विचारात घेवून मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत कार्यवाही करावी.

१. ज्या कार्यालयांमध्ये १००० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारीववृंद आहे, अशा कार्यालयांमध्ये, मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

२. ज्या कार्यालयामध्श्ये १००० पेक्षा अधिक अधिकारी/ कर्मचारीवृंद नाही मात्र अशा कार्यालयांच्या अधिपत्याखाली क्षेत्रीय कार्यालये आहेत व अशा क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचा-यांच्या नियुक्त्यांचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयांना दिलेले असतील तर अशा क्षेत्रीय कार्यालयातील आरक्षण तपासणीकरिता संबंधित विभागीय कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

३. सर्व विद्यापिठे सर्व उपसंचालक/सहसंचालक (ज्यांना शिक्षकेतर कर्मचा-यांच्या मान्यता देण्याचे अधिकार आहेत) यांच्या कार्यालयामध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

४. या व्यतिरिक्त ज्या कार्यालयाला विधानमंडळाच्या अनुसूचित जाती/जमाती/वि.जा.भ.ज./ इ.मा.व. कल्याण समितीने विशेष करुन (Specifically) आदेश दिलेले असतील अशा कार्यालयामध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

५. सदर मागासवर्ग कक्षाकरीता नेमावयाच्या अधिकारी व कर्मचारीवर्गाची संख्या ही त्या कार्यालयाच्या एकूण अधिकारी/कर्मचारी वर्गाची संख्या, त्या कायर्चालयाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचा-यांची संख्या व त्या कार्यालयांच्या कार्यक्षेत्राखाली येणा-या

कार्यालये/शैक्षणिक संस्था विचारात घेवून तसेच स्थापन करावयाच्या मागासवर्ग कक्षाचे कामकाज विचारात घेवून निश्चित करावयाची आहे.

६. असा निश्चित केलेला अधिकारी/कर्मचारीवृंद स्वतंत्रपणे पदे निर्माण करुन किंवा सद्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांमधून मागासवर्ग कक्षाला उपलब्ध करुन देण्याबाबत प्रशासकीय विभागाने वा संबंधीत कार्यालयाने निर्णय घ्यावा.

२. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या परिपत्रकानुसार योग्य त्या सूचना विनाविलंब निर्गमित करण्यात याव्यात व त्याची एक प्रत या विभागाकडे पाठवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दे. त्र्यं. कुमावत**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन.**

**शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/ नगरपालिका/महानगरपालिका इत्यादी कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत .**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग.
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१०/प्र. क्र. ४०९/१६ ब
मंत्रालय मुंबई -४०० ३२,
१६ ऑगस्ट -२०१०

**वाचा** :- शासन परिपत्रक, क्रमांक : बीसीसी-२००४/१६६६/प्र.क्र. ६१/१६-ब,
दिनांक १० ऑगस्ट, २००४.

**प्रस्तावना :** शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-२००४/१६६६/प्र.क्र. ६१/०४/१६-ब, दिनांक १० ऑगस्ट, २००४ नुसार शासकीय/निमशासकीय तसेच मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/शासकीय उपक्रम, अनुदानित संस्था, विद्यापिठे, सहकारी संस्था, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादीमध्ये ज्या कार्यालयामध्ये १००० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी वृंद आहे अशा कार्यालयामध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यात यावा असे आदेश शासनाने दिले आहेत.

या संदर्भात अध्यक्ष, अनुसूचित जमाती कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई यांच्याकडे दिनांक ४ जून, २०१० रोजी झालेल्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी त्यांनी सदर आदेशातील १००० इतक्या अधिकारी व कर्मचारी वृंदाच्या मर्यादेत सुधारणा करुन ती संख्या कमी करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

**शासन परिपत्रक :** उपरोक्त बाबत विचार करुन शासन आता असे आदेश देत आहे की, ज्या कार्यालयामध्ये ५०० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी वृंद आहे, अशा कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावा.

२. शासन परिपत्रक दिनांक १०-८-२००४ मधील क्रमांक २ पुढे दिलेल्या आदेशामध्ये या अनुषंगाने १००० च्या ऐवजी ५०० इतकी अधिकारी व कर्मचारी वृंदाची मर्यादा राहील. शासन परिपत्रक, दिनांक १०-८-२००४ मधील अन्य आदेश जसे आहेत तसे लागू राहतील.

३. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय / निमशासकीय, मंडळे/ महामंडळे, शासकीय उपक्रम इत्यादी कार्यालयांना या परिपत्रकानुसार योग्य त्या सूचना निर्गमित कराव्यात व यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे याची खातरजमा करावी.

४. सदर शासन परित्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००८१६१८४३४२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दि .रा. डिंगळे**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

# [८]

# आरक्षण
# अनुशेषाचे वार्षिक विवरणपत्र

**शासकीय सेवेतील आरक्षित पदावर मागासवर्गीयांच्या सेवाभरती पदांचे वार्षिक विवरणपत्र.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-२००१/प्र.क्र.५०/२००१/१६-ब,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २/११/२००१

**परिपत्रक**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.: बीसीसी - १०६८/६६५९४/३३५४/जे, दिनांक ४ एप्रिल, १९६९ अन्वये आरक्षित पदावर मागासवर्गीयांच्या सेवाभरती संदर्भातील वार्षिक विवरणपत्र विहित करण्यात आले आहे व त्या विवरण पत्रातील माहिती संचालक, समाजकल्याण यांच्यामार्फत शासनाकडे पाठविण्याच्या सूचना सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना देण्यात आलेल्या आहेत. सदर विवरणपत्राऐवजी आता वरील विषयासंबंधीची माहिती या परिपत्रकासोबत जोडलेल्या सुधारीत विवरण पत्रामध्ये सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी संचालक, समाज कल्याण यांच्याकडे पाठवावी. संचालक, समाज कल्याण यांनी ही माहिती एकत्रित स्वरुपात शासनाकडे पाठवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

**शैला तारगे पाटील**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

# विवरणपत्र

## मागासवर्गीयांच्या सरळसेवा भरतीसंबंधी दिनांक ३१ डिसेंबर        रोजीची असलेली माहिती.
## (शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी/२००१/प्र.क्र.५०/२००१/१६ब, दिनांक २/११/२००१ चे सहपत्र)

**विभागाचे नांव**

| सेवेचा वर्ग | सरळसेवा भरती/पदोन्नतीच्या कोट्यातील पदे | | भरलेल्या पदांमध्ये मागासवर्गीयांच्या आरक्षणाप्रमाणे आवश्यक असलेले प्रतिनिधीत्व | | | | | | | | | मागासवर्गीयांचे प्रत्यक्ष असलेले प्रतिनिधीत्व | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण पदे (एकाकी पदे व आरक्षण अन्य पदे वगळून | भरलेली पदे | अ. जा. | अ. ज. | वि.जा. अ. | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि. मा. प्र. | इ.मा.व (सरळ सेवा भरती संदर्भात) | खुले | अ.ज | अ.ज. | वि. जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि. मा. प्र. | इ.मा. व. | खुले |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| गट - अ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| गट - ब | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| गट - क | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| गट - ड | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

| सन २०..... या भरतीपर्यंत भरण्यात आलेली पदे (अनुशेषाची रिक्त पदे (Carried forward reserved vacancies) स्वंतत्र दर्शवावीत | | | | | | | | | अनुशेषाची रिक्त पदे (Carried forward reserved vacancies) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. जा. | अ. ज. | वि.जा. अ. | भ.जा. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा.प्र. | इ.मा.व (केवळ सरळ सेवा भरती संदर्भात) | खुले | अ. जा. | अ.ज. | वि. जा. अ | भ.जा. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि. मा. प्र. | इ.मा.व. (केवळ सरळ सेवा भरती संदर्भात) | अनुशेषाची रिक्त पदे न भरण्याची सर्वसाधारण कारणे |
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३९ |

**मागासवर्गीयांची सेवाभरती दर्शविणारे वार्षिक विवरणपत्र सादर करण्यास विलंब टाळण्या साठी मंत्रालयीन विभाग/ विभाग प्रमुख यांनी अनुसरण्याची कार्यपध्दती**

**महाराष्ट्र शासन.**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :बीसीसी-२००२/१३८१/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ४/१०/२००२.

**संदर्भ :** १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -१०७७/१५२२/सोळा, दिनांक २९ ऑक्टोबर,१९७७.
२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२००१/प्र.क्र. ५०/२००१/१६-ब, दिनांक १/११/२००१.

**शासन परिपत्रक** :-

सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७७/१५२२/१६, दिनांक २९ ऑक्टोबर, १९७७ च्या शासन परिपत्रकान्वये मागासवर्गीयांची सेवा भरती दर्शविणारे वार्षिक विवरण सादर करण्याबाबत यापूर्वी मंत्रालयीन विभाग अणि विभाग प्रमुखांना सूचना देण्यात आल्या होत्या. परंतू या सूचनाचे पालन करण्यात टाळाटाळ करण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने दिसून येते.

२. मागासवर्गीय उमेदवारांच्या प्रत्येक वर्षाच्या सेवाभरतीसंबंधातील वार्षिक विवरण सादर करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती काटेकोरपणे अनुसरण्यात यावी असे निदेश शासन देत आहे.

अ) मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील विभागांच्या प्रमुखांना, वार्षिक विवरणाच्या संबंधातील माहिती विहित प्रपत्रामध्ये संकलित करुन ती प्रत्येक वर्षी १५ फेब्रुवारीपूर्वी न चूकता मंत्रालयाच्या प्रशासनिक विभागाकडे पाठवण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. ठरलेल्या तारखेपर्यंत विवरणपत्र न पाठवणाऱ्या विभाग प्रमुखांची नावे प्रत्येक वर्षी २५ फेब्रुवारीपर्यंत सामान्य प्रशासन विभागाला कळविण्यात यावीत.

ब) विभाग प्रमुखांनी आपापल्या पध्दतीने त्यांच्या दुय्यम कार्यालयाकडून माहिती मिळविण्यासाठी लगेच कार्यवाही सुरु करावी आणि प्रत्येक वर्षी २० जानेवारीपर्यंत आवश्यक ती माहिती न देणा-या अधिका-यांच्या विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचे निदेश, विभाग प्रमुखांना द्यावेत. दुय्यम कार्यालयांकडून माहिती गोळा करण्याची जबाबदारी विभाग प्रमुखांची असते आणि प्रत्येक वर्षी आपापल्या मंत्रालयीन विभागाकडे १५ फेब्रुवारीपर्यंत त्यांनी जी माहिती पाठवणे आवश्यक असते ती त्यांच्याकडे पाठवण्यात येत आहे, याची खात्री करुन घेण्यासाठी विभाग प्रमुखांना आवश्यक वाटेल अशी कार्यवाही त्यांनी केली पाहिजे असे त्यांना स्पष्टपणे कळवण्यात यावे.

क) मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील आस्थापनांच्या व सेवांच्या संबंधातील विवरणे एकत्रित केली पाहिजेत आणि संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे संपूर्ण विभागाचे म्हणजेच खुद्द मंत्रालयीन विभागांचे आणि त्यांच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुखांकरिता / कार्यालयांकरिता असे एक एकत्रित

(खंडशः नव्हे) विवरण पाठवले पाहिजे. असे एकत्रित विवरण प्रत्येक वर्षी १५ मार्चपर्यंत संचालक, समाजकल्याण पुणे यांच्याकडे पाठविण्यात यावे व त्याची एक प्रत सामान्य प्रशासन विभागाला पृष्ठांकित करण्यात यावी.

ड) मागास उमेदवाराकरिता जागा राखून ठेवण्यासंबंधीच्या व त्यांची भरती करण्यासंबंधीच्या कामाकरिता जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या मंत्रालयीन विभागामधील आस्थापनेचा प्रभारी उपसचिव यासंबंधातील आवश्यक कार्यवाही सुरु करण्यास व तिच्या जोमाने पाठपुरावा करण्यास जबाबदार असेल. या कामाचा प्रभार ज्या उपसचिवांकडे असेल त्यांची नावे सामान्य प्रशासन विभागाला कळविण्यात आली पाहिजेत.

स्थायी आदेशांच्या अनुसार मेहेतर म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींची अनुसूचित जातीकरिता वर्ग-४ मध्ये ज्या रिकाम्या जागा राखून ठेवलेल्या असतात त्या जागांच्या संबंधात गणना करण्यात येणार नाही. मेहेतरांच्या संख्येचा वार्षिक विवरणात दर्शवलेल्या वर्ग चारच्या आकडयांमध्ये समावेश होणार नाही. हे आकडे वार्षिक विवरणात स्वतंत्र प्रवर्गामध्ये दर्शविण्यात आले पाहिजेत. वर्ग चार संबंधातील आकडयांमध्ये मेहेतरांची संख्या समाविष्ट नाही अशा अर्थाची टीप वार्षिक विवरणाच्या शेवटी विनिर्देशपूर्वक समाविष्ट करण्यात आली पाहिजे.

३. मागासवर्गीयांच्या भरतीचे वार्षिक विवरणपत्र प्रत्येक वर्षाला संचालक, समाजकल्यापण, पुणे आणि अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांना दि. २८ फेब्रुवारी पर्यंत संदर्भ क्रमांक (२) च्या शासन परिपत्रकातील विवरणपत्रानुसार न चूकता पाठविण्यात याव्यात. याबाबत असेही स्पट करण्यात येते की, या आदेशांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी. टाळाटाळ, व निष्काळजीपणा दाखविणा-या अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाईही करण्यात यावी. मंत्रालयीन विभाग / विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय / निमशासकीय सेवा / मंडळे / महामंडळे इत्यादी आस्थापनेवरील ही माहिती शासनास प्रत्येक वर्षीच्या दि. २८ फेब्रुवारी पर्यंत पाठवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दे. त्र्यं. कुमावत**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

# [९]

# आरक्षण
# मागासवर्गीय संघटना

**आरक्षित पदांवर मागासवर्गीय कर्मचा-यांची भरती करताना मागासवर्गीय संघटनांकडून उमेदवारांची यादी मागविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी १०८३/(सीआर. नं. १४३/८३) १६ ब
दिनांक २८ सप्टेंबर,१९८३.

**पहा :** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७७/इसीआर /१०४९/१६, दिनांक २७/९/१९७७.

२) शासकीय परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७९/१६-ब, १६, दिनांक ३०/७/१९८०

**परिपत्रक**

शासकीय परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७९/१६-ब, दिनांक ३०/७/१९८० अन्वये शासनाने वर्ग ३ व वर्ग ४ मधील जी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व विभागीय निवड मंडळे यांच्या कार्यकक्षेत येत नाहीत, त्या पदांवर मागासवर्गीय उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्याकरिता खालील तीन मागासवर्गीय संघटनांना उमेदवारांची नांव नोंदणी व नावांची शिफारस करण्यासाठी मान्यता दिली आहे :-

१) सचिव, मागासवर्गीय सुधार महासंघ,
व्दारा- आर.जे. वाघमारे,
लॉक नं. १२, दुसरा मजला अजंठा बिल्डिंग,
२०/२१ कार्टर रोड, खार दांडा, मुंबई ४०० ०५३.

२) मुख्य संघटक सचिव,
महाराष्ट्र स्टेट फेडरेशन ऑफ शेडयूल्ड कास्ट/ शेडयूल्ड ट्राईब्ज /विमुक्त जाती /नोमॅडिक ट्राईब्ज ॲड बुध्दिस्ट एमप्लॉईज वेल्फेअर असोसिएशन, महेदिया बिल्डिंग, धंतोली, नागपूर.

३) महाराष्ट्र स्टेट फेडरेशन फॉर बॅकवर्ड क्लास मेडिकल वेल्फेअर,६५,
रामबाग, नागपूर.

२. शासनाने वरील आदेशांच्या संदर्भात पुनर्विचार केला असून, शासकीय परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ३०/७/१९८० च्या आदेशांमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात आला आहे :-

वरील तीन मान्यताप्राप्त संघटनांकडे नोंदणी केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना रिक्त पदांबाबतची फक्त माहिती पुरविण्याच्या दृष्टीने, नियुक्ती अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात भरावयाच्या रिक्त पदांबाबतची माहिती वरील तिन्ही संघटनांना पाठवावी. मात्र मागासवर्गीय संघटनांकडे नोंदविलेल्या उमेदवारांच्या नावांची शिफारस सेवायोजन कार्यालये किंवा समाजकल्याण अधिकारी यांच्या मार्फतच होणे आवश्यक आहे. या संघटनांना नियुक्ती अधिका-यांकडे स्वतंत्रपणे नावांची शिफारस करण्याचे अधिकार राहणार नाहीत, म्हणून नियुक्ती अधिका-यांनी यापुढे वरील संघटनांनी स्वतंत्ररित्या शिफारस केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या नावांचा विचार करु नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**आरक्षित पदांवर मागासवर्गीय कर्मचा-यांची भरती करताना मागासर्गीय संघटनांकडून <u>उमेदवारांची यादी मागविण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग.

शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी १०८३ / (सीआर. नं. १४३/८३) १६ ब

मंत्रालय मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ ऑक्टोबर १९८३.

<u>पहा</u> : (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०७७/इसीआर/१०४९/१६, दिनांक २७/९/१९७७.

(२) शासकीय परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी १०७९/१६-ब, दिनांक ३० जुलै १९८०.

(३) शासकीय परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी १०८३/(सी आर नं.१४३/८३) १६-ब, दिनांक २८ सप्टेंबर १९८३.

**<u>परिपत्रक</u> :-** शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक १०८३/(सी आर नं.१४३/८३) १६-ब, दिनांक २८ सप्टेंबर १९८३ मधील सुधारित आदेशांप्रमाणे मान्यताप्राप्त मागासवर्गीय संघटनांनी त्यांच्याकडे नोंदणी केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना रिक्त पदांबाबतची फक्त माहिती द्यावयाची आहे. या तीनही संघटनांना त्यांच्याकडे नोंदणी केलेया मागासवर्गीय उमेदवारांच्या नावाची सेवायोजन कार्यालये / समाजकल्याण अधिकारी वा आदिवासी विकास अधिकारी यांच्याकडे स्वतंत्रपणे शिफारस करण्याचे अधिकार नाहीत म्हणून सदर संघटनांनी स्वतंत्ररित्या शिफारस केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या नावांचा विचार करु नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बा. उ. मोरे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**कर्मचा-यांची भरती करण्याबाबत मागासवर्गीय संघटनांना रिक्त पदांची माहिती पुरविण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी ११८९/२१२ [प्र.क्र. ७४/८९]/१६-ब,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२, दिनांक १० मे १९८९.

**वाचा** : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०८३/ [सीआर-१४३/८३]/१६-ब, दिनांक २८ स्प्टेंबर १९८३.

**प रि प त्र क**

शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी १०८३/(सी आर १४३/८३) १६-ब, दिनांक २८ सप्टेंबर १९८३ अन्वये ज्या तीन संघटनांना त्यांच्याकडे नोंदणी केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना रिक्त पदांबाबतची फक्त माहिती पुरविण्यास मान्यता दिली आहे त्याव्यतिरिक्त आता वर्ग ३ व ४ मधील जी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व विभागीय निवड मंडळे यांच्या कार्यकक्षेत येत नाहीत, अशा पदांवर मागासवर्गीय उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात भरती करण्याबाबतच्या जाहिरातीतील रिक्त पदांची फक्त माहिती पुरविण्यासाठी खालील दोन संघटनांना शासन मान्यता देण्यात येत आहे :-

(१) अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, महाराष्ट्र शाखा,
पंडित नेहरु मार्ग, सरकारी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था,
वर्धा रोड, जेसलिन हॉस्पिटल जवळ, धंतोली,नागपूर.

(२) इंडियन डिप्रेस्ड क्लासेस प्रोग्रेसिव्ह लीग,
व्दारा : एस.एम.पाटील,प्लॉट नं.१३१६, बुध्द नगर,
(आनंद बुध्द विहाराच्या मागे) नागपूर (१७.

वरील संघटनांकडे नोंदणी केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना रिक्त पदांबाबतची फक्त माहिती पुरविण्याच्या दृष्टीने, नियुक्ती अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात भरावयाच्या रिक्त पदांबाबतची माहिती वरील दोन संघटनांना पाठवावी. मात्र या संघटनाकडे नोंदविलेल्या उमेदवारांच्या नावांची शिफारस सेवायोजन कार्यालये, समाजकल्याण अधिकारी, किंवा आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत होणे आवश्यक आहे. या संघटनांना नियुक्ती अधिका-यांकडे स्वतंत्रपणे उमेदवार पुरस्कृत करण्याचे अधिकार राहणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. द. माळवे**
**शासनाचे उप सचिव.**

**आरक्षित पदांवर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत मागासवर्गीय संघटनांना रिक्त पदांची माहिती पुरविण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी २०००/३१०/प्र.क्र. २४/२०००/ १६-ब,
मंत्रालय मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ७ मार्च, २०००.

**वाचा** :- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८३/(सीआर-१४३/८३)/१६-ब, दिनांक २८ सप्टेंबर, १९८३.
२) शासन परिपत्रक क्रमांक-बीसीसी ११८९/२१२ (प्र.क्र.७४/८९)१६-ब, दिनांक -१० मे १९८९.

**परिपत्रक**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०८३/(सीआर १४३/८३) १६-ब, दिनांक २८ सप्टेंबर, १९८३ व शासन परिपत्रक, क्रमांक बीसीसी ११८९/२१२ (प्र.क्र. ७४/८९)/१६,ब, दिनांक १० मे, १९८९ अन्वये ज्या ५ संघटनांना त्यांच्याकडे नोंदणी केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना रिक्त पदांबाबतची फक्त माहिती पुरविण्यास मान्यता दिली आहे. या संघटनांव्यतिरिक्त आता ऑल इंडिया मुस्लिम ओ.बी.सी. ऑर्गनायझेशन या संघटनेस गट-क आणि गट-ड मधील जी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व विभागीय निवड मंडळे यांच्या कार्यकक्षेत येत नाहीत, अशा पदांवर मागासवर्गीय उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात भरती करण्याबाबतच्या जाहिरातीतील रिक्त पदांची फक्त माहिती पुरविण्यासाठी शासन मान्यता देण्यात येत आहे.

या संघटनेकडे नोंदणी केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना रिक्त पदांबाबतची फक्त माहिती पुरविण्याच्या दृष्टीने, नियुक्ती अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयात भरावयाच्या रिक्त पदांबाबतची माहिती वरील संघटनेस पाठवावी. मात्र या संघटनेकडे नोंदविलेल्या उमेदवारांच्या नावांची शिफारस सेवायोजन कार्यालये, समाजकल्याण अधिकारी, किंवा आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत होणे आवश्यक आहे. या संघटनेस नियुक्ती अधिका-यांकडे स्वतंत्रपणे उमेदवार पुरस्कृत करण्याचे अधिकार राहणार नाहीत.

सदर संघटनेस महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ७, २९ व ३० मध्ये विहित करण्यात आलेल्या तरतुदीनुसार मान्यता देण्यात आलेली नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शैला तारगे पाटील**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**आरक्षित पदांवर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत मागासवर्गीय संघटनांना रिक्त पदांची माहिती पुरविण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग.

शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी २०००/प्र. क्र. ४६/२०००/ १६-ब,

मंत्रालय मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- १९ जून, २०००.

**वाचा**:- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०८३/(सीआर-१४३/८३)/१६-ब, दिनांक २८ सप्टेंबर, १९८३.

२) शासन परिपत्रक, क्रमांक बीसीसी-११८९/२१२ (प्र.क्र.७४/८९)/१६-ब, दिनांक- १० मे, १९८९.

**<u>परिपत्रक</u>**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०८३/(सीआर-१४३/८३)/१६-ब, दिनांक २८ सप्टेंबर, १९८३ व शासन परिपत्रक क्रमांक-बीसीसी-११८९/२१२/(प्र.क्र.७४/८९)/१६-ब, दिनांक १० मे, १९८९ व शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी २०००/३१०/प्र.क्र.२४/२०००/१६-ब, दिनांक ७ मार्च, २००० अन्वये ज्या ६ संघटनांना त्यांच्या कडे नोंदणी केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना रिक्त पदांबाबतची फक्त माहिती पुरविण्यास मान्यता दिली आहे या संघटनाव्यतिरिक्त आता आदिवासी राजपत्रित अधिकारी महासंघ या संघटनेस गट-क आणि गट-ड मधील जी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व विभागीय निवड मंडळे यांच्या कार्यकक्षेत येत नाहीत, अशा पदांवर मागासवर्गीय उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात भरती करण्याबाबतच्या जाहिरातीतील रिक्त पदांची फक्त माहिती पुरविण्यासाठी शासन मान्यता देण्यात येत आहे.

या संघटनेकडे नोंदणी केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना रिक्त पदांबाबतची फक्त माहिती पुरविण्याच्या दृष्टीने, नियुक्ती अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयात भरावयाच्या रिक्त पदांबाबतची माहिती वरील संघटनेस पाठवावी. मात्र या संघटनेकडे नोंदविलेल्या उमेदवारांच्या नावांची शिफारस सेवायोजन कार्यालये, समाजकल्याण अधिकारी, किंवा आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत होणे आवश्यक आहे. या संघटनेस नियुक्ती अधिकाऱ्यांकडे स्वतंत्रपणे उमेदवार पुरस्कृत करण्याचे अधिकार राहणार नाहीत.

सदर संघटनेस महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ७, २९, व ३० मध्ये विहित करण्यात आलेल्या तरतुदीनुसार मान्यता देण्यात आलेली नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**शैला तारगे पाटील**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**आरक्षित पदांवर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत मागासवर्गीय संघटनांना रिक्त पदांची माहिती पुरविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग.
शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०००/प्र. क्र. ४६/२०००/१६-ब,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३१ जुलै, २०००.

**संदर्भ :** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-२०००/
प्र.क्र.४६/२०००/१६-ब, दि. १९ जून, २०००.

**शुध्दीपत्रक**

संदर्भाधीन शासन परिपत्रकातील परिच्छेद १ मधील ओळ क्रमांक ६ येथे - "या संघटनांव्यतिरिक्त आता आदिवासी राजपत्रित अधिकारी महासंघ," यापुढे "व्दारा -डॉ.एस.बी.भाडे, एम.एस./आर.बी./IV/२९१ /१२, ५ वा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल हॉस्पिटल, मध्य रेल्वे, भायखळा, मुंबई -४०००२७" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शैला तारगे-पाटील**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**आरक्षित पदांवर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची भरती करण्यासंदर्भात मागासर्गीयांना रिक्त पदांची माहिती पुरविण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-१०९८/प्र.क्र.२२/१६-ब, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ११ सप्टेंबर, २०००.

**वाचा:** १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०७९/१६-ब, दिनांक : ३० जुलै, १९८०.

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०८३/(सीआर-१४३/८३)/१६-ब, दिनांक : २८ सप्टेंबर, १९८३.

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०८३/(सीआर-१४३/८३)/१६-ब, दि. २४ ऑक्टोबर, १९८३.

४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-११८९/२१२/प्र.क्र.(७४/८९)/१६-ब, दिनांक : १० मे, १९८९.

५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२०००/३१०/प्र.क्र.२४/२०००/१६-ब, दि. ७ मार्च, २०००.

६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२०००/प्र.क्र.४६/२०००/१६ -ब, दि. १९ जून, २०००.

**परिपत्रक**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग व विभागीय निवड मंडळे यांच्या कार्यकक्षेबाहेरील गट "क" आणि गट "ड" मधील आरक्षित पदांवर मागासवर्गीय उमेवारांची तात्पुरत्या स्वरुपात भरती करण्याबाबतच्या रिक्त पदांची माहिती पुरविण्यासाठी शासनाने उपरोक्त परिपत्रकान्वये ७ संस्थांना/संघटनांना मान्यता दिलेली आहे. त्याचप्रमाणे आता "ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट, शेडयूल्ड ट्राईब्ज् ॲन्ड बॅकवर्ड क्लासेस रिझर्व्हेशन ॲक्शन कमिटी, १८ नझूल कॉलनी, नागपूर-४४० ००४" या संस्थेसही मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्त परिपत्रकातील अन्य तरतुदी या संस्थेच्या बाबतीतही लागू राहतील. त्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

(१) या संस्थेकडे नोंदविलेल्या उमेदवारांना रिक्त पदांची माहिाी उपलब्ध व्हावी या दृष्टीने नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्या कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपाच्या भरावयाच्या रिक्त पदांची माहिती पाठवावी.

(२) या संघटनेस, त्यांच्याकडे नोंदविलेल्या उमेदवारांची नियुक्ती प्राधिका-याकडे अथवा सेवायोजन कार्यालये, समाजकल्याण अधिकारी तसेच आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे स्वतंत्रपणे शिफारस करण्याचे अधिकार नाहीत.

२. सदर संघटनेस महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ७, २९ व ३० मध्ये विहीत करण्यात आलेल्या तरतुदीनुसार मान्यता देण्यात आली नाही.

३. उपरोक्त दि. १० मे, १९८९ अन्वये अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, महाराष्ट्र शाखा, नागपूर या संघटनेस मान्यता देण्यात आलेली आहे. या संघटनेने कळविल्याप्रमाणे त्यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता बदलला असून, तो अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, महाराष्ट्र युनिट, व्दारा-श्री. बाबुराव मडावी, ११-ए, टिळक नगर, नागपूर असा आहे. याबद्दल उचित नोंद घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शैला तारगे-पाटील**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन.**

**आरक्षित पदावर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची भरती करण्यासंदर्भात मागासवर्गीयांच्या रिक्त पदांची माहिती पुरविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-२००३/प्र.क्र. ११६/०३/१६-ब,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : २३/१/२००६

**वाचा :** (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी- १०७९/१६-ब, दिनांक ३० जुलै, १९८०

(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी- १०८३/सीआर १४३/८३/१६-ब, दि. २८ सप्टेंबर, १९८३.

(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-१०८३/१४३/८३/१६-ब, दि. २४ ऑक्टोबर, १९८३.

(४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी/११८९/२१२/प्र.क्र.७४/८९/१६-ब, दिनांक १० मे, १९८९.

(५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. : बीसीसी-२०००/३१० /प्र.क्र.२४/१६-ब, दिनांक ७ मार्च, २०००.

(६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. : बीसीसी-२०००/प्र.क्र.४६/२०००/१६-ब, दिनांक १९ जून, २०००.

(७) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. : बीसीसी-१०९८/प्र.क्र. २२/१६-ब, दिनांक ११ सप्टेंबर, २०००.

**परिपत्रक**

गट-क आणि गट-ड मधील जी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या कार्यकक्षेत येत नाहीत, (पूर्वी विभागीय निवडमंडळे यांच्या कार्यकक्षेतील पदे वगळली होती. परंतु आता विभागीय निवड मंडळे बरखास्त केलेली असल्यामुळे विभागीय निवडमंडळे हा शब्द वगळला आहे.) अशा पदावर मागासवर्गीय उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात भरती करण्याबाबतच्या जाहिरातीतील/मागणीपत्रातील रिक्त पदांची माहिती (फक्त रिक्त पदे भरावयाची संख्या) पुरविणेबाबत शासनाने खालील संघटनांना मान्यता दिलेली आहे.

१) सचिव, मागासवर्गीय सुधार महासंघ, बॅरेक्स नं. १२, २ रा मजला, अजंठा बिल्डिंग, २०/२१, व्हाईट रोड, खार दांडा, मुंबई ४०० ०५२.

२) मुख्य संघटक, महाराष्ट्र स्टेट फेडरेशन ऑफ शेड्युल्ड कास्ट/शेड्युल्ड ट्राईब/विमुक्त जाती/नोमॅडीक ट्राईब्ज ॲण्ड बुध्दिस्ट एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशन, धंतोली, नागपूर.

३) महाराष्ट्र स्टेट फेडरेशन्स फॅार बॅकवर्ड क्लास मेडीकल वेल्फेअर, रामबाग, नागपूर.

४) अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, महाराष्ट्र शाखा पंडीत नेहरु मार्ग, सरकारी कर्मचारी गृहनिर्माण संस्था, नसलीन टॉकीज जवळ, धंतोली, नागपूर.

५) इंडीयन डिप्रेस्ड क्लासेस प्रोग्रेसिव्ह लोग, बुध्दनगर, नागपूर.

६) अध्यक्ष, आदिवासी राजपत्रीत अधिकारी, महासंघ भायखळा, मुंबई.

७) राष्ट्रीय अध्यक्ष, ऑल इंडिया मुस्लीम ओबीसी ऑर्गनायझेशन, अंबड रेल्वे गेटजवळ, नुतन वसाहत, जिल्हा जालना.

८) ऑल इंडीया शेड्युल्ड कास्ट, शेड्युल्ड ट्राईब अॅण्ड बॅकवर्ड क्लासेस रिझर्व्हेशन अॅक्शन कमिटी, १८ नझूल कॉलनी, नागपूर ४४० ००४.

वरील संघटनांपैकी काही संघटनांनी ज्या कार्यालयामध्ये मागासवर्गीयांमधील पदे भरावयाची होती, त्या पदाकरिता प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांनी केलेल्या शिफारशीव्यतिरिक्त स्वतःच्या उमेदवारांच्या शिफारस केल्याची बाब आढळून आली आहे. सदरची बाब गंभीर असून अशा परस्पर शिफारशी करण्यास या संघटनांना अधिकार नाहीत.

वरील संघटनांनी त्यांच्याकडे नाव नोंदविलेल्या उमेदवारांना शासकीय रोजगार कार्यालयामध्ये / रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामध्ये आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी इत्यादींच्याकडे नाव नोंदविण्याबाबत कळवावे. नावे अगोदरच नोंदविली असल्यास शासकीय कार्यालयाच्या सेवायोजन कार्यालयातील जेष्ठतेप्रमाणे नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे शिफारस करण्याबाबत मागासवर्गीय संघटनांनी शासकीय कार्यालयाच्या सेवायोजन कार्यालयास विनंती करावी. शासकीय कार्यालयाच्या सेवायोजन कार्यालयांनी नियुक्ती अधिकाऱ्याकडे शिफारस केलेल्या उमेदवारांने मुलाखतपत्रे वा परिक्षापत्रे पाठविण्याचे काम संबंधीत नियुक्ती प्राधिकाऱ्याचे राहील. उमेदवारांना मुलाखतपत्र पाठविण्याचे काम मागासवर्गीय संघटनांनी करण्याबाबत शासकीय सेवायोजन कार्यालयांनी संबंधीत मागासवर्गीय संघटनेस कळवू नये. वरील संघटनांना महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ मधील नियम ७, २९ व ३० मधील विहित केलेल्या तरतुदीनुसार मान्यता देण्यात आलेली नसल्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त संघटनांना जे अधिकार आहेत ते अधिकार या संघटनांना लागू नाहीत. उपरोक्त मागासवर्गीय संघटनेनी त्यांना दिलेल्या मान्यतेचा अन्य कारणासाठी गैरवापर केल्यास अशा संघटनांची मान्यता रद्द केली जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**र. ग. पवार**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

# [भाग -ब]

# सेवाभरतीची मार्गदर्शक तत्वे

**शासकीय सेवेत गट "क" आणि "ड"**
**<u>सेवा भरतीची एकत्रित मार्गदर्शक तत्वे.</u>**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्र.न्याप्र.-१००३/९९/प्र.क्र.२/०३ (भाग-२)/१६-अ, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २५ ऑक्टोबर २००५

**वाचा.-**

(१) शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही.१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ, दिनांक १६ मार्च १९९९ (सहपत्र-१)

(२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी.१०९७/प्र.क्र.२/९७/१६ब, दिनांक २९ मार्च १९९७. (सहपत्र-२)

(३) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. बीसीसी.१०९७/प्र.क्र.६३/९७/१६ब, दिनांक १८ ऑक्टोबर १९९७. (सहपत्र-३)

(४) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.आयपीई/आरटीए/१०७९/०/४८३/१६अ, दिनांक १० ऑक्टोबर १९८०. (सहपत्र-४)

(५) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.आरटीए. १०७९/०/४८२/१६अ, दिनांक १६ एप्रिल १९८१. (सहपत्र-५)

(६) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एईएम. १०८०/३५/१६अ, दिनांक २१ जानेवारी १९८०. (सहपत्र-६)

(७) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही.१०९४/प्र.क्र.३०/९७/१६अ, दिनांक १७ नोव्हेंबर १९९४. (सहपत्र-७)

(८) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.प्रकल्प. १०००/प्र.क्र.२७/२०००/१६अ, दिनांक १३ सप्टेंबर २०००. (सहपत्र-८)

(९) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही. १०७७/३५७६/१४३३/१६अ, दिनांक २३ मे १९७८. (सहपत्र-९)

(१०) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग), अधिनियम, १९९५, या अधिनियमाच्या कलम-३२ व ३३ चा उतारा.) (सहपत्र-१०)

(११) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही. १०९७/प्र.क्र.१२२/९७/१६अ, दिनांक २ मे १९९८. (सहपत्र-११)

(१२) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्र. संकीर्ण. १०९६/प्र.क्र.३०/का.२, दिनांक १ ऑगस्ट १९९७. (सहपत्र-१२)

(१३) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दिनांक २५ मे २००१. (सहपत्र-१३)

(१४) शासन निर्णय, शालेय शिक्षण आणि क्रिडा विभाग क्र. राक्रिएधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल २००५. (सहपत्र-१४)

(१५) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एईएम.१०१२/३६५५/प्र.क्र.९०/९२/१६अ, दिनांक ३१ मे १९९३. (सहपत्र-१५)

(१६) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.पअंक.१०९७/१७९३/प्र.क्र.४/९८/१६अ, दिनांक १९ मार्च १९९८. (सहपत्र-१६)

(१७) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.अकंप.१००४/प्र.क्र.५१/०४/आठ, दिनांक २२ ऑगस्ट २००५. (सहपत्र-१७)

(१८) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.संकीर्ण.१००३/प्र.क.९६/०३/१३-अ, दिनांक १९ नोव्हेंबर २००३. (सहपत्र-१८)

(१९) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही.२००५/प्र.क्र.४७/०५/१२, दिनांक २५ ऑगस्ट २००५. (सहपत्र-१९)

(२०) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही.२००४/प्र.क्र.१२/०४/१२, दिनांक ७ जून २००४. (सहपत्र-२०)

(२१) शासन निर्णय, सा.प्र.वि.प्रनिम.३००४/प्र.क्र.३२/२००४/१३-अ, दिनांक ९ जून २००४ (सहपत्र-२१)

(२२) शासन अधिसूचना, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही.२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च २००५. (सहपत्र-२२)

(२३) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही.२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जुलै २००५. (सहपत्र-२३)

**<u>परिपत्रक</u>**

मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ, औरंगाबाद यांनी मूळ अर्ज क्र. ७२०/०१, क्र. ८४६/०४, संकीर्ण अर्ज क्र. १६४/०५ व इतर वर दिनांक १८ नोव्हेंबर २००२ व दिनांक ५ सप्टेंबर २००५ रोजी दिलेल्या सूचना विचारात घेऊन त्यानुसार गट-क व गट-ड पदावरील सेवाभरतीसाठीची पाळावयाची तत्वे एकत्रित करुन ती सर्व संबंधितांच्या निदर्शनास खालीलप्रमाणे आणून देण्यात येत आहेत-

महाराष्ट्र शासनाने सेवाभरती योजनेत गट "क" व गट "ड" पदांसाठी काही घटकांना आरक्षण दिले आहे. हे आरक्षण सर्वसाधारणपणे दोन भागात विभागले गेले आहे. पहिल्या भागातील आरक्षण हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त/भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांसाठी देण्यात आले आहे. या आरक्षित घटकांना सामाजिक/उभे आरक्षण म्हणून संबोधले जाते. या व्यतिरिक्त शासनाने प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, महिला, अपंग इत्यादी घटकांसाठी सेवाभरतीत विशेष आरक्षण ठेवले आहे. या आरक्षणाची तपशीलवार माहिती शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही.१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ, दिनांक १६ मार्च १९९९ (सहपत्र-१) मध्ये दिलेली आहे.

२. **मागासवर्गीयांसाठी आरक्षण** (सामाजिक आरक्षण)

सामाजिक आरक्षणाची रिक्त पदे बिंदू नामावलीनुसार भरली जातात ज्यामध्ये कोणत्या प्रवर्गातील उमेदवारास कोणत्या क्रमांकाच्या बिंदूवर निवडावयाचे याची माहिती देण्यात आलेली आहे. जर बिंदू नामावलीनुसार एखादे पद आरक्षित असेल तर त्या प्रवर्गाशिवाय ते पद इतर प्रवर्गामधून भरता येत नाही. त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाला नाहीतर ते पद रिक्त ठेवावे लागते व भविष्यात होणाऱ्या भरतीसाठी त्या प्रवर्गाचा अनुशेष म्हणून आरक्षण पुढे ओढून सदर बिंदू त्याच प्रवर्गाच्या उमेदवारातून भरला जातो. मागासवर्गीयांच्या आरक्षणाचा अनुशेष कसा निश्चित करावा याबाबत शासन निर्णय, क्र. बीसीसी. १०९७/प्र.क्र.२/९७/१६ब, दिनांक २९ मार्च १९९७. (सहपत्र-२) मध्ये सूचना दिल्या आहेत. बिंदू नामावली संबंधीचा तपशील स्पष्ट करण्यासाठी शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. बीसीसी.१०७९/प्र.क्र.६३/९७/१६ब, दिनांक १८ ऑक्टोबर १९९७. (सहपत्र-३) अवलोकन करावा. त्यानुसार बिंदूनामावली ही आरक्षणाची विहित टक्केवारी पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवावयाची आहे. ज्या प्रवर्गाची विहित टक्केवारी पूर्ण होईल त्या प्रवर्गाकरिता बिंदू नामावली वापरण्याची आवश्यकता राहणार नाही; त्यानंतर ज्या प्रवर्गाचे पद रिक्त होईल ते त्या प्रवर्गातील कर्मचाऱ्याच्या नियुक्तीद्वारे भरण्यात यावे व त्या बिंदू पुढे तो बिंदू त्या प्रवर्गासाठी उपयोगात आणला आहे अशी नोंद घ्यावयाची आहे.

महाराष्ट्र राज्यात सामाजिक आरक्षणाबाबत विधानमंडळाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या ब विमुक्त जाती विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग) अधिनियम, २००४ म्हणून पारित केलेला आहे.

३. **विशेष/समांतर आरक्षण**

समांतर आरक्षण हे कप्पीकृत (compartmentlised) आरक्षण आहे. ज्याला सामाजिक आरक्षणामध्ये विशेष आरक्षण असे म्हणता येईल. कोणत्याही विशेष आरक्षण प्रवर्गाला एका कप्यामधून दुसऱ्या कप्प्यामध्ये नेता येत नाही. विशेष आरक्षण प्रवर्गाच्या उमेदवाराच्या निवडीची प्रक्रिया सामाजिक आरक्षणाच्या अधीन राहून कशी केली जावी हे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १६ मार्च १९९९ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. (सहपत्र-१)

(अ) **माजी सैनिक आरक्षण -** माजी सैनिकांना १५% विशेष आरक्षण असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आयपीई/आरटीए/१०७९/०/४८३/१६अ, दिनांक १० ऑक्टोबर १९८०.(सहपत्र-४) मध्ये त्याबाबतचा तपशील नमूद करण्यात आला आहे. शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.आरटीए. १०७९/०/४८२/१६अ, दिनांक १६ एप्रिल १९८१. (सहपत्र-५) अन्वये माजी सैनिकांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत शिथिल करण्यात आलेली आहे.

(ब) **प्रकल्पग्रस्त आरक्षण-**प्रकल्पग्रस्त व्यक्तीकरीता ५% पर्यंत विशेष आरक्षण देण्यात आले आहे. यासंदर्भात शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एईएम. १०८०/३५/१६अ, दिनांक २१ जानेवारी १९८० अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. (सहपत्र-६) काही प्रकरणांमध्ये ३ वर्षापर्यंत वयोमर्यादा शिथिल केली आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या आरक्षणामध्ये प्रकल्पग्रस्तांबरोबरच भूकंपगस्तांचाही समावेश केलेला आहे.

यासंदर्भातील शासन निर्णय, सा. प्र. वि., क्र. एसआरव्ही. १०९४/प्र.क्र.३०/१६अ, दिनांक १७ नोव्हेंबर १९९४. (सहपत्र-७) मधील सूचना विचारात घ्याव्यात. महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त पुनर्वसन अधिनियम, २००१ मधील प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या/नामनिर्देशीत व्यक्तीच्या रोजगाराकरीता ५% कोटा विहीत केलेला आहे. प्रकल्पग्रस्त अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांना शासकीय सेवेतील गट-क आणि गट-ड मधील पदावर नियुक्ती देण्याबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.प्रकल्प. १०००/प्र.क्र.२७/२०००/१६अ, दिनांक १३ सप्टेंबर २०००. (सहपत्र-८) अन्वये स्पष्ट केलेले आहे.

(क) **अपंगासाठी आरक्षण. -** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही. १०७७/३५७६/१४३३/१६अ, दिनांक २३ मे १९७८ अन्वये शासनाने गट क आणि ड मधील पदांमध्ये अंध, बहिरेपणा आणि अस्थिव्यंग अपंगाकरीता विशेष आरक्षणांतर्गत प्रत्येकी १% याप्रमाणे एकूण ३% पदे राखीव ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सदर शासन निर्णय आणि त्यासंबंधीत इतर शासन निर्णय सहपत्र-९ प्रमाणे आहेत. त्यानंतर केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग), अधिनियम, १९९५ च्या कलम ३२ व ३३ मध्ये अंध (अल्पदृष्टी/दृष्टीहिनता), बहिरेपणा व अस्थिव्यंग व्यक्तींकरीता शासनाच्या सेवेतील सर्व स्तरावरील पदांमधून अपंग व्यक्तीच्या नियुक्तीयोग्य ठरविलेल्या संवर्गात एकूण ३% आरक्षण ठेवण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. यासंदर्भात शासन सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही. १०९७/प्र.क्र.१२२/९७/१६अ, दिनांक २ मे १९९८. (सहपत्र-११) अवलोकन करावे.

(ड) **महिलांसाठी आरक्षण.-**सन १९९७ मध्ये महिलांकरिता ३०% पदे आरक्षित ठेवण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित केले. सदरचे आरक्षण शासनाकडील सर्व गटातील पदांकरीता ठेवण्यात आले आहे. या संदर्भातील शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक संकीर्ण १०९६/प्र.क्र.३०/का.२, दिनांक १ ऑगस्ट १९९७ आणि क्र. ८२/२००१/मसेआ.२०००/प्र.क्र.४१५/का.२, दिनांक २५ मे २००१ (सहपत्र-१२ आणि १३) अन्वये निर्गमित केलेले आहेत.

(ई) **खेळाडूंसाठी आरक्षण.-** ज्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये भाग घेतला आहे आणि काही पारितोषिके प्राप्त केली आहेत अशा खेळाडूंसाठी सेवाभरतीत ५% एवढे विशेष आरक्षण नव्याने लागू केले आहे. शासन निर्णय, शालेय शिक्षण आणि क्रिडा विभाग क्र. सक्रयो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल २००५. (सहपत्र-१४) अवलोकीत करावेत.

४. **पसंतीक्रम**

सामाजिक आरक्षण तसेच विशेष आरक्षणाव्यतिरिक्त इतर काही प्रवर्गांना (घटकांना) शासन सेवेत प्रतिनिधित्व देण्यासाठी जसे स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत व्यक्ती, संपकालीन कर्मचारी, १९८१ चे जनगणना कर्मचारी, १९९१ चे जनगणना कर्मचारी आणि अंशकालीन पदवीधारक बेरोजगार यांच्याकरिता सेवाभरतीमध्ये पसंतीक्रम दर्शविले आहेत. यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एईएम.१०९२/३६५५/प्र.क्र.९०/९२/१६अ, दिनांक ३१ मे १९९३ आणि पअंक.१०९७/१७९३/प्र.क्र.४/९८/१६अ, दिनांक १९ मार्च १९९८ (सहपत्र १५ व १६) विचारात घ्यावेत.

५. **अनुकंपा तत्वावर नियुक्ती**

गट-क व ड मधील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील एका सदस्यास काही अटींवर केवळ गट-क व ड मधील पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत शासनाचे धोरण आहे. पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता आणि सेवाप्रवेश नियमांतील तरतुदी पूर्ण करणाऱ्या कुटुंबियातील पात्र सदस्याला, त्यासाठी ठेवण्यात येणाऱ्या प्रतिक्षा सूचीतील क्रमानुसार गट-क व ड मधील पदावर नियुक्ती देण्यात येते. यासंबंधी अलिकडेच निर्गमित केलेल्या शासन निर्णय, क्रमांक अकंपा.१००४/प्र.क्र.५१/०४/आठ, दिनांक २२ ऑगस्ट २००५. (सहपत्र-१७) स्वयंस्पष्ट आहे.

६.  **सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय**

(अ) मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक ११६४६/११७२४/१९९६ प्रकरणी शासकीय/निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनेतील रिक्त पदे भरण्याबाबत असे निर्देश दिले आहेत की, रिक्त पदाबाबत सर्व प्रसारमाध्यमातून जसे वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडीओ, नोटीस बोर्ड, रोजगार पत्र इत्यादीमध्ये जाहिरात प्रसिद्ध करुन अर्ज मागविण्यात यावेत. अशा प्रकारे प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांचा निवडीसाठी विचार करण्यात यावा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने शासनाने सा.प्र.वि.क्र.संकीर्ण.१००३/प्र.क.९६/०३/१३-अ, दिनांक १९ नोव्हेंबर २००३ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. (सहपत्र-१८)

(ब) मा. सर्वोच्च न्यायालयाने ए. उमराणी विरुद्ध रजिस्टार को. ऑप. सोसायटी, तामिळनाडू राज्य व इतर याप्रकरणी असे निर्देश दिले आहेत की, शासकीय, निमशासकीय व सार्वजनिक उपक्रमामध्ये पदे भरताना नियुक्ती विहीत मार्गाने करणे शासनावर बंधनकारक आहे. विहित कार्यपद्धती व नियमाचे पालन न करता मागीलदारांने अनियमितपणे केलेल्या नेमणुका नियमित करण्यात येऊ नयेत असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. त्याअनुषंगाने शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही.२००५/प्र.क्र.४७/०५/१२, दिनांक २५ ऑगस्ट २००५ रोजी निर्गमित केले आहेत. (सहपत्र-१९).

७.  **निवड करण्यासाठी घ्यावयाची लेखी व तोंडी परीक्षा**

मा. सर्वोच्च न्यायालयाने शासकीय, निमशासकीय व सार्वजनिक उपक्रमामध्ये रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार पात्रता परीक्षा व मुलाखत घेऊन त्या आधारे गुण ठरविण्यासंबंधी विहित कार्यपद्धती अवलंबिण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही.२००४/प्र.क्र.१२/०४/१२, दिनांक ७ जून २००४ व शासन निर्णय क्रमांक प्रनिम.३००४/प्र.क्र.३२/२००४/१३-अ, दिनांक ९ जून २००४ निर्गमित केले असून त्याच्या प्रती अनुक्रमे सहपत्र-२० व २१ म्हणून जोडले आहे.

गुणवत्ता यादी मध्ये जर एकापेक्षा जास्त उमेदवार एकाच क्रमांकावर असतील तर पसंतीक्रमाच्या प्राथम्यानुसार उमेदवाराची निवड करावयाची आहे.

८.  **कुटुंब लहान राखण्याचे प्रतिज्ञापत्र**

शासन सेवेत प्रवेश करु इच्छिणाऱ्या व्यक्तीसाठी दोनपेक्षा अधिक अपत्य असण्यावर निर्बंध घालणाऱ्या शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही.२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च २००५ मधील तरतुदी देखील विचारात घ्याव्यात. (सहपत्र-२२) यासंदर्भात लहान कुटुंबाची अतिरिक्त अट पदांच्या जाहिरातीत समाविष्ट करणे आणि सेवाप्रवेश करणाऱ्या उमेदवारांकडून कुटुंब लहान राखण्यासाठी विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र घेणे नियुक्ती अधिकाऱ्यांना अनिवार्य करण्याबाबतच्या शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही.२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जुलै २००५ मधील सूचना देखील विचारात घेण्यात याव्यात. (सहपत्र-२३)

९.  निवड प्रक्रिया करताना जिल्हा निवड समिती व प्रादेशिक निवड समिती तसेच नियुक्ती प्राधिकारी यांनी वरील प्रमाणे निरनिराळे निर्देश विचारात घेऊन गट-क व ड पदावर उमेदवाराची निवड करावयाची आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**र.ग.पवार,**
**शासनाचे उप सचिव.**

# [भाग - क]

## सरळसेवा भरती व समांतर आरक्षण

## [१]

## समांतर आरक्षण

**शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षण (Horizontal Reservation) कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही - १०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ,
मंत्रालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दिनांक : १६ मार्च, १९९९.

**वाचा -** १. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/१६-अ, दि. २३.५.१९७८.
२. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एसईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २१.१.१९८०.
३. शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.आयपीई/आरटीए-१०८०/०/१८१/१६-अ, दि. १०.१०.१९८०.
४. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०९४/१००४/प्र.क्र.३०/१६-अ, दि. १७.११.१९९४.
५. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि. १२.८.१९९४.
६. शासन निर्णय, न.व.वि.क्र.ईक्युआर-१०९४/प्र.क्र.७६८/भूपुक-१, दि. ९.८.१९९५.
७. शासन निर्णय, म.व.बा.क.वि.क्र.संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-२, दि. १.८.१९९७.
८. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. ६.८.१९९७.
९. शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.१२/९७/१६-अ, दि. २.५.१९९८.
१०. अनिल कुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-१९९५ (५) एससी-५०५) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्वे.

**परिपत्रक :-** शासनाने सेवेतील भरतीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू केले आहे. हे आरक्षण सामाजिक आरक्षण (Social Reservation) असल्याने ते उभे आरक्षण (Vertical Reservation) आहे. त्याचप्रमाणे विशेष आरक्षण (Special Reservation) मागासवर्गीयांव्यतिरिक्त अन्य घटकांसाठी लागू केलेले आहे व ते समांतर किंवा आडवे आरक्षण (Horizontal Reservation) आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने (ॲपलेट साईड) रिट याचिका क्रमांक : ४०६७/१९९८ वरील निर्णयान्वये अनिल कुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-१९९५ (५) एससी-५०५) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयास अनुसरून समांतर आरक्षणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सेवेतील उभे आरक्षण व समांतर आरक्षणाच्या संदर्भात अनुसरावयाची कार्यपद्धती व त्या बाबतच्या मार्गदर्शक सूचना शासकीय / निमशासकीय सेवा, मंडळे / महामंडळे / नगरपालिका / महानगरपालिका / जिल्हापरिषदा / शासकीय अनुदान प्राप्त संस्था / विद्यापीठे / सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावे.

२. सेवेतील नियुक्तीसाठी सामाजिक आरक्षण (उभे आरक्षण) इत्यादीप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. अनुसूचित जाती | : | १३% |
| २. अनुसूचित जमाती | : | ७% |
| ३. विमुक्त जाती (अ) | : | ३% |
| ४. भटक्या जमाती (ब) | : | २.५% |
| ५. भटक्या जमाती (क) | : | ३.५% |
| ६. भटक्या जमाती (ड) | : | २% |
| ७. विशेष मागासव प्रवर्ग | : | २% |
| ८. इतर मागास वर्ग | : | १९% |

वर नमुद केलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त सेवेतील नियुक्त्यांसाठी लागू असलेले विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) पुढीलप्रमाणे आहे -

| | |
|---|---|
| १. माजी सैनिक | १५% फक्त गट क आणि गट ड साठी |
| २.प्रकल्पग्रस्त / भूंकपग्रस्त | ५% फक्त गट कआणि गट ड साठी |
| ३.अपंग | ३% गट अ आणि ब मधील काही पदांसाठी तसेच गट क आणि गट ड साठी |
| ४. महिला | ३०% |

समांतर आरक्षण हे फक्त सरळ सेवा भरतीस लागू राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणातंर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येऊ नये.

४. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्या प्रमाणे समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण (Compartmentalised Reservation) आहे, म्हणून पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत केवळ सामाजिक आरक्षणाची पदसंख्याच नमूद न करता सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा.,अ.ज.,वि.ज. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि खुला प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या सुध्दा निर्देशित करावी.

५. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात / उल्लेखिलेल्या नुसार समांतर आरक्षणातंर्गत त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा. यासाठी सरळसेवा भरती करताना खालील टप्पे विचारात घेण्यात यावेत :-

**(अ) प्रथम टप्पा :-** गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी, या यादीत समांतर आरक्षणात बसणाऱ्यांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्‌भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर समांतर आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर समांतर आरक्षणाकरीता त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ट करावेत.

**(ब) दुसरा टप्पा :-** त्यानंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा 'अ'मध्ये सामिल झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे)

**(क) तिसरा टप्पा :-** वरील 'ब' नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील (Social Reservation) प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार 'अ' येथे विशद केलेल्या कार्यपद्धतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गातंर्गत राहावे.

६. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्यानुसार विशेष आरक्षण हे प्रत्येक उभ्या आरक्षणाच्या कक्षातंर्गत राहील. म्हणजेच विशेष आरक्षण हे एका सामाजिक आरक्षण प्रवर्गातून दुसऱ्या सामाजिक आरक्षण प्रवर्गात स्थानांतरीत करता येणार नाही.

७. सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी वरील कार्यपध्दती तसेच सूचनांनुसार यापुढे न चुकता कार्यवाही करावी. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, मंडळे / महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हा परिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/ विद्यापीठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भि. रा. वाढवे,**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वित करण्याबाबतच्या कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरण..**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख : १३ ऑगस्ट, २०१४

**वाचा :-** शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च, १९९९.

**प्रस्तावना :-**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च, १९९९ नुसार शासन सेवेत सरळसेवेने नियुक्ती करताना समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

२. अ) श्री. इरफान मुस्तफा शेख यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्रमांक ३०१/२००९ मध्ये मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक २६.०८.२००९ रोजी दिलेला न्यायनिर्णय, याबाबत करण्यात आलेल्या अपिलावर (रिट याचिका क्रमांक २७२/२०१०) मध्ये मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिनांक १५.११.२०१० रोजी दिलेला न्यायनिर्णय आणि मा. सर्वोच्च न्यायालयाने याबाबतच्या अपिलावर (एसएलपी/सिव्हील सी.सी.१५८०२/२०११) दिनांक २७.०९.२०११ रोजी दिलेला न्यायनिर्णय.

ब) त्याचप्रमाणे मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल करण्यांत आलेला श्रीमती. किर्ती वाघ यांचा मूळ अर्ज क्रमांक ९२४/२०१० मधील दिनांक ११.०४.२०११ च्या निर्णयासंदर्भात दाखल झालेल्या पुर्नविलोकन अर्ज क्रमांक ४/२०१२ मध्ये मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक १७.०६.२०१३ रोजी दिलेला न्यायनिर्णय.

क) तसेच कु. अर्चना शिवाजी खांबे व इतर यांचा मूळ अर्ज क्रमांक ४३७/२०१२ मध्ये दिनांक ०२.०४.२०१४ रोजी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिलेला न्यायनिर्णय.

३. उपरोक्त सर्व न्यायनिर्णय विचारात घेता, शासन परिपत्रक दिनांक १६ मार्च, १९९९ मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीसंदर्भात मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरण निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार आता खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

**शासन परिपत्रक :-**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च, १९९९ मधील परिच्छेद ५ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीमध्ये मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरणाचा समावेश करण्यात येत असून सुधारित परि. ५ खालीलप्रमाणे आहे. शासन सेवेत सरळसेवेने नियुक्ती करतांना समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी सदर सुधारीत कार्यपध्दती अनुसरण्यात यावी :-

(अ) प्रथम टप्पा :- खुल्या प्रवर्गातून समांतर आरक्षणाची पदे भरताना, गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी (या ठिकाणी खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीय उमेदवारांचाही समावेश होईल). या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्‌भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर खुल्या प्रवर्गासाठी राखीव समांतर आरक्षणाची पदे भरण्याकरिता सदर यादीतील आवश्यक पर्याप्त संख्येइतके शेवटचे उमेदवार वगळून पात्र उमेदवारांपैकी केवळ खुल्या प्रवर्गाचेच आवश्यक पर्याप्त संख्येइतके उमेदवार घेणे आवश्यक आहे."

(ब) दुसरा टप्पा :- त्यानंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात. (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा "अ" मध्ये सामील झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे.)

(क) तिसरा टप्पा :- वरील "ब" नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील (Social Reservation) प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार "अ" येथे विशद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत रहावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१४०८१३१०५३२०४३०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**प्रमोद त्र्यं. नलावडे**
**सचिव (सा.वि.स.) सामान्य प्रशासन विभाग,**
**महाराष्ट्र शासन.**

# [२]

# सेवेमध्ये अपंगासाठी  समांतर आरक्षण

**Reservation in service for**
**The physically handicapped persons.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
General Administration Department.
Resolution No. SRV-1077/3576/1433/XVI-A.
Mantralayka, Bombay-400 032, Dated the 23rd May, 1978.

**R E S O L U T I O N**

The question of reservation of vacancies for appointment of physically handicapped persons in State services etc. was under consideration of Government for some time past. Government has now decided that one percent vacancies each for the blind, the deaf and the orthopedically handicapped in Class III and Class IV services of Government and comparable posts in the Public Sector Undertakings, Local Bodies to be filled in by direct recruitment in any year should be reserved for being filled in by these persons. The percentage of reservation specified above should be inclusive of 80% reservation made by Government under Government Resolution, General Administration Department, No. SRV-1071/6454-D, dated the 29th March 1972, for persons belonging to the weaker sections of the community.

2. Since the number of posts in several cadres is small and the vacancies may not occur frequently, it may not become feasible in several cases to apply the aforesaid reservation to each category of posts individually. Government is, therefore, pleased to direct that the reservation for the physically handicapped persons should be made applicable to the total vacancies arising in a particular calendar year in all Class III and Class IV posts as a whole and not against each category of posts and that for this purpose, all the Class III/Class IV posts controlled by a single appointing authority should be taken together as a whole.

3. The definition of the categories of the handicapped for purposes of reservation in employment are given in the Annexure 'A' to this Resolution. For appointment to reserved posts, the physically handicapped persons should possess the prescribed qualifications for the posts and should have the capacity to perform the duties of the posts to which they are to be appointed, the latter to be certified by the Medical Boards for the physically handicapped. The categories of posts to which such persons should be held eligible for appointment are indicated in Annexure 'B' to this Resolution. These categories should be treated as merely illustrative and not exhaustive. It will be the duty of the Medical Board to satisfy itself whether with the residual physical capacity, the physically handicapped person under examination would be in a position to perform the specific duties of the post to which he is to be appointed.

4. Government has decided that the upper age limit prescribed for recruitment should be relaxed up to 45 years in the case of physically handicapped persons if they are otherwise suitable and have the necessary capacity to perform the duties of the posts.

5. It has also been decided that in the event of such persons not being available to fill up the vacancies, the shortfall should be made good by resorting to normal procedure of recruitment. There should be no carry over from year to year on account of unfilled vacancies for want of duly qualified persons among the physically handicapped.

6. So far as posts and services under Government are concerned, these orders will apply to recruitment to posts and services which are outside the purview of the Maharashtra Public Service Commission.

7. The Mantralaya Departments are requested to take suitable steps to implement these orders so far as the Public Sector Undertaking under their administrative control are concerned.

8. The Rural Development Department is requested to issue suitable orders in respect of the posts under the Zilla Parishads.

9. The Urban Development and Public Health Department is requested to issue similar orders in respect of posts under the Municipal Corporations and Municipal Councils.

10. This Resolution issues with the concurrence of the Finance Department, vide its un-official reference No. CR 360/78/SER-9, dated the 11th May 1978.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**C. A. SARANGDHAR,**
**Under Secretary to Government.**

ACCOMPANIMENT TO GOVERNMENT RESOLUTION,GENERAL ADMINISTRAFFTION DEPARTMENT, NO. SRV-1077/3576/1433/XVI-A, DATED THE 23rd MAY 1978.

-----------

## ANNEXURE – 'A'

Definitions of the categories of the Handicapped for purposes of reservation in employment.

**THE BLIND :**

The blinds are those who suffer from either of the following conditions :-

(a) Total absence of sight ;
(b) Visual acuity not exceeding 6/60 or 20/200 (snellen) in the better eye with correcting lenses;
(c) Limitation of the field of vision subtending an angle of 20 degrees or worse.

**THE DEAF** :

The deaf are those in whom the sense of hearing is non-functional for ordinary purposes of life. They do not hear, understand sounds at all events, with amplified speech. The cases included in this category will be those having bearing loss more than 90 decibles in the better ear (profound impairment) or total loss of hearing in both ears.

**THE ORTHOPAEDICALLY HANDICAPPED** :

The Orthopedically handicapped are those who have a physical defect or deformity which causes an interference with the normal functioning of the bones, muscles and joints.

--------------

## ANNEXURE – 'B'

| | | |
|---|---|---|
| (a) | Persons who have lost one hand And one upper limb. | Clerk, Liftman, Messenger Or Tracer. |
| (b) | Persons lame in one leg. | Clerk, Typist, Junior Architectural Assistant, Draftsman, Assistant Draftsman, Tracer, Computer or Daftary. |
| (c) | Persons deaf but with good eye sight 6/6 with corrections. | Typist, Mali, Dhobi, Sweeper. |
| (d) | Persons deaf but possessing eye sight 6/12, 6/24 with corrections. | Mali, Dhobi, Barbers, Cook-mate, Sweeper. |
| (e) | Persons blind but with good hearing. | Masseur. |
| (f) | Persons deaf and mute but with good Eye sight i.e. 6/6 with corrections. | Tailor, Carpenter, Sweeper or Computer. |

**महाराष्ट्र शासन.**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : एसआरव्ही -१०८१/ सीआर -१५/सोळा-ए
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ७ सप्टेंबर १९८२

**पहा :-** शासन निर्णय ,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही- १०७७/३५७६/१४३३ / सोळा-ए, दिनांक २३-५-१९७८.

**शासन निर्णय :**-दिनांक २३-५-१९७८ च्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक -एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/सोळा-ए, अन्वये देण्यात आलेल्या आदेशात फेरबदल करुन शासन आता असा निदेश देत आहे की, दि. २३-५-१९७८ च्या शासन निर्णयाच्या पहिल्या परिच्छेदातील चौथ्या व पाचव्या ओळीतील शब्दाऐवजी "बधिर आणि /किंवा मूक" हे शब्द दाखल करण्यात यावेत, मूक व्यक्तीसाठी स्वतंत्रपणे एक टक्का आरक्षण असावे असा हया सुधारित आदेशाचा उद्देश नाही. परंतु, आगोदरच तरतूद करण्यात आलेले एक टक्का आरक्षण हे बधिर किंवा मूक किंवा बधिर व मूक अशा दोन्हीही व्यक्तीकरिता उपलब्ध करण्यात यावे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २३-५-२९७८ च्या शासन निर्णयासोबतच्या जोडपत्र -ए मधील "बधिर" या संज्ञेच्या व्याख्येनंतर पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :-

"मूक"

जिभेतील किंवा स्वरयंत्रातील एखाद्या शारीरिक / जन्मजात दोषामुळे किंवा मेंदूतील (वाचाकेंद्र) कांही बिघाडामुळे ज्यांना बोलता किंवा शब्दोपचार करता येत नाही परंतु ज्यांची दृष्टी किंवा श्रवण अन्यथा सर्वसामान्य आहे अशा व्यक्ती मूक व्यक्ती होत.

३. त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २३-५-१९७८ च्या शासन निर्णयासोबतच्या जोडपत्र बी मध्ये उपखंड (क) आणि (ड) यांमध्ये "बधिर" या शब्दानंतर" आणि /किंवा मूक" या शब्दाची भर घालण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**प्र. द. माळवे**
**शासनाचे अवर सचिव,**

**महाराष्ट्र शासन.**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक : एसआरव्ही -१०८१/ ३२७३/ १६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १ मार्च १९८३.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय ,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही १०७७/ ३५७६/१४३३ / १६-अ, दिनांक २३.५.१९७८.
२) शासन निर्णय ,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही १०७७/ ३५७६/१४३३ / १६-अ ,दिनांक ७.९.१९७८.
३) शासन निर्णय ,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही १०८१ / ३२७३/१४३३ / १६-अ ,दिनांक १.-९.१९८१.

**निर्णयः-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही - १०८१/३२७३/१६-अ, दिनांक १०.९.१९८१ च्या परिच्छेद - ४ मध्ये अशंतः बदल करुन शासन आता असे आदेश देत आहे की सदर शासन निर्णयातील आदेश बृहन्मुंबईतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील वर्ग-३ च्या लिपिक वर्गीय पदांवरील सेवाभरतीसाठी सुध्दा लागू करण्यात येत आहेत.

२. त्याचप्रमाणे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही- १०७७/३५७६ /१४३३/१६-अ, दिनांक ७.९.१९७८ मधील आदेशांच्या परिच्छेद-२ मध्ये अशंतः बदल करुन शासन असाही आदेश देत आहे की, बृहन्मुंबईतील कार्यालयातील लिपिक वर्गीय पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणा-या स्पर्धात्मक परीक्षेच्या प्रवेशाकरिता शारिरिकदृष्टया अपंग व्यक्तींना परीक्षेला बसण्यासाठी, त्या व्यक्ती जर इतर दृष्टया पात्र असतील, तर कमाल वयोमर्यादेची अट १० वर्षे पर्यन्त शिथिल केली जाईल.

हे आदेशवित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर-१०१९/८२/एस.ई.आर-९, दिनांक २०.९.१९८२ च्या सहमतीने काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**प्र. द. माळवे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंग कल्याणार्थ शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा /शासन सेवेत आरक्षण याचा फायदा मिळण्यासाठी व्यक्तींच्या अपंगत्वाचे प्रमाण निश्चित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
शासन निर्णय क्र. इडीडी १०९०/२२५९२/के.नं.४००/सुधार-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२. दिनांक १९ ऑगस्ट, १९९२.

**वाचा :-** भारत सरकार, कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्र. ४-२/८३/डब्ल्यू-३, दिनांक ६-८-१९८६.

**शासन निर्णय :-** केंद्र शासन, कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली, यांनी त्यांच्या दि. ६-८-१९८६ च्या परिपत्रकासनुसार, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अपंगत्वाचे प्रमाण / अपंगत्वाची सुसूत्रित व्याख्या याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. राज्य शासनामार्फतही अपंग कल्याण अनेक योजना राबविल्या जातात व शासकीय सेवेत आरक्षण इत्यादी सवलती अपंगाना देण्यात येतात. मात्र त्यासाठी लाभार्थी व्यक्तीचे अपंगत्व किती प्रमाणात असावे याबाबतचे सुस्पष्ट आदेश नसल्याने केंद्र शासनाने निश्चित केलेले प्रमाण / राज्य शासनाने स्वीकारावे किंवा कसे याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरुन विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी संबंधित लाभार्थी अपंग व्यक्तीच्या अपंगत्वाच्या प्रकाराप्रमाणे खाली निर्देशित केल्याप्रमाणे अपंगत्वाचे प्रमाण / टक्केवारी असणे निर्धारित करण्यात येत आहे :-

**(१) शारिरीक पुनर्वसनाच्या योजनांचा लाभ मिळण्यासाठी :-**(कृत्रीम अवयव / साधने मिळणे)
अ) अंध-दृष्टी विषमता २०-४०% किंवा त्यापेक्षा कमी असावी.
ब) कर्ण /मूकबधिर ६०% पेक्षा अधिक श्रवणक्षीणता
क) अस्थिव्यंग ४०% पेक्षा अधिक व्यंगत्व

**(२) शैक्षणिक पुनर्वसन :-** (शिष्यवृत्ती एकात्मिक शिक्षण प्रणालीमध्ये प्रवेश)
अ) अंध :- १) दृष्टीचा पूर्णतः अभाव किंवा
२) सुधार भिंगासहीत दृष्टीतीक्ष्णता - ६/६०, किंवा २०/२०० स्नेलनपेक्षा कमी नसावी किंवा
३) दृष्टीक्षेत्राची मर्यादा २० अंश किंवा त्यातून कमी अंशाच्या कोनाइतकी खराब असावी. (एक डोळ्याने अंध असलेल्यांना शैक्षणिक पुनर्वसनाच्या योजनांचा लाभ "अंध" म्हणून देता येणार नाही.)
ब) कर्ण / मूकबधिर - ६०% पेक्षा अधिक श्रवणक्षीणता
क) अस्थिव्यंग - ४०% पेक्षा अधिक विकलांगता.

**३) आर्थिक पुनर्वसन -** (नोकऱ्यात आरक्षण, बीज भांडवल योजना इ.)
(अ) अंध-शैक्षणिक पुनर्वसनासाठी असलेले अपंगत्वाचे प्रमाण ग्राह्य धरावे.
(ब) कर्ण / मूकबधिर : किमान ६०% श्रवणक्षीणता
(क) अस्थिव्यंग : किमान ४०% व्यंगत्व.
याबाबत असेही स्पष्ट करण्यात येते की, केंद्र शासनाच्या आदेशानुसार ४०% अपंगत्वाबाबतचे प्रमाणपत्र दिल्यानंतर सुध्दा सेवाविषयक सवलतीसाठी सदर उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा काय ते प्रमाणित करण्याचे काम पूर्वीप्रमाणे वैद्यकीय मंडळाकडेच राहील.

२. हा निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सल्ल्यानुसार व शिक्षण व सेवायोजन विभाग / सामान्य प्रशासन विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(श. ए. दीक्षित)**
**उप-सचिव, महाराष्ट्र शासन**

**केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनामध्ये शारीरिक दृष्टया अपंगांसाठी गट "अ"आणि "ब" (वर्ग १ व २) मधील आरक्षणाकरिता समितीची स्थापना.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : एसआरव्ही -१०९७/ प्र.क्र. १२/९७/ १६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २२ एप्रिल १९९७

**शासन निर्णय**

केंद्र शासनाच्या अपंगांसाठी सेवाभर्तीमध्ये जागा राखून ठेवण्यासंबंधीचे १९९५ चे अधिनियम दिनांक ७-२-९६ पासून अंमलात आलेले असून त्यासंदर्भात राज्य शासनाने क्रमांक - एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/१६-अ, दिनांक २३ मे १९७८ ला निर्गमित केलेला शासन निर्णय या अधिनियमाने अधिक्रमित झालेला आहे. केंद्र शासनाच्या अधिनियमानुसार शारिरीकदृष्टया अपंगासाठी गट "अ"आणि "ब" (वर्ग-१ व २) मधील पदांसाठी आरक्षण करण्याबाबतचा निर्णय शासनाने त्वरित घ्यावा व त्या अधिनियमांच्या कलम ३३ अन्वये अपंगांसाठी ३ टक्के आरक्षण ठेवावे हे बंधनकारक केले आहे. ज्या पदांच्या संदर्भात शारिरीक दृष्ट्या अपंग व्यक्तींना नेमणूका देणे योग्य वाटणार नाही अशी पदे या अधिनियमाच्या तरतूदींमधून वगळण्याचे अधिकार राज्य शासनाला दिलेले असून त्याबाबतची कार्यवाही राज्य शासनातर्फे करावयास पाहिजे. कोठल्या पदांसाठी आरक्षण करता येईल ते निश्चित करण्याबाबत अधिनियमामधील कलम ३२ मध्ये तरतूद केलेली आहे.

२. उपरोक्त संदर्भात याचिका क्र. ४७/९७ - श्री. एस. एल. पगारिया विरुध्द महाराष्ट्र शासन- सहायक अभियेता, श्रेणी-२ यांच्या सरळसेवा भरतीबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी केलेल्या आदेशान्वये शासन स्तरावर बैठक घेण्यात आली. त्यावेळी वरील परिच्छेद-१ मध्ये नमूद केलेल्या बाबींवर विचार करण्यासाठी व त्यासंबंधी अभ्यास करुन निर्णय घेण्यासाठी एक समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला.

या समितीमध्ये खालील अधिका-यांचा समावेश असेल.

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव /सचिव समाज कल्याण सांस्कृतिक कार्य | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव /सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| ३) सचिव, पाटबंधारे विभाग | सदस्य |
| ४) सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ५) सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |

वरील समितीचे "सदस्य सचिव" म्हणून सहसचिव / उपसचिव,सामान्य प्रशासन विभाग (१६-अ) चे काम पाहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**अ. रा. साळवी**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम, १९९५ नुसार शासन सेवेतील पदावर शारिरीकदृष्ट्या अपंगासाठी आरक्षण ठेवण्याबाबतची कार्यपद्धती.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.१२/९७/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ मे १९९८.

**वाचा :-** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/१६-अ, दिनांक २३ मे १९७८.

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०८१/सीआर-१५/१६-अ, दिनांक ७ सप्टेंबर, १९८२.

(३) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक इडीडी-१०९०/२२५९२/ सीआर-४००/सुधार-२, दिनांक १९ ऑगस्ट १९९२.

(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी- १०९७/सीआर-२/९७/१६-ब, दिनांक १६ ऑगस्ट, १९९७.

(५) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम, १९९५, (क्रमांक १/१९९६).

**परिपत्रक :-** अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १) हा अधिनियम जम्मू व काश्मीर राज्य वगळता संपूर्ण देशांमध्ये दिनांक ७ फेब्रुवारी १९९६ पासून लागू करण्यात आलेला आहे.

२. सदर अधिनियमाच्या कलम ३२ नुसार राज्य शासनाने अंपगांसाठी आपल्या आस्थापनेवरील जी पदे आरक्षित करता येतील ती पदे शोधून काढणे (Identify) आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम ३३ नुसार अपंगांच्या नियुक्तीसाठी किमान ३ टक्के पदे आरक्षित करणे आवश्यक आहे. त्यापैकी प्रत्येकी एक टक्का पदे, अनुक्रमे (१) अंध, अल्पदृष्टी (दृष्टीहीनता), (२) बहिरेपणा, (३) अस्थिव्यंग किंवा मंदमती या व्याधींनी ग्रस्त असलेल्या व्यक्तीसाठी राखीव ठेवणे आवश्यक आहे. या कलमात कामाचे स्वरुप पाहता ज्या आस्थापनेवर अपंगासाठी आरक्षण करणे शक्य नाही, अशा बाबतीत सुट नमूद करण्यात आली आहे.

३. आस्थापना या शब्दाची व्याख्या आणि या अधिनियमाच्या कलम ३२ आणि ३३ चे उतारे (Extract) सोबतच्या जोडपत्रात देण्यात आले आहेत.

४. राज्याच्या विविध आस्थापनांवर सरळसेवा भरतीने करावयाच्या नियुक्तीत अपंगांसाठी करावयाच्या आरक्षणाची कार्यपद्धती येथे दर्शविण्यात आली आहे. तिचे पालन करण्यात यावे.

(य) अधिनियमातील कलम ३२ व ३३ लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागाने प्रत्येक संवर्गातील कर्मचाऱ्यांकडून ज्या प्रकारचे काम करण्यात येते त्याचा आढावा घेण्यात यावा. विभागांतर्गत आणि विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेली विविध शासकीय कार्यालये यांच्या कार्यालयातील अ, ब, क, आणि ड संवर्गानुसार हा आढावा घेण्यात यावा. कामाच्या स्वरुपाचे काळजीपूर्वक परिशीलन करुन प्रत्येक संवर्गात अपंग

व्यक्तीसाठी सरळसेवा भरतीत रिक्त पदावर ३ टक्के आरक्षण करण्याबाबत विभागाने प्रस्ताव तयार करावा. समाजकल्याण विभाग आणि सामान्य प्रशासन विभाग यांच्यामार्फत शासनाच्या मान्यतेसाठी संवर्गनिहाय प्रस्ताव सादर करण्यात यावेत. अंतिमरित्या मंजूर झालेली योजना शासन निर्णयाच्या स्वरुपात प्रसिध्द करण्यात यावी. कर्मचारी वर्गाकडून करण्यात येणाऱ्या कामाचे स्वरुप विचारात घेता, विशिष्ट संवर्ग/आस्थापना यांच्यासाठी असे आरक्षण ठेवणे शक्य नसल्याचे आढळून आल्यास असे संवर्ग/आस्थापना यांना सदर आरक्षणापासून सूट देण्याचा प्रस्ताव समाजकल्याण विभाग आणि सामान्य प्रशासन विभाग यांच्यामार्फत शासनाच्या आदेशार्थ सादर करण्यात यावा. शासनाच्या मान्यतेनंतर अशा प्रकारची दिलेली सूट अधिसूचित करण्यात यावी.

(र) आधीच्या परिच्छेदामध्ये दर्शविल्यानुसार सर्व शासकीय महामंडळे/कंपन्या, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे, अनुदानित संस्था यांनी सरळसेवा भरती करताना अपंग व्यक्तींसाठी ३ टक्के पदे आरक्षित करावीत. कामाचे स्वरुप पाहता अशा आरक्षणापासून कलम ३३ अंतर्गत सूट हवी असल्यास त्यांनी आपल्याशी / संबंधित शासकीय विभागांशी संपर्क साधावा.

(ल) अपंग व्यक्तीसाठी असलेले ३ टक्के आरक्षण हे आधीच अस्तित्वात असलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग यांच्यासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत असेल. शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दिनांक १६ ऑगस्ट १९९७ नुसार बिंदु नामावलीत हे आरक्षण दर्शविण्यात आले नाही.

(व) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०७०/३५७६/१४३३/१६-अ, दिनांक २३ मे १९७८ अन्वये महाराष्ट्र राज्यात अपंगासाठी गट ‘क’ आणि गट ‘ड’ च्या पदांवर आधीच आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. परिच्छेद १ व २ मध्ये दर्शविल्यानुसार गट ‘क’ आणि गट ‘ड’ च्या पदांचा संवर्गनिहाय आढावा घेण्यास काही कालावधी लागणार असल्यामुळे जैसे थे परिस्थतीत सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी. मात्र वरील परिच्छेद १ व २ मध्ये दर्शविल्यानुसार आरक्षणाबाबत अगर आरक्षणातून सूट देण्याबाबत प्रशासकीय विभागाने आणि इतर आस्थापनांनी विशेष आदेश निर्गमित केल्यास त्या आदेशांच्या मर्यादेपर्यन्त वरील दिनांक २३ मे १९७८ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमण केले जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने.

**नवीन कुमार,**
**प्रधान सचिव (सेवा)**

**अपंग व्यक्ती (समान संधी,हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम,१९९५ नुसार अपंगाकरिता शासकीय सेवेत पदांचा शोध घेणेबाबत.........**

**महाराष्ट्र शासन.**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : एसआरव्ही -५१०९८ प्र.क्र. १४/९८/ १६-अ,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट, १९९८

**वाचा :-** १) शासन निर्णय क्रमांक -एसआरव्ही-१०९७/प्र.क्र. १२/९७/१६-अ,दिनांक :- २२.४.१९९७.

२) शासन परिपत्रक क्रमांक -एसआरव्ही-१०९७/प्र.क्र. १२/९७/१६-अ,दिनांक :- २.५.१९९८.

**शासन निर्णय**

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम,१९९५ चे कलम ३२ नुसार शासकीय सेवेत आणि कलम २ (के) मधील "आस्थापना" या व्याख्येत नमूद करण्यात आलेल्या आस्थापनांमध्ये अपंग व्यक्तीकरिता सुयोग्य असलेल्या पदांचा शोध घ्यावयाची तरतूद करण्यात आली असून तदनुसार शासन निर्णय क्रमांक- एसआरव्ही-१०९७/प्र.क्र. १२/९७/१६-अ, दि. २२-४-१९९७ अन्वये एका समितीची स्थापना केली होती. त्याचप्रमाणे वर नमूद केलेल्या शासन परिपत्रक दि. २.५.१९९८ अन्वये राज्य शासनाच्या विभागांतर्गत आणि विभागाचे अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या विविध कार्यालयांमधील संवर्गाचा आढावा घेऊन अपंगांना सुयोग्य असलेली पदे शोधून काढण्याची विहित कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करुन त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाने महाराष्ट्र अपंग विकास मंच विरुध्द केंद्र शासन व इतर,याचिका क्रमांक-११७/१९९८ मध्ये दि. १३ जुलै १९९८ रोजी दिलेल्या निर्देशानुसार अपंग व्यक्तींना सुयोग्य असलेल्या पदांचा शोध करण्याकरिता तज्ञ व्यक्तींची समिती नेमण्यात यावी व या समितीमध्ये २ अशासकीय सदस्यांची (यापैकी १ अंध व्यक्तींच्या सेवाभावी संस्थेचा प्रतिनिधी) नेमणूक करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तदनुसार शासन निर्णय क्र. एसआरव्ही- १०९८/प्र.क्र. १२/९७/१६-अ, दिनांक २२ एप्रिल,१९९७ अधिक्रमित करुन शासन निर्णय दि. २ मे, १९९८ अन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीस पूरक मार्गदर्शन तसेच या कामाला गती देण्याच्या दृष्टीने पुढील तज्ञ व्यक्तींची समिती स्थापन करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

या समितीमध्ये खालील अधिकारी/अशासकीय सदस्य यांचा समावेश असेल.

| | | |
|---|---|---|
| १) सचिव, समाजकल्याण. | .. | अध्यक्ष |
| २) सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग. | .. | सदस्य |
| ३) आयुक्त,अपंग कल्याण. | .. | सदस्य |
| ४) संचालक, आरोग्य सेवा,मुंबई | .. | सदस्य |
| ५) डीन,ग्रांट मेडीकल कॉलेज,मुंबई. | .. | सदस्य |
| ६) अशासकीय अंधशाळा चालविणा-या सेवाभावी संस्थांचा प्रतिनिधी. | .. | सदस्य |
| ७) अशासकीय वैद्यकीय सेवेतील व्यक्ती. | .. | सदस्य |

अनुक्रमांक ६ आणि ७ वर उल्लेखिलेले सदस्यांचे नाव स्वतंत्रपणे सूचित करण्यात येत आहे.

वरील समितीचे "सदस्य सचिव" म्हणून सहसचिव / उपसचिव,सामान्य प्रशासन विभाग (१६-अ) हे काम पहातील. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार सदर समिती अध्यक्ष एखाद्या व्यक्तीस/संस्थेस आणि संबंधित विभागाचे अधिका-यांना आमंत्रित करु शकतात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**शि.शा.हिरीजगनेर**
**शासनाचे उप सचिव,**

**अपंग व्यक्तींना शासकीय सेवेत वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदावर आरक्षण ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक : एसआरव्ही -१०९८/ सी.आर. ३५/९८/ १६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २८ सप्टेंबर, १९९८.

**वाचा :-** १) शासन निर्णय सा. प्र. वि. क्र. एसआरव्ही-१०७७/३५७६/ १४३३/ १६-अ, दि.२३ मे, १९७८

२) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०८१/सीआर-१५/१६-अ, दि.७ सप्टेंबर,१९८२

**परिपत्रक :-** अपंग व्यक्तींना शासकीय सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ (गट "क" आणि गट "ड") पदावरील नियुक्तीसाठी ३ % आरक्षण ठेवण्याबाबतची योजना सन १९७८ पासून राज्यात लागू करण्यात आली आहे. या संदर्भात शासनाने वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत तसेच अपंगांसाठी विहित केलेल्या आरक्षणानुसार पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्याविषयी देखील वेळोवेळी शासनाने सूचित केलेले आहे

आता केंद्र शासनाचा अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम,१९९५ लागू झालेले असून सदर अधिनियमातील कलम ३३ नुसार अपंगांना शासन सेवेत ३% आरक्षण ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. या संदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/ प्र.क्र. १२/९७/१६-अ, दिनांक २ मे, १९९८ अन्वये विहित करण्यात आली आहे.या परिपत्रकाच्या परिच्छेद ४ (ब) मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, गट "क" आणि गट "ड" च्या पदाचा संवर्ग निहाय आढावा घेण्यास काही कालावधी लागणार असल्यामुळे जैसे थे परिस्थितीत सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी

या परिपत्रकाद्वारे अशा सूचना देण्यात येत आहेत की,. गट "क" आणि गट "ड" मधील पदांवरील नियुक्तीसाठी ३% आरक्षण ठेवण्यासंबंधीच्या शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/१६-अ, दिनांक २३ मे, ७८ अन्वये देण्यात आलेल्या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**शि.शा.हिरीजगनेर**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंग व्यक्तींना शासकीय व शासनाच्या अधिपत्याखालील सेवेतील गट-अ ते गट-ड मधील पदांवर सरळ सेवेने नियुक्ती देण्यासंबंधात उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्र. एसआरव्ही-१०९८/प्र.क्र.३९/९८/१६-अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६ जून, २००१.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/१६-अ, दि. २३.०५.७८.
२) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. एसआरव्ही-१०८१/३२७३/१६-अ, दि. १.३.८३.

**शासन निर्णय**

अपंग व्यक्तींकरीता शासकीय सेवेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क आणि गट-ड मधील पदांवरील नियुक्तीसाठी संदर्भाधिन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात आली आहे.

२. तथापि गट-अ आणि गट-ब मधील पदांसाठी उच्च वयोमर्यादेत सवलत देण्यात आलेली नव्हती. केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ मधील कलम ३८(१) (बी) नुसार अपंग व्यक्तींना शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी उच्च वयोमर्यादेत सवलत देण्याची तरतूद विहित करण्यात आली असल्यामुळे अपंग व्यक्तींची शासकीय सेवेत सरळ सेवेने नियुक्ती करताना उच्च वयोमर्यादेत देण्यात आलेल्या सवलतीत एकसूत्रता असावी, असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. यासंदर्भात शासनाचे आदेश आहेत की, राज्य शासनाच्या सेवेतील व राज्य शासनाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट -अ ते गट-ड मधील पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा अन्य मार्गाने केल्या जाणाऱ्या सरळसेवा नियुक्तींसंबंधात अपंग व्यक्तींसाठी उच्च वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात यावी.

ही सवलत आदेशाच्या दिनांकापासून लागू होईल. त्यामुळे या विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ व २ च्या आदेशानुसार देण्यात आलेल्या उच्च वयोमर्यादेच्या सवलती या आदेशाच्या दिनांकापासून आपोआप रद्द होतील.

४. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका / महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय अनुदानप्राप्त संस्था, आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(द. दा. देशपांडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**अपंग व्यक्तींना शासकीय सेवेतील गट-अ ते गट-ड मधील पदांवर सरळ सेवेने नियुक्ती देण्यासंदर्भात क्रमवार बिंदू नामावली व कार्यपध्दती विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक, क्र. एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ४ मार्च, २००२.

**संदर्भ :-** १) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.: एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.-१२/९७/१६-अ दि. २ मे, १९९८.
२) केंद्र शासनाचे क्र. ३६०३५/१६/९१-Estt (SCT) दि. १८.२.१९९७ चे कार्यालयीन ज्ञापन.
३) केंद्र शासनाचे क्र. ३६०२५/०३/९७-Estt (Res) दि. ४.७.१९९७ चे कार्यालयीन ज्ञापन.
४) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.: एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.-३१/९८/१६-अ, दि. १६ मार्च, १९९९.

**<u>शासन परिपत्रक</u>**

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ च्या कलम ३२ व ३३ नुसार, अपंग व्यक्तीसाठी गट-अ ते गट-ड मधील नियुक्तीकरीता योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) सरळ सेवा भरतीमध्ये १) अंध/अल्पदृष्टी (दृष्टीक्षीणता)-१%, २) कर्णबधीर-१%, आणि ३) अस्थिव्यंग किंवा मंदमती-१% असे एकूण ३% आरक्षण ठेवण्याची कार्यपद्धती या विभागाच्या दि. २ मे, १९९८ च्या शासन परिपत्रकात विहित करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य शासनाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागाने विभागांतर्गत आणि विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या विविध शासकीय कार्यालयांमधील गट-अ ते गट-ड मधील प्रत्येक संवर्गातील कामाच्या स्वरुपाचे काळजीपूर्वक परिशीलन करुन अपंग व्यक्तीसाठी सरळसेवा भरतीत रिक्त पदांवर ३% आरक्षण विहित करणे आवश्यक आहे.

२. केंद्र शासनाने त्यांच्या दि. १८ फेब्रुवारी, १९९७ आणि दि. ४ जुलै, १९९७ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये अपंग व्यक्तींची गट-अ व गट-ब मधील पदांवर सरळ सेवेने भरती करतांना १०० रिक्त पदांची स्वतंत्र नोंदवही ठेवून त्यामधील १, ३४ व ६७ या क्रमानुसार येणारी रिक्त पदे राखून ठेवण्याच्या सूचना देऊन त्याबाबतची कार्यपद्धती विहित केली आहे. राज्य शासकीय/निमशासकीय सेवेत गट-अ ते गट-ड मधील नियुक्तीकरीता योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) अपंगांची सरळ सेवेने नियुक्ती करतांना केंद्र शासनाने विहित केलेली क्रमवार बिंदू नामावली व कार्यपद्धती स्वीकारण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यानुसार खालील सूचना देण्यात येत आहेत.

३. राज्य शासनाच्या सेवेतील गट-अ ते गट-ड मधील अपंग व्यक्तींसाठी योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) सरळ सेवेने नियुक्ती करतांना प्रत्येक मंत्रालयीन विभागांनी/त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी अपंगांसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी योग्य ठरविण्यात आलेल्या व सरळ सेवेने भरण्यात यावयाच्या प्रत्येक पदासाठी १०० बिंदूंची स्वतंत्र नोंदवही (Register) ठेवून त्यामधील १, ३४ व ६७ या क्रमाने येणारी रिक्त पदे अपंगासाठी राखून ठेवावीत. याकरीता विभाग प्रमुखांनी नोंदवहीतील क्रमांक १ पासून सुरुवात करुन कोणत्याही एका अपंग प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करावा. मात्र असे करताना नियुक्तीस योग्य ठरविलेले पद (Identified Post) एकापेक्षा अनेक अपंग प्रवर्गाकरीता योग्य ठरविलेले असेल तर, आरक्षण ठेवताना ते १) अंध/अल्पदृष्टी, (दृष्टीक्षीणता) २) कर्णबधीर आणि ३) अस्थिव्यंग किंवा मंदमती या क्रमाने आळीपाळीने (by Rotation) आरक्षित राहील याची खातरजमा करावी. त्यानंतर या विभागाच्या शासन परिपत्रक

दि. १६.३.१९९९ मधील कार्यपद्धतीनुसार मागणीपत्र पाठवावे.अशा प्रकारे निवड झालेल्या अपंग उमेदवारास सध्या चालू असलेल्या १०० बिंदू नामावलीत (Roster) त्याच्या प्रवर्गानुसार मागासवर्गीय (उदा.अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, इ.)/खुला प्रवर्ग यानुसार दर्शविण्यात यावे. प्रस्तावित क्रमवार बिंदूनुसार तसेच सामाजिक आरक्षण/खुला प्रवर्ग याप्रमाणे मागणी केलेल्या अपंग प्रवर्गाचा उमेदवार त्या भरती वर्षात उपलब्ध न झाल्यास अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम, १९९५ च्या कलम ३६ नुसार कार्यवाही करावी.

४. हे आदेश शासकीय/निमशासकीय सेवा, सर्व शासकीय मंडळे/ महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे, अनुदानित संस्था यांना लागू होतील.

५. या सूचना आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि, ज्या प्रकरणी नियुक्तीची कार्यवाही चालू असेल त्या प्रकरणांना हे आदेश लागू होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(द. दा. देशपांडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंग कर्मचाऱ्यांना गट-क आणि गट-ड मधील पदांवर पदोन्नतीमध्ये ३% आरक्षण विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्र. एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ५ मार्च, २००२.

**संदर्भ :-** १) केंद्र शासनाचे क्र. ३६०३५/८/८९-Estt (SCT) दि. २०.११.१९८९ चे कार्यालयीन ज्ञापन.
२) केंद्र शासनाचे क्र. ३६०३५/०७/९५-Estt (SCT) दि. १८.२.१९९७ चे कार्यालयीन ज्ञापन.
३) केंद्र शासनाचे क्र. ३६०२५/०३/९७-Estt (Res) दि. ४.७.१९९७ चे कार्यालयीन ज्ञापन.

**<u>शासन निर्णय</u>**

केंद्र शासनाने त्यांच्या दि. २०.११.८९ च्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे अपंग कर्मचाऱ्यांना गट-क मधून गट-क मधील, गट-ड मधून गट-ड मधील आणि गट-ड मधून गट-क मधील, नियुक्ती करीता योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) पदोन्नतीमध्ये ३% आरक्षण विहित केले आहे. तसेच दिनांक १८ फेब्रुवारी, १९९७ आणि दि. ४ जुलै, १९९७ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये याबाबतची कार्यपद्धती विहित केली आहे. केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासकीय/निमशासकीय सेवेत गट-क आणि गट-ड मधील नियुक्तीसाठी योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये ३% आरक्षण विहित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. केंद्र शासनाच्या धोरणास अनुलक्षून शासन असे आदेश देत आहे की, राज्य शासनाच्या सेवेतील गट-क व गट-ड मधील अंध/अल्पदृष्टी (Visually Handicapped), कर्णबधीर आणि अस्थिव्यंग या अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत प्रत्येकी १% याप्रमाणे एकूण ३% आरक्षण विहित करण्यात यावे. पदोन्नतीमधील हे आरक्षण गट-क मधून गट-क मधील पदांसाठी, गट-ड मधून गट-ड मधील पदांसाठी आणि गट-ड मधून गट-क मधील पदांसाठी अपंगाच्या नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांकरिता (Identified Posts) असेल. अपंग कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करतांना शासनाने वेळोवेळी विहित केलेले पदोन्नतीसंबंधातील नियम, आदेश व निकष (उदा. पदोन्नती लगतच्या पदावरील किमान सेवेचा कालावधी, विहित विभागीय/सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा, गोपनीय अहवाल, इ.) यानुसार कार्यवाही करण्यात यावी. पदोन्नती संदर्भात क्रमवार बिंदू नामावली व कार्यपद्धती या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविण्यात आली आहे.

३. हे आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून शासकीय सेवा, सर्व शासकीय मंडळे/महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे, अनुदानित संस्था यांना लागू होतील. तथापि ज्या प्रकरणी पदोन्नतीची प्रक्रीया या आदेशाच्या दिनांकापूर्वी सुरु झाली असेल त्या प्रकरणी हे आदेश लागू होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(द. दा. देशपांडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दि. ५ मार्च, २००२ चे परिशिष्ट**

अपंग कर्मचाऱ्यांना गट-क मधून गट-क मधील, गट-ड मधून गट-ड मधील आणि गट-ड मधून गट-क मधील पदोन्नती व क्रमवार बिंदू नामावली वापरण्यासंबंधीची कार्यपद्धती :-

१] अ) विभाग प्रमुख कार्यालय प्रमुख यांनी १) अंध / अल्पदृष्टी (Visually Handicapped), २) कर्णबधीर आणि ३) अस्थिव्यंग या प्रवर्गातील अपंग कर्मचाऱ्यांना **गट-क मधून गट-क मधील, गट-ड मधून गट-ड मधील आणि गट-ड मधून गट-क मधील** नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) पदोन्नतीमध्ये ३% पर्यन्त आरक्षण देण्यासाठी १०० रिक्त पदांची [नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांची (Identified Posts)] पदनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवावी. त्यामधील क्र. १, ३४ व ६७ हे बिंदू अपंगांसाठी आरक्षित करण्यात यावेत. विभाग प्रमुख यांनी क्रमांक १ वर मूळ संवर्गातील (Feeder Cadre) कोणत्याही एका अपंग प्रवर्गाच्या जेष्ठतम कर्मचाऱ्यांचा प्रथम विचार करावा. म्हणजेच जर मूळ संवर्गामधील (Feeder Cadre) जेष्ठतम कर्मचारी अस्थिव्यंग प्रवर्गातील असेल तर नोंदवहीतील क्रमांक १ हा बिंदू त्यांच्या पदोन्नतीकरीता वापरण्यात यावा. तथापि अपंगांच्या (अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग) विविध प्रवर्गासाठी योग्य प्रकारे आरक्षण आळीपाळीने राहील याची विभाग प्रमुखांनी खात्री करणे आवश्यक आहे. अपंग कर्मचाऱ्यांस त्यांच्या अपंग प्रवर्गानुसार, त्यांना नोंदवहीत आरक्षित केलेल्या बिंदूनुसार पदोन्नती देताना त्यास त्याच्या सामाजिक आरक्षण/खुल्या प्रवर्गानुसार (अ.जा.,अ.ज., खुला) बिंदु नामावली (Roster) मध्ये दर्शविण्यात यावे.
**उदा.** जर एखाद्या वर्षात अपंग कर्मचाऱ्याकरीता क्रमवार बिंदु नामावलीनुसार दोन पदे आरक्षित करण्यात आली असतील आणि या दोन पदांपैकी एका पदावर अनुसूचित जाती व अन्य पदावर खुल्या प्रवर्गातील अपंग कर्मचाऱ्यांची पदोन्नतीने नेमणूक करण्यात आली असेल, तर अनुसूचित जातीच्या अपंग कर्मचाऱ्यांस बिंदूनामावलीत अ.जा. बिंदूवर आणि खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यास खुल्या प्रवर्गासमोर दर्शविण्यात यावे.

काही प्रकरणी जर पदोन्नतीकरीता उपलब्ध असलेली रिक्त पदे कमी असतील आणि यापैकी एकही रिक्त पद अनुसूचित अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या आरक्षित बिंदूसमोर दर्शविण्यात आले नसेल, परंतु नोंदवहीतील बिंदूनुसार त्यापैकी एक रिक्त पद अपंग कर्मचाऱ्यांकरिता आरक्षित केले असेल आणि पदोन्नतीकरीता उपलब्ध असलेला अपंग कर्मचारी सामाजिक आरक्षणानुसार (मागासवर्गीय) राखीव प्रवर्गातील असेल, तर त्यानंतर उपलब्ध असलेला रोस्टरवरील बिंदू (संबंधित मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेला) संबंधित अपंग प्रवर्गासाठी आरक्षित अपंग उमेदवारास समायोजित (Adjusting) करण्यासाठी वापरण्यात यावा.
**उदा.** जर उपलब्ध तीन रिक्त पदे पदोन्नतीच्या बिंदूनामावलीतील बिंदू क्रमांक ८,९,१० या खुल्या प्रवर्गासमोर दर्शविण्यात आली. त्यापैकी १ रिक्त पद अपंग कर्मचाऱ्यांसाठी नोंदवहीतील बिंदूनुसार आरक्षित आहे आणि जर अपंग प्रवर्गानुसार निवड केलेला कर्मचारी अनुसूचित जातीचा असेल तर त्याला त्यानंतर उपलब्ध होणाऱ्या अनुसूचित जातीच्या बिंदूसमोर बिंदूनामावलीत क्रमांक १२ वर दर्शविण्यात येवून समायोजित करावे.

**ब)** अपंगासाठी रिक्त असलेली पदे, पदोन्नती आणि निवडीने (By Selection) भरताना सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्रातील अपंग कर्मचाऱ्यांचा विचार करावा. मात्र जेथे संबंधित अपंग प्रवर्गानुसार पुरेसे अपंग कर्मचारी सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्रात उपलब्ध नसतील, तेथे सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्र ५ पट वाढवावे आणि त्यानुसार उपलब्ध होणाऱ्या अपंग कर्मचाऱ्यांचा विचार करावा. परंतु सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्र वाढवूनही अपंग कर्मचारी उपलब्ध झाले नाहीत, तर हे आरक्षण पुढील तीन भरती वर्षाकरीता पुढे ओढावे व नंतर व्यपगत करावे. मात्र सदर रिक्त पद/पदे नियुक्तीस योग्य ठरविलेल्या (Identified Posts) अन्य अपंग प्रवर्गात अदलाबदलीने बदलून, पदोन्नतीसाठी सदर अपंग प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांचा विचार करावा.

**क)** अपंगांकरीता जे पद/पदे पदोन्नती देवून (Prornotion by Non-selection) पदोन्नतीने भरावयाचे आहे, त्याकरीता सुयोग्य अपंग कर्मचाऱ्यांचा अपंग प्रवर्गानुसार आरक्षित पदाकरीता पदोन्नतीसाठी विचार करावा. जर अपंग प्रवर्गानुसार अपंग कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र / उपलब्ध झाला नाही, तर हे आरक्षण पुढील तीन भरती वर्षाकरीता पुढे ओढावे व नंतर व्यपगत करावे. मात्र सदर रिक्त पद/पदे नियुक्तीस योग्य ठरविलेल्या (Identified Posts) अन्य अपंग प्रवर्गात अदलाबदलीने बदलून, पदोन्नतीसाठी सदर अपंग प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांचा विचार करावा.

**ड)** ज्या गट/संवर्गात सरळ सेवेने करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण ७५% पेक्षा जास्त नसेल, अशाच गट/संवर्गामध्ये अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण राहील.

२. पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित करतांना केंद्र शासनाच्या दि. २०.११.८९ च्या आदेशातील खालील मुद्यांचाही विचार करण्यात यावा.

"ज्या अपंग प्रवर्गाकरिता पद/पदे नियुक्तीकरीता योग्य ठरविण्यात (Identified) आली आहेत, त्याच पदांपुरते हे आरक्षण मर्यादित असेल. अपंग प्रवर्गातील संबंधीत व्यक्ती पदोन्नतीचे पद समर्थपणे धारण करु शकत असेल तरच हे आरक्षण कार्यान्वित होईल.

जर समुचित अपंग प्रवर्गातील व्यक्ती, मूळ श्रेणीत (Feeder grade) पुढील उच्च श्रेणीतील अपंगासाठी नियुक्तीकरीता योग्य ठरविलेल्या पदावरील (Identified Posts) पदोन्नतीसाठी उपलब्ध होत नसेल तर परस्पर अदलाबदलीस (Inter se exchange) खालील अटींच्या अधिन राहून परवानगी देण्यात यावी.

(एक) ज्या पदावर पदोन्नती द्यावयाची आहे त्या पदाच्या मूळ श्रेणीत (Feeder Grade), त्या अपंग प्रवर्गातील व्यक्ती उपलब्ध असली पाहिजे,

(दोन) अशा प्रकारे अदलाबदल करण्यात आलेले आरक्षण पुढील तीन भरती वर्षापर्यंत पुढे ओढण्यात येईल व तद्नंतर हे आरक्षण व्यपगत (Lapse) होईल."

-------------

**अपंग व्यक्तींना शासकीय सेवेतील गट- अ ते गट-ड मधील पदांवर,अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम,१९९५ मधील तरतुदीनुसार आरक्षण विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन.**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक : १००१/६१/प्र. क्र. ३६/२००२/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १० मे, २००२

**वाचा :-** १) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०७७/ ३५७६/ १४३३/१६-अ, दि.२३.५.१९७८.
२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्रमांक-एसआरव्ही-१०९७/प्र.क्र. १२/९७/१६-अ, दि.२.५.१९९८.
३) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्रमांक-एसआरव्ही-५१०९८/प्र.क्र. १४/९८/१६-अ, दि.२०.८.१९९८.
४) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्रमांक-एसआरव्ही-१०९८/प्र.क्र. ३५/९८/१६-अ, दि.२८.९.१९९८.
५) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक -एसआरव्ही-१०९८/प्र.क्र. १४/९८/१६-अ, दि.९.१०.१९९८.
६) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक -एसआरव्ही-१०९८/प्र.क्र. ३९/९८/१६-अ, दि.१६.६.२००१.
७) शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्रमांक -एसआरव्ही-१०९९/प्र.क्र. ३७/९९/१६-अ, दि.४.३.२००२.

**शासन परिपत्रक**

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम, १९९५ च्या कलम ३२ व ३३ नुसार, अपंग व्यक्तींसाठी शासकीय व निमशासकीय सेवेतील गट-अ ते गट-ड मधील नियुक्तीकरीता योग्य ठरविलेल्या पदांवर (Indentified Post) सरळ सेवा भरतीमध्ये-१) अंध/अल्पदृष्टी(दृष्टीक्षीणता)- १%, २) कर्णबधीर-१% आणि ३) अस्थिव्यंग किंवा मंदमती-१% असे एकूण ३% आरक्षण ठेवण्याची कार्यपध्दती संदर्भाधीन क्रमांक -२ च्या आदेशात विहित करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य शासनाच्या प्रत्येक मंत्रालयीन विभागाने विभागांतर्गत आणि विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या विविध शासकीय कार्यालयामधील गट-अ ते गट-ड मधील प्रत्येक संवर्गातील कामाच्या स्वरुपाचे काळजीपूर्वक परिशीलन करुन अपंग व्यक्तींसाठी सरळसेवा भरतीत रिक्त पदांवर ३% आरक्षण विहित करणे आवश्यक आहे. याकरिता उच्च नयायालयाच्या निर्देशनुसार संदर्भाधीन क्रमांक ३ व ५ च्या आदेशानुसार सचिव, सामाजिक न्याय यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ व्यक्तींची समिती स्थापन करण्यात आली आहे. अपंग व्यक्तींना शासकीय सेवेत गट- अ ते गट-ड मधील नियुक्तीकरिता योग्य ठरविलेल्या पदांवर सरळसेवेने नियुक्ती देण्यासंदर्भात संदर्भाधीन क्रमांक ७ च्या आदेशानुसार क्रमवार बिंदू नामावली व कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्रमांक ६ च्या आदेशानुसार अपंग

व्यक्तींना शासकीय व शासनाच्या अधिपत्याखलील सेवेतील गट-अ ते गट-ड मधील पदांवर सरळसेवेने नियुक्ती देण्यासंदर्भात उच्च वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षापर्यन्त शिथिल करण्यात आली आहे.

२. अपंग व्यक्तींना अपंग व्यक्ती अधिनियम,१९९५ मधील तरतुदीनुसार सरळसेवा भरतीमध्ये नियुक्ती मिळण्यासाठी, नियुक्तीकरिता योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Post) ३% आरक्षण विहित करणे आवश्यक आहे. ही कार्यवाही करताना प्रत्येक मंत्रालयीन विभागने विभागांतर्गत आणि विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या विविध शासकीय कार्यालये यामधील गट-अ ते गट-ड मधील संवर्ग/पदांनुसार कामाच्या स्वरुपाचे काळजीपूर्वक परिशिलन करुन आरक्षणाचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभाग आणि सामान्य प्रशासन विभाग यांच्यामार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे. तरीही काही मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखलील कार्यालये यांनी ही कार्यवाही अद्यापही पूर्ण केलेली नाही, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. म्हणून या परिपत्रकान्वये अशा सूचना देण्यात येत आहेत की, ज्या मंत्रालयीन विभागांनी विभागांतर्गतआणि विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या विविध कार्यालयातील गट -अ ते गट ड मधील संवर्ग /पदांवर अद्यापपर्यंत अपंग व्यक्तींसाठी आरक्षण विहित केलेले नाही, त्या सर्व विभागांनी/कार्यालयांनी ही कार्यवाही दिनांक ३१ मे, २००२ पर्यन्त कटाक्षाने पूर्ण करावी.

३. प्रत्येक मंत्रालयीन विभागांनी / त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी वित्त विभागाच्या दि.१० सप्टेंबर,२००१ च्या शासन निर्णयानुसार विभागातंर्गत आणि अधिपत्याखालील कार्यालयातील पदांचा आढावा घेऊन जी पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे, त्या पदांपैकी अपंग अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या पदांना अपंग आरक्षण विहित केलेले आहे अशा पदांवर अपंग व्यक्तींच्या नियुक्त्या करणे आवश्यक आहे. मागणीपत्र पाठवताना / पदे भरताना या विभागाच्या दि. ४ मार्च, २००२ च्या परिपत्रकानुसार कार्यवाही करावी, अशा सूचना सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना देण्यात येत आहेत.

४. अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ च्या कलम ३२ (बी) मधील तरतुद खालीलप्रमाणे आहे,

"at periodical intervals not exceeding three years, review the list of posts indentified and up-date the list taking into consideration the developments in technology"

या तरतुदीच्या अनुषंगाने अशा सूचना देण्यात येत आहेत की, अपंग व्यक्ती अधिनियमातील कलम ३२ व ३३ नुसार तसेच या विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ मध्ये विहित केलेल्या परिपत्रकातील कार्यपध्दतीनुसार, सर्व मंत्रालयीन विभागांनी विभागांतर्गत आणि विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या विविध कार्यालयातील गट अ ते गट ड मधील अपंग व्यक्तींसाठी योग्य ठरविलेल्या व सूट दिलेल्या पदांच्या यादीचा आढावा अपंग व्यक्ती अधिनियमातील कलम ३२ (बी) मधील तरतुदीनुसार संबंधित आदेशांच्या दिनांकापासून प्रत्येक तीन वर्षांनी घेऊन तंत्रज्ञानात झालेल्या विकासानुसार यादी अद्ययावत करावी.

५. अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम,१९९५ च्या कलम २ (टी) नुसार अपंग व्यक्तीचे अपंगत्व किमान ४०% असणे आवश्यक आहे. म्हणून सर्व मंत्रालयीन विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी ज्या संवर्ग / पदांकरीता अपंग प्रवर्गासाठी आरक्षण विहित केले आहे त्यामध्ये अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% दर्शविलेले नसल्यास सुधारित आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

६.	याबाबत असेही स्पष्ट करण्यात येते आहे की, ज्या विभागांनी पदांचे / संवर्गाचे सेवा प्रवेश नियम तयार केले असतील त्या मंत्रालयातील विभागांनी या विभागच्या दि. २ मे, १९९८ च्या आदेशातील कार्यपध्दतीनुसार सामायिक संवर्गाच्या पदांना अपंग व्यक्तींसाठी आरक्षण विहित करण्याबाबतचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

७.	हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, सर्व शासकीय मंडळे / महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे, अनुदानित संस्था यांना लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**द. दा. देशपांडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. अपंग-१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६/५/२००४.

**वाचा :-** १) केंद्र शासनाचा अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५.
२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.१२/९७/१६-अ, दि. २ मे, १९९८.
३) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दि. ४ मार्च, २००२.

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्याअपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ मधील तरतूद क्र. ३२ अनुसार शासकीय आस्थापनेमध्ये अपंग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवता येऊ शकतील अशी पदे ठरवावयाची असून तरतूद क्र. ३३ अनुसार अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग किंवा मेंदुचा पक्षघात या अपंग प्रवर्गासाठी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण तीन टक्के आरक्षण ठेवून अशा व्यक्तींच्या नियुक्त्या करावयाच्य आहेत. तथापि एखाद्या विभागातील / आस्थापनेतील कामाचे स्वरुप विचारात घेऊन व यासंबंधात कारणे स्पष्ट करुन आरक्षण ठेवण्यापासून सूट देण्याबाबत आदेश निर्गमित करावयाचे आहेत. या तरतूदी विचारात घेऊन राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाने विभागांतर्गत व विभागांच्या अधिपत्याखालील गट-अ, ब, क, व ड मधील सर्व संवर्गातील कामाच्या स्वरुपाचा आढावा घेऊन अपंग व्यक्तींसाठी ३% आरक्षण ठेवण्याबाबत प्रस्ताव तयार करुन, त्यास समाजकल्याण विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांच्या मार्फत शासनाची मान्यता घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्याच्या सूचना उपरोल्लेखित क्र. २ च्या परिपत्रकान्वयेय देण्यात आल्या होत्या. उपरोल्लेखित क्र.३ च्या परिपत्रकान्वये आरक्षणानुसार नियुक्त्या करण्याबाबत क्रमवार बिंदु व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

अपंगासाठी संवर्गानुसार आरक्षण ठेवण्याच्या व प्रत्येक पदासाठी १०० बिंदुची स्वतंत्र नोंदवही ठेवण्याच्या सूचना आहेत. बहुतांश कार्यालयांत पदे संख्येने अल्प असण्याची शक्यता असल्याने ३% आरक्षणानुसार पदांची परिगणना करणे कठीण आहे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार गट-क व गट-ड मधील पदांचा गटनिहाय एकत्रित विचार करुन आरक्षण ठेवण्यासाठी पदांची परिगणना करावयाची आहे. तथापि गट-अ व गट-ब संबंधात अशी परिगणना संवर्गानुसार करावी अशा त्यांच्या सूचना आहेत. केंद्र शासनाच्या या पद्धतीचा विचार करुन व त्यामध्ये राज्याच्या दृष्टीकोनातून बदल करुन आरक्षित पदांच्या परिगणनेबाबत सुधारित पद्धती विहित करण्याचा विचार होता. या सुधारित पध्दतीमुळे एकाकी पद असले तरीही ते एकुण संख्येत विचारात घेतले जाणार असल्याने आरक्षणातून वगळले तरीही परिगणनेनुसार फरक पडणार नाही. तसेच आरक्षण ठेवण्याची व राबविण्याची प्रक्रिया केंद्रीभूत होणार असल्याने आरक्षण ठेवण्याच्या व त्यानुसार पदे भरण्याच्या प्रक्रियेस गती येऊन त्याचा कार्यपालन अहवालही लवकर मिळु शकेल. त्याचप्रमाणे आरक्षण ठेवण्याबाबत व त्यानुसार पदे भरण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांना मार्गदर्शन व्हावे व त्यांच्या शंकांचे निरसन व्हावे हा हेतुही आहे. हे विचारात घेऊन आता पुढील प्रमाणे तपशीलवार सूचना/मार्गदर्शन करण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक** :-

अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाच्या आरक्षणाबाबत पुढील प्रमाणे एकत्रित मार्गदर्शनात्मक स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

१)	अपंग व्यक्तीसाठी गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड या संवर्गातील पदांसाठी आरक्षण ठेवावयाचे आहे.

२)	अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाचे आरक्षण सरळसेवेने करण्यात यावयाच्या नियुक्त्यांसाठी लागू आहे. (तथापि, सा.प्र.वि. शासन परिपत्रक दि. ५.३.२००२ अन्वये फक्त गट-ड मधून गट-ड मधील, गट-ड मधून गट-क मधील व गट-क मधून गट-क मधील पदांवरील पदोन्नतीसाठी हे आरक्षण लागू करण्यात आले आहे.)

३)	सा.प्र.वि. परिपत्रक दि. १६.३.१९९९ अन्वये स्पष्ट करण्यात आल्यानुसार अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाचे आरक्षण समांतर आरक्षण (Horizontal Reservation) असून ते ५२% सामाजिक आरक्षण (व खुल्या प्रवर्गासाठी असलेले ४८% प्रमाण) यामध्ये कप्पीकृत/अंतर्भूत (Interlocking) आहे.

४)	सा.प्र.वि. शासन परिपत्रक दि. ४.३.२००२ अनुसार अपंग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणानुसार ठेवावयाची १०० रिक्त पदांची नोंदवही व नियुक्त्यांसाठी असलेली बिंदुनामावली या स्वतंत्र बाबी आहेत. तथापि अपंगासाठी ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांच्या नोंदवहीतील संबंधित क्रमांकानुसार अपंग उमेदवारांची मागणी करताना बिंदु नामावलीतील रिक्त बिंदुच्या प्रवर्गाच्या (मागासवर्गीय किंवा खुला) उमेदवाराची मागणी करावयाची आहे. तसेच केवळ अपंग व्यक्तींची मागणी करावयाची नसून अपंगांच्या कोणत्या प्रवर्गासाठी (अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर, अस्थिव्यंग किंवा मेंदुचा पक्षघात) मागणी आहे. हे ही स्पष्ट करावयाचे आहे.

५)	अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी अपंगत्वाचे किमान प्रमाण ४०% असणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती अधिनियमात अपंग व्यक्तीची व्याख्या पुढील प्रमाणे करण्यात आली आहे.

"blindness" referes to a condition where a person suffers from any of the following conditions namely :-

(i) total absence of sight; or

(ii) visual acuity not exceeding 6/60 or 20/200 (snellen) in the better eye with correcting lenses; or

(iii) limitation of the field of vision subtending and angle of 20 degree or worse;

"Person with low vision" means a person with impairment of visual functioning even after treatment of standard refractive correction but who uses or is potentially capable of using vision for the planning or execution of a lask with appropriate assistive device;

"hearing impairment" means loss of sixty decibels or more in the better ear in the conversational range of frequencies.;

"locomotor disability" means disability of the bones, joints or muscles leading to substantial restriction of the movement of the limbs or any form of cerebral palsy;

"cerebral palsy" means a group of non-progressive conditions of a person characterised by abnormal motor control posture resulting from brain insult or injuries occurring in the pre-natal, peri-natal or infant period of development; 22

केंद्र शासनाच्या अधिनियमातील वर उल्लेख केलेली व्याख्या व संबंधित पदावर अपंगासाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाच्या आदेशात नमूद करण्यात आलेले अपंगत्वाचे प्रमाण / प्रकार विचारात घ्यावेत.

६)	अपंग व्यक्तीची निवड झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यक मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करावी.

७)	सा.प्र.वि.शा.नि. दि. १६ जून, २००१ अन्वये अपंग व्यक्तींसाठी उच्चतम वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली आहे.

८)	अपंग व्यक्तीसाठी संबंधित जिल्ह्यांमधील शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय तज्ञांचे प्रमाणपत्र आधारभूत धरावे.

**<u>अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणानुसार पदांची परिगणना</u>**

सा.प्र.वि. परिपत्रक दि. २ मे, १९९८ अन्वये प्रत्येक संवर्गात अपंग व्यक्तींसाठी ३% आरक्षण ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच सा.प्र.वि. परिपत्रक दि. ४ मार्च, २००२ अन्वये प्रत्येक पदासाठी १०० बिंदूंची स्वतंत्र नोंदवही ठेवून त्यामधील १, ३४ व ६७ हे बिंदू अपंगासाठी आरक्षित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि प्रत्येक संवर्गातील पदे अपंग व्यक्तीसाठी आरक्षण ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या संख्येने उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे व केंद्र शासनाने गट-क व गट-ड मधील पदांसाठी विहित केलेली पध्दती विचारात घेऊन अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणानुसार पदांची परिगणना करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून वर्षभरात सर्व गटात व सर्व संवर्गात उपलब्ध होणाऱ्या रिक्त पदांची माहिती मागवून १०० बिंदू नोंदवही ठेवावी. ही १०० बिंदू नोंदवही गट-अ, ब, क व ड अशी गटनिहाय ठेवावी. प्रत्येक गटांच्या नोंदवहीमध्ये त्या गटांतर्गत रिक्त होणाऱ्या सर्व संवर्गाचा/पदांचा समावेश करावा. रिक्त पदांमध्ये अपंग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवता येऊ शकतील असे ठरवून (Identified) आरक्षण ठेवलेली व अपंग व्यक्ती काम करु शकणार नाहीत असे ठरविल्यामुळे (Non-identified) आरक्षण न ठेवलेली अशा दोन्ही प्रकारच्या पदांचा समावेश करावा. या नोंदवहीमधील क्रमांक १,३४ व ६७ हे बिंदू अपंगांसाठी दर्शवावेत. या बिंदूंमधील एखादा बिंदू अपंग व्यक्तींसाठी अनारक्षित ठरविलेल्या पदाचा असेल तर अपंग व्यक्तींसाठी आरक्षित ठरविलेल्या पदाचा पुढील नजीकचा बिंदू विचारात घ्यावा. एकाकी पद असले तरीही ते या नोंदवहीमध्ये समाविष्ट करावे. मात्र आरक्षित करावयाचा बिंदु ठरविताना त्या बिंदुचा विचार न करता त्या पुढील नजीकच्या बिंदुचा विचार करावा. या सर्व रिक्त पदांनुसार व अपंगांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणानुसार अपंग प्रवर्गनिहाय पदांची संख्या निश्चित करुन त्यांचे नियुक्ती प्राधिकाऱ्यांमध्ये वाटप करावे. हे वाटप अपंगाच्या विविध प्रवर्गासाठी सुयोग्य ठरविलेली पदे विचारात घेऊन अपंगांच्या अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व व अस्थिव्यंग किंवा मेंदूचा पक्षघात या तीनही प्रवर्गामध्ये शक्यतो समान होईल याची दक्षता घ्यावी. यासाठी अपंगाच्या कोणत्याही प्रवर्गापासून आरक्षणाची सुरुवात करता येईल. तथापि हे करताना अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग/मेंदूचा पक्षाघात ही क्रमवारी ठेवण्यात यावी. नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यानुसार अपंग उमेदवारांची मागणी करुन/नियुक्त्यांच्या विहित पध्दतीचे पालन करुन पात्र अपंग उमेदवारांच्या नियुक्त्या कराव्यात. विभाग प्रमुखांनी १०० रिक्त पदांच्या नोंदवही नुसार नियुक्त्या झाल्यानंतर पुन्हा नवीन नोंदवही तयार करावी. तसेच विभाग प्रमुखांनी या संबंधातील कार्यवाही पारदर्शक, नि:पक्ष व तक्रारीस वाव राहु नये अशी असण्याबाबत पुरेपूर दक्षता घ्यावी.

मंत्रालयीन स्तरावरील आस्थापनेबाबत ही नोंदवही प्रशासकीय विभागामध्ये ठेवण्यात यावी. महामंडळे, मंडळे यांच्याबाबत ही नोंदवही त्यांच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात यावी. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीने भरण्यात येणाऱ्या मंत्रालयातील व बृहन्मुंबईतील समान संवर्गातील पदांबाबत ही नोंद वही सामान्य प्रशासन विभागामधील संबंधित कार्यासनांनी ठेवावी.

वरील पद्धतीमुळे संदर्भाधीन परिपत्रक क्र.२ व ३ मधील संवर्गानुसार आरक्षण व नोंदवही ठेवण्याबाबतच्या सूचना अधिक्रमित झाल्या आहेत असे समजावे. तसेच अपंग व्यक्तींच्या आरक्षणाबाबत व नियुक्त्यांबाबत वरील सूचनांच्या अनुषंगाने शंका उपस्थित झाल्यास त्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचा निर्णय अंतिम समजावा. विशिष्ट पदावरील नियुक्तीबाबत जर तक्रारी/न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवल्यास ती संबंधित प्रशासकीय विभागांनी हाताळावीत. यासंबंधात आवश्यक असल्यास या विभागाशी सल्लामसलत करावी.

**<u>अपंगासाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा अनुशेष</u>**

अपंगाच्या ज्या विशिष्ट प्रवर्गाची मागणी करण्यात आली आहे. त्या प्रवर्गाचा उमेदवार एखाद्या भरती वर्षात उपलब्ध न झाल्यास अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूद क्र. ३६ अनुसार हे पद पुढील भरती वर्षापर्यंत रिक्त ठेवावयाचे आहे. केंद्र शासनाच्या या संबंधातील धोरणानुसार हे आरक्षण तीन भरती वर्षापर्यंत पुढे ओढावयाचे आहे. दरम्यानच्या कालावधीत अपंगांच्या तीनही प्रवर्गात आंतरबदल (Inter change) करुन सुयोग्य उमेदवार उपलब्ध झाल्यास पद भरावयाचे आहे असे करुनही सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास तिसऱ्या भरती वर्षानंतर ते पद आरक्षण मुक्त करुन अपंग उमेदवाराव्यतिरिक्त उमेदवारातून पद भरावे.

या परिपत्रकातील सूचना शासकीय/निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानीत संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचा अधिकार शासनाला आहे. अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील. प्रशासकीय विभागांनी या सूचना त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणाव्यात.

हे आदेश या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि या आदेशाच्या दिनांकापूर्वी नियुक्त्यांची प्रक्रीया सुरु असेल त्यांस हे आदेश लागू होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(द. दा. देशपांडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्याची बदली त्याच्या राहत्या ठिकाणाजवळ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : अपंग-१००४/प्र.क्र.१८/०४/१६-अ,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १५.१२.२००४.

**संदर्भ :** १) सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. एसआरव्ही - १०८५/१४७/सीआर-७४/१६-अ, दि. ७.१०.१९८७.
२) सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक : अपंग - १००४/प्र.क्र.-१८/०४/१६-अ, दि. १५.४.२००४.

**शासन परिपत्रक :-**

शासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांच्या बदल्या सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेऊन त्यांच्या राहत्या ठिकाणाजवळ करण्याबाबत संदर्भाधीन क्र. १ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि या सूचनांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही असे निदर्शनास आल्यामुळे संदर्भाधीन क्र.२ च्या परिपत्रकान्वये, मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना पुन्हा सूचना देण्यात आल्या होत्या की, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी शासनाने दि. १६ जानेवारी, २००४ रोजी प्रख्यापित केलेल्या अध्यादेशास अधीन राहून शासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांच्या बदल्या प्रशासकीय सोयीनुसार शक्य असल्यास त्यांच्या राहत्या ठिकाणाजवळ कराव्यात.

आता या अनुषंगाने सुधारित सूचना देण्यात येत आहेत की, शासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांच्या बदल्या, शासनाने दि. १६.१.२००४ रोजी तसेच दिनांक २ जुलै, २००४ रोजी प्रख्यापित केलेले अध्यादेश / बदल्यांचे नियम, यातील तरतुदीस बाधा येणार नाही या अटीचे अधीन राहून त्यांच्या राहत्या ठिकाणाजवळील कार्यालयात पदांची उपलब्धता आणि प्रशासकीय सोय लक्षात घेवून करता येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(दे. त्र्यं. कुमावत)**
**शासनाचे उप सचिव.**

**अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ नुसार अपंगांसाठी शासन सेवेत सुयोग्य पदांचा शोध घेण्याबाबत....**

**तज्ञ समितीची पुनर्रचना.**

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- अपंग-२००४/प्र.क्र.५३५/सुधार-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ डिसेंबर, २००४.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-५१०९८/प्र.क्र.१४/९८/१६-अ, दिनांक २०.८.१९९८.

२) शासन परिपत्रक, सामाजिक सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक :- अपंग-२००४/प्र.क्र.२०४/सुधार-३, दिनांक ५.८.२००२.

३) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक-अपंग-२००४/प्र.क्र.३२६ (भाग-५) सुधार-३, दिनांक १२.२.२००४.
शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक-अपंग-२००४/प्र.क्र.६२/सुधार-३, दिनांक २२.१२.२००४.

**शासन परिपत्रक :-** नॅशनल फेडरेशन फॉर ब्लाईड या संस्थेने मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. १२९/०३ च्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार या परिपत्रकाअन्वये तज्ञ समितीच्या स्थापनेबाबत सध्या अस्तित्वात असलेले सर्व शासन निर्णय / परिपत्रके अधिक्रमित करण्यात येत असून शासन सेवेत अपंगांसाठी सुयोग्य पदांचा शोध घेण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या तज्ञ समितीची नव्याने पुनर्रचना करण्यात येत आहे व त्यानुसार या तज्ञ समितीवर खालीलप्रमाणे शासकीय / अशासकीय सदस्य रहातील.

१) प्रधान सचिव (सामाजिक न्याय) - अध्यक्ष
२) सचिव, विधी व न्याय विभाग - सदस्य
३) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे - सदस्य
४) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग - सदस्य
५) अधिष्ठाता, ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई - सदस्य
६) विभाग प्रमुख (नेत्र) ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई - सदस्य
७) विभाग प्रमुख (कर्णबधीर) ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई - सदस्य
८) विभाग प्रमुख (अस्थिव्यंग) ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई - सदस्य
९) विभाग प्रमुख (मतिमंद) ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई - सदस्य
१०) श्री. राजेंद्र व्यास, नॅशनल असोसिएशन ऑफ ब्लाईड, वरळी, मुंबई (किंवा संस्थेचा प्रतिनिधी) - सदस्य
११) डॉ. अधानी, संचालक, रिजनल इन्स्टिस्टट्यूट ऑफ फिजीकल मेडिसिन, हाजीअली, मुंबई (अशासकीय सेवेतील वैद्यकीय व्यावसायिक) - सदस्य
१२) श्री. वसंत संखे, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, मुंबई (अस्थिव्यंग प्रतिनिधी) - सदस्य
१३) श्री. मधु जोशी, कायदेशीर सल्लागार, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, गोरेगांव, मुंबई (अंध प्रतिनिधी) - सदस्य

वरील समितीचे सदस्य सचिव म्हणून उप सचिव / अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग हे काम पहातील. ही समिती सामाजिक न्याय विभागातंर्गत राहील.

२. समितीचे अध्यक्ष आवश्यकतेनुसार एखाद्या व्यक्तीस संस्थेस किंवा संबंधित विभागाचे अधिकाऱ्यांस बैठकीसाठी आमंत्रित करु शकतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(वि.द.आठवले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंगासाठी सुयोग्य ठरविण्यात आलेल्या व अंधांच्या सर्व प्रवर्गासाठी विहीत केलेल्या पदांवर पूर्ण अंध व्यक्तींची नियुक्ती करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
परिपत्रक क्रमांक :- अपंग-२००६/प्र.क्र.१०५/सुधार-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३ नोव्हेंबर, २००६

**परिपत्रक**

अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार व मा. उच्च न्यायालयातून दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. ११०/०२ व १२९/०३ संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांत त्यांच्या अखत्यारित असलेल्या अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याच्या सूचना यापूर्वी वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात अंधांच्या सर्व प्रवर्गासाठी (टोटल ब्लाईड/लो व्हीजन/पार्शली साईटेड) विहीत करण्यात आलेल्या अनुशेषांच्या जागेवर पूर्णतः अंध व्यक्ती डावलून केवळ लो व्हीजन अथवा पार्शली साईटेड या प्रकारच्या अंध व्यक्तींची नियुक्ती केली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यामुळे पूर्णतः अंध व्यक्तींवर होणारा अन्याय टाळण्याच्या दृष्टीने सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, जी पदे अंधाच्या वर नमूद केलेल्या सर्व प्रवर्गासाठी सुयोग्य ठरविण्यात आली असतील व अशा पदांवर नियुक्ती देताना पूर्णतः अंध उमेदवाराबरोबरच पार्शली साईटेड / लो व्हीजन उमेदवार उपलब्ध असतील तर नियुक्ती देताना पूर्णतः अंध उमेदवाराचाही विचार करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(ज. न. राठोड)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंगासाठी सुयोग्य ठरविण्यात आलेल्या व अंधांच्या सर्व प्रवर्गासाठी विहित केलेल्या पदांवर <u>पुर्ण अंध व्यक्तींची नियुक्ती करण्याबाबत....</u>**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
परिपत्रक क्रमांक : अपंग-२००६/प्र.क्र.१०५/सुधार-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १ डिसेंबर, २००६

**प रि प त्र क**

अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार व मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. ७०/२००२ व १२९/२००३ संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागात त्यांच्या अखत्यारित असलेला अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याच्या सूचना यापूर्वी वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. या संदर्भात अंधांच्या सर्व प्रवर्गासाठी (टोटल ब्लाईंड / लो व्हीजन / पार्शली साईटेड) विहित करण्यात आलेल्या अनुशेषाच्या जागेवर पूर्णतः अंध व्यक्ती डावलून केवळ लो व्हीजन अथवा पार्शली साईटेड या प्रकारच्या अंध व्यक्तीची नियुक्ती केली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यामुळे पूर्णतः अंध व्यक्तीवर होणारा अन्याय टाळण्याच्या दृष्टीने सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, जी पदे अंधांच्या वर नमुद केलेल्या सर्व प्रवर्गासाठी सुयोग्य ठरविण्यात आली असतील व अशा पदांवर नियुक्ती देताना पूर्णतः अंध उमेदवाराबरेबरच पार्शली साईटेड / लो व्हीजन उमेदवार उपलब्ध असतील तर नियुक्ती देताना पूर्णतः अंध उमेदवाराचाही विचार करण्याबाबतच्या सूचना समक्रमांकाच्या दिनांक ३-११-२००६ च्या परिपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या आहेत.

२. न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने असेही निदर्शनास आले आहे की, पद भरतीकरिता ज्या पदांबाबत लेखी परीक्षा घेण्यात येते त्यावेळी पूर्णपणे अंध उमेदवारांना लेखनिकाचे सहाय्य घेण्यास परवानगी देण्यात येत नाही. या संदर्भात सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे लक्ष अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ च्या कलम-३१ मधील तरतूदीकडे वेधण्यात येत आहे. सदर तरतूद **"All educational institutions shall provide or cause to be provide amanuensis to blind students and students with or low vision"** अशी आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, पद भरतीकरिता ज्या पदांबाबत लेखी परीक्षा घेतली जाईल. त्यावेळी ज्या पूर्णपणे अंध असलेल्या अथवा अल्पदृष्टीचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवाराने लेखनिकाचे सहाय्य घेण्याची परिक्षेपूर्वी मागणी केल्यास त्यांना लेखनिकाचे सहाय्य घेण्यास परवानगी देण्यात यावी. अशी मागणी अर्जदाराने अर्ज करतेवेळीच संबंधित प्राधिकाऱ्याकडे करणे आवश्यक राहील. परीक्षा सुरु झाल्यानंतर लेखनिकाची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नाही.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या सूचना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या / प्राधिकाऱ्यांच्या / नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(ज. न. राठोड)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**मा.मुंबई उच्च न्यायालय प्रकरण प्राधान्य**

क्र.अकआ/प्र-७/लेखनिक/सुविधा/
२००६-०७/**२९५१**
**अपंग कल्याण आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे-१**
**दुरध्वनी क्र.०२० २६१२२०६१/२६१२६४७१**
**फॅक्स क्र. (०२०-२६१११५९०)**
दिनांक - २० डिसेंबर, २००६.

## परिपत्रक

**विषय : दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक पुरविणेबाबत..**

**संदर्भ :** १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम, १९९५.
२) मा. मुंबई उच्च न्यायालय यांचे याचिका क्रमांक ७०/२००२ व १२९/२००३ प्रकरणात दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ चे आदेश.
३) मुख्य आयुक्त, अपंग कल्याण, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे इंग्रजी पत्र क्र. २७-ओ.आर/(३)/सीसीडी/९९, दिनांक १४/०५/२००३ व क्र. २७-ओ आर (३) / सीसीडी/९९/६६०८, दिनांक ०२/०८/२०००.
४) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, परिपत्रक क्रमांक अपंग-२००६/प्र.क्र.१०५/सुधार-३, दिनांक १ डिसेंबर, २००६.

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतूदीनूसार व **मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्रमांक ७०/२००२ व १२९/२००३ संदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार** सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागात त्यांच्या अखत्यारीत असलेला अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याचे आदेश आहेत. सदर न्यायालयीन प्रकरणात असे दिसून आले आहे की, दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती यांच्या पदभरतीकरीता ज्या पदांबाबत लेखी परिक्षा घेण्यात येतील त्यावेळी त्यांना लेखनिकाचे सहाय्य घेण्यास परवानगी देण्यात येत नाही. यामुळे सदर व्यक्तींवर होणारा अन्याय टाळण्याच्या दृष्टीने सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना कळविण्यात येत आहे की, **अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील प्रकरण क्रमांक ५ व ६ मधील तरतूदीनूसार** दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती यांना लेखनिक उपलब्ध होण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**शैक्षणिक परिक्षा / नेमणूकीसाठी घ्यावयाची परिक्षा यासाठी अपंग उमेदवारांना लेखनिकाची सवलत देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे.**

१) अपंग उमेदवाराला परिक्षेसाठी लेखनिक हा परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्यांची इच्छा असल्यास स्वतः लेखनिकाची व्यवस्था करावी.

२) परिक्षेच्या वेळी पर्यवेक्षक आणि समवेक्षक यांनी योग्य ते पर्यवेक्षण करुन फसवणूकीचे किंवा तत्सम गैर प्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३) प्रत्यक्ष अडचणी विचारात घेवून जर परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने लेखनिक पुरविला असल्यास, त्या प्राधिकाऱ्याने त्या लेखनिकाची सक्षमता तपासून निश्चित करुन घ्यावी.

४) परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने नेमणूकीच्या जाहिरातीमध्ये लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत सुस्पष्ट उल्लेख करावा.

५) उमेदवारांने परिक्षा आयोजित करणाऱ्या संबंधित यंत्रणेकडून लेखनिक घेणार आहे किंवा उमेदवार स्वतः लेखनिकाची व्यवस्था करणार आहे याचा अर्जात स्पष्ट उल्लेख करावा.

६) परिक्षा घेणाऱ्या यंत्रणेने परिक्षेच्या आवश्यकते प्रमाणे लेखनिकाची निवड करुन जिल्हा / विभागीय किंवा राज्य पातळीवर त्यांचे पॅनेल तयार करावे.

७) लेखनिकाचे पॅनेल हे आवश्यकतेप्रमाणे त्या-त्या शाखेनुसार उदा. कला, वाणिज्य, विज्ञान, गणित, अभियांत्रिकी, वैद्यकीय इ. विषयाप्रमाणे करावे व फक्त पात्र आणि सक्षम लेखनिकाचा त्या पॅनेल मध्ये समावेश करावा.

८) शक्यतो परिक्षार्थी व लेखनिक हे एकाच शाखेचे असावेत.

९) उमेदवाराने स्वतःचा लेखनिक आणला असेल व जर तो लेखनिक आणि उमेदवार एकाच शाखेचे असतील तर तो लेखनिक उमेदवाराचे शैक्षणिक पात्रते पेक्षा एक पायरी / टप्पा कमी असावा. मात्र लेखनिक व उमेदवार भिन्न शाखेचे असल्यास त्यास ही अट लागू राहणार नाही.

१०) वर उल्लेखलेल्या शिवाय इतर कोणतेही निर्बंध लेखनिकाच्या निवडीवर असू नयेत.

११) काही अपवादात्मक परिस्थितीत परिक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार मुख्य समवेक्षक यांना राहतील.

१२) वेगवेगळ्या विषयाच्या पेपरसाठी एका पेक्षा अधिक लेखनिक वापरता येणार नाहीत. मात्र वरील ११ प्रमाणे अपवादात्मक परिस्थितीमध्ये बदल करण्याची परवानगी देण्यात येईल.

१३) लेखनिकाच्या मान्यता पत्रात खालील माहिती / तपशील नमूद करण्यात यावी.

१. परिक्षेसाठी उमेदवारास द्यावयाचा जादा वेळ.
२. लेखनिकाच्या वेगळे / स्वतंत्र बसण्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था.
३. प्रत्येक पेपरवर परिक्षेचा दिनांक, विषय याबरोबरच लेखनिकाचे नांव इ. तपशील छापण्यात येणार असल्याची माहिती.
४. अपवादात्मक परिस्थितीत लेखनिक बदलने आवश्यक असल्यास, त्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक.

१४) लेखनिकास अल्पोपहार घ्यावयाचा असल्यास त्यांने तो परिक्षेच्या अगोदर किंवा नंतर घ्यावा.

१५) उमेदवार व लेखनिक यांना परिक्षेच्या वेळा बद्दल संपूर्ण माहिती देण्यात यावी.

१६) अतिरिक्त वेळ :-

१. लेखी परिक्षा एक तासाची असल्यास त्यासाठी किमान २० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात यावा.

२. त्याचप्रमाणे परिक्षेचा कालावधी एक तासापेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.

१७) परिक्षेच्या वेळी उमेदवारांचा गोंधळ व संभ्रम टाळण्यासाठी परिक्षा सुरु होण्याच्या पूर्वी योग्य अशी बैठक व्यवस्था करण्यात यावी.

१८) अपंगांसाठी बसण्याची व्यवस्था शक्यतो तळ मजल्यावर करण्यात यावी.

१९) प्रश्न पत्रिकेमधील मूळ प्रश्नांत दृष्य बाबी समाविष्ट असल्यास अथवा उमेदवाराकडून अशा दृष्य बाबींचा अर्थ लावणे किंवा दृष्य बाबींचे सादरीकरण करणे अपेक्षीत असल्यास अशा प्रश्नांचे ऐवजी पर्यायी प्रश्न पुरविण्यात यावेत. मात्र उमेदवारास उत्तर देण्यासाठी पर्यायी प्रश्नांचे ऐवजी मूळ प्रश्न निवडण्याची मुभा राहील.

२०) दृष्टीहीन उमेदवारांना उत्तर पत्रिका लिहीताना ब्रेलचा वापर करण्याची किंवा संगणक अथवा टंकलेखन यंत्र वापरण्याची मुभा राहील. ब्रेल लिपीमधील उत्तर पत्रिकेचे मुल्यांकन हे ब्रेल लिपी जाणणाऱ्या तज्ञ / परिक्षक यांच्याकडून करावे. शक्य झाल्यास प्रश्न पत्रिका ब्रेल लिपीमध्ये अथवा डिजिटल टेक्सट (Digital text) मध्ये पुरविण्यात यावी.

२१) एस.एस.सी / एच.एस.सी. परिक्षा मंडळे, सर्व विद्यापीठे, सर्व शैक्षणिक संस्था आणि सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी वरील सूचनांचे पालन करावे.

**आयुक्त, अपंग कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**अपंगांसाठी सुयोग्य ठरविण्यात आलेल्या पदावर <u>अंध प्रवर्गातील व्यक्तींच्या नियुक्तीबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : अपंग-२००७/प्र.क्र.७४/सुधार-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ ऑक्टोबर, २००७

**<u>परिपत्रक</u>**

**शासन परिपत्रक :-** अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार व मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. ७०/०२ व १२९/०३ च्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार याचिकाकर्त्यांच्या वकीलासमवेत चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी दिनांक १७ मे, २००७ रोजी पुनर्रचित तज्ञ समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत पार्शली साईटेड म्हणजे ४०% अंधत्व व लो व्हीजन म्हणजे ६०% अंधत्व असा अर्थ अभिप्रेत असल्याचे डॉ. लहाने (समिती सदस्य) यांनी नमुद केले. यावर नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड च्या सदस्यांनी असे विभाजन दाखविल्यामुळे जास्त अंधत्व असलेल्या उमेदवारावर अन्याय होतो असे समितीच्या निदर्शनास आणले सदर बाब विचारात घेऊन समितीने असा निर्णय घेतला की, शासन निर्णयामध्ये ज्या ठिकाणी पार्शली साईटेड असा उल्लेख केलेला आहे त्या त्या ठिकाणी लो व्हीजन असे दर्शविण्यात यावे व लो व्हीजन म्हणजे ४० ते ६०% अंधत्व गृहीत धरण्यात यावे.

वरीलप्रमाणे घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, त्या विभागाने निर्गमित केलेल्या अथवा यापुढे करण्यात येणाऱ्या शासन निर्णयाच्या मसुद्यात ज्या ज्या ठिकाणी पार्शली साईटेड असा उल्लेख करण्यात आलेला आहे त्या त्या ठिकाणी लो व्हीजन अशी दुरुस्ती करण्यात यावी. तसेच सदर बाब आपल्या अधिपत्याखालील असलेल्या सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणावी.

सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २००७१०२३१७४१५५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ज. न. राठोड)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**अपंग कर्मचाऱ्यांना गट क व गट ड पदांवर पदोन्नतीमध्ये दिलेल्या ३% आरक्षणाच्या अमंलबजावणीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

**शासन परिपत्रक, क्रमांक : अपंग-१००८/प्र.क्र.१११/०८/१६-अ,**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक : ८.९.२००८.**

**वाचा :-** १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९७/प्रक्र.१२/९७/१६अ, दि.२.५.१९९८.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६अ, दि. ५.३.२००२.

३) केंद्र शासनाचे ऑफिस मेमोरेंडम, क्र.-३६०३५/३/२००४/Estt (Res), दि. २९.१२.२००५.

४) शासन पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. अपंग २००२/प्रक्र.३३१/सुधार-३, दि. ७.६.२००६.

५) शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.अपंग २००७/प्रक्र.६१/सुधार-३, दि. २०.४.२००७.

६) शासन शुध्दीपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. अपंग २००७/प्रक्र.६१/सुधार-३, दि. २५.५.२००७.

७) शासन परिपत्रक, क्र. न्याय-२००७/स.न्या/प्रक्र १०३/१६अ, दि. १९.१०.२००७.

**प्रस्तावना :-** अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १) हा अधिनियम जम्मू व काश्मिर राज्य वगळता, संपूर्ण देशामध्ये दि. ७ फेब्रुवारी, १९९६ पासून लागू करण्यात आला आहे.

२. संदर्भाधिन दि. २.५.९८ च्या परिपत्रकासोबतच अधिनियमातील ३२ आणि ३३ चे उतारे जोडून सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना पाठविले आहेत. त्यानुसार अधिनियमाच्या कलम ३२ नुसार राज्य शासनाने अपंगासाठी आपल्या आस्थापनेवरील जी पदे आरक्षित करता येतील ती पदे शोधून काढून निश्चित करणे आवश्यक आहे. सदर अधिनियमाच्या कलम ३३ नुसार अपंगांचे नियुक्तीसाठी किमान ३ टक्के पदे आरक्षित करणे आवश्यक आहे. त्यापैकी प्रत्येकी एक टक्का पदे अनुक्रमे १) अंध/अल्पदृष्टी २) बहिरेपणा ३) अस्थिव्यंग किंवा मंदमती या व्याधीने ग्रस्त असलेल्या व्यक्तीसाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. या कलमात विशिष्ट कामाचे स्वरुप पहाता, ज्या आस्थापनेवर अपंगांसाठी आरक्षण करणे शक्य नाही. अशा बाबतीत सूट देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

३. संदर्भाधीन दि. ५.३.२००२ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेतील गट "क" व गट "ड" मधील अंध / अल्पदृष्टी, कर्णबधिर, अस्थिव्यंग किंवा मेंदूचा पक्षघात या अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत प्रत्येकी १ टक्का याप्रमाणे एकूण ३ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. पदोन्नतीमधील हे आरक्षण गट "क" व गट "क" पदावर, गट "ड" मधून गट "ड" पदावर आणि गट "ड" मधून गट "क" पदावर अपंगाच्या नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांकरीता असेल व अपंग कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करताना शासनाने वेळोवेळी विहित केलेले पदोन्नतीसंबंधातील नियम, आदेश व निकष (उदा.पदोन्नती लगतच्या पदावरील किमान सेवेचा कालावधी, विहित विभागीय/सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा, गोपनीय अहवाल इ.) यानुसार कार्यवाही करण्याचेही आदेश दिलेले आहेत.

४.	सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या पत्र क्रमांक-अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि. ५.५.२००६ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या आहेत.

१) अपंगासाठी आरक्षित पदे भरण्यासाठी तसेच अपंगाचा अनुशेष मोजतांना अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ अमंलात आल्यानंतर निर्माण झालेली रिक्त पदे विचारात घेण्यात यावीत.

२) वरील प्रयोजनार्थ केंद्र शासनाच्या दि. २९.१२.२००५ च्या परिपत्रकान्वये विहित केलेल्या मार्गदर्शक सूचना अमंलात आणाव्यात.

सदर सूचना अंमलात आणण्यासाठी वरील दि. २९.१२.२००५ च्या परिपत्रकाची प्रत वरील दि. ५.५.२००६ च्या पत्रासोबत जोडली होती व सदर पत्रातील सूचना सर्व प्रशासकीय विभागानी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालये, महामंडळे व संस्थांना निर्गमित कराव्यात असे कळविले होते.

५.	<u>अपंगांना पदोन्नती देण्याची कार्यवाही होण्यासाठी सदर सूचना पुन्हा खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत</u> :-

**<u>शासन परिपत्रक</u> :-**

अपंग कर्मचाऱ्यांना गट "क" आणि गट "ड" मधील पदांवर पदोन्नती देण्यासाठी अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ (१९९६ चा - १) हा अधिनियम लागू झाल्यापासून म्हणजे दि. ७.२.१९९६ पासून रिक्त होणारी पदे विचारात घेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना पुन्हा देण्यात येत आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०९०८११३०२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(दि.रा.डिंगळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंग व्यक्ती (समान संधी हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतूदीच्या अनुषंगाने अपंग व्यक्तींना राज्य शासनाच्या सेवेत आरक्षण देऊन पदे भरणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन परिपत्रक क्र. न्यायाप्र ०६/प्र.क्र.९/सुधार-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक २७ फेब्रुवारी, २००९

**<u>परिपत्रक</u>**

केंद्र शासनाचे अपंग व्यक्तींना समान संधी त्यांचे हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याकरिता "अपंग व्यक्ती अधिनियम १९९५" हा कायदा पारित करुन संपूर्ण देशभरात १ जानेवारी, २००६ पासून अंमलात आणलेला आहे. या कायद्यातील कलम २५ ते ४३ मध्ये अपंगांसाठी विविध तरतूदी करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये अपंगत्व येण्याची कारणे शोधून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, अपंग मुला मुलींसाठी शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे, श्‍िक्षित प्रशिक्षित अपंगाना निरनिराळ्या सेवामधील आरक्षण देणे तसेच पुनर्वसनविषयक उपाययोजना करणे इत्यादी तरतूदींचा समावेश आहे.

२. या कायद्यातील कलम ३२ ते ४१ ची परिणामकारकरित्या अंमलबजावणी होत नाही. यासाठी मा. उच्च न्यायाल, मुंबई येथे जनहित याचिका क्र. १३९/२००६, ५४/२००७, ७०/२००२, ७५/२००६, १२९/२००३ इत्यादी अशा वेगवेगळ्या जनहित याचिका दाखल झालेल्या आहेत. या जनहित याचिकांची वेळोवेळी सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालयाने अपंगासाठी पदे निश्चित करुन येणारा / असलेला अनुशेष प्राथम्याने भरण्याबाबत वेळोवेळी राज्य शासनाला निर्देश दिले आहेत. किंबहुना एका सुनावणीच्या वेळी अन्य भरती बंद करुन केवळ अपंगाचा अनुशेष भरण्याचे आदेश दिले होते ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

३. वरील कार्यवाहीनंतर वेगवेगळ्या जनहित याचिकांवर दिनांक १२-२-२००९ रोजी मा. उच्च न्यायालयाने घेतलेल्या सुनावणीत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अत्यंत तीव्र नाराजी व्यक्त करुन खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत :-

अ) शासन सेवेतील तसेच महामंडळे / मंडळे, राज्य स्वायत्त संस्था व अन्य अनुदानित संस्थामध्ये अपंगासाठी संवर्गनिहाय संख्या निश्चित करावी.

ब) अपंगासाठी संवर्गनिहाय पदनिश्चिती करावी. (वर्गवारीनुसार अंध, अस्थिव्यंग व मुक-बधिर) (identification of post)

क) संवर्गनिहाय एकूण संख्येप्रमाणे अपंगासाठी ३% आरक्षण निश्चित करावे.

ड) विभागनिहाय सद्यःस्थितीतील अपंगाचा अनुशेष त्वरित भरण्याविषयी नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

इ) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे प्रलंबित राहू नयेत यादृष्टीने सर्व प्रशासकीय विभागाने पाठपुरावा करावा.

फ) अपंगाचा अनुशेष व आरक्षित पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग व राज्य शासनाचे संबंधित विभाग यांनी विहित कालावधीत विशेष भरती मोहिम हाती घ्यावी.

४. वरीलप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे राज्य शासन, राज्य शासनाची अंगीकृत महामंडळे/मंडळे, संस्था इत्यादींनी तातडीने कार्यवाही करुन अपंगांचा अनुशेष व आरक्षित पदे व त्यासंदर्भात संवर्ग निहाय पदनिश्चिती करुन भरणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांना आपल्या अखत्यारितील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, महामंडळे/मंडळे, संस्था इत्यांदींना खास मोहिम राबवून विहित कालमर्यादेत अपंगाचा अनुशेष व आरक्षित असलेली पदे भरण्याची मोहिम तातडीने हाती घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागास दरवर्षी सादर करावा.

५. वरील सूचनांची अंमलबजावणी जे नियुक्ती प्राधिकारी करणार नाहीत अथवा अपंगांची पदे भरण्यास सहकार्य करणार नाहीत अशा अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द आंतरविभागीय चौकशी करुन कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६. सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अखत्यारितील सर्व आस्थापनाच्या निदर्शनास आणावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(जॉनी जोसेफ)**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : अपंग-१००९/प्र.क्र.२७६/०९/१६-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ मार्च, २०१०.

**वाचा :-**१) शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६.०३.१९९९.
२) केंद्र शासनाचे ऑफिस मेमोरँडम क्रमांक : ३६०३५/३/२००४/EStt (Res), दिनांक- २९.१२.२००५.
३) शासन पत्र, सा.न्या.व वि.स. विभाग, क्रमांकःअपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि. ०७.०६.२००६.
४) शासन परिपत्रक, सा.न्या.व वि.स. विभाग,क्रमांकःअपंग-२००७/प्र.क्र.६१/सुधार-३, दि.२०.०४.२००७.
५) शासन शुध्दीपत्रक,सा.न्या.व वि.स.विभाग,क्रमांकःअपंग-२००७/प्र.क्र.६१/सुधार-३, दि. २५.०५.२००७.
६) शासन परिपत्रक क्रमांकःन्याय-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३ (भाग-३)/१६-अ, दिनांक-१९.१०.२००७.

**प्रस्तावना :-**

वरील संदर्भ क्रमांक १ येथील शासन परिपत्रकान्वये अपंगांचे आरक्षण ‘‘समांतर आरक्षण’’ म्हणून दर्शविले असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येऊ नये, असे स्पष्ट केले आहे. तथापि, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने वरील संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक ०७.०६.२००६ च्या पत्रान्वये अंपगांची नियुक्ती करताना संदर्भ क्रमांक २ येथील केंद्र शासनाच्या ऑफिस मेमोरँडम, दिनांक २९.१२.२००५ मधील मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करावी, असे सर्व नियुक्ती प्राधिकारी यांना कळविले असून त्या पत्रासोबत सदर मार्गदर्शक तत्वांची प्रत देखील जोडून पाठविली आहे.

श्रीमती इंद्रा सहानी विरुध्द केंद्र शासन प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश लक्षात घेऊन तसेच केंद्र शासनाच्या वरील संदर्भ क्र. २ येथील दिनांक २९.१२.२००५ च्या ऑफिस मेमोरँडममधील मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेता, अपंगाची आरक्षित पदे सरळ सेवेने भरताना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता स्वतंत्रपणे दर्शाविण्यात यावीत, असे आदेश संदर्भ क्रमांक ४ व ५ येथील परिपत्रकान्वये दिलेले आहेत. हे दोन्ही आदेश महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संगणक सांकेतांक अनुक्रमे क्रमांक २००७०४२०१७११२१००१ व २००७०५२५११३१२२००१ असे आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने देखील अपंग हा अपंग आहे. तो खास प्रवर्ग असून त्याचे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, खुला पवर्ग, इत्यादी प्रवर्गामध्ये आणखी वर्गवारी होत नाही, असे स्पष्ट केले आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेवून सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी आता अपंगांची सरळसेवेने नियुक्ती करताना वरील संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक १६.०३.१९९९ च्या शासन परिपत्रकामधील कार्यपध्दतीचा अवलंब न करता वरील सूचनानुसारच म्हणजे अपंगांची आरक्षित पदे सरळ सेवेने भरताना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता ती स्वतंत्रपणे दर्शविण्यात येऊन अपंगांची पद भरती करण्याची कार्यवाही करावी. मात्र निवड झालेल्या उमेदवारांना ते

ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घ्यावे. तसेच या व्यतिरिक्त वर नमूद केल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या ऑफिस मेमोरँडम, दिनांक २९.१२.२००५ मधील इतर मार्गदर्शक तत्वानुसार अपंगांची पदे भरण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना संदर्भाधीन क्रमांक ६ येथील शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. या सूचनांची कार्यवाही होण्यासाठी सदर सूचना पुन्हा सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी आता अपंगांची सरळसेवेने नियुक्ती करताना वरील संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक १६.०३.१९९९ च्या परिपत्रकामधील कार्यपध्दतीचा अवलंब न करता वरील सूचनांनुसारच म्हणजे अपंगांची आरक्षित पदे सरळसेवेने भरताना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता ती स्वतंत्रपणे दर्शविण्यात येऊन अपंगांची पद भरती करण्याची कार्यवाही करावी. मात्र निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घ्यावे. तसेच, या व्यतिरिक्त वर नमूद केल्याप्रमाणे शासनाच्या ऑफिस मेमोरँडम दिनांक २९.१२.२००५ मधील इतर मार्गदर्शक तत्वानुसार अपंगांची पदे भरण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

अपंग प्रवर्ग वगळता उर्वरित माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूंकपग्रस्त, महिला, इत्यादी समांतर आरक्षणाबाबत मात्र सदर दिनांक १६.०३.१९९९ च्या शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसारच कार्यवाही करणे आवश्यक आहे.

हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, मंडळे / महामंडळे / नगरपालिका /महानगरपालिका / जिल्हापरिषदा / शासकीय अनुदानप्राप्त संस्था/विद्यापीठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावेत.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक - २०१००३१९१४५२३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(गो. आ. लोखंडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंगासाठी सुयोग्य ठरविण्यात आलेल्या पदांबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : न्यायाप्र २००९/प्र.क्र.९/सुधार-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३ ऑगस्ट, २०१०.

**संदर्भ :-** सम क्रमांकाचा दि. १३ ऑगस्ट, २००९ चा शासन निर्णय.

**शासन निर्णय :-** संदर्भाधिन शासन निर्णयान्वये सर्व शासकीय, निमशासकीय संस्थांमध्ये अपंगांसाठी पदनिश्चिती करताना अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मध्ये नमुद केलेल्या अपंग प्रकारानुसार अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींसाठी पदे राखून ठेवण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. त्यासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मध्ये नमुद करण्यात आलेल्या अपंग प्रकारानुसार अपंग असणाऱ्या व्यक्तींसाठी राखीव असलेली पदे भरण्याबाबत सद्या सरु असलेल्या कार्यवाहीमधील पदे व भविष्यात भरण्यात येणारी पदे ही शासन निर्णय दि. १३ ऑगस्ट, २००९ मध्ये नमुद करण्यात आलेल्या अपंग प्रकारानुसारच भरण्यात यावीत.

२. तसेच राज्यातील अपंग व्यक्तींना अपंगत्वाचे फायदे घेण्यासाठी आवश्यक असलेले अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र निर्गमित करणेबाबत या विभागाच्या क्र. अपंग - २००९/प्र.क्र.५९/सुधार-३, दिनांक १६ मे, २००९ चे शासन परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत आहे. त्याऐवजी शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

३. अपंग व्यक्तीसाठींच्या राखीव पदावर सरसकट ४०% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणाऱ्या उमेदवारांची नियुक्तीसाठी निवड केली जाते. परंतु असा उमेदवार त्या पदावर त्याच्या अपंगत्वाच्या टक्केवारीनुसार काम करण्यास पात्र आहे किंवा नाही हे वैद्यकीय मंडळाने न ठरवता त्यांनी फक्त अपंगत्वाच्या टक्केवारीची तपासणी करुन तशी टक्केवारी नमुद करावी व सर्वसाधारण वैद्यकीय तपासणीनुसार तो उमेदवार शारिरीकदृष्ट्या पात्र (Fit) आहे किंवा नाही (Unfit) असे प्रमाणपत्रात नमूद करावे. तसेच अपंगाच्या पदांची जाहिरात देताना त्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या त्याचप्रमाणे अपेक्षित शारीरीक क्षमता / पात्रता याविषयी जाहिरातीत खुलासा करावा.

४. सदरहू शासन निर्णय सर्व मंत्रालयीन विभांगांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणावा.

५. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत असून तो महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून याचा सांकेतांक क्रमांक **२०१००८०३१६१००२००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सतीश गवई)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंग अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार शासकीय/निमशासकीय सेवेतील पदे अपंगांसाठी सुनिश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : न्यायाप्र २००९/प्र.क्र.५/सुधार-३ मंत्रालय विस्तार भवन,

मुंबई- ४०० ०३२. दिनांक : ३ ऑगस्ट, २०१०.

**वाचा :-** अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५

**प्रस्तावना :-** अपंग व्यक्ती (समाना संधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ च्या कायद्यान्वये अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासनाच्या विविध विभागामार्फत अपंगासाठीच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्यामध्ये शासकीय व निमशासकीय सेवेत अपंग व्यक्तींसाठी ३% पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे. त्याकरिता अपंग व्यक्तींसाठी पदनिश्चिती करण्यात येते. त्याप्रमाणे सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांचे नियंत्रणाखालील आस्थापनेवरील पदांची निश्चिती केलेली आहे व अपंग आरक्षणांतर्गत शासन सेवेतील अपंग व्यक्तींसाठी राखीव पदे त्वरित भरण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

वरील प्रमाणे करण्यात आलेल्या पदनिश्चितीमध्ये एक वाक्यता नाही किंवा ती परिपुर्ण नाही. यासाठी अपंग व्यक्तीसाठी सुधारीत पद निश्चिती करणे व त्या अनुषंगाने अपंगांची राखीव पदे भरणे यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. २२५/२००९ दाखल करण्यात आली आहे. सदर दाखल झालेल्या जनहित याचिकेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने शासकीय / निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपंगासाठी सुनिश्चित करणेबाबतचे निर्देश दिले आहेत. अपंग व्यक्ती अधिनियमातील तरतुदीनुसार शासकीय / निमशासकीय सेवेतील पदे अपंगांसाठी सुनिश्चित करण्याबाबत तज्ञ समितीची स्थापना करण्यात आली आहे. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार पद निश्चितीबाबत तज्ञ समितीने केलेल्या सूचना विचारात घेऊन शासकीय / निमशासकीय सेवेतील पदे अपंगांसाठी सुनिश्चित करण्याबाबत शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-** १) केंद्र शासनाने अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीस अनुसरुन त्यांच्या अखत्यारीतील आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे निश्चित केली असून त्याची यादी प्रसिध्द केलेली आहे. सदर यादी नुसार राज्य शासनाच्या अखत्यारीतील शासकीय व निमशासकीय आस्थापनेवरील जी पदे समान आहेत ती पदे संबंधित मंत्रालयीन विभागानी अपंगांसाठी निश्चित करावी व तसे आदेश निर्गमित करुन त्याप्रमाणे अपंगांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही करावी.

२) केंद्र शासनाच्या यादीतील पदांव्यतिरिक्त जी पदे राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय व निमशासकीय आस्थापनेवर आहेत अशा पदांची अपंगांसाठी पद निश्चिती करणेबाबतचा प्रस्ताव संबंधित मंत्रालयीन विभागांनी तज्ञ समितीच्या मान्यतेसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा मार्फत सादर करावा.

३) ज्या पदांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये अंध व्यक्तींना पार पडणे शक्य आहे, अशा पदांसाठी आवश्यक असणारे सहायक तंत्रज्ञान संबंधित विभागांनी उपलब्ध करून द्यावे. निवड झालेल्या अशा अंध कर्मचाऱ्यांना शासनाच्या सर्वसाधारण धोरणानुसार नियुक्तीचा परिविक्षा कालावधी लागू राहील.

२. सदरहू शासन निर्णय सर्व मंत्रालयीन विभागांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक **२०१००८०३१६१९४१००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सतीश गवई)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंग कर्मचा-यांच्या नियुक्त्या करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन.**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक : अपंग- १००९ / प्र. क्र. २७६/ ०९/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ११ मार्च २०११.

**वाचा :-** १) शासन परिपत्रक क्र.: एसआरव्ही -१०९७/प्र. क्र. ३१/९८/१६-अ, दि.१६-३-१९९९.

२) केंद्र शासनाचे ऑफिस मेमोरॅडम क्र.: ३६०३५/३/२००४/ ESH(Res) दि. २९-१२-२००५

३) शासन पत्र सा.न्या.व वि.स.विभाग क्र. अपंग/२००२/ प्र.क्र.३३१/सुधार-३ दि. ७-६-२००६.

४) शासन परिपत्रक सा.न्या.व वि.स.विभाग क्र. अपंग/२००७/ प्र.क्र.६१/सुधार-३ दि. २०-४-२००७.

५) शासन शुध्दीपत्रक, सा.न्या.व वि.स.क्र. अपंग/२००७/ प्र.क्र.६१/ सुधार-३, दि. २५-५-२००७.

६) शासन परिपत्रक क्र.न्याया-२००७/स. न्या./प्र. क्र १०३ (भाग-३)/१६-अ, दि. १९-१०-२००७.

**<u>प्रस्तावाना :-</u>**

वरील संदर्भ क्रमांक १ येथील शासन परिपत्रकान्वपये अपंगांचे आरक्षण **'समांतर आरक्षण '** म्हणून दर्शविले असून, ते सामाजिक आरक्षणांतर्गत असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येऊ नये, असे स्पष्ट केले आहे. तथापि, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने वरील संदर्भ क्र. ३ येथील दिनांक ०७-०६-२००६ च्या पत्रान्वये अपंगांची नियुक्ती करताना संदर्भ क्रमांक २ येथील केंद्र शासनाच्या ऑफिस मेमोरॅडम, दिनांक २९-१२-२००५ मधील मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करावी, असे सर्व नियुक्ती प्राधिकारी यांना कळविले असून, त्या पत्रासोबत सदर मार्गदर्शक तत्वांची प्रत देखील जोडून पाठविली आहे.

श्रीमती इंद्रा सहानी विरुध्द केंद्र शासन प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश लक्षात घेऊन तसेच केंद्र शासनाच्या वरील संदर्भ क्र. २ येथील दि. २१-१२-२००५ च्या ऑफिस मेमोरॅडममधील मार्गदर्शक तत्वे विचारात घेता, अपंगांची आरक्षित पदे सरळ सेवेने भरताना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावीत, असे आदेश संदर्भ क्र. ४ व ५ येथील परिपत्रकान्वये दिलेले आहेत. हे दोन्ही आदेश महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्यांचा संगणक सांकेतांक अनुक्रमे २००७०४२०१७११२१००१ व २००७०५२५११३१२२००१ असे आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने देखील अपंग हा अपंग आहे, तो खास प्रवर्ग असून,त्याचे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, खुला प्रवर्ग, इत्यादी प्रवर्गामध्ये आणखी वर्गवारी होत नाही, असे स्पष्ट केले आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी आता अपंगांची सरळसेवेने नियुक्ती करताना वरील संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक १६-०३-१९९९ च्या शासन परिपत्रकामधील कार्यपध्दतीचा अवलंब न करता वरील सूचनांनुसारच म्हणजे अपंगांची आरक्षित पदे सरळ सेवेने भरताना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता ती स्वतंत्रपणे दर्शविण्यात येऊन अपंगांची पदे भरती करण्याची कार्यवाही करावी. मात्र निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घ्यावे. तसेच या व्यतिरिक्त वर नमूद केल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या ऑफिस मेमोरँडम, दिनांक २९-१२-२००५ मधील इतर मार्गदर्शक तत्वानुसार अपंगांची पदे भरण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना संदर्भराधीन क्रमांक ६ येथील शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. या सूचनांची कार्यवाही होण्यासाठी सदर सूचना पुन्हा सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक** :

सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी आता अपंगांची सरळसेवेने नियुक्ती करताना वरील संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक १६-०३-१९९९ च्या परिपत्रकामधील कार्यपध्दतीचा अवलंब न करता वरील सूचनानुसारच म्हणजे अपंगांची आरक्षित पदे सरळसेवेने भरताना ती सामाजिक प्रगवर्गात न दर्शविता ती स्वतंत्रपणे दर्शविण्यात येऊन अपंगांची पद भरती करण्याची कार्यवाही करावी. मात्र निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील, त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घ्यावे. तसेच, या व्यतिरिक्त वर नमूद केल्याप्रमाणे शासनाच्या ऑफिस मेमोरँडम दिनांक २९-१२-२००५ मधील इतर मार्गदर्शक तत्वानुसार अपंगांची पदे भरण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

अपंग प्रवर्ग वगळता उर्वरित माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, महिला इत्यादी समांतर आरक्षणाबाबत मात्र सदर दि.१६-०३-१९९९च्या शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसारच कार्यवाही करणे आवश्यक आहे.

हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, मंडळे / महामंडळे / नगरपालिका / महानगरपालिका / जिल्हा परिषदा / शासकीय अनुदानप्राप्त संस्था / विद्यापीठे / सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावेत.

सदर परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्यांचा संगणक सांकेत क्र. २०१००३१९१४५२३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**गो. आ. लोखंडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसा केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अपंगांसाठी सुनिश्चित केलेली पदे राज्य शासनाच्या आस्थापनांवरील पदांना लागू करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन.**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक :न्यायाप्र.-२०११/ प्र. क्र.४/ सुधार ३
मंत्रालय,विस्तार भवन मुंबई ४०० ०३२
दिनांक १७ मार्च २०११

**संदर्भ :-** १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५
२) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. अपंग/२००४/ प्र.क्र.५३५/सुधार-३, दि. २७-१२-२००४.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र.-२००९/ प्र. क्र. ५/ सुधार-३, दि. ३-७-२०१० चे पत्र.
४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र .न्यायाप्र.-२००९ / प्र. क्र. ५/ सुधार-३, दि. ३-८-२०१०.
५) मा. उच्च न्यायालय,मुंबई यांचे रिट याचिका क्र. ३२९४/२०१० वरील दिनांक १५-१-२०११ चे आदेश.
६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र.-२०११/ प्र. क्र. ४/ सुधार-३, दि. ८-२-२०११ चे पत्र.

**प्रस्तावना** :- अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील कलम ३३ नुसार केंद्र व राज्य शासनाच्या अखत्यारितील आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी ३% एवढी पदे आरक्षित ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशी पदे सुनिश्चित करण्यासाठी अधिनियमातील कलम ३२ नुसार तज्ञ समिती गठित करण्यात आलेली आहे. त्यानुसार केंद्र व राज्य शासनाने कार्यवाही करून अपंगासाठी पदांची सुनिश्चिती करून ३% प्रमाणे पदे भरणे आवश्यक आहे.

२. वरील तरतुदीनुसार राज्य शासनाने तज्ञ समिती गठित करून राज्य शासनाच्या अखत्यारितील पदनिश्चितीबाबतचे आदेश विविध विभागामार्फत निर्गमित करण्यात आले आहेत व त्याप्रमाणे अपंगांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि अपंगांसाठी सुनिश्चित केलेली पदे योग्यरित्या सुनिश्चित झालेली नाहीत तसेच अपंगांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर योग्यरित्या व पात्र अपंग उमेदवारांची नियुक्ती करण्यात येत नाही अशा व अन्य मुद्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ७०/२००२,७५/२००६, १२९/२००३, १३९/२००६, ५४/२००७, २२५/२००९,४४/२००९,११८/२०१० आणि रिट याचिका ३२९४/२०१० दाखल करण्यात आलेल्या आहेत. सदरहू जनहित / रिट याचिकांवर वेळोवेळी झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने दिलेल्या निदेशानुसार राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत वेळोवेळी पदांची सुनिश्चिती करून अपंगांसाठी आरक्षित पदे भरण्यात आलेली आहेत.

३.  रिट याचिका क्र. ३२९४/२०१० या याचिकेसह अन्य जनहित याचिकांवर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १५-१-२०११ रोजी विशेष सुनावणी घेऊन अंतरिम आदेश दिलेले आहेत. अंतरिम आदेशांमध्ये विविध बाबीसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने विहित मुदतीत कार्यवाही करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्यापैकी केंद्र शासनाने त्यांच्या आस्थापनेवरील अपंगासाठी सुनिश्चित केलेल्या गट-अ, गट-ब,गट-क व गट ड पदांबाबत अनुक्रमे अधिसूचना दि. १८ जानेवारी,२००७, दि. १५-३-२००७ व दि.  १५-३-२००७ रोजी प्रसिध्द केलेली आहे. सदर यादीनुसार राज्य शासनाच्या अखत्यारितील पदांबाबत एकत्रित आदेश काढण्याबाबत निदेश आहेत.

४.  वरील प्रमाणे केंद्र शासनाने त्यांनी गठित केलेल्या तज्ञ समितीच्या वेळोवेळी बैठका घेऊन संबंधित पदांची कर्तव्ये व जबाबदा-या आणि कामाचे स्वरुप विचारात घेऊन सविस्तर यादी प्रसिध्द केलेली आहे. सदर अधिसूचना राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश आणि उत्तरांचल या राज्यांनी त्यांच्या आस्थापनांवरील पदांसाठी लागू केली असल्याचे जनहित याचिकेच्या सुनावणीच्या वेळी निदर्शनास आणून दिलेले आहे. त्यानुसार या विभागाच्या दि. ८-२-२०११ च्या पत्रान्वये सर्व मंत्रालयीन विभागांना केंद्र शासनाच्या यादीनुसार त्यांच्या विभागाच्या अखत्यारितील पदांची सुनिश्चिती करुन यादी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास एकत्रितरित्या आदेश निर्गमित करण्यासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि त्याप्रमाणे संबंधित विभागांकडून यादी उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास राज्य शासनाच्या अखत्यारितील पदांची सुनिश्चिती करुन एकत्रित पदांची यादी प्रसिध्द करता आलेली नाही.

५.  वरील सर्व बाबी व मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाची दि. १८ जानेवारी,२००७, दि. १५-३-२००७ व दि.१५-३-२००७ ची अधिसूचना राज्य शासनाच्या अखत्यारितील पदांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली यांनी भारत सरकारच्या विशेष अधिसूचना भाग-१ (सेक्शन-१) दिनांक १८ जानेवारी,२००७, दि. १८ जानेवारी,२००७ व दि. १५ मार्च, २००७ नुसार केलेली पदनिश्चिती राज्य शासनाच्या अखत्यारितील आस्थापनेवरील विविध पदांकरिता खालील प्रमाणे या शासन निर्णयान्वये लागू करण्यात येत आहे -

१) केंद्र शासनाने अपंगासाठी सुनिश्चित केलेली गट-अ, गट-ब व गट-क व गट-ड मधील जी पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर समान आहेत अशी पदे सुनिश्चित करण्यात येत आहेत.

२) केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या यादीतील ज्या पदांची कर्तव्ये व जबाबदा-या, कामांचे स्वरुप व ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी समान आहेत अशा पदांची पदनामे जरी भिन्न असली तरी ती अपंगांसाठी सुनिश्चित राहतील.

३) केंद्र शासनाच्या यादीमध्ये वरील अनुक्रमांक १ व २ व्यतिरिक्त जी पदे अस्तित्वात आहेत अशा पदांची कर्तव्ये व जबाबदा-या व कामाचे स्वरुप इत्यादीसह माहितीचा तपशील तज्ञ समितीसमोर सादर करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे पाठवावा.

४) वरील अनुक्रमांक ३ येथील पदे तज्ञ समितीकडून सुनिश्चित झाल्यानंतर त्याची एकत्रित यादी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित करेल.

५) वरील अनुक्रमांक १ व २ प्रमाणे अपंगासाठी सुनिश्चित असलेली पदे तातडीने भरण्याची कार्यवाही येत्या ३ महिन्यात पूर्ण करावी.

६) अपंगासाठी पदे भरण्यासाठी देण्यात येणारी जाहिरात ही राज्यस्तरावरील किमान २ मराठी व इंग्रजी वर्तमानपत्र तसेच शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

वरील निर्णयानुसार अपंगासाठी पदनिश्चितीप्रमाणे पदे भरली जरणार असल्याने संबंधित विभागाने पदनिश्चतीबाबत यापूर्वी निर्गमित केलेले आदेश आपोआप रद्द होतील.

सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील नियुक्ती प्राधिकरणांना सदरहू आदेशानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात व अपंगासाठी आरक्षित असलेली पदे कोणत्याही परिस्थितीत ३ महिन्यात भरली जातील याबाबत संबंधितांना सक्त सूचना देण्यात याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०११०३१७१८१६३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**दिनेश वाघमारे**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार अपंग व्यक्तींना शासकीय/ निमशासकीय सेवेत आरक्षण देऊन पदे भरणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन.**

सार्मजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय ,क्रमांक :न्यायप्र.-२०११/ प्र. क्र.४/ सुधार ३

मंत्रालय,विस्तार भवन मुंबई ४०० ०३२

दिनांक २७ एप्रिल २०११

**वाचा :-** १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग)

२) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र-०६ /प्र. क्र. ९ / सुधार-३, दि. २७ फेब्रुवारी,२००९.

३) शासन निर्णय,क्र.:अपंग-२०१०/ प्र. क्र.१९४ / सुधार-३, दि.१७ मार्च,२०११.

**परिपत्रक :-**

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५ मधील कलम ३२ नुसार शासकीय व निमशासकीय सेवेत अपंग व्यक्तींसाठी ३ टक्के एवढे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. सदर अधिनियमातील कलम ३३ नुसार शासकीय व निमशासकीय आस्थापनेवरील अपंग व्यक्तीसाठी पदे सुनिश्चित करुन ती भरणे आवश्यक आहे. या व अन्य बाबींसाठी मा. उच्च न्यायालय,मुंबई येथील जनहित याचिका क्र १३९/३००६, ५४/ २००७, ७०/२००२,७५/२००६, १२९/२००३ अशा वेगवेगळया जनहित याचिका दाखल झाल्या होत्या. या जनहित याचिकांवर वेळोवेळी सुनावणी होऊन दिनांक १२-२-२००९ रोजी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अपंगांसाठी संवर्गनिहाय संख्या निश्चित करणे, पदनिश्चिती करणे, संवर्गनिहाय एकूण संख्येप्रमाणे अपंगांसाठी ३ टक्के आरक्षण निश्चित करणे, विभागनिहाय अपंगांचे अनुशेष त्वरित भरण्यासाठी नियुक्ती प्राधिकरणाने नियुक्ती करणे इ. सूचना शासन परिपत्रक दिनांक २७ फेब्रुवारी,२००९ नुसार दिलेल्या आहेत, परंतू त्याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याची बाब मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणण्यात आलेली आहे.

२. सद्यस्थितीत अपंगांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर योग्यरीत्या व पात्र अपंग उमेदवारांची नियुक्ती करण्यात येत नाही व अन्य मुद्यांबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र. ७०/२००२, ७५/२००६, १२९/२००३/१३९/२००६ ५४/२००७,२२५/२००९,४४/२००९,११८/२०१० आणि रिट याचिका ३२९४/२०१० दाखल करण्यात आलेल्या आहेत. सदरहू जनहित / रिट याचिकांवर दि. १८-३-२०११ रोजी झालेल्या सुनावणीत याचिकाकर्त्यांनी अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील कलम ३२ व ३३ चा उल्लेख करुन अपंगांसाठी अधिनियमानुसार विहित करण्यात आलेले ३ टक्के आरक्षण हे एकूण संवर्ग संख्येस न लावता दि. ७ फेब्रुवारी,१९९६ पासून उपलब्ध झालेल्या रिक्त पदांवर गणना केली जाते ही बाब अधिनियमाच्याविरुध्द आहे, असे नमूद केलेले आहे. तसेच या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालही मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलेले आहेत. सर्वसाधारण पद भरतीसाठी जाहिरात देताना अपंगांसाठी आरक्षित असलेली पदे

स्वतंत्रपणे नमूद न करता, अपंगांना प्राधान्य देण्यात येईल, अशा प्रकारची जाहिरात प्रसिध्द करण्यात येते. अशीही बाब मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणण्यात आलेली आहे. यावर शासनाकडून मा. उच्च न्यायालयास खुलासा करावयाचा आहे. या संदर्भात अपंग व्यक्तींच्या पद भरतीबाबत सविस्तर सूचना या विभागाच्या दि. २७ फेब्रुवारी, २००९ या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.

३. वरील सर्व बाबी विचारात घेऊन, शासन आता संवर्गनिहाय आरक्षण ठेवण्याबाबत पुन्हा खालील प्रमाणे सूचना देत आहे.

१) शासन सेवेतील तसेच महामंडळे / मंडळे /राज्य स्वायत्त संस्था व अन्य अनुदानित संस्थांमध्ये अपंगसाठी संवर्गनिहाय पदांची संख्या निश्चित करावी.

२) या विभागाच्या दि. १७ मार्च,२०११ अन्वये अपंगांसाठी संवर्गनिहाय पद निश्चिती करावी (अंध/क्षीणदृष्टी, अस्थिव्यंग, मूकबधिर).

३) अपंगांचे आरक्षण रिक्त पदांवर निश्चित न करता संवर्गनिहाय मंजूर पद संख्येप्रमाणे अपंगांसाठी ३ टक्के आरक्षण निश्चित करावे.

४) सद्यस्थितीतील संवर्गनिहाय असलेली अपंगांच्या अनुशेषाची पदे दि.३० जून २०११ भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

५) पद भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द करताना अपंगांसाठी असलेली पदसंख्या प्रवर्गनिहाय (अंध/क्षीणदृष्टी, अस्थिव्यंग, मूकबधिर) अशी स्वतंत्रपणे दर्शवावी.

४. सदर शासन निर्णयसंबंधित मंत्रालयीन विभागाने आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक व कार्यालय प्रमुख तसेच महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, मंडळे, सार्वजनिक उपक्रम तातडीने पाठवावा व त्याप्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांना द्याव्यात, असेही आदेश देण्यात येत आहेत.

५. वरीलप्रमाणे करण्यात आलेली कार्यवाही ही दि. ३० जून, २०११ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करावी व तसा अहवाल सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास सादर करावा.

सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०११०४२७१९१५२९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(ज. न. राठोड)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**अंपग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार अपंग व्यक्तीना शासकीय / निमशासकीय सेवेत आरक्षण देऊन पदे भरणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन.**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक :न्यायप्र.-२०११/प्र.क्र.१२९ सुधार-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक **४ ऑगस्ट, २०११.**

**संदर्भ :-** १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५

२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०९९/ प्र. क्र. ३७ / ९९ / १६-अ, दि. ४ मार्च, २००२.

३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र. न्याय -२००७/ स.न्या./प्र. क्र.१०३/ (भाग-३)/१६-अ,दिनांक १९ ऑक्टोबर, २००७

४) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र-०६ /प्र. क्र. ९ / सुधार-३, दि. २७ फेब्रुवारी,२००९.

५) शासन निर्णय,क्र.:अपंग-२०१०/ प्र. क्र. १९४ / सुधार-३, दि.१७ मार्च, २०११.

६) शासन परिपत्रक, क्र. न्या.याप्र.-२०११ / प्र.क्र. ४ / सुधार-३ दि. २७ एप्रिल,२०११.

**परिपत्रक :-**

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम ३२ नुसार शासकीय व निमशासकीय सेवेत अपंग व्यक्तींसाठी ३ टक्के एवढे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. सदर अधिनियमातील कलम ३३ नुसार शासकीय व निमशासकीय आस्थापनेवरील अपंग व्यक्तीसाठी पदे सुनिश्चित करुन ती भरणे आवश्यक आहे. वरील संदर्भाधीन अनुक्रमांक २ येथील शासन परिपत्रकाव्दारे सामान्य प्रशासन विभागाने शासन सेवेतील गट "अ" ते गट "ड" मधील पदांवर सरळ सेवेने नियुक्ती देण्यासंदर्भात क्रमवार बिंदू नामावली व कार्यपध्दती विहित केलेली आहे. वरील अनुक्रमांक ४, ५ व ६ अन्वये अपंग व्यक्तींसाठी लागू करण्यात आलेले ३ % आरक्षण पदभरती करताना संवर्ग संख्येला लावण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच अपंग व्यक्तीसाठी वरील शासन निर्णय दि. १७ मार्च,२०११ अन्वये पदे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत. पदे सुनिश्चित करण्यात आलेल्या एखाद्या संवर्गामध्ये पदसंख्या ३३ पेक्षा कमी असेल अशा वेळी ३ % प्रमाणे अपंगांसाठी पद राखून ठेवण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

आता अपंग व्यक्तीसाठी सुनिश्चित केलेल्या संवर्गनिहाय मंजूर पदांपैकी ३ % पदांवर अपंगांसाठी आरक्षण ठेवताना पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना या परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत :-

| संवर्गातील मंजूर पद संख्या | अपंगांकरिता राखीव पदे |
|---|---|
| १-७ | निरंक |
| ८-३३ | १ पद |
| ३३ पेक्षा जास्त | ३ टक्के आरक्षणानुसार पूर्ण एककात येणारी पदे आणि त्यापुढील अपूर्णांक ०.५ अथवा त्यापेक्षा जास्त असले तर त्याकरिता १ अतिरिक्त पद गृहीत धरावे. |

३. सदर शासन परिपत्रकसतील सूचना संबंधित मंत्रालयीन विभागाने आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक प्रमुख व कार्यालय प्रमुख तसेच महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, मंडळे, सार्वजनिक उपक्रम अनुदान प्राप्त संस्था यांच्या निदर्शनास आणाव्यात.

४. हे परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक ११७/ १६-अ, दि. २७/७/२०११ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदरहू शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०११०८०३१२४९४९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**दिनेश वाघमारे**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

# [३]

# सेवेमध्ये खेळाडूंसाठी समांतर आरक्षण

**अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ३० एप्रिल, २००५.

**प्रस्तावना :-** राष्ट्राच्या व राज्याच्या सांस्कृतिक जीवनामध्ये क्रीडा संस्कृतीस अनन्यसाधारण महत्व आहे. राष्ट्राच्या प्रगतीमध्ये त्या राष्ट्राची व पर्यायाने राज्याची क्रीडा क्षेत्रातील कामगिरी हा एक महत्वाचा मानदंड आहे. त्यामुळे वेगवेगळ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके प्राप्त करणारे खेळाडू राष्ट्रास अथवा राज्यासाठी लौकिक प्राप्त करुन देत असतात.

**२.** खेळाडूचे खेळातील करिअरचे वय व शैक्षणिक करिअरचा काळ एकच असल्याने त्यांना दोन्ही आघाडींवर सारख्याच प्रमाणात लक्ष देता येणे शक्य नसते. त्यामुळे बऱ्याचदा शैक्षणिक प्राविण्यात त्यांची पिछेहाट होते व त्यामुळे नोकरी व्यवसायाच्या स्पर्धेत ते केवळ शैक्षणिक करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांशी स्पर्धा करु शकत नाहीत. खेळाचा उमेदीचा काळ संपल्यानंतर अशा गुणवत्ताधारक खेळाडूंना नोकरीसाठी वणवण भटकावे लागते. यामुळे खेळाडू अथवा त्यांचे पालक खेळाकडे करिअर म्हणून पहात नाहीत व खेळास पूर्णवेळ योगदान देण्यापासून ते परावृत्त होतात.

**३.** राज्याचे व राष्ट्राचे नांव उज्वल करणाऱ्या खेळाडूंना उदरनिर्वाहाची खात्री मिळाल्यास ते खेळातील प्राविण्य वाढविण्याकडे अविचलपणे लक्ष देतील म्हणून खेळाडूंना शासकीय व इतर नोकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवण्याची मागणी विविध क्षेत्रातून व विशेषतः क्रीडा क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणावर येत होती. त्याबाबत आता विचार करुन शासनाने, शासनाच्या विविध विभागात व शासनाच्या मालकीच्या व नियंत्रणाखाली असलेल्या महामंडळात, स्थानिक प्राधिकरणात व विविध स्वरुपात शासकीय सवलती प्राप्त केलेल्या संस्थामध्ये, अत्युच्च गुणवत्ताप्राप्त खेळाडूंसाठी नोकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :** शासकीय व निमशासकीय कार्यालयांमधील गट-अ, ब, क व ड संवर्गातील नामनिर्देशनाने भरण्यात येणाऱ्या पदांपैकी ५% पदे विशेष कामगिरी बजावणाऱ्या स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी आरक्षित असावीत. मात्र हे आरक्षण ५२% पेक्षा अधिक असणार नाही.

निर्णयाचे स्वरुप व त्याच्या ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत :-

**१) आरक्षण लागू करावयाच्या सेवा व कार्यालये**

नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांमधील आरक्षण हे खालील कार्यालयास लागू राहील :-

**अ)** राज्य शासनाची सर्व कार्यालये

**ब)** राज्य शासनाचे उपक्रम व महामंडळे

**क)** स्थानिक स्वराज्य संस्था

**ड)** वैधानिक मंडळे

**इ)** राज्य शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष (उदा. जमीन, पाणी, अनुदान, कर सवलती इ.) प्राप्त होणाऱ्या संस्था.

२) **आरक्षण लागू नसलेली सेवा व कार्यालये**

**अ)** उच्च न्यायालय
**ब)** न्यायाधिकरणे
**क)** राज्यपालांचे सचिवालय
**ड)** विधानमंडळ सचिवालय
**इ)** महाराष्ट्र लोकसेवा आयोग
**ई)** लोक आयुक्त, महाराष्ट्र

३) **नियुक्तीसाठी खेळाडूंची अर्हता**

विविध कार्यालयातील नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांकरिता खेळाडूंनी खालील अर्हता पूर्ण केलेली असावी :-

**अ)** खेळाडू हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा व त्याला मराठीचे ज्ञान असावे.
**ब)** सदर खेळाडूने सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदासाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.
**क)** खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील करण्यात यावी.
**ड)** एखाद्या खेळाडूने राज्याचे नांव उज्ज्वल होईल अशी कामगिरी केल्याचे निदर्शनास आल्यास, शैक्षणिक व वयाची अट शिथील करुन, अशा खेळाडूस योग्य अशा पदी नियुक्त करण्याचे अधिकार शासनास राहतील.

४) **क्रीडाविषयक अर्हता**

आरक्षित पदांवर नियुक्ती देण्यासाठी खेळाडूने क्रीडाविषयक क्षेत्रात खालीलप्रमाणे कामगिरी केलेली असावी :-

**अ) गट-अ साठी अर्हता**

सदर पदांसाठी आंतरराष्ट्रीय स्पर्धामधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये भारतातर्फे प्रतिनिधीत्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेले असावे अथवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

सदर स्पर्धा या संबंधित खेळांच्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात.

तसेच उपरोक्त स्पर्धाव्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा या मान्यताप्राप्त खेळांच्या असून आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड ही राष्ट्रीय संघातून झालेली असावी. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

**ब) गट-ब साठी अर्हता**

सदर पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधीत्व करताना राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

सदर स्पर्धा या संबंधित खेळांच्या भारतीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा भारतीय ऑलिम्पिक समितीने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात.

तसेच उपरोक्त स्पर्धाव्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा या मान्यताप्राप्त खेळांच्या असून राष्ट्रीय स्तरावरील भारतीय ऑलिम्पिक समितीच्या मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड ही राज्य संघातून झालेली असावी.

**क) गट-क व ड साठी अर्हता**

सदर पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धात प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य असावे. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूचा यासाठी विचार करता येणार नाही.

राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

## ५) आरक्षणासाठी मान्यताप्राप्त क्रीडा प्रकार

विविध गटांसाठी मान्यताप्राप्त क्रीडा प्रकारांचा तक्ता **परिशिष्ट-अ** येथे ठेवला आहे. सदर यादीमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

## ६) खेळाडूंना नियुक्ती देण्यासाठी अवलंबावयाची पध्दती

गट-अ व ब साठी विविध विभागाने त्याच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार नामनिर्देशनाने पदे भरण्यासाठी अवलंबिलेली कार्यपद्धती लागू राहील. महामंडळ, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानितसंस्था,इ. संस्थांमध्ये प्रचलित शासन कार्यपद्धती लागू राहील. गट-क व ड मधील नामनिर्देशनाने भरावयाची पदे शासनाचे अस्तित्वात असलेले आदेश व कार्यपद्धती तसेच वेळोवेळी शासनाने दिलेल्या सूचना व निर्गमित केलेल्या आदेशानुसार भरण्यात यावीत.

## ७) सर्वसाधारण अटी व मार्गदर्शक तत्वे

(१) खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणातून थेट नेमलेला उमेदवार हा आरक्षण बिंदू नामावलीमध्ये त्या त्या प्रवर्गामध्ये गणला जाईल. उदा. अनुसूचित जातीचे खेळाडू व्यक्ती ही अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या बिंदूवर गणली जाईल.

(२) राज्य शासनाच्या सेवेत यापूर्वीच असलेल्या उमेदवारांना त्यांनी क्रीडा क्षेत्रात अधिक वरिष्ठ स्थान अथवा पदक प्राप्त केल्यास व ते शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इ. बाबींसह पात्र असल्यास वरिष्ठ जागेसाठी ते अर्ज करण्यास पात्र राहतील.

(३) खेळाडूंची कामगिरीविषयक प्रमाणपत्रे **परिशिष्ट-ब** येथे दिलेल्या प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात घेऊन संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेली असावीत. प्रमाणपत्राचे नमुने (फॉर्म १ ते ४) सोबत जोडले आहेत.

(४) कोणत्याही खेळाच्या स्पर्धेच्या अधिकृततेबाबत अथवा दर्जाबाबत साशंकता निर्माण झाल्यास संचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या अहवालाच्या आधारे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांच्या संमतीने देण्यात आलेला निर्णय हा अंतिम असेल.

(५) शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्था यांच्या सेवेत नियुक्तीसाठी खेळाडूंकरिता ५% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

(६) खेळाडूंच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करताना अनु. जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदांपैकी त्या त्या प्रवर्गातील खेळाडूंसाठी ५% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

(७) खेळाडूंचे आरक्षण हे समांतर आरक्षण राहील व ते कार्यान्वित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६.३.९९ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी. सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

(८) खेळाडूंसाठी विहित करण्यात आलेले सदर ५% आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

(९) खेळाडू आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष आरक्षण असल्यामुळे ते आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत खेळाडू आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या, सामाजिक आरक्षण/उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब) (क) (ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि खुला प्रवर्ग) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी.

(१०) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि व्यक्ती/कुंटुंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू सदस्यांना खेळाडूंसाठी असलेले ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूंचे ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

(११) इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) यांचेकरिता उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गट (क्रिमीलेअर) बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले नियम व अटी लागू राहतील.

(१२) उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे असावे.

(१३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकाऱ्यांकडून खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणुकीकरिता ज्या खेळाडूंची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदाकरिता केलेला अर्ज संबंधित विभागांनी/कार्यालयांनी संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठवावा.

(१४) संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणपत्र या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार आहे किंवा नाही हे तपासावे. तसेच सदर प्रमाणपत्राच्या पृष्ठयर्थ संबंधित उमेदवाराचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता जी माहिती सादर केली असेल ती माहिती मूळ कागदपत्रांवरुन तसेच आवश्यकता वाटल्यास गुप्तभेटी देवून तपासून घ्यावी व सर्व माहिती योग्य असल्याचे आढळून आल्यास प्रमाणपत्र प्रमाणित करुन संबंधित कार्यालयांना परत पाठवावे.

(१५) जर एखाद्या प्रमाणपत्राबाबत संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शंका असल्यास त्यांनी याबाबतचा सविस्तर तपशील आपल्या अहवालात नमूद करुन मुळ कागदपत्र मुळ विभागाकडे परत करावेत.

(१६) संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणपत्र तपासणीचा अहवाल एक महिन्यात संबंधित कार्यालयांना पाठवावा.

(१७) खेळाडूंचा अहवाल एक महिन्यात प्राप्त झाला नाही तर संबंधित कार्यालयांनी प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिनतेने संबंधित उमेदवारास तात्पूरती नेमणूक द्यावी.

(१८) अधिकृत एकविध संघटनेच्या प्रमाणपत्रांची छाननी क्रीडा खात्यास करता यावी याकरिता सर्व राष्ट्रीय व राज्य संघटनांनी त्यांच्या उक्त स्पर्धेचे आयोजन झाल्यापासून ९० दिवसांमध्ये त्या स्पर्धेतील खेळाडूंचे संपूर्ण रेकॉर्ड/स्पर्धेचे अधिकृत निकाल व्यवस्थितरित्या जतन करुन त्याची एक प्रत क्रीडा संचालनालयाकडे पाठवणे आवश्यक राहील.

(१९) एकविध संघटनांकडून प्राप्त झालेल्या निकालांच्या आधारावर संचालक, क्रीडा व युवक सेवा हे खेळाडूंना प्रमाणपत्र देतील किंवा संघटनांनी दिलेले प्रमाणपत्र प्रमाणित करतील.

(२०) खेळाडूंसाठी असलेल्या ५% आरक्षणाअंतर्गत विविध संवर्गातील विविध खात्यातील पदे भरली जात आहेत का नाही तसेच त्यांचा राहिलेला अनुशेष आदींचे संनियंत्रण संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत करण्यात येईल.

(२१) विविध खात्यांच्या मुख्यालयांनी संवर्गनिहाय रिक्त अथवा भरलेल्या पदांची माहिती विहित नमुन्यात दरवर्षी डिसेंबरअखेर संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविणे बंधनकारक आहे व संचालकांनी ती एकत्रित करुन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडे प्रत्येकवर्षी ३१ मार्च अखेरपर्यंत पाठवावी.

(२२) आरक्षण ठेवत असताना अपूर्णांकात आल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशाप्रमाणे त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(२३) एकाकी पदास आरक्षण लागू राहणार नाही.

(२४) आरक्षण हे पदनिहाय व वेतनश्रेणीनिहाय असेल.

(२५) समांतर आरक्षण असल्यामुळे त्या संवर्गात अदलाबदलअनुज्ञेय होणार नाही.

(२६) एखादा खेळाडू उमेदवार अ गटातील नेमणूकीसाठी पात्र असून त्याने ब गटासाठी अर्ज केल्यास त्याचा विचार करण्यास हरकत नाही. परंतु, त्याचबरोबर संबंधित उमेदवारांने अ गटासाठीचे पद उपलब्ध झाल्यास अर्ज केल्यास त्याचा नियमानुसार विचार करण्यात यावा.

(२७) समांतर आरक्षण असल्यामुळे आरक्षणाचा अनुशेष पुढे नेता येणार नाही.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय व निमशासकीय कार्यालये, महामंडळे व अनुदानित संस्था यांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणून त्याचे योग्य प्रकारे पालन करण्याबाबत सूचना द्याव्यात.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती की, सदर शासन निर्णयातील सूचना व मार्गदर्शक तत्वे यांचा विचार करुन आवश्यकतेनुसार पदाच्या सेवाप्रवेश नियमात योग्य ती तरतूद करण्याची कार्यवाही त्वरित करावी.

४. हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**डॉ. ज. मो. फाटक**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**(शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि. ३०.४.२००५ चे सहपत्र)**

## परिशिष्ट-अ

### इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनद्वारे मान्यताप्राप्त खेळ

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आट्यापाट्या | १७ | रग्बी फुटबॉल |
| २ | बॉल बॅडमिंटन | १८ | सेपाक टकरा |
| ३ | बेसबॉल | १९ | सॉफ्ट टेनिस |
| ४ | बिलियर्ड ॲण्ड स्नुकर | २० | टेनिक्वाईट |
| ५ | बॉलिंग | २१ | थ्रोबॉल |
| ६ | ब्रिज | २२ | ट्रॅम्पोलिन |
| ७ | बॉडी बिल्डर्स | २३ | टग ऑफ वॉर |
| ८ | कॅरम | २४ | स्कूल गेम |
| ९ | सायकलपोलो | २५ | योगा |
| १० | कराटे | २६ | पॅरॉलॉपिक |
| ११ | मल्लखांब | २७ | ब्लाईंड स्पोर्टस् |
| १२ | मोटर स्पोर्टस् | | **विंटर गेम्स** |
| १३ | माऊंटेरिअरिंग | २८ | लग |
| १४ | पोलो | २९ | बॉबस्लिप |
| १५ | पॉवरलिफ्टिंग | ३० | बिएथलॉन |
| १६ | रोलर स्केटींग | ३१ | आईस हॉकी |

### महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनद्वारे मान्यताप्राप्त खेळ

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आर्चरी | १७ | ट्रायथलॉन |
| २ | ॲथलेटिक | १८ | व्हॉलीबॉल |
| ३ | ॲक्वटिक्क | १९ | वेटलिफ्टिंग |
| ४ | बॅडमिंटन | २० | रेस्टलिंग |
| ५ | बॉक्सिग | २१ | हॉकी |
| ६ | बास्केटबॉल | २२ | तायक्वांदो |
| ७ | सायकलिंग | २३ | फूटबॉल |
| ८ | जिम्नॅस्टिक | २४ | हॉकी |
| ९ | हॅण्डबॉल | | **असोसिएट मेंबर** |
| १० | ज्युडो | २५ | कॅनॉइंग ॲण्ड कयाकिंग |
| ११ | कबड्डी | २६ | मल्लखांब |
| १२ | खो-खो | २७ | फन्सिंग |
| १३ | लॉन टेनिस | २८ | कॅरम |
| १४ | रायफल | २९ | बॉडी बिल्डर्स |
| १५ | रोईंग | ३० | आट्यापाट्या |
| १६ | टेबल टेनिस | ३१ | स्केटींग |

### महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनद्वारे शिफारस केलेले खेळ

१ ब्रिज
२ चेस
३ क्रिकेट
४ गोल्फ
५ स्क्वॅश
६ सॉफ्टबॉल

## परिशिष्ट-ब

### खेळाडूंच्या कामगिरीची प्रमाणपत्रे प्रमाणित करणाऱ्यांची यादी

| अ.क्र. | स्पर्धेचा स्तर | प्रमाणपत्र देणारे प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | आंतरराष्ट्रीय स्पर्धा | संबंधित खेळाचे राष्ट्रीय फेडरेशनचे सचिव |
| २ | राष्ट्रीय स्पर्धा | संबंधित खेळांच्या राष्ट्रीय फेडरेशनचे सचिव अथवा संबंधित खेळांच्या राज्य संघटनेचे सचिव |

**ANNEXURE**

Proforma of the annual statement to be filled by each Mantralaya Department/Head of Department regarding recruitment of meritorious sportsmen. (Use separate forms for each group).

STATEMENT SHOWING..........OF SPORTSMEN APPOINTED TO GROUP A/B/C/D POSTS/SERVICES DURING THE YEAR ENDING 31ST DECEMBER 20---

| S. No. | Name of Mantralaya Deptt./Head of Deptt. | No. of Sportsmen appointed to Group - posts | | | Name of the game & No. appointed against each |
|---|---|---|---|---|---|
| | | In the Mantralaya Deptts. ( ) | In other Offices | Total | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

Category-wise breakup of the sportsmen appointed during the year mentioned in Col. 5.

1. Participation in International Competitions.
2. Participation in National Competitions.
3. Participation in Inter University Tournament.
4. Participation in National School Games Competitions.

( )

**Under Secretary (Administration)**

**Head of Department……**

<u>**ANNEXURE**</u>

## <u>F O R M - 1</u>

(Specimen forms for representing India in an International Competition in one of the recognised Games/Sports).

**NATIONAL FEDERATION/NATIONAL ASSOCIATION OF…..**

Certified to a meritorious sportsmen for employment to Group Service under the State Government.

Certified that Shri/Smt./Kumari…………………………………………………………………………. Son/Wife/Daughter of Shri……………………………………………………resident of …………………………………………………represented the country in the game/
(complete address)
event of ……………………………………………………competition/Tournament held at ………………………from………………………to……………………….

The Certificate is being given on the basis of record available in the office of National Federation / National Association of…………………………………………..

Place ……………………………. Signature……………………………..

Date ……………………………….. Name ………………………………..

Designation ………………………….

Name of the Federation / National Association …………………………..

Address…………………………….
Seal ………………………………….

**Note :-** This Certificate will be valid only when signed Personally by the Secretary, National Federation/ National Association.

**Attested by**
**The Authority of the Director**
**Of Sports & Youth Services**

# F O R M – 2

(for representing a State in India in a National Competition in one of the recognized Games/ Sports).

STATE ASSOCIATION OF …………………………………………..IN THE GAME OF……………………………………………………………………..

Certified to a meritorious sportsmen for employment to Group Service under the State Government.

Certified that Shri/Smt./Kumari…………………………………………………………………….. Son/Wife/Daughter of Shri……………………………………………………resident of …………………………………………………represented the State of …………… (complete address)
in the game/ event of …………………………………………………in the National competition/Tournament held at ………………………………………………………... from………………………to……………………….

The position obtained by the individual/team in the above said Competition/Tournament was …………………………………………………………..

The Certificate is being given on the basis of record available in the office of the State Association of…………………………………………..

Place ……………………………… Signature……………………………..

Date ……………………………….. Name ………………………………..
Designation …………………………

Name of the State Association …………………………..

Address…………………………….
Seal …………………………………..

**Note :-** This Certificate will be valid only when signed Personally by the Secretary of the State Association.

**Attested by**
**The Authority of the Director**
**Of Sports & Youth Services**

# F O R M – 3

(for representing a State School Team in the National Games for School in one of the recognised Games/ Sports).

Dirctorate of Sports & Youth Services of the State Maharashtra

Certified to a meritorious sportsmen for employment to Group Service under the State Government.

---------------

Certified that Shri/Smt./Kumari………………………………………………………………….. Son/Wife/Daughter of Shri……………………………………………………resident of ………………………………………………..Student of ………………………… represented the ……………………………………………………………State School Team in the game/event of ……………………………………………………...in the National Games for Schools held at………………………………………………….. From………………………. To ………………………

The position obtained by the individual/team in the above said Competition/Tournament was ……………………………………………………………..

The Certificate is being given on the basis of record available in the office of Directorate of Sports & Youth Services of Maharashtra.

Place ………………………………. Signature……………………………..

Date ……………………………….. Name ………………………………..

Designation ………………………….

Name of the Federation / National Association …………………………..

Address…………………………….

Seal ………………………………….

**Note :-** This Certificate will be valid only when signed Personally by the Director of Additional/Joint or Deputy Director in overall charge of Sports/Games/ for Schools in the Directorate of Sports & Youth Services of the State.

**The Authority of the Director**
**Of Sports & Youth Services**

**ANNEXURE**

**FORM – 4**

(for the awardees in NCC performances conducted
by the Ministry of Education & Social Welfare)

Government of India / Ministry of Education & Social Welfare

Certified to a meritorious N.C.C. men for employment to a Group Service under the State Government.

----------------

Certified that Shri/Smt./Kumari………………………………………………………………………….. Son/Wife/Daughter of Shri……………………………………………………resident of ……………………………………………….represented the ……………………. (complete address)
in the school game/ event of …………………………………………………...in at the National competition held at ……………………………………………………………..... from………………………to……………………….

The Certificate is being given on the basis of record available in the Ministry of Education & Social Welfare.

Place ……………………………. Signature…………………………...

Date …………………………….. Name ………………………………..
Designation ………………………….
Name of the Federation / National Association …………………………..
Address…………………………….
Seal ………………………………..

**Note :-** This Certificate will be valid only when signed Personally by the Secretary or other Officer in overall Charge of NCC in the Ministry of Education & Social Welfare.

**Attested by**
**The Authority of the Director**
**Of Sports & Youth Services**

**अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय / निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक-राक्रीधो २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे २
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१ जून, २००६

**वाचा :-** १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक राक्रीधो २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे २, दिनांक ३० एप्रिल, २००५.
२) संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांचे पत्र क्रमांक-आस्थाप/राक्रीधो/२००५/(९३)/का-१, दिनांक ११ ऑक्टोबर, २००५.

**शासन निर्णय :-** संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

या शासन निर्णयातील उप परिच्छेद ४ (क) मध्ये गट क व ड च्या आरक्षित पदावर नियुक्ती देण्याकरिता विहित केलेल्या क्रीडा विषयक अर्हतेमध्ये भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय, शालेय स्पर्धामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त करणाऱ्या किंवा सुवर्ण, रौप्य, कास्य पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंचा समावेश करण्यास याद्वारे शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

यासाठी संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांनी प्रमाणिक करावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडलेल्या फॉर्म ३ A प्रमाणे राहील.

२. या शासन निर्णयातील उप परिच्छेद ७ मध्ये सर्वसाधारण अटी व मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली आहेत. या उप परिच्छेद ७ मधील अनुक्रमांक २२ पुढीलप्रमाणे सुधारण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

"(२२) आरक्षण ठेवित असताना पदाची संख्या अपूर्णांकात आल्यास व ती ०.५० पेक्षा कमी आल्यास त्या प्रवर्गातील खेळाडूंकरिता आरक्षण निरंक राहील. मात्र, सदर आरक्षण ०.५० ते ०.९९ आल्यास सदर पद खेळाडूसाठी आरक्षित राहील.

**टिप :-** ५० टक्के अथवा त्यापेक्षा (५० ते ९९ टक्के अपूर्णांकाचा विचार करुन) एक पद वाढविल्यास आरक्षण ५२ टक्केपेक्षा जास्त होणार नाही, याची दक्षता घ्यावी."

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी अधिपत्याखालील शासकीय व निमशासकीय, महामंडळे व अनुदानित संस्था यांच्या निदर्शनास सदर सुधारणा आणावी व त्यानुसार कार्यवाही करण्याची सूचना द्याव्यात.

४. हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सतीश जोंधळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# FORM 3(A)

(for representing a State School Team in the School National Games/Tournament/Competition organized by the School Game Federation of India)

Directorate of Sports and Youth Services of the State of Maharashtra

Certificate to meritorious sportsmen for employment to Group C/D service under the State Government.

Certified that Shri/Smt/kumari …………………………………………………………..

Son/wife/Daughter of Shri ………………………………………………………………….

Resident of (complete address) ……………………………………………………………..

a student of (name of the school) ………………………………………………………..

represented the State School Team in the game/event of ……………………………………….

in the National Games for Schools held at ………………………………………………….

from to

The position obtained by the individual / team in the above said Competition / Tournament was

This Certificate is being given on the basis of record available in the office of Directorate of Sports and Youth Services of Maharashtra.

**Place** **signature**

**Date** **Name**

**Designation**

**Note :-** This certificate will be valid only when signed personally by the Director joint Director or Deputy Director of Sports and Youth Services. Government of Maharashtra State.

**अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय/निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक-राक्रीधो २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे २

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १८ नोव्हेंबर, २००६

**वाचा :-** १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक राक्रीधो २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे २, दिनांक ३० एप्रिल, २००५.

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- राक्रीधो २००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे २, दिनांक २१ जून, २००६.

**प्रस्तावना :-** संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्या शासन निर्णयानुसार गट "क" व "ड" च्या आरक्षित पदावर नियुक्ती देण्याकरिता विहित केलेल्या क्रीडा विषयक अर्हतेमध्ये काही स्पर्धा समाविष्ट केलेल्या आहेत. तथापि, भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील शालेय खेळ स्पर्धा तसेच भारतीय खेळ प्राधिकरण यांचेद्वारा आयोजित राज्य व राष्ट्रीय स्तरावरील ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा यांचाही समावेश या अर्हतेमध्ये करणे आवश्यक असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे सदर स्पर्धांचा समावेश गट-"क" व "ड" च्या अर्हतेमध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

याबाबत विधीमंडळाच्या जुलै, २००६ मध्ये झालेल्या पावसाळी अधिवेशनात चर्चा झाली होती. तसेच विधीमंडळाने मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती यासाठी नियुक्त केलेली आहे. सदर समितीच्या दिनांक १ नोव्हेंबर, २००६ रोजी झालेल्या बैठकीत या दृष्टीने सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील विविध आस्थापनामध्ये सुरु असणाऱ्या नोकर भरतीचा विचार करता ही सुधारणा तातडीने अंमलात आणणे आवश्यक आहे. यास्तव विधीमंडळ समितीने घेतलेला निर्णय व खेळाडूंच्या आरक्षणाबाबत प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय शासनाने घेतला आहे :-

शासन निर्णय :- शासन निर्णय दिनांक ३० एप्रिल, २००५ व दिनांक २१ जून, २००६ अन्वये गट "क" व "ड" च्या पदांसाठी निश्चित केलेल्या क्रीडा विषयक अर्हतेमध्ये खालील अर्हताही नव्याने समाविष्ट करण्यात यावी :-

अ) भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धातील प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कास्य पदक प्राप्त खेळाडू.

ब) भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रीडा स्पर्धातील प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कास्य पदक प्राप्त खेळाडू.

२. हा शासन निर्णय दिनांक २१ जून, २००६ पासून पूर्वलक्ष्मी प्रभावाने लागू करण्यात यावा.

३. हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**सतीश जोंधळे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय / निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : संक्रीआ-२००७/(प्र.क.३२९/०७)/क्रीयुसे-२,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ११ जुलै, २००८

**वाचा :-** (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे २, दिनांक ३० एप्रिल, २००५.

(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २१ जून, २००६.

(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ नोव्हेंबर, २००६.

(४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक - संक्रीआ-१००६/(प्र.क्र.१८२/०६)/क्रीयुसे-२, दिनांक ६ मे, २००८.

**प्रस्तावना :-** उच्चतम गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय / निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ टक्के आरक्षण ठेवण्याची तरतूद शासन निर्णय दिनांक ३० एप्रिल, २००५ अन्वये करण्यात आली आहे. या शासन निर्णयात आवश्यक सुधारणा दिनांक २१ जुलै, २००६, दिनांक १७ नोव्हेंबर, २००६ व दिनांक ६ मे, २००८ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आल्या आहेत. शासन निर्णय दिनांक ३० एप्रिल, २००५ च्या अनुक्रमांक-७ नुसार सर्वसाधारण अटी व मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. यातील अनुक्रमांक-७ (१०) ते ७ (१२) नुसार खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमिलेयअर) खेळाडू सदस्यांना आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नाही. खुल्या प्रवर्गातील खेळाडूला क्रिमिलेयरमध्ये मोडत नसल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य ठरविले आहे. हे प्रमाणपत्र कोणत्या अधिकाऱ्याने द्यावे याबाबत सुस्पष्ट आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** खेळाडू आरक्षणातंर्गत खुल्या प्रवर्गातील खेळाडूंना क्रिमिलेयर प्रमाणपत्र देण्यासाठी सक्षम प्राधिकारी शासनाने निश्चित केले आहे. त्यानुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती, "ब", "क" व "ड" त्याचप्रमाणे इतर मागासवर्ग तसेच विशेष मागास यांचेबाबतीत क्रिमिलेअरमध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र ज्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून दिले जाते त्याच सक्षम प्राधिकाऱ्याकडून, खेळाडूंचे समांतर आरक्षणाची अंमलबजावणी करण्याकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत क्रिमिलेअरमध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे असा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. या शासन निर्णयातील तरतूदी, निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

३. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-१००८/७५/१६-अ, दिनांक ९.४.२००८ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक-२००८०७१११३१७३९००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतीश जोंधळे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : खेआस-२०१०/(प्र.क.२७२/१०)/क्रीयुसे-२,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ९ डिसेंबर, २०१०

**वाचा :-** वाचा शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००२/(प्र.क्र.६८)/ क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल, २००५.

**प्रस्तावना :-** अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे त्यांच्या कारकिर्दीत शिक्षणाकडे अंशत : दुर्लक्ष होते. यामुळे त्यांच्या भविष्यातील नोकरीची जबाबदारी राज्याने घेणे गरजेचे असते. याच भूमिकेतून राज्य शासनाने उपरोक्त दिनांक ३० एप्रिल, २००५ च्या शासन निर्णयानुसार शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये खेळाडूंसाठी ५ टक्के समांतर खेळाडू आरक्षण ठेवले आहे. यानुसार आतापर्यन्त गट-अ (१), गट-ब (८), गट-क (५१२) व गट-ड (१०५) अशा एकूण सुमारे ६२६ खेळाडूंना विविध आस्थापनावर नोकरी मिळाली आहे.

या शासन निर्णयातील ३ (ड) नुसार राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या खेळाडूला थेट नियुक्ती देण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत. या तरतूदीआधारे यापूर्वी वर्ग-१ पदावर एक व वर्ग-३ पदावर तीन खेळाडूंना शासनाने थेट नियुक्ती दिली आहे. सर्वसाधारणतः "गट-अ" पदांच्या सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार सरळसेवेची पदे राज्य लोकसेवा आयोगाकडून भरली जातात. प्रचलित सेवाप्रवेश तरतूदीनुसार अशा पदांवर थेट खेळाडूंची नियुक्ती करता येत नाही.

प्रचलित धोरणातील ३ (ड) मधील तरतूदीनुसार राज्याचे नाव उज्ज्वल होईल अशी कामगिरी करणाऱ्या खेळाडूला शैक्षणिक व वयाची अट शिथिल करुन नियुक्ती देण्याचे अधिकार शासनास असले तरी "राज्याचे नाव उज्ज्वल करणारी कामगिरी" याची स्पष्टता खेळाडू आरक्षण धोरणात करण्यात आलेली नाही. त्यामुळे वरील प्रमाणे प्राप्त मागण्यांवर निर्णय घेताना शासन स्तरावर संःदिग्धता येत आहे. याशिवाय राज्य लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदावर नियुक्ती करताना सदर पद आयोगाच्या कक्षेतून वगळणे व इतर प्रक्रियेस कालावधी लागत असल्याने खेळाडूंची नियुक्ती प्रक्रिया योग्य गतीने होत नाही. या सर्व बाबींसाठी विहित कार्यपध्दती ठरविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता व त्याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय :** खेळाडूंकडून शासन सेवेत थेट नियुक्ती मिळण्यासाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही होण्याच्या दृष्टीने सदर प्रस्तावांची गुणवत्तेवर छाननी करुन शिफारस करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुख्य सचिव | : | अध्यक्ष |
| २. | अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | : | सदस्य |
| ३. | अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | : | सदस्य |
| ४. | संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य | : | सदस्य |
| ५. | सह / उप सचिव, क्रीडा विभाग | : | सदस्य सचिव |

याशिवाय  खेळाडूने क्रीडा विभागाखेरीज इतर विभागात थेट नियुक्तीची मागणी केल्यास त्या विभागाचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांना या समितीच्या बैठकीस निमंत्रित करण्यात यावे.

२. मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उपरोक्त समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने अंतिम शिफारस करण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) मा. मुख्यमंत्री | - | अध्यक्ष |
| २) मा. उपमुख्यमंत्री | - | उपाध्यक्ष |
| ३) मा. मंत्री (क्रीडा) | - | सदस्य |
| ४) संबंधित विभागाचे मा. मंत्री | - | सदस्य |
| ५) मा. राज्यमंत्री (क्रीडा) | - | सदस्य |

३. शासनातील विविध मान्यवरांकडे प्राप्त होणाऱ्या अर्जांवर / शिफारशींवर पुढील प्रमाणे कार्यवाही समिती व संबंधित विभागाने करावी :-

(अ) खेळाडूने मागणी केलेल्या पदाच्या उपलब्धतेबाबत (रिक्त पद, प्रवर्गनिहाय आरक्षण, इत्यादी) संबंधित विभागाने प्रथमतः तपासणी करावी त्यानंतर खेळाडूची शैक्षणिक / तांत्रिक अर्हता ही, मागणी केलेल्या पदाच्या जबाबदाऱ्या किमान स्तरावर निभावताना उपयोगात येऊ शकते काय याचीही विभागाने तपासणी करावी. विभागाने अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून कार्यालयीन कामकाजाच्या १५ दिवसात ही तपासणी पूर्ण करावी.

(ब) वरील "अ" प्रमाणे तपासणी झाल्यावर सदर विभागाने ही संपूर्ण कागदपत्रे आपल्या अहवालासह संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्याकडे कार्यालयीन कामकाजाच्या पुढील ८ दिवसात पाठवावीत.

(क) संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांनी प्राप्त प्रस्तावातील क्रीडा कामगिरीची सविस्तर तपासणी, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून कार्यालयीन कामकाजाच्या १५ दिवसात करावी व त्यानंतरच्या ८ कार्यालयीन दिवसात हा प्रस्ताव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांना सादर करावा.

(ड) मंत्रालय स्तरावर शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने असे प्रस्ताव एकत्रित करावेत. याबाबत समितीची प्रत्येक दोन महिन्यात किमान एक बैठक व्हावी. याशिवाय समितीचे अध्यक्ष यांनी निश्चित केल्यास अतिरिक्त बैठकीचे आयोजनही करता येईल.

या समितीने सदर खेळाडूची क्रीडा कामगिरी, अर्हता व मागणी केलेल्या पदाची किमान अर्हता याचा एकत्रित विचार करुन त्याला सदर पदावर नियुक्त करण्याबाबत अनुकूल / प्रतिकूल अशी स्पष्ट शिफारस करावी. प्रकरणनिहाय या खेळाडूने मागणी केलेल्या पदापेक्षा इतर समकक्ष अथवा कनिष्ठ पदावर नियुक्तीबाबत अभिप्रायही समिती देऊ शकेल. समितीच्या बैठकीचे इतिवृत्त बैठकीनंतर एक आठवड्यात मान्य व्हावे.

(इ) मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी अंतिम शिफारशीसाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर ठेवाव्यात व या समितीच्या बैठकीचे इतिवृत्त पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागास पाठवावे.

(फ) मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेनंतर गट- "क" व "ड" मधील नियुक्तीबाबत पुढील कार्यवाही संबंधित विभागाने यथाशीर्घ दोन आठवड्यात करावी. नवीन पदनिर्मिती असल्यास त्याचा प्रस्ताव एक आठवड्यात शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक १०

सप्टेंबर, २००१ नुसार संबंधित विभागाने वित्त विभागास या प्रस्तावावर मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दोन आठवड्याच्या आत प्राथम्याने निर्णय घ्यावा.

(ह) समितीच्या शिफारशीनंतर खेळाडूंची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील गट- "अ" व "ब" मधील पदावर, लोकसेवा आयोगाचा सल्ला न घेता थेट नियुक्ती करावयाची झाल्यास त्यासाठी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव न घेता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने निर्णय घेऊन संबंधित खेळाडूला गट- "अ" व "ब" मधील पदावर थेट नियुक्ती देण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१०१२१०१८३०५४००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कि.शां.परब**
**अवर सचिव, महाराष्ट्र**

**राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी विहित केलेल्या कार्यपद्धतीमध्ये अतिरिक्त तरतूदींचा समावेश करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : खेआस-२०११/(प्र.क.६/११)/क्रीयुसे-२,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २१ मे, २०११

**वाचा :-** (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००२/(प्र.क्र.६८)/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल, २००५.

(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-खेआस-२०१०/(प्र.क्र.२७२/१०)/क्रीयुसे-२, दिनांक ९ डिसेंबर, २०१०.

**प्रस्तावना :-** राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबतची कार्यपद्धती उपरोक्त अनुक्रमांक - २ वरील दिनांक ९ डिसेंबर, २०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार खेळाडूंकडून शासन सेवेत थेट नियुक्ती मिळविण्यासाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची गुणवत्तेवर छाननी करुन शिफारस करण्यासाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यासंबंधात काही बाबी सुस्पष्ट होण्याच्या दृष्टीने काही अतिरिक्त तरतुदी करण्याची केलेली शिफारस शासनाच्या विचाराधीन होती व त्याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**:शासन निर्णय :** राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यासंबंधात काही बाबी सुस्पष्ट होण्याच्या दृष्टीने मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेले आहेत :-

**(१)** "राज्याचे नाव उज्ज्वल करणारी कामगिरी" म्हणजे कोणती कामगिरी हे स्पष्ट होण्याच्या दृष्टीने खालील अधिकृत स्पर्धामध्ये पदक प्राप्त केलेल्या खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी विचार करण्यात यावा :-

(अ) गट - "अ" नियुक्तीसाठी :- (१) ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, (२) जागतिक क्रीडा स्पर्धा, (३) एशियन गेम्स स्पर्धा, (४) कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धा.

(ब) गट - "ब" नियुक्तीसाठी :- (१) आशियाई चॅम्पियनशीप स्पर्धा, (२) ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशीप स्पर्धा, (३) युथ ऑलिम्पिक (४) कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धा.

**(२)** खेळाडूने संबंधित स्पर्धेनंतर ६ महिन्यात थेट नियुक्तीसाठी अर्ज करणे आवश्यक राहील.

**(३)** खेळाडूंच्या करावयाच्या थेट नियुक्त्या ह्या उपरोक्त अनुक्रमांक - १ येथील दिनांक ३० एप्रिल, २००५ च्या शासन निर्णयानुसार शासन सेवेत खेळाडूंना नियुक्ती देण्यासाठी विहित केलेल्या ५ टक्के आरक्षणाच्या मर्यादेत राहतील.

**(२)** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळांवर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक - २०११०५२११५५२३२००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कि.शां.परब**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क.६८/क्रीयुसे-२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : ३० डिसेंबर, २०१३.

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि. ३० एप्रिल, २००५.

**प्रस्तावना :-**

शासकीय व निमशासकीय कार्यालयामधील गट अ, ब, क व ड संवर्गातील नामनिर्देशनाने भरण्यात येणाऱ्या पदांपैकी ५% पदे विशेष कामगिरी बजावणाऱ्या स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी संदर्भाधीन दि. ३० एप्रिल, २००५ च्या शासन निर्णयानुसार आरक्षित ठेवण्यात आली आहेत. सदर निर्णयातील तरतुदीनुसार खेळाडूंची प्रमाणपत्र तपासण्याची कार्यवाही क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून करण्यात येते.

इंडियन ऑलंपिक असोसिएशन यांनी त्यांच्या ११ जुलै, २०११ च्या पत्रान्वये ३१ राष्ट्रीय संघटनांची मान्यता दि. ११ फेब्रुवारी, २०११ पासून काढली आहे. तथापि सदर बाब संबंधित राष्ट्रीय व राज्य संघटनांनी शासनाच्या व खेळाडूंच्या निदर्शनास आणून दिली नाही. परिणामी खेळाडू सदर संघटनेने फेब्रुवारी २०११ नंतर आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्पर्धेमध्ये सहभागी झाले व त्यामध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंनी नोकरीसाठी ५ टक्के खेळाडू आरक्षणातंर्गत अर्ज देखील केले. सदर खेळाडूंची प्रमाणपत्रे त्या-त्या विभागामार्फत क्रीडा संचालनालयाकडे तपासणीसाठी प्राप्त झाली असता क्रीडा संचालनालयाने मान्यता काढून घेतल्याची बाब त्यांच्या वेळीच निदर्शनास न आल्यामुळे दि. ३० एप्रिल, २००५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तपासून निर्णय दिले.

२. संघटनेची मान्यता काढून घेतल्याची बाब क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या फेब्रुवारी २०१३ मध्ये निदर्शनास आली. त्यामुळे संचालनालयाने त्यानंतर प्राप्त झालेल्या प्रमाणपत्रांची तपासणी दि. ३० एप्रिल, २००५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करुन निर्णय दिला. या प्रकारामुळे काही खेळाडूंची प्रमाणपत्रे उपरोक्त बाब निदर्शनास येण्यापूर्वी वैध ठरविण्यात आली. तर उपरोक्त बाब निदर्शनास आल्यानंतर ज्या खेळांच्या राष्ट्रीय संघटनेची मान्यता इंडियन ऑलंपिक असोसिएशने काढून टाकली त्या खेळांच्या स्पर्धांची खेळाडूंची प्रमाणपत्रे अवैध असल्याबाबतचे संबंधित कार्यालयांना कळविण्यात आले. परिणामी संबंधित खेळाडूंना त्या विभागामध्ये नोकरी मिळू शकत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. संघटनांची मान्यता काढल्याची बाब राष्ट्रीय राज्य संघटनांनी शासनाच्या व खेळाडूंच्याही निदर्शनास न आणली गेल्यामुळे खेळाडू सदर संघटनांनी आयोजित केलेल्या फेब्रुवारी २०११ नंतरच्या स्पर्धेत सहभाग घेत राहीले. परिणामी काही खेळाडू नोकरीसाठी पात्र ठरले, तर काही खेळाडू नोकरीसाठी अपात्र ठरल्यामुळे विसंगत परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामध्ये खेळाडूंचा तसेच शासनाचाही दोष नसून संघटनांच्या कृतीमुळे सदर परिस्थिती निर्माण झाली आहे.

३. त्यामुळे खेळाडूंचे नुकसान होवू नये म्हणून व त्यांचे हित जपावे या दृष्टीने सध्या निर्माण झालेल्या परिस्थितीवर उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती:-

**शासन निर्णय :-**

इंडियन ऑलंपिक असोसिएशन यांनी त्यांच्या ११ जुलै २०११ च्या पत्रान्वये ३१ राष्ट्रीय संघटनांच्या काढलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने दि. ३० एप्रिल २००५ च्या शासन निर्णयातील खेळांच्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे:-

अ) इंडियन ऑलंपिक असोसिएशनने मान्यता काढलेल्या संघटनेने फेब्रुवारी २०११ नंतरच्या आयोजित केलेल्या स्पर्धामध्ये प्राविण्य मिळविलेल्या ज्या खेळाडूंची प्रमाणपत्रे मान्यता नसल्याच्या कारणास्तव दि. ३१ डिसेंबर २०१३ पर्यंत अवैध ठरविण्यात आली आहेत त्या खेळाडूंना संघटनांना मान्यता नसल्याची बाब अवगत नसल्यामुळे त्या खेळाडूंच्या बाबतीत ज्या विभागात त्यांची निवड झालेली होती त्या विभागाने जर सदर प्रमाणपत्र दि. २८ फेब्रुवारी २०१४ पर्यंत पुनर्तपासणीसाठी क्रीडा संचालनालयास पाठविली तर त्याची क्रीडा संचालनालयाने त्यांना इंडियन ऑलंपिक असोसिएशनची मान्यता आहे असे गृहीत धरुन पुनर्तपासणी करुन द्यावी. मात्र दि. १ मार्च २०१४ पासून खेळाडूंच्या प्रमाणपत्रांची पुनर्तपासणी करण्यात येणार नाही.

ब) तथापि, दि. १ जानेवारी २०१४ नंतर होणाऱ्या नोकर भरती प्रक्रीयेतील ५ टक्के आरक्षणाअंतर्गत निवड झालेल्या खेळाडूंचे संबंधित विभागाकडून खेळाडूंचे प्रमाणपत्र तपासणीसाठी अर्ज क्रीडा संचालनालयास नव्याने प्राप्त होतील त्या अर्जांच्या बाबतीत दि. ३० एप्रिल २००५ च्या शासन निर्णयानुसार जी इंडियन ऑलंपिक असोसिएशनच्या मान्यतेची तरतूद आहे ती लागू राहील.

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने वेळोवेळी अधिकृत स्पर्धा व संघटनांची अदययावत माहीती त्यांच्या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्याची दक्षता घ्यावी.

क) वरील प्रश्न हा संबंधित राष्ट्रीय व राज्य संघटनांनी इंडियन ऑलंपिक असोसिएशनची मान्यतेची बाब उघड न केल्यामुळे उद्भवला आहे. तसेच त्या संघटनाकडून खेळाडूंना मान्यता नसतांना अद्यापही इंडियन ऑलंपिक असोसिएशनची मान्यता असल्याबाबत प्रमाणपत्रावर उल्लेख करुन खेळाडूंना प्रमाणपत्र देवून त्यांची व शासनाची फसवणूक करीत असल्यामुळे त्या संघटनांची महाराष्ट्र शासनाने दिलेली मान्यता का रद्द करण्यात येवू नये या बाबतची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी जर सदर प्राप्त खुलासा असमाधानकारक वाटल्यास त्या संबंधित राज्य संघटनेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. तसेच यापुढे प्रमाणपत्रावर इंडियन ऑलंपिक असोसिएशनची मान्यता असल्याचे नमूद करु नये, अशा सूचना संबंधित संघटनांना आयुक्त क्रीडा व युवक सेवा यांनी दयाव्यात.

ड) उपरोक्त बाब भविष्यात परत उद्भवू नये याकरीता खेळाडूंनी ते सहभागी होणार असलेल्या खेळाच्या स्पर्धेची व संघटनेची अधिकृतता असल्याबाबतची खातरजमा करणे ही त्यांची जबाबदारी राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१२३०१७१६४९३०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**कि.शां.परब**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# [४]

# सेवेमध्ये प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त यांचेसाठी समांतर आरक्षण

**Preference for employment on Irriga - tion Project Establishments to the project affected persons.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

Revenue Forests Department
Resolution No. PRA – 1071/177785/R-1
Sachivalaya, Bombay 32 BR.
Dated the 20th November, 1973

**RESOLUTION :** In Government Circular, General Administration Department No. PRA-1071/177785/R-1, dated the 28th January 1971, it was laid down that preference to the project affected persons including their dependents for the purpose of appointment to subordinate posts on Project Establishments concerned should be shown with due regard to the relevant recruitment rules as regard age limit, educational qualifications. It was also directed that the project affected persons should register their names with the Local Employment Exchange in order to avail themselves of the concession for appointment to subordinate posts on the project establishment concerned on priority basis.

2. Government has reconsidered the question regarding preference for employment to the shown to the project affected persons and is pleased to direct that project affected persons should be given the highest priority for employment in the Irrigation project establishment without having to register themselves with the Employment Exchanges. However, whenever a project affected person is appointed directly the vacancy in which he is appointed by the Project authorities to the Employment Exchange in compliance with the provisions of Employment Exchange (compulsary Notification of Vacancies) Act, 1959. These orders are issued in consultation with the Industries and Labour Department.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**Under Secretary to the Government of Maharashtra,**
**Revenue and Forests Department.**

**Employment of Project Affected Persons –**
**Grant of concessions for the Purpose of –**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

General Administration Department
Resolution No. SRV-1078/PAP/XII
Mantralaya, Bombay-400 032, 22nd September 1978

**READ :** Government Resolution, Revenue and Forests Department, No. RPA-1071/1777785/R-1, dated the 20th November 1973.

**RESOLUTION: -** In order to rehabilitate the Project Affected Persons, Government has issued orders of giving highest priority for employment in the Irrigation project Establishment to the Project Affected Persons and their dependents. In Practice however, it is observed that this has not helped them to any appreciable extend. The question of giving the Project Affected Persons and their dependents further concessions to overcome the difficulties experienced by them in securing employment under Government was under consideration. Government is pleased to accord the following concessions to the Project Affected Persons and their dependents in regard to employment to posts in Government offices situated outside Greater Bombay.

(1) In respect of those project affected persons whose houses are sub-merged under the project or who lose 75% of their land for the project, the upper age limit for entry into Government Service should be relaxed by 3 years.

(2) The period spent by a Project Affected Persons who fulfils the condition laid down in Para 1 (1) in temporary service under Government should be computed for calculating the upper age limit and the same should be further relaxed by the quantum of this period. When the Project Affected Person gets re-employed in another job, the time spent by him on temporary job with Government earlier should be counted for his subsequent service and the entire service should be treated as one without break.

2. The concessions mentioned in Para I above are admissible to those Project Affected Persons who produce a certificate in the prescribed form issued by the Resettlement Officer concerned on behalf of the Collector as provided in Government Circular, General Administration Department No. RPA-1569-R-1, dated the 14th January 1971.

3. In making appointments to Class-III and IV posts the appointing authorities should take into consideration the above concessions and give preference to these persons if they fulfill the other conditions of the relevant recruitment rules.

4. These orders will apply to recruitment to posts and services which are outside the purview of the Maharashtra Public Service Commission.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**C.A.SARANGDHAR,**
**Under Secretary to Government**

**प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ मधील भरतीबाबत प्राथम्यक्रम.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जानेवारी १९८०.

**संदर्भ :-** (१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-१०७१/१७७७८५/र-१, दिनांक २० नोव्हेंबर, १९७३.
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७८/आरएपी/१२, दिनांक २२ सप्टेंबर १९७८.

**निर्णय :-** शासनाच्या पुनर्वसनविषयक धोरणानुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांना शासकीय सेवा प्रवेशासाठी तारतम्य दाखवून नोकरीत पसंती देण्याबाबत सवलत देण्यात आली आहे. त्यानुसार अशा व्यक्तींनी त्यांची नावे सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदविलेली असतील आणि संबंधित शासकीय पदाबाबत असलेल्या भरतीच्या शर्ती पूर्ण केल्या असतील तर, शासकीय कार्यालयामधील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेर असलेल्या पदांवर नेमणूक करण्यासाठी त्यांना तारतम्याने पसंती देण्यात येते. शासन ठराव, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-१०७१/१७७७८५/र-१, दिनांक २० नोव्हेंबर, १९७३ मधील आदेशानुसार प्रकल्पग्रस्त व्यक्तींना पाटबंधारे प्रकल्पाच्या आस्थापनेवर भरतीसाठी "सर्वोच्च प्राथम्यक्रम" (Highest Priority) देण्यात येतो. त्यासाठी सेवायोजन कार्यालयात नावे नोंदविण्याची अट त्यांचेबाबतीत लागू करण्यात येत नाही. शासन ठराव, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७८/आरएपी/१२, दिनांक २२ सप्टेंबर, १९७८ द्वारा काढलेल्या आदेशाप्रमाणे बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयांतील पदांत भरतीबाबत ज्या प्रकल्पग्रस्तांची घरे किंवा ७५ टक्के शेतजमीन प्रकल्पग्रस्तासाठी संपादण्यात येते, त्यांच्या बाबतीत शासकीय सेवा भरतीसाठी असलेली कमाल वयोमर्यादा ३ वर्षांनी शिथिल करण्यात आली आहे. तसेच अशा प्रकल्पग्रस्तांची शासनामध्ये अस्थायी स्वरुपाची सेवा केली असेल तर, त्या अस्थायी सेवेचा कालावधी शासन प्रवेशासाठी असणारी कमाल वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी लक्षात घेण्यात येतो आणि सदर कमाल वयोमर्यादा अस्थायी सेवेच्या कालावधीने शिथिल करण्यात येते. प्रकल्पग्रस्तांना शासनाच्या सेवेत पुन्हा प्रवेश मिळाल्यावर त्यांच्या पूर्वीच्या अस्थायी सेवेचा कालावधी त्यांच्या शासन सेवेचा एकूण कालावधी निर्धारित करण्यासाठी ग्राह्य धरण्यात येतो व शासनामधील त्यांची सर्व सेवा अखंड असल्याचे मानण्यात येते.

**२.** प्रकल्पग्रस्तांना शासन सेवा प्रवेशासाठी दिलेल्या वरील सवलती व्यवहारामध्ये विशेष परिणामकारक होत नाहीत असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. पाटबंधारे प्रकल्पांच्या आस्थापनेवर दिलेल्या सर्वोच्च प्राथम्याखेरीज प्रकल्पग्रस्तांना इतर शासकीय कार्यालयांमध्ये सेवा प्रवेशासाठी प्राथम्यक्रम देण्यात आलेला नाही. परिणामत: शासकीय नोकरीसाठी प्रकल्पग्रस्तांना व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना तारतम्यपूर्वक दिलेल्या पसंतीच्या सवलतीचा फारसा उपयोग होत नाही. यामुळे शासकीय सेवा प्रवेशासाठी सर्वोच्च प्राथम्यक्रम मिळावा अशी मागणी प्रकल्पग्रस्तांकडून बऱ्याच काळापासून करण्यात येत आहे. राज्याच्या विकासाकरिता शासनाने हाती घेतलेल्या विविध प्रकल्पांमुळे प्रकल्पग्रस्तांना स्थलांतर करावे लागते आणि इतरत्र नवीन जीवनक्रम सुरु करावा लागतो आणि त्या अनुषंगाने अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. या त्यांच्या त्यागाची जाणीव ठेवून त्यांना शासनाने दिलेली नोकरीविषयक सवलत प्रत्यक्षात परिणामकारक व फलदायी ठरावी आणि पुनर्वसनाच्या

कार्यवाहीमध्ये त्यांना सहाय्य व्हावे म्हणून त्यांना शासकीय सेवा प्रवेशासाठी निश्चित प्राथम्यक्रम देणे आवश्यक आहे असे शासनाला वाटते. यासाठी शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**(अ)** शासनाने हाती घेतलेल्या पाटबंधारे प्रकल्पासह सर्व प्रकल्पांच्या बाबतीत, त्या प्रकल्पांना महाराष्ट्र प्रकल्प विस्थापितांचे पुनर्वसन कायदा, १९७६ लागू केला आहे किंवा नाही हे लक्षात न घेता, त्यांच्या आस्थापनेवरील तृतीय व चतुर्थ श्रेणीतील पदांवर नेमणूक करण्यासाठी प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना "सर्वोच्च प्राथम्यक्रम" देण्यात यावा. यासाठी सेवायोजन कार्यालय किंवा राज्य निवड मंडळ यांच्याकडे संदर्भ करण्याची आवश्यकता नाही. मात्र या सवलतीची अंमलबजावणी करताना प्रकल्पग्रस्त कुटुंबातील फक्त एका व्यक्तीस तिचा फायदा मिळावा. या संदर्भात खालील परिच्छेद (५) मधील तरतुदही लक्षात घेण्यात यावी. हा आदेश निघण्यापूर्वी ज्या प्रकल्पग्रस्त व्यक्तींना व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना पाटबंधारे प्रकल्प आस्थापनेवर, तसेच इतरही प्रकल्प आस्थापनेवर नोकरी देण्यात आली असेल, त्यांच्या कुटुंबात उपरोक्त प्रकल्प आस्थापनेवर नोकरी मिळालेल्या व्यक्तींची संख्या लक्षात न घेता ते नेमणुकीच्या वेळी राज्य निवड मंडळामार्फत नेमले गेले नसले तरी, त्यांना या आदेशांचा फायदा देण्यात यावा.

**(ब)** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७९/६६/१६-अ, दिनांक २७ एप्रिल १९७९ द्वारा शासन सेवा, शासन पुरस्कृत महामंडळे, शासनाकडून मदत करण्यात येणारी महामंडळे, शासनाने चालविलेल्या संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाकडे आहे अशा इतर सर्व ॲथॉरिटीज, सेवा व संस्था यांमध्ये आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांमधील व्यक्तींसाठी शासनाने आधीच राखून ठेवलेल्या ८० टक्के जागा भरताना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांत मोडणाऱ्या प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना "सर्वोच्च प्राथम्यक्रम" देण्यात यावा. मागासवर्गीयांच्या विविध घटकवर्गासाठी राखून ठेवलेल्या ३४ टक्के जागा भरुन झाल्यावर हा प्राथम्यक्रम अंमलात यावा आणि हा सर्वोच्च प्राथम्यक्रम एकूण जागांच्या किमान ५ टक्के पर्यन्त देण्यात यावा. एखादी प्रकल्पग्रस्त व्यक्ती अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ वा इतर मागासवर्गीय गटात मोडत असेल तर, त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या उपरोक्त ३४ टक्के जागा भरताना ती प्रकल्पग्रस्त व्यक्ती वरीलपैकी ज्या विशिष्ट गटात मोडत असेल तर त्या विशिष्ट गटासाठी राखून ठेवलेल्या जागेनुसार तिला सर्वोच्च प्राथम्यक्रम देण्यात यावा. प्रकल्पग्रस्त व्यक्ती वरील कोणत्याही गटात मोडत नसेल परंतु, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकात मोडत असेल तर, तिला ८० टक्के जागांमधील (३४ टक्के जागा वगळता) उरलेल्या जागा भरताना "सर्वोच्च प्राथम्यक्रम" देण्यात यावा.

**(क)** उपरोक्त नोकरीविषयक सवलतीच्या संदर्भात "केंद्र शासन किंवा राज्य शासन यांनी हाती घेतलेल्या पाटबंधार, वीज अथवा इतर कोणत्याही प्रकल्पामुळे ज्या व्यक्तींचे घर आणि/अथवा जमीन पूर्णतः किंवा अंशतः संपादण्यात आली असेल"अशा व्यक्तींना "प्रकल्पग्रस्त व्यक्ती" मानण्यात यावे. या संदर्भात त्या व्यक्तीचे घर आणि/अथवा जमीन पूर्णतः किंवा अंशतः ज्या प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली असेल तो प्रकल्प "महाराष्ट्र प्रकल्प विस्थापितांचे पुनर्वसन कायदा, १९७६" खाली अधिसूचित झाला आहे किंवा नाही हे लक्षात घेण्याची आवश्यकता नाही. तसेच नोकरीविषयक संदर्भात प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील व्यक्ती व अशा प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती म्हणून प्रकल्पग्रस्त व्यक्तीचा पती अथवा अशा व्यक्तीची पत्नी, अशा व्यक्तीचे अज्ञान मुलगे, अशा व्यक्तींच्या अविवाहित मुली, अशा व्यक्तींचे अज्ञान भाऊ किंवा बहिणी, तसेच अशा व्यक्तीचे आई व वडील या व्यक्तींचा समावेश ग्राह्य धरावा. या निर्णयानुसार शासन पत्र, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-१०७४/३५००/र-१, दिनांक २० मार्च, १९७५ मध्ये दिलेल्या "प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती" या संज्ञेच्या व्याख्येत आवश्यक बदल करण्यात यावा.

**(ड)** संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या वतीने संबंधित पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेल्या दाखल्याच्या आधारे एखादी व्यक्ती "प्रकल्पग्रस्त व्यक्ती" किंवा "प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती" आहे असे ठरविण्यात यावे. प्रस्तुत दाखल्याचा नमुना सोबत जोडला आहे. हा दाखला फक्त प्रकल्पग्रस्त व्यक्तीला देण्यात यावा आणि त्याचा उपयोग तिच्या कुटुंबातील फक्त एकाच व्यक्तीस करता यावा. या संदर्भात खालील परिच्छेद (इ) मधील तरतुदही लक्षात घेण्यात यावी. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला वरीलप्रमाणे नोकरी मिळाल्यानंतर सदर दाखल्याची नोकरीविषयक परिणामकारकता रद्द करण्यात यावी. तथापि सदर दाखलाधारक व्यक्तीला पुनर्वसन योजनेखालील इतर विविध सवलतींच्या बाबतीत अशा दाखल्याची आवश्यकता असल्यास, तो दाखला वापरण्याची मुभा देण्यात यावी. प्रकल्पग्रस्त व्यक्तीला किंवा तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला सदर दाखल्याच्या आधारे नोकरी दिल्यानंतर नोकरी दिल्याबाबतची माहिती संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे, तसेच संबंधित जिल्ह्याच्या सेवायोजन कार्यालयाकडे पाठविण्याबाबत सर्व शासकीय कार्यालयांना आदेश देण्यात यावेत.

**(इ)** ज्या प्रकल्पासाठी भूसंपादनाची कार्यवाही १ जून १९६५ पूर्वी सुरु करण्यात आली, त्यामुळे ज्या व्यक्ती प्रकल्पग्रस्त झाल्या, अशा प्रकल्पग्रस्त व्यक्तींच्या कुटुंबातील जास्तीत जास्त दोन व्यक्तींना वरील "सर्वोच्च प्राथम्यक्रम" चा लाभ देण्यात यावा.

**३.** वरील आदेश महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेर असलेल्या पदांवरील भरतीसाठी लागू आहेत.

**४.** हे आदेश महसूल व वन विभागाच्या संमतीने काढण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. ना. बटब्याल**
**शासनाचे सचिव, महाराष्ट्र शासन**

# <u>प्र प त्र</u>

(शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग कमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१ जानेवारी १९८० चे सहपत्र)

**प्रकल्पग्रस्त व्यक्तीला अथवा प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला नोकरीविषयक सवलतींच्या संदर्भात द्यावयाच्या दाखल्याचा नमुना**

जिल्हाधिकारी कार्यालय (पुनर्वसन शाखा),

------------------------------------ प्रकल्प

------------------------------------- जिल्हा

दिनांक :

(१) दाखला देण्यात येतो की, श्री. / श्रीमती / कुमारी ------------------------------------ (प्रकल्पग्रस्त व्यक्तीचे संपूर्ण नाव) -----------------------------यांचे ------------------------------------- (गावाचे नाव) ----------------------- (तालुक्याचे नाव) ------------------------------ (जिल्ह्याचे नाव) येथील सर्व्हे क्रमांक ------------------------ मधील -------------------- (हेक्टर आर ) शेतजमीन -------------- --------------------------------- (प्रकल्पाचे नाव) ------------------ प्रकल्पासाठी संपादन केली असल्यामुळे/ करण्यात येत असल्यामुळे ते/त्या/ती प्रकल्पग्रस्त व्यक्ती आहे/ आहेत.

**आणि / अथवा**

(२) दाखला देण्यात येतो की, श्री./श्रीमती/कुमारी ------------------------------------------------ (प्रकल्पग्रस्त व्यक्तीचे संपूर्ण नाव) ------------------------------------- यांचे --------------------------- (गावाचे नाव) ---------------------------- (तालुक्याचे नाव) ------------------------------------------ (जिल्ह्याचे नाव) ----------------------------------- येथील घर / घरे ------------------------------------ (प्रकल्पाचे नाव) ---------------------------------------- प्रकल्पासाठी संपादन केली असल्यामुळे/करण्यात येत असल्यामुळे ते/त्या/ती प्रकल्पग्रस्त व्यक्ती आहे/आहेत.

(३) दाखला देण्यात येतो की, श्री/श्रीमती/कुमारी --------------------------------- (हे/ह्या/ही उपरोक्त परिच्छेद १/२) मधील प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील आणि तिच्यावर अवलंबून असणारी व्यक्ती असून तिचे प्रकल्पग्रस्त व्यक्तीशी नाते पती/पत्नी/अज्ञान मुलगा/अविवाहित मुलगी/अज्ञान भाऊ/अज्ञान बहिण/आई/वडील असे आहे.

(४) शासनाच्या पुनर्वसन योजनेअंतर्गत सदर प्रकल्पग्रस्त व्यक्तीला किंवा तिच्या कुटुंबातील आणि तिच्यावर अवलंबून असणाऱ्या उपरोक्त <u>एकच व्यक्तीला नोकरी मिळण्याच्या संदर्भात</u> सदर दाखला परिणामकारक राहील. ज्या प्रकल्पासाठी भूसंपादनाची कार्यवाही दिनांक १ जून १९६५ पूर्वी सुरु करण्यात आली असल्यामुळे ज्या व्यक्ती प्रकल्पग्रस्त झाल्या अशा प्रत्येक प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबातील जास्तीत जास्त दोन व्यक्तींना शासकीय कार्यालयात नियमानुसार नोकरी मिळेपर्यंत सदर दाखला परिणामकारक राहील. वरीलप्रमाणे संबंधित व्यक्तीला नोकरी मिळाल्यावर या दाखल्याची परिणामकारकता रद्द होईल.

(५) ह्या दाखल्याच्या आधारे प्रकल्पग्रस्त व्यक्ती किंवा तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला/जास्तीत जास्त दोन व्यक्तींना/नोकरी देण्याची कार्यवाही करणाऱ्या कार्यालयाने नोकरी दिल्याबाबत तपशील खालील जिल्हाधिकाऱ्यांकडे/पुनर्वसन अधिकाऱ्यांकडे तात्काळ कळविणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी -----------------------------------------------
जिल्ह्याचे नाव ------------------------------------------
जिल्हा पुनर्वसन आधिकारी ------------------------------
जिल्हाधिकारी -----------------------------------------
(जिल्ह्याचे नाव) ---------------------------- यांचेकरिता.

**टीप. -** वरील दाखल्याच्या परिच्छेद (१) व (२) मध्ये नमूद केलेल्या शेतजमिनीबाबत किंवा/आणि घरांबाबत भूसंपादन कायद्याच्या कलम ४ अनुसार काढण्यात आलेली अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात ज्या तारखेस प्रसिद्ध केली जाईल, त्या तारखेपासून सदर दाखला परिणामकारी होईल.

--------------

**महाराष्ट्र शासन,**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र. एसआरव्ही/१०९४/१००४/प्र.क्र.३०/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १७ नोव्हेंबर, १९९४.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईएस-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१.१.८०.

२) (इंग्रजी) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही/१०८०/५६३/१५६/ १६-अ, दि. १.१२.८०.

३) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक : आरपीए/१०९०/३३१४/प्र.क्र.३४१/र-१, दिनांक २५.७.९१.

मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार शासन सेवेत नियुक्तीसाठी आरक्षणाबाबत विचार करताना भूंकपग्रस्त व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याबाबतही विचार करण्यात आला. त्यावेळी शासनाने असा निर्णय घेतला की, यापुढे प्रकल्पग्रस्ताखालील आरक्षणात भूंकपग्रस्तही समाविष्ट होतील.

प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या आरक्षणामध्ये प्रकल्पग्रस्तांबरोबरच भूंकपग्रस्तही समाविष्ट करावयाचे ठरले आहे. त्यानुसार यापुढे प्रकल्पग्रस्तांसाठी आलेल्या ५ टक्के आरक्षणामध्ये भूंकपग्रस्तांनाही आरक्षणाची सवलत देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**अ. रा. साळवी**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**शासन सेवेत नियुक्तीसाठी प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या ५% आरक्षणामध्ये भूकंपग्रस्तांचा समावेश करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग.
क्रमांक : ईक्यूआर १०९४ /प्र.क्र.७६८भूपुक-१
मंत्रालय- मुंबई-४०० ३२
दि. ९ ऑगस्ट, १९९५

**वाचा** :-शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही १०९४/प्र.क्र. ३०/१६-अ, दिनांक १७ नोव्हेंबर १९९४.

**शासन निर्णय** :

दिनांक १७ नोव्हेंबर १९९४ च्या उपयुक्त शासन निर्णयान्वये शासन सेवेत नियुक्तीसाठी महाराष्ट्र राज्यातील विविध प्रकल्पग्रस्त व्यक्तीसाठी असलेल्या ५% आरक्षणामध्ये राज्यातील भूकंपग्रस्त व्यक्तींचा समावेश करण्यात यावा असा निर्णय शासनानने घेतला असून भूकंपग्रस्तांना आरक्षणाचा लाभ देण्यासंदर्भात आवश्यक ते संनियंत्रण जिल्हाधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल. जिल्हाधिका-यांनी खालील मार्गदर्शक बाबींच्या आधीन राहून प्रकरणे तपासावी व निर्णय घ्यावा.

अ) भूकंपग्रस्तांची व्याख्या :- भूकंपग्रस्तांच्या बाबतीत व्यक्तीगत विचार न करता कुटुंबाचा विचार करण्यात येऊन भूकंपग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरीविषयी सवलत देण्यात यावी. भूकंपग्रस्त कुटुंब ठरविताना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१) लातुर व उस्मानाबाद जिल्हयातील जी ५२ गावे पुर्णपणे उध्दवस्त झाली आहेत त्यातील कुटुंबे,
२) ज्यांची घरे पूर्णतः उध्दवस्त झाली आहेत,
३) ज्यांच्या व्यवसायांची जागा अथवा व्यवसाय पूर्णपणे उध्दवस्त झाले असल्याने जगण्याचे साधन नष्ट झले आहे.

ब) भूकंपग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबाची व्याख्या :- महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ च्या कलम ६ (सी) मध्ये दर्शविल्याप्रमाणे कुटुंबामध्ये पती/पत्नी/मुलगा व अविवाहित मुलगी, कुटुंबात राहणारे व कुटुंबप्रमुखावर अवलंबून असणारे भाऊ व बहिण,नातु आणि सून यांचा समावेश होतो.

क) भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात भूकंपग्रस्त असल्याचा दाखला देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांच्याकडे राहील.

ड) प्रकल्पग्रस्त व्यक्ती व भूकंपग्रस्त व्यक्ती यास संयुक्तपणे ५% जागा आरक्षित केल्यामुळे या दोहोपैकी एकास नेमणूक द्यावयाची झाल्यास भूकंपग्रस्त व्यक्तीस प्राधान्य द्यावे. तथापि प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होऊ नये, यासाठी या आरक्षणांची उपलब्ध ५ जागांपैकी ३ जागा भूकंपग्रस्त व २ जागांवर प्रकल्पग्रस्त या प्रमाणात नियुक्त्या द्याव्यात.

इ) भूकंपग्रस्तांना प्रकल्पग्रस्तांप्रमाणेच शासन सेवेत "क" व "ड" गटातील पदावर नियुक्तीसाठी (लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) उच्च वयोमर्यदेत ३ वर्षे इतकी सूट देण्यात यावी. त्याच प्रमाणे प्रकल्पग्रस्तांसाठी प्रादेशिक निवडमंडळाच्या कक्षेतील ५% नेमणूका निवडमंडळाच्या कक्षेतून वगळण्यात आल्या आहेत. त्यामध्ये भूकंपग्रस्तांचाही समावेश करण्यात यावा.

फ) जिल्हाधिकारी यांच्याकडील प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षायादीमध्ये वेळोवेळी प्रमाणित होणा-या भूकंपग्रस्त व्यक्तींचा समावेश करण्यात येऊन नोकरी विषयक सवलतींसाठी प्रतिक्षायादीतील क्रमानुसार शिफारस करण्यात यावी व या नेमणूकीवर जिल्हाधिका-यांनी संनियंत्रण ठेवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ.प्र.पं.भिसे**
**कार्यासन अधिकारी,**
**भूकंप पुनर्वसन कक्ष**

**प्रकल्पग्रस्त व्यक्ती अथवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींच्या नेमणूका दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतून वगळण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक : प्रानि १२९६/प्र.क्र. १४९/९६/१३-अ, मंत्रालय- मुंबई-४०० ०३२

दि. ३ जानेवारी १९९७

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईएम /१०८०/३५/१६-अ, दिनांक २१-१-८०.

२) शासन परिपत्रक क्रमांक प्रानिमं. १२९०/प्र.क्र. ३८/९०/१३-अ, दिनांक १८ जून, १९९०

**<u>शासन परिपत्रक</u>** :

१. प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना शासन सेवा, शासन पुरस्कृत महामंडळे, शासनाकडून सहाय्य मिळणारी महामंडळे, शासनाने चालविलेल्या संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाकडे आहे अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांच्या आस्थापनेवरील गट- क व गट-ड मधील पदांवर नेमणूकीसाठी क्रमांक १ येथील संदर्भाधीन दिनांक २१-१-१९८० च्या शासन निर्णयानुसार सर्वोच्च प्राथम्यक्रम एकूण जागांच्या किमान ५% पर्यंत देण्यात यावा असे आदेश आहेत. संदर्भाधीन क्र. २ येथील दिनांक १८-६-१९९० च्या शासन परिपत्रकानुसार रिक्त पदांच्या ५% पर्यंतची पदे प्रकल्पग्रस्त व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात यावीत असे सूचित करण्यात आले आहे. शासनाच्या वरील दोन्ही आदेशातील वर नमूद केलेल्या तरतुदी परस्पर विसंगत असल्यामुळे प्रकल्पग्रस्तांची पदे भरण्यास अडचणी येतात असे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

२. शासन आता असे आदेश देत आहे की, प्राथम्यक्रमाने प्रकल्पग्रस्तांसाठी असलेली ५% पदे भरताना नियुक्ती प्राधिका-यांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एईएम १०८०/३५/१६-अ, दिनांक २१-१-८० मधील तरतुदी नुसार हा सर्वोच्च प्राथाम्यक्रम एकूण संवर्गबळाच्या किमान ५% पर्यन्त देण्यात यावा. सदर ५% पदे भरताना मागासवर्गीयांच्या आरक्षणाला बाधा येणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रकल्पग्रस्त व्यक्तीमधील मागास प्रवर्गातील व्यक्ती उपलब्ध असल्यास त्यास प्राधान्य देऊन त्या त्या प्रवर्गाच्या आरक्षित पदावर नियुक्ती करावी.

३. प्रकल्पग्रस्त व्यक्तींना प्राथम्यक्रम असलेल्या या ५% पदासाठी नियुक्ती प्राधिका-यांकडे परस्पर अर्ज करता येईल. तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षित नसलेल्या अशा पदासाठीही त्यांना निवड मंडळाकडे जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज करता येईल. मात्र निव मंडळाकडून करण्यात येणा-या उमेदवारांच्या निवडीमध्ये त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून प्राधान्य राहणारी नाही. तेथे त्यांना इतर उमेदवारांप्रमाणेच स्पर्धेतून निवड होऊन जावे लागेल.

४. नियुक्ती प्राधिका-यांनी मागणीपत्र पाठवितांना प्रकल्पग्रस्तासाठी राखीव असलेली ५% पदे वगळून निवड मंडळाकडे मागणीपत्र पाठवावे. तसेच त्यांच्याकडे परपर आलेल्या अर्जामधून प्रकल्पग्रस्त व्यक्ती अथवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींच्या नेमणूका करताना वरील आदेशाचे काळजीपूर्वक पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रकल्पग्रस्त व्यक्तींना शासकीय सेवेत गट-ड च्या पदावर नियुक्तीसाठी वयोमर्यादेत सूट देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : एईएम-१०९९/प्र.क्र.४७/९९/१६-अ,
मंत्रालय- मुंबई-४०० ०३२.दिनांक २४.२.२०००.

**वाचा :-** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही- १०७८/पीएपी/१२, दिनांक २२-९-७८.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१ जानेवारी, १९८०.

**शासन निर्णय**

प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयातील गट- क आणि गट -ड मधील पदांवर शासकीय सेवा भरतीसाठी असलेली कमाल वयोमर्यादा ३ वर्षांनी शिथिल करण्यात आली आहे. त्यामुळे बृहन्मुंबईतील गट-क व गट-ड च्या पदांवर प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्तींना वयोमर्यादेत तीन वर्षांची सवलत अनुज्ञेय नव्हती.

१. शासनाने विकासासाठी हाती घेतलेल्या विविध प्रकल्पासाठी जमीनधारक आपली जमीन, घर इत्यादी स्थावर मालमत्ता शासन स्वाधीन करुन कुटुंबासह अन्यत्र स्थलांतरित होतो. त्यामुळे या प्रकल्पाग्रस्तांना पुन्हा नवीन जीवनक्रम सुरु करावा लागतो. बृहन्मुंबईतील गट-क मधील बहुतांश पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे असून, गट-ड मधील पदे पूर्णतः नियुक्त प्राधिका-यांचे कक्षेतील पदे आहेत. प्रकल्पग्रस्तांना सेवाविषयक सवलती देण्याच्या शासनाच्या धोरणाचा आशय व उद्देश लक्षात घेता असा निर्णय घेण्यात येत आहे की, प्रकल्पग्रस्त वा त्यांच्यावर अवलंबून अवसणा-या व्यक्तींना गट-ड च्या पदांवर नियुक्ती देताना संदर्भाधिन क्र. १ च्या आदेशातील घSituated outside Greater Bombayङ हा मजकूर तसेच संदर्भाधिन क्र.२ च्या आदेशातील घ्बृहन्मुंबई बाहेरीलङ हा मजकूर वगळण्यात यावा. गट-क च्या पदावर नियुक्ती देताना दि. २२/९/७८ व २१/१/८० च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शैला तारगे पाटील,**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रकल्पग्रस्त अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांना शासकीय सेवेतील गट क आणि गट ड मधील पदांवर नियुक्ती देण्याबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : प्रकल्प-१०००/प्र.क्र.२७/२०००/१६-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १३ सप्टेंबर, २०००.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २१ जानेवारी, ८०.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:प्रानिमं-१२९०/प्र.क्र.३८/९०/१३-अ, दि. १८ जून, १९९०.
३) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक आरपीए-१०९३/प्र.क्र.१३९/र-१, दि.२२ सप्टेंबर, १९९३.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०९४/१००४/प्र.क्र.३०/१६-अ, दि. १७.११.९४.
५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रानिमं-१२९६/प्र.क्र.१४९/९६/१३-अ, दिनांक ३ जानेवारी, ९७.

**शासन परिपत्रक**

संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक-१ अनुसार, प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांना शासन सेवा व शासन पुरस्कृत महामंडळे, शासनाकडून सहाय्य मिळणारी महामंडळे, शासनाने चालविलेल्या संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांच्या आस्थापनेवरील गट क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारितील पदे वगळून) आणि गट ड मधील पदांवरील नेमणुकांसाठी एकूण जागांच्या किमान ५% पर्यन्त सर्वोच्च प्राथम्यक्रम देण्यात आला आहे. संदर्भाधीन क्रमांक ३ च्या शासन परिपत्रकान्वये प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्ती संबंधात कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. संदर्भाधीन क्रमांक ५ अनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्तींनी प्राथम्यक्रम असलेल्या या ५% पदांसाठी नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे परस्पर अर्ज करणे आवश्यक आहे.

**२.** प्रकल्पग्रस्त किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांना शासकीय सेवेत गट क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारितील पदे वगळून) व गट ड मधील पदांवर नियुक्ती देण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यांना असल्यामुळे या संबंधात जिल्हाधिकारी यांच्याकडे असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षा यादीतील ज्येष्ठतेनुसार नियुक्त्या दिल्या जात नाहीत, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे संदर्भीत शासन निर्णयांमध्ये अंशतः बदल करुन जिल्हाधिकारी आणि नियुक्ती प्राधिकारी यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१) जिल्हाधिकारी यांनी प्रकल्पग्रस्त उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करताना प्रकल्पग्रस्तांनी सादर केलेल्या प्रथम अर्जाच्या दिनांकानुसार ज्येष्ठता ठरवावी व त्यासाठी एक नोंदणी रजिस्टर ठेवावे.

२) यापुढे नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्त उमेदवाराच्या परस्पर नियुक्त्या करु नयेत. सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे रिक्त असलेल्या पदांपैकी प्रकल्पग्रस्तांमधून भरावयाच्या पदांसाठी मागासवर्गीयांच्या आरक्षणाला बाधा येणार नाही, याची दक्षता घेवून संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षा यादीतील उमेदवाराची मागणी पदांच्या सेवा प्रवेश नियमानुसार करावी.

३) जिल्हाधिकारी कार्यालयाने वरील सूचना क्र. २ नुसार प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या यादीतून आवश्यक उमेदवारांची ज्येष्ठतेनुसार शिफारस संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना करावी.

४) नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांना नियुक्ती दिल्यानंतर त्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयास कळवावे व संबंधित जिल्हाधिकारी यांनी या उमेदवारांची नावे प्रतिक्षा यादीतून वगळावीत.

**३.** नियुक्ती प्राधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षा यादीनुसार व सेवाप्रवेश नियमानुसार पात्र असलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत वरील सूचनांनुसार कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. दा. देशपांडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

\

**प्रकल्पग्रस्त अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांना शासकीय सेवेतील गट-क आणि गट-ड मधील पदांवर नियुक्ती देण्याबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक : प्रकल्प-२००१/१०९/प्र.क्र.१३/२००१/१६-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ एप्रिल २००१.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ दि. २१ जानेवारी, १९८०
२) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक : आरपीए-१०९३/प्र.क्र. १३९/र-१, दि. २२ स्प्टेंबर,१९९३
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक, एसआरव्ही-१०९४/१००४/प्र.क्र. ३०/१६-अ, दिनांक १७-११-१९९४.
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रानिमं-१२९६/प्र.क्र.१४९/९६/१३-अ, दि. ३ जानेवारी,१९९७
५) शासन परिपत्रक,क्रमांक पकल्प-१०००/प्र.क्र.२७/२०००/१६-अ, दि. १३ सप्टेंबर २०००

**शासन परिपत्रक**

उपरोल्लेखित दि. २१-१-८० च्या शासन निर्णयान्वये, प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांना शासन सेवा व शासन पुरस्कृत महामंडळे, शासनाकडून सहाय्य मिळणारी महामंडळे, शासनाने चालविलेल्या संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका,नगरपालिका आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांच्या आस्थापनेवरील गट-क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारितील पदे वगळून) आणि गट-ड मधील पदांवरील नेमणूकीमध्ये एकूण जागांच्या ५% पर्यंत सर्वोच्च प्राथम्यक्रम देण्यात आला आहे. दि. १७-११-९४ शासन निर्णयानुसार प्रकल्पग्रतांसाठी देण्यात आलेल्या ५% सर्वोच्च प्राथम्यात भूकंपग्रस्तांचाही समावेश करण्यात आला आहे. दि. ३-१-१९९७ च्या शासन परिपत्रकानुसार प्रकल्पग्रस्तांना नियुक्तीसंबंधात नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्याकडे आलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या परस्पर अर्जातून नियुक्त्या करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

२. प्रकल्पग्रस्त किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांना शासकीय सेवेत गट-क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारितील पदे वगळून) व गट-ड मधील पदांवर नियुक्ती देण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिका-यांना असल्यामुळे या संबंधात जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षा यादीतील ज्येष्ठतेनुसार नियुक्तया दिल्या जात नाहीत, असे शासनाच्या निदर्शनास आल्यामुळे दि. ३-१-९७ च्या शासन परिपत्रकामध्ये अंशतः बदल करुन यापुढे नियुक्ती प्राधिका-यांनी प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या परस्पर नियुक्त्या करु नयेत, अशा सूचना दि. १३-९-२००० च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. या परिपत्रकानुसार सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्याकडे रिक्त असलेल्या पदांपैकी प्रकल्पग्रस्तांमधून भरावयाच्या पदांसाठी मागासवर्गीयांच्या आरक्षणाला बाधा येणार नाही, याची दक्षता घेवून संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षा

यादीतील उमेदवारांची मागणी करावी. जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या यादीतून आवश्यक उमेदवारांची जेष्ठतेनुसार शिफारस संबंधित नियुक्ती प्राधिका-यांना करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

३. प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्यांबाबतच्या काही प्रकरणी नियुक्ती प्राधिका-यांकडून दि १३-९-२००० पूर्वी कार्यवाही सुरु असल्यामुळे या प्रकरणांबाबत दि. १३-९-२००० च्या परिपत्रकामघील आदेश लागू करावेत किंवा कसे हा प्रश्न शासनाच्या विचाराधील होता याबाबत शासन आता असे आदेश देत आहे की, ज्या प्रकल्पग्रस्तांनी दि. १३-९-२००० पूर्वी नियुक्ती प्राधिका-यांकडे नियुक्तीसाठी अर्ज केले असतील व त्यावेळी सर्वोच्च प्राथम्यक्रमानुसार पद/पदे रिक्त असतील व नियुक्ती प्राधिका-यांनी प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्यासंबंधात दि. १३-९-२००० पूर्वी कार्यवाही सुरु केली असेल अशा प्रकरणांमध्ये सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दि. १३-९-२००० मधील सूचना लागू होणार नाहीत. अशा प्रकरणी दि. ३-१-९७ च्या परिपत्रकामधील सूचनांनुसार नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्याकडे प्रकल्पग्रस्तांकडून परस्पर आलेल्या अर्जातून नियुक्तीबाबत कार्यवाही करावी. उर्वरित प्रकरणी तसेच दि. १३-९-२००० किंवा त्यानंतर प्रकल्पग्रस्तांकडून आलेल्या अर्जातून करावयाच्या नियुक्त्यांबाबत शासन परिपत्रक दि. १३-९-२००० मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.

४. जिल्हाधिकारी कार्यालयात प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या प्रतिक्षायादीतील जेष्ठतेसंबंधीची माहिती मिळावी म्हणून प्रकल्पग्रस्तांच्या जेष्ठता सूचीची अद्ययावत प्रत सूचना फलकावर सुयोग्य ठिकाणी लावावी. तसेच नियुक्ती प्राधिका-यांकडून आलेली उमेदवारांची मागणी व जिहाधिका-यांनी त्यांच्याकडे कळविलेली उमेदवारांची नांवे किंवा याबाबत करण्यात येत असलेली कार्यवाही या संबंधची अद्ययावत महितीही जिल्हाधिकारी कार्यालयात सूचना फलकावर लावण्यात यावी. हे आदेश वित्त विभागाच्या दि. २९-६-२००० च्या शासन निर्णयाच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत. रिक्त पद असले तरी ते पद भरण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी असल्याशिवाय त्या पदावर प्रकल्पग्रस्तांची नेमणूक होऊ नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. दा. देशपांडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रकल्पग्रस्त व्यक्ती अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांना शासकीय सेवेतील गट-क आणि गट-ड मधील पदांवर सर्वोच्च प्राथम्यक्रमानुसार नियुक्ती देण्यासंबंधीच्या आदेशांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत--**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : प्रकल्प.१००२/मु.स. १४२/प्र.क्र. २४/२००२/१६-अ,
मंत्रालय- मुंबई-४०० ३२
दि. २०-३-२००२

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईएम /१०८०/३५/१६-अ, दिनांक २१-१-८०.
२) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. आरपीए-१०९३/प्र.क्र. १३९/र-१, दिनांक २२ सप्टेंबर १९९३.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९४/१००४/ प्र. क्र. ३०/१६-अ, दि.१७-११-९४.
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रनिमं-१२९६/प्र.क्र.१४९/९६/१३-अ, दि. ३-१-१९९७.
५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रकल्प-१०००/प्र.क्र.२७/२०००/१६अ, दि.१३-९-२०००.
६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रकल्प-१००१/१०९/प्र.क्र. १३/०१/१६-अ, दि. ७-०४-२००१

## शासन परिपत्रक

उपरोल्लेखित दि. २१-१-८० च्या शासन निर्णयान्वे, प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांना शासन सेवा व शासन पुरस्कृत महामंडळे, शासनाकडून सहाय्य मिळणारी महामंडळे, शासनाने चालविलेल्या संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांच्या आस्थापनेवरील गट क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारितील पदे वगळून) आणि गट-ड मधील पदांवरील नेमणूकीमध्ये एकूण जागांच्या ५% पर्यन्त सर्वोच्च प्राथम्यक्रम देण्यात आला आहे. दिनांक १७-११-९४ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांसाठी देण्यात आलेल्या ५% सर्वोच्च प्राथम्यात भूकंपग्रस्तांचाही समावेश करण्यात आला आहे.

२. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक दि. ३-१-१९९७ नुसार प्रकल्पग्रस्तांना नियुक्तीसंबंधात नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्याकडे आलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या परस्पर अर्जातून नियुक्त्या करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि प्रकल्पग्रस्तांना नियुक्ती देण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिका-यांना असल्यामुळे या संबंधात जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षा यादीतील ज्येष्ठतेनुसार नियुक्त्या दिल्या जात नाहीत, असे शासनाच्या निदर्शनास आल्यामुळे दि. ३-१-९७ च्या शासन परिपत्रकामध्ये अंशतः बदल करुन यापुढे नियुक्ती प्राधिका-यांनी प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या परस्पर नियुक्त्या करु नयेत, या नियुक्त्या जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षायादीतून उमेदवारांची ज्येष्ठतेनुसार नावे मागवून कराव्यात अशा सूचना

दि. १३-९-२००० च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दि. ७-४-२००१ अन्वये सूचना देण्यात आल्या की, ज्या प्रकल्पग्रस्तांनी दि. १३-९-२००० पूर्वी नियुक्ती प्राधिका-यांकडे अर्ज केले असतील, सर्वोच्च प्राथम्य क्रमानुसार पद रिक्त असेल व नियुक्ती प्राधिका-यांनी प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्तयांबाबत दि. १३-९-२००० पूर्वी कार्यवाही सुरु केली असेल, अशा प्रकरणी प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या शासन परिपत्रक दि.१३-९-२००० मध्ये दिलेल्या सूचनानुसार प्रतिक्षायादीतून जेष्ठतेने न करता शासन परिपत्रक दि. ३-१-१९९७ मधील सूचनांनुसार नियुक्ती प्राधिका-यांकडे परस्पर आलेल्या अर्जातून करावयात.

३. शासनाने प्रकल्पग्रस्तांनी विविध प्रकल्पासाठी शेतजमीन, घर, इत्यादिंबाबत केलेला त्याग विचारात घेऊन शासकीय सेवा, शासन पुरस्कृत महामंडळे,जिल्हा परिषदा,महानगरपालिका,नगरपालिका व ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे, अशा सेवा व संस्था यांच्या आस्थापनेतील सेवांमध्ये प्रकल्पग्रस्तांना नियुक्त्यांमध्ये सर्वोच्च प्राथम्य दिले आहे. या परिपत्रकाव्दारे सर्व नियुक्ती प्राधिका-यांना सूचना देण्यात येत आहेत की, प्रकल्पग्रस्तांसाठी विहित करण्यात आलेल्या सर्वोच्च प्राथम्य क्रमानुसार प्रकल्पग्रस्तांना नियुक्त्या देण्याच्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. दा. देशपांडे**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रकल्पग्रस्त अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांना शासकीय सेवेतील गट-क आणि गट-ड मधील पदांवर नियुक्ती देण्याबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक : पकल्प.१००१/१०९/प्र.क्र. १५४/२००१/१६-अ,

मंत्रालय- मुंबई-४०० ०३२

दि. २३ ऑक्टोबर,२००२

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईएम /१०८०/३५/१६-अ, दिनांक २१-१-८०.

२) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. आरपीए-१०९३/प्र.क्र. १३९/र-१, दिनांक २२ सप्टेंबर १९९३.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९४/१००४/ प्र. क्र. ३०/१६-अ, दि.१७-११-९४.

४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रानिमं-१२९६/प्र.क्र.१४९/९६/१३-अ, दि. ३-१-१९९७.

५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रकल्प-१०००/प्र.क्र.२७/२०००/१६अ, दि.१३-९-२०००.

६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रकल्प-१००१/१०९/प्र.क्र. १३/०१/१६-अ, दि. ७-०४-२००१

**शासन परिपत्रक**

प्रकल्पग्रस्त किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांना शासकीय सेवेत गट-क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे वगळून) व गट-ड मधील पदांवर नियुक्ती देण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिका-यांना असल्यामुळे या संबंधात जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षा यादीतील जेष्ठतेनुसार नियुक्त्या दिल्या जात नाहीत, असे शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर दि. ३-१-९७ च्या शासन परिपत्रकामध्ये अंशतः बदल करुन नियुक्ती प्राधिका-यांनी प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या परस्पर नियुक्त्या करु नयेत, अशा सूचना दि. १३-९-२००० च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनुसार नियुक्ती प्राधिका-यांनी त्यांच्याकडे रिक्त असलेल्या पदांपैकी प्रकल्पग्रस्तांमधून भरावयाच्या पदांसाठी मागासवर्गीयांच्या आरक्षणाला बाधा येणार नाही, याची दक्षता घेवून संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रकल्पग्रस्तांच्या प्रतीक्षा यादीतील उमेदवाराची मागणी करावयाची असून, जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या प्रतीक्षा यादीतून आवश्यक उमेदवारांची जेष्ठतेनुसार शिफारस संबंधित नियुक्ती प्राधिका-यांना करावयाची आहे.

२. नियुक्ती प्राधिका-यांनी प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्तीसाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उमेदवारांची मागणी करावयाची आहे. तथापि काही नियुक्ती प्राधिकारी राज्य स्तरावर तसेच विभागीय स्तरावर असल्यामुळे या नियुक्ती प्राधिका-यांनी कोणत्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रकल्पग्रस्त उमेदवारांची नावे मागवावीत याबाबत काही कार्यालयाकडून विचारणा करण्यात आल्या होत्या. तसेच काही प्रकल्पग्रस्त व्यक्तींनी ते रहात असलेल्या जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रतीक्षा यादीतून दुस-या जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रतीक्षा यादीमध्ये नाव हस्तांतरीत करण्यास मान्यता द्यावी अशी विनंती केली होती. याबाबत विचारणा करुन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

अ) राज्य स्तरावरील व विभागीय स्तरावरील नियुक्ती प्राधिका-यांनी गट क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे वगळून) व गट ड मधील पदावर नियुक्त्या करताना विहित आदेशाव्दारे ते जी पध्दती अवलंबवितात (उदा. जाहिरात देणे, लेखी परीक्षा घेणे, मुलाखती घेणे इ.) तीच पध्दती प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्यांसाठी अवलंबवावी. यासाठी गुणवत्ता यादी तयार झाल्यावर नियुक्त्या करताना प्रकल्पग्रस्तांना शासनाने विहित केलेले सर्वोच्च प्राथम्य राहील याची खबरदारी घेण्यात यावी. राज्यातील कोणत्याही जिल्हयातील प्रकल्पग्रस्त उमेदवार नियुक्तीसाठी राज्य स्तरावरील कार्यालयामध्ये अर्ज करु शकतील. तथापि विभागीय स्तरावरील कार्यालयामध्ये नियुक्त्या करताना नियुक्ती प्राधिका-यांनी त्या विभागांतर्गत असलेल्या जिल्हयातील प्रकल्पग्रस्ताचाच विचार करावा. यासाठी विशिष्ट विभागांतर्गत असलेल्या जिल्हयातील प्रकल्पग्रस्तच संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे अर्ज करु शकतील.

ब) प्रकल्पग्रस्त व्यक्ती एका जिल्हयातून दुस-या जिल्हयात काहीना काही कारणाने स्थलांतरीत होणार असेल व या व्यक्तीची एका जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रतीक्षा यादीतून दुस-या जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रतीक्षा यादीत नाव हस्तांतरीत करण्याची करण्याची मागणी असेल तर त्या व्यक्तीचे नाव ज्या जिल्ह्यात हस्तांतरीत करावयाचे आहे त्या जिल्हयातील प्रतीक्षा यादीमध्ये शून्य जेष्ठतेवर (संबंधित व्यक्तींच्या अर्जाच्या दिनांकारोजी यादीमध्ये दर्शविलेल्या शेवटच्या अनुक्रमानंतर) नोंदविण्यात यावे. असे करतांना मूळ जिल्ह्याच्या यादीतील सदर प्रकल्पग्रस्तांचे नाव कमी करण्यात आले आहे याची खात्री करुन घ्यावी. मात्र प्रकल्पग्रस्तांस/ त्याच्या नामनिर्देशितास नोकरी मिळाल्यानंतर ही हस्तांतरणाची सवलत मिळणार नाही. नाव हस्तांरीत करण्यची सवलत फक्त एकदाच देण्यात यावी.

४. हे आदेश वित्त विभागाच्या पदनिर्मिती/पदभरती अतिरिक्त संवर्ग कक्ष याबाबत दि. १०-९-२००१ रोजीच्या शासन निर्णयाच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत. तसेच हे आदेश या परिपत्रकाच्या दिनांकापासून लागूराहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. दा. देशपांडे**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रकल्पग्रस्तांना शासकीय / निमशासकीय सेवेत गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्ती देतांना उच्चतम वयोमर्यादा शिथिल करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : विसआ-१००१/६०/प्र.क्र.१३९/०१(भाग-१)/१६-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २००३.

**संदर्भ :-** १) सा.प्र.वि.शा.नि.,क्र.एसआरव्ही-१०७८/पीएपी/१२, दि. २२/९/१९७८.
२) सा.प्र.वि.शा.नि.,क्र.एइएम-१०८०/३५/१६-अ, दि. २१/१/१९८०.
३) सा.प्र.वि.शा.नि.,क्र. एसआरव्ही-१०९४/१००४/प्र.क्र.३०/१६-अ, दि. १७/११/९४.
४) सा.प्र.वि.शा.नि.,क्र.एइएम-१०९९/प्र.क्र.४७/९९/१६-अ, दि. २४/२/२०००.

**शासन निर्णय :-**

प्रकल्पग्रस्त किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांना बृहन्मुंबई बाहेरील शासकीय व निमशासकीय सेवांमधील गट-क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या देताना संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये उच्चतम वयोमर्यादा तीन वर्षांनी शिथिल करण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबईतील शासकीय व निमशासकीय कार्यालयातील गट-ड मधील पदांवरील प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्यांसाठीही ही सवलत देण्यात आली आहे. संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये नियुक्त्या देण्यासाठी एकूण संवर्ग बळाच्या ५% पदांवर सर्वोच्च प्राथम्य देण्यात आले असून संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या सर्वोच्च प्राथम्यक्रमात भूंकपग्रस्तांचाही समावेश करण्यात आला आहे.

२. प्रकल्पग्रस्तांना नियुक्त्यांच्या वेळी उच्चतम वयोमर्यादेत देण्यात आलेल्या शिथिलतेमध्ये वाढ करण्याच्या मागण्या तसेच विधीमंडळाच्या सन २००१ मधील दुसऱ्या अधिवेशनात विधानसभेत देण्यात आलेले आश्वासन यांचा विचार करुन सदर वयोमर्यादा आणखी शिथिल करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

३. शासन असे आदेश देत आहे की, प्रकल्पग्रस्त किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांच्या गट-क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या करताना उच्चतम वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३५ वर्षापर्यंत व मागासवर्गीयांसाठी ४० वर्षापर्यंत शिथिल करण्यात यावी.

४. हे आदेश शासकीय सेवा, शासकीय मंडळे, महामंडळे, महानगर पालिका, नगर पालिका, जिल्हा परिषदा आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा आधिकार राज्य शासनाला आहे, अशी इतर प्राधिकरणे, सेवा व संस्था यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील.

५. हे आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दे. त्र्यं. कुमावत**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रकल्पग्रस्त अथवा त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्ती यांना शासकीय सेवेतील गट-क आणि गट-ड मधील पदांवर नियुक्ती देण्याबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती..............................................**

**शासन आदेश रद्द करण्याविषयी.**

**महाराष्ट्र शासन.**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक,क्रमांक : न्याप-१००३/९९/ प्र.क्र. २/०३ / १६-अ,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : ५ एप्रिल २००५.

**पहा :- १)** शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : १००१/१०९/ प्र.क्र.१३/०१/१६-अ, दिनांक ७-४-२००१.

२) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करण्यात आलेली मूळ याचिका क्रमांक ७२०/०१ व क्रमांक ३७४/०२ यावर मा.न्यायाधिकरणाने दि. २३-१२-२००२ रोजी दिलेला न्यायनिर्णय.

३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र.संकिर्ण-१००३/प्र.क्र.९६/२००३/१३-अ, दिनांक १९-११-२००३

**प्रस्तावाना :-**

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करण्यात आलेली मूळ याचिका क्रमांक ७२०/०१ व क्रमांक ३७४/०२ यावर मा. न्यायाधिकरणाने दिनांक २३-१२-२००२ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयान्वये शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रकल्प १००१/१०९/ प्र.क्र.१३/२००१/ १६-अ, दिनांक ७-४-२००१ व शासन परिपत्रक क्र.प्रकल्प-१००२/मु.स. १४२/प्र.क्र. २४/०२/ १६-अ,दिनांक२०-३-२००२ रद्द करण्याविषयी निदेश दिले आहेत. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,दि.२-८-२००२ अन्वये शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दि. २०-३-२००२ चे अधिक्रमण करण्यात येऊन सुधारित आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, संकिर्ण १००३/प्र.क्र.९६/२००३/१३-अ,दिनांक १९-११-२००३ मध्ये नमूद केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २२-८-१९९६ च्या न्यायनिर्णयाचे उल्लघंन न होता शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रकल्प १००१/१०९/प्र. क्र. १३/ १६-अ, दिनांक ७-४-२००१ चे आदेश रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक प्रकल्प १००१/१०९/ प्र. क्र. १३/२००१, दिनांक ७-४-२००१ याव्दारे रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**र. ग. पवार**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रकल्पग्रस्तांना शासकीय/निमशासकीय सेवेत गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्ती देतांना उच्चतम वयोमर्यादा शिथिल करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय, क्रमांक प्रकल्प-१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ३ फेब्रुवारी, २००७.

**संदर्भ :** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-१०७८/पीएपी/१२, दि. २२.९.१९७८.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २१.१.१९८०.

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-१०९४/१००४/प्र.क्र.३०/१६-अ, दि. १७.११.९४.

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एईएम-१०९९/प्र.क्र.४७/९९/१६-अ, दि. २४.२.२०००.

५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक विसआ-१००१/६०/प्र.क्र.१३९/०१(भाग-१)/१६-अ, दि. ३०.५.२००३.

६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, कमांक एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१९/२००४/१२, दि. १७.८.०४.

७) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. न्याप्र. १००३/९९/प्र.२/०३ (भाग-२)/१६-अ, दि. २५.१०.०५.

**प्रस्तावना :-**

प्रकल्पग्रस्त किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांना बृहन्मुंबई बाहेरील शासकीय व निमशासकीय सेवांमधील गट-क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या देताना संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये उच्चतम वयोमर्यादा तीन वर्षांनी शिथिल करण्यात आली होती. तसेच संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबईतील शासकीय व निमशासकीय कार्यालयातील गट-ड मधील पदांवरील प्रकल्पग्रस्ताच्या नियुक्त्यांसाठीही ही सवलत देण्यात आली होती. संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये नियुक्त्या देण्यासाठी एकूण संवर्ग बळाच्या ५% पदांवर सर्वोच्च प्राथम्य देण्यात आले असून संदर्भाधीन क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या सर्वोच्च प्राथम्यक्रमात भूंकपग्रस्तांचाही समावेश करण्यात आला आहे. संदर्भाधीन क्र. ५ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय/निमशासकीय सेवेतील गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या देण्यासाठी उच्चतम वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३५ वर्षापर्यंत व मागासवर्गीयांसाठी ४० वर्षापर्यंत शिथिल करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. आता संदर्भाधीन क्र.६ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेतील प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्ष ठरविण्यात आली आहे. यामुळे प्रकल्पग्रस्तांना वयोमर्यादेत देण्यात आलेली शिथिलता अबाधित रहाणे अपेक्षित आहे. हे विचारात घेऊन शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

प्रकल्पग्रस्तांना शासकीय/निमशासकीय सेवेतील गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या देण्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षांपर्यंत शिथिलता देण्यात यावी. प्रकल्पग्रस्तांच्या आरक्षणामध्ये

भूंकपग्रस्ताचाही समावेश असल्याने सदर आदेश भूंकपग्रस्तांनाही लागू आहेत. सदर वयोमर्यादा सरसकट शिथिल केली असल्याने मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त उमेदवारांनाही ४५ वर्षापर्यंतचीच सवलत राहील.

संदर्भाधीन क्र.७ नुसार पदभरतीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने तसेच मा. प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार "शासनाने शासकीय सेवेत गट-क आणि गट-ड सेवाभरतीची एकत्रित मार्गदर्शक तत्वे शासन परिपत्रक क्र. न्याप्र. १००३/९९/प्र.२/०३(भाग-२)/१६-अ, दि. २५ ऑक्टोबर, २००५ अन्वये निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुसारच पदभरती करणे आवश्यक आहे."

हे आदेश शासकीय सेवा, शासकीय मंडळे, महामंडळे, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषदा आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे, अशी प्राधिकरणे,सेवा व संस्था यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील.

हे आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**परमेश्वर जकिकोरे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवेतील गट "क" आणि गट "ड" मधील पदांवर नियुक्ती देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक : न्यायप्र -१००८/७/प्र.क्र. ५८/०८/(भाग-२)१६-अ,

मंत्रालय- मुंबई-४०० ०३२. दि. १८, जुलै,२००८

**वाचा :-** १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : आरपीए -१०७१/१७७७८५/र-१, दिनांक २०-११-१९७३.

२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१-१-१९८०.

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रानिम- १२९६/प्र.क्र. १४९/९६/१३-अ दि.३-१-१९९७.

४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: प्रकल्प -१०००/प्र.क्र.२७/२०००/१६-अ, दि. १३-९-२०००.

५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रकल्प-१००१/ १०९/ प्र.क्र.१३/ २००१/ १६-अ, दि.७-४-२००१.

६) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रकल्प-१००२/मु.स. -१४२/प्र.क्र. २४/२००२/१६-अ, दि. २ ऑगस्ट २००२

७) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रकल्प-१००१/१०९/प्र.क्र. १५४/ २००१/१६-अ, दिनांक २३/१०/२००२.

८) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : विसआ-१००१/६०/प्र.क्र. १३९/०१/ (भाग-१) /१६-अ, दिनांक ३० मे,२००३.

९) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकिर्ण-१००३/प्र.क्र. ९६/०३/ /१३-अ, दिनांक १९/११/२००३,

१०) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : न्याप्र -१००३/९९/प्र.क्र. २/०३/१६-अ, दिनांक ५ एप्रिल २००५.

११) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही -२००५/प्र.क्र. ४७/०५/ १२, दिनांक २५ ऑगस्ट,२००५.

१२) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : न्याप्र-१००३/९९/प्र.क्र. २/०३/ (भाग-२) /१६-अ, दिनांक २५/१०/२००५.

**प्रस्तावना :-**

श्री. सुनिल एकनाथ पाटील ऊर्फ चौधरी, प्रकल्पग्रस्त यांनी, जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडून दिनांक १७/८/२००७ रोजी लिपिक-नि-टंकलेखक व तलाठी ही पदे भरण्यासाठी दिलेली जाहिरात रद्द करण्याबाबत व श्री. पाटील यांना जिल्हाधिकारी,जळगांव यांनी प्रकल्पग्रस्तांसाठी ठेवलेल्या जेष्ठता यादीनुसार प्रकल्पग्रस्त यांच्यासाठी असलेल्या ५% समांतर आरक्षण कोटयामधून नियुक्ती मिळणेबाबत विनंती केली होती. तसेच त्यांनी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनवर्सनासाठीचा सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ मधील कलम १० चा उपक्रम ६ मधील खंड (अ) व (ब) मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्तांसाठीच्या ५% पदांवर इतरांची नियुक्ती करण्यास प्रतिवादींना प्रतिबंध करण्यात यावा, अशीही विनंती मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्रमांक ७४७२/२००७ दाखल करुन केली होती. या याचिकेवर मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दि. ३१/३/२००८ रोजी आदेश दिलेले आहेत. सबब, आदेशांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**शासन परिपत्रक :-**

वर नमूद केलेल्या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या दिनांक ३१/३/२००८ रोजीच्या आदेशातील कार्यान्वयीन भाग सोबत जोडलेल्या परिशिष्ट- एक मध्ये दिलेला आहे. तो थोडक्यात खालील प्रमाणे आहे :-

अ) प्रकल्पग्रस्तांना ५% प्राथम्य कोटा ठेवला असल्यामुळे त्यांनी जाहिरातीला अनुसरुन खुल्या बाजारातील उमेदवारांप्रमाणे अर्ज करण्याची अयावश्यकता नाही आणि खुल्या बाजारातील उमेदवारांशी स्पर्धा करण्याचीही आवश्यकता नाही. त्यांची जेष्ठतेप्रमाणे नियुक्ती करण्यात यावी.

ब) दिनांक १७/८/२००७ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन प्रतिवादींनी प्रकल्पग्रस्तांशी संबंधित भरती केली असल्यास ती भरती रद्दबातल ठरविण्यात येत आहे.

क) मा.उच्च न्यायालयाचा निर्णय मा. मुख्य सचिव यांना सादर करुन महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तिंचे पुनवर्सनासाठीचा सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १० चा उपकलम ६ मधील खंड (अ) व (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व नियुक्ती प्राधिका-यांना खालील प्रमाणे निदेश देण्यात यावेत :-

१) प्रत्येक विभागांतर्गत सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी वर्ग-३ व वर्ग-४ (गट-क व गट-ड) (अतांत्रिक) च्या संवर्गाची एकूण संख्या निर्धारित करावी. त्यापैकी प्राथम्यक्रमानुसार प्रकल्पग्रस्तांसाठी किती पदे उपलब्ध होतात व त्यापैकी किती पदे रिक्त राहिली आहेत हे निश्चित करावे.

२) प्रकल्पग्रस्तांसाठी निश्चित केलेल्या व त्यापैकी रिक्त असलेल्या पदांवर प्रकल्पग्रस्तांची नियुक्ती करण्यासाठी सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी जिल्हाधिकारी/पुनर्वसन अधिकारी यांचेकडे नोंदणी झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या नावांची जेष्ठतेनुसार यादी मागवावी आणि जे प्रकल्पग्रस्त उमेदवार नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र ठरतात त्यांचे जेष्ठता यादीनुसार नियुक्तीचे योग्य ते आदेश निर्गमित करावेत. नियुक्तीचे आदेश काढताना सामाजिक आरक्षणाचा योग्य विचार करुन संबंधित आरक्षित प्रवर्गाच्या रिक्त पदावर त्या प्रवर्गातील जेष्ठता यादीनुसार पहिल्या क्रमांकाच्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराची नियुक्ती करावी.

३) आता येथून पुढे प्रकल्पग्रस्तांसाठीची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात देण्याची गरज नाही. प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूका शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व जिल्हाधिकारी /पुनवर्सन अधिकारी यांनी प्रकल्पग्रस्तांच्या ठेवलेल्या जेष्ठता यादीनुसार काटेकोरपणे परंतु कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेशिवाय करण्यात याव्यात.

४) प्रकल्पग्रस्तांसाठीची रिक्त पदे निश्चित करणे व ती भरण्याची कार्यवाही राज्यातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी आदेशाच्या म्हणजेच दिनांक ३१/३/२००८ पासून १८ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करावी.

प्रचलित याचिकेमध्ये वादी नसलेले राज्यातील सर्व प्रकल्पग्रस्त यांना सदर निर्णयातील निरीक्षणे व निर्देशांचा लाभ मिळेल.

वरील प्रमाणे मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या कराव्यात.

सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखलील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन परिपत्रकानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना तात्काळ द्याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०७१८१२४८२७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दि. रा. डिंगळे**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

We therefore, allow the writ petition although not strictly in term of prayer clauses.

(1) We uphold the contention advanced on behalf of the petitioner that so far as appointments of PAPs to 5% priority quota, they are not required to apply, as if open market candidates; in response to an advertisement nor they are not required to compete with open market candidates. They are also not required to compete between themselves and ordinarily they should be appointed in order of seniority. The only occasion for making and exception would be for observation of compartmentalised. reservations e.g. if there are 10 posts in a department for PAPs category and 5 posts are already filled in by open category and therefore, there are vacancies only of reserved category, open category PAP in the wait list will have to make a room for candidate below him of reserved category.

(2) The recruitment, if any, carried out by the respondents pursuant to advertisement dated 17-8-2007, so for as it relates to PAOs category, must be held vitiated and quashed.

(3) In the light of view taken by us as above, it is desirable to direct learned A.G.P. to place a copy of this judgement before the Chief Secretary of the state for appropriate directions to all appointing authorities referred in causes (a) and (b) of sub-section (6) of section 10 of Ac t XI of 2001. They should be directed to :

(i) Take an assessment of total cadre strength in Class III and Class IV ( Class 'C' and 'D') (non technical) of each Departments, find out how many seats are available to PAPs as 'priority quota' and how many are vacant.

(ii) For vacancies indentified, all the appointing authorities should ask for the names of PAP candidates registered with Collector/ Resettlement officer, who are eligible for appointment as per rules (by giving due consideration to social reservations i.e. to vacancies of reserved category, the first candidate from that category in the seniority list should be sponsored) and issue appropriate appointment orders to such candidates sponsored from seniority list.

(iii) Now onwards there should be no need to advertise the vacancies available for PAPs and appointments of PAPs should be carried out strictly in accordance with the instructions so far issued by the Government from time to time, i.e. strictly from the seniority list maintained by Collector/ Resettlement Officer on verifying the eligibility according to rules for the post and without any competitive examination.

(iv) The exercise of identifying the vacancies and filling those, all over the State with all appointing authorities, should be completed within a period of 18 months from today.

(4) Needless to say that benefit of observations and directions in this judgement should be available to all the PAPs irrespective of the fact that they are not present petition.

(5) Rule made absolute accordingly.

**भूंकपग्रस्त व्यक्तींना, प्रकल्पग्रस्त व्यक्तींप्रमाणे शासकीय सेवेतील गट च्क छआणि गट च्डछमधील पदांवर नियुक्ती देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : भूकंप -१००८/प्र.क्र. १४५/२००८/१६-अ,
मंत्रालय- मुंबई-४०० ०३२
दि. २७ ऑक्टोबर २००८.

**वाचा :-** १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : आरपीए -१०७१/१७७७८५/र-१, दि. २.११.१९७३..

२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २१.१.१९८०.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०९४/ १००४/ प्र.क्र. ३०/९४/१६-अ,दि. १७.११.१९९४.

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः इक्यूआर-१०९४/प्र.क्र.७६८/ भूपुक -१, दि. ९.८.१९९५.

५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रानिम- १२९६/प्र.क्र.१४९/ ९६/१३ दि.३.१.१९९७.

६) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रकल्प-१०००/प्र. क्र.२७/२०००/१६-अ दि. १३.९.२०००.

७) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रकल्प-१००१/१०९/प्र.क्र. १३/ २००१/१६-अ, दि. ७.४.२००१.

८) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रकल्प-१००२/मुस१४२/प्र.क्र. २४/ २००२/१६-अ, दि. २.८.२००२.

९) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रकल्प-१००१/१०९/प्र.क्र.१५४/२००१/ १६-अ, दि. २३.१०.२००२,

१०) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : विसआ-१००१/६०/प्र.क्र. १३९/०१/ (भाग-१) १६-अ, दि. ३०.५.२००३.

११) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण -१००३/प्र.क्र. ९६/०३/१३-अ दि. १९.११.२००३.

१२) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : न्याप्र-१००३/९९/प्र.क्र. २/०३/१६-अ दि. ५.४.२००५.

१३) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/ १२, दिनांक २५.८.२००५,

१४) शासन परिपत्रक़, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : न्याप्र-१००३/९९/प्र.क्र.२/०३/ (भाग-२) १६-अ, दिनांक २५.१०.२००५.

१५) शासन परिपत्रक़, क्रमांक : न्यायप्र-१००८/७/प्र.क्र. ५८/०८/ (भाग-२)१६-अ, दिनांक १८.७.२००८.

**प्रस्तावना :-**

वरील संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णय, दिनांक १७-११-१९९४ अन्वये प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या आरक्षणामध्ये प्रकल्पग्रस्तांबरोबरच भूकंपग्रस्तांनाही समाविष्ट केले असून प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या ५ टक्के आरक्षणामध्ये भूकपंग्रस्तांनाही आरक्षणाची सवलत देण्यात आली आहे. तदनंतर संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णय, महसूल व वन विभाग,दि. ९-८-१९९५ अन्वये च्प्रकल्पग्रस्त व्यक्ती व भूकपंग्रस्त व्यक्ती यास संयुक्तपणे ५ टक्के जागा आरक्षित केल्यामुळे या दोहोपैकी एकास नेमणूक द्यावयाची झाल्यास भूकंपग्रस्त व्यक्तीस प्राधान्य द्यावे. तथापि, प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होऊ नये यासाठी आरक्षणाची उपलब्ध ५ जागापैकी ३ जागा भूकपंग्रस्त व २ जागांवर प्रकल्पग्रस्त याप्रमाणात नियुक्त्या द्याव्यात,छअसे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सदर शासन निर्णयान्वये असेही स्पष्ट करण्यात आले आहे की, जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षा यादीमध्ये वेळोवेळी प्रमाणित होणा-या भूकंपग्रस्त व्यक्तीचा समावेश करण्यात येऊन नोकरीविषयक सवलतीसाठी प्रतिक्षा यादीतील क्रमानुसार शिफारस करण्यात यावी व या नेमणूकीवर जिल्हाधिका-यांनी संनियंत्रण ठेवावे.

वरील संदर्भ क्रमांक १५ येथील दिनांक १८-७-२००८ च्या शासन परिपत्रकान्वये च्मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी याचिका क्रमांक ७४७२/२००७ वर दि. ३१-३-२००८ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांना ५ टक्के प्राथम्य कोटा ठेवला असल्यामुळे त्यांनी जाहिरातीला अनुसरुन खुल्या बाजारातील उमेदवारांशी स्पर्धा करण्याचीही आवश्यकता नाही. त्यांची जेष्ठतेप्रमाणे नियुक्ती करण्यात यावीछ असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर परिपत्रकामध्ये भूकंपग्रस्तांच्या आरक्षणाबाबत स्पष्टता नसल्याने भूकंपग्रस्तांच्या पद भरतीबाबत अडचणी निर्माण झाल्या आहेत. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

प्रकल्पग्रस्तांना ५ टक्के प्राथम्य कोटा ठेवला असल्यामुळे त्यांनी जाहिरातीला अनुसरुन खुल्या बाजारातील उमेदवारांप्रमाणे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. भूकंपग्रस्तांच्या नियुक्त्या त्यांच्या जेष्ठतेप्रमाणे संदर्भाधीन क्रमांक १५ येथील शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, दि. १८-७-२००८ मधील निर्देशानुसार करण्यात याव्यात. जिल्हाधिकारी लातूर व उस्मानाबाद या दोन जिल्ह्यातच भूकंपग्रस्त नोंदणीकृत असल्याने नोंदणीकृत भूकंपग्रस्तांची जेष्ठता यादी जिल्हाधिकारी लातूर व उस्मानाबाद यांनी राज्यातील उर्वरित जिल्हयांचे जिल्हाधिकारी /नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सत्वर पाठवाावी.

सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय / निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना तात्काळ द्याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८१०२७१४४८०१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दि. रा. डिंगळे**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रकल्पग्रस्तांना असलेल्या ५% समांतर आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूंकपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २% समांतर आरक्षण लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : भूकंप -१००९/प्र.क्र. २०७/२००९/१६-अ, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२. दिनांक : २७ ऑगस्ट, २००९

**वाचा :-**१) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ, दिनांक २१.१.१९८०.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०९४/ १००४/ प्र. क्र. ३०/९४/१६-अ, दि. १७.११.१९९४.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : इक्यूआर-१०९४/प्र.क्र.७६८/ भूपुक -१, दि. ९.८.१९९५.

**प्रस्तावना :-**

वरील संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णय, दिनांक २१-१-१९८० अन्वये प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्तींना शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्ती देण्यासाठी एकूण जागांच्या किमान ५% जागांवर सर्वोच्च प्राथम्य देण्यात आलेले आहे.

संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णय दिनांक १७-११-१९९४ अन्वये प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या ५% समांतर आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांनाही आरक्षणाची सवलत देण्यात आलेली आहे. प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त यांना संयुक्तपणे ५% समांतर आरक्षण ठेवण्यात आल्याने उपलब्ध होणा-या ५ जागापैकी ३ जागांवर भूकंपग्रस्त व २ जागांवर प्रकल्पग्रस्त या प्रमाणात नियुक्त्या द्याव्यात असे आदेश संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णय दि. १-८-१९९५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी याचिका क्र. ५४५२/२००८ व ५२६६/२००८ यावर एकत्रितपणे सुनावणी घेऊन दि. २१-११-२००८ रोजी प्रकल्पग्रस्तांच्या ५% आरक्षणामध्ये भूकंपग्रस्तांचा समावेश करुन कोणतीही पद भरती करु नये असे अंतरिम आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना असलेले ५% समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून या समांतर आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे समांतर आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रकल्पग्रस्तांना असलेले ५ टक्के समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून या आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २% समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे.

सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना तात्काळ द्याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९०८२७१४३००९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दि. रा. डिंगळे**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

# [५]

# सेवेमध्ये महिलांकरीता समांतर आरक्षण

**शासकीय, निमशासकीय, व शासन अनुदानित संस्थामधील संस्थांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

नविन महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२

महिला प्रशासन भवन, ३ रा मजला,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक - २५.५.२००१.

**निर्णय :-** शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा दि. १ एप्रिल, १९९४ पासून राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सदर ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत परिशीष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयाद्वारे वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून महिलांच्या ३०%आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे एकत्रित आदेश देण्यात येत आहेत. हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी महिलांच्या ३०% आरक्षणासंदर्भात करण्यात आलेली कार्यवाही ही परिशिष्ट-१ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे असे समजण्यात यावे.

**(एक) आरक्षणाची व्याप्ती, अटी व शर्ती**

**१)** शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्था यांच्या सेवेत नियुक्तीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

**२)** महिलांच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करताना अनु. जाती. अनु. जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदापैकी त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

**३)** महिलांचे आरक्षण हे संमातर आरक्षण राहिल व ते कार्यान्वित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६.३.९९ मधील मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही करावी. (प्रत सोबत जोडली आहे) सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

**४)** महिलांसाठी विहित करण्यात आलेले सदर ३०% आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

**५)** महिला आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष आरक्षण असल्यामुळे ते आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत महिला आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या, सामाजिक आरक्षण/उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), (क) (ड), वि.मा.प्र., इमाप्र अणि खुला प्रवर्ग) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी.

**६)** महिलांसाठीचे सदर आरक्षण हे मागासवर्गीयांचे आरक्षण ज्या ज्या ठिकाणी लागू आहे त्या सर्व ठिकाणी लागू राहील.

७) भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात यावे.

८) महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येवू नये.

९) खुल्या प्रवर्गातील उन्न्त आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

१०) खुल्या प्रवर्गातील ज्या व्यक्तीचे / कुटुंबाचे सर्व मार्गानी येणारे एकूण वार्षिक उत्पन्न सलगच्या मागील तीन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु. दोन लाख किंवा त्यापेक्षा अधिक असेल ती व्यक्ती/कुटुंब उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट म्हणून समजण्यात येईल. या संदर्भातील कुटुंबाच्या व्याख्येमध्ये विवाहित महिलेच्या बाबतीत पती, पत्नी व मुले यांचा समावेश राहील. आणि अविवाहित मुलीच्या संदर्भात आई, वडील व अविवाहित भावंडे यांचा समावेश राहील.

११) इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) यांचेकरीता उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गट (क्रिमीलेअर) बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले निकष व अटी लागू राहतील.

१२) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागामार्फत इतर मागासवर्गासाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) याबाबतची उत्पन्न मर्यादा वाढविण्यास सदर वाढीव उत्पन्न मर्यादा खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आपोआप लागू राहील.

१३) मागासवर्गीयांचे आरक्षित प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांना सेवा भरतीसाठी जे सेवाभरती नियम, अटी व शर्ती लागू केल्या तेच सेवाभरती नियम, अटी व शर्ती त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठीच्या आरक्षणाबाबतही लागू राहतील.

१४) महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात यावे.

१५) महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

**(दोन) प्रमाणपत्रे**

**(अ) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र व त्याची तपासणी**

(१) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र घेण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतचा अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना परिशीष्ठ २ व ३ म्हणून सोबत जोडला आहे.

(२) वरील प्रमाणपत्राच्या आधारे ज्या महिलांना आरक्षणाचा लाभ देण्यात येईल त्यांची प्रमाणपत्रे तपासण्यास आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकाऱ्यांकडून महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता ज्या महिलांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदाकरिता केलेला अर्ज संबंधित विभागानी / कार्यालयानी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे तपासणीसाठी पाठवावा.

(४) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी सदर प्रमाणपत्र या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसारआहे किंवा नाही हे तपासावे. तसेच प्रमाणपत्राच्या पृष्ठ्यर्थ संबंधित उमेदवाराने या शासन निर्णयातील परिशीष्ठ-२ मधील अर्जान्वये प्रमाणपत्र मिळण्याकरिता जी माहिती सादर केली असेल ती माहिती मुळ कागदपत्रांवरुन तसेच आवश्यकता वाटल्यास गृहभेटी देवून तपासून घ्यावी. व सर्व माहिती योग्य असल्याचे आढळून आल्यास प्रमाणपत्र प्रमाणित करुन संबंधित कार्यालयाना परत पाठवावे.

(५) जर एखाद्या प्रमाणपत्राबाबत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना शंका असल्यास त्यांनी याबाबतचा सविस्तर तपशील आपल्या अहवालात नमूद करावा.

(६) ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी तपासून प्रमाणित केली असतील त्या उमेदवारांची महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूक करण्यास हरकत नाही.

(७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी प्रमाणपत्र तपासणीचा अहवाल एक महिन्यात संबंधित कार्यालयांना पाठवावा.

(८) आयुक्ताचा अहवाल एक महिन्यात प्राप्त झाला नाही तर संबंधित कार्यालयांनी प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिनतेने संबंधित उमेदवारास तात्पूरती नेमणूक द्यावी.

(९) ज्या उमेदवारांच्या प्रमाणपत्राबाबत शंका उपस्थित झाली असेल अशा उमेदवारांच्या बाबतीत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी स्वतःच्या सहीने आपल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकारी यांना अ.शा. गोपनीय पत्राद्वारे कळवाव्यात व त्यांचा अहवाल ठराविक कालमर्यादेत मागवावा.

(१०) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी उपस्थित केलेल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांना मान्य असल्यास त्यांनी संबंधित प्रमाणपत्र रद्द करावे.

**(ब) मागासवर्गीय उमेदवारांची प्रमाणपत्रे व त्यांची तपासणी**

(१) अनु. जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यामधील महिलांनी त्यांच्या प्रवर्गातील महिला आरक्षणाच्या लाभाकरिता त्या त्या प्रवर्गात मोडत असल्याचे प्रमाणपत्र आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सादर करणे आवश्यक राहील व सदर प्रमाणपत्रे तपासण्याबाबत आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग यांनी जी कार्यपध्दती विहीत केली आहे तीच कार्यपध्दती अंमलात राहील.

**(क) मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदांवर नियुक्ती झाल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे व त्याची तपासणी**

(१) मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवार खुल्या प्रवर्गातील जागांकरीता विकल्प देतील किंवा विकल्प न देताही मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदांवर झाल्यास अशा महिला उमेदवारांना प्रमाणपत्र सादर करण्याबाबत खालील दोन विकल्प राहतील.

**(अ)** अशा महिला उमेदवारांनी सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी विहीत केल्याप्रमाणे त्यांच्या संबंधित जातीची प्रमाणपत्रे सादर करावीत व ती त्या विभागांनी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार तपासून घेण्यात यावीत. अशा महिला उमेदवारांकडून खुल्या प्रवर्गातील महिलाकरीता विहित केलेले क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

**(ब)** जर त्या त्यांच्या संबंधित जातीचे प्रमाणपत्र सादर करु इच्छित नसतील किंवा सादर करु शकत नसतील तर अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच या शासन निर्णयाच्या परिशिष्ट -३ नुसार विहित केलेले उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१) या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-२ नुसार संबंधित तहसिलदार/नायब तहसिलदार यांचेकडे क्रिमीलेअरच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.

(२) वर नमुद केलेल्या उमेदवारांनी उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास, तहसिलदार व नायब तहसिलदार यांनी अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गाप्रमाणेच उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र द्यावे.

(३) हे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतच्या अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना या शासन निर्णयाच्या परिशिष्ठ २ व ३ प्रमाणे राहील.

(४) वरील प्रमाणपत्र तपासण्यासाठी वा शासन निर्णयाच्या परिच्छेद (दोन) (अ) मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.

**(तीन)** हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

**(चार)** हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २९/१६-अ, दि. ३.४.२००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चंद्रसेन तुरकर**
**अवर सचिव, महाराष्ट्र राज्य**

## परिशिष्ट - १

**शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि. २५.५.२००१ चे परिशिष्ट -१.**

वाचा :- १) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९३/प्र.क्र.३६६/का-२, दि. २२ जून, १९९४

२) शासन परिपत्रक, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९५/प्र.क्र.२१६/का-२, दि. १३.१०.१९९५

३) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९३/प्र.क्र.३६६/का-२, दि. १६.१०.१९९५

४) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-२, दि. २७.५.१९९७

५) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-२, दि. १.८.१९९७

६) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-१०, दि. १८.२.१९९८

७) शासन परिपत्रक, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-१०, दि. १२.५.१९९८

८) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९८/प्र.क्र.८०/का-१०, दि. २.११.१९९८

९) शासन परिपत्रक, महिला व बाल विकास विभाग क्रमांक :- संकीर्ण-१०९६/प्र.क्र.३०/का-२, दि. २१.६.२०००

-------------------------

(शासन निर्णय, क्र.८२/२००१ मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि. २५.५.२००१ चे परिशिष्ट -२)

## परिशीष्ट -२

खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी असलेल्या ३०% आरक्षणाच्या सवलतीसाठी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना :-

प्रति,
तहसिलदार / नायब तहसिलदार,

महोदय,

मी आपणांस विनंती करते की, खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी असलेल्या ३०% आरक्षणाच्या सवलतीसाठी मला कृपया उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे, अशी विनंती आहे.

मी माझी माहिती खालीलप्रमाणे नमूद करीत आहे :-

**१)** अर्जदाराचे पूर्ण नाव :-
**२)** जन्म दिनांक :-
**३)** निवासाचा पूर्ण पत्ता
**अ)** सध्याचा :-
**ब)** कायमचा :-
**४)** धर्म :-
**५)** जात :-
**६)** वडीलांचे नाव :-
**७)** आईचे नाव :-
**८)** पतीचे नाव :-
**९)** पालकांचा / पतीचा व्यवसाय :-
**१०)** पालकांच्या / पतीच्या उत्पन्नाचा तपशिल :-
**११)** **अ)** पालक / पती नोकरी करीत असल्यास :-
**१)** वडीलांच्या/पतीच्या नोकरीचे ठिकाण (कंपनी / कार्यालयाचे नाव) :-
**२)** पदनाम :-
**३)** मागील तीन वर्षाचे वर्ष निहाय एकूण वार्षिक वेतन (सर्व भत्त्यांसह) :-

**४)** आईचे नोकरीचे ठिकाण :-
(कंपनी / कार्यालयाचे नाव)

**५)** पदनाम :-

**६)** मागील तीन वर्षाचे वर्ष निहाय एकूण :-
वार्षिक वेतन
(सर्व भत्यांसह)

**७)** कुटुंबाचे एकूण उत्पन्न :-
(तीन वर्षाचे वर्षनिहाय)
अ.क्र. ३ + ७

**(ब)** पालक / पती व्यवसाय करीत असल्यास :-

**१)** व्यवसायाचे नाव :-

**२)** व्यवसायाचे ठिकाण :-

**३)** व्यवसायातून मिळालेले मागील तीन :-
वर्षाचे वर्ष निहाय एकूण उत्पन्न

मी असे प्रमाणित करते की, वर नमुद केलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे व विश्वासाने खरी आहे आणि म्हणून मी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नाही. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील महिलांसाठीच्या आरक्षणाच्या लाभासाठी मी पात्र आहे. जर मी वर नमुद केलेली माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी आहे, असे निवड होण्यापूर्वी किंवा नंतर आढळून आल्यास माझी निवड/नियुक्ती रद्दबादल ठरविण्यास पात्र असेल. तसेच कायदा किंवा नियमांद्वारे विहित असणाऱ्या कारवाईस मी पात्र असेल.

आपली,

**(उमेदवाराची सही)**

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**(शासन निर्णय, क्र.८२/२००१ मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि. २५.५.२००१ चे परिशिष्ट -३)**

## परिशिष्ट -३

खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमध्ये ठेवण्यात आलेल्या ३०% आरक्षणाच्या सवलतीकरिता उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना :-

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. संकीर्ण-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि. २२.५.२००१ अन्वये विहित केलेल्या खुल्या प्रवर्गातील महिलांकरिताच्या उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) प्रवर्गामध्ये कुमारी / श्रीमती ------------------------------------------------------- यांच्या कुटुंबियांचे लगतच्या मागील ३ वर्षाचे सर्व मार्गानी मिळून एकूण उत्पन्न वार्षिक सरासरी रुपये २ लाखाच्या आत असल्याने त्या खुल्या प्रवर्गातील उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नाहीत.

सही

**(सक्षम अधिकारी)**

**दिनांक :-**

**शिक्का :-**

----------------

# [६]

# सेवेमध्ये पदवीधर सुशिक्षित बेरोजगार यांना वयोमर्यादेत सवलत व समांतर आरक्षण

**सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत पदवीधर/पदविकाधारक बेरोजगार लाभार्थिंना शासकीय सेवेतील गट "क" मधील पदांवर नियुक्तीसाठी सवलती देण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक-पअक-१०९७/१७९३/प्र.क्र.४/९८/१६-अ,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दि. १९ मार्च, १९९८.

**वाचा:-** १) शा. नि., उ. ऊ. व का. वि. क्रमांक-ईएमपी-१४७८/३४९३/आयएनडी-१३, दि. ३०.११.१९७८.

२) शा. नि., सा. प्र. वि. क्रमांक: एईएम-१०९२/३६५५/सीआर-९०/९२/१६-अ, दि. ३१.८.१९९३

३) शा.नि.उ.व तं, शि. आणि सेवायोजन वि. क्रमांक-पीटीई-१०९१/(४०६)/सेयो-१, दि. २१.३.१९९५.

**निर्णय:-** जे पदवीधर/पदविकाधारक नोकरीच्या शोधात आहेत त्यांना मानधन रुपाने सहाय्य देण्याची योजना शासन निर्णय, उ. ऊ. व का. वि. क्रमांक-इएमपी-१४४८/३४९३/आयएनडी-१३, दि. ३०.११.७८ अन्वये कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत बेरोजगार पदवीधर/पदविकाधारकास प्रत्येक महिन्यास मानधन दिले जाते आणि त्याला प्रत्येक महिन्यात कमीत कमी १५ दिवस रोजी ४ तास याप्रमाणे काम करावे लागते. हे मानधन जास्तीत जास्त ३ वर्षापर्यंत किंवा त्यास नोकरी मिळेपर्यन्त जे आधी घडेल त्याप्रमाणे अनुज्ञेय राहील.

२. या योजनेचे लाभार्थींनी शासनाकडे त्यांना येणाऱ्या विविध अडचणीसंबंधी गाऱ्हाणी आणि निवेदने सादर केलेली आहेत. त्यांच्या मागणीपैकी एक मुख्य म्हणजे शासनातील सेवा प्रवेशासाठी वयोमर्यादा शिथिल करणे तसेच त्यांच्या नियुक्तीसाठी प्राधान्य देणे. शासनाने याबद्दल विचार करुन खालीलप्रमाणे सवलती देण्याचा निर्णय घेतला आहे:-

3. The Government has directed that the annual confidential reports of the Officers concerned with the implementation of the programme should reflect also the performance in respect of items concerning the Parliamentary Election Manifesto. All Heads of Departments are therefore, requested to give top most priority to this matter, pursue it vigorously and ensure strict compliance of the orders. The Heads of Departments are requested to issue suitable instructions in this regard to the appointing authorities under their administrative control and ensure compliance by them.

4. The orders regarding reservation for ex-servicemen are applicable to the Zilla Parishads. The Chief Executive Officers are requested to take similar action for ensuring strict implementation of reservation for ex-servicemen in Class III and Class IV posts under the Zilla Parishads.

5. The Corporations/Boards/Authorities under the administrative control of the State Government are required to implement these orders. Government has directed that these bodies must strictly implement the Government orders regarding reservation for ex-servicemen and amend the relevant recruitment rules for incorporating the provisions regarding reservation for ex-servicemen, if this has not already been done.

6. The Mantralaya Departments are requested to take steps for ensuring strict implementation of Government orders regarding reservation for ex-servicemen in Class III and Class IV posts by all the appointing authorities in Government Departments and by the Corporations/Boards/Authorities under their administrative control.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**A. A. ALAVI**
**Secretary to Government.**

**सहपत्र ५**

**Immediate**

**Concessions to ex-servicemen for recruitment to Class III and Class IV posts.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Circular No. RTA. 1079/0/482/XVI-A,

Mantralaya, Bombay 400 032, Dated the 16th April 1981.

***Read.***—*(i)* Government Circular, General Administration Department, No. IPE/RTA. 1080/ 0/181/XVI-A, dated the 10th October 1980.

*(ii)* Government Circular, General Administration Department, No- SRV. 1080/563/ 156/XVI-A, dated the 1st December 1980.

***CIRCULAR.***—Orders are in force since May 1973 providing 15% reservation for ex-servicemen in Class III and Class IV posts which are required to be filled by direct recruitment. Consolidated orders embodying this and other concessions regarding age limit etc. sanctioned by Government for the ex-servicemen from time to time have been issued in Government Circular, General Administration Department, No. IPE/RTA/1080/0/181/XVI-A, dated 10th October 1980. Thereafter, in Government Circular, General Administration Department No. SRV-1080/563/156/XVI-A, dated the 1st December 1980 it has been clarified that the reservations already provided in favor of ex-servicemen and certain other specified sections of society, except those belonging to the economically weaker sections, should not be subject to any economic criterion and that they should continue to get the reservations irrespective of the quantum of their family income.

2. The Government of India have since adopted certain special measures for promoting absorption of ex-servicemen in civil services and posts. This Government also has decided to adopt such measures and to direct as follows :—

**I-*Reservation of vacancies :—*** According to the existing orders, besides the Government departments and Government offices, the Zilla Paridhads and the Corporations, Boards, Industrial Units, etc. under the administrative control of the State Government are required to provide 15% reservation for ex-servicemen and to amend their recruitment rules accordingly, I Government has now decided (1) to make the existing orders regarding 15% reservation for I ex-servicemen in applicable also to the local bodies *i.e.* Municipal Corporations, Municipal Councils and all other authorities, services and institutions in respect of which Government has powers to give directions, and (2) to extend the scope of the reservations to the voluntary organizations receiving grants-in-aid from the Central Government or State Government,

requiring such organizations to reserve at least 10% of vacancies in the lower or middle level posts under them (comparable to the Class III and Class IV/ posts in Government service) for employment, of ex-servicemen. All Departments of Mantralaya should issue suitable instructions to all such bodies with which they are respectively concerned and request them to amend the relevant recruitment rules for incorporating the provisions regarding reservations for ex-servicemen. A condition making such reservation for ex-servicemen compulsory should also be included in the terms and conditions under which voluntary organizations/agencies are given grants-in-aid by the Government.

**II-*Release of unfilled reserved vacancies* :—**

Under the existing orders, the vacancies reserved for ex-servicemen which remain unfilled on account of duly qualified candidates not becoming available can be carried forward for a period of *one year* As regards release of unfilled reserved vacancies, the following revised procedure is laid down—

(*i*) The vacancies reserved for ex-servicemen in respect of Class III posts and Class IV posts should not be released to any general candidates until and unless the appointing authority has (a) obtained a certificate regarding “Non-availability of ex-servicemen" from the Employment Exchange, Zilla Sainik Board, Regional Selection Board or the Maharashtra Public Service Commission, depending upon the nature of the job and (b) recorded a certificate that such a “ Non-availability” certificate has been obtained.

(*ii*) Individual cases of release of vacancies reserved for ex-servicemen should be referred by the various appointing authorities lower than the Government to the concerned Administrative Departments of the Mantralaya and such posts should be filled by general candidates only with the approval of the concerned Administrative Departments.

(*iii*) Similar instructions should be issued by the Departments of the Mantralaya, to the Public Sector Undertakings/Corporations under their administrative control. The Rural Development Department also should issue similar instructions to the Zilla Parishads.

**III-*Age relaxation :—***

According to the existing orders ex-servicemen who have put in not less than six months continuous service in the Armed Forces are allowed to deduct from their age the length of continues service in the Armed forces *plus* three years. In the case of disabled ex-servicemen the age limit is relaxed up to 45 years for purposes of appointment to Class III and Class IV posts. As per the existing orders, such age relaxation is applicable to the appointment of ex-servicemen only to the posts reserved for them. Government has now decided in consultation with the Maharashtra Public Service Commission to extend this concession also for their appointment to unreserved vacancies in Class III posts. This concession is also extended to unreserved vacancies in class IV posts.

**IV-*Relaxation /lowering of educational qualifications* :—**

At present, ex-servicemen are not entitled to any concession in regard to educational qualifications. Government is now pleased to give the following concessions to them in this regard, for appointment only to reserved vacancies in Class III and Class IV posts :—

(*i*) For appointment to any reserved vacancy in Class IV posts, an ex-servicemen who has put in not less then 3 years service in the Armed Forces should be exempted from satisfying the minimum educational qualification, namely a pass in the fourth standard examination prescribed in respect of such posts.

(*ii*) For appointment to any reserved vacancy in Class III posts, the appointing authority may, at its discretion, relax the minimum educational qualification, where such qualification prescribed is a pass in the Middle School Examination or any lower examination, in favor of ex-servicemen who have put in at least 3 years service in the Armed Forces and who are otherwise considered fit and suitable for appointment to such posts, in view of their experience and other qualifications. Such Class III posts will obviously *not* include ministerial posts like Clerks, Typist etc., for which minimum educational qualification is a pass in Secondary School Certificate Examination.

***Note.***—In computing the period of 3 years referred to in (i) and (ii) above, service in a corresponding post in a civil Department or a Public Sector Undertaking or an autonomous organization whether under Central or State Government or in a nationalised Bank should be added to the period of service in the Armed Forces.

(*iii*) For appointment to any reserved vacancy in Class III posts, to be filled partly by direct recruitment and partly by promotion or transfer, where the minimum educational or technical qualification prescribed for appointment by direct recruitment is higher than that prescribed for promotions or transferees, an ex-servicemen should be deemed to satisfy the prescribed educational or technical qualification if the.—

(a) satisfies the educational or technical qualification prescribed for direct recruitment to the posts from which promotion or transfer to the posts in question is allowed ; and

*(b)* has an identical experience of work in a similar discipline and for the same number of years in the Armed Forces of the Union, as prescribed for promotees or transferees.

(*iv*) All Departments of Mantralaya should examine and identify the posts in which military experience either in general or in a specific field or posts would be of distinct advantage so as to provide for such experience as an essential or desirable qualification and also to consider whether in view of the relevance of the experience possessed, lower educational qualification should not be prescribed for ex-servicemen. The General Administration Department (Personal Division) should, while approving recruitment fules for the various posts referred to them, specifically insist on the examination of the provisions regarding modes of recruitment, educational qualifications and experience from these engles also.

***Note.***—The concessions at (*iii*) and (*iv*) above should be made applicable only to Class III posts appointments to which are outside the purview of the Maharashtra Public Service Commission.

(*v*) The Departments of Mantralaya should ensure that the Public Sector Undertaking under their administrative control also adopt and implement the decision at *(iv)* above.

**V - *Implementation* :—**

For the proper implementation of the orders regarding reservation for ex-servicemen, Deputy Secretaries to Government in charge of establishment in the Mantralaya Department shall be designated as Liaison Officers. The functions to be entrusted to then would be (i) to ensure due compliance by the appointing authorities under their administrative control of the orders and instructions pertaining to reservation in favor of ex-servicemen, (ii) to watch the receipt of periodical returns which may be prescribed in respect of placement of ex-servicemen and their timely submission after due scrutiny and consolidation, and (iii) to conduct annually inspection of the registers maintained in the offices of Heads of Departments under them and submit a report of inspection to the Secretary of the Department.

3. The Department of Mantralaya are requested to ensure that the existing orders as amplified in para 2 above are implemented by them and the various authorities under them, scrupulously.

4. These orders issue with concurrence of Finance Department *vide* its unofficial reference No. 738/EXP-481, dated the 15th April 1981.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**V. S. FADNAVIS**
Deputy Secretary to Government

# [भाग - ड]

## भरती व बढतीमध्ये आरक्षण व जातवैधता प्रमाणपत्रे

# भरती व बढतीमधील आरक्षण व जात वैधता प्रमाणपत्रे

## प्रस्तावना

महाराष्ट्र शासनामध्ये शासकीय, निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीमध्ये, बढतीमध्ये अथवा शैक्षणिक सवलतींकरीता आरक्षणाचे लाभ घेण्याकरीता शासनाचे विविध शासकीय निर्णय झाले आहेत. त्यासाठी लाभार्थीचे महाराष्ट्रातील वास्तव्य असणे अनिवार्य आहे. त्याकरीता अनु.जाती, अनु.जमाती, भटक्या जमाती या केव्हा शासनाच्या अधिसूचनेत आल्या/ शासन निर्णयाने प्रसिध्द केल्या त्यावेळी संबंधित प्रवर्गातील व्यक्ती संबंधित दिवशी महाराष्ट्रात वास्तव्यास असणे आवश्यक आहे असे मानण्यात आले. यालाच मानीव दिनांक म्हटले आहे. यास्तव संबंधित प्रवर्गाकरीता महाराष्ट्राचे वास्तव्याकरीता खालीलप्रमाणे मानीव दिनांक निश्चित केले आहे.

| जातीचा प्रवर्ग | मानीव दिनांक |
|---|---|
| अनुसूचित जाती | १० ऑगस्ट १९५० |
| अनुसूचित जमाती | ६ सप्टेंबर १९५० |
| विमुक्त जाती व भटक्या जमाती | २१ नोव्हेंबर १९६१ |
| इतर मागास वर्ग व विशेष मागस प्रवर्ग | १३ ऑक्टोबर १९६७ |

आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी खलील प्रमाणपत्रे आवश्यक आहेत.

- सर्व प्रवर्गातील मागास वर्गीयांना आरक्षणाचे लाभ घेण्यासाठी संबधित जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणीचे प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य आहे.
- अनुसूचित जाती/ जमाती वगळून उर्वरित मागास वर्गामधील उन्नत-प्रगत (Creamy Layer) व्यक्तींना आरक्षणाचे लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.
- अनुसूचित जाती / जमाती वगळून उर्वरित मागास वर्गामधील व्यक्तींना आरक्षणाचे लाभ घेण्यासाठी उन्नत-प्रगत गटात (Non Creamy Layer) मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक आहे.

आरक्षणाचे लाभ घेणेकरीता जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असलेने, आरक्षण व जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र यांचेशी संबंधित असणारे शासनाचे विविध शासन निर्णय संकलित करुन एकत्रितरित्या माहितीसाठी उपलब्ध करुन देणेचा प्रयत्न या भागामध्ये केला आहे. तसेच सोबत माहे डिसेंबर २०१५ अखेर शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या मागासवर्गियांची प्रवर्गनिहाय जातीची यादी संदर्भासाठी देणेत आली आहे. त्याचा उपयोगही निश्चितच होईल.

******

**जातीचा दाखला देण्यास नकार दिल्यावर त्याबाबत करावयाचे अपील ज्या प्रवर्गांना क्रिमिलेयरमध्ये मोडत नाही असा दाखला सादर करावा लागतो त्यांच्यासह.**

**महाराष्ट्र शासन**

समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय, क्र. सीबीसी-१०९६ / प्र. क्र. ४८ /मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जुलै,१९९७.

**वाचा** :- १) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी- १०९६/प्र. क्र.४८ / मावक- ५, दिनांक ३ जून, १९९६.

२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१०९६/प्र.क्र. ४८ / मावक - ५, दिनांक ९ जुलै, १९९६.

**शासन निर्णय** :- शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र. सीबीसी-१०९६ / प्र. क्र.४६/ मावक-५, दिनांक ३ जून १९९६ सोबत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना जातीची प्रमाणपत्रे देताना परिशिष्ट “अ” नुसार ज्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत त्या परिशिष्टामधील अनुक्रमांक ३५ मधील जातीचा दाखला मिळावा म्हणून जो अर्ज केला असेल तो अर्ज नाकारला किंवा अर्ज नाकारण्याची कारणे अर्जदारास कळविण्यात आल्यानंतर नाकारण्यात आलेल्या अर्जासंबंधी कोणत्याही प्राधिका-याकडे दावा किंवा अपील करता येणार नाही. अशी तरतूद केलेली आहे. त्याऐवजी “नाकारण्यात आलेल्या अर्जासंबंधी ज्या क्षेत्रातील सक्षम प्राधिका-याने जातीचा दाखला व जातीचा दाखला क्रिमिलेअरमध्ये मोडत नसल्यासह देण्यास नकार दिलेला आहे त्या क्षेत्रातील जी जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती अस्तित्वात आहे त्यांचेकडे अपील करता येईल.” अशी तरतूद करण्यात येत आहे.

२. वरील प्रमाणे केलेल्या तरतुदीची नोंद सर्व सक्षम प्राधिका-यांनी घ्यावी व अर्ज नाकारल्यानंतर नाकारलेल्या अर्जामध्येच अपील प्राधिका-याकडे १५ दिवसांत अपील करता येईल असे नमूद करुन अर्जदारास कळविण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**वि. वा. मेहेर**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील असलेल्या ज्या उमेदवारांनी जातीचा दावा करुन निवडणूक लढविली आहे अशा उमेदवारांच्या जातीच्या दाव्याची पडताळणी सध्या अस्तित्वात असलेल्या जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून घेण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन.**
समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय, क्रमांक सीबीसी-१०९७ / प्र. क्र. २०७ / मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ जानेवारी, १९९८.

**वाचा** : - १) शासन निर्णय,समाजकल्याण,,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी १६८४/ गोप /५९२ / (१९९९) / बीसीडब्ल्यू-५, दिनांक १४ मार्च, १९८५.

२) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१६९४ / ४०१२४ / प्र. क्र. २५६ / मावक-५, दिनांक २६ डिसेंबर १९९४.

३) शासन निर्णय, समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१०९६ / प्र. क्र. ४८ / मावक-५, दिनांक ५ जुलै, १९९७.

४) उप आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक : एसईसी-एमएनसी-१९९७ / प्र. क्र. २३२ /का-३, दिनांक ९ जुलै, १९९७.

**शासन निर्णय**:- वर उल्लेखिलेल्या अनुक्रमांक १ व २ येथील शासन निर्णयान्वये अनुक्रमे संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावर जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तसेच विभागीय स्तरावर पाच जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या अनुक्रमे मुंबई, औरंगाबाद, नागपूर, अमरावती व नाशिक येथे स्थापन करण्यात आलेल्या आहेत, वरील सर्व समित्यांची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत :-

१) ठराविक वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयांत पहिल्या वर्षाकरिता प्रवेश घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे (अनुसूचित जमाती वगळून) जातीचे प्रमाणपत्र / जातीच्या दाव्याची तपासणी करणे.

२) शासन सेवेत मागासवर्गीयांची राखीव असलेल्या पदावर नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस करण्यात आलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या (अनुसूचित जमाती वगळून) जातीच्या प्रमाणपत्राची / जातीच्या दाव्याची तपासणी करणे.

३) शासनाच्या समाजकल्याण विभागामार्फत जाती प्रमाणपत्राच्या / दाव्याच्या तपासणी बाबतची सोपविलेली अन्य प्रकरणे तपासणे.

४) जे कर्मचारी अनुसूचित जाती / विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गामध्ये राखीव असलेल्या पदांवर नियुक्त झाले आहेत अशांचे जाती दावे तपासणे.

५) निवड मंडळामार्फत व प्रादेशिक दुय्यम सेवा मंडळामार्फत राखीव जागेवर शिफारस केलेल्या मागासवर्ग कर्मचा-यांच्या जाती दाव्याची प्रकरणे तपासणे.

६) या पूर्वी अमागासवर्ग म्हणून शासन सेवेतज प्रवेश केला आहे व त्यानंतर एखाद्याची जात मागासवर्ग म्हणून घोषित केले आहे व मागास म्हणून त्यांना असलेल्या आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छित असल्यास अशा उमेदवारांच्या जाती दाव्याची प्रकरणे तपासणे.

७) महाराष्ट्र राज्यातील जे कर्मचारी / अधिकारी केंद्र शासनाच्या सेवेत आहेत व त्यांचे जाती दाव्याची तपासणी करावयाची आहे अशाची प्रकरणे तपासण्यासंबंधी तपासावीत.

८) निमशासकीय सेवेत राखीव जागेवर प्रवेश घेतलेले सर्व कर्मचारी / अधिकारी यांच्या जातीचे दाव्यांची तपासणी करणे.

९) एखाद्या उमेदवारांची / कर्मचा-याची पूर्वी अमागासवर्गीय म्हणून शासन सेवेत नियुक्ती झाली असेल व तो आता मागासवर्ग असल्याचा दावा करीत असतील किंवा पूर्वी त्यांचा मागासवर्गाच्या दुस-या वर्गावारीचा दावा करीत आहेत असे असल्यास अथवा त्यांच्या जाती प्रमाणपत्रात नमूद असलेली व शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रात नमूद असलेली जात याच्यात तफावत असेल अशा जाती दाव्याची प्रमाणपत्रे तपासणे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग यांच्यासाठी काही राखीव ठेवण्यात येतात. सदर जागांवर काही उमेदवार खोटया जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे निवडणूक लढवितात असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे राखीव जागेव निवडून आलेल्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची सत्यता पडताळून पहाणे अनिवार्य झाले आहे अशा खोटया प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे क्रमप्राप्त आहे, त्यासाठी शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

३. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीमध्ये अनुसूचित जाती, नागरिकांचा मागासवर्गीयांसाठी (इतर मागासवर्गीय व विमुक्त जाती) काही जागा राखीव ठेवण्यात येतात. सदर राखीव जागेवर खोटया जातीच्या प्रमाणपत्राव्दारे निवडणूका लढवितात. सदर राखीव जागेवर निवडून आलेल्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची सत्यता संबंधित जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून संबंधित जिल्हाधिकारी यांनी करुन घ्यावी. निवडणूका झाल्यानंतर राखीव मतदार संघातून निवडून आलेल्या सर्व उमेदवारांचे जाती / जमातीचे प्रमाणपत्रे संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधित जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे १५ दिवसाच्या आत आवश्यक त्या कागदपत्रासह पाठवावीत व संबंधित जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने अशा उमेदवाराच्या जाती दाव्याची पडताळणी ४५ दिवसाच्या आत करुन आपला निर्णय संबंधित जिल्हाधिका-यांकडे न चूकता पाठवावी.

हा शासन निर्णय नगर विकास विभाग तसेच ग्राम विकास विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जे. पी. डांगे**
**सचिव, समाजकल्याण,**
**महाराष्ट्र शासन.**

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्रांची / दाव्यांची तपासणी -**

**तपासणी समितीच्या कामाचे स्वरुप व अधिकाराबाबत.**

**महाराष्ट्र शासन.**
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय ,क्रमांक : एसटीसी-१०९८/ प्र. क्र. ३३ /का -१०
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक ११ जून १९९८

**वाचा :-** १) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी- १६८४/२८१८/(२९१)/का.११ दिनांक २३ जानेवारी, १९८५.

२) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक सीबीसी- १६८४/(३९२)/का.११ दिनांक ८ मार्च, १९८५.

३) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी- १०९०/२३९४२/१८६/ का १० दिनांक ३ जून, १९९२

४) सह सचिव, कल्याण मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्र. १२०१८/ १३/९५-एससीडी /आर-सेल, दिनांक २५ सटेंबर १९९५

५) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी- १८९५ / प्र. क्र. १८२ /का.१० दिनांक २६ ऑक्टोबर १९९५ .

६) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी- १६९६/प्र. क्र. ३४ /का -१० दिनांक ७ मार्च, १९९६

७) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी- १८९५/ प्र. क्र. १८२ /भाग-२/ का १० दिनांक १५ मार्च १९९६

८) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी- १८९५ /प्र. क्र. १८२/का १० दिनांक १४ जुलै, १९९७

९) शासन शुध्दीपत्रक,आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी- १८९५/प्र. क्र १८२/ का १०. दिनांक २३ जुलै,१९९७,

**प्रस्तावना :-** मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र. १४७६७/९३,सिव्हील अर्ज क्र. ५८५४/९४, कुमारी माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर यावर दिनांक २ सप्टेंबर, १९९४ रोजी असा निर्णय दिला आहे की, प्रत्येक राज्याने जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करणे व त्यांची तपासणी करणे याबाबतची कार्यपध्दती सर्वोच्च न्यायालयाने प्रस्तुतच्या निर्णयात घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विहित करावी. या मार्गदर्शक सूचनांमध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, जातीची प्रमाणपत्रे तपासण्याबाबतचा अर्ज, शैक्षणिक संस्थेत प्रवेश/सेवेत नेमणूक मिळविण्यापूर्वी किमान सहा महिने अगोदर जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावा. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित केले

आहेत. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सुचनानुसार पुणे, नाशिक व नागपूर येथील अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची पुर्रचना उपरोक्त संदर्भांकित अनुक्रमांक ८ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. उपरोक्त संदर्भांकित अनुक्रमांक १,३ व ६ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये तत्कालीन समित्यांच्या कामकाजाबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या पुनर्रचित तपासणी समित्यांच्या कामकाजाची कार्यकक्षा अधिक स्पष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- याबाबत शासन असे आदेश देत आहे की, पुणे, नाशिक व नागपूर येथील अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या कामाचे स्वरुप (Nature of work) व कर्तव्ये खालील प्रमाणे राहतील.

१) वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात पहिल्या वर्षाकरिता प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची / जातीच्या दाव्यांची तपासणी करणे.

२) अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोग/ विविध निवडमंडळे व प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळामार्फत शासन सेवेत नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जातीच्या प्रमाणपत्राची / जातीच्या दाव्यांची तपासणी करणे.

३) शासन सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्या जाती दाव्याच्या संदर्भात संबंधीत विभाग / कार्यालये यांच्याकडून प्राप्त तक्रारींची /जाती दाव्यांच्या प्रकरणांची तपासणी करणे.

४) शासनाने, आदिवासी विकास विभागामार्फत सोपविलेल्या जातीच्या प्रमाणपत्रांच्या/दाव्यांच्या प्रकरणाची तपासणी करणे.

५) मा. उच्च न्यायालयाकडून अनुसूचित जमातीच्या जातीच्या प्रमाणपत्रांची / दाव्यांची तपासणी करण्याबाबत सोपविलेली सर्व प्रकरणे.

६) महाराष्ट्र राज्याचे कायम रहिवासी असलेल्या ज्या कर्मचारी/अधिका-यांची केंद्र शासनाच्या सेवेत/केंद्र शासनाच्या अंगीकृत उपक्रमात राखीव जागेवर नेमणूक करण्यात आली आहे अशा अनुसूचित जामातीच्या सर्व कर्मचारी/अधिकारी यांच्या जातीच्या प्रमाणपत्रांची/दाव्यांची तपासणी करणे.

७) जिल्हापरिषदा/ निमशासकीय कार्यालये/ विविध बँका व शासकीय व निमशासकीय उपक्रम उदा- एस.टी. महामंडळ,महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळ, नगरपालिका, महानगरपालिका व राज्य शासन अंगीकृत इतर उपक्रम इ. मध्ये (This list is illustrative and not exaustive) अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांवर नेमणूकीसाठी शिफारस केलेल्या सर्व कर्मचा-यांची / अधिका-यांची प्राप्त झालेली जातीची प्रमाणपत्रे/ दावे तपासणे.

८) अनुसूचित जमातीच्या नसलेल्या व्यक्तीला जर सक्षम अधिका-याने अनुसूचित जमातीचे जाती प्रमाणपत्र दिले आहे अशा प्रकारच्या कोणत्याही तक्रारीची संबंधित जाती प्रमाणपत्र तपासणी समिती आपल्या अखत्यारीतील दक्षता पथकामार्फत चौकशी करुन निर्णय देईल व तो निर्णय अंतीम राहील.

९) अनुसूचित जमातीचा दावा करणा-या व्यक्तींना सक्षम अधिका-यांनी दिलेली जातीची प्रमाणपत्रे दि. २९-१०-१९८० पूर्वीची किंवा तदनंतरची असली तरी ती तपासण्याचे अधिकार तपासणी समितीस दि. ८ मार्च, १९८५ व १४ जुलै,१९९७ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत, ते अधिकार, तसेच जर जातीचे प्रमाणपत्र "अवैध" असल्याचे तपासणी समितीस आढळून आले तर ते जातीचे प्रमाणपत्र रद्द करण्याचे व जप्त करण्याचे अधिकारही तपासणी समितीस कायम राहतील. सदर बाबतीत तपासणी समितीचा निर्णय हा अंतिम राहील.

१०) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्रांची/जातीच्या दाव्यांची तपासणी प्रक्रिया मा. सर्वोच्च न्यायालयाने कु. माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर प्रकरणी दिलेल्या

मार्गदर्शक सूचनेतील परिच्छेद क्र. ६, ७, ८ व ९ मधील तरतुदीनुसार संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने कार्यवाही करावी.

२. शासन याबाबत पुढे असेही आदेश देत आहे की, यार्पूर्वी संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे नव्याने दाखल झाली आहेत असे गृहीत धरावे व अशा प्रकरणांच्या संदर्भात योग्यतो निर्णय त्वरित घेऊन तो संबंधितांना कळवावा.

३. हे आदेश पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येत आहेत.

४. अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांनी वरील आदेशाचे कृपया काटेकोरपणे अनुपालन करावे.

५. हा शासन निर्णय, नगर विकास विभाग, ग्राम विकास, जलसंधारण विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रामानंद तिवारी**
**सचिव,**
**आदिवासी विकास विभाग.**

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची / दाव्यांची तपासणी. तपासणी समितीच्या कामाचे स्वरुप व अधिकाराबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक एसटीसी-१३९९/प्र.क्र.२/ का.१०
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ सप्टेंबर, १९९९.

<u>वाचा</u> :-(१) शासन परिपत्रक, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी-१६८०/१९९६१/का.५, दिनांक ६ मे, १९८० व शुध्दीपत्रक दिनांक : ३ जून, १९८०.

(२) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी-१६८०/४३६६९/का.५, दिनांक : २९ ऑक्टोबर, १९८०.

(३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : सीबीसी-१६८४/२८१८/(२९१)/का.११, दिनांक : २३ जानेवारी, १९८५.

(४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : सीबीसी-१६८४ /(३९२)/का.११, दिनांक : ८ मार्च, १९८५.

(५) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक : सीबीसी- १६८५/(५१३)/का.१०, दिनांक : १३ ऑगस्ट १९८५.

(६) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : सीबीसी- १६८५/(५१३)/का.१०, दिनांक : १८ एप्रिल, १९८६.

(७) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी- १०९०/२३९४२/१८६/ का.१०, दिनांक : ३ जून १९९२.

(८) सह सचिव, कल्याण मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे अर्ध शासकीय पत्र कमांक : १२०१८/१३ /९५-एससीडी /आर-सेल, दिनांक : २५ सप्टेंबर, १९९५.

(९) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी- १०९५/प्र.क्र.११८/का.१०, दिनांक : २६ ऑक्टोबर, १९९५.

(१०) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१६९६/प्र.क्र.३४/का.१०, दिनांक : ७ मार्च, १९९६.

(११) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१८९५/प्र.क्र.१८२/भाग-२ का.१०, दिनांक : १५ मार्च, १९९६.

(१२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१८९५/प्र.क्र.१८२/का.१०, दिनांक : १४ जुलै, १९९७ व शुध्दीपत्रक दिनांक : २३ जुलै, १९९७.

(१३) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१०९८/प्र.क्र.३३/का.१०, दिनांक : ११ जून, १९९८.

(१४) शासन शुध्दीपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१०९९/प्र. क्र३३/का.१०, दिनांक १६ एप्रिल,१९९९.

(१५) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१०९८/प्र.क्र.३३/का.१०, दिनांक : १९ एप्रिल, १९९९.

**<u>शासन निर्णय</u> :-** अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्याकरिता पुणे, नाशिक, व नागपूर येथे ३ समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या समित्यांचे कामाचे स्वरुप व अधिकार, जाती प्रमाणपत्र तपासणी समितीची रचना, दक्षता पथकाची रचना, जे अनुसूचित जमातीचे विद्यार्थी वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्षाला प्रवेश घेऊ इच्छितात त्यांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणीबाबतची कार्यपध्दती व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या प्रभागातून निवडून येणाऱ्या उमेदवारांचे जातीचे दाखले तपासणे, इत्यादी बाबतचे आदेश संदर्भांकित शासन आदेशान्वये दिलेले आहेत. या सर्व तरतुदी एकत्रितकरणाचा व सुलभिकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. वरील सर्व आदेश अधिक्रमित करुन एकत्रित आदेश निर्गमित करण्यात येत आहे. सर्व संबंधितांनी जाती प्रमाणपत्र पडताळणी करताना खालील आदेशांचे अनुपालन करावे.

**अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची रचना.**

२.१ राज्यातील विविध महसूल विभागांकरिता असलेल्या जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची रचना पुढील प्रमाणे आहे.

(अ) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे
(कार्यक्षेत्र : पुणे व मुंबई महसूल विभाग)

| | |
|---|---|
| (१) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे | अध्यक्ष |
| (२) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे | सदस्य |
| (३) उप संचालक (संशोधन) | सदस्य सचिव |
| (४) संशोधन अधिकारी | सदस्य |
| (५) संशोधन अधिकारी | सदस्य |

(ब) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक
(कार्यक्षेत्र : नाशिक व औरंगाबाद महसूल विभाग)

| | |
|---|---|
| (१) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | अध्यक्ष |
| (२) (अ) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक | सदस्य (नाशिक विभाग) |
| (ब) अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती | सदस्य (औरंगाबाद विभाग) |
| (३) उपसंचालक (संशोधन) | सदस्य सचिव |
| (४) संशोधन अधिकारी | सदस्य |
| (५) संशोधन अधिकारी | सदस्य |

(क) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर
(कार्यक्षेत्र : अमरावती व नागपूर महसूल विभाग)

| | |
|---|---|
| (१) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे. | अध्यक्ष |
| (२) (अ) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर | सदस्य (नागपूर विभाग) |
| (ब) अपर आयुक्त,आदिवासी विकास, अमरावती | सदस्य (अमरावती विभाग) |
| (३) उपसंचालक (संशोधन) | सदस्य सचिव |
| (४) संशोधन अधिकारी | सदस्य |
| (५) संशोधन अधिकारी | सदस्य |

२.२ अनुसूचित जमातीच्या जातीच्या दाव्याच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रत्येक सुनावणीच्या मुलाखतीच्यावेळी तीन सदस्यांची गणपूर्ती आवश्यक राहील. या तीन सदस्यांपैकी कमीत कमी एक सदस्य अध्यक्ष किंवा अपर आयुक्त असेल.

**जातीचे प्रमाणपत्र / जातीचा दावा तपासणीकरिता समितीकडे सादर करावयाची कागदपत्रे**

३.१ जातीचे प्रमाणपत्र / जातीचा दावा तपासण्याकरिता संबंधितांनी खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावे समितीकडे पाठविणे आवश्यक आहे :-

(अ) संबंधित व्यक्ती ज्या ठिकाणची मूळ रहिवासी असेल त्याच ठिकाणच्या सक्षम अधिका-याने, शासनाने निर्धारीत केलेल्या नमुन्यात दिलेले जातीचे मूळ प्रमाणपत्र.

(ब) संबंधित व्यक्तीचे प्राथमिक व माध्यमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र.

(क) संबंधित व्यक्तीने ज्या शाळेत / महाविद्यालयात शिक्षणक्रमाचे अंतिम वर्ष पूर्ण केले असेल/ करीत असेल ती शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा त्या शाळा / महाविद्यालयाच्या दप्तरात असलेल्या जातीच्या नोंदीसंबंधीचे प्रमाणपत्र.

(ड) संबंधित व्यक्ती शासकीय सेवेत असेल तर त्याच्या सेवापुस्तकातील जाती विषयक नोंद असलेल्या पृष्ठाचा उतारा.

(इ) संबंधित व्यक्तीच्या वडीलांच्या प्राथमिक / माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म-मृत्यू नोंदवहीतील उतारा.

(फ) संबंधित व्यक्तीच्या जवळच्या नात्यातील म्हणजे वडील/ वडील भाऊ/ चुलते/ चुलत भाऊ/ चुलत बहीण किंवा रक्ताचे नातेसंबंध असलेल्या वडीलधारी नातेवाईकांचे जातीचे प्रमाणपत्र किंवा त्यांच्या जन्म नोंदणी रजिस्टरमधील उतारा.

(ग) संबंधित व्यक्तीच्या वर नमूद केलेल्या रक्ताचे नातेसंबंध असलेल्या नातेवाईकांपैकी शासन सेवेत असलेल्या नातेवाईकांच्या सेवा पुस्तकातील जातीची नोंद असलेल्या पृष्ठाचा प्रमाणित उतारा.

३.२ विशिष्ट प्रकरणात वरीलप्रमाणे नमूद केलेले पूराव्यांव्यतिरिक्त अतिरिक्त कागदोपत्री पुरावे आवश्यक आहेत अशी खात्री जाती प्रमाणपत्र तपासणी समितीची झाल्यास ती कागदपत्रे मागण्याची मुभा त्यांना राहील.

**अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या कामाचे स्वरुप**

४.१ अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीला खालीलप्रमाणे जातीच्या दाखल्यांची तपासणी करण्याचे अधिकार आहेत. तपासणीमधे जातीचे प्रमाणपत्र अवैध आढळल्यास ते रद्द करण्याचे व जप्त करण्याचे अधिकार समितीस रहातील. या बाबतीत तपासणी समितीचा निर्णय अंतिम राहील.

(अ) वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची / जातीच्या दाव्यांची तपासणी करणे.

(ब) अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोग / विविध निवडमंडळे, प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे व निवड समित्या यांच्यामार्फत शासन सेवेत नियुक्तीसाठी शिफारस

करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जातीच्या प्रमाणपत्रांची/ जातीच्या दाव्यांची तपासणी करणे.

(क) शासन सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्या जाती दाव्याच्या संदर्भात संबंधित विभाग / कार्यालये यांच्याकडून प्राप्त झालेल्या जाती दाव्यांच्या प्रकरणांची तपासणी करणे.

(ड) शासन, आदिवासी विकास विभागामार्फत सोपविलेल्या जातीच्या प्रमाणपत्रांच्या / दाव्याच्या प्रकरणांची तपासणी करणे.

(इ) मा. उच्च न्यायालयाकडून अनुसूचित जमातीच्या जातीच्या प्रमाणपत्रांची / दाव्यांची तपासणी करण्याबाबत सोपविलेली सर्व प्रकरणे.

(फ) महाराष्ट्र राज्याचे कायम रहिवासी असलेल्या ज्या व्यक्तींची केंद्रशासनाच्या सेवेत व केंद्रशासनाच्या अंगीकृत उपक्रमात राखीव जागेवर नेमणूक करण्यात आली आहे अशा अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या जातीच्या प्रमाणपत्रांची /दाव्यांची तपासणी करणे.

(ग) जिल्हा परिषदा, नगरपालिका, निमशासकीय कार्यालये, बँका, शासकीय व निमशासकीय उपक्रम (उदा. एस.टी. महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळ) व राज्य शासन अंगीकृत इतर संस्था इत्यादीमध्ये अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांवर नेमणुकीसाठी शिफारस केलेल्या सर्व कर्मचा-यांची / अधिका-यांची प्राप्त झालेली जातीची प्रमाणपत्रे/ दावे तपासणे.

(ह) अनुसूचित जमातीच्या नसलेल्या व्यक्तीला जर सक्षम अधिका-यांनी अनुसूचित जमातीचे जातीचे प्रमाणपत्र दिले आहे अशा प्रकारच्या तक्रारीची तपासणी करणे.

(ज) जातीचा दाखला द्यावयास नाकारुन सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द १५ दिवसाचे आत संबंधित अर्जदाराने समितीपुढे अपिल केल्यावर त्यावर निर्णय देणे. (यासाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी अर्जदारास अर्ज का नाकारण्यात आला आहे त्याबाबतची कारणे कळवावीत तसेच संबंधित समितीकडे १५ दिवसाच्या आता अपिल अर्ज सादर करु शकतात असे कळवावे.)

(ल) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या प्रभागातून निवडणूक लढवून निवडून आलेल्या उमेदवारांच्या अनुसूचित जमातीच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणीकरिता संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे १५ दिवसाच्या आत आवश्यक त्या कागदपत्रासह पाठविल्यानंतर संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने अशा उमेदवारांच्या जाती दाव्याची पडताळणी ४५ दिवसाच्या आत करुन घेतलेला निर्णय संबंधित जिल्हाधिका-यांकडे पाठविणे.

४.२ अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्रांची / जातीच्या दाव्याची तपासणी प्रक्रिया मा. सर्वोच्च न्यायालयाने कु. माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर या प्रकरणी (विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १४७६७/९३ मधील सिव्हील अर्ज क्रमांक ५८५४/९४) दिलेल्या मार्गदर्शक सूचनेतील तरतुदीनुसार संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने कार्यवाही करावी.

**वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना वेळेवर वैधता प्रमाणपत्र देण्याकरिता अवलंबावयाची कार्यपध्दती**

५.१ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरिता राखीव जागा असतात. त्या जागांकरिता अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरिता प्रवेश अर्ज सादर करताना जातीचा

दाखला जोडावा. मात्र प्रवेशाच्या वेळी अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडील वैधता प्रमाणपत्र सादर करावे. त्यानंतरच राखीव जागेवर प्रवेश दिला जाईल. याकरिता खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

(अ) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज व त्यामध्ये निदेर्श केलेली कागदपत्रे खाली दर्शविलेल्या समित्यांकडे पाठविण्यासाठी संबंधित शैक्षणिक संस्थेकडे १५ नोव्हेंबर पर्यंत सादर करावीत.

| | समिती | जिल्हा | विभाग |
|---|---|---|---|
| (१) | अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, २८ क्वीन्स गार्डन, पुणे -४११ ००१. | पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर | पुणे विभाग |
| | | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | कोकण विभाग |
| (२) | अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, रमाबाई आंबेडकर कन्या शाळेजवळ, जुना आग्रारोड, नाशिक-४२२ ०२२. | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, अहमदनगर, | नाशिक विभाग |
| | | औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली | औरंगाबाद विभाग |
| (३) | अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर- ४४० ०१०. | बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ. | अमरावती विभाग |
| | | वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया. | नागपूर विभाग |

(ब) सर्व शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे ३० नोव्हेंबर पर्यंत पोहोचतील या बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी.

(क) जे अर्ज विहित मुदतीत अनुसूचित जमाती जाती तपासणी समितीकडे सादर होणार नाहीत ते अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जावू नयेत.

(ड) संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने त्यांच्याकडे दि. ३० नोव्हेंबर पर्यंत प्राप्त झालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करुन त्या प्रमाणपत्राच्या वैध / अवैधतेबाबत आपला निर्णय सर्व विद्यार्थ्यांना पुढच्या ३१ मे पूर्वी कळविण्यात यावा.

५.२ उच्च व तंत्रशिक्षण विभाग व शालेय शिक्षण विभाग यांनी तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल्या संबंधित अधिका-यांनी या शासन निर्णयाच्या प्रती विज्ञान शाखेच्या ११ वी व १२ वी इयत्तेचे वर्ग चालवित असलेल्या सर्व विश्वविद्यालयांना, महाविद्यालयांना, कनिष्ठ महाविद्यालयांना व शाळांना पाठवाव्यात आणि या बाबीला प्रत्येक वर्षी शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीस मोठया प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. ही प्रसिध्दी शाळा / महाविद्यालयाच्या सूचना फलकावर योग्य प्रकारची सूचना लावून प्रसिध्दी द्यावी. तसेच वर्गामध्ये

स्वतंत्र बैठका घेऊन अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना या सुधारीत पध्दतीची माहिती द्यावी. तसेच या शासन निर्णयातील सूचना अनुसूचित जमातीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या वैयक्तिक नजरेस लेखी आणाव्यात व त्याची पोच रेकॉर्डवर ठेवावी.

**अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून ३ महिन्यात पडताळणी समितीचा निर्णय प्राप्त न झाल्यास नियुक्ती देण्याबाबत**

६.१ महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तसेच विविध निवड मंडळांमार्फत अनुसूचित जमातीकरीता राखीव असलेल्या पदावर शिफारस झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी संबंधित विभागांनी / कार्यालयांनी जाती प्रमाणपत्र पडताळणीबाबतची सर्व कागदपत्रे अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावीत. अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने जादा कागदपत्रांची मागणी केल्यानंतर उमेदवारांनी त्याची पूर्तता केल्यानंतर ३ महिन्यात तपासणी समितीने निर्णय द्यावा. तपासणी समितीचा निर्णय या मुदतीत प्राप्त झाला नाही तर संबंधित विभागाने उमेदवारास तपासणी समितीच्या निर्णयाच्या अटीच्या अधिन राहून नेमणूक द्यावी. अशा प्रकरणात विलंब टाळण्याकरिता सर्व विभागांनी / कार्यालयांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे वेळेत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स. नु. गावीत**
**शासनाचे अवर सचिव.**

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची / दाव्याची तपासणी. तपासणी समितीच्या कामाचे स्वरुप व अधिकाराबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
शुध्दीपत्र क्र. एसटीसी-१३९९/प्र. क्र. २/का-१०
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक १५ जानेवारी २०००.

**वाचा :-** १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१३९९ / प्र. क्र. २/का-१०, दि. ९ सप्टेंबर,१९९९.

२) सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे पत्र क्रमांक एसईसी/जीलईएन-११९९ /प्र. क्र.५६/ का-१०, दिनांक २० ऑक्टोबर,१९९९.

**शुध्दीपत्र** :-

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१३९९ / प्र. क्र. २/का-१०, दि. ९ सप्टेंबर,१९९९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४.१ मधील (ल) मध्ये सुधारणा करण्यात येत असून आता सदर परिच्छेद खाली नमूद केल्याप्रमाणे वाचावा.

"महानगरपालिकांमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेवर निवडून आलेल्या सदस्यांची जात प्रमाणपत्रे संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्रे तपासणी समितीकडे संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी पाठवावी व स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगर परिषदा व नगर पंचायतीमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेवर निवडून आलेल्या सदस्यांची जात प्रमाणपत्रे संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्रे तपासणी समितीकडे संबंधित जिल्हाधिकारी यांनी पाठवावी, निवडून आलेल्या उमेदवारांच्या संबंधी जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून प्राप्त झालेल्या जाती प्रमाणपत्र पडताळणी अर्जाबाबत अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्रे तपापसणी समितीने त्वरित कार्यवाही करुन ४५ दिवसात आपला निर्णय पाठविणे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स. नु. गावीत**
**शासनाचे अवर सचिव.**

**अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्र /दाव्यांची तपासणी ----**

**-------------------------------------------------------**

**जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कामाचे स्वरुप व अधिकाराबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग
आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग.
शासन निर्णय क्र. सीबीसी - १२ - २०००/ २५२ / प्र. क्र. १ / इमाव -५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २५ जानेवारी, २०००

वाचा :- १) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. सीबीसी- १६८० / १९९६१ / का - ५, दि. ६ मे, १९८० व शुध्दीपत्रक क्र. ३ जून, १९८०.

२) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. सीबीसी - १६८० / ६५३९६ (४९९) / का - ५, दि. ६ सप्टेंबर, १९८३.

३) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक सीबीसी-१६८३/गोप.१०१६/(१५३८)/का-५, दि.२३ सप्टेंबर, १९८३

४) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. सीबीसी -१६८४/ गोप.५९२/ (१९९९) / बीसीडब्ल्यू -५, दि. १४ मार्च, १९८५

५) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. सीबीसी - १६८४ /गोप. ५९२ / (१९९९) / बीसीडब्ल्यू -५, दि. १६ ऑक्टोबर, १९८५.

६) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. सीबीसी - १०८४ / ७४९३२ / (२०८३) / बीसीडब्ल्यू - ५, दि. ५ डिसेंबर, १९८५.

७) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. सीबीसी - १५८४ / ७१७५१ / (२२९७) / बीसीडब्ल्यू - ५, दि. १८ एप्रिल, १९८६.

८) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. सीबीसी - १६८६ / १४६५८ / (२४५२) / मावक - ५, दि. १ एप्रिल, १९८७.

९) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्र. सीबीसी - १६८८ / (२८२९) / मावक - ५, दि. २९ जुलै १९८८

१०) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्र. सीबीसी - १६९४ / ४०१२४ / प्र. क्र. २५६ / मावक -५, दि. २६ डिसेंबर, १९९४.

११) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्र. सीबीसी - १६८४ /गोप ५९२ / (१९९९) / मावक - ५, दि. २७ एप्रिल, १९९५.

१२) शासन निर्णय , समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९६ /प्र. क्र. ४८/ मावक - ५, दि. ३ जून, १९९६.

१३) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९६ / सीआर - १२४ / मावक - ५, दि. २३ जुलै, १९९६.

१४) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९६ / प्र. क्र. १२३ / मावक - ५, दि. २१ ऑगस्ट १९९६.

१५) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १६९६ / प्र. क्र. ४६ / मावक - ५, दि. ३ जुलै, १९९७.

१६) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९६ / प्र. क्र. ४८ / मावक - ५, दि. ५ जुलै, १९९७.

१७) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्रमांक सीबीसी - १०९६ / प्र. क्र. ४८/ मावक - ५, दि. १६ जुलै, १९९७.

१८) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९७ / प्र. क्र. २०७ / मावक - ५, दि. १ जानेवारी, १९९८.

१९) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १६९६ / प्र. क्र. ४६ / (भाग -३) / मावक - ५, दि. १६ मार्च, १९९८.

२०) शासन पत्र, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९८/ २९०९२/ प्र. क्र. ३०५ / मावक - ५, दि. १५ मार्च, १९९९.

२१) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा विभाग,
क्र. सीबीसी - १०९८ / प्र. क्र. २०७ / मावक - ५, दि. ३ सप्टेंबर, १९९९.

२२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग क्र. सीबीसी - १०९८ / १४८५० / प्र.क्र. ११८ / इमाव - ५, दि. २० डिसेंबर, १९९९.

**शासन निर्णय :** अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती येथे सहा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्या समित्यांची कर्तव्ये, रचना, त्या समित्यांना मदत करण्यासाठी दक्षता पथकाची निर्मिती, जातीप्रमाणपत्र तपासण्याची कार्यपध्दती इत्यादी बाबतचे आदेश संदर्भांकित शासन आदेशान्वये दिलेले आहेत. त्यामध्ये काही सुधारणा करणे तसेच त्या सर्व तरतुदी एकत्रित करुन त्यांचे सुलभीकरणाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. वरील सर्व आदेशातील सारांश रुपातील बदलांसह जाती प्रमाणपत्र तपासणीबाबत खालीलप्रमाणे एकत्रित सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहे. तरी सर्व संबंधितांनी वरील प्रवर्गातील जातीच्या प्रमाणपत्रांची /दाव्यांची पडताळणी करताना खालील आदेशांचे अनुपालन करावे.

२) **अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची रचना.**

२ (१) राज्यातील सहा महसूल विभागाकरिता असलेल्या जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची रचना पुढील प्रमाणे आहे :-

१) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे.

१) अतिरिक्त आयुक्त (महसूल), पुणे विभाग, पुणे - अध्यक्ष
२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे. - सदस्य
३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे. - सदस्य सचिव

२) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, कोकण विभाग, मुंबई.

१) अतिरिक्त आयुक्त (महसूल), कोकण विभाग, मुंबई - अध्यक्ष
२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, कोकण विभाग, मुंबई - सदस्य
३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई - सदस्य सचिव

३) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक.

१) अतिरिक्त आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक - अध्यक्ष
२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक - सदस्य
३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नाशिक - सदस्य सचिव

४) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

१) अतिरिक्त आयुक्त (महसूल), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - अध्यक्ष
२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - सदस्य
३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण औरंगाबाद - सदस्य सचिव

५) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर.

१) अतिरिक्त आयुक्त (महसूल), नागपूर विभाग, नागपूर - अध्यक्ष
२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर - सदस्य
३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नागपूर - सदस्य सचिव

६) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती.

१) अतिरिक्त आयुक्त (महसूल), अमरावती विभाग, अमरावती - अध्यक्ष
२) विभागीय समाजकल्याण अधिकारी, अमरावती विभाग, अमरावती - सदस्य
३) संशोधन अधिकारी / जिल्हा समाजकल्याण अधिकारी, अमरावती - सदस्य सचिव

३. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग दाव्याच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रत्येक सुनावणीच्या मुलाखतीच्या वेळी **दोन** सदस्यांची गणपूर्ती आवश्यक राहील. जातीची वैधता प्रमाणपत्रे ही वरील तिन्ही अधिका-यांच्या सहया व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी निर्गमित करणे आवश्यक आहे.

४. **<u>अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या कामाचे स्वरुप.</u>**

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या जाती प्रमाणपत्र तपासणी समितीला खालील प्रमाणे जातीच्या दाखल्याची तपासणी करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तपासणीमध्ये जातीचे प्रमाणपत्र अवैध आढळल्यास ते रद्द व जप्त करण्याचे अधिकार समितीस राहतील. याबाबतीत तपासणी समितीचा निर्णय अंतिम राहील.

१) ठराविक वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र व औषध निर्माणशास्त्र या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयात पहिल्या वर्षाकरिता प्रवेश घेणा-या त्यांच्या विभागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची (अनुसूचित जमाती वगळून) जातीच्या प्रमाणपत्रांची / जातीच्या दाव्यांची तपासणी करणे.

२) शासन सेवेत मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावर नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग / विविध निवड मंडळे, प्रादेशिक दुय्यम सेवा मंडळे व निवड समित्या यांच्यामार्फत शिफारस करण्यात आलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या (अनुसूचित जमाती वगळून) जातीच्या प्रमाणपत्रांची / जातीच्या दाव्यांची तपासणी करणे.

३) शासनाच्या समाजकल्याण तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभागामार्फत जातीच्या प्रमाणपत्रांच्या / दाव्यांच्या तपासणीबाबत सोपविलेली अन्य प्रकरणे तपासणे.

४) जे कर्मचारी अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गामध्ये राखीव असलेल्या पदावर नियुक्त झालेले आहेत अशा कर्मचा-यांच्या जाती दाव्याच्या संदर्भात संबंधित विभाग / कार्यालय यांच्याकडून प्राप्त झालेल्या कर्मचा-यांच्या / अधिका-यांच्या जातीदाव्यांच्या प्रकरणांची तपासणी करणे.

५) यापूर्वी अमागासवर्गीय म्हणून शासन सेवेत प्रवेश केला आहे व त्यानंतर एखाद्याची जात मागासवर्गीय म्हणून घोषित केलेली आहे व मागासवर्गीय म्हणून त्यांना असलेल्या आरक्षणाचा फायदा घेवू इच्छित असल्यास अशांचे जाती दावे तपासणे.

६) महाराष्ट्र राज्याचे कायम रहिवासी असलेल्या ज्या व्यक्तींची केंद्र शासनाच्या सेवेत व केंद्र शासनाच्या अंगीकृत उपक्रमात राखीव जागेवर नेमणूक करण्यात आली आहे अशा मागासवर्गीय व्यक्तींच्या (अनुसूचित जमाती वगळून) जातींच्या प्रमाणपत्रांची तपासणी करणे.

७) जिल्हापरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, निमशासकीय कार्यालय, बँका, शासकीय व निमशासकीय उपक्रम (उदा एस.टी. महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ इत्यादी) व राज्य शासन अंगीकृत इतर संस्था इत्यादी मध्ये मागासवर्गीयांसाठी राखीव जागांवर (अनुसूचित जमाती वगळून) नेमणूकीसाठी शिफारस केलेल्या सर्व कर्मचा-यांच्या / अधिका-यांची प्राप्त झालेली जातीची प्रमाणपत्रे / दावे तपासणे.

८) एखाद्या उमेदवाराची / कर्मचा-याची पूर्वी अमागासवर्गीय म्हणून शासन सेवेत नियुक्ती झाली असेल व ते आता मागासवर्गीय असल्याचा दावा करीत असेल किंवा पूर्वी त्याच्या मागासवर्गाच्या विशिष्ट वर्गवारीचा दावा होता, परंतु तो आता मागासवर्गाच्या दुस-या वर्गवारीचा दावा करीत असेल अथवा त्याच्या जाती प्रमाणपत्रात नमूद असलेली जात यामध्ये तफावत असेल अशी जाती दाव्यांची प्रकरणे तपासणे.

९) शासन सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्या जाती दाव्याच्या संदर्भात संबंधित विभाग / कार्यालय यांच्याकडून प्राप्त झालेल्या जाती दाव्याच्या संदर्भात तपासणी करणे.

१०) मा. मुंबई उच्च न्यायालय, तसेच औरंगाबाद व नागपूर खंडपीठाकडून अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या जातींच्या प्रमाणपत्रांची / दाव्यांची तपासणी करण्यासाठी सोपविलेली सर्व प्रकरणे तपासणे.

११) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जातींच्या नसलेल्या व्यक्तींला जर सक्षम अधिका-यांनी वरील प्रवर्गातील जातीचे प्रमाणपत्र दिलेले आहे अशा प्रकारच्या तक्रारींची तपासणी करणे.

१२) जातीचे प्रमाणपत्र देणा-या सक्षम अधिका-यांनी एखाद्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र देण्याचे नाकारल्यास त्या सक्षम प्राधिका-यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द १५ दिवसाच्या आत संबंधित अर्जदाराने समितीपुढे अपिल केल्यास त्यावर निर्णय देणे. (यासाठी संबंधित सक्षम अधिका-याने अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देण्याचे का नाकारण्यात आले याबाबतची कारणे कळवून सदरच्या निर्णयाविरुध्द संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे १५ दिवसाच्या आत अपिल अर्ज करु शकतात असे कळवावे.)

१३) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्गाच्या ज्या विद्यार्थ्यांनी आपले वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र या अभ्यासक्रमाचे पदवी शिक्षण खुल्या वर्गातून केले आहे व ते त्यांचे पुढील पदव्युतर शिक्षण मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागांवर (अनुसूचित जमाती वगळून) घेऊ इच्छित असतील अशा विद्यार्थ्यांच्या जातीप्रमाणपत्राच्या अर्जाची तपासणी करणे.

१४) स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग करिता राखीव असलेल्या प्रभागातून निवडणूक लढवून निवडून आलेल्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी करण्याकरिता जातीचे प्रमाणपत्र आवश्यक त्या कागदपत्रांसह संबधित जिल्हाधिकारी / संबंधित महापालिका आयुक्त, यांनी संबंधित अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे १५ दिवसाच्या आत पाठविल्यानंतर संबंधित जात प्रमाणपत्र तपासणी समितीने अशा उमेदवारांच्या जाती दाव्याची पडताळणी ४५ दिवसाच्या आत करुन घेतलेला निर्णय संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्ताकडे पाठविणे.

५. अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्रांची / जातीच्या दाव्याची तपासणी प्रक्रिया मा. सर्वोच्च न्यायालयाने कु. माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर या प्रकरणी (विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १४७६७/९३ मधील सिव्हील अर्ज क्रमांक ५८५४ / ९४) दिलेल्या मार्गदर्शक सूचनेतील तरतुदींनुसार संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने

६. **जातीचे प्रमाणपत्र / जातीचा दावा तपासणीकरिता समितीकडे सादर करावयाची कागदपत्रे.**

जातीचे प्रमाणपत्र / जातीचा दावा तपासण्याकरिता संबंधितांनी खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावे समितीकडे पाठविणे आवश्यक आहे :-

(अ) संबंधित व्यक्ती ज्या ठिकाणची मूळ रहिवासी असेल त्याच ठिकाणच्या सक्षम अधिका-याने, शासनाने निर्धारित केलेल्या नमुन्यात दिलेले जातीचे मूळ प्रमाणपत्र.

(ब) संबंधित व्यक्तीचे प्राथमिक व माध्यमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र,

(क) संबंधित व्यक्तीने ज्या शाळेत / महाविद्यालयात शिक्षणक्रमाचे अंतिम वर्ष केले असेल / करीत असेल ती शाळा / महाविद्यालयाच्या दप्तरात असलेल्या जातीच्या नोंदीसंबंधीचे प्रमाणपत्र.

(ड) संबंधित व्यक्ती शासकीय सेवेत असेल तर त्याच्या सेवापुस्तकातील जाती विषयक नोंद असलेल्या पृष्ठाचा उतारा.

(इ) संबंधित व्यक्तीच्या वडीलांच्या प्राथमिक / माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म -मृत्यू नोंदवहीतील उतारा.

(फ) संबंधित व्यक्तीच्या नात्यातील म्हणजे वडील / वडील भाऊ / चुलते /चुलत भाऊ / चुलत बहीण किंवा रक्ताचे नातेसबंध असलेल्या वडीलधारी नातेवाईकांचे जातीचे प्रमाणपत्र किंवा त्यांच्या जन्म नोंदणी रजिस्टरमधील उतारा.

(ग) संबंधित व्यक्तीच्या वर नमूद केलेल्या रक्ताचे नातेसंबंध असलेल्या नातेवाईकांपैकी शासन सेवेत असलेल्या नातेवाईकांच्या सेवा पुस्तकातील जातीची नोंद असलेल्या पृष्ठाचा प्रमाणित उतारा.

विशिष्ट प्रकरणात वरीलप्रमाणे नमूद केलेले पुराव्यांव्यतिरिक्त अतिरिक्त कागदोपत्री पुरावे आवश्यक आहेत अशी खात्री जाती प्रमाणपत्र तपासणी समितीची झाल्यास, ती कागदपत्रे मागण्याचा अधिकार समितीस राहील.

**७. वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र व औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणा-या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना वेळेवर वैधता प्रमाणपत्र देण्याकरिता अवलंबावयाची कार्यपध्दती.**

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधशास्त्र, वास्तुशास्त्र अभ्यासक्रमांसाठी राखीव जागा असतात. या जागांकरिता विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करताना जातीचा दाखला जोडावा मात्र प्रवेशाच्या वेळी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करावे त्यानंतरच राखीव जागेवर प्रवेश दिला जाईल. त्याकरिता खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

(अ) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जातीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेच्या इयत्ता ११ वीत शिकत असतांना विहित नमुन्यातील अर्ज व त्यामध्ये निर्देश केलेली कागदपत्रे खाली दर्शविलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे पाठविण्यासाठी संबंधित शैक्षणिक संस्थेकडे प्रत्येक वर्षी ३० नोव्हेंबर पर्यंत सादर करावीत.

| समिती | जिल्हा | विभाग |
|---|---|---|
| १) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, व विशेष मागासप्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे. गणेश पेठ, पांगुळ आळी, सुंगधा हॉटेल, पुणे विभाग, पुणे -४११ ००२. | पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर. | पुणे विभाग |
| २) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, व विशेष मागासप्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, कोकण विभाग, मुंबई, कोकण भवन, ६ वा मजला, विस्तारित इमारत,रुम नं.७१, नवी मुंबई - ४०० ०६१४. | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग, | कोकण विभाग |
| ३) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, व विशेष मागासप्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, महसूल विभाग कार्यालय आवार, नाशिक नाशिक रोड - ४२२ १०१ | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव व अहमदनगर, | नाशिक विभाग |
| ४) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद, जालना रोड, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर व हिंगोली. | औरंगाबाद विभाग |
| ५) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, व विशेष मागासप्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर प्लॉट नं. १४३, श्री. दंदे यांची इमारत शिवाजीनगर, नागपूर. | वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर गडचिरोली व गोदिया | नागपूर विभाग. |
| ६) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, व विशेष मागासप्रवर्गाची जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती गोविंद कुंज, अंबा पेठ, अमरावती विभाग, अमरावती. | बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती व यवतमाळ. | अमरावती विभाग |

(ब) सर्व शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे दि. १५ डिसेंबर पर्यंत पोहचतील या बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी.

(क) संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी, यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेले अर्ज संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे ३१ डिसेंबर पर्यंत न चुकता पाठवावेत.

(ड) जे अर्ज विहित मुदतीत जात प्रमाणपत्र समितीकडे सादर होणार नाहीत असे अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाऊ नयेत.

(इ) जात प्रमाणपत्र समितीकडे प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची नोंद समितीने नोंद रजिस्टरमध्ये घेऊन एकूण प्राप्त झालेल्या अर्जापैकी प्रत्येक महिन्यात किती अर्जावर कार्यवाही केली वा अंतिम निर्णय घेतला या बाबतचा साद्यंत अहवाल समितीने पुढील महिन्याच्या १० तारखे पर्यंत शासनास सादर करावा.

(ई) संबंधित जात प्रमाणपत्र समितीकडे दि. ३१ डिसेंबर पर्यंत प्राप्त झालेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करुन त्या प्रमाणपत्रांच्या वैध / अवैधबाबतचा आपला निर्णय सर्व विद्यार्थ्यांना पुढच्या वर्षाच्या ३१ मे पर्यंत कळवावा.

(उ) एखाद्या जात प्रमाणपत्र समितीने दिलेल्या निर्णयाविरुध्द उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणात संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने त्या प्रकरणासंबंधिचे परिच्छेद निहाय अभिप्राय तसेच आवश्यकतेनुसार शपथपत्र, आवश्यक ती माहिती व कागदपत्रे शासनाच्या वतीने न्यायालयास विनाविलंब सादर करावीत. तसेच अशा प्रकरणांचा प्रगती अहवाल शासनास वेळच्या वेळी सादर करावा.

८. उच्च व तंत्रशिक्षण विभाग व शालेय शिक्षण विभाग यांनी तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल्या संबंधित अधिका-यांनी या शासन निर्णयाच्या प्रती विज्ञान शाखेच्या ११ वी व १२ वी इयत्तेचे वर्ग चालवित असलेल्या सर्व विश्वविद्यालयांना, महाविद्यालयांना, कनिष्ठ महाविद्यालयांना व शाळांना पाठवाव्यात आणि या बाबीला प्रत्येक शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीस मोठया प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. ही प्रसिध्दी शाळा / महाविद्यालयाच्या सूचना फलकावर योग्य प्रकारची सूचना लावून प्रसिध्दी द्यावी. तसेच वर्गामध्ये स्वतंत्र बैठका घेऊन अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना या सुधारित पध्दतीची माहिती द्यावी. तसेच या शासन निर्णयातील सूचना अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या वैयक्तिक नजरेस लेखी आणाव्यात व त्याची पोच रेकॉर्डवर ठेवावी.

**९. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून ३ महिन्यात पडताळणी समितीचा निर्णय प्राप्त न झाल्यास नियुक्ती देण्याबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तसेच विविध निवड मंडळामार्फत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गा करीता राखीव असलेल्या पदावर शिफारस झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी संबंधित विभागांनी / कार्यालयांनी जाती प्रमाणपत्र पडताळणीबाबतची सर्व कागदपत्रे संबंधित अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावीत. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने जादा कागदपत्रांची मागणी केल्यानंतर

उमेदवारांनी त्यांची पूर्तता केल्यानंतर ३ महिन्यात तपासणी समितीने निर्णय द्यावा. तपासणी समितीचा निर्णय या मुदतीत प्राप्त झाला नाही, तर संबंधित विभागाने उमेदवारास तपासणी समितीच्या निर्णयाच्या अटीच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक द्यावी. अशा प्रकरणात विलंब टाळण्याकरिता सर्व विभागांनी / कार्यालयांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे वेळेत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

१०. हा शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. वा. मेहेर**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या पदावर नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांचे जातीचे दाखले तपासणे.**

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
शासन परिपत्रक, क्र. एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/ का.१०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ एप्रिल, २०००.

**परिपत्रक :-** अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दावा करताना सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करावे लागते. परंतू काही सक्षम प्राधिका-यांनी जे अनुसूचित जमातीचे नाहीत त्यांनादेखिल अनुसूचित जमातीचे असल्याचे जातीचे प्रमाणपत्र दिल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे त्यामुळे राखीव जागांवर हक्क सांगणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेले जातीचे प्रमाणपत्र वैध आहे किंवा कसे हे तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. म्हणून प्रथमत: दि. ६/५/१९८० च्या शासन परिपत्रक, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी-१६८०/१९९६१/का.५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकरिता शिफारस झालेल्या उमेदवारांचे जातीचे दाखले तपासण्याची तरतूद करण्यात आली. या विभागाकडे ज्यांच्या अनुसूचित जमातीच्या राखीव पदावर नियुक्त्या झालेल्या आहेत परंतू ते अनुसूचित जमातीचे नाहीत अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याशिवाय निवड मंडळे व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस झालेल्या उमेदवारांचे जातीचे दाखले तपासल्यानंतर नियुक्त्या दिल्या जाव्यात अशी तरतूद असतानादेखिल काही उमेदवारांचे जातीचे दाखले तपासलेले नाहीत असे दिसून आले आहे म्हणून ज्यांची नियुक्ती अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या पदावर झाली आहे परंतू जातीचा दाखला तपासण्यात आलेला नाही अशांचे जातीचे दाखले तपासण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यावर विचार करुन शासन असे आदेश देत आहे की, शासकीय / निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, बँका, शासकीय उपक्रम (उदा. एसटी महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ) व राज्य शासन अंगीकृत संस्थांमधे अनुसूचित जमातीच्या राखीव पदावर नियुक्ती झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे जातीचे दावे खाली नमूद केलेल्या पडताळणी समितीकडून तपासून घेण्यात यावेत व तपासणी अहवाल आदिवासी विकास विभागास सादर करण्यात यावा.

| समिती | जिल्हा | विभाग |
|---|---|---|
| १) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, २८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१ | पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर. | पुणे विभाग |
| | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग. | ठाणे विभाग |
| २) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ०२२. | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, अहमदनगर. | नाशिक विभाग |
| | औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली. | औरंगाबाद विभाग |

| | | |
|---|---|---|
| ३) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर -४४० ०१०. | बुलढाणा,अकोला,वाशिम, अमरावती, यवतमाळ. | अमरावती विभाग |
| | वर्धा, नागपूर, भंडारा,चंद्रपूर गडचिरोली, गोंदिया. | नागपूर विभाग. |

२. दिनांक ९ सप्टेंबर, १९९९ चा शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१३९९/प्र.क्र.२/का-१० तील परिच्छेद ३.१ मध्ये नमूद केलेली जाती दावा तपासण्याकरीता लागणारी कागदपत्रे पडताळणी समितीकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. जातीचा दाखला ज्या जाती प्रमाणपत्र तपासणीच्या हद्दीतील सक्षम अधिका-याचा आहे त्या त्या संबंधीत समितीकडे जातीचा दावा तपासण्याकरिता पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**स. नु. गावीत**
**शासनाचे अवर सचिव.**

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशाकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांच्या सेवेत नियुक्ती करण्याआधी अनुसूचित जमातीच्या जाती <u>प्रमाणपत्राबाबत वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन,**
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : एसटीसी-१०९९/प्र.क्र.१४/का.१०
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ ऑगस्ट, २०००.

<u>**पहा**</u> **:-**(१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस अॅन्ड पेन्शन्स, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक ३६०३६/८/९८ - ईएसटीटी (आरईएस), दिनांक १६.३.१९९९.
(२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१३९९/प्र.क्र.२/का.१०, दिनांक ९.९.१९९९.
(३) शासन शुध्दीपत्र, आदिवासी विकास विभाग, क्रमांक :एसटीसी-१३९९/प्र.क्र.२/का.१०, दिनांक १८७.७.२०००.

<u>**प्रस्तावना**</u> **:-** माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २.९.१९९४ रोजी निर्णय देतांना नियुक्तीपूर्वी सहा महिने अगोदर जातीचा दाखला पडताळून घेण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. तसेच अवर सचिव, भारत सरकार, मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस अॅन्ड पेन्शन्स, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक १६.३.१९९९ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, नियुक्ती देताना जातीच्या दाखल्याची योग्य ती पडताळणी व्हावी अशी शिफारस राष्ट्रीय अनुसूचित जाती, जमाती आयोगाने केलेली आहे. ती शिफारस केंद्र शासनाने स्वीकारली असून, राज्य शासनाने त्यावर आवश्यक ती कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या आहेत. आदिवासी विकास विभागाने दिनांक १७.७.२००० च्या शुध्दीपत्रका अन्वये अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या पदावर अनुसूचित जमातीच्या ज्या उमेदवारांची लोकसेवा आयोगामार्फत तसेच विविध निवड मंडळ/समिती मार्फत शिफारस केलेली आहे, त्यांची नियुक्ती करण्यापूर्वी संबंधित विभागाने / कार्यालयाने जाती प्रमाणपत्र पडताळणी बाबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावीत अशा प्रकारची तरतूद केलेली आहे. पडताळणी समितीला आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता उमेदवाराने केल्यानंतर सहा महिन्यात पडताळणी समितीने निर्णय द्यावयाचा असतो. सहा महिन्यात निर्णय दिला गेला नाही तर समितीच्या निर्णयाच्या अधीन राहून नेमणूक देण्याची तरतूद आहे. तात्पुरती नियुक्ती दिल्यानंतर यदाकदाचित जर जाती प्रमाणपत्र अवैध ठरल्यास संबंधित कर्मचारी /अधिकाऱ्याला सेवेतून काढून टाकण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३/अकरा, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९३ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९५/९९५/प्र.क्र.३/९६/अकरा, दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९६ अन्वये तरतूद केली आहे. या तरतूदी असतानादेखील अनुसूचित जमातीवर अन्याय होतो म्हणून अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना न्याय मिळण्यासाठी काही ठोस उपाययोजना करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

<u>**शासन निर्णय**</u> **:-** अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच मंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था येथील निवड मंडळामार्फत / निवड समिती मार्फत / विविध निवड मंडळे व लोकसेवा आयोगा मार्फत अनुसूचित जमातीकरीता राखीव असलेल्या पदावर शिफारस झालेल्या / निवड केलेल्या उमेदवारांचे जाती प्रमाणपत्र तपासण्याबाबत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी उमेदवारांना तात्काळ

कळवावे व संबंधित उमेदवारांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता एक महिन्याच्या आत संबंधित प्राधिकाऱ्यांकडे करावी. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर विभागाने / कार्यालयाने तात्काळ संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे कागदपत्रे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने आवश्यक ती पूर्ण कागदपत्रे प्राप्त झाल्यावर सहा महिन्याचे आ निर्णय घ्यावा व संबंधित विभागाने / कार्यालयाने जाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नियुक्ती द्यावी.

२. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नियुक्तीच्या वेळेस जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. जाती दाव्याबाबत वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती देण्यात यावी. जाती दावा वैधता प्रमाणपत्र मिळण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेवून महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे नियमन) नियमावली, १९८२ च्या कलम ४ (२) (अ) नुसार सक्षम प्राधिकाऱ्याने मुदत वाढवून दिलेल्या कालावधीत उमेदवारांना हजर करुन घेण्यात यावे.

३. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**स.न.गावीत**
**अवर सचिव.**

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या <u>जाती प्रमाणपत्रांची / दाव्यांची तपासणी.</u> तपासणी समितीच्या कामाचे स्वरुप व अधिकाराबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग
शुध्दीपत्र क्रमांक - एसटीसी-१३९९/प्र.क्र.२/का.१०
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक - २ मे, २००१.

**<u>वाचा</u> :-** आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-एसटीसी-१३९९/प्र.क्र.२/का.१०, दिनांक-९.९.१९९९

**<u>शुध्दीपत्र</u>** :- प्रस्तावनेतील दिनांक ९ सप्टेंबर, १९९९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४.१ मधील भाग "ग" पुढीलप्रमाणे आहे--"जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, निमशासकीय कार्यालये, बँका, शासकीय व निमशासकीय उपक्रम (उदा. एस.टी. महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ) व राज्य शासन अंगीकृत इतर संस्था इत्यादिमध्ये अनुसूचित जमातीसाठी राखीव जागावर नेमणूकीसाठी शिफारस केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची / अधिकाऱ्यांची प्राप्त झालेली जातीची प्रमाणपत्रे / दावे तपासणे" सदर भाग "ग" रद्द करण्यात येत असून त्याऐवजी **परिच्छेद ४.१ मधील "ग" खाली सुधारित केल्याप्रमाणे** वाचावा --

"शासकीय / निमशासकीय कार्यालये, शासकीय उपक्रमे (Undertaking), सांविधानिक संस्था (Statutory Bodies), जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, मंडळे / महामंडळे, शासनाचे अंगीकृत व्यवसाय, अकृषी व कृषी विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था (आश्रमशाळासंह), अनुदानित शैक्षणिक संस्था (अनुदानित आश्रमशाळांसह), सहकारी संस्था / सहकारी साखर कारखाने /सहकारी सूत गिरण्या/ बँका/सहकारी बँका, सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या शासनमान्य स्वेच्छा संस्था (Voluntary Agencies) यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये (This list is illustrative and not exhaustive) यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/अनुदान/सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्वप्रकारच्या सेवांमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागांवर नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या सर्व कर्मचारी/अधिकारी यांची प्राप्त झालेली जातीची प्रमाणपत्रे / दावे तपासणे"

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दि. वा. जोशी**
**कक्ष अधिकारी**

**अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या पदावर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांचे जमातीचे दाखले तपासणे.**

**महाराष्ट्र शासन**

आदिवासी विकास विभाग,
शुध्दीपत्र क्र. एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/का.१०
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : २८ मे, २००१.

**वाचा :-** १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१३९९ /प्र.क्र.२/का.१०, दिनांक ९ सप्टेंबर, १९९९.
२) परिपत्रक क्रमांक आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/का.१० दिनांक १३ एप्रिल, २०००.
३) परिपत्रक क्रमांक आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/का.१० दिनांक १५ मार्च, २००१.
४) शुध्दीपत्र, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी- १३९९/प्र.क्र.२/का.१० दिनांक २ मे २००१.

**शुध्दीपत्र** :- प्रस्तावनेतील दिनांक १३.४.२००० च्या परिपत्रकातील परिच्छेद १ मध्ये "शासकीय / निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, बँका, शासकीय उपक्रम (उदा. एस.टी. महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ) व राज्य शासन अंगीकृत संस्थांमध्ये अनुसूचित जमातीच्या राखीव पदावर नियुक्ती झालेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे जातीचे दावे पडताळणी समितीकडून तपासून घेण्यात यावेत"अशी तरतूद करण्यात आलेली आहे. सदर तरतूद खाली सुधारित केल्याप्रमाणे वाचावी.

"शासकीय / निमशासकीय कार्यालये, शासकीय उपक्रमे (Undertaking),सांविधानिक संस्था (Statutory Bodies), जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, मंडळे / महामंडळे, शासनाचे अंगीकृत व्यवसाय, अकृषी व कृषी विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था (आश्रमशाळासंह), अनुदानित शैक्षणिक संस्था (अनुदानित आश्रमशाळांसह), सहकारी संस्था / सहकारी साखर कारखाने /सहकारी सूत गिरण्या/ बँका/सहकारी बँका, सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या शासनमान्य स्वेच्छा संस्था (Voluntary Agencies) यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये (This list is illustrative and not exhaustive) यांना राज्याच्या तिजोरीतून निधी / अनुदान / सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्वप्रकारच्या सेवांमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदावर अगोदरच नियुक्त झालेल्या आणि नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या सर्व कर्मचारी/ अधिकारी यांचे जमातीचे प्रमाणपत्र संबंधित तपासणी समितीकडून तपासून घेण्यात यावेत. वरील सेवांमध्ये कार्यरत असलेल्या ज्या अनुसूचित जमातीच्या कर्मचारी/अधिकारी यांच्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी त्यांच्या पदोन्नतीच्या टप्प्यापर्यंत झालेली नाही अशा सर्व कर्मचारी / अधिकारी यांच्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात यावी. तसेच पदोन्नती देण्यात येणाऱ्या सर्व अनुसूचित जमातीच्या कर्मचारी/अधिकारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी त्यांच्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात यावी. त्याशिवाय त्यांना पदोन्नती देण्यापूर्वी त्यांच्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात यावी. त्याशिवाय त्यांना पदोन्नती देण्यात येऊ नये."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्यामला शुक्ला**
**उप सचिव**

**अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांच्या सेवेत नियुक्ती करण्याआधी त्यांच्या जाती प्रमाणपत्राबाबत वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत.....................**

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्र.क्र-९१/मावक-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२
दिनांक : ८ डिसेंबर, २००३

**वाचा** :- (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस अँड पेन्शन्स,नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-३६०३६/८/९८/ईएसटीटी (आरईस) दिनांक १६ मार्च, १९९९.

(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक-सीबीसी १२/२००२/२५२/प्र.क्र.-१/इमाव-५, दिनांक २५ जानेवारी, २०००.

**प्रस्तावना :-** माधुरी पाटील विरुध्द अप्पर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २.९.१९९४ रोजी निर्णय देताना नियुक्तीपूर्वी सहा महिने अगोदर जातीचा दाखला पडताळून घेण्याबाबतचे निदेश दिलेले आहेत. तसेच अवर सचिव, भारत सरकार, मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस ॲन्ड पेन्शन्स, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक. १६.३.१९९९ च्या पत्रांन्वये असे कळविले आहे की, नियुक्ती देताना जातीच्या दाखल्याची योग्य ती पडताळणी व्हावी अशी शिफारस राष्ट्रीय अनुसूचित जातीचा, जमाती आयोगाने केलेली आहे. ती शिफारस केंद्र शासनाने स्वीकारली असून, राज्य शासनाने त्यावर आवश्यक ती कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या आहेत. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभागाने दिनांक २५ जानेवारी, २००० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पदावर ज्या उमेदवारांची लोकसेवा आयोगामार्फत तसेच विविध निवड मंडळ/समितीमार्फत शिफारस केलेली आहे. त्यांची नियुक्ती करण्यापूर्वी संबंधीत विभागाने/कार्यालयाने जाती प्रमाणपत्र पडताळणीबाबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे संबंधीत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठीच्या जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावीत अशाप्रकारची तरतूद केलेली आहे. पडताळणी समितीला आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता उमेदवाराने केल्यानंतर तीन महिन्यात पडताळणी समितीने निर्णय द्यावयाचा असतो. तीन महिन्यात निर्णय दिला गेला नाही तर समितीच्या निर्णयाच्या अधीन राहून नेमणूक देण्याची तरतूद आहे. तात्पुरती नियुक्ती दिल्यानंतर यदाकदाचित जर जाती प्रमाणपत्र अवैध ठरल्यास संबंधीत कर्मचारी/अधिका-याला सेवेतून काढून टाकण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीडीआर १०९३/१०७७/प्र.क्र.-२३/९३/अकरा, दिनांक १२ ऑक्टोबर, १९९३ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-सीडीआर १०९५/९९५/प्र.क्र.-३ /९६ /अकरा, दि. ३१ ऑक्टोबर, १९९६ अन्वये तरतुद केली आहे. या तरतुदी असताना देखील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या व्यक्तींवर / उमेदवारांवर अन्याय होतो म्हणून त्यांना न्याय मिळण्यासाठी काही ठोस उपाययोजना करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**<u>शासन निर्णय</u>** : शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय उपक्रमे (Undertaking), सांविधानिक संस्था (Statutory Bodies), जिल्हापरिषदा, नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, मंडळे/महामंडळ शासनाचे अंगीकृत व्यवसाय, अकृषी व कृषी विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था (आश्रमशाळांसह), अनुदानित शैक्षणिक संस्था (अनुदानित आश्रमशाळांसह) सहकारी संस्था/सहकारी साखर कारखाने/सहकारी सूत गिरण्या/बँका/सहकारी बँका, सहाय्यक अनुदान मिळणा-या शासन मान्य स्वेच्छा संस्था (Voluntary Agencies) यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये (This list is illustrative and not exhaustive) यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/अनुदान/सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्वप्रकारच्या सेवांमधील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदावर शिफारस झालेल्या/निवड केलेल्या उमेदवारांचे जाती प्रमाणपत्र तपासण्याबाबत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नियुक्ती प्राधिका-यांनी उमेदवारांना तात्काळ कळवावे व संबंधीत उमेदवारांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता एक महिन्याच्या आंत संबंधीत प्राधिका-यांकडे करावी. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर विभागाने/कार्यालयाने तात्काळ संबंधीत जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे कागदपत्रे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत, जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने आवश्यक ती पूर्ण कागदपत्रे प्राप्त झाल्यावर सहा महिन्यांचे आत निर्णय घ्यावा व संबंधीत विभागाने / कार्यालयाने जाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती द्यावी. तसेच पदोन्नती देण्यात येणा-या सर्व अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या कर्मचारी / अधिकारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी त्यांच्या जाती दाव्याची तपासणी करण्यात यावी. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून कर्मचारी / अधिकारी यांच्या जाती प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय त्यांना पदोन्नती देण्यात येऊ नये.

२. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्तीच्या वेळेस तसेच पदोन्नतीच्या वेळेस जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. जाती दाव्याबाबत वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती देण्यात यावी. जाती दावा वैधता प्रमाणपत्र मिळण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेवून महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे नियमन) नियमावली, १९८२ च्या कलम ४(२)(अ) नुसार सक्षम प्राधिका-याने मुदत वाढवून दिलेल्या कालावधीत उमेदवारांना हजर करुन घेण्यात यावे.

३. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**वि. वा. मेहेर**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांच्या सेवेत नियुक्ती करण्याआधी त्यांच्या जाती प्रमाणपत्राबाबत वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२
दिनांक : २८ जानेवारी, २००४

**वाचा** :- (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस अँड पेन्शन्स, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-३६०३६/८/९८/ईएसटीटी (आरईस) दिनांक १६ मार्च, १९९९.

(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक-सीबीसी १२/२००२/२५२/प्र.क्र-१/इमाव-५, दिनांक २५ जानेवारी, २०००.

(३) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५, दिनांक ८ डिसेंबर, २००३.

**आ दे श**

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांच्या सेवेत नियुक्ती करण्याआधी त्यांच्या जाती प्रमाणपत्राबाबत वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्र.क्र-९१/मावक-५, दिनांक ८ डिसेंबर, २००३ अन्वये काढलेल्या आदेशास पुढील आदेशांपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

२. मागासवर्गीयांसाठी (अनुसूचित जमाती वगळून) राखीव असलेल्या जागेवर निवड केलेल्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी संबंधीत विभागांनी करुन घेण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे त्वरित सादर करावीत व समितीने आपला निर्णय ३ महिन्यांचे आंत संबंधीत विभागाकडे सादर करावा. थोडक्यात, निवड झालेल्या उमेदवारांनी ३ महिन्याचे आंत वैधता प्रमाणपत्र विभागाकडे सादर करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**वि. वा. मेहेर**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांच्या सेवेत नियुक्ती करण्याआधी त्यांच्या जाती प्रमाणपत्राबाबत वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्र.क्र-९१/मावक-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२
दिनांक : ६ फेब्रुवारी, २००४

**वाचा** :- (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस अँड पेन्शन्स,नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-३६०३६/८/९८/ईएसटीटी (आरईएस) दिनांक १६ मार्च, १९९९

(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक : सीबीसी १०/२०००/२५२/प्र.क्र.१/इमाव-५, दिनांक २५ जानेवारी, २०००

(३) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक सीबीसी १०/२००३/प्र.क्र.९१/ मावक-५, दिनांक ८ डिसेंबर, २००३

(४) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्र.क्र-९१/मावक-५, दिनांक २८ जानेवारी, २००४

**शुध्दीपत्रक :-**

वर उल्लेखिलेल्या अनुक्रमांक ४ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २ मधील ओळ क्रमांक २ व ५ येथे नमूद केलेल्या "निवड " या शब्दाऐवजी "नियुक्ती " असे वाचण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**वि. वा. मेहेर**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांमध्ये पदोन्नतीपूर्वी जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, विशेष सहाय्य विभाग

परिपत्रक क्रमांक-सीबीसी १०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ५ मार्च, २००५

**वाचा** :- (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस अॅन्ड पेन्शन्स,नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक- ३६०३६/८/९८/ईएसटीटी (आरईस) दिनांक १६ मार्च, १९९९.

(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक-सीबीसी १२/२००२/२५२/प्र.क्र-१/इमाव-५, दिनांक २५ जानेवारी, २०००.

(३) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्रक्र-९१/ मावक-५, दिनांक ८ डिसेंबर, २००३.

(४) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्र.क्र-९१/मावक-५, दिनांक २८ जानेवारी, २००४ व समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दिनांक ६ फेब्रुवारी, २००४.

**परिपत्रक**

शासकीय/निमशासकीय कार्यालये/शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था/जिल्हापरिषदा/नगरपरिषदा/ नगरपालिका/महानगरपालिका/ग्रामपंचायती/मंडळे/महामंडळे/शासनाचे अंगीकृत व्यवसाय/विद्यापीठे/कृषी विद्यापीठे/ शासकीय शिक्षण संस्था आश्रमशाळांसह/सहकारी संस्था/सहकारी साखर कारखाने/सहकारी सूतगिरण्या/बँका/ सहकारी बँका/सहाय्यक अनुदान मिळणा-या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/अनुदान/सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था/मंडळे यांना त्यांच्या आस्थापनेवरील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदांवर पदोन्नती देण्यापूर्वी त्या उमेदवाराच्या जाती प्रमाणपत्राची/जाती दाव्याची वैधता तपासणे बंधनकारक राहील.

२. ज्या मागासवर्गीय कर्मचारी व अधिका-यांची जाती प्रमाणपत्राची पडताळणी अद्यापही झालेली नाही व सद्यस्थितीत पदोन्नतीच्या क्षेत्रात (Zone of Consideration) येत असतील असे अधिकारी व कर्मचा-यांचे पदोन्नतीच्या प्रक्रियेपूर्वी ६ महिने अगोदर सर्व प्रशासकीय विभागाने जाती प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठवून वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावी व नंतरच त्यांना पदोन्नती देण्यात यावी. तसेच सरळ सवेने भरती प्रकरणी उमेदवाराने जाती प्रमाणपत्राची वैधता ६ महिन्यात सादर करणे आवश्यक राहील. मात्र ही सवलत निवडणूक क्षेत्रात (Election of Local Bodies) लागू राहणार नाही. इच्छूक उमेदवाराने नामांकन भरण्यापूर्वी ६ महिने अगोदर आपल्या जाती प्रमाणपत्राची वैधता तपासणी करण्यासाठी संबंधित जिल्हाधिका-यामार्फत समितीकडे अर्ज करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**डॉ. मुन्शिलाल गौतम**
**प्रधान सचिव, सामाजिक न्याय**

**अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांमध्ये पदोन्नतीपूर्वी जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक-सीबीसी १०/२००४/प्र.क्र-५७०/मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२
दिनांक : १६ मे, २००७

**वाचा :-** (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस ॲन्ड पेन्शन्स, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-३६०३६/८/९८/ईएसटीटी (आरईस) दि. १६ मार्च, १९९९.
(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक सीबीसी १२/२००२/२५२/प्र.क्र.१/इमाव-५, दि. २५ जानेवारी, २०००.
(३) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५, दि. ८ डिसेंबर, २००३.
(४) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५, दि. २८ जानेवारी, २००४ व समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दिनांक ६ फेब्रुवारी, २००४.

**प्रस्तावना** : संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दिनांक २८.१.२००४ चा शासन निर्णय व समक्रमांकाचे शुध्दीपत्रक, दिनांक ६.२.२००४ अन्वये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित विभागांनी करुन घेण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे त्वरित सादर करावीत व समितीने आपला निर्णय ३ महिन्याचे आत संबंधीत विभागाकडे सादर करावा असे शासनाचे आदेश आहेत. त्यामध्ये सुधारणा करुन दि. ५ मार्च, २००७ च्या परिपत्रकान्वये अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे जाती दाव्याची तपासणी अद्याप झालेली नाही. त्यापैकी जे पदोन्नतीच्या क्षेत्रात येतात (Zone of Consideration) त्यांचा जाती दावा पदोन्नतीच्या प्रक्रियेपूर्वी ६ महिने अगोदर सर्व प्रशासकीय विभागांनी जातीप्रमाणपत्रे विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठवून वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावीत व त्यानंतर संबंधीतांना पदोन्नती द्यावी. मागासवर्गीय उमेदवाराच्या जाती दावा पडताळणीबाबत दि. २५ जानेवारी, २००० च्या शासन निर्णयानुसार स्वयंस्पष्ट आदेश आहेत. तरीही याबाबत वारंवार मार्गदर्शनार्थ संदर्भ प्राप्त होतात. याबाबत स्पष्टीकरण करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

१) खुल्या प्रवर्गातून शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने त्यांच्या नियुक्तीनंतर कालांतराने मागासवर्गीय आरक्षणाचे फायदे मिळविण्यासाठी जर जाती प्रमाणपत्रासह अर्ज केला असेल तर त्या उमेदवाराने ज्या तारखेला जातीचे प्रमाणपत्र कार्यालयाकडे सादर केले आहे, त्या तारखेपासून पुढे आरक्षणाचे फायदे जातीच्या दाव्याची वैधता तपासून झाल्यावर देय ठरतील (भूतलक्षी प्रभावाने लाभ देय ठरणार नाही.)

२)	इतर मागासप्रवर्गाला पदोन्नतीमध्ये आरक्षण नसल्याने इतर मागासवर्ग प्रवर्गातून यापूर्वीच शासन सेवेत प्रविष्ट झालेल्या व अद्यापही वैधता तपासणी न झालेले महाराष्ट्र राज्यातील मूळ निवासी असलेल्या उमेदवाराची पदोन्नतीसाठी वैधता तपासणीची आवश्यकता नाही. तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अंमलबजावणीसाठी संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आलेले नाही. तथापि, सरळसेवेने नियुक्तीनंतर जाती वैधता तपासणी करणे सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता बंधनकारक आहे.

३)	एखाद्या जातीचा प्रवर्ग शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार बदलण्यात आला असेल व त्या जातीचे प्रमाणपत्र / वैधता तपासणी त्या जातीच्या उमेदवाराकडे असेल तर सदर उमेदवारास पुन्हा सर्व कागदपत्र देऊन नव्याने जातीचे प्रमाणपत्र काढण्याची आवश्यकता नसून जुने जातीच्या प्रमाणपत्र, उपजिल्हाधिकारी कार्यालयात जमा करुन शासनाच्या, शासन निर्णयानुसार त्यांना नविन प्रवर्गाच्या जातीचे प्रमाणपत्र त्वरित देण्यात यावे व जुन्या जातीच्या प्रमाणपत्राची वैधता तपासणी झाली असल्यास पुन्हा नविन जातीच्या प्रमाणपत्राची वैधता तपासणी करणे आवश्यक नाही.

४)	जर एखादा मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गातून सेवेत आला असेल व त्याने कधीही कुठल्याही स्तरावर, कुठल्याही प्रकारचे मागासवर्गीय आरक्षणाचे फायदे घेतले नसतील असा उमेदवार आरक्षणाच्या लाभाकरिता मागणी करत नसेल तर अशा उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची वैधता तपासणी करण्याची आवश्यकता नाही. मात्र आरक्षणाच्या लाभाची मागणी करणाऱ्या उमेदवाराचा जाती दावा तपासणे आवश्यक राहील.

हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०५१७१३०४५३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**रमेश म. उबाळे**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**जात वैधता प्रमाणपत्राअभावी रिक्त राहणारी पदोन्नतीची पदे तात्पुरत्या पदोन्नतीने भरण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-१२०७/प्र.क्र.५३/०८/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४००० ०३२
दिनांक :- १६/६/२००८

वाचा : १) शासन शुध्दीपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्र.एसटीसी-१४२०००/ प्र. क्र.४३/का.१०, दि.२८.५.२००१.

२) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दि. ५.३.२००५.

**प्रस्तावना** :

अनुसूचित जमातीच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांच्या जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी झाल्याशिवाय पदोन्नती देण्यात येऊ नये असे आदेश संदर्भाधीन अ.क्र.१ येथील शुध्दीपत्राअन्वये देण्यात आले आहेत. तसेच अनुसूचित जाती. वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र.च्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची जात प्रमाणपत्रे पडताळणी समितीकडे पाठवून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच त्यांना पदोन्नती देण्यात यावी असे आदेश संदर्भाधीन क्र. २ च्या परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत. या आदेशातील तरतुदीनुसार, ज्या मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त झालेली नाहीत, त्यांना पदोन्नती देता येत नाही. यामुळे पदोन्नतीची बरीच पदे रिक्त राहतात. यामुळे प्रशासकीय कामकाजावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासनाने यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

ज्या मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना निवडसूचीत / तदर्थ पदोन्नतीसूचीत समावेशनास (पदोन्नतीस) पात्र ठरविले आहे. परंतू त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसल्याने त्यांना पदोन्नती देता येत नाही अशा प्रकरणी संबंधित मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांचा ज्या प्रवर्गातून (राखीव / खुल्या) समावेश झाला आहे त्या प्रवर्गातील त्याच्या लगत कनिष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यास निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांच्या कालावधीसाठी पदोन्नती देण्यात यावी. ही पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात यावी.

१) संबंधित लगत कनिष्ठ अधिकारी / कर्मचारी मागास प्रवर्गातील असल्यास त्याचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले असणे आवश्यक राहील.

२) ही पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून संबंधित ज्येष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यांने जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यावर ती आपोआप संपुष्टात येईल असे आदेशात नमूद करण्यात यावे.

३) सदर पदोन्नती ११ महिन्यांकरीता वा ज्येष्ठ अधिकारी / कर्मचारी जात वैधता प्रमाणपत्र सादर करेल यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत सुरु राहील. तथापि या कालावधीमधील ज्येष्ट अधिकारी / कर्मचाऱ्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास ही पदोन्नती १ दिवसाचा (सुटीचा कालावधी वगळून) खंड देवून पुढे चालू ठेवता येईल.

४) या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी कनिष्ठ अधिकारी / कर्मचारी यांना सेवाज्येष्ठतेचा हक्क मिळणार नाही.

२. संबंधित मागास अधिकारी / कर्मचाऱ्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्यास पदोन्नती देण्यात यावी व कनिष्ठ कर्मचाऱ्याची तात्पुरती पदोन्नती संपुष्टात आणावी. सदर ज्येष्ठ अधिकारी / कर्मचारी यांची पदोन्नतीच्या पदावरील ज्येष्ठता अबाधित राहील.

३. मंत्रालयीन विभागांनी सदर आदेशातील तरतूदीनुसार राजपत्रित पदावर पदोन्नतीबाबतचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करावेत व अराजपत्रित पदांवर पदोन्नतीबाबत सर्व विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्याकडून कार्यवाही होत असल्याची खात्री करुन घ्यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०६१६१५३१४३००१ असा आहे.

५. हा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.४५/मावक ५, दिनांक ७/३/२००८ व आदिवासी विकास विभागाच्या क्र. अनौ.संदर्भ क्र.४२/का.१०, दिनांक ५/४/२००८ अन्वये तसेच सामान्य प्रशासन विभाग/का.१२ च्या अनौ.संदर्भ क्र.६५९/१२, दिनांक २८/४/२००८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**गो. आ. लोखंडे**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांमध्ये पदोन्नती पुर्वी जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक :- सीबीसी-१०/२०१०/प्र.क्र.४७/मावक-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २६ मार्च, २०१०

**वाचा** :- (१) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक :- सीबीसी-१२/२००२/२५२/प्र.क्र.१/इमाव-५, दिनांक २५ जानेवारी, २०००

(२) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दिनांक ५ मार्च, २००५

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६ ब, दि. ०५ नोव्हेंबर, २००९

**प्रस्तावना :-** अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांमध्ये पदोन्नतीपुर्वी जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक - २, दिनांक ०५/०३/२००५ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. तथापि सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-३, दिनांक ०५ नोव्हेंबर, २००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ७ मध्ये **" मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज यापुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येऊ नये."** असे आदेश पारीत केलेले आहेत. त्यामुळे दोन्ही आदेशामधील तरतूदींचे पालन करण्याबाबत क्षेत्रीय अधिका-यांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. याबाबत सुस्पष्ट असे आदेश सर्व संबंधितांना देण्याची आवश्यकता असल्याने सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भ क्रमांक-२, दि.०५/०३/२००५ च्या आदेशामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-** शासकीय / निमशासकीय वा तत्सम सेवेत सरळसेवेने प्रवेश तसेच पदोन्नतीबाबतच्या सूचना शासन परिपत्रक दिनांक ०५ मार्च, २००५ अन्वये निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदरचे परिपत्रक आता अधिक्रमित करण्यात येत असून त्याऐवजी खालील प्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत :-

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांची शासकीय वा निमशासकीय कार्यालये, शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था / जिल्हा परिषदा / नगर परिषदा / नगरपालिका / महानगरपालिका / ग्रामपंचायत / मंडळे / महामंडळे / शासनाचे अंगीकृत व्यवसाय / विद्यापीठे / शासकीय शिक्षण संस्था आश्रमशाळांसह / सहकारी संस्था / बँका / सहकारी बँका / सहाय्यक अनुदान मिळणा-या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या-ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये यांना

राज्याच्या तिजोरीतून निधी / अनुदान / सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्वप्रकारच्या संस्था / मंडळे येथे निवड मंडळामार्फत / निवड समितीमार्फत / विविध निवड मंडळे / लोकसेवा आयोगामार्फत राखीव असलेल्या पदावर शिफारस झालेल्या / निवड केलेल्या उमेदवारांचे जाती प्रमाणपत्र पडताळणी करण्याबाबत आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी नियुक्ती प्राधिका-यांनी उमेदवारांना तात्काळ कळवावे व संबंधीत उमेदवारांनी त्यांच्या जाती दाव्या प्रित्यर्थ आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता एक महिन्याच्या आत संबंधीत प्राधिका-याकडे करावी. कागदपत्राची पुर्तता झाल्यानंतर विभागाने / कार्यालयाने तात्काळ संबंधीत जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे कागदपत्रे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत.

२. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर ३ महिन्याच्या आत जाती दाव्याचा समितीचा निर्णय संबंधीत आस्थापनेस कळवावा. संबंधीत उमेदवाराच्या जातीचा दावा **वैध असल्यसाबाबतचा समितीचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर** संबंधित आस्थापनेने उमेदवारास नियुक्ती द्यावी.

३. ज्या मागासवर्गीय कर्मचारी व अधिका-यांची जाती प्रमाणपत्राची पडताळणी अद्यापि झालेली नाही व सद्यस्थितीत पदोन्नतीच्या क्षेत्रात (Zone of Consideration) येत असतील असे अधिकारी व कर्मचा-यांचे पदोन्नतीच्या प्रक्रियेपुर्वी ६ महिने अगोदर सर्व प्रशासकीय विभागाने जाती प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठवून **जातीचे वैध प्रमाणपत्रे** प्राप्त करुन घ्यावीत व नंतरच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

४. सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१००३२६१८४१३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतीश गवई**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

**शासन सेवेत, पदोन्नतीसाठी इतर मागासवर्ग प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना जात प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत........**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.५९०/मावक-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ८ जून, २०११.

**वाचा** :- १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी १०/२०१०/ प्र.क्र.४७/मावक-५, दिनांक २६ मार्च, २०१०.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी २००९/प्र.क्र.२१९/कार्या-१६- ब, दिनांक ०५ नोव्हेंबर, २००९.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी १०/२००४/ प्र.क्र.५७०/मावक-५, दिनांक १६ मे, २००७.
४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र.सीबीसी १०/२००४/ प्र.क्र.५७०/मावक-५, दिनांक ०५ मार्च, २००५.
५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सीबीसी १२/२००२/ प्र.क्र.२५२/मावक-५, दिनांक २५ जाने., २०००.

**प्रस्तावना :-** अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थांमध्ये पदोन्नतीपूर्वी जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना उपरोक्त संदर्भाधीन क्र.४ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. संदर्भाधीन क्र. ३ चे शासन निर्णयान्वये पदोन्नतीपुर्वी जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता सादर करण्याबाबत मार्गदर्शनपर स्पष्टीकरण करण्यात आले होते. तथापि, इतर मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण नसल्याने इतर मागासवर्गातून यापूर्वीच सेवेत लागलेल्या व जात प्रमाणपत्र पडताळणी झाली नसलेल्या उमेदवारांबाबत पदोन्नतीसाठी जात पडताळणी करण्याची आवश्यकता नसल्याने उक्त शासन निर्णयान्वये सूचित करण्यात आले होते. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ७ मध्ये,"***मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असतांना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज या पुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येऊ नये***" असे आदेश पारीत करण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन शासन परिपत्रक दि. ०५.०३.२००५ मध्ये दि. २६.०३.२०१० च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली. इतर मागासवर्ग प्रवर्गातून पदोन्नती मिळणाऱ्यांबाबत या विभागाचा दिनांक १६.०५.२००७ चा शासन निर्णय तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०५.११.२००९ च्या परिपत्रकातील आदेश, यामुळे सदर प्रवर्गातील उमेदवारांमध्ये जाती वैधता प्रमाणपत्राच्या अनुषंगाने संभ्रम निर्माण झाल्याने याबाबत सुस्पष्ट अशा सूचना पारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक** :- शासकीय / निमशासकीय इ. सेवेतील पदोन्नतीसाठी इतर मागासवर्ग प्रवर्गातील अधिकारी / कर्मचारी तसेच अनुकंपा तत्वावर, संप कालावधीत अथवा अन्य निवड प्रक्रियेतून शासकीय / निमशासकीय इ. सेवेत नियुक्त झालेले अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचे जात प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत खालीलप्रमाणे सूचना नव्याने देण्यात येत आहेत:-

१) इतर मागासवर्गातील जे अधिकारी / कर्मचारी अनुकंपा तत्वावर, संप कालावधीत अथवा अन्य निवड प्रक्रियेतून शासकीय / निमशासकीय इ. सेवेत नियुक्त झाले असतील व अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांची इतर मागासवर्गीयाकरिता आरक्षित असलेल्या पदांकरिता नियुक्ती झालेली नसेल अथवा खुल्या प्रवर्गातून इतर मागासवर्गीयांची नियुक्ती झाल्या नंतर अशा अधिकारी / कर्मचारी यांनी इतर मागासवर्गीयांना असणारे फायदे / सवलती मिळविण्याकरिता दावा केलेला नसेल तर, इतर मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण नसल्यामुळे अशा अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नतीकरिता जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही, परंतु असे अधिकारी / कर्मचारी कायमस्वरुपी खुल्या प्रवर्गात दर्शविण्यात येत असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

२) इतर मागासवर्गातील ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी इतर मागासवर्गीयांकरिता असलेल्या आरक्षणाचा फायदा घेतलेला नाही, अशा अधिकारी / कर्मचारी यांना खुल्या बिंदुवर दर्शविले असेल तरच त्यांना पुढील पदोन्नतीसाठी, जात प्रमाणपत्राची पडताळणी होऊन ते वैध ठरण्याचे बंधन लागू असणार नाही.

३) आरक्षणाचा लाभ घेतलेल्या वा घेऊ इच्छिणा-या इतर मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तसेच, अनुकंपा तत्वावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना देखील संबंधित प्रवर्गाच्या बिंदूवर दर्शविण्यात येत असल्यामुळे आवश्यकतेनुसार त्यांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

२. सदरहू परिपत्रक शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०६०८११०३५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**ज. न. राठोड**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन परिपत्रक दिनांक ५.११.२००९ मधील क्रमांक ७ च्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने सुधारित आदेश निर्गमित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १२ डिसेंबर, २०११

**वाचा :** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९.

**<u>प्रस्तावना :-</u>**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :-

"मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज यापुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येवू नये."

याचिका क्र.२१३६/२०११ श्रीकांत चंद्रकांत सैदाणे विरुद्ध महाराष्ट्र शासन यासह एकूण १५ याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशान्वये शासन परिपत्रक दि. ५.११.२००९ मधील क्रमांक ७ पुढील आदेश रद्द ठरविले आहेत.

**<u>शासन निर्णय :-</u>**

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश विचारात घेवून शासन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे :-

४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने दिलेले आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

५) सरळसेवाभरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्याने आदेश निर्गमित करावेत.

६) नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. त्याने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार, संबंधित जात पडताळणी समितीने उमेदवारांचे जात पडताळणीचे प्रस्ताव सहा महिन्यांच्या आत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर त्यास दिलेले नियुक्ती आदेश

त्वरीत रद्द करावेत, आणि त्या उमेदवाराविरुद्ध नियुक्ती प्राधिकाऱ्याने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करावी.

याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे, यावर मा. सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील, त्या आदेशाच्या अधीन राहून उपरोक्त आदेश राहतील.

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिनस्त कार्यालयांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणून द्यावा.

प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी सर्व जात पडताळणी समित्यांना वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निदेश द्यावेत व जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असलेल्या प्रकणांचा त्यांनी दरमहा आढावा घ्यावा, आढावा घेण्यात आल्यानंतर मासिक प्रगती अहवाल प्रधान सचिव (सा.वि.स.), सामान्य प्रशासन विभाग यांना पाठवावा.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१११२२६१०२२२१२२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**सु. ना. रणखांबे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक : बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२. तारीख : १८ मे, २०१३.

**वाचा -**

१) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक १४२०००/प्र.क्र.४३/का.१०, दि. १३.४.२००० (दिनांक २८ मे २००१ च्या शुध्दीपत्रकासह)

२) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी १०९९/प्र.क्र.१४/का.१०, दि. १६.८.२०००.

३) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दि.५ मार्च २००५

. ४) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.४७/ मावक-५ ,दि.२६ मार्च २०१०

५) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.५९०/ मावक-५, दि. ८ जून २०११

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि. १५ जून, १९९५

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब, दि. २४ जून, २००४.

८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००२ /प्र.क्र.९३/०४/१६-ब, दि.३० जून,२००४.

९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००५ /प्र. क्र. २८/०५/१६-ब, दिनांक १५-१२-२००५ (क्र.बीसीसी २०११/प्र.क्र. ९२९/११/१६-ब,.७ जानेवारी, २०१२ च्या शुध्दीपत्रकासह)

१०) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००.

**शासन परिपत्रक -**

उपरोक्त क्रमांक १ मे ५ येथील शासन निर्णय / परिपत्रक याव्दारे शासनाने शासकीय / निमशासकीय, इत्यादी कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी (जेथे "कर्मचारी" असा उल्लेख आहे तेथे "कर्मचारी व अधिकारी" या दोघांचाही समावेश होतो.) आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून तपासून घ्यावी, असे आदेश वेळोवेळी निर्गमित केले आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अद्याप अनेक मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासून घेण्यासाठी संबंधित जात पडताळणी समितीकडे प्रस्तावच सादर केलेले नाहीत, ही बाब अनुचित आहे. तसेच नियुक्ती प्राधिकारी / आस्थापना अधिकारी यांचेकडूनही शासनाच्या आदेशाचे पालन केले जात नाही, ही बाब गंभीर आहे.

२.	महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० (यापुढे सदर अधिनियमाचा सोयीकरिता अधिनियम २००० असा उल्लेख करण्यात आला आहे.) हा कायदा दिनांक १८.१०.२००१ पासून अंमलात आला आहे. यातील कलम ६ नुसार, शासकीय / निमशासकीय इत्यादीच्या सेवेत कार्यरत असलेल्या प्रत्येक मागासवर्गीय कर्मचाऱ्याने, आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता, संबंधित जात पडताळणी समितीकडून तपासून घेणे आवश्यक आहे. यातील कलम १० च्या तरतुदीनुसार, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग, या प्रवर्गामध्ये मोडत नसलेल्या, अशा कोणत्याही व्यक्तीने जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन, मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदावर नियुक्ती मिळविली असेल, तर ती व्यक्ती सेवेतून तात्काळ सेवामुक्त केली जाण्यास पात्र ठरते आणि अशा व्यक्तीने घेतलेले अन्य कोणतेही लाभ काढून घेतले जाण्यास सुध्दा ती पात्र ठरते. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ हा कायदा दि. २९.१.२००४ पासून अंमलात आला आहे. यातील कलम ४ (१) च्या तरतुदीनुसार, ज्या मागास प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे त्याच मागास प्रवर्गाच्या उमेदवारामधून ते पद भरणे बंधनकारक आहे. हे पाहता, जात प्रमाणपत्राची वैधता तपासून न घेता एखादा कर्मचारी अनेक वर्षे शासन सेवेत रहात असेल, तर ते एक प्रकारे उपरोक्त तरतुदीचे उल्लंघन ठरते. त्यामुळे शासन आता खालील प्रमाणे सूचना देत आहे :-

(१) शासकीय / निमशासकीय इत्यादीच्या सेवेमध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गांमधील) ज्यांनी अद्याप जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केला नाही अशा कर्मचाऱ्यांनी, आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी, आवश्यक त्या परिपूर्ण कागदपत्रांसह, अर्ज, संबंधित जात पडताळणी समितीकडे दि. ३१.७.२०१३ पर्यंत करावा व त्याबाबतची पोचपावती संबंधित कार्यालयातील आस्थापना अधिकारी यांना तात्काळ सादर करावी. प्रत्येक कार्यालयातील आस्थापना अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयात कार्यरत असणाऱ्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी सर्व कर्मचाऱ्यांनी दि.३१.७.२०१३ पर्यंत जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचे प्रस्ताव जात पडताळणी समितीस सादर केलेले आहेत याची खातरजमा पावतीसह करुन घ्यावी.

२) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० यातील कलम ८ नुसार, आपण विशिष्ट जातीचे / जमातीचे आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी संबंधित मागासवर्गीय कर्मचाऱ्यावर आहे. हे पाहता, उपरोक्त मुदतीत जे मागासवर्गीय कर्मचारी आपल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचा अर्ज, संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करणार नाहीत, अशा कर्मचाऱ्यांवर ते आपला जातीचा दावा सिध्द करु शकत नाहीत असा ठपका ठेवून, त्यांना एक महिन्याच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी एक महिन्याची नोटीस देण्यात यावी. तद्नंतरही जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता न करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सदर कायद्यातील कलम-१० नुसार त्यांच्या सेवा समाप्त करण्याची कारवाई करण्यात यावी.

३) सर्व जात पडताळणी समित्यांना याव्दारे सूचना देण्यात येत आहे की, शासकीय/निमशासकीय, इत्यादी सेवेतील कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याच्या अर्जावर सहा महिन्यांच्या कालावधीत समितीने योग्य तो निर्णय घ्यावा.

४) जात पडताळणी समितीने जर एखाद्या कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्याच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात याव्यात आणि त्याचेवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या

जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग अधिनियम,२००० मधील कलम ११ नुसार कारवाई करण्यात यावी. या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, अशा परिस्थितीत संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याची कार्यवाही विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन तातडीने करण्यात यावी.

५) संदर्भाधीन अनुक्रमांक ६ ते ९ येथील आदेशांनुसार, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५.६.१९९५ पूर्वी नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास, त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मात्र अशा कर्मचाऱ्यांनी, ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जे कर्मचारी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकत नाहीत, अशा कर्मचाऱ्यांच्या सेवेस संरक्षण अनुज्ञेय नाही. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५.६.१९९५ पूर्वी नोकरीस लागलेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज न करता अथवा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र अवैध ठरले जाण्याची वाट न पाहता, अन्य मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करुन सेवेत संरक्षण मिळविले आहे, अशा कर्मचाऱ्यांचे पूर्वीचे मूळ अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अधिनियम २००० मधील कलम ७ च्या तरतुदी नुसार जप्त करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी अशा कर्मचाऱ्यांनी आपले अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र, ज्या प्राधिकाऱ्याने दिले आहे त्या प्राधिकाऱ्याकडे दि.३१.७.२०१३ पूर्वी जमा करावे व त्याबाबतची पोचपावती, संबंधित कार्यालयाच्या आस्थापना अधिकाऱ्यास सादर करावी अशी पोचपावती, सादर करणे आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांकडे पाठपुरावा करण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांची राहील. अशाप्रकारे जमा झालेली प्रमाणपत्रे रद्द करण्याची कार्यवाही संबंधित जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याने करावी व त्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांच्या आस्थापना अधिकाऱ्यास कळवावे या संदर्भातील पुढील सूचना, महसूल विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग यांनी, संबंधित यंत्रणांना द्याव्यात.

६) दि. १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे जे कर्मचारी शासनसेवेत लागले आहेत व ज्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे अशा कर्मचाऱ्यांनी, ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र अद्याप सादर केले नसल्यास, प्रथम संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र कायद्यातील कलम ७ प्रमाणे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र जप्त करुन घ्यावे व तशी पोच संबंधित कर्मचाऱ्यांना द्यावी. अशा पोच पावतीसह संबंधित कर्मचाऱ्यांने ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, जात प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे दिनांक ३०.६.२०१३ पर्यंत सादर करावीत. त्याकरिता दि. ३०.६.२०१३ ही अंतिम मुदत राहील व दि. ३१.७.२०१३ पर्यंत तो ज्या मागास प्रवर्गाचा आहे त्याप्रवर्गाचे जात प्रमाणपत्र त्याने सादर करावे, या मुदतीपर्यंत अशी कार्यवाही जे कर्मचारी करु शकणार नाहीत, अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन तातडीने समाप्त करण्यात याव्यात.

दि. १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्यापैकी, ज्या कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र, तपासणीसाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे अथवा ज्यांनी अद्याप जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्जच सादर केलेला नाही, ते आपण अनुसूचित जमातीपैकी असल्याचा दावा सोडून देवून, ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचा विकल्प स्विकारु शकतात. त्यांनी तसे रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथ पत्राव्दारे संबंधित आस्थापना अधिकाऱ्यास तातडीने कळवावे आणि त्यांनी त्या शपथपत्राची साक्षांकित प्रत, संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करावी व त्याना त्यांचे अनुसूचित जमातीचे मूळ जात प्रमाणपत्र जप्त करण्याची विनंती करावी आणि त्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाच्या जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी

आवश्यक कागदपत्रे जात प्रमाणपत्र देणा-या प्राधिका-याकडे दि.३०.६.२०१३ पर्यंत सादर करावी व त्याबाबतची पोचपावती संबंधित आस्थापना अधिका-यांस सादर करावी.

७) जे कर्मचारी दि. १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत दाखल झाले व जात प्रमाणपत्राची वैधता तपासून न घेता, दि. १५.६.१९९५ नंतर सेवानिवृत्त झाले आहेत अथवा ज्यांनी दि. १५.६.१९९५ नंतर स्वेच्छा सेवा निवृती घेतली आहे, अशा कर्मचा-यांनी आपल्या अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासून घेवून, या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यात, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त परि. क्र.२ (६) मध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. १५ जून १९९५ नंतर सेवानिवृत्त / स्वेच्छानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना सुध्दा सदर विकल्प स्वीकारता येईल. जे सेवानिवृत्त कर्मचारी वरील बाबींची पूर्तता या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या कालावधीत करणार नाहीत, त्यांचे सेवानिवृती - वेतन तात्काळ थांबविण्यात येईल, अशा सूचना संबंधित कर्मचा-यास तो ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाला आहे, त्या कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिका-याने तात्काळ द्याव्यात. विहित मुदतीत अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र अथवा ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत, त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (त्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडे परत केले असल्याच्या पोचपावतीसह) सादर न केल्यास, अशा कर्मचा-यांचे सेवानिवृत्ती वेतन बंद करण्याची कार्यवाही जात पडताळणी अधिनियम, २००० मधील कलम १० च्या तरतुदीनुसार संबंधित नियुक्ती प्राधिका-याने करावी.

**३.** सदर शासन परिपत्रकातील आदेश शासकीय / निमशासकीय कार्यालये / शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था / जिल्हा परिषदा /नगरपरिषदा /नगरपालिका / महानगरपालिका / ग्रामपंचायती / मंडळे /महामंडळे / शासनाचे अंगीकृत व्यावसाय / विद्यापीठे / कृषी विद्यापीठे /शासकीय शिक्षण संस्था / (आश्रमशाळांसह) / सहकारी संस्था / सहकारी साखर कारखाने / सहकारी सूतगिरण्या / सहकारी बँका /सहाय्यक अनुदान मिळणा-या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये यांना राज्याच्या तिजोरीतून निधी / अनुदान /सहायक अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था / मंडळे यांच्या आस्थापनेवरील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासप्रवर्ग या प्रवर्गातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना लागू आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम-२००१ च्या कलम २ मध्ये नमुद केलेल्या "आस्थापना " या व्याख्येत समाविष्ट होणा-या आस्थापनेवरील सर्व अधिकारी /कर्मचारी यांनाही लागू आहेत.

**४.** सदर परिपत्रक प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व विभागप्रमुखांच्या /नियुक्ती प्राधिका-यांच्या निदर्शनास आणावे, सर्व विभागप्रमुखांनी / नियुक्ती प्राधिका-यांनी / आस्थापना अधिका-यांनी सदर परिपत्रकातील आदेश, लेखी स्वरुपात संबंधित कर्मचा-यांच्या तात्काळ निदर्शनास आणावेत. याबाबतीत आवश्यक असलेली कार्यवाही तात्काळ करणे संबंधित कर्मचा-यांवर व संबंधित अधिका-यांवर बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१३०५१८१७२२४९९५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जयंतकुमार बांठिया**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी - २०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक : ३० जुलै, २०१३.

<u>वाचा</u> -

(१) शासन परिपत्रक, आदिवासी विभाग, क्रमांक १४२०००/प्र. क्र.४३/का.१०, दि. १३.४.२००० (दिनांक २८ मे २००१ च्या शुध्दीपत्रकासह)

(२) शासन निर्णय, आदिवासी विभाग, क्रमांक एसटीसी १०९९ /प्र.क्र.१४/का.१० दि. १६.८.२०००.

(३) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दिनांक ५ मार्च, २००५

(४) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी १०/ २०१०/प्र.क्र.४७/मावक-५, दि. २६ मार्च २०१०.

(५) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सीबीसी १०/ २०१०/प्र.क्र.५९०/ मावक-५, दि. ८ जून २०११

(६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि. १५ जून, १९९५

(७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब, दि. २४ जून, २००४

(८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २००२/प्र.क्र.९३/१६-ब, दि. ३० जून, २००४

(९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब, दि. १५.१२.२००५ (क्र.बीसीसी २०११/प्र.क्र.९२९/११/१६-ब, दि. ७ जानेवारी,२०१२ च्या शुध्दीपत्रकासह)

(१०) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००

(११) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र.बीसीसी -२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दि. १८ मे, २०१३

**<u>शासन परिपत्रक</u>** -

शासकीय / निमशासकीय, इत्यादी कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांनी त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता, संबंधित जात पडताळणी समितीकडून तपासून घेण्याबाबत वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत. असे असूनही अद्याप अनेक मागासवर्गीय कर्मचा-यांनी, त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासून

घेतलेली नाही किंवा त्यासंबंधिचे प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर केलेले नाहीत, ही बाब गंभीर आहे. त्यामुळे मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास अनुसरावयाच्या कार्यवाहीसंबंधीच्या सूचना संदर्भाधीन क्र. ११ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १८ मे, २०१३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

सदर परिपत्रकाच्या संदर्भात सुधारित सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अंशतः सुधारणा करण्यात येत आहेत.

१. शासन सेवेतील मागासवर्गीय अधिकारी / कर्मचा-यांनी जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी आवश्यक त्या परीपूर्ण कागदपत्रांसह प्रस्ताव, संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करण्याची मुदत आता दि. ३० सप्टेंबर, २०१३ पर्यंत राहिल. मात्र त्यानंतर पुढे मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद संबंधित अधिकारी / कर्मचा-यांनी घ्यावी.

२. दिनांक ३०.६.२०१३ पर्यंत सेवा निवृत्त झालेल्या मागास प्रवर्गातील (अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचा-यांना जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

३. अनुसूचित जमाती प्रवर्गातील दि. ३०.६.२०१३ पर्यंत सेवा निवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचा-यांना जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तथापि, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दि. १५ जून १९९५ पूर्वी शासन सेवेत नियुक्त झालेल्या व दि. १५ जून १९९५ नंतर, अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र नियुक्ती प्राधिका-याला सादर न करता, दि. ३०.६.२०१३ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचा-यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे शपथपत्र व अनुसूचित जमातीचे मूळ जात प्रमाणपत्र, ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले आहेत, त्या कार्यालय प्रमुखाकडे दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ पर्यंत जमा करावे व त्याबाबतची पोचपावती संबंधित अधिका-यांकडून घ्यावी.

४. अनुसूचित अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या व अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र न देता सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचा-याच्या वारसाला त्याच्या वडीलांच्या जात प्रमाणपत्राच्या आधारे, अनुसूचित जमाती प्रवर्गातील असल्याचा दावा भविष्यात करता येणार नाही.

सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१३०७३०१७१६२६७५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जयंतकुमार बाँठिया**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**राज्यात विशेष मागास वर्ग (अ) या प्रवर्गातील मुस्लिम समाजास जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीबीसी-१०/२०१४/प्र.क्र. १३१/मावक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२
दिनांक : २२ जुलै, २०१४

**वाचाः-**

अल्पसंख्यांक विभाग शासन निर्णय क्र. अविवि-२०१४/प्र.क्र.८१/का-७, दि. १९ जुलै, २०१४

**शासन निर्णयः-**

राज्यात शैक्षणिक व सामाजिक मागासलेल्या समाजासाठी विशेष मागास प्रवर्ग (अ) निर्माण करुन त्यामध्ये शासन निर्णय क्र. अविवि-२०१४/प्र.क्र.८१/का-७, दि.१९ जुलै २०१४ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या मुस्लिम गटाचा समावेश केलेला आहे. सदर प्रवर्गामधील जातींना जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याची कार्यपध्दती इतर मागासवर्गासाठी असलेल्या जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याच्या कार्यपध्दतीसारखीच राहील. या प्रवर्गासाठी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रासाठी इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग या प्रवर्गाप्रमाणे महाराष्ट्रातील वास्तव्याचा दिनांक १३ ऑक्टोबर, १९६७ असा राहील. यासाठी या प्रवर्गातील व्यक्तींना द्यावयाच्या जात प्रमाणपत्राचा नमुना सोबत परिशिष्ट अ मध्ये जोडला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०७२२१७३२३६३२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. द. शिंदे**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

## परिशिष्ट - अ

Form of certificate to be issued to Special Backward Category (A) persons belonging the state of Maharashtra.

Documents verified :- (1)

(2)

(3)

(4)

## CASTE CERTIFICATE

This is to certify/that shri/shrimati/kumari* ________________________________
Son/daughter * of ______________________ of village/Town * ________________
in District/Division * ______________________________________________of the State of Maharashtra belongs to the ______________________________caste which is recognised as Special Backward Category A) under Government Resolution ___________________________Department No. __________________________dated _______________________________________ as amended from time to time.

2. Shri/Shrimati/Kumari * _______________________________________ and/or his/her * family ordinarily reside (s) in village / Town ______________ ___________________________of _______________________ district / division of the State of Maharashtra.

Signature __________________________
Designation ________________________
With seal of office.

Place ___________________
Date ___________________

# [भाग- इ]

## मागासवर्गीयांची प्रवर्गनिहाय जातीची अद्ययावत यादी

## महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची यादी
## अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा १९७६
## (१९७६ चा १०८ वा) मधील परिशिष्ट १ मधील भाग-१० मध्ये नमूद केल्याप्रमाणे
## अनुसूचित जाती (आरक्षण १३%)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अगेर | २५) | हलसार, हसलार, हुलसवार, हलसवार **(शा.नि.दि. १५ एप्रिल, २०१० प्रमाणे समाविष्ट)** |
| २) | अनमुक | २६) | होलार, व्हलार |
| ३) | आरेमाला | २७) | होलय, होलेर, होलेया, होलिया |
| ४) | आरवा माला | २८) | कैकाडी (अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालूका सोडून चंद्रपूर जिल्हा यांत) |
| ५) | बहना, बहाना | २९) | कटिया, पथरिया |
| ६) | बाकड, बंट | ३०) | खंगार, कनेरा, मिरधा |
| ७) | बलाही, बलाई | ३१) | खाटिक, चिकवा, चिकवी |
| ८) | बसोर, बुरुड, बांसोर, बांसोडी, बसोड **(शा.नि.दि. १५ एप्रिल, २०१० प्रमाणे समाविष्ट)** | ३२) | कोलूपूल-वंडलु |
| ९) | बेडाजंगम, बुडगा जंगम | ३३) | कोरी |
| १०) | बेडर | ३४) | लिंगडेर |
| ११) | भांबी, भांभी, असादरु, असोदी, चामडिया, चमार, चमारी, चांभार, चमगार, हरळय्या, हराळी, खालपा, माचीगार, मोचीगार, मादर, मादिग, मोची, तेलगू, मोची, कामाटी मोची, राणीगार, रोहिदास, नोना, रामनामी, रोहित समगार, सतनामी, सूरज्यबंशी, सूरज्यरामनामी, समगारा, चर्मकार, परदेशी चामार, **(शा.नि.दि.१५ एप्रिल, २०१० प्रमाणे समाविष्ट)** | ३५) | मादगी |
| १२) | भंगी, मेहतर, ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बाल्मिकी, कोरार, झाडगल्ली, **हेला (शा.नि.दि.१५ एप्रिल, २०१० प्रमाणे समाविष्ट)** | ३६) | मादिगा |
| १३) | बिंदला | ३७) | महार, मेहरा, तराळ, धेगू-मेगू |
| १४) | ब्यागारा | ३८) | माह्यावंशी, धेड, वणकर, मारु-वणकर |
| १५) | चलवादी, चन्नया | ३९) | माला |
| १६) | चेन्न दासर, होलया, दासर, होलेया दसारी | ४०) | माला दासरी |
| १७) | डक्कल, डोक्कलवार | ४१) | माला हन्नाई |
| १८) | ढोर, कक्कय्या, कंकय्या, डोहोर | ४२) | माला जंगम |
| १९) | डोम, डुमार | ४३) | माला मस्ती |
| २०) | येल्लमलवार, येल्लमलवंडलु | ४४) | माला साले, नेटकानी |
| २१) | गंडा, गंडी | ४५) | माला सन्यासी |
| २२) | गरोड, गारी | ४६) | मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग |
| २३) | घासी, घासीया | ४७) | मांग-गारोडी, मांग-गारुडी |
| २४) | हल्लीर | ४८) | मन्ने |

| | | | |
|---|---|---|---|
| ४९) | मश्ती | ५५) | सांसी |
| ५०) | मेघवाल, मेंघवार | ५६) | शेणवा, चेणवा, सेडमा, रावत |
| ५१) | मिठा, अयलवार | ५७) | सिंधोल्लू, चिंदोल्लू |
| ५२) | मुक्री | ५८) | तिरगार, तिरबंदा |
| ५३) | नाडीया, हादी | ५९) | तुरी |
| ५४) | पासी | | |

## अनुसूचित जमाती (७%)

| अ.क्र. | जातीचे नाव | अ.क्र. | जातीचे नाव |
|---|---|---|---|
| १) | आंध | २०) | कमार |
| २) | बैगा | २१) | कोथडी, कातकरी, ढोर, काथोडी, ढोर कातकरी, सोन काथोडी, सोन कातकरी |
| ३) | बरडा | २२) | कंवर, कावर, कोर, चेरवा, राठिया, तन्वर, छट्री |
| ४) | बावचा, बेमचा | २३) | खैरवार |
| ५) | भैना | २४) | खरिया |
| ६) | भारिया, भुमिया, भुईनहार-भुमिया, पांडो | २५) | कोकणा, कोकणी, कुकना |
| ७) | भात्रा | २६) | कोल |
| ८) | भिल, भिल्ल-गरासिआ, ढोली भिल, डुंगरी भिल, डुंगरी गरासिआ, मेवासी, भिल, रावल भिल, तडवी भिल, भगातिया, भिलाला, पांवरा, वसावा, वसावे | २७) | कोलाम, मुन्नेरवारलु |
| ९) | भुंजिया | २८) | कोळी ढोर, टोकरे कोळी, कोलचा कोलघा |
| १०) | बिंझबार | २९) | कोळी महादेव, डोंगर कोळी |
| ११) | बिरहुल, बिरहोर | ३०) | कोळी मल्हार |
| १२) | वगळले | ३१) | कोंध, खोंड, कांध |
| १३) | धाणका, तडवी, तेतारिया, वळवी | ३२) | कोरकू, बोपची, मोवासी, निहाल, नहल, बोंधी, बोंडेया |
| १४) | धनवार | ३३) | कोया, भिनेकोया, राजकोया |
| १५) | धोडिया | ३४) | नगेसिया, नगासिया |
| १६) | दुवळा, तलाविया, हलपति | ३५) | नाइकडा, नायका, चोळीवाला नायका, कापडिया नायका, मोटा नायका, नाना नायका |
| १७) | गाभित, गामटा, गावित, मावची, पाडवी | ३६) | आरांव, धनगड |
| १८) | गोंड किंवा राजगोंड, आरख, अराखे, अगारिया, असूर, वडीमारिया, वडामारिया, भाटोला, भिम्बा, भुला, कोइलाभूता, कोइलाभूती, भार, विसन, होन, मारिया, छोटा मारिया, दंडा मी मारिया, धरु, धुरवा, धोबा, धुलिया, डोरला, गायकी, गट्टा, गट्टी, गायत्ता, गोंड, गोवारी, हिल, मारिया, कांदरा, कलंगा, खटोला, कोयतार, कोया, खिरवार, खिरवारा, कुच मारिया, कुचकी मारिया, माडिया मारिया, माना, मन्नेवार, मोध्या, मोगिया, मोंध्या, मुडिया, नागरची, नाईकपोडा, नागवंशी, ओझा, राज, सोदाझारी, झरेनका, थाटिया, थोड्या वाडेमारिया, वढेमारिया | ३७) | परधान, पाथरी, सरोटी |
| १९) | हलबा, हलबी | ३८) | पारधी, आडवी चिंचेर, फास पारधी, फांसेपारधी, लंगोटी पारधी, वहेलिया, वहेल्लिया, चिता राधी, शिकारी टाकणकर, टाकिया |

| अ.क्र. | जातीचे नाव | अ.क्र. | जातीचे नाव |
|---|---|---|---|
| ३९) | परजा | ४४) | ठाकूर, ठाकर, का-ठाकूर, का-ठाकर, मा-ठाकूर, मा-ठाकर |
| ४०) | पढेलिया | ४५) | वगळले |
| ४१) | पोमला | ४६) | वारली |
| ४२) | राठवा | ४७) | विटोलिया, कोटवालिया, वारोडिया |
| ४३) | सवर, सवरा | | |

## विमुक्त जाती-अ (V.J.)
## (आरक्षण ३%)

| अ.क्र. | जाती | | तत्सम |
|---|---|---|---|
| १) | बेरड | १) | अ) **, ब) नाईकवाडी, क) तलवार, ड) वाल्मिकी |
| २) | बेस्तर | २) | संचलू वड्डार |
| ३) | भामटा | ३) | अ) भामटी, ब) गिरणी वडडार, क) कामाटी, ड) पाथरुट, इ) टकारी (मुस्लिम धर्मीयांसह), फ) उचले, ग) घंटीचोर |
| ४) | कैकाडी<br>(मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, परभणी, उस्मानाबाद, नांदेड, जिल्हे व चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तालुका यात) | ४) | अ) धोंतले<br>ब) कोरवा<br>क) माकडवाले किंवा कोंचीकोरवा<br>ड) पामलोर<br>इ) कोरवी |
| ५) | कंजारभाट | ५) | अ) छारा, ब) कंजार, क) नात |
| ६) | कटाबू | - | |
| ७) | बंजारा | ७) | अ) गोर बंजारा, ब) लंबाडा/लंबारा, क) लंभाणी<br>ड) चरण बंजारा, इ) लभाण, फ) मथुरा लभाण<br>ग) कचकीवाले बंजारा, ह) लमान बंजारा<br>इ) लमाण/लमाणी, ज) लबान, क) ***<br>ल) धाली/धालीया, ग) धाडी/धारी, न) सिंगारी<br>व) नावी बंजारा, प) जोगी बंजारा, क्यु) **, र) **<br>स) बंजारी |
| ८) | **** | | पाल पारधी |
| ९) | राज पारधी | | अ) ***, ब) गाव पारधी, क) हरण शिकारी, ड) * |
| १०) | राजपूत भामटा | | अ) परदेशी भामटा, ब) परदेशी भामटी |
| ११) | रामोशी | | - |
| १२) | वडार | | अ) गाडी वड्डर, ब) जाती वड्डर, क) माती वड्डर, ड) पाथरवट, इ) संगतराश/दगडफोडू, ई) वड्डर |
| १३) | वाघरी | | अ) सलात, ब) सलात वाघरी |
| १४) | छप्परबंद (मुस्लिम धर्मीयासह) | | |

## भटक्या जमाती - ब (N. T. B)
## (आरक्षण २.५ %)

| अ.क्र. | जात | तत्सम |
|---|---|---|
| १) | गोसावी | १) बावा २) बैरागी ३) भारती ४) गिरी गोसावी ५) भारती गोसावी ६) सरस्वती पर्वत ७) सागर ८) बान किंवा वान ९) तीर्थ आश्रम १०) अरण्य घरभारी ११) संन्यासी १२) नाथपंथी गोसावी १३) पुरी |
| २) | बेलदार | ओड, मुस्लीम बेलदार, कापेवार, मुन्नर कापेवार, मुन्नर कापु, तेलंगा, तेलगी, पेंटरेडडी, बुकेकरी, **मुस्लीम राज, मुसलमान राज, मुस्लीम मेमार, मेमार, मुस्लीम गवंडी (शा.नि.दि. ३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** |
| ३) | भराडी | अ) बाळ संतोशी ब) किंगरीवाले क) नाथबावा ड) नाथ जोगी, गारपगारी इ) नाथपंथी डवरी गोसावी ई) नाथ, जोगी, नाथपंथी उ) डवरी |
| ४) | भुते | भोपे |
| ५) | ** | ----------- |
| ६) | चित्रकथी | ----------- |
| ७) | गारुडी | सापगारुडी (मुस्लीम धर्मियांसह) |
| ८) | लोहार | घिसाडी, घिसाडी लोहार किंवा गाडी लोहार किंवा चितोडी लोहार, रजपूत लोहार, पांचाळ लोहार, खाती, खातवाढी, जिनगर, चितोडीया-लोहार, **चितारी / जिनगर (शा.नि.दि. ३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** |
| ९) | गोल्ला | गोल्लेवार, गोलेर, गोलकर |
| १०) | गोंधळी | --------- |
| ११) | गोपाल | अ) गोपाल भोरपी ब) खेळकरी |
| १२) | हेळवे | १२) हिलव |
| १३) | जोशी | अ) बुडबुडकी ब) डमरुवाले क) कुडमुडे ड) मेंढगी इ) सरोदे, सरोदी फ) सहदेव जोशी म) सरवदे ह) सरोदा |
| १४) | काशी कापडी | ----------- |
| १५) | कोल्हाटी | डोंबारी |
| १६) | मैराळ | अ) दांगट ब) बीर |
| १७) | मसनजोगी | १) सुदगडसिध्द २) मपनजोशी ३) शारदाकार/ शार्दाकार/शारदाकाळ/बालासंतु |
| १८) | नंदीवाले | तिरमल |
| १९) | पांगूळ | --------- |
| २०) | रावळ | राऊळ किंवा रावळयोगी |
| २१) | सिक्कलगर | कटारी, सेक्क्लगर (मुस्लिम धर्मिय), शिख-शिकलीगार, शिख-शिकलीकर, कातारी शिकलगार, मुस्लिम शिकलगार, शिकलीगार, शिकलीगर, शिकलगार, शिकीलगर, शिकलकर, शिकलीकर, शिकलकरी, सिकलकर, सिकलीकर, सिकीलगर, सिकीलकर, सिकलीघर, सिक्कलकर, सिकलीगर, सिकलगर, सिक्कलीगर, सायकलगर, सैकलकर, सैकलगर, **कातारी-शिकलकर (शिकलीकरी) हिंदू धर्मीयांसह (शा.नि. दि. ३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** |
| २२) | वगळले | ---------- |

| | | |
|---|---|---|
| २३) | वैदू | |
| २४) | वासुदेव | |
| २५) | भोई | १) झिंगा भोई २) परदेशी भोई ३) राजभोई ४) भोई ५) कहार ६) गोंडिया कहार ७) धुरिया कहार ८) किरात ९) मछुआ १०) मांझी ११) जातिया १२) केवट १३) ढीवर १४) धीवर १५) धीमर १६) पालेवार १७) मंछेद्र १८) नावाडी, भोई नावाडी, तारु-नावाडी १९) मल्हार २०) मल्हाव २१)बोई २२) गाढव भोई २३) खाडी भोई २४) खारे भोई २५) ढेवरा २६) भनारा, भनारी, भनारे **२७) निषाद २८)मल्ला २९) मल्लाह ३०) नावीक ३१) ओडा ३२) ओडेवार ३३) ओडेलू ३४) बेस्तार ३५) बेस्ता ३६) बेस्ती ३७) बेस्तालू ३८) भनार (शा.नि. दि. ३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** |
| २६) | बहुरुपी | अ) बोहरशी ब) बहुरुपिया क) भोरपी ड) रायरंध्र इ) अय्यार व अय्यारी |
| २७) | ठेलारी (धुळे, नाशिक, जळगाव व औरंगाबाद जिल्ह्यात) | ------- |
| २८) | ओतारी | अ) ओतनकर ब) ओतकर क) वतारी ड) ओझारी इ)वतकर, वतकरी, वतनकर, वतोकर, ओतकरी, ओतोकारइ वतोकार. |

## भटक्या जमाती क (N.T.-C)
## (आरक्षण ३.५%)

| | | |
|---|---|---|
| २९) | धनगर | १)अहिर, **धनगर अहिर** २) डांगे ३) गटरी ४) हंडे ५) तेलवर ६)हटकर ७)हाटकर ८) शेगर, सगर, सेगर ९) खुटेकर १०) तेलंगी ११)तेल्लारी १२)कोकणी - धनगर १३) कानडे १४) वऱ्हाडे धनगर १५) झाडे १६) झेंडे १७) कुरमार १८) माहुरे १९) लाडसे २०) सनगर २१) धनवर २२) गडारिया २३) गड्री २४) गढरी २५) डंगेधनगर व डोंगरी धनगर **२६) गडरिया / गडारिया (शा. नि. दि. ३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** |

## भटक्या जमाती ड (N.T.-D)
## (आरक्षण २ %)

| | | |
|---|---|---|
| ३०) | वंजारी | वंजार, वंजारा |

## भटक्या जमाती - ब (N. T. B)
## (आरक्षण २.५ %)

| | | |
|---|---|---|
| ३१) | मरीआईवाले, कडकलक्ष्मीवाले, मरगम्मावाले | -------- |
| ३२) | गिहरा / गहरा | -------- |
| ३३) | गुसाई / गोसाई | --------- |
| ३४) | मुस्लीम मदारी, गारुडी, सापवाले व जादूगर | --------- |
| ३५) | भारतीय इराणी | --------- |
| ३६) | गवळी, मुस्लीम गवळी, गवलान, ग्वालवंश | --------- |
| ३७) | दरवेशी, वाघवाले - शाह (मुस्लीम धर्मीय), अस्वलवाले | --------- |
| ३८) | **बागडी (भज - ब) (शा. नि. दि. ३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** | ---------- |

## महाराष्ट्रातील सर्व इतर मागासलेल्या वर्गाची यादी (आरक्षण १९ टक्के)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अलितकार | ३८) | वगळले |
| २) | वगळले **(शा. नि. वि. ३० जानेवारी, २०१४)** | ३९ | गढवी |
| ३) | वगळले | ४०) | वगळले |
| ४) | बडीआ | ४१) | वगळले |
| ५) | बजानिआ | ४२) | गोचाकी |
| ६) | बाजीगर | ४३) | गुरव |
| ७) | बुट्टाल | ४४) | वगळले |
| ८) | भांड, छप्पर भांड, मुस्लिम भांड | ४५) | गवंडी, गुर्जर-कडीया |
| ९) | भवैया किंवा तारगल | ४६) | हलेपैक |
| १०) | भाविण | ४७) | वगळले |
| ११) | भिस्ती किंवा पखाली, सक्का | ४८) | वगळले |
| १२) | वगळले | ४९) | जगीयासी |
| १३) | बारी किंवा बारई | ५०) | जजाक |
| १४) | बेरीया | ५१) | जतिया |
| १५) | बेसदेवा | ५२) | जातिगर |
| १६) | भडभुंजा, भूजवा, भूंजवा, भूर्जी, भरडभूंजा, भूरंजी, भूंज | ५३) | जव्हेरी, परजीया सोनी |
| १७) | भांटा | ५४) | वगळले |
| १८) | भट, भाट | ५५) | जोगीण |
| १९) | चमथा | ५६) | जोहारी |
| २०) | चांदलगडा | ५७) | जुलाहा, अन्सारी |
| २१) | चरण किंवा गढवी | ५८) | जंगम, **मालाजंगम (विरभद्र) (शा.नि.दि.३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** |
| २२) | चारोडी | ५९) | वगळले, चितारी-जिनगर |
| २३) | चिप्पा, छिपा | ६०) | जाडी |
| २४) | दास किंवा दांगडीदास | ६१) | वगळले |
| २५) | दावगर | ६२) | कम्मी |
| २६) | देपला | ६३) | कापडी |
| २७) | देवळी | ६४) | वगळले |
| २८) | देवदिग, देवाडिगा, **शेरीगार व मोईली (शा.नि.दि. ३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** | ६५) | खाटी |
| २९) | वगळले | ६६) | वगळले |
| ३०) | ढोली, हश्मी/डफली | ६७) | वगळले |
| ३१) | वगळले | ६८) | वगळले |
| ३२) | वगळले | ६९) | कोंगाडी |
| ३३) | वगळले | ७०) | कोर्चर |
| ३४) | वगळले | ७१) | वगळले |
| ३५) | गंधारप | ७२) | कचोरा |
| ३६) | गुजराथ बोरी | ७३) | कादेरा |
| ३७) | वगळले | ७४) | कामाटी |

| | | | |
|---|---|---|---|
| ७५) | कसबी | ११०) | नोनीया, लोनिया, लुनिया, नुनिया |
| ७६) | वगळले | १११) | नक्काशी |
| ७७) | वगळले | ११२) | नीली |
| ७८) | वगळले | ११३) | नीलकांती |
| ७९) | वगळले | ११४) | नेकार जाडा |
| ८०) | कुचबंध | ११५) | पधारिया |
| ८१) | कुछारिया | ११६) | पडीयार |
| ८२) | कुंभार किंवा कुम्हार, कुंबारा, कुलाला, मुल्या | ११७) | पात्रदावरु |
| ८३) | कुणबी (पोटजाती-लेवा कुणबी, लेवा पाटील, लेवा पटीदार, मराठा कुणबी व कुणबी मराठा. | ११८) | फासेचरी |
| ८४) | वगळले | ११९) | फुडगी |
| ८५) | कची, **कोइरी, कोईरी, कोयरी व कुशवाहा (शा.नि.दि.३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** | १२०) | पखाली, सक्का |
| ८६) | काठी | १२१) | पांचाळ |
| ८७) | कासार (पोटजाती-कंचार, कचारी) | १२२) | पांका |
| ८८) | लाभा | १२३) | पेर्की, पेरकेवाड, पेरीका, पेरीके, पेरका |
| ८९) | लडीया, लढीया, लरिया | १२४) | पुतली गर |
| ९०) | लडाफ, लइडाफ (नद् दाफ), मन्सुरी | १२५) | परीट किंवा धोबी, तेलगू मडेलवार (परीट) **धोबी, परीट, तेलगू मडेलवार (परीट) मडवळ, वट्टी (वॅटस), रजक (शा.नि.दि.१ मार्च २०१४ प्रमाणे) लिंगायत परीट, लिंगायत धोबी (शा.नि.दि.४ सप्टेंबर, २०१४ प्रमाणे)** |
| ९१) | लखेरीया | १२६) | पाटकर, सोमवंशीय सहस्त्रार्जून क्षत्रिय, पटवेकरी, पटवेगार, पटेगार, पट्टेगार, पटवी, क्षत्रिय पाटकर, खत्री, क्षत्रिय |
| ९२) | वगळले, हडाड/मिस्त्री (लुहार, लुवार) | | |
| ९३) | **माच्ची (शा.नि.दि. १ मार्च २०१४ प्रमाणे) वगळले** | | |
| ९४) | मानभाव, महानुभाव भोपी, मानभाव भोपी | | |
| ९५) | वगळले | | |
| ९६) | मारवार बोरी | | |
| ९७) | मे | | |
| ९८) | मिना | १२७) | फुलारी |
| ९९) | महली | १२८) | राचेवर |
| १००) | मेदार | १२९) | राईकर, रायीकर |
| १०१) | म्हाली | १३०) | बंडी |
| १०२) | मिठा | १३१) | रचबंधिया |
| १०३) | वगळले | १३२) | रंगारी |
| १०४) | मथुरा | १३३) | रँग्रेझ |
| १०५) | नामधारी | १३४) | राओत, रावत, राऊतीया |
| १०६) | नामधारी पैक | १३५) | रंग्रेज (भावसार, रंगारी) |
| १०७) | निरशिकारी | १३६) | वगळले |
| १०८) | नावी, न्हावी (सलमानी, हजाम), वारिक, नाभिक, नापित, म्हाली, वालंद, हडपद, हज्जाम, नावीसेन, सलमानियाँ | १३७) | वगळले |
| १०९) | नेथुरा | १३८) | वगळले |

| | | | |
|---|---|---|---|
| १३९) | वगळले | १७२) | नीलगार, निली, निराळी |
| १४०) | संजोगी | १७३) | कोसकांती देवांग |
| १४१) | सरानिया | १७४) | सुतार, सुथार, वाढई, बाढी, वढई बाढई, बढई, वाढी, वाडी, वधाई, पोटजाती : झाडे सुतार, पांचाळ सुतार, **लिंगायत सुतार (शा.नि.दि.४ सप्टेंबर, २०१४)** |
| १४२) | वगळले | | |
| १४३) | वगळले | | |
| १४४ | वगळले | १७५) | फुतगुडी |
| १४५) | सुप्पालिंग, **सपलिंग, सपलिगा, सपालिगा, सपालिग, सुपलिग, सुप्पलिग, सुप्पलिगा (Suppalig, Sappaliga) शा.नि.दि.१ मार्च, २०१४ प्रमाणे** | १७६) | वगळले |
| १४६) | सुथारिया (सिंधमधील) | १७७) | पिंजारा, पिंजारी, मन्सुरी |
| १४७) | साहिस, साईस, शिस | १७८) | वगळले |
| १४८) | सपेरा | १७९) | भिलाला |
| १४९) | शिलावट | १८०) | वगळले |
| १५०) | वगळले | | |
| १५१) | वगळले | १८१) | तेली, तिळवण तेली, मराठा तेली, तराणे तेली, देशकर तेली, एरंडेल तेली, लिंगायत तेली, एक बैल तेली, दोन बैल तेली, सावतेली, एक बहिया तेली |
| १५२) | वगळले | | |
| १५३) | शिंपी, इद्रिसी/दर्जी, साईसुतार, जैन शिंपी, श्रावक शिंपी, शेतवाळ, शेतवाल, सैतवाळ, सैतवाल, मेरु शिंपी/मेरु क्षत्रिय शिंपी, **तेलगु दर्जी, तेलगु शिंपी (शा.नि.दि.३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट) नामदेव शिंपी (शा.नि.दि.१ मार्च, २०१४ प्रमाणे)** | | |
| १५४) | सोनार | १८२) | माळी (पोटजाती-फुलमाळी, फुले, हळदे, काचा, कडू, बावने, अधप्रभू, अधशेटी, जिरे, उंडे, लिंगायत माळी इ.) बागवान (मुस्लीम धर्मीय) भारत बागवान, मरार, मराळ, कोसरे, गासे वनमाळी, सावतामाळी, चौकळशी, वाडवळ, राईन (बागवान), पाचकळशी, तत्सम जाती : सोमवंशीय-पाठारे, क्षत्रिय, पाठारे- क्षत्रिय-पाचकळशी, पाठारे क्षत्रिय, सुतार सास्टीकर, घोडेखाउ, एस.के.पी. |
| १५५) | तांडेल | | |
| १५६) | वगळले | | |
| १५७) | तारगला | | |
| १५८) | थेटवार | | |
| १५९) | थोरीया | | |
| १६०) | तांबट, त्वष्टा कासार, कासार | | |
| १६१) | थोग्ती | | |
| १६२) | वडी | १८३) | लोणारी |
| १६३) | वगळले | १८४) | वगळले |
| १६४) | वंसफोड, हिंदू धरकार | १८५) | तलवार-कानडे/कानडी |
| १६५) | वगळले | १८६) | रघवी (विदर्भ जिल्हयातील) |
| १६६) | वर्थी | १८७) | भंडारी, बावर्ची/भटीवारा (मुस्लीम धर्मीय) |
| १६७) | वगळले | १८८) | गानली किंवा गांडली |
| १६८) | येरकुला | १८९) | पोवार किंवा पवार (पोवार किंवा पवार आडनावे) भोयर, भोइर, भोयीर |
| १६९) | आगरी, आगळे किंवा काळण | १९०) | काथार, काथारवाणी, कंठहारवाणी, नेवी धाकड, मिटकरीवाणी, वाणी, बोरळ (लिंगायत वाणी किंवा लाडवाणी सोडून), बोराळ, बोरुळ, बोरड, तांबोळी, **लाडशाखीय वाणी (शा.नि.दि.३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट) वैश्यवाणी, वैश्य-वाणी, वै.वाणी, वैश्य वाणी V.Wani., पानारी (शा.नि.दि.१ मार्च, २०१४ प्रमाणे) लिंगायत वाणी, लिंगायत तांबोळी (शा.नि.दि.४ सप्टेंबर, २०१४ प्रमाणे)** |
| १७०) | भावसार | १९१) | मोमीन, अन्सारी |
| १७१) | कुरहीनशेट्टी | १९२) | फकीर बंदरवाला |

| | | | |
|---|---|---|---|
| १९३) | वगळले | २३३) | चिमूर |
| १९४) | घडशी | २३४) | चिंताला |
| १९५) | तांबोळी.(मुस्लीम धर्मीय पानफरोश) | २३५) | डाकालेरु |
| १९६) | अनुसूचित जातीतून ख्रिचन धर्म स्विकारलेले | २३६) | दर्जी |
| १९७) | लंझाड, लझाड | २३७) | वगळले |
| १९८) | यादव, **अहिर (शा.नि.दि. २४ जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** | २३८) | कुरबा, कुरुबार |
| १९९) | लाडसी | २३९) | हरकांत्रा, मांगेली, मांगेले, पागे, संदुरी |
| २००) | वगळले | २४०) | **वॅटस, गडवाल रजाक (शा.नि.दि. १ मार्च २०१४ प्रमाणे वगळले)** |
| २०१) | वगळले | २४१) | डोम्मारा |
| २०२) | अतार | २४२) | गाडाबा किंवा गोडबा |
| २०३) | औधिया | २४३) | गंगाणी |
| २०४) | बादक, बारव | २४४) | गारोडी |
| २०५) | बगळू | २४५) | गोल्लेर |
| २०६) | मारवार बाओरी, मारबार वाघरी | २४६) | गोदळा |
| २०७) | उदासी, वगळले | २४७) | हाबुरा |
| २०८) | बालसंथनम | २४८) | हरणी |
| २०९) | मथूरा बंजारा | २४९) | हिल - रेडिडस |
| २१०) | शिंगाडे बंजारा | २५०) | देवेरी |
| २११) | लंबाडे | २५१) | विनकर, वन्या, बनकर, **बुनकर (शा.नि.दि. ३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** |
| २१२) | फानडे बंजारा | २५२) | काछिया |
| २१३) | सुनार बंजारा | २५३) | कोराच, पाडलोर |
| २१४ | धालिया बंजारा | २५४) | कलाल, कलार, लाड, लाडवक, गौड कलाल, शिव्हारे, जैन कलार, (लाड ब्राम्हण वगळून) |
| २१५) | शिंगाडया बंजारा | | |
| २१६) | बाओरिया | | |
| २१७) | कोळी बारीया | २५५) | कांदेल |
| २१८) | बथिनी | २५६) | कसेरा |
| २१९) | बेगरी | २५७) | कसाई, कसाब, कुरेशी |
| २२०) | भाम्पटा किंवा घंटीचोरे किंवा परदेशी | २५८) | कटीपामुला |
| २२१) | पोंग | २५९) | किरार |
| २२२) | दासर | २६०) | ख्रिश्चन कोळी |
| २२३) | उचिला | २६१) | कोराचार किंवा कोरवे |
| २२४) | भांडदरा, बिल्लवा, थिया, बेलछेडा | २६२) | कोडकू सह कोरवा |
| २२५) | खारवी, धीवर भोई | २६३) | कोमाकपू |
| २२६) | भोयर | २६४) | कोंडू |
| २२७) | बिंदली | २६५) | लखारी |
| २२८) | बुरबुक | २६६) | लोहार-गाडा, दोडी, खतवली, पांचाळ, पंचाल |
| २२९) | चादर | २६७) | चुनारी |
| २३०) | चक्रवदय-दासर | २६८) | वगळले |
| २३१) | चांडाळ | २६९) | माहिल |
| २३२) | चेन्वू किंवा चेन्ववार | २७०) | मैदासी |

| | | | |
|---|---|---|---|
| २७१) | माझवार | ३०८) | ओडेवार |
| २७२) | मतियारा, मतिहारा | ३०९) | मण्यार (बांगडीवाला), मण्यार, मणियार व मणेरी |
| २७३) | मानकर खालु | ३१०) | जातगार |
| २७४) | मोंडीवार, मोंडीवारा | ३११) | कराडी |
| २७५) | मुंडा | ३१२) | कुंकूवाले |
| २७६) | हजाम, कालसेरु, नावलिगा, कान्शी, नाभिक, नाई, वालंद | ३१३) | वगळले/वगळले/ खातवाढई |
| २७७) | पाचभोटला, पाचबोटला | ३१४) | वगळले |
| २७८) | पदमपारि | ३१५) | कोहळी |
| २७९) | भिस्ती | ३१६) | खाटिक, कुरेशी, खाटिक, कसाई |
| २८०) | पामूला | ३१७) | डांगरी |
| २८१) | पंचमा, **पंचम (शा.नि.दि. ३० जानेवारी, २०१४ प्रमाणे समाविष्ट)** | ३१८) | वेडू (वाघरी) |
| २८२) | पंडा | ३१९) | धावड |
| २८३) | फर | ३२०) | निऱ्हाळी (निराळी) |
| २८४) | पिंजारी | ३२१) | चित्रकथी हरदास |
| २८५) | पुरवाली | ३२२) | बेस्ता, बेस्ती, बेस्तल्लू |
| २८६) | राचभोया | ३२३) | परिवार |
| २८७) | राउतिया | ३२४) | सावकलार |
| २८८) | संगारी | ३२५) | हणबर |
| २८९) | संताल | ३२६) | दोडे गुजर, गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर, रेवा गुजर, सुर्यवंशी गुजर, बडगुजर, तत्सम जाती :- लोंढरी/ पेंढारी |
| २९०) | साऊन्ता किंवा सोन्ता | | |
| २९१) | सावतेली | | |
| २९२) | सारे | ३२७) | पहाड/ पहाडी |
| २९३) | भावगर, शिव शिंपी, नामदेव | ३२८) | गडरिया |
| २९४) | शिंगडाव किंवा शिंगाड्या | ३२९) | मच्छिमार (दाल्दी) |
| २९५) | सिंधूर | ३३०) | भालदार |
| २९६) | सोरें | ३३१) | अलकरी |
| २९७) | सुत्रा | ३३२) | पेंढारी |
| २९८) | सुत्राई | ३३३) | यलम/येलम/ यल्लम |
| २९९) | भडाई | ३३४) | महात/माहूत/महावत |
| ३००) | गंणिगा, गांची | ३३५) | फकीर |
| ३०१) | थोटेवाडू | ३३६) | लोंध, लोधा, लोधी |
| ३०२) | तिमाली | ३३७) | नालबंद |
| ३०३) | वालवाई | ३३८) | कुलेकडगी, कुल्लेकडगी, कुलाकडगी, कुल्लाकडगी, **लिंगायत कुल्लेकडगी (शा.नि.दि.४ सप्टेंबर, २०१४ प्रमाणे)** |
| ३०४) | वडडेर (कालावडेर किंवा पाथरोड) | ३३९) | मुजावर |
| ३०५) | वनाडी | ३४०) | मुलाणा, मुलाणी, मुलाणे |
| ३०६) | येनाडिवाड्स | ३४१) | ईस्ट इंडियन, ईस्ट इंडियन ख्रिश्चन, ईस्ट इंडियन कॅथॉलिक |
| ३०७) | येरगोलावाड किंवा थेल्ला पामालवाडस | ३४२) | नेवेवाणी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४३) | वगळले, **(शा. नि. दि. ३० जानेवारी २०१४ प्रमाणे)** | ३४७) | राठोड (आर्थिक निकषाच्या अधिन राहून) **(शा. नि. दि. ३० जानेवारी २०१४ प्रमाणे)** |
| ३४४) | मुस्लीमधर्मीय काकर | ३४८) | मारवाडी न्हावी **(शा. नि. दि. ३० जानेवारी २०१४ प्रमाणे)** |
| ३४५) | दोरीक | ३४९) | गुरडी, गुटरडी-कापेवार, गुराडी, गुरड-कापू, व **गुरडी-रेडडी (शा. नि. दि. ३० जानेवारी २०१४ प्रमाणे) गुर्डा-कापेवार (शा. नि. दि. १ मार्च २०१४ प्रमाणे बदल), गुरडी कापेवार (शा.नि.दि.४ सप्टेंबर, २०१४ प्रमाणे)** |
| ३४६) | पटवा | ३५०) | गावडा, गावडे (GAWADA, GAVADA, GAWADE, GAVADE) **(शा. नि. दि. १ मार्च २०१४ प्रमाणे)** |

## विशेष मागास प्रवर्ग (S.B.C.)
## (आरक्षण २%)

| अ.क्र. | जातीचे नांव |
|---|---|
| १) | गोवारी |
| २) | वगळले |
| ३) | १) कोष्टी, २) हलबा कोष्टी, ३) वगळले, ४) साळी, स्वकुळ साळी, ५) लाडकोष्टी, ६) गढेवाल कोष्टी, ७) देशकर, ८) वगळले, ९) पद्मशाली, तत्सम जातः सालेवार, चेनेवार, चनेवार, चन्नेवार १०) देवांग, ११) काची बंधे, १२) पटवीस, १३) सतसाले, १४) साडे, १५) जैन कोष्टी, **तत्सम जाती : लिंगायत कोष्टी, लिंगायत देवांग, लिंगायत साळी (शा.नि.दि.४ सप्टेंबर, २०१४ प्रमाणे)** |
| ४) | १) कोळी, तत्सम जाती, २) मच्छिमार कोळी, ३) अहीर कोळी, ४) खानदेशी कोळी, ५) पानकोळी, ६) ख्रिश्चन कोळी, ७) चुंबळे कोळी, ८) पानभरे कोळी, ९) कोळी सुर्यवंशी, १०) मांगेला, ११) सोनकोळी, १२) वैती, १३) खारवा किंवा खारवी, १४) अनुसूचित जमातीमध्ये समावेश नसलेले कोळी, **१५) माच्छी, मिटना, माच्छी-मिटना (शा.नि.दि.१ मार्च, २०१४ प्रमाणे)** |
| ५) | १) मुन्नेरवार, २) मुन्नुरवार, ३) मुन्नुर, ४) तेलगु मुन्नुर, ५) मुन्नुरवार तेलगु, ६) वगळले ७) वगळले, ८) तेलगु कापेवार, ९) मुन्नरवाड, १०) तेलगु फुलमाळी |
| ६) | गाबीत |
| ७) | मुस्लिम धर्मीय भंगी / मेहतर / लालबेग / हलालखोर / खाकरोब |